# ''नाशिक जिल्ह्याच्या विशेष संदर्भात वंचितांच्या समाजजीवनातील परिवर्तनाचा अभ्यास (कालखंड २० वे शतक)''

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतंर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन प्रबंध


**संशोधक**

गणेश दादासाहेब रूपवते

(कायम नोंदणी क्रमांक : ०२११३००७८३९)

**मार्गदर्शक**

प्राचार्य डॉ. राजेंद्र पी. भामरे,

इतिहास विभाग प्रमुख,

समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान

व वाणिज्य महाविद्यालय नामपूर, ता. बागलाण, जि. नाशिक.


**नोव्हेंबर २०१९**

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत ''इतिहास'' या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी रुपवते गणेश दादासाहेब यांनी ''नाशिक जिल्ह्याच्या विशेष संदर्भात वंचितांच्या समाजजीवनातील परिवर्तनाचा अभ्यास (२० वे शतक)'' या विषयावरील संशोधन प्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर संशोधन प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत.

स्थळ : नाशिक

दिनांक : नोव्हेंबर २०१९.

**मार्गदर्शक**

प्राचार्य डॉ. राजेंद्र पी. भामरे

# मूल्यमापन प्रमाणपत्र

This is to Certify that the thesis entitled, ''**नाशिक जिल्ह्याच्या विशेष संदर्भात वंचितांच्या समाजजीवनातील परिवर्तनाचा अभ्यास (२० वे शतक)**'' Submitted by Shri. Ganesh Dadasaheb Rupwate to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of Philosophy (Ph.D.) is bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or part have not been submitted to any other institute or university for the award of any other degree or diploma.

Furthermore in accordance with the UGC rules 2009 that govern the Ph.D. student. The student has completed the due process that includes Interview.

Place : Nashik

Date : Nov - 2019

Signature of Research Guide

# प्रतिज्ञापत्र

मी रुपवते गणेश दादासाहेब प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्र विद्या शाखांतर्गत ''इतिहास'' या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर केलेला *''नाशिक जिल्ह्याच्या विशेष संदर्भात वंचितांच्या समाजजीवनातील परिवर्तनाचा अभ्यास (२० वे शतक)''* हा संशोधन प्रबंध मी स्वत: संशोधित केलेला आहे. या लिखाणासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. हा प्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

स्थळ : नाशिक

दिनांक : नोव्हेंबर २०१९.

**संशोधक विद्यार्थी**

गणेश दादासाहेब रुपवते

# मनोगत

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने या संशोधनासाठी संशोधक विद्यार्थी म्हणून मला संधी दिल्याबद्दल प्रथम विद्यापीठाचे मन:पूर्वक आभार मानतो. सदर संशोधनासाठी मला संशोधक विद्यार्थी म्हणून स्वीकारणारे मा. डॉ. राजेंद्र भामरे सरांच्या ऋणात राहणे मी पसंत करेन. सदर संशोधन काळात टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे इतिहास विभागप्रमुख मा. डॉ. नलिनी वाघमारे यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन करून उपयुक्त सूचना देऊन माझ्या कामात मदत केल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सोशल सायन्सचे अधिष्ठाता मा. डॉ. बी. डी. कुलकर्णी यांनी संशोधन काळात मार्गदर्शन करून योग्य त्या सूचना केल्या. त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विभागातील डॉ. यादव मॅडम यांनी वेळोवेळी प्रोत्साहन देऊन योग्य ती मदत केल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. विद्यापीठाच्या ग्रंथालयातील ग्रंथपाल व कर्मचारी वर्गाने ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ, पुस्तके, अहवाल, मासिके वेळोवेळी व तत्परतेने उपलब्ध करून दिल्याबद्दल या ग्रंथालय विभागाचे मन:पूर्वक आभार मानतो.

आमच्या डांग सेवा मंडळ संस्थेतील कला महाविद्यालय अभोणे येथील प्राचार्य डॉ. एस. आर. निकम, दादासाहेब बिडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. बी. टोचे यांचे तसेच कला महाविद्यालय अभोणे येथील ग्रंथपाल प्रा. ए. आर. वाढोरे यांनी वेळोवेळी पुस्तके, मासिके उपलब्ध करून दिले त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. कला महाविद्यालय अभोणे येथील प्रा. डॉ. डी. ए. सोनवणे, प्रा. पी. व्ही. देशपांडे, प्रा. डॉ. डी. के. नेरपगार, प्रा. आर. एम. पगार, प्रा. डॉ. एम. एन. पवार, डॉ. दिनकर भदाणे, प्रा. मनोज सूर्यवंशी, प्रा. किशोर पवार, प्रा. एल. के. बागूल, श्री. आर. पी. पगारे, श्री. पी. पी. नंदाळे व इतर सहकारी वर्गाकडून वेळोवेळी मिळालेल्या सहकार्याबद्दल मी मन:पूर्वक ऋण व्यक्त करतो. तसेच कला महाविद्यालय

मानूर येथील प्रा. डॉ. के. के. खैरनार व वणी महाविद्यालयाचे डॉ. वाय. एम. साळुंके यांनी संशोधन काळात सहकार्य व मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

विशेष आभार-संशोधनासाठी सर्वतोपरी मदत करणाऱ्या डांगसेवा मंडळाच्या अध्यक्षा मा. श्रीमती हेमलताताई बिडकर, डांग सेवा मंडळाचे उपाध्यक्ष मा. आण्णासाहेब मराठे, डांगसेवा मंडळाच्या सचिव मा. सौ. मृणालताई जोशी, कला महाविद्यालय अभोणे येथील स्थानिक विकास समितीचे सदस्य मा. श्री. शेखरजी जोशी यांचे मन:पूर्वक आभार मानतो. माझ्या या कार्यात मला सतत प्रेरणा देणारे व कौटुंबिक जबाबदारी पार पाडून मला पूर्णवेळ संशोधनासाठी मोकळीक देणारी माझी आई कृष्णाबाई दादासाहेब रुपवते हिचा मी ऋणी आहे. तसेच माझी सहचारिणी प्रा. सौ. रागिनी गणेश रुपवते हिनेदेखील मला संशोधनकार्यासाठी मोठा हातभार लावला त्याबद्दल मी तिचेदेखील येथे आभार मानू इच्छितो.

याशिवाय माझे बंधु श्री. प्रदिप रुपवते, वहिनी सौ. सविता रुपवते, बंधु श्री. राजेंद्र रुपवते, वहिनी सौ. सरला रुपवते, बंधु श्री. अशोक रुपवते, वहिनी सौ. कांचन रुपवते, माझा मुलगा चि. निनाद व मुलगी कु. प्रियंका तसेच मनोहर रुपवते, सौ. माया रुपवते या कुटुंबातील सदस्यांचे देखील मी आभार व्यक्त करतो. या संशोधन प्रबंधाची वेळेवर उत्कृष्ट संगणकीय छपाई मुद्रितशोधनाचे काम पूर्ण करून दिल्याबद्दल सनय प्रकाशनच्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. तसेच या संशोधन कार्यात ज्या ज्ञात अज्ञातांचे मला कळत नकळत सहकार्य लाभले त्या सर्वांचे मी आभार मानतो.

स्थळ : नाशिक

दिनांक : नोव्हेंबर २०१९.

**संशोधक विद्यार्थी**

गणेश दादासाहेब रुपवते

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | १-४३ |
| २. | वंचिताच्या चळवळीचा उगम व विकास | ४४ ते १२१ |
| ३. | कामगार चळवळ | १२२ ते १६५ |
| ४. | आदिवासी चहवळ : परिवर्तनाचा आढावा | १६६ ते १९८ |
| ५. | आर्थिक व शैक्षणिक परिवर्तन | १९९ ते २६६ |
| ६. | साहित्यीक व सुधारकांचे योगदान | २६७ ते ३०४ |
| ७. | उपसंहार | ३०५ ते ३१३ |
| ८. | संदर्भ ग्रंथ सूची | ३१४ ते ३२० |
| * | परिशिष्टे | ३२१ ते ३२६ |

## प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

'इतिहास म्हणजे सनावळ्या', इतिहास म्हणजे राजाची कहानी किंवा गतकालीन राजकारण या इतिहासाहविषयीच्या कल्पना आता आमूलाग्र बदलल्या आहेत. इतिहास म्हणजे काय या मूलभूत प्रश्नाच्या विचाराला तात्त्विक बैठक प्राप्त झाली आहे. इतिहास ही मानवी जीवनाची सर्वांगीण कथा आहे. व्यक्ती, समाज, स्थळ आणि काल यांचे संदर्भ घेऊन इतिहास घडत असतो. भूतकाळातील घटनांचा, प्रसंगाचा, विचारांचा, संस्कृतीचा आणि त्याविषयीच्या इतिहासाच्या स्मृतींचा तेव्हाच खरा अर्थबोध होतो. जेव्हा त्या स्मृतींना किंवा आठवणींना काळाचा संदर्भ असतो.

एकविसाच्या शतकाच्या प्रारंभी विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या अभ्यासक्रमांमध्ये काही मूलभूत बदलांची प्रक्रिया सुरु केली. इतिहास केवळ गतकाळाची गोष्ट, राजघराण्यांची कहाणी, घडलेल्या घटनांचा इतिवृन्तांत हा पारंपारिक समज आता इतिहास जमा झाला असून नव्याने अभ्यास संशोधन करणाऱ्या संशोधकांनी त्यापासून बोधही घेतला आहे. इतिहासाच्या अभ्यासात सामान्य माणसाचे योगदान अभ्यासले जाऊन तो आता केंद्रबिंदू झाला आहे. इतिहास जसा *"His-story'* आहे. तसाच तो "*Her-story'* देखील आहे. इतिहास संशोधनामध्ये सखोलता, नव्या जाणिवा, वंचित घटक, ॲनल्सफ, सबार्ल्टन, स्रीवाद ते राजकीय मांडणी, पांरपारिक साधनांसमवेतच अन्वयार्थी दृष्टिकोण तसेच माहिती व तंत्रज्ञानाचा वापर, स्थानिक प्रेरणा, मिथके, लोककथांमधील सत्यांश, इत्यादी सर्व घटकांचा अभ्यास करुन महाराष्ट्रातील अनेक नवशिक्षितांनी समाजातील वंचितांसाठी कार्य केले. भारतभर ज्या ज्या ठिकाणी शोषित घटकांसाठी सुधारकांनी समाज जागृती करण्याचे प्रयत्न केले असे प्रयत्न महाराष्ट्रातही सुरू झालेले दिसून येतात. यातील काही घटकांची चळवळींची नोंद

ज्यांनी समाजातील तळागाळातील इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला त्यांच्या इतिहास लेखनात आलेली आहे.

नाशिक जिल्ह्याचे ऐतिहासिक महत्त्व अनन्य साधारण आहे. रामायण काळापासून त्या शहराचा उल्लेख असलेला दिसून येतो. तसेच भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासातही नाशिक शहरात झालेल्या ऐतिहासिक घडामोडींचा उल्लेख आहे. परंतु या जिल्हयात वंचित समाजाविषयी या समाजजीवनातील परिवर्तनाविषयी सत्याग्रह, चळवळी याविषयी फारसा उल्लेख (अभ्यास) असलेला दिसत नाही. प्रस्तुत संशोधनातून संशोधकाने नाशिक जिल्हयातील वंचितांसाठी केलेल्या कार्याचा व त्यामुळे वंचितांमध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास केलेला आहे.

नाशिक जिल्हयात विविध ठिकाणी विसाव्या शतकात शेतकरी चळवळी, जमीन हक्क विषयक चळवळी, शेतमजुरांच्या चळवळी, दलित (अस्पृश्य) चळवळ, आदिवासींच्या चळवळी, औद्योगिक कामगार चळवळी, शैक्षणिक चळवळी व सुरूवात इत्यादी चळवळीत व समाज परिवर्तनासाठी प्रयत्न झालेला आहे. यासाठी समाज सुधारकांनी, नेत्यांनी, राजकीय कार्यकर्त्यांनी विशेष योगदान दिलेले आहे.

जातिव्यवस्था, गरिबी, दारिद्रय, भेदभाव इत्यादी घटकांमुळे समाजातील एक वर्ग नेहमी वंचित असलेला दिसून येतो. नाशिक जिल्ह्यात संपूर्ण विसाव्या शतकात शोषित, वंचित समाजासाठी विविध क्षेत्रातून सुधारकांच्या प्रयत्नांमुळे सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात विविध चळवळी, सत्याग्रह, मोर्चे इत्यादींमुळे जो बदल घडून आला याचा संशोधनात्मक अभ्यास संशोधकाने प्रस्तुत प्रबंधात केलेला आहे.

## विषयाची निवड

संशोधनासाठी ''*नाशिक जिल्ह्याच्या विशेष संदर्भात वंचितांच्या समाजजीवनातील परिवर्तनाचा अभ्यास* (कालखंड विसावे शतक)'' हा विषय निवडीचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे.

१. सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक बदलातून नवीन शक्तींचा उदय झाला. त्यावेळी त्याचा फायदा समाजातील प्रभावी वर्गांनी

(शक्तिशाली गटांनी) घेतला. त्यांनी वंचितांच्या तुलनेत जास्त प्रगती साधली. तसेच त्यांनी दुर्बलांना कायम बाजूला ठेवण्याचा प्रयत्न केला. याची आणखी कारणे कोणती आहेत व दुर्बल घटक बाजूला राहिल्याने त्यांच्यातील परिवर्तन मागे राहिले याबाबी प्रस्तुत अभ्यासातून स्पष्ट होऊ शकतील.

२. समाजातील वंचितांच्या गटांना जगणे व नैसर्गिक हक्क सुध्दा आधीच्या काळात नाकारला गेला होता. ज्ञान, संपत्ती, सत्ता यापासून वंचितांना बाजूला ठेवण्यात आले होते. त्यामुळे समाज विभागला गेला होता. तो एकात्म बनू शकला नाही, संघटित होऊ शकला नाही. याविषयीचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे.

३. भारतीय इतिहास लेखन क्षेत्रातील अभ्यासकांच्या एका गटाने परंपरागत इतिहास लेखन शास्त्रातील अभिजनवादी प्रवृत्तींना फाटा देऊन गेल्या २०-२५ वर्षात नव्याने इतिहास लेखनाचा प्रवाह पुढे आणला. त्यांनी समाजातील तळागाळातील इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला.

४. विसाव्या शतकात स्वातंत्र्य चळवळींसोबत समाज सुधारणांविषयक चळवळीही सुरू होत्या. यात वंचित घटकांविषयी चळवळी घडून आलेल्या आहेत, ज्या ग्रामीण स्तरापर्यंत सुरू होत्या; प्रस्तुत संशोधनामध्ये या चळवळींचा अभ्यास करावयाचा आहे.

५. विसाव्या शतकात वंचित समाज जागृती विषयक सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात जे प्रयत्न झाले ते प्रयत्न पूर्णत्वास नेण्यासाठी कोणकोणत्या समस्या उद्‌भवल्या यातून समाजजीवनात परिवर्तन झाले का? यापरिवर्तनाचा क्षेत्रभेटीद्वारे अभ्यास करावयाचा आहे.

६. नाशिक शहर व जिल्हा यांना सलग व ऐतिहासिक परंपरा आहे. विसाव्या शतकात नाशिक जिल्ह्यात समाजविकासासाठी व वंचित घटकांच्या समस्या निवारण्यासाठी, या समाजाचे परिवर्तन होण्यासाठी पूर्व समाजव्यवस्थेत या समाजाला चांगले स्थान मिळवून देण्यासाठी अस्पृश्यता निवारण्यासाठी जे

प्रयत्न झाले, ज्या चळवळी उभ्या राहिल्या यातून समाज परिवर्तनाची दिशा कशी बदलली, याचळवळींचा समाज मनावर कोणता परिणाम झाला. याविषयीचा अभ्यास अपेक्षित आहे.

**७.** नाशिक जिल्ह्यात मागील पूर्ण शतककाळात (२० वे शतक) जे समाज प्रबोधनकार, समाजसुधारक, राजकीय कार्यकर्ते, संघटना उदयास आल्या. त्यांनी वंचित घटकांसाठी दिलेले योगदान व यातून बदललेली परिस्थिती प्रस्तुत संशोधन प्रबंधातून अभ्यासण्याचा विद्यार्थी संशोधकाचा प्रयत्न आहे.

## संदर्भ साहित्याचे परिशीलन

वंचित (शोषित अंकित) घटकांमध्ये समावेशीत होणाऱ्या शेतकरी, दलित, आदिवासी, कामगार वगैरेंच्या जीवनाविषयी असलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी झालेल्या चळवळी, आंदोलन याबाबत काही अभ्यासकांनी महत्त्वपूर्ण संशोधन केलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पीएच. डी. प्रबंध, पुस्तके, *गौरवग्रंथ, स्मरणिका, नियतकालिके, दैनिके* इत्यादी संदर्भ साहित्याचा समावेश होतो. त्याचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे केलेले आहे.

सुदिन गायकवाड टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे सादर केलेल्या ''महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास'' (सन १९६० ते सन २०१०)[१] या आपल्या पीएच. डी. प्रबंधात संपूर्ण महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळींचा अभ्यास केलेला आहे. या संशोधन अभ्यासात त्यांनी कामगार हा औद्यौगिक व्यवस्थेचा व अर्थव्यवस्थेचा अविभाज्य घटक आहे. परंतु तितकाच तो दुर्लक्षिला जाणारा घटक आहे. यात माथाडी कामगारांची अवस्था फार चांगली नाही.

१. सोनवणे डी. ए. यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे सादर केलेल्या ''नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकासाच्या निवडक योजनांची परिणामकारकता'' (कालावधी सन १९९१ ते सन २०११)[२] या आपल्या

पीएच. डी. प्रबंधात निवडक व महत्त्वपूर्ण आदिवासी विकास योजनांचा नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजावर काय परिणाम झाला याचे अध्ययन केले आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने काही संदर्भपुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यामध्ये बाबूराव पवार यांनी कर्मवीर व शिक्षणमहर्षी भाऊसाहेब हिरे यांच्या शैक्षणिक योगदानाविषयी *'सोनहिरा'*[३] नावाचे चरित्र लिहिले असून त्यामध्ये भाऊसाहेब हिरे यांच्या नाशिक परिसरातील त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याचा आढावा तसेच भाष्य केले आहे. सरल धारणकर यांनी *'आदिवासी सेवक दादासाहेब बिडकर'* आणि *'दादासाहेब बिडकरः वसा आदिवासी सेवेचा'* [४] या दोन पुस्तकांचे लेखन केले असून ती दत्तात्रय मल्हार बिडकर यांनी वंचिताच्या उद्धारासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणारी आहेत.

अशोक सोनकृत *मोगलपर्व* [५] या ग्रंथात मालोजीराव मोगल यांच्या कार्याचा जीवनपट साकारला असून त्यांचे शेतकरी चळवळीतील योगदान अधोरेखित केले आहे. सुधीर फडके यांचे *काकासाहेब वाघ : काळ आणि कार्य* [६] हे पुस्तक शेतकरी कामगार पक्षाने नाशिक जिल्ह्यात केलेल्या कार्याविषयी प्रकाशझोत टाकणारे आहे. तुकाराम दिघोळे यांचे *'तहानलेली माती अन् विकासाची गती'* [७] हे आत्मचरित्र असले तरी नाशिक जिल्ह्यातील शैक्षणिक कार्याचा विशेषतः सिन्नर तालुक्याचा शैक्षणिक प्रगतीचाकालपट उलगडून दाखविणारे आहे. अभिमन्यू सूर्यवंशी यांनी लिहिलेल्या *शेतकरी जेव्हा जागा होतो* व *आदिवासींचा विकास सूर्य* [८] ही दोन पुस्तके नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचा भातलढ्याचे समग्र वर्णन करणारी आहेत.

त्याचबरोबर विनय जायखेडकृत *आमदार पंडितराव धर्मा पाटील*, नरहर कुलकर्णीकृत *समाजाचे दीपस्तंभ : अजबा विठ्ठलराव पाटील*,[९] शं. क., कापडणीसकृत *'नामस्मृती स्मृतिग्रंथ'* भावना भार्गवे यांनी *पद्मश्री दादासाहेब गायकवाड* हा चरित्रग्रंथ [१०] लिहिला आहे. दिंडोरी तालुक्यातील 'अंबे' या वाडीवजा गावी श्री. गायकवाड यांचा जन्म ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झालेला

परिचय, त्यांचे वंचितांशी संबंधित काम, काळाराम मंदिराचा सत्याग्रह, अशा विविध मुद्यांचा सांगोपांग उहापोह या ग्रंथात आहे. विलास संगवेकृत '*आदिवासींचे सामाजिक जीवन*' [११] हा ग्रंथ आदिवासींच्या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनावर प्रकाश टाकतो मात्र तो पुरेशा प्रमाणात नाही. स्वातंत्र्य चळवळींच्या कालखंडावर नाशिक जिल्ह्याच्या इतिहासाशी संबंधित पुसतक एम. जी. वाघ यांनी *मुखेडचा सत्याग्रह* लिहिले. त्यामध्ये निफाड तालुक्यातील मुखेड गावच्या लोकांनी केलेल्या सत्याग्रहाची समग्र माहिती असून एका अर्थाने त्या गावचा विशिष्ट कालावधीचा समग्र स्थानिक इतिहास आहे.

प्रदीप गायकवाड यांनी *डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवडक भाषणे व लेख* [१२] हे पुस्तक संपादित केले असून 'कामगार चळवळ' हा नाशिक परिसरातील कामगार चळवळींच्या संघर्षाची कहाणी मांडणारा आहे. नाशिक परिसरातील शैक्षणिक परिवर्तनाविषयीची मांडणी *'शोध डॉ. वसंतराव पवारांचा'* [१३] हे पुस्तक प्रा. शंकर बोऱ्हाडे यांनी लिहिले असून नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक संस्थेच्या गुणात्मक व विस्तारात्मक मांडणीचा सविस्तर कालपट या पुस्तकामध्ये दिला आहे.

नाशिक जिल्ह्यातील इतिहासाविषयी प्रकाशझोत टाकणारी ही पुस्तके असली तरी उपरोक्त मांडणीमध्ये माथाडी कामगार, कंपनी कामगारांच्या समस्या, झोपडपट्टी निमूर्लनाविषयीच्या चळवळी, चलन छपाई उद्योगांमुळे बहुतांश वंचितांना प्राप्त झालेला रोजगार, शिक्षणप्रवाहात काम करणारे वंचित घटक, त्यांच्या सर्वांगिण परिस्थितीत झालेल्या बदलांविषयी अजून मांडणी झालेली नाही म्हणून या सर्व मुद्यांचा उहापोह प्रस्तुत प्रबंधांमध्ये केला आहे.

## विषयाची स्थल, कालमर्यादा

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या विषयासाठी विसाच्या शतकातील नाशिक जिल्हाची निवड केली आहे. अर्थातच प्रबंधांच्या शीर्षकामध्ये कालाची मर्यादा आलेली आहे. यासाठी १९०१ ते २००० दरम्यानचा नाशिक जिल्ह्यातील वंचितांच्या

शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनाची मांडणी केली आहे.

## संशोधनाची उद्दिष्टये

संशोधकाने प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी पुढील उद्दिष्ट्ये डोळयासमोर ठेवली आहेत.

१. नाशिक जिल्हयातील वंचितांचे गट (प्रमुख) त्यांची वैशिष्ट्ये आणि त्यांच्यावरील निर्बंध जाणून घेणे.

२. नाशिक जिल्हयातील वंचितांच्या प्रमुख गटाच्या हितासाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्था, संघटना, व्यक्ती यांच्या कार्यावर दृष्टिकोन टाकणे..

३. नाशिक जिल्हयातील वंचितांच्या प्रमुख गटाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक चळवळींचा अभ्यास करणे.

४. नाशिक जिल्हयातील वंचित समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था, संघटना यांना आलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

५. नाशिक जिल्हयात विसाव्या शतकात वंचित समाजासाठी झालेल्या कार्यामुळे व चळवळीमुळे वंचितांच्या समाज जीवनात झालेले परिवर्तन अभ्यासणे.

## संशोधनाची गृहीतके

१. नाशिक जिल्हयातील वंचितांच्या समस्यांचे पूर्णपणे निराकरण झालेले नाही. वंचितांच्या समस्येच्या मुळाशी आर्थिक समस्या आहे.

२. नाशिक जिल्हयातील वंचितांच्या विकासासंबंधी कार्य करणाऱ्या धोरणांमध्ये बदल झालेला नाही.

३. नाशिक जिल्हयात २० व्या शतकात वंचितांच्या हितासाठी कार्य करणारे गट उदयास आले म्हणून वंचित समाज जीवनात परिवर्तन झालेले आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रबंधासाठीची माहिती गोळा करताना उपलब्ध साधनांचे परिशीलन करुन मिळविलेल्या साधनांपैकी नेमकी कोणती साधने घ्यायची यासाठी

ऐतिहासिक संशोधन पद्धती वापरली आहेत. प्रबंधाचा विषय वंचितांच्या इतिहासाशी संबंधित असल्याने त्याचा प्रारंभ अंतोनियो ग्रामची यांच्या सबाल्र्टन मांडणीपासून सुरुवात केली आहे. अंतोनियो ग्रामची (१८९१-१९३७) याने सामान्यांच्या इतिहासाची संकल्पना मांडली. इतिहास का काही वीरपुरुषांच्या, शासनकर्त्यांच्या वा बुद्धिमंतांच्या कामगिरीपुरता सीमित नसतो. इतिहासात राज्यकर्त्यांची प्रत्यक्ष शासनसत्ता (Political Power) आणि बुद्धिमंतांची धर्म, शिक्षण, कला यांच्या माध्यमातून चालणारी अप्रत्यक्ष सत्ता म्हणजेच 'धुरिणत्व' (Hegemony) या दोन्हींना स्थान असते. त्यामुळे इतिहासात धुरिणत्वाची कल्पना पुढे आली. तसेच राष्ट्र उभारणीत वंचितांचा विधायक वाटा असतो, मात्र इतिहासात त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते यामताचा पाठपुरावा होऊन 'वंचितांचे इतिहासशास्त्र' विकसित झाले. रणजित गुहा, होमी भाभा, गायत्री चक्रवेदी स्पिवाक यांनी वंचितांच्या इतिहासाचे पद्धतिशास्त्र विकसित केले. त्यातून 'सबाल्टर्न इतिहासाची' म्हणजेच *History from below* या तत्त्वानुसार सामान्यांच्या इतिहासालेखनाचे पद्धतिशास्त्र पुढे आले.

त्याचप्रमाणे संशोधनाचे स्वरुप लक्षात घेऊन स्वतःलाच काही प्रश्न विचारुन प्रश्न पद्धती, तज्ज्ञ व जाणकार लोकांच्या मुलाखती तसेच सामाजिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेली मुलाखत पद्धती वापरली आहे. सर्वेक्षण अथवा निरीक्षण पद्धती, प्रश्नावली पद्धती आणि संशोधनासाठी विशेष आवश्यक असलेली महत्त्वाची टिपणे तयार करण्यासाठी वापरावयाची पुस्तिका पद्धती वापरली आहे. त्याचप्रमाणे कामगार संघटना, चळवळीतील कार्यकर्ते या सर्वांच्या भेटी घेण्यासाठी क्षेत्रभेट पद्धतीचा अवलंब केला आहे. क्षेत्रभेटीचा अवलंब करुन नाशिक जिल्ह्यातील वंचितांच्या प्रमुख गटांच्या सामाजिक जीवनामध्ये कोणता बदल झाला आहे. यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्था संघटना व त्यांचे कृतिशील नेते यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. त्याविषयीची यादी व प्रश्नावली प्रबंधांच्या अखेरीस परिशिष्ठांमध्ये दिली आहे.

## प्रबंधाची संक्षिप्त रुपरेषा

*''नाशिक जिल्ह्याच्या विशेष संदर्भात वंचितांच्या समाज जीवनातील परिवर्तनाचा अभ्यास (१९०० ते २०००)''* या विषयाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रबंधामध्ये सहा प्रकरणांची मांडणी केली आहे. प्रकरण पहिले हे *प्रास्ताविक* या शीर्षकाचे असून त्यामध्ये विषयाची निवड, संदर्भसाहित्याचे परिशीलन, विषयाची स्थल, कालमर्यादा, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाची गृहितके, संशोधन पद्धती, प्रबंधाची संक्षिप्त रुपरेषा, संदर्भ साधने, वंचितच्या इतिहास, वंचितच्या इतिहासलेखनाची आवश्यकता, विषयासंदर्भात वंचिताच्या इतिहासलेखनाचा आढावा तसेच नाशिक जिल्ह्याचा ऐतिहासिक व भौगोलिक इतिहास या शीर्षकाचे असून त्यामध्ये प्राचीन ते अर्वाचीन असा नाशिक परिसराच्या स्थानिक इतिहासाचा संक्षिप्त आढावा इत्यादी उपघटकांचा आढावा घेतला आहे.

प्रकरण दुसरे *वंचित चळवळ : उगम व विकास* असे आहे. या प्रकरणात शेती व शेतीवर अवलंबून असणारा शेतकरी, मजूर व कामगार वर्ग, निफाड, बागलाण, मालेगाव, देवळा येथून स्थलांतरित होणारा शेतमजूरांचा वर्ग, सिन्नर व नाशिक औद्योगिक वसाहतीत काम करणारा हंगामी व कंत्राटी कामगार यासर्वांच्या परिस्थितीमध्ये झालेला बदल तथा प्रशासनाकडून होणारी पिळवणूक, दलित व आदिवासी वर्गातील स्त्री कामगारांच्या समस्या याविषयीची साधार व कालानुक्रमे मांडणी केली आहे.

प्रबंधांचे तिसरे प्रकरण हे *नाशिक जिल्ह्यातील कामगार चळवळ* या शीर्षकाचे असून त्यामधे दलित आदिवासी कामगार यांच्यावर आधुनिकीकरणाने कोणत परिणाम झाला, जागतिकीकरणात कामगार व वंचितांचे असलेले स्थान व सद्यस्थिती यांचा अभ्यास केला आहे.

प्रकरण चौथे हे *आदिवासी चळवळ : परिवर्तन* या शीर्षकाचे त्यामध्ये आदिवासी संस्कृती, त्यांची आर्थिक परिस्थिती, सांस्कृतिक जीवन, विवाह पद्धती, पारंपरिक नियम, जीवनपद्धती कुटुंब संस्था यांची माहिती व तसेच आदिवासी देव-देवता, त्यांची वस्तीस्थाने, त्यांचा यात्रोत्सव (उदा. खांबदेव किंवा डोंगरदेवाची

यात्रा), ग्रामीण भागातील परंपरागत सामाजिक रुढी परंपरा यासर्वांचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

प्रकरण पाचवे हे *आर्थिक व शैक्षणिक परिवर्तन* या शीर्षकाचे असून १९००-२००० पर्यंत वंचित घटकांच्या शैक्षणिक, आर्थिक परिस्थितीमध्ये कसे बदल घडून आले. त्यासाठी कुकुट्टपालन, दुग्धव्यवसाय, शेतीस पूरक व्यवसाय म्हणून डिंक, मध, जंगलातील उपयुक्त खाण्यास योग्य असे पदार्थ गोळा करणे, त्यासाठी बचत गटांची स्थापना, गृहद्योग इत्यांदीची माहिती आर्थिक परिवर्तन या घटकांमधे दिली आहे.

शैक्षणिक परिवर्तन या उपघटकांची मांडणी करताना प्राथमिक व विशेष शिक्षण देणाऱ्या शाळा, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, वैद्यकिय महाविद्यालये तसेच प्रमुख शैक्षणिक संस्थांच्या विकासाचा साधार कालपट मांडला आहे.

प्रकरण सहावे हे *साहित्यीक व समाजसुधारकांचे वंचितासाठींचे योगदान* या शीर्षकाचे आहे. या प्रकरणात नाशिक जिल्ह्यातील वंचितासाठी कर्मवीर भाऊसाहेब हिरे, कर्मवीर काकासाहेब वाघ, दादासाहेब बिडकर, कॉम्रेड नाना मालुसरे, कॉम्रेड जीवा पांडू गावीत, दादासाहेब गायकवाड, नानासाहेब दीक्षित, क्रांतिवीर वसंतराव नाईक, डॉ. डी. एल. कराड, मा. आ. ए. टी. पवार इत्यादींच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण सातवे हे *उपसंहार* असे असून त्यामध्ये संशोधनाची उद्दिष्टये गृहितके, गृहितकांची पडताळणी व प्रबंधाच्या मांडणीतील निष्कर्ष दिले आहेत. प्रबंधासाठी तीन परिशिष्ठे दिली असून त्यात नाशिक जिल्ह्याचा औद्योगिक नकाशा, नमुना प्रश्नावली व मुलाखती घेतलेल्या मान्यवरांची यादी दिली आहे.

## संदर्भ साधने

प्रस्तुत प्रबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा अवलंब केलेला आहे. प्राथमिक साधनांमध्ये नाशिक जिल्हयातील वंचित घटकांसाठी कार्य केलेल्या व कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्था, शासन संस्था, संघटना यांचे प्रकाशित व

अप्रकाशित कागदपत्रे, वंचित समाजातील व शैक्षणिक दृष्ट्या योगदान दिलेले कृतीशील कार्यकर्ते यांच्या प्रत्यक्ष मुलाखती, त्यांच्याकडील खाजगी ग्रंथसंग्रह, त्यांच्या संस्थांचे अहवाल, पत्रव्यवहार, इतिवृत्त, तत्कालीन वृत्तपत्रे, इत्यादी साधनांचा वार केला आहे. तसेच विविध प्रकाशित संदर्भ ग्रंथांचा वापर प्रबंध लेखनासाठी केला आहे. त्याची सविस्तर यादी प्रबंधांच्या अखेरीस निवडक साहित्य संदर्भसूची या घटकात दिली आहे.

## वंचितांचा इतिहास [१४]

'सबाल्र्टन' इतिहासलेखनाचे प्रवर्तक रणजीत गुहा व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'सबाल्र्टन' ही संकल्पना प्रसिद्ध इटालियन मार्क्सवादी कृतिशील विचारवंत अंतोनियो ग्रामची (१८९१-१९३७) कडून घेतली. पारंपरिक अर्थी 'सबाल्र्टन' ही संज्ञा लष्करी अधिकार सोपानातील निम्नस्तरीय श्रेणींना उद्देशून वापरण्यात येते. परंतु ग्रामची यांनी  आपल्या विश्लेषणात्मक चौकटीत या संज्ञेचा कल्पक उपयोग केला. ही संकल्पना धुरीणत्व नसलेल्या (*Non-hegemonic*) गटांना किंवा वर्गांना लागू केली. वर्गभान नसलेले शोषित -अंकित (subordinate) समूह असाही अ यातून ध्वनित होतो. 'सबाल्र्टन' संकल्पनेची ही लवचिकता भारतीतील सामजिक वास्तवातील व्यामिश्रतेचा वेध घेण्यासाठी उपयोगी असल्याच्या धारणेतून सब्लाटर्न इतिहासप्रकल्पाने तिचा स्वीकार केला. अर्थातच, 'सबाल्र्टन'संकल्पनेला भारतीय स्वरुपात उभे करण्याची जोखीमही त्याने पत्करली.

१९८० च्या दशकात सुरुवातीला रणजीत गुहा यांनी सर्वप्रथम भारतीय समाजस्थितीच्या संदर्भात सबाल्टर्न संकल्पनेचा अवलंब केला. पहिल्यांदा अभिजन गटांना व्याख्यांकित करुन त्या संदर्भात सब्लाटर्नची श्रेणी त्यांनी निश्चित केली. त्यांच्या मते भारतीय समाजस्थितीच्या संदर्भात अभिजन ही संज्ञा वर्चस्वी (Dominant) गट निर्देशित करते. या वर्चस्वी गटामध्ये परदेशी व भारतीय अशा दोन्ही वर्गसमूहांचा समावेश होतो. परदेशी गटांमध्ये परदेशी भांडवलदार, व्यापारी वर्गाचे प्रतिनिधी, प्रशासकीय रचनेच्या शिरोभागातील नोकरशहांचा वर्ग

इत्यांदींचा समावेश होतो. अखिल भारतीय वर्चस्वी गटाला प्रांतिक व स्थानिक पातळीवरचे अंकितांमधील काही वर्गही साहाय्यभूत ठरत असतात. त्यांचाही समावेश वर्चस्वी गटांमध्ये होतो. हा वर्ग सामाजिक-आर्थिक विकासक्रमानुसार वेगवेगळ्या  प्रदेशांत वेगवेगळा असतो. त्यामुळे या वर्गाचे स्वरूप व्यामिश्र बनते. परिणामतः, काही ठिकाणी वर्चस्वी असलेला गट इतर ठिकाणी अंकित वर्ग म्हणून वर्तन करताना दिसतो. या गटामध्ये ग्रामीण श्रेष्ठी. दरिद्री जमीनदार, श्रीमतं व मध्यम शेतकरी इत्यादींचा समावेश होतो. स्थानिक अभिजनांचे हे संदिग्ध, विरोधाभासी स्वरूप. लक्षात घेऊन गहा 'सबाल्टर्न'ची व्याख्या खालीलप्रमाणे करतात,

*The social group and element included in this category represents the demographic difference between the total Indian population and all: those whom we have described as the elite.*

ग्रामचीची सबाल्टर्न संकल्पना स्थूल व लवचिक असली तरी त्यामध्ये संदिग्धता नाही. शोषित असणारे आणि प्रभुत्वाच्या सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेमध्ये अंकितता पत्करलेले जनसमूह असा अर्थ त्यातून प्रगट होतो. आर्थिक उत्पादनातून घडणाऱ्या विकासाच्या व बदलांच्या संदर्भात सबाल्टर्न समाज-गटांच्या निर्मितीची प्रक्रिया शोधण्याची ग्रामचीने केलेली सूचना (ग्रामची १९९६:५२) नागरी समाजातील वर्चस्व/प्रभुत्व संबंधांबरोबरच शोषण संबंधांचा अभ्यास करणाचा आग्रह कायम ठेवते. या पार्श्वभूमीवर सबाल्टर्न संकल्पनेचे भाषांतर 'शोषित-अंकित जन' असे करणे अधिक उचित ठरू शकते.

गुहा व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'सबाल्टर्न' या संकल्पनेचा केलेला स्वीकार त्यांच्या इतिहास प्रकल्पाचे सामर्थ्यस्थान आहे. परंतु, भारतीय संदर्भात त्यांनी लावलेल्या सबाल्टर्न संज्ञेचा अर्थ गोंधळ वाढवणारा व अपुरा आहे. भारतातल्या शोषण-शासनाच्या व्यवस्थेची व्यामिश्रता अधोरेखित करून सबाल्टर्नची व्याख्या करण्याऐवजी स्थानिक अभिजनांचे कुंपणावरचे संदिग्ध स्थान यास त्यांनी व्याख्येसाठी महत्त्वाचे मानले. वर्गव्यवस्था, जातिव्यवस्था व पितृसत्तेने भारतीय

समाजातील शोषणाची व वर्चस्वाची विशिष्टता घडवली आहे. अशा परिस्थितीमध्ये राष्ट्रीय पातळीवरच्या अभिजनांना मदत करणारे स्थानिक अभिजन हे अभिजन व मदत न करणारे ते सबाल्टनं अशी व्याख्या संदिन्धता व गोंधळ वाढवणारीच ठरते. जातिव्यवन्येच्या अनन्यतेमुळे शोषित-अंकितांमध्ये शोषणाचे व वर्चस्वाचे संबंध उतरंडीच्या स्वरूपात कार्यरत राहतात. त्यामुळे सर्व शोषित-अंकितांना सबाल्टर्न या एका सामाजिक कोटीमध्ये उभे करणे गोंधळाला आमंत्रण देणारेच ठरते.

सुमित सरकार दाखवून देतात त्याप्रमाणे सबाल्टर्न इतिहास प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात राजकीय अर्थशास्त्राच्या पृष्ठभूमीवरच सबाल्टर्न इतिहासलेखनाची वाटचाल सुरू झाली. वर्ग या साचेबंद संकल्पनेची मातब्बरी न स्वीकारता, मार्क्सवादी तत्त्वांचा आधार घेण्याची सोय ग्रामचीची सबाल्टर्न संज्ञा करून देत असल्याने गुहा व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'सबाल्टर्न'चा आश्रय घेतला. ब्रिटिशपूर्व सामंती समाजातील उत्पादनसंबंध आणि भांडवली उत्पादनसंबंधांच्या मिश्रणातून वासाहतिक समाज आकारास आला. समाजातील सत्तारचनेचे, शोषण संबंधांचे व जनसंघर्षाचे यथार्थ आकलन, निरूपण व विश्लेषण निखळ 'वर्ग' या संकल्पनेद्वारे करणे शक्य नव्हते. त्यामुळे वर्गविग्रहाची आत्यंतिकता सोडून ग्रामचीचा 'सबाल्टर्न' या स्थूल व लवचिक संज्ञेचा उपयोग करणे अधिक फलदायी होते. सबाल्टर्न इतिहासप्रकल्पाच्या सृजनशीलतेचा यामुळे फैलाव होऊ शकला..

'सबाल्टर्न' या लवचिक संज्ञेआधारे मार्क्सवाद्यांच्या वर्गवादी संकुचिततेला 'सबाल्टर्न' समूहाने ओलांडले. गण, जात, लिंगभाव अशा वर्गेतर शोषण-शासनाच्या संस्थांची दखल घेऊन इतिहासलेखन करण्याची त्यांची भूमिका इतिहासलेखनाचा साचलेला प्रवाह मुक्त करणारी ठरली. परंतु, वर्चस्व व अंकिततेच्या चौकटीत सबाल्टर्न संज्ञेला खुटविण्याच्या त्यांच्या अट्टहासामुळे राजकीय-अर्थशास्त्राच्या परिधात या संस्थांचे शोषण-शासन त्यांना समजून घेता आले नाही. या संस्थांचा परस्परांशी असलेला पूरक वा विरोधी संबंध त्यांनी लक्षात घेतला नाही.

'सबाल्टर्न'च्या आत्तापर्यंतच्या खंडांमध्ये अभिजनवादी इतिहासलेखनाच्या विविध प्रवाहांना चिकित्सेचे लक्ष्य बनविले गेले आहे. वसाहतवादी, राष्ट्रवादी व त्याचबरोबर मार्क्सवादी या तिन्ही प्रवाहांतील अभिजनवाद त्यांनी चव्हाट्यावर मांडला. अंकितांना स्वतःची जाणीव किंवा आत्मभान नसते अशी धारणा हे प्रवाह बाळगतात, असा जोरकस हल्ला त्यांनी चढवला.

वसाहतवादी/नववसाहतवादी इतिहासलेखनातील अभिजन वादाच्या तात्त्विक आकृतिबंधाची चिकित्सा 'सबाल्टर्न'ने विकसित केली. वासाहतिक कालखंडातील राजकारणाच्या ब्रिटिशांच्या शिक्षण पद्धतीशी कार्यकारणसंबंध प्रस्थापित करूनच वसाहतवादी इतिहासकारांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीची मीमांसा केली. ब्रिटिश संस्था, संकल्पना, संधी, संपत्ती यांना इंग्रजी-शिक्षित भारतीय अभिजनवर्गाने दिलेला प्रतिसाद म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढा हे त्यांच्या मांडणीचे मुख्य सूत्र राहिले. ब्रिटिश शिक्षण पद्धतीतुन उदयाला आलेला इंग्रजी-शिक्षित मध्यमवर्ग मिल, लॉक, बर्क इत्यादींच्या ब्रिटिश उदारमतवादी विचारांच्या बाळकडूवर पोसला होता. वैज्ञानिकता व विवेकनिष्टा यांच्या पायावर उभ्या राहिलेल्या या राजकीय प्रतिनिधित्वाच्या संस्थांचे समाजजीवनातील महत्त्व ओळखून ब्रिटिश सत्तेच्या वसाहतवादी ढाच्यामध्ये राष्ट्रवादी केले राजकारण करण्याची भूमिका या नव्या इंग्रजी-शिक्षित अभिजनवर्गाने घेतली. अशा प्रकारे भारतीय राष्ट्रवाद म्हणजे ब्रिटिश उदारमतवादाचे फलित वा ब्रिटिश साम्राज्याची देणगी असे मानणारी इतिहास मीमांसा वसाहतवादी इतिहासकारांनी केली.

अनिल सील (१९६८), डेव्हिड वॉशबेक (१९७६), गॉर्डन जॉन्सन (१९७३) यासारख्या इतिहासकारांनी ब्रिटिशांना नाइलाजास्तव साम्राज्यवादी भूमिका भारतात बजावावी लागली असा युक्तिवाद शेतकरी, आदिवासी, दलित (वा निम्न जातीय), स्त्रिया यांच्या मांडला. इंग्रजांच्या व्यापारी सुरक्षिततेसाठी आणि ब्रिटिशांच्या हितसंबंधांचे रक्षण करणारे स्थानिक मदतनीस न मिळाल्यानेच ब्रिटिशांनी परिस्थितीविवश होऊन सत्ता काबीज केली, अशी धारणा या इतिहासकारांच्या 'अनैच्छिक साम्राज्यवादा'च्या (reluctant im-perialism)

संकल्पनेच्या गाभ्याशी आहे. वॉशब्रूक तर दक्षिण हेतूलक्षी भूमिकेचे खंडन केले आणि वर्गसंघर्षाला व वर्गजाणिवेला आशियातील भांडवली विकासाची अपरिहार्य परिणती वसाहतवाद अस्तित्वात आला अशी संगती लावतात. अनैच्छिक साम्राज्यवादाच्या कोटिक्रमातून सहयोगकर्ता (collaborator) वर्गाचे रिसाधार कर्तेपण सिद्ध होते. नववसाहतवादी इतिहासकारांनी भारतीय राष्ट्रीय चळवळ व राष्ट्रवाद यांना या सहयोगी वर्गाची उपज मानले. ब्रिटिश शिक्षणपद्धतीतून उदयाला आलेल्या इंग्रजी-शिक्षित भारतीय अभिजनवर्गाने ब्रिटिश राजवटीसाठी मध्यस्थ, दलाल व हस्तक म्हणून कार्य केले. प्रांतीय स्तरावर उदयाला आलेल्या या अभिजनवर्गामध्ये ब्रिटिश प्रशासनातील नोकऱ्या, विधिमंडळातील पदे मिळवण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. राजकीय सत्ता व आर्थिक लाभासाठी धडपडणाऱ्या अभिजनांनी 'दाता-आश्रित' संबंधांआधारे गट-तट उभारले. भारतातील राष्ट्रवाद म्हणजे प्रामुख्याने अभिजनांनी त्यांच्या हितसंबंधांसाठी केलेली उठाठेव होती, अशी संगती नववसाहतवादी इतिहासकारांनी लावली. भारतीय जनतेला ब्रिटिशविरोधी उठावासाठी उद्युक्त करून अभिजनांनी आपले हितसंबंध साध्य करण्याचे राजकारण केले. भारतीय राष्ट्रीय लढ्याला यापेक्षा कोणतीही वेगळी विचारसरणी नव्हतो. सबाल्टर्न इतिहासकारांनी वसाहतवादी इतिहासलेखनातील या अभिजनवादाची मूलभूत चिकित्सा करून भारतीय राष्ट्रवादाला केवळ अभिजन राजकारणाच्या संकुचित परीघामध्ये कोंबणाऱ्या त्याच्या प्रवृत्तीवर तिखट टीका केली. वसाहतवादी संकल्पना, धारणा, विश्वदृष्टिकोनाचा स्पर्शही न झालेल्या शोषित-अंकित जनांमध्ये कार्यरत असलेली संवेदनशीलता ऊर्ध्वमुख करून त्यांनी भारतीय प्रतिकाराचा स्वायत्त पाया अधोरेखित केला.

वसाहतवादी भूमिकेच्या विरोधात राष्ट्रवादी इतिहासकारांनी राष्ट्रीय लढ्यामधील विचारसरणी व अभिजनवर्गाच्या वैचारिक नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची मानली. वसाहतवादाविरुद्ध उभी राहिलेली प्रत्येक चळवळ व प्रतिकार हे काँग्रेसच्या नेतृत्वाला शिरोधार्य मानत होती या धारणेनुसार त्यांनी आपले

इतिहासलेखन केले. काँग्रेसचा इतिहास व राष्ट्रीय नेत्यांचा चरित्रक्रम यांना केंद्रवती ठेवून भारतीय राष्ट्रीय चळवळीचे इतिहासलेखन त्यांनी केले आदिवासी, शेतकरी, दलित व तत्सम प्रकारच्या शोषित-अंकितांचे उठाव एकतर राष्ट्रीय चळवळीच्या परीघाबाहेरचे म्हणून दुर्लक्षित केले गेले किंवा अभिजनवर्गांच्या वैचारिक नेतृत्वाअभावी झालेले उठाव म्हणून त्यांची संभावना केली गेली. सबाल्टर्न इतिहासकारांनी आपल्या विविध लेखंमधून राष्ट्रवादी इतिहासलेखनातील या धारणेचे खंडन केले.

मार्क्सवादी इतिहासकारांचे इतिहासलेखन हेतूलक्ष्मी (Teleological) होते. शोषित अंकितांचा प्रतिकार त्यांनी वर्गसंघर्ष व वर्ग जाणिवेच्या परीघात पाहिला. वर्गीय अन्वेषणपद्धतींच्या अट्टहासामुळे शेतकरी, आदिवासी, दलित (वा निम्न जातीय) स्त्रिया यांच्या उठावांचे संशोधन व विवेचन त्यांच्याकडून फारसे घडले नाही. शेतकऱ्यांच्या, आदिवासींच्या उठावातील धर्मभावनेला त्यांनी उच्चभू वर्गाच्या प्रभुत्वशाली हस्तक्षेपाची निष्पती मानले. सबाल्टर्न इतिहासकारांनी मार्क्सवादी इतिहासलेखनातील अशा गृहितकांचे व हेतूलक्ष्मी भूमिकेचे खंडन केले आणि वर्गसंघर्षाला व वर्गजाणिवेला प्राधान्य न देता शोषित-अकिताच्या जाणिवेचा स्वतंत्र शोध घेतला.

तळातून इतिहास लिहिणारे ब्रिटिश इतिहासकार इ. पी. थॉम्पसन (१९२४-१९९३) यांच्या अपारंपरिक मार्क्सवादी प्रवाहानेही सबाल्टर्न इतिहासप्रकल्पाला तत्त्वाधार पुरवला. थॉम्पसन यांचे इतिहासलेखन सबाल्टन इतिहासकारांचे प्रारंभिक प्रेरणास्त्रोत ठरले. मार्क्सवादी अर्थवादाच्या संकुचिततेला थॉम्पसन उल्लंघतात. औद्योगिक क्रांतिपूर्व युगातील श्रमिकवर्गाच्या इतिहासाचा धांडोळा घेताना ते वर्गभान नसलेल्या श्रमिकांनी डेडझम, युनिॲरिझम अशा धर्मपंथांच्या आधारे केलेला वर्गसंघर्ष चित्तारुन वर्गभान घडविण्यातील सांस्कृतिक घटकांची भूमिका पुढे आणतात. थॅम्पसनांच्या मते, वर्ग जात्याच असत नाहीत. जेव्हा काही लोक वारशाने किंवा देवाणघेवणीतून आलेल्या त्यांच्या समान अनुभूतीच्या आधारे त्यांच्यापेक्षा विरोधी वा वेगळे हितसंबंध असलेल्या लोकांच्या विरोधात त्यांच्या

म्हणून असलेल्या हितसंबंधांची जाण करुन घेऊन अस्मितेचे बांधणी करतात तेव्हा वर्ग घडतो. थॉम्पसन यांच्या या मार्गावरुनच सबाल्टर्नने आपल्या प्रवासाची सुरुवात केली.

दक्षिण आशियातील वर्चस्व व प्रभुत्वाची वर्चस्व व प्रभुत्वाची व्यवस्थाव न्याविरोधात होणारा शोषित-अंकितांचा प्रतिकार याचे विवेचन करण्यासाठी फ्रेंच तत्वज्ज्ञ मिशेल फूको (१९२६-८४) यांचे विचार सबाल्टर्नच्या प्रकल्पात उत्तरोत्तर प्रभावी ठरत गेले. मानवी रक्त्वाची वैश्विकता मानणाऱ्या प्रबोधनकालीन मानवतावादाची फूको यांनी चिकित्सा केली. प्रामुख्याने मानवाच्या पराधीन-आत्मनिष्ठ व्यक्तित्वांना (Subjects) घडविणाऱ्या निरनिराळ्या पद्धतींचा इतिहास लिहिण्याचा हेतू त्यांनी बाळगला. प्रभुत्वशाली चर्चाविश्वांच्या (केवळ भाषिक व्यवस्था या अर्थाने नव्हे, तर व्यापक संस्थात्मक उभारणी या अर्थी उदा. कारागृह, इस्पितळ इत्यादी) आधारे पराधीन-आत्मनिष्ठत्व घडवून आधुनिक समाजामध्ये जनतेचे शिस्तीकरण व अंकिताकरण केले जाते असा त्यांचा युक्तिवाद राहिला. पराधीन आत्मनिष्ठत्व घडवून आधुनिक समाजामध्ये जनतेचे शिस्तीकरण व अंकितीकरण केले जाते असा त्यांचा युक्तिवाद राहिला. पराधीन -आत्मनिष्ठत्व एकांतवासात घडत नाही तर सत्तासंबंधीच्या गुंतागुंतीच्या जाळ्यात ते उभे राहत असते. पराधीन आत्मनिष्ठत्वाचे दोन अर्थ मिशेल फूकोंना अभिप्रेत आहेत. एक, व्यक्तीला दुसऱ्याच्या नियंत्रणाखाली आणणरी व त्यावर अवलंबून ठेवणारी पराधीनता; दोन अर्थ फूकोना अभिप्रेत आहेत. एक व्यक्तीला दुसऱ्याच्या नियंत्रणाखाली आणणारी व त्यावर अवलंबून ठेवणारी पराधीनता; दोन, ज्ञान आणि विवेक यांच्या चौकटीत व्यक्तीचे नियंत्रण व नियमन करणाऱ्या पद्धती युरोपीय इतिहासात कशा विकसित होत गेल्या याचे सूक्ष्म विवेचन फूको यांनी केले.

सबाल्टर्न प्रकल्पांतर्गत फूकोंच्या चिंतनाचे भारतीय इतिहास मीमांसेसाठी प्रास्तावित करण्याचे श्रेय गायत्री चक्रवर्ती-स्पिवाक (१९८५) यांच्याकडे जाते. ज्ञान आणि सत्ता यांतील आंतरसंबंधाबद्दलचा फूकोवादी दृष्टीकोन बर्नार्ड कोहन यांच्या लेखात (१९८६) केंद्रभागी आहे. ज्ञानातून नियंत्रणाची स्थिती निर्माण होत असते.

प्रचलित वैद्यकीय ज्ञान व चिकित्सापद्धतीच्या दबदब्यातून व्यक्ती आपला देह त्याच्या शय्येवर शरण करते. असा सत्तासंबंध फूको यांनी आपल्या ज्ञानमीमांसेतून उलघडून दाखवला. या आधारावरच डेव्हिड अर्नोल्ड यांचा "*Indian Plague,* १८९६-१९००' हा लेख लिहिला आहे. पार्थ चटर्जी, ग्यान प्रकाश, दिपेश चक्रबर्ती, शाहीद अमीन हे फूकोवादी विश्लेषणपद्धतीं अवलंब करणारे इतर प्रमुख सबाल्टर्न इतिहासकार म्हणून उल्लेखता येतील.

सबाल्टर्न इतिहासकारांनी भाषाशास्त्राचादेखील पद्धतिशास्त्र म्हणून अवलंब केला. रोलाँ बार्थस् (१९१५-१९८०) या फ्रेंच संरचनावादी भाषाशास्त्राच्या 'Function व Indices' या संज्ञा घेऊन शोषित अंकितांच्या बंडाबाबतच्या ब्रिटिश पत्रांचे विश्लेषणस गुहा यांनी आपल्या एका लेखात (१९८३) केले आहे. संरचनावाद व उत्तर संरचनावादातून आलेले भाषाशास्त्रीय मनोविश्लेषण शोषित अंकितांच्या जाणिवेचे पैलू उकलण्यासाठी त्यांनी लागू करण्याच्या सबाल्टर्न इतिहासाकारांचा सुरुवातीपासूनच प्रयत्न राहिला.

गुहा यांनी सर्वप्रथम शोषित-अंकितांच्या स्वायत्त भानाचा वस्तुपाठ सादर केला. शोषित-अंकित हा आत्मनिष्ठ कर्ता असतो ही भूमिका प्रस्तावित करुन शेतकऱ्यांना त्यांनी बंडाचे कर्ते म्हणून सादर केले. शेतकऱ्यांवर वर्चस्व गाजविणाऱ्या सत्तेच्या प्रतीकांना उध्वस्त करणे किंवा त्यांना बळकावणे ही शेतकरी बंडातील नकाराची रीत गुहा यांनी उलगडून दाखविली. उलटफेराच्या (Inversion) या नकारक्रियेमध्ये स्थानिक व वसाहतवादी वर्चस्वखाली सत्ताप्रतीकांचे भंजन शेतकरी करतात. मौखिक व लिखित भाषा, अंगविक्षेप, सामाजिक अवकाश, वस्त्रे दळणवळणाची साधने, गृहसंपत्ती अशा सर्व बाबींमध्ये उलथापालथ घडवून आणतात. उच्चभूंसाठी वापरली जाणारी श्रेष्ठतादर्शक वा आदरवाचक संबोधाने यांना फाटा देऊन, शिव्या शापांच्याद्वारे शेतकरी आपला नकार अभिव्यक्त करतात. लेखनकला शापांच्याद्वारे शेतकरी आपला नकार अभिव्यक्त करतात. लेखनकला हे लबाडी व शोषण करण्याचे शत्रूचे साधन म्हणून बंडामध्ये, खंडपत्रे, करारपत्रे अशी शेतकऱ्यांना बंधनात अडकवणाऱ्या कागदपत्रांची होळी करण्यात

येते. चांभाराने रजपूताच्या भाषेत बोलणे, बरिया जातीच्या व्यक्तीने पाटीदार (शेतकरी) जातीची पगडी धारण करणे, बलाही या निम्नजातीय व्यक्तीने घोड्यावर स्वार होऊन बुंदेलखंडातील गावात फिरणे, जमीनदाराला पाहिल्यावर शेतकऱ्याने बाजेवरुन उठून उभे न राहता बसून राहणे, अशा उलट-फेराच्या अनेक वर्तनांचा निर्देश गुहा करतात. शेतकऱ्यांच्या प्रतिष्ठेची प्रस्थापना करण्याचा ध्यास केंद्रवर्ती ठेवून उलटफेराची नकारक्रिया शेतकरी बंडामधून कार्यरत असल्याचे गुहांचे विश्लेषण आहे.

शोषित-अंकित जनांच्या प्रतिकारामागील व जाणिवेमधील समुदाय भावनेचा व व्यवहाराचा शोध घेताना सबाल्टर्न इतिहासकारांनी जातीची भूमिका तपासली. प्रायः मानवंशास्त्राच्या आधारे जात. नातलग, क्षेत्रीय कल्पनांचा उलगडा करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तथापि, मानवंशशास्त्राची युरोपकेंद्री भूमिका त्यागूनच त्यांनी त्यांचा अवलंब केला. हे विशेष मानवशंशास्त्राचा विकास मुख्यतः युरोप-केंद्री परिप्रेक्ष्यात झाला. युरोपीय समाज हा सामंतशाहीतून भांडवलशाहीमध्ये प्रवेश केलेला समाज असल्यामुळे तो गतिमान व प्रगत समाज होय; त्या तुलनेत युरोपेत्तर आशियाई-आफ्रिकी समाज निसर्गनियमांप्रमाणे वागणारे, स्थितीशील, आदिम समाज होत. या तत्त्वनिष्ठेतून मानवशास्त्राचा उदय व विकास झाला. मानवशास्त्राला युरोपकेंद्री चौकटीतून मुक्त करणे हे सबाल्टर्नचे एक उद्दिष्ट राहिले.त्यांनी गण, जात यांना स्थितिशील न मानता, त्यातील गतिशीलता उकलण्याचा प्रयत्न केला. तरीही, जातीची 'व्यवस्था' म्हणून अभ्यास करण्याची भूमिका सबाल्टर्न समूहाने स्वीकारलेली आढळत नाही.

शोषित-अंकितांना स्वायत्त कर्ता ठरवून त्यांच्या विद्रोहाचा, प्रतिकाराचा इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत सबाल्टर्न समूहाने आरंभीच्या खंडांमध्ये स्त्री-प्रश्नाला स्थान दिले नाही. चक्रवर्ती- स्पिवाक यांच्या चौथ्या खंडातील लेखाने (१९८५) सबाल्टर्नच्या या वैगुण्यावर बोट ठेवले. सबाल्टर्न इतिहासकारांनी शोषित-अंकितांच्या विद्रोही जाणिवेतील सामुदायिकता नातलग संबंध, जात, क्षेत्रीय कल्पना यांच्या संदर्भात पुढे आणली. परंतु स्त्री विनितयाच्या पद्धतीतील रचना व

निर्बंध यांमधून नातलग संबंधांचा क्षेत्रीय विस्तार निश्चित होतो याचा विचार सबाल्टर्न इतिहासाकारांना सूचला नाही.

इ. पी. थॉम्पसन यांचा तळाकडून इतिहास लिहिण्याचा परिप्रेक्ष्य ग्रामचीची तात्त्विक भूमिका आणि संरचनावादी भाषाशास्त्र यांच्या चौकटीत रणजीत गुहा यांनी सुरु केलेला सबाल्टर्न इतिहास प्रकल्प अनेक प्रकारच्या तात्त्विक भूमिका, संकल्पनात्मक हत्यारे व पद्धतिशास्त्रीय रीतींचा अवलंब करीत वाटचाल करत आहे. सबार्ल्टनच्या प्रारंभीच्या खंडांमध्ये प्रबळ असलेला ग्रामचीचा प्रभाव क्षीण होत जाऊन उत्तरकाळात ग्रामचीच्या तात्त्विक भूमिकेपासून फारकात घेण्यात आली. सामाजिक-आर्थिक रचनेमध्ये शोषित-अंकित जनांच्या शोषणाचा अर्थ लावण्याऐवजी त्यांचा वर्चस्व/अंकिततेच्या संबंधांना सर्वोपरि महत्त्व देण्यात आले. सबार्ल्टनच्या उत्तरकाळात इतिहासकारांनी वसाहतकालीन मध्यम वर्गीयांचीच शोषित अंकितता दाखवण्यामध्ये धन्यता माजली. दुसऱ्या खंडापासून फूकोंच्या चंचूप्रवेशानंतर आधुनिकोत्तरवादाकडे त्यांचा कल वाढत गेला. ज्ञान, सत्ता, चर्चाविश्व, पराधीन-आत्मनिष्ठ व्यक्ती, भिन्नता या उत्तर संरचनावादी सिद्धांतव्यूहामधेच शोषित अंकिततेचा अर्थ लावण्याचा खटाटोप करण्यात आली. वर्ग, जात, गण अशा निश्चित व्याख्या असणाऱ्या संकल्पना-कसोट्या आधारे शोषित-अंकित जनांचे विश्लेषण करण्याऐवजी स्थानिकता, समुदाय आणि लुटकपणा या समाज-स्थितींवर भर देण्यात आली.

सबार्ल्टन इतिहासारांनी उच्चभू जात-वर्गांचे शोषित अंकितांच्या विद्रोही जाणिवेतील हस्तक्षेपाचा पाठपुरावा केला नाही. श्रमिकांना एकत्र बांधणारा स्वायत्त घटक आणि उच्चभूंच्या संस्कृतीमधून आलेल्या प्रभुत्वशाली घटक या दोन्ही घटकांमुळेच खंडित व विरोधाभासी बनलेली शोषित-अंकितांची जाणिव ग्रामची यांनी अधोरेखित केली. मात्र, सरकार आणि चटर्जी हे दोन इतिहासकार वगळता, सबार्ल्टन समूहातील इतर इतिहासकारांनी शोषित-अंकित जनांच्या जाणिवेची दुर्लगता चित्तारण्याऐवजी तिचा स्वायत्त जाणिवेतून उद्‌भवलेल्या शोषित-अंकितांच्या प्रतिकारामध्ये क्रांती या संरचनात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता

नव्हती. याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण व अन्वयार्थ सबाल्टर्न इतिहासाकार देत नाहीत. सर्वंकष ऐतिहासिक अन्वयार्थ सबार्ल्टन इतिहासकार देत नाहीत. सर्वंकष ऐतिहासिक अन्वयार्थ देण्याची भूमिकाच चक्रवर्ती-स्पिवाक व त्यांचे साथीदार अयोग्य मानत असल्यामुळेच त्यांच्याकडून तशी अपेक्षा करणे गैरलागू ठरते.

अशा अनेक मर्यादा असल्या तरी सबार्ल्टन इतिहासप्रकल्पाने शोषित-अंकितांबाबतच्या इतिहासलेखनाचा अवरुद्ध प्रवाह खुला केला. प्रयोगशील रीतीने नवनव्या अभ्यासपद्धतींचा अवलंब करुन शोषित अंकितांच्या जाणिवेतील 'स्वायत्त'पणा अधोरेखित केला. प्रयोगशील रीतीने नवनव्या अभ्यासपद्धतींचा अवलंब करुन शोषित-अंकितांच्या प्रतिकाराचे विवेचन केले. सबार्ल्टन इतिहासलेखन प्रकल्पाच्या योगदानाची योग्य चिकित्सा करुन शोषित-अंकितांसंबंधीच्या इतिहासलेखनाचा प्रवाह विस्तारला पाहिजे.

### वंचितांच्या इतिहासलेखनाची आवश्यकता

इतिहासाची मांडणी करत असताना इतिहासकाराच्या काळाचे संदर्भ, त्याची स्वतःची दृष्टी आणि जगत असलेल्या मुल्यव्यवस्थेचा प्रभाव त्याच्यावर असतो आणि त्या आधारेच तो इतिहासाची मांडणी करत असतो. म्हणूनच इतिहासलेखन प्रवाहामध्ये इतिहासकारांचे विविध संप्रदाय[१५] आपल्याला दिसतात.

इतिहास अभ्यासकांनी आपल्या सोयीसाठी इतिहास हा कालखंडामध्ये विभाजीत केला. प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक ही विभागणी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रारंभ झाली. आता त्यामध्ये आधुनिक कालखंडाचे विभाजन आधुनिक व उत्तर आधुनिक असे झाले आहे. ब्रिटिशांनी भारत जिंकल्यावर त्यांनी आपणास ज्यांच्यावर राज्य करायचे आहे त्यांचे परंपरा, इतिहास, संस्कृती आणि एतद्देशीयांचे बारकावे समजून घेण्याची प्रक्रिया सुरु केली. अर्थात ब्रिटीशांचा यामागचा हेतू हा साम्राज्यवादी होता हे उघड आहे. विल्यम जोन्स्, विलिकिन्स, ग्रँड डफ, व्हिन्सेन्ट स्मिथ, जेम्स् मिल व कर्नल ब्रिग्ज इत्यादी लेखकांनी केलेली

भारतीय इतिहासाची मांडणी त्यांना जशी समजली त्याप्रकारे साम्राज्यवादी व प्रशासकीयदृष्ट्या केली.

जेम्स् कॅनिंगहॅम ग्रँड डफने लिहिलेल्या *'History Of Maratha's vol.3'* मध्ये मराठी सत्तेच्या उदयाबाबतचा 'वणवा' सिद्धांत मांडला.[१६] ब्रिटीशांच्या साम्राज्यवादी इतिहास लेखनाविरुद्ध भारतीयांची जी प्रतिक्रिया उमटली ते लिखाण 'राष्ट्रवादी' इतिहासलेखन प्रवाह म्हणून प्रसिद्ध पावले.

राष्ट्रवादी इतिहासकारांनी ब्रिटिश राजवटीचे साम्राज्यवादी अंतरंग उघडले. परिणामी भारतीय इतिहासलेखनाचे स्वरुप बदलले, कक्षा रुंदावली. उदा. मध्ययुगातील ऐतिहासिक महापुरुषांच्या कामगिरीचा गुणगौरव केला. त्यांना एका जातीच्या बंधनामध्ये अडकवले. त्यामुळे नकळतच जमातवादाची बीजे रोवली. आमचा गतकाळ गौरवशाली आहे हे सांगताना 'उच्च जात-वर्ण' अहंकारांनी राष्ट्रवादी लेखनास ग्रासले.[१७] राष्ट्रीय आशय स्पष्ट करण्याऐवजी मुस्लिम शासकांविरुद्धचे लढे असे स्वरुप त्या मांडणीस दिले त्यामुळे सामाजिक ऐक्यास तडा दिला.[१८] भारतीय राष्ट्रवादी इतिहास मांडणी प्रतिक्रियावादी मांडणी म्हणून 'जातजाणीवेला' प्राधान्य देणारा इतिहासलेखनाचा एक 'सुधारणावादी' इतिहास म्हणजेच भारतातील 'वंचिताचा इतिहास' मांडणारा प्रवाह सुरु केला, हीच भारतातील सबाल्टर्न इतिहासाची प्रथम मांडणी होय.

'सबाल्टर्न स्टडीज'[१९] तथा 'वंचितांचा अभ्यास' हा इतिहास लेखनातील एक प्रवाह आहे. 'तळाकडून इतिहास' असेही त्याचे वर्णन केले जाते.[२०] भारतात 'सबाल्टर्न' या शब्दासाठी 'वंचित' हा मराठी शब्द प्रयोग डॉ. अरविंद देशपांडे यांनी वापरला. डॉ. उमेश बगाडे यांनी सबाल्टर्नसाठी 'शोषित व अंकित' असा शब्दप्रयोग वापरला आहे.[२१] डॉ. शाम कायदे यांनी सबाल्टर्न इतिहासासंदर्भात 'बहुजनांच्या इतिहासाचा अन्वयार्थ' असा लेख लिहिला.[२२] खरोखरच बहुजन शब्दास सबाल्टर्न शब्द वापरणे योग्य नाही.[२३] सबाल्टर्न किंवा उपेक्षित या शब्दास मोल्सवर्थ

शब्दकोशामध्ये पुढील प्रतिशब्द आहेत.[२४] उपेक्षित- Overlooked neglected, disregarded, treated with unconcern and indifference' असा शब्दप्रयोग केला आहे. इटालियन मार्क्सवादी विचारवंत आंतनिओ ग्रामची याने सबाल्टर्न इतिहासप्रवाहाची कल्पना मांडली. 'सबाल्टर्न' ही लष्करी उतरंडीमधील संज्ञा होय. ग्रामचीच्या निधनानंतर १९५० नंतर त्याचे लिखाण "*Secectionas from Political writing*" आणि "*Selections from Prison Notebooks*" असे प्रसिद्ध झाले. ग्रामचीने बदललेल्या जागतिक परिस्थितीच्या संदर्भात मार्क्सच्या सिद्धांताचा नवा अन्वयार्थ लावला. त्याने युक्तीवाद केला की, 'आर्थिक व्यवहार सामाजिक जीवनाला आधारभूत असले तरी त्यावरील सांस्कृतिक मजलाही महत्त्वाचा आहे. संस्कृती ही सामाजिक परिवर्तनास गती देते. ग्रामचीचा हा विचार दक्षिण आशियाचा वेगळ्या प्रकारचा इतिहास समजून घेण्यासाठी डॉ. रणजित गुहा यांनी केला आणि १९८२ पासून 'सबाल्टर्न' इतिहासाची मांडणी करण्यास प्रारंभ केला. रणजित गुहांचा जन्म १९२२ सालचा. १९८० पासून ऑस्ट्रेलियाच्या कॅनबेरा या ठिकाणच्या नॅशनल विद्यापीठामध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. ''*Writing on South Asian History and Society*'' ही मांडणी करत त्यांनी अभिजन वर्ग न पोहचलेल्या अथवा त्यांनी दखल न घेतलेल्या जनसामान्यांच्या इतिहास कार्याची मांडणी केली.

अभिजनवाद्यांनी सामान्यांची दखल घेतली नाही. त्याविषयीच्या इतिहासाची कुळकथा रणजित गुहा मांडतात. १९८२ पासून आजपर्यंत सबाल्टर्न इतिहासाविषयीचे बारा खंड प्रकाशित झाले आहेत. हे सर्व खंड इंग्रजीभाषेमध्ये आहेत. त्यामुळे ते इंग्रजी वाचकांशिवाय इतरांपर्यंत पोहोचले नाही. आता त्याचा हिंदी आणि बंगालीमध्ये अनुवाद झाला आहे. त्या मांडणीमध्ये काही उणीवाही जाणवतात. उदा. शेतकऱ्यांची जाणीव ही सबाल्टर्न जाणीव[२५] असली तरी ते पुरुषसत्ताक आहे, याकडे अभ्यासकांनी दुर्लक्ष केले आहे. शेतकरी आदिवासींबरोबरच दलित, स्त्रिया यांच्याबद्दल व त्यांच्या जाणिवेबद्दल लिखाण

नाही. शेतकऱ्यांविषयीची, त्यांच्या परिस्थितीविषयीची मांडणी महात्मा फुलेंनी ग्रामची जन्माला येण्याच्या अगोदरच केली होती. मुळातच याठिकाणी ग्रामचीने प्रतिसंस्कृतीच्या निर्मितीची गरज प्रतिपादन केली त्यापेक्षाही चांगली मांडणी व अगोदरच महात्मा फुलेंनी केलेली आहे.[२६]

## जनसामान्यांच्या इतिहासाची मांडणी

सबाल्टर्न मांडणीचे जनक म्हणून श्रेय अंन्तोनिओ ग्रामची यास दिले जाते. त्याचा कालखंड १८९१ ते १९३७ असा आहे. ग्रामची जन्मास येण्याअगोदरच महात्मा जोतीबा फुले (१८२७-१८९०) एक वर्ष अगोदर निधन पावले होते. महात्मा फुलेंनी भारतीय इतिहासाची मांडणी जनसामान्यांच्या नव्हे तर दुसऱ्या कोणत्या अंगाने केली? या प्रश्नाचे उत्तर 'जनसामान्यांच्या सर्वस्वी उत्थानासाठीची/ प्रगतीसाठीची' मांडणी असे द्यावे लागेल. पारंपरिक सामाजिक शोषण आणि आर्थिक शोषण यांचा सामाजिक घटकांच्या संदर्भात पहिला विचार फुलेंनी केला. स्वातंत्र्याचे मूल्य बहुजन समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी इतिहास हे महत्त्वाचे साधन आहे. छत्रपती शिवाजींचा पोवाडा लिहिण्यामागचा त्यांचा हेतू इतिहास कथनाचा असून 'कुणबी, माळी, महार, मांग इत्यादी जातींच्या लोकांना तो उपयोगी पडावा, हा व्यवहारी हेतू आहे.'

भारताच्या इतिहासातील वर्गसंबंधीचे पहिले आकलन महात्मा फुले यांना झाले. त्यांनी स्थूलमानाने इतिहासाची सर्वांगीण चिकित्सा केली. फुलेंनी आपल्या लिखाणातून केलेली वंश संकल्पनेची मांडणी वर्णजाती संस्थेच्या सांस्कृतिक निकषांवर आधारीत केली. मात्र या संपूर्ण मांडणीमध्ये सामान्य कष्टकरी जनतेच्या शोषणाबद्दल केवळ ब्राह्मणांना जबाबदार धरले. सबाल्टर्न किंवा तळाकडून इतिहासाच्या मांडणीमध्ये 'स्त्री-इतिहासाची'[२७] मांडणी करणारा एक प्रवाह विकसित झाला आहे. समाजातील सर्वच जातीधर्माच्या स्त्रियांच्या प्रश्नांना सर्वप्रथम फुलेंनी वाचा फोडली. लोकसंख्येच्या निम्म्याने तरी असणाऱ्या स्त्रियांवर

पुरुषशाहीने वंचितावस्था लादली. त्यामुळे स्त्रीविषयक इतिहास मांडणीस 'तळाकडून इतिहास' म्हणून संबोधता येते.

एकोणिसाव्या शतकामध्ये महाराष्ट्रात स्त्री-विषयक विचारमंथन झाले. जातिविषयक विचारमंथनाप्रमाणेच हे विचारमंथन सामाजिक संबंधाच्या पारंपारीक आकृतीबंधाना छेद देवू पहात होते. लोकहितवादींची शतपत्रे आणि फुले दांपत्यांचे स्त्री-शिक्षणाचे कार्य या दोन गोष्टींमुळे एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला स्त्री-विषयक प्रश्नांच्या विचारमंथनास गती मिळाली.[२८] कनिष्ठस्तरीय शेतकरी-कामकरी स्त्रियांच्या स्थितीविषयी व सुधारणेविषयी कार्य केले. ''सर्व शुद्रादि अतिशुद्रांसह भिल्ल कोळी इत्यादी मानव बांधवांनी आपआपल्या कन्यापुत्रांस शाळेमध्ये पाठवून त्या सर्वांस सत्यज्ञान शिकविण्याचा आरंभ करावा हे त्यांचे आवाहन महत्त्वाचे आहे.'' *'शेतकऱ्यांचा आसूड'* या ग्रंथामधून आणि 'अखंडादि काव्यरचना' मधील 'कुळंबीण' विभागामध्ये शेतकरी स्त्रियांच्या कष्टदायी व हालाखीचे वर्णन केले आहे. फुलेंचा स्त्री-मुक्तीचा विचार व्यापक स्वरुपाचा होता. याठिकाणी फुल्यांची भुमिका मानवतावादाकडे फुले झुकलेले दिसतात.

थोडक्यात म. फुले यांनी समाजातील वंचित, उपेक्षित वर्गाच्या प्रश्नांना वाचा फोडली. खऱ्या अर्थाने ते समाजातील उपेक्षितांचे अंतरंग समजून घेणारे 'उपेक्षितांचे मानकरी' होते.

अशाच प्रकारचा उच्च दर्जाचा इतिहासलेखनाचा प्रयत्न गेल ऑमव्हेट यांनी केला आहे.[२९] प्रस्तुत पुस्तकामध्ये त्यामनी आंबेडकरपूर्व तर १९५६ पर्यंतच्या मुबंई, आंध्र आणि कर्नाटक प्रातांतील दलित चळवळीच्या स्वरुपाची मांडणी केली. भारतातील जातीनिहाय समाजामध्ये, तळागाळातील घटकांना सामाजिक क्रांतीचे भान कसे आले, त्यांचे विशेषतः कनिष्ठ जातींचे आत्मभान जागे झाल्याची मांडणी आहे.

## नाशिक जिल्हा : संक्षिप्त इतिहास

महाराष्ट्र राज्यात असलेल्या ३५ जिल्ह्यांपैकी नाशिक हा उत्तर महाराष्ट्रातील इतिहासप्रसिध्द जिल्हा आहे. नाशिक जिल्ह्याला एक वेगळी भौगोलिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. आज अस्तित्वात असलेल्या नाशिक जिल्ह्याची निर्मिती इ.स. १८६९ मध्ये झाली. उत्तर महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वत रांगेच्या पूर्वेस असलेल्या नाशिक जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १९°-५६ उत्तर ते २०°-५० उत्तर असा आहे. तर रेखावृत्तीय विस्तार ७३°-१६ पूर्व ७४°-५६ पूर्व आहे. नाशिक जिल्ह्याने महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी १५५८२ चौ.कि.मी. क्षेत्रफळ व्यापलेले आहे.[३०] ग्रामीण भागाचे क्षेत्रफळ १५०११.७४ चौ. कि.मी. आहे. नाशिक जिल्ह्याच्या ईशान्य पूर्वेला धुळे, जळगाव व औरंगाबाद जिल्हे आहेत. पश्चिमेला अहमदनगर जिल्हा आहे.

महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई नाशिक शहरापासून १८८ कि.मी. अंतरावर आहे. नाशिक जिल्ह्यात पूर्व व पश्चिम वाहिनी नद्या आहेत. या जिल्ह्याचे हवामान साधारणपणे उष्ण व कोरडे असते. त्याचप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील बऱ्याच मोठया प्रदेशाचा समावेश पर्जन्यछायेच्या प्रदेशात होतो. नाशिक जिल्ह्यात हिवाळा मध्यम स्वरूपाचा, उन्हाळा कोरडा तर पावसाळा सर्वसाधारण स्वरूपाचा असतो. या जिल्ह्यातील तापमान साधारणपणे फेब्रुवारी महिन्यानंतर वेगाने वाढत जाते. नाशिक शहरातून वाहणारी गोदावरी व तिला दारणा, कादवा, कश्यपी, नासर्डी, बाणगंगा इत्यादी उपनद्या मिळतात. तसेच कालवे, पाटबंधारे, धरणे यांच्यामुळे येथील हवामान आल्हाददायक असते. जिल्ह्यात नोव्हेंबर ते जानेवारी या महिन्यात सुखद थंडी असते. फेब्रुवारी ते मे महिन्यापर्यंत साधारणपणे ३० ते ४५ सेल्सिअस तापमान असते. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव शहराची मे महिन्यातील तापमानाची नोंद ४५.५०° से. झालेली आहे. जून महिन्यात या जिल्ह्यात नैऋत्य मान्सूनचे आगमन होताच तापमान हळूहळू कमी होऊ लागते. नाशिक जिल्ह्याच्या परिसरात सहयाद्री डोंगराची रांग आहे. तेथे बऱ्यापैकी झाडे आहेत. मात्र दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी होत असल्यामुळे उष्णतेचे प्रमाणही वाढत आहे. नाशिक

जिल्ह्याच्या व शहराच्या भौगोलिक स्थानामुळे जिल्ह्याच्या विकासास मदत झालेली आहे. मुंबई, पुणे, औरंगाबाद या महानगरांच्या केंद्रस्थानी नाशिक जिल्हा वसलेला आहे. त्यामुळे नाशिकच्या विकासात भर पडलेली आहे.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

नाशिक जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी शेकडा २२.१३ क्षेत्र जंगलव्याप्त आहे. महाराष्ट्रातील जास्त वनस्पती असलेला जिल्हा नाशिक आहे. जिल्ह्यातील पश्चिमेकडील कमी उंचीच्या दाट लोकसंख्येच्या प्रदेशात शेतीसाठी जमीन म्हणून बरीच अरण्यतोड झालेली आहे. जंगल संपत्तीवर येथील माणूस जिवापाड प्रेम करतो. जंगल म्हणजे आपल्या उपजीविकेचे साधन व आपली मालकी या दृष्टीने पाहतो. येथील मुख्य पीक तांदूळ व नागली आहे. अलीकडच्या काळात जमिनीचे सपाटीकरण करून विहीरी खोदून बागायती शेतीकडे या भागातील लोकांचा कल वाढला आहे. ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या प्राचीन प्रतिष्ठान या व्यापारी मार्गावरील नाशिक शहराने आधुनिक काळात व्यापारी व औद्योगिक केंद्र म्हणून मानाचे स्थान मिळविले आहे. नाशिकला प्रागैतिहासिक काळापासून इतिहास आढळतो.

नाशिक जिल्ह्याच्या प्रदेशाच्या अस्तित्वाचा उल्लेख पुरातन काळातील पाषाण युगापर्यंत जोडला जातो. तसेच पौराणिक उल्लेखानुसार नाशिकचा संबंध रामायण काळाशी जोडला जातो. प्रभु रामचंद्र यांचे वनवासातील वास्तव्य नाशिक शहरातील पंचवटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात गेले. नाशिक जिल्ह्याचा इतिहास तेजस्वी आणि पारंपरिक परंपरांचा आहे. नाशिक शहराचा पुरातन काळात पदमनगर, त्रिकंटक, जनस्थान या नावांनी उल्लेख केलेला आपणांस मिळतो. पौराणिक काळातील राम-लक्ष्मण यांच्या वनवास काळात नाशिकच्या जंगलात दंडकारण्य भागात लक्ष्मणाने शुपर्णखा नांवाच्या राक्षसिणीचे नाक कापले होते. संस्कृत भाषेत नाकाला नासिका म्हणतात. त्यावरून या भागास नासिक असे नांव पडले असावे. भारतात मानवी संस्कृती अस्तित्वात आली त्यावेळेपासून या परिसरात मानवाचे अस्तित्व होते. महाराष्ट्र राज्यात स्थिर अशा मानवी संस्कृतीचा

प्रारंभ इ.स.पू. १५०० च्या आसपास झाला असावा. त्याचे विशेष म्हणजे ताम्रपाषाणयुगीन संस्कृती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्कृतीचा परिचय पुरातत्ववेत्त्यांनी करून दिला. ही संस्कृती पुरातत्त्व शास्त्रात नाशिक जोर्वे संस्कृती या नांवाने ओळखली जाते. आज बागलाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरावर महाभारत काळात मुल्हेर व साल्हेर किल्ल्यावर मयूरध्वज व ताम्रध्वज या दोन बंधूंची राजवट असल्याचा उल्लेख येतो. महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात आणि संस्कृतीच्या जडणघडणीत नाशिकला महत्त्व प्राप्त झाले. नाशिकच्या परिसरात अश्मयुगीन संस्कृती अस्तित्वात होती.

इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून इ. स. तिसऱ्या शतकापर्यंत कान्हेरी आणि बेडसा येथील कोरीव लेखात नाशिकचा उल्लेख सापडतो. मौर्य व दक्षिणेतील सर्वात प्राचीन व बलाढय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सातवाहन राजवंशातील काही व्यक्तींचा या परिसराशी संबंध होता. सातवाहन वंशातील राजा कृष्ण सातकर्णी याचा कोरीव लेख नाशिक येथे असलेल्या लेण्यात सापडतो.[३१] सुमारे २००० वर्षांपूर्वी नाशिक व गोवर्धन या नगराचा लौकिक होता. सातवाहन राज्यकर्त्यांनंतर सत्तेवर आलेल्या अंभिर ईश्वरसेन राजाचा सापडलेला कोरीव लेख पांडव लेण्यातील (त्रिरश्मी) लेखातून नाशिकबाबत प्रकाश पडतो. सातवाहन राजा गौतमीपूत्र सातकर्णी व शकक्षत्रप राजा नहपान यांच्यात इ.स. १२५ च्या सुमारास गंगापूर गोवर्धन येथे युध्द झाल्याचा उल्लेख येतो. या काळात शासकीयदृष्टया नाशिक हे जिल्हा (विषय) आणि गोवर्धन हे उपविभाग (आहार) केंद्र होते.

नाशिक शहरापासून जवळ असलेले त्र्यंबकेश्वर हे सर्वात प्राचीन गाव म्हणून कर्नाटकातील गंग राजवंशाच्या काळातील इ.स. ४६६ मधील उपलब्ध झालेल्या ताम्रपटात उल्लेख आढळतो. इ.स. सातव्या शतकात हा परिसर बदामीचे चालुक्य राज्यकर्ते यांच्या ताब्यात होता. नाशिकचा प्रशासक म्हणून या घराण्यातील जयसिंह चालुक्य हा होता. त्याचा ताम्रपट येथे सापडला आहे. नाशिक जिल्हयातील दिंडोरी परिसर दंडकारण्यात मोडत होता. या परिसरावर प्राचीन सातवाहन ते मध्ययुगीन यादव राज्यकर्त्यांचे वर्चस्व होते. तसेच नाशिक

जिल्ह्यातील कळवण (बागलाण) परिसर विक्रमसेन नावाच्या त्रैकुटक राजाने भारवन ताम्रपटात कळवण (कल्लीवन) परिसर हा शिवस्वामी नावाच्या ब्राह्मणास दान दिल्याचा उल्लेख आलेला आहे. चालुक्य राज्यकर्त्यांच्या काळात सिंद (सेंद्रक) नावाच्या लष्करी पथकाचा तळ सिन्नर येथे होता. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव परिसराचा सर्वात प्राचीन उल्लेख राष्ट्रकुट राजा इंद्रजित तिसरा यांच्या काळातील इ.स. ९१५ मधील वजीरखेडा या गावात सापडलेल्या ताम्रपटात येतो. या ताम्रपटात मालेगावचा उल्लेख 'माहुलीग्राम' असा करण्यात आलेला आहे.

यादव घराण्याचा संस्थापक राजा दृढप्रहार याने इ. स. ८५० च्या सुमारास नाशिक जिल्हयातील चंद्रदित्यापूर (चांदवड) येथे आपली राजकीय सत्ता स्थापन केली होती. यानंतर यादवाचा राजा सेऊणचंद्र पहिला याने सिन्नरला येऊन राज्य कारभार केला व सेऊनपूर नावाची पेठ वसविली होती. त्यामुळे चांदवडनंतर सिन्नर ही यादवांची राजधानी होती.

यादव राज्यकर्त्यांच्या सत्तेला मध्ययुगीन काळातील मुस्लीम सत्तांच्या आक्रमणामुळे पडतीचे दिवस आले. इ.स. १३१२ पासून नाशिक जिल्ह्याचा परिसर मुस्लीम राज्यकर्त्यांच्या अधिपत्याखाली जाऊ लागला होता. प्रारंभी बहामनीनंतर इ.स. १४९० ते १६३६ या काळात हा प्रदेश निजामशाहीच्या वर्चस्वाखाली होता. नाशिक जिल्हयातील बागलाण (सटाणा) या प्रदेशाला बागलाण हे नांव मध्ययुगीन काळात रूढ झाले. या परिसरावर बागुल आडनांवाच्या राठोडवंशीय राजपूत राजांनी सुमारे ३०० वर्ष राज्य केले. त्यावरून बागुल-बागलाणे-बागलाण असे नांव रूढ झाले. बागुलवंशीय राजाची मुल्हेर किल्ला ही राजधानी होती.

पुढील काळात मुघल सम्राट शहाजहान याने नाशिक व परिसरावर आपले वर्चस्व निर्माण केले. त्यावेळी कारभाराच्या निमित्ताने या परिसरात मुघल सरदारांचे नाशिक व परिसरात वास्तव्य होते. तेव्हा या सरदारांनी या परिसरात अनेक वाडे, मशिदी उभारल्या. त्यांनी या भागातील वातावरणामुळे गुलाबाची फुले तयार करण्यासाठी येथील शेतीला उत्तेजन दिले. त्याचा परिणाम असा झाला की, नाशिक व परिसरात गुलाबाच्या फुलांची शेतीच निर्माण झाली. त्यावरून मुघलांनी

नाशिकला 'गुलशनाबाद' असे नांव दिले होते.[३२] इ.स. १६३६ मध्ये अलिवर्दीखान नांवाच्या मोगल सेनापतीने नाशिक जिल्ह्यातील चांदवड परगण्यावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. त्यावेळी निफाड व आजूबाजूचा परिसर या परगण्यात समाविष्ट करण्यात आला होता. इ.स. १६३८ मध्ये औरंगजेबाने बागलाण (मुल्हेर) येथील शेवटचा राठोड राजा बहिउमखान याचा पराभव करून हा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला होता. तसेच वणी-दिंडोरी हा परिसर मध्ययुगाच्या काळात पेठ संस्थानात समाविष्ट होत होता. यावेळी दिंडोरी येथे ऐतिहासिक घराणे, राजे होते. तसेच नाशिक जिल्हयातील मालेगाव व आजूबाजूचा परिसर मध्ययुगीन काळात गाळणा प्रांत म्हणून ओळखला जात होता. या प्रांतातील आजच्या देवळा तालुक्यातील पिंपळगाव-वाखारी येथे मुघलाच्या लष्कराचे लष्करी ठाणे होते. तसेच इ.स. १६६७ मध्ये राघोजी पाटील शिंदे नांवाच्या गावप्रमुखाने येवला हे गाव वसवले होते.

मुगलांची दक्षिणेत सत्ता होती याच काळात मराठयांची सत्ता उदयास येत होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांच्या स्वराज्याचे धोरण आखले जात होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी मोरोपंत पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली नाशिक जिल्हयातील बागलाण परिसरातील साल्हेरचा किल्ला जानेवारी १६६१ मध्ये मुघल सम्राट औरंगजेबाकडून जिंकून घेतला होता. तसेच इ.स. १६६४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या ताब्यातील सुरत शहराची लूट केली. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी नाशिक जिल्ह्याच्या परिसरातून प्रवास केला होता. या काळात नाशिक जिल्ह्यात मुघल-मराठा यांच्यात वणी-दिंडोरीचे युध्द, अहिवंतगडचा वेढा, तळेगांवचे युध्द इत्यादी अनेक घटना इतिहास प्रसिध्द आहेत. तसेच इ.स. १६७०-७१ च्या दरम्यानच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या ताब्यात असलेले नाशिक जिल्हयातील १९ किल्ले जिंकून घेतले होते.[३३]

पेशवा पहिला बाजीराव याने आपल्या पराक्रमाच्या जोरावर अनेक नवीन प्रदेश आपल्या राज्याला जोडले होते. त्यामध्ये नाशिकचाही समावेश होता. त्यांनी नाशिकमध्ये पेशवेवाडा (सरकारवाडा) बांधला होता. या पेशवेवाडयातून या

परिसराचे सर्व सरकारी कामकाज पाहिले जात होते. पेशवा बाजीराव विश्रांतीकरीता व धार्मिक कार्यासाठी ते सहकुटुंब नाशिकला येत असत.[३४] तसेच त्यांचे आजोळ नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील कोठुर गावातील बर्वे कुटुंबातील होते. मुघल सम्राट औरंगजेब यांच्या काळात नाशिकमधील मंदिरे व गोदावरी नदीवरील जे घाट उद्ध्वस्त करण्यात आले होते ती सर्व मंदिरे व घाट पेशवा बाजीरावाने दुरूस्ती करून नव्याने बांधली होती. नाशिक शहरात पहिला पूल पेशव्यांनी बांधला. तो पूल 'सरस्वती पूल' नांवाने ओळखला जातो. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव परिसर (गाळणा प्रांत) इ.स. १७५२ मध्ये पेशव्यांच्या ताब्यात गेला. जेव्हा पेशव्यांनी शूर सरदार नारोशंकर दाणी या सरदाराला येथील जहागिरी दिली होती तेव्हा त्याने मालेगाव येथे भुईकोट किल्ला बांधलेला आहे.

नाशिक जिल्ह्यातील बागलाण प्रांत इ.स. १७९५ मध्ये पेशव्यांच्या ताब्यात आला होता. तसेच पेशवे काळात वणी दिंडोरी या परिसरात वर्चस्वावरून पेशवे व दाभाडे यांच्यात अनेक वेळा राजकीय संघर्ष झालेला होता. तसेच येवला परिसर हा विंचूर प्रांतात मोडत होता. त्याची जहागिरी पेशव्यांनी विठ्ठल सुंदर दाणी या सरदाराला दिली होती. नाशिक जिल्हयातील नांदगाव परिसराचा समावेश या काळात माणिकपुंज परगण्यात करण्यात आलेला होता. तसेच मल्हारराव होळकर इ.स. १७५२ मध्ये पेशवाईत आले. त्यावेळी त्यांना पेशव्यांकडून नाशिक जिल्ह्यातील चांदवड या परगण्याची देशमुखी मिळाली होती. तेव्हापासून या परगाण्याचा कारभार ते पहात होते. पेशवा अमृतराव याने इ.स. १८०३ मध्ये नाशिक शहराची लूट केली. ब्रिटिशांनी पेशवाई नष्ट केली तेव्हा जनरल मॅक्डोनॉल्ड व कॅप्टन ब्रिग्ज या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी दिनांक १९ एप्रिल १८१८ रोजी नाशिक व परिसरावर आपले वर्चस्व निर्माण केले.[३५] अशा अनेक सत्तांनी व ब्रिटिश काळापर्यंत नाशिक व परिसरावर आपले वर्चस्व निर्माण केले होते.

ब्रिटिशांच्या विरोधी सुरू झालेल्या स्वातंत्र्य आंदोलनात नाशिक जिल्हाही आघाडीवर होता. इ.स. १८५७ च्या उठावातील मोठा रणशूर व आघाडीचा सेनानी तात्या टोपे यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील येवला गावातील होता. त्यांनी

ब्रिटिशांना चांगलेच हैराण केले होते. तसेच या दरम्यानच्या काळात नांदूरशिंगोटे येथील भागोजी नाईक यांनीही ब्रिटिशांच्या विरोधात आदिवासींना एकत्र करून लढा दिला होता. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी इ.स. १९०० मध्ये 'मित्र मेळा' नावाची संघटना स्थापन केली होती. पुढे याच संघटनेचे रूपांतर 'अभिनव भारत' सोसायटीत करून ब्रिटिशांविरोधी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने भारताला स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा घेऊन भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान दिले आहे. तसेच ब्रिटिशांच्या विरोधात झालेल्या सामाजिक क्रांतीच्या क्षेत्रात मोलाचा वाटा उचलणारे न्या. महादेव गोविंद रानडे यांचा जन्मही नाशिक जिल्ह्यातील सिन्नर या गावात झालेला आहे. त्याचबरोबर नाशिक जिल्ह्यात अनेक ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. इ.स. १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीत दादासाहेब बिडकर, क्रांतिवीर वसंतराव नाईक, गो. ह. देशपांडे, भाऊसाहेब हिरे, दादासाहेब पोतनीस, डॉ. भुतेकर अशा अनेकांनी या जिल्ह्याच्या भूमीत ब्रिटिशांच्या विरोधात जनमत जागृत करून रान उठविले होते.[३६]

आज अस्तित्वात असलेल्या नाशिक जिल्ह्याचा काही भाग मध्ययुगात अहमदनगर तर काही भाग खानदेश जिल्ह्यात समाविष्ट होता. अहमदनगर जिल्ह्यात असणाऱ्या सिन्नर, चांदवड, दिंडोरी, इगतपुरी, नाशिक, पेठ संस्थान हा सर्व प्रदेश ब्रिटिशांनी एकत्र करून इ.स. १८३७-३८ मध्ये अहमदनगर येथील जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली उपविभाग निर्माण केला होता. त्याच्यानंतर इ.स. १८५६ मध्ये हा उपविभाग रद्द करून हे सर्व तालुके अहमदनगर जिल्ह्यात समाविष्ट केले होते. तद्नंतर इ.स. १८६९ मध्ये स्वतंत्र जिल्हा म्हणून नाशिक जिल्ह्याची निर्मिती केली. त्यावेळी हे सर्व तालुके व खानदेशातील मालेगाव, नांदगाव, बागलाण हा प्रदेश समाविष्ट केला होता.[३७] त्यानंतर जून १९९९ मध्ये देवळा व त्र्यंबक या नवीन दोन तालुक्यांची निर्मिती करून एकूण १५ तालुके असलेला नाशिक जिल्हा आज अस्तित्वात आलेला आहे.

## धार्मिक पार्श्वभूमी

प्राचीन काळात मानव आपल्या गरजा भागविण्यासाठी पूर्णतः निसर्गावर आधारित होता, त्यामुळे तो आपल्या मुलांप्रमाणे निसर्गावर प्रेम करत होता. असे असले तरी वादळी वारे, मेघ गर्जना, विद्युत, अतिवृष्टी, महापूर, भूकंप अशा संकटांची देखील त्याला जाणीव होऊ लागली या संकटामागे कोणतीतरी दैवी शक्ती आहे, असे त्यास वाटू लागले. या दैवी शक्तीपासून सुटका होण्यासाठी देवतांच्या उपासनेस प्रारंभ झाला. 'देव' या शब्दाची व्याख्या 'दिव्य देह धारण करणारा एक वर्ग' अशी केली जाते.[३८] जिच्याठिकाणी दिव्य तेज अथवा सामर्थ्य असते, ती देवता होय. मानवाला त्याच्या आदिम अवस्थेच्या काळातच देवेतेची प्रचिती झाली. वैदिक काळात वरुण, सूर्य, उषा, इंद्र, वायू, अग्नी, पृथ्वी, पशुपती, विष्णु, अशा देवतांना प्रसन्न करुन घेण्यासाठी यज्ञ करण्याची प्रथा मोठ्या प्रमाणात होती. देव देवतांची पूजा करणाऱ्यांमध्ये ऐक्याची भावनादेखील त्या काळात दिसून येते. त्याचा उल्लेख ऋग्वेदात दिसतात. उदा. 'वरुणा! तु जन्मतः अग्नी आहेस, चेतवला गेलास तर तू मित्र होतोस, हे बलपुत्रा! तुझ्यात सर्व देवांची वसती आहे. परिचर्या करणाऱ्यांना तू इंद्र आहेस.'[३९] देवतांची कल्पना दृढ झाल्यानंतर या देवता राहतात कुठे असा प्रश्न ओघानेच आला. देवता दिसत नाहीत, पृथ्वीवर आढळत नाहीत, त्याअर्थी त्या आकाशात राहत असाव्यात, अशी कल्पना पुढे आली. देवालयाची स्थापना विधीपूर्वक करावयाची असते. देवालय कोठे निर्माण करावे याविषयी *बृहद्संहितेत* वर्णन केलेले आहे.

*कृत्वाप्रभूतं सलिलमारामान् विनिवेश्य च।*

*देवतायतं कुर्याद्यशोधर्माभिवृद्धये।।*

*इष्टपूर्तेन लक्ष्यन्ते ये लोकास्तान बुभूषता।*

*देवानामालयः कार्यो द्वयमप्यत्र दृश्यते*

(विपुल जलाची सरोवरे आणि फळा-फुलांनी बहरलेल्या वृक्षाची उद्याने निर्माण करुन त्याजागी यश व धर्म यांच्या वृद्धीसाठी देवालय निर्माण करावे.

इष्टपूर्तीमुळे ज्या स्वर्गादी लोकांची प्राप्ती होते त्या लोकांची अभिलाषा बाळगणाऱ्या व्यक्तीने देवाचे मंदिर निर्माण करावे.)[४०]

मंदिर ही संस्कृत संज्ञा आहे. मराठीत त्यास देवालय असे देखील म्हणतात. विविध देव मूर्तींच्या रुपाने दर्शन घडविणारे स्थळ म्हणजे मंदिर होय. अगदी प्राचीन काळात देव मूर्ती दगडी फरशीवर किंवा शिलाफलकावर तयार झाली. तिचे आश्रयस्थान म्हणजे झाडाखाली उघड्यावर होय. पुढील काळात देव मूर्ती ठेवलेल्या पूजास्थानाचे वेगळेपण दाखविण्यासाठी व संरक्षण होण्यासाठी त्याभोवती दगडी कठडा बांधण्यात येऊ लागला. ऊन, वारा, पाऊस या पासून देवतांचे संरक्षण होण्यासाठी गवताचे छप्पर तयार केले जाऊ लागले. त्याला पर्णकुटी असे म्हणतात. बौद्ध काळात चैत्यगृहाचे विकसीत रुप होते. प्राचीन काळी समाजाचे केंद्रस्थान असलेली यज्ञसंस्थेची जागा नंतरच्या काळात मंदिर संस्थेने घेतली. यज्ञाची जागा देवपूजा, दानपरिषद या यज्ञासंबंधित बाबींची मंदिर वास्तूंशी सांगड घातली गेली. गाभारा, मंडप हे यज्ञकुंडाच्या स्थानी आले. गाभाऱ्यात प्रत्यक्ष मूर्तीची स्थापना झाली. आहुतीच्या ऐवजी नैवद्य आला. यज्ञातील युपाचे गरुडस्तंभामध्ये रुपांतर झाले. परिषद भूमीच्या जागी सभामंडप आला. मूर्तिपुजा आणि मंदिरस्थापत्याची मुळे इतिहासकाळाच्या प्रारंभी भारतात मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेल्या यक्षपूजेत होती. मुर्तीपूजेत मंदिर हा महत्त्वाचा घटक आहे. मुर्तीपुजेच्या प्रथेतूनच मंदिर ही संकल्पना तयार झाली.

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात देवालयांना महत्त्वाचे स्थान आहे. समाजाच्या सामुदायिक रुढी, परंपरा जतन  करण्याचे ते एक प्रभावी साधन आहे. पूजे-अर्चेबरोबर भजन, किर्तन, धार्मिक विधी आणि मंगल कार्ये संपन्न होतात. त्यामुळे सांस्कृतिक जीवन समृद्ध होते. ग्रामीण भागातील यात्रेच्या आणि उत्सवाचे निमित्ताने सामुदायिक जीवनाचे दर्शन घडते. मंदिरांमध्ये गावसभा 'गोताई' भरवून न्यायनिवाडे होत असत. समाजातील अडीअडचणी, प्रश्न सोडविण्याचे ते एक स्थळ म्हणून महत्त्वाचे होते.[४१] महाराष्ट्राला मंदिर वास्तूकलेचा मोठा वारसा लाभला आहे.

भारतात जी विविध देवदेवतांची मंदिरे आहेत त्यामध्ये 'शिव' मंदिरांची संख्या जास्त आहे. महाराष्ट्रात शिव किंवा महादेवाची पूजा प्रिय आहे. *शिवपुराणात* सांगितलेल्या १२ ज्योतीर्लिंगांपैकी ५ महाराष्ट्रात आहेत. त्यापैकी त्र्यंबकेश्वर (नाशिक) हे महत्त्वपूर्ण ज्योतीलिंग आहे.

प्राचीन काळापासून महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर संपूर्ण भारतात नाशिक हे धार्मिकदृष्ट्या पवित्र स्थान म्हणून ओळखले जाते. नाशिक परिसरास रामायण, महाभारत या महाकाव्यांपासून ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. तसेच विविध दंतकथांच्या आधारे नाशिकचे संदर्भ रामायणाशी जोडले आहेत. ते म्हणजे रामायणातील दंडकारण्य म्हणजे आजचा नाशिकचा परिसर होय. नाशिक हे पवित्र तीर्थक्षेत्र असल्यामुळे देशाच्या सर्व भागातून असंख्य भाविक नाशिकच्या गोदावरी नदीत स्नान करून महत्त्वाच्या मंदिराचे दर्शन घेतात. तसेच नाशिक येथे दर बारा वर्षांनी कुंभमेळा भरतो. या कुंभमेळयाकरीता संपूर्ण भारताच्या अनेक भागातून असंख्य साधुसंत कुशावर्त येथे येतात. कुशावर्त हे दगडी शिल्प आहे. श्री त्र्यंबकेश्वराच्या मंदिराच्या मागील बाजूस पूर्व-पश्चिम ६१५ फुट दक्षिणोत्तर ३५० फुट असे गौतमतीर्थ आहे. येथून जवळच अंजनेरी नावाचा पर्वत आहे. त्याठिकाणी हनुमान यादेवतेचा जन्म झाला. तसेच श्री निवृत्तीनाथांनी समाधी घेतली तो परिसर नाशिकजवळ आहे. पंचवटीत शृंगेरीपिठाचे जगद्‌गुरू शंकराचार्य श्रीमद् सच्चिदानंद महाराज व त्यांचे शिष्य शंकराचार्य ब्रह्मानंद स्वामी यांच्या समाधी आहेत.

सम्राट अशोकाने बौध्द धर्माच्या प्रसारासाठी विविध प्रांतामध्ये पाठविलेल्या धर्मसुधारकांच्या प्रयत्नामुळे दक्षिणेत प्रमुख ठिकाणी बौध्दपिठाची स्थापना झाली. बुध्दोत्तर काळात बौध्द धर्मात जे संप्रदाय उदयास आले त्यापैकी भद्रायनीय संप्रदायाचे केंद्र म्हणून नाशिकचा उल्लेख शिलालेखात आढळतो.

यादव काळात जैनांचे धार्मिक महत्त्व नाशिक परिसरात निर्माण झाले. इ.स. १००० सालापासून जैनधर्मीय लोकांनी नाशिकच्या उत्तरेला ५ मैल अंतरावर ६०० फूट उंच अशा टेकडीवर जैनधर्मीय लेणी खोदून जैन धर्माचे मंदिर बांधले आहे.

त्या भागाला आज म्हसरूळ म्हणून ओळखले जाते. तसेच द्वापार युगातील श्रीकृष्णाला गजसुखकुमार नावाचा भाऊ होता. त्याने नाशिक परिसरात मुक्ती घेतली होती. म्हणून तो परिसर गजपंथी टेकडी किंवा गंजपथ परिसर म्हणून ओळखला जातो.

नाशिक जिल्ह्यातील बागलाणमध्ये मांगीतुंगी हे जैनधर्मियांचे क्षेत्रस्थळ इ.स. अकराव्या शतकात उदयास आले. नाशिक जिल्हयातील इगतपुरीच्या पश्चिमेस त्रिंगालवाडीचा किल्ला असून तेथे ११ व १२ व्या शतकात कोरलेल्या जैन गुंफा प्रसिध्द आहेत. तसेच बागलाणमधील देवळाणे येथे राष्ट्रकूटकालीन शैवमंदिर असून ते शिल्पस्थापत्याचा उत्कृष्ट नमूना म्हणून परिचित आहे. तसेच या भागातील मुल्हेर येथे काशीराज महाराजांनी रामानंद संप्रदायाची स्थापना केली. त्याच्यानंतर त्यांचे शिष्य उद्धव महाराज यांचे समाधी स्थळ येथे आहे. येथे दरवर्षी रासउत्सव मोठ्या प्रमाणात होतो. मुल्हेरपासून जवळ ५-७ कि.मी. अंतरावर नयन महाराजाची समाधी व दावल मलिक यांची समाधी आहे. दावल मलिक यास हिंदू-मुस्लीम या दोन्ही धर्माचे लोक मानतात. तसेच बागलाण तालुक्यात हेमांडपंथी शैलीच्या शिवाच्या मंदिराकरीता देवळाणे गाव प्रसिद्ध आहे. तसेच संत शिरोमणी देव मामलेदार (यशवंतराव) महाराज यांच्या वास्तव्याने व प्रशासनाने नाशिक जिल्हयातील बागलाणची भूमी पवित्र झालेली आहे. नाशिक जिल्हयातील नांदगाव तालुक्याचे मुख्यालय नांदगावपासून ७-८ कि.मी. अंतरावर नस्तनपूर या गांवी शनिदेवाचे प्रमुख पीठ आहे.

यादव काळात सिन्नर येथे गोंदेश्वर, भिल्लम मठ, आयरेश्वर अशी हेमाडपंथी शैलीची मंदिरे बांधण्यात आली आहेत. तसेच महानुभाव पंथाचे कार्य मोठया प्रमाणात या परिसरात प्रसारीत झालेले आहे. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी हे सिन्नर येथील मठात काही काळ वास्तव्यास होते असा उल्लेख महानुभाव साहित्यात मिळतो. तसेच या परिसरातील वडांगळी येथील सतीमाता व सामंत दादा हे वंजारा-बंजारा समाजाचे मोठे देवस्थान आहेत.

महाराष्ट्र राज्यातील साडेतीन शक्तीपिठांपैकी एक कळवण तालुक्यातील नांदुरी येथील सप्तशृंगी गडावरील देवी हे आहे. तसेच चांदवड तालुक्यातील रेणुकादेवी हे सुध्दा पवित्र तीर्थस्थळ म्हणून ओळखले जाते. चांदवड येथील रेणुकादेवी मंदिराचा जिर्णोध्दार अहिल्याबाई होळकर यांनी केला होता.

नाशिक शहराच्या जवळील गंगापूर येथील वाड्यात गोपिकाबाई राहात होत्या. तेव्हा पेशवे काळात नाशिक व परिसरात वेदविद्या यांचा अभ्यास वाढीस लागला होता. गोपिकाबाईंनी मंदिराच्या विकासासाठी मोठे लक्ष दिले. ज्यामध्ये प्रामुख्याने सुंदरनारायण मंदिर, उमामहेश्वर मंदिर, पंचरत्नेश्वनर मंदिरे, तिळभांडेश्वर मंदिर, श्री बालाजी मंदिर, भद्रकाली मंदिर, काळाराम मंदिर इत्यादी मंदिरे अतिशय महत्त्वाची असून धार्मिकदृष्टया महत्त्वाची म्हणून मानली जातात. गोपिकाबाई नंतर रघुनाथराव पेशवे यांच्या पत्नी आनंदीबाई पेशवे ह्यासुध्दा नाशिक येथे वास्तव्यासाठी आलेल्या होत्या.[४२] त्या आनंदवल्ली येथे राहात होत्या. त्या ठिकाणी रघुनाथराव पेशवे यांनी मोठा वाडा बांधला होता. प्राचीन तीर्थस्थान म्हणून ओळखले जाणारे श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे नानासाहेब पेशवे यांनी भगवान शंकराचे तथा त्र्यंबकराजाचे भव्य मंदिर उभारले. हे मंदिर शिल्पकलेचा अजोड नमुना आहे. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात इगतपुरी गावाजवळील प्रिंप्री येथे सद्रद्दिन नावाच्या मुस्लीम साधूचा दर्गा आहे. तसेच इगतपुरी येथे जगप्रसिद्ध बौद्ध धर्माचे विपश्यना केंद्र प्रसिध्द आहे.

## आर्थिक पार्श्वभूमी

नाशिक जिल्ह्याचा परिसर प्राचीन ते आर्वाचीन या सलग कालखंडात आर्थिक दृष्ट्या संपन्न होता. तसा तो आजही आहे. सातवाहन काळात उत्तरेकडून व पश्चिमेकडून मराठवाड्यात व दक्षिण भारतात जाण्यासाठी असलेले व्यापारी मार्ग नाशिक परिसरातून जात असल्याने जकतीच्या माध्यमातून उत्पन्न मिळत असल्याच्या नोंदी नाशिकच्या शिलालेखामध्ये आहेत.[४३]

सातवाहन काळात नाशिक व परिसरातील स्थानिक लोकांनी रोमशी चालणाऱ्या व्यापारात मोठ्या प्रमाणात भाग घेतलेला होता. नाशिक परिसरात इ.

स. आठव्या शतकातील एक ताम्रपट उपलब्ध झालेला आहे. या ताम्रपटात शक सातवाहन यांच्या काळात आहार असलेल्या गोवर्धन गावातील लोकांचा प्रमुख व्यवसाय वस्त्रोद्योग हा होता. त्यांच्यापैकी अनेक व्यापाऱ्यांची नावे नाशिकच्या आजूबाजूच्या क्षेत्रात असलेल्या शिलालेखात नमूद करण्यात आलेली आहेत. या काळातील श्रीमंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यापाऱ्यांची नांवे दिली आहेत. त्यामध्ये वीर आणि रमनाक या दोन व्यापाऱ्यांची नांवे श्रीमंत, सधन व्यापारी म्हणून असल्याचा उल्लेख मिळतो. [४३]

तसेच या परिसरातील काही दानलेखामध्ये वस्त्रोद्योग, तेलउद्योग, कुंभारकाम आणि जययंत्रकाम या वेगवेगळया व्यवसायाचे वर्णन करण्यात आले आहे. येथील सर्व आर्थिक व्यवहार श्रेष्ठींमार्फत चालविण्यात येत होते. आनंद नांवाची श्रेष्ठी कार्यरत होती. या श्रेष्ठी प्रमुखाचे संपूर्ण कुटुंब या व्यवसायात गुंतलेले होते. या श्रेष्ठी प्रमुखाचा मुलगा विदेशी व्यापारात गुंतलेला होता. त्याचे नांव सार्थवादी असे होते.[४४] ऊसनक आणि त्याची पत्नी शिवदत्ता हे सुध्दा व्यापारात आघाडीवर होते. त्यांनी कोकणातील बंदरातून बराच माल परदेशात निर्यात केल्याची माहिती पांडवलेणे येथे असलेल्या कोरीव लेखामध्ये वर्णन केलेली आहे. दक्षिण भारतातील सर्वात प्राचीन व बलाढय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सातवाहन राजवंशातील राजाच्या काळातील नाशिक जिल्ह्यातील जोगलटेंभी या ठिकाणी शक सातवाहन काळातील १३२५० नाण्यांचा प्रचंड साठा सापडलेला आहे. [४५]

पेशवे काळात महाराष्ट्रातील अनेक भागातून लोक नाशिक परिसरात येऊन स्थायिक झाले. त्यामुळे येथील व्यापार उद्दीम वाढीस लागला होता. त्यामुळे बाजारपेठा वाढल्या. या बाजारपेठातून संगमनेर, ठाणे, कल्याण, सुरत, बडोदा या नगरांशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाले होते. तसेच नाशिक जिल्ह्यात राघोजी पाटील (शिंदे) यांनी पेशवे काळात गुजरात, दक्षिणेतून कुशल कारागिर येवले गावात आणून येथे रेशीम वस्त्रोद्योग सुरू केला होता. त्यावेळेपासून येवला ही रेशीम वस्त्राची बाजारपेठ म्हणून प्रसिध्द आहे. याचप्रमाणे नाशिक जिल्हयातील चांदवड येथील किल्ल्यावर मुकोजी होळकर यांनी टाकसाळ सुरू केली होती. त्या

टाकसाळीतून चांदीची नाणी पाडली जात असत. पेशवे राजवटीत बाळाजी विश्वनाथ ते दुसरा बाजीराव या सर्वांचे नाशिक परिसराशी विशेषतः आनंदवल्ली या उपनगराशी संबंध होते.

ब्रिटिशांनी भारत जिंकल्यानंतर नाशिक परिसरावर आपले प्रभुत्व निर्माण केले. १८५७ ते १९४७ पर्यंत या स्वातंत्र्य लढ्याच्या काळात नाशिक परिसरातील विविध स्वातंत्र्य सैनिकांनी ब्रिटिशांनी लढा दिला. स्वातंत्र्योत्तर काळात नाशिक परिसरात औद्योगिक वसाहती निर्माण झाल्याने आर्थिक परिस्थिती बदलली. जीवनमान उंचावले तसेच काहीप्रमाणात कामगारांची पिळवणूकही होऊ लागली. या विषयीची आधिक माहिती प्रबंधात पुढे दिली आहे.

भारताच्या इतिहासलेखनामागील हा नूतन प्रवाह अभ्यासताना इतिहास अभ्यासकांना नवनवीन अभ्यासक्षेत्रे खुली होऊ पहात आहेत. ग्रामचीच्या शब्दांमध्ये सांगायचे झाले तरे 'लष्करी मोहिमात प्रत्यक्ष लढण्याचे काम हा दुय्यम अधिकारी करतो, त्याच्या सक्रिय सहभागाशिवाय कोणतीही मोहीम अंमलात येत नाही. मात्र मोहीमेच्या विजयाचे श्रेय नेतृत्व करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यास दिले जाते.' हाच निकष लावून मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास सूक्ष्म पातळीवर जावून करता येणे शक्य आहे. शासकीय व खाजगी अभिलेखागारांमध्ये उपलब्ध असलेल्या व शासकीय गृह खात्याच्या अधिकारातील गुप्त फाईलींमधील मजकूराच्या आधारे नाशिक परिसरातील वंचिताचा इतिहास आणि विसाव्या शतकात त्यांच्यात झालेले परिवर्तन यांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात पुढे केला आहे. या पुढील प्रकरणात नाशिक जिल्ह्यातील वंचित चळवळीचा उगम कसा झाला याविषयीचा आढावा घेतला आहे.

## संदर्भ व तळटिपा


१. सुदिन गायकवाड, ''महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास (सन १९६० ते सन २०१०)'', (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१०.

२. डी. ए. सोनवणे, ''नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकासाच्या निवडक योजनांची परिणामकारकता (कालावधी सन १९९१ ते सन २०११)'' (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २०१८.

३. बाबूराव पवार, *सोनहिरा*, नाशिक, प्रथम आवृत्ती मार्च, १९९८.

४. सरल धारणकर, आदिवासी सेवक दादा बिडकर, नाशिक, प्रथमावृत्ती, २००५.

५. मालोजीराव मोगल, मोगलपर्व, प्रथमावृत्ती, जुलै, २०११.

६. सुधीर फडके, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य,* नाशिक, प्रथम आवृत्ती, जुलै १९७४.

७. तुकाराम दिघोळे, *तहानलेली माती अन् विकासाची गती*, नाशिक, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २०१५.

८. अभिमन्यू सूर्यवंशी, *शेतकरी जेव्हा जागा होतो*, पुणे, प्रथमावृत्ती, २०१४.

९. विनय जायखेडकर (संपा.), *आमदार पंडित धर्मा पाटील, गौरवग्रंथ,* प्रथमावृत्ती, नाशिक, मे १९६९.

१०. भार्गवे भावना, *पद्मश्री दादासाहेब गायकवाड, काल व कार्य,* प्रथमावृत्ती, पुणे, १९६८.

११. विलास संगवे, *आदिवासींचे सामाजिक जीवन*, प्रथमावृत्ती, मुंबई, १९७२.

१२. प्रदीप गायकवाड, *कामगार चळवळ डॉ. बा. आ. निवडक भाषणे*, द्वितीयावृत्ती, नागपूर, २००५.

१३. शंकर बोऱ्हाडे, *शोध डॉ. वसंतराव पवारांचा*, नाशिक, सप्टेंबर २०११.

१४. प्रविण चव्हाण, ‘सबाल्टर्न इतिहासलेखन मुक्तिगीत? नव्हे शोकांतिका’, *साधना, दिवाळी* २००६, पुणे, पृ.११७.

१५. अधिक माहितीसाठी पहा. - जास्वंदी बांबूरकर (संपा.), *इतिहासाचे नवे प्रवाह*, पुणे, २०१८.

१६. महादेव गोविंद रानडे, *मराठी सत्तेचा उत्कर्ष*, पुणे, १९६०.

१७. Ranjit Guha (and others). (ed.), *Subaltern stusies*, Vol 1-12, New Delhi, 1982-2006.

१८. उमेश बगाडे, ‘सबाल्टर्न स्टडीज् व भारतीय इतिहास लेखनातील स्थित्यंतर शोषित-अंकितांची ‘स्वायत्त’ जानीव व तिचे पोकळ राजकीय- अर्थशास्त्र,’ समाजप्रबोधन पत्रिका, जुलै-सप्टेबर, २००७, पृ. ३०२-३१२.

१९. Ranjit Guha (and others). (ed.), opcit.

२०. राजा दीक्षित, ‘१९ व्या शतकातल्या महाराष्ट्रातील स्त्री-जीवन. तळाकडून इतिहास, *पुणे विद्यापीठ वार्ता: महिला सबलीकरण विशेषांक*, पुणे विद्यापीठ, पुणे, जानेवारी-मार्च, २००४, पृ. ०६

२१. उमेश बगाडे, ‘प्रतिक्रिया सबाल्टर्न स्टडीज् च्या निमित्ताने’, *संशोधक, वि. का. राजवाडे इतिहास संशोधक मंडळ*, धुळे, एप्रिल-जून, १९९६, पृ. ६४-७४.

२२. शाम कायर्दे, ‘बहुजनांच्या इतिहासाचा अन्वयार्थ’, *संशोधक, त्रै., वि. का. राजवाडे इतिहास संशोधक मंडळ*, धुळे, त्रै. जानेवारी-मार्च, १९९६.

२३. उमेश बगाडे, पूर्वोक्त.

२४. N.G. kalekar (preface to Reprint), "*Molesworth's Marathi-English Dictionary*, pune, 2008, p. 102.

२५. सबाल्टर्नसाठी मांडणीची शोकात्मिका प्रवीण चव्हाण यांनी अभ्यासांती सर्व बाराही खंडाची चिकित्सक परिक्षणे करुन मांडली आहेत. पहा. प्रविण चव्हाण, ‘सबाल्टर्न इतिहासलेखन मुक्तीगीत? नव्हे शोकात्मिका।’, *साधना, दिवाळी*, पुणे, २००६, पृ. ११६.

२६. अधिक माहितीसाठी वाचा.अरविंद देशपांडे, *'म. फुले : पर्यायी संस्कृतीचे जनक'*, इतिहास शिक्षक, त्रै. जुलै-ऑगस्ट-सप्टेबर, २००४, पुणे, पृ. ०३-१२.

२७. राजा दीक्षित, पूर्वोक्त.

२८. हरि नरके (संपा.), *महात्मा फुले: शोधाच्या नव्या वाटा*, मुंबई, १९९८, पृ. ११.

२९. Gali Omvedt, *"Dality and the Democratic, Revolution: Dr. Ambedkar and the Dalit Movement in colonial India*', sage publication, Delhi, 1994.

३०. महाराष्ट्र शासनाच्या सांख्यिकी विभागाने नाशिक जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन या तयार केलेल्या धारिकेच्या आधारे, मुंबई,२००२, पृ.३१०.

३१. रा. श्री. मोरवंचिकर, *सातवाहनकालीन महाराष्ट्र*, औरंगाबाद, १९९९, पृ. ९०.

३२. सेतुमाधवराव पगडी (संपा.), *'मोगल दरबाराची बातमीपत्रे'* (दरबार-इ-मुअल्ला या फार्सी कागदपत्रांचा अनुवाद) खंड,३, मुंबई, १९६८.

३३. अधिक माहितीसाठी पहा.- गो. स. सरदेसाई, *मराठी रियासत*, (संस्करण व संपादन, स. मा. गर्गे), पुनर्मुद्रण मुंबई, १९९८.

३४. अधिक माहितीसाठी पहा.- वि. गो. खोबरेकर, *मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम*, मुंबई, १९६२.

३५. अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे (संपा.), *मराठ्यांचा इतिहास*, खंड ३, नागपूर, १९८९, पृ. १०९.

३६. नवाझ मोदी (संपा.), *भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया*, (अनु. वासंती फडके.), पुणे, जानेवारी, २००३.

३७. अ. रा. कुलकर्णी, कंपनी सरकार, पुणे, २०००, पृ. ०९.

३८. प्र. कृ. प्रभुदेसाई, *आदिशक्तीचे विश्वरुप अर्थात देवी कोश*, खंड ३, पुणे, १९८६, पृ. २.

३९. विनायक कुलकर्णी, *भारतीय कला उद्‌गम आणि विकास*, पुणे, १९९६, पृ. ११.

४०. अ. प्र. जामखेडकर, *महाराष्ट्र : इतिहास, प्राचीन काळ स्थापत्य व कला*, खंड १, भाग २, मुंबई, २००२, पृ. ११८.

४१. ग. भा. जोशी, *अठराव्या शतकातील महाराष्ट्राचे सामाजिक जीवन*, अप्रकाशित प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९८०, पृ. ३८७.

४२. प्रमोद ओक, *पेशवे घराण्याचा इतिहास*, पुणे, १९९६. (या ग्रंथामध्ये आनंदीबाईच्या आनंदवल्ली येथील वास्तव्याविषयी सविस्तर लेख आहे.)

४३. वा. वि. मिराशी, *पश्चिमी क्षत्रप व त्यांचे कोरीव लेख*, नागपूर, १९६४.

४४. महाराष्ट्रामध्ये सातवाहनांचे सर्वात जास्त कोरीव शिलालेख सापडले असून त्यामध्ये व्यापारी श्रेणी व दानकर्ते यांचे उल्लेख आहेत. तसेच बौद्धभिक्खुंच्या चरित्रार्थासाठी त्यांच्याकडे विशिष्ट आर्थिक ठेव ठेवून त्यावरील व्याजातून त्यांचा चरितार्थ चालवावा अशा नोंदी उपलब्ध आहे.

४५. लहू गायकवाड, 'जुन्नरचा इतिहास, प्राचीन ते आर्वाचीन', अप्रकाशित पीएच्.डी प्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास सादर, पुणे, २०११.

## प्रकरण दुसरे

# वंचितांच्या चळवळीचा उगम व विकास

नाशिक जिल्हा हा शेतीप्रधान जिल्हा असून येथील समाज मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहे. तसेच नाशिक जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या नाशिक शहरात सातपूर, अंबड या दोन ठिकाणी औद्योगिक वसाहती आहेत. तसेच सिन्नर, गोंदे, माळेगांव, येवला इत्यादी ठिकाणी आणि परिसरात लहान मोठे उद्योगधंदे आहेत. त्यात काम करणारा मजूर वर्ग आहे. त्यांच्याही अनेक समस्या होत्या व आहेत. त्यांच्या या समस्या सोडविण्याकरीता ज्या काही चळवळी झाल्या आहेत.

चळवळी ह्या प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक व राजकीय अशा सर्व व्यवस्थेला छेद देणाऱ्या असतात. त्यातून मुख्यत्वे मानवतेचा प्रश्न उचलून धरतात. तसेच चळवळीचा उद्देश समाज स्वायत्ततेचा असतो. सामाजिक चळवळीचे उद्दिष्ट समाज परिवर्तनाचे असते. चळवळीच्या संदर्भात गसफिल्ड जे. आर. म्हणतात, ''समाजव्यवस्थेच्या एखाद्या भागात बदल घडवून आणण्यासाठी केलेली सामूहिक मागणी म्हणजे सामाजिक चळवळ होय.'' या चळवळी जुन्या अमानवीय रूढी, परंपरा यांना विरोध करण्यासाठी, नवीन मूल्य रूजविण्यासाठी केल्या जातात. तसेच चळवळी ह्या जनतेच्या पाठिंब्याशिवाय सफल होत नसतात. आपल्या ध्येयपूर्तीकरीता या चळवळी वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करतात.

शेतकरी या शब्दाचा अर्थ म्हणजे ''जमिनीत घाम गाळून कष्ट करणारा उत्पादक घटक म्हणजे शेतकरी होय''.[१] तसेच ज्याने उत्पादन केलेल्या उत्पादनावर बहुसंख्य जनता अवलंबून आहे तो वर्ग म्हणजे शेतकरी होय. शेतावर, जमिनीवर मालकी असणे, खंडाचा हक्क असणे, भाडेपट्ट्याचा हक्क असणे तो म्हणजे शेतकरी होय. शेतकरी या शब्दाची व्याख्या करताना चेआनोव्ह व माओ-त्से-तुंग यांनी म्हटले, ''फक्त शेतात राबणारे शेतकरी अपेक्षित नाहीत; तर अन्यायाविरुद्ध झगडणारा व बदल घडवून आणणारा समाजातील प्रभावी गट होय. भारताच्या

इतिहासात प्रथमच प्रो. आर. एस. शर्मा आणि प्रो. डी. डी. कोसंबी यांनी शेतकऱ्यांना स्थान मिळवून दिले. प्रो. इरफान हबीब यांच्या मते ''जी व्यक्ती स्वत:च्या हिंमतीवर शेती कसण्याचे काम स्वीकारते व त्यासाठी स्वत:ची अवजारे वापरते आणि त्या कामाकरीता त्याला त्याच्या घरातील लोकांचे श्रम उपयोगी पडतात; तो शेतकरी होय. शेतकऱ्यांच्या वर्गवारीमध्ये शेतकऱ्यांच्या मालमत्तेसंबंधी असलेले नाते लक्षात घेणे गरजेचे आहे. त्याच्यामध्ये जमिनीवर मालकी असणारा शेतकरी, शेतीवर राबणारा शेतकरी याचाही विचार करावा लागतो.

भारत हा शेतीप्रधान देश असून येथील बहुसंख्य लोकसंख्या स्वत:च्या उपजीविकेकरीता शेतीवर अवलंबून आहे. शेती व्यवस्थेत झालेल्या बदलांचा आणि घडून येणाऱ्या गोष्टींचा परिणाम शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनावर घडून येत असतो. तेव्हा शेतकऱ्यांचे केले जाणारे शोषण याविरुद्ध अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी चळवळीच्या माध्यमातून शोषणकर्त्यांच्या विरोधी आपला आवाज उठविला आहे.

प्राचीन काळापासून शेतकऱ्यांचे उठाव, चळवळी झालेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या चळवळीचा उगम भारतात, ग्रामीण भागात, खेड्यापाड्यातून झालेला आपल्याला दिसून येतो. ब्रिटिशांनी इ. स. १८१८ मध्ये मराठ्यांचे राज्य जिंकून घेतले तो प्रांत म्हणजे आजचा महाराष्ट्र होय. ब्रिटिशांचा सर्वात प्रथम विरोध सहन करावा लागला तो येथील शेतकरी वर्गाला. त्यांनी या ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या शेतीवर आकारण्यात येणाऱ्या महसूलात (सारा) फेरफार केला. त्यामुळे येथील शेतकरी त्यांना विरोध करू लागला होता.

## रामोशांचा उठाव

पेशव्यांच्या काळात पुणे परिसरात रामोशी लोकांचा भरणा जास्त होता. शेती, पशुपालन, गावाचा महसूल जमा करण्याचा अधिकार त्यांना होता. परंतु या अधिकारावर ब्रिटिशांनी गदा आणल्यामुळे त्यांनी इ. स. १८२६ मध्ये ब्रिटिशांविरोधात बंड केले होते.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात ईस्ट इंडिया कंपनीने तत्कालीन मुंबई प्रांतात रयतवारी पद्धतीचा अवलंब केला. तेव्हा येथील शेतकरी वर्गाला आपला

सारा थेट सरकारकडे जमा करावा लागत असे. तसेच अवर्षण, दुष्काळ, टोळधाड अशा नैसर्गिक संकटांच्या वेळी सारा भरण्याकरीता सावकाराकडून कर्ज घेतल्याशिवाय शेतकरी वर्गाकडे पर्याय उरला नव्हता. तेव्हा सावकाराकडे जमीन, गुरेढोरे गहाण ठेवून जास्तीच्या व्याजदराने घेतलेले कर्ज फेडण्याशिवाय पर्याय शिल्लक राहात नव्हता. त्यातून शेतकरी वर्ग अधिक कर्जबाजारी व कंगाल बनत गेले.[२] सरकार एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला सावकार अशा कचाट्यात शेतकरी पिळला जात होता. तेव्हा शेतकऱ्यांनी सुरुवातीच्या काळात आपली गाऱ्हाणी अगदी शांततेच्या मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १८५७ च्या उठावानंतर थोड्याच काळात महाराष्ट्रात शेतकऱ्यांनी ब्रिटिशांनी सुरू केलेल्या सारा वसुलीच्या धोरणाला विरोध झाला तो पुणे जिल्ह्यातील सासवड या गावापासून सुरू होऊन त्याचे सर्वत्र लोण पसरले. अहमदनगर जिल्ह्यात तर अगदी सावकारांच्या घरात शिरून त्यांना घेराव घालणे, कुठल्याही प्रकारचा रक्तपात न करता सावकाराकडे जमा असलेली कागदपत्रे जाळून नष्ट करणे, अशी कृत्ये शेतकरी वर्गाकडून करण्यात येऊ लागली. तेव्हा सरकारला या गोष्टीची जाणीव होताच सरकार सावकाराच्या मदतीला धावून आले. त्यावेळी इ. स. १८६१ मध्ये जवळजवळ या परिसरातून ३००० शेतकऱ्यांना अटक करण्यात आली होती. [३] तेव्हा पुणे शहरात कार्यरत असलेली ''सार्वजनिक सभा'' हिने इ. स. १८६७ मध्ये शेतकऱ्यांच्या या प्रश्नांकडे लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांनी पूर्वीच्या दराने सरकारला सारा भरावा असे जाहीर केले. परंतु सरकारने त्यांच्या या गोष्टीकडे फारसे गांभीर्याने पाहिले नाही. त्यातून शेतकरी वर्गातील निराशा वाढत जाऊन शेतकरी वर्ग संतप्त झाला. अहमदनगर, सोलापूर, पुणे येथील गुजर मारवाडी सावकारांविरुद्ध शेतकऱ्यांनी सामाजिक बहिष्कार टाकला होता. इ. स. १८७४ मध्ये महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. त्यावेळी नाशिक जिल्ह्यातील गिरणा व धुळे जिल्ह्यातील पांजरा नद्यांना महापूर आले. यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. या भागातील पूरग्रस्तांना सार्वजनिक सभेने ३००० रुपये मदत केली होती.

## दक्षिणेतील बंड

शिरूर तालुक्यातील काळूराम नावाच्या मारवाडी सावकाराने करडे गावातील बाबासाहेब देशमुख नावाच्या शेतकऱ्याविरुद्ध १५० रुपये कर्ज वसुलीकरिता इ. स. १८७४ मध्ये न्यायालयातून आदेश मिळविला होता. या आदेशाचा आधार घेऊन सावकाराच्या माणसांनी बाबासाहेब देशमुख नावाच्या शेतकऱ्याचे घर पाडले. सावकाराच्या या कृत्यामुळे संतप्त झालेल्या गावातील जनतेने सावकारीच्या विरोधात पाऊल उचलले. त्यावेळी या घटनेचे लोण संपूर्ण पुणे जिल्ह्यात पोहचले. त्यापाठोपाठ अहमदनगर जिल्ह्यातही पसरले. तेव्हा १२ मे १८७५ रोजी पारनेर तालुक्यातील सुपे या गावी बाजाराकरीता परिसरातून आलेली सर्व जनता एकत्र जमली.[४] सावकाराला धडा शिकविण्याकरीता त्यांच्या पेढ्यांवर व घरांवर हल्ले करून जाळपोळ केली होती.

## महात्मा फुलेचे कार्य

महात्मा ज्योतिराव फुले यांनी पुणे परिसरातील शेतकऱ्यांच्या परिस्थिती विचारात घेऊन इ. स. १८७५ मध्ये शेतकरी चळवळ उभारली. महात्मा ज्योतिराव फुले यांची मुंबईत इ. स. १८७८ साली मामा परमानंदाशी भेट झाली. तेव्हा त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत ''*आसूड*'' नावाचे पुस्तक लिहिण्याचा विचार व्यक्त केला.[५] तेव्हा इ. स. १८८३ मध्ये त्यांनी लिहिलेल्या या ग्रंथात येथील गरीब शेतकऱ्यांच्या परिस्थितीविषयी म्हटले ''जगातील एकंदर सर्व देशांचे इतिहास एकमेकांशी ताडून पहाता, हिंदुस्थानातील अज्ञानी व देवभोळ्या शूद्र शेतकऱ्यांची स्थिती मात्र इतर देशातील शेतकऱ्यांपेक्षा निकृष्ट अवस्थेत पात्र होऊन केवळ पशूपलीकडचे मजलीस जाऊन पोहोचली'. असे वर्णन करून शेतकऱ्यांची सत्य परिस्थिती मांडली. तसेच ब्रिटिश राजपूत्र ड्युक हा भारत भेटीवर आलेला असताना २ मार्च १८८८ रोजी त्याचा पुणे येथे सत्कार करण्यात आला. त्यावेळी या सत्काराच्या कार्यक्रमास महात्मा फुले शेतकऱ्यांच्या वेशात गेले. त्या ठिकाणी केलेल्या भाषणात म्हणाले, ''आपल्या समोर रेशमी कपडे व अलंकार परिधान केलेले श्रीमंत, सरदार नि जहागिरदार पाहून

रयतेविषयी आपले मत बनवू नये, खरा हिंदुस्थान पहायचा असेल तर मजबरोबर खेड्यात चला.'' यातून त्यांनी शेतकऱ्यांच्या स्थितीची जाणीव करून दिली होती.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाकरीता स्थान झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसने इ. स. १८९१ मध्ये नागपूर येथे झालेल्या अधिवेशनात शेतकरी वर्गाला सहाय्य करण्यासाठी कृषी बँकांची स्थापना करण्यात यावी असा ठराव केला होता. तसेच इ. स. १८९९ साली लखनौ येथे झालेल्या अधिवेशनात शेतकऱ्यांना कर्जातून सूट देण्यात यावी असा ठराव पास केला होता. तसेच इ. स. १९०१ मधील काँग्रेसच्या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या कामाला प्राथमिकता देण्याची सूचना केली होती.

इ. स. १९१७ मध्ये महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखालील बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यात निळ उत्पादक शेतकऱ्यांनी लढा दिला. त्यामुळे १८ ऑक्टोबर १९१७ रोजी सरकारला तीन काठिया पद्धती रद्द करावी लागली होती. तसेच गुजरातमधील खेडा जिल्ह्यातही अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना सरकारकडून वसूल करण्यात येणारा शेतसारा भरणेही शक्य होत नव्हते. अशा परिस्थितीतही सरकारने शेतकऱ्यांकडून सक्तीने सारा वसुली सुरू ठेवली होती. त्यावेळी महात्मा गांधींनी प्रत्यक्ष पाहणी करून सक्तीची शेतसारा वसुली बंद करण्याची मागणी केली. त्याबरोबर सरदार वल्लभभाई पटेल यांनी या परिसरातील शेतकऱ्यांची संघटना उभी करून साराबंदीचा सत्याग्रह केला. शेवटी सरकारला नमते घेऊन शेतसारा रद्द करावा लागला होता.

## नाशिक जिल्ह्यातील स्वातंत्र्यपूर्व शेतकरी चळवळ

छत्रपती शाहू महाराजांनी महात्मा जोतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा धागा पकडून संस्थानात कार्य सुरू केले होते. त्या चळवळीत वाढलेले डी. आर. भोसले हे शिक्षण पूर्ण करून नाशिक जिल्ह्यातील पिंपळगांव (बसवंत) येथे इ. स. १९०७ पासून फौजदार म्हणून नोकरी करीत असतानाही त्यांनी सत्यशोधक चळवळीचा वारसा चालू ठेवला होता. त्यांच्या या विचारांचा प्रभाव पिंपळगांव बसवंत येथील गणपत दादा मोरे यांच्यावर पडला. श्री. भोसले डी. आर. यांचा मुक्काम पिंपळगांव येथे असताना सरकारी कामानिमित्त त्यांना नेहमीच निरनिराळ्या गावी

फिरतीवर जावे लागत होते. त्यावेळी ते भेटीसाठी गेलेल्या गावात रात्री तेथील लोकांची सभा घेत व त्यांना सत्यशोधक समाज म्हणजे काय? बहुजन समाजाचे मागासलेपण कशामुळे झाले आहे, या सर्व गोष्टींची जाणीव करून देत असत. इत्यादी स. १९१२ मध्ये ठाण्याचे डॉ. संतुजी फड (लाड) यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक येथे सत्यशोधक समाजाचे दुसरे अधिवेशन भरले होते.[६] त्यावेळी फड (लाड) म्हणाले, ''सत्यापरता नाही धर्म । सत्य हेची परब्रह्म ।। अर्थात, मानवधर्म हाच खरा धर्म. ईश्वराचे सत्य स्वरूप जाणा. सत्याची कास धरा.'' गरीब-श्रीमंत, उच्च-नीच अशा स्वरुपाच्या विषमतेवर आधारलेला समाज नको आहे.[७] त्यावेळी या अधिवेशनातील रावसाहेब थोरात, गणपतदादा मोरे, शंकरराव विठ्ठल कदम, कीर्तिवान निंबाळकर, रुंजा पाटील, अजबा विठ्ठल पाटील इ. लोक हजर होते. ते या अधिवेशनातील विचारांनी प्रभावित झाले आणि चळवळीकडे आकर्षिले गेले.

इ. स. १८८५ मध्ये स्थापना झालेल्या काँग्रेसने इ. स. १९२० मधील नागपूर काँग्रेसच्या अधिवेशनात शेतकऱ्यांच जमिनी पुरेसा मोबदला न घेता ताब्यात घेतल्या जात होत्या. त्याबद्दल निराशा व्यक्त केली होती.

नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील वडनेरभैरव येथे इ. स. १९२० मध्ये शेतकरी परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेला विठ्ठल रामजी शिंदे हजर होते. त्यांनी या परिषदेत जमीन कसणारा तोच खरा शेताचा मालक (कुणबी) असतो. म्हणजे जमीनदार, सावकार यांच्या धोरणाला त्यांनी विरोध केला होता.

नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील सटाणे येथील दगाजी अजबा पाटील यांना वडिलांकडून मिळालेला वारसा आणि शेतकरी वर्गाबद्दल असलेली आस्था यातून त्यांनी शेतकऱ्यांच्या परिस्थितीची सुधारणा होणेकरीता प्रयत्न केले. त्याकरीता त्यांनी शेतकऱ्यांना शेतीची साधने, खते, बी-बियाणे सवलतीच्या दरात उपलब्ध व्हावीत याकरीता एखादी संस्था असावी. या विचारातून त्यांनी शेती खात्यातील अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून ऑगस्ट १९२२ मध्ये बागलाण तालुक्यातील सर्व प्रमुख शेतकऱ्यांची सटाणा येथे सभा आयोजित केली होती. या

सभेचे अध्यक्ष तत्कालीन मामलेदार श्री. घैसास साहेब हे होते. या सभेत झालेल्या विचार विनिमयातून ''बागलाण तालुका शेती सुधारणा मंडळ''[८] ही संस्था स्थापन करण्यात आली होती. त्यांनी स्वत: परिश्रम करून संस्थेचे कार्य वाढविले. तसेच परिसरातून अनेक सहकार्यांची फळी उभारली होती. या संस्थेमुळे बागलाण तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीचे उत्पादन वाढविण्यास हातभार लागला होता. संस्थेचा रौप्य महोत्सवी कार्यक्रम झाला. त्यावेळी कार्यक्रमांचे अध्यक्ष भाऊसाहेब हिरे म्हणाले, ''दादासारख्या महाभागाच्या कार्यानेच मला सार्वजनिक सेवेची खरी स्फूर्ती मिळाली.'' त्यांच्या या उद्‍गारातून आपल्याला त्यांच्या कार्याची महती कळते. बागलाण परिसरातील शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीच्या शेतीची व शेतीला जोडधंदा म्हणून चांगल्या प्रकारच्या जनावरांची माहिती मिळावी याकरीता त्यांनी इत्यादी स. १९२३ मध्ये सटाणा येथे शेतकी प्रदर्शन भरविले होते. त्यावेळी परिसरातील शेतकऱ्यांच्या नजरेस शेतीची आधुनिक अवजारे प्रथमच या प्रदर्शनात दिसली. त्यातून हजारो शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला होता.

नाशिक जिल्ह्यातील बागलाण, कळवण, मालेगाव या भागात मुळातच पावसाच्या पाण्याचे पडण्याचे प्रमाण कमी आहे. अशा परिस्थितीत इ. स. १९२७ पासून ४-५ वर्षे या परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. तेव्हा या परिसरातील अनेक लोक आपल्या पोटाची खळगी भरण्याकरीता गाव सोडून इतरत्र गेली होती.[९] फक्त जनावरांच्याच नाही तर माणसांच्याही जीविताचा प्रश्न उद्‍भवला होता. या दरम्यानचे काळातच स्थानिक अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार तत्कालीन जिल्हाधिकारी आर. जी. गार्डन यांनी १ जून १९२७ रोजी एक पत्रक काढून बागलाण व मालेगाव तालुक्यात ३३% शेतसारा वाढ केली होती. तसेच ही वाढ फेब्रुवारी १९२८ पासून लागू करण्याचे जाहीर केल्यामुळे या परिसरातील शेतकरी वर्गात मोठी खळबळ माजली. एका बाजूने नैसर्गिक आपत्ती आली. तिचे निवारण करण्यासाठी सरकारने मदत करण्याचे बाजूला ठेवून त्याउलट शेतसारा वाढ करून शेतकऱ्यांवर आघात केला होता. तेव्हा परिसरातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन बैठका, सभा घेऊन

जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयाला विरोध करण्याचा निर्णय घेतला होता. या काळात बागलाण तालुका काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी श्री. देवचंद पाटील व श्री. शंकरराव पोतदार हे होते. त्यांनी परिसरातील सर्व शेतकऱ्यांना संघटित करून नामपूर येथील श्री. नरहर गोपाळशेठ यांच्याशी विचारविनिमय करून विरोध करण्याचा निर्णय घेतला. या सर्वांनी नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहकार्याने चळवळ करण्याचे निश्चित केले होते.[१०] तेव्हा बागलाण परिसरातील गावांमध्ये शेतकऱ्यांच्या बैठका होऊन सारावाढ रोखण्यासाठी जनजागृती केली होती. तसेच बागलाण तालुका काँग्रेस कमिटीने नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटीचे तत्कालीन अध्यक्ष वकील श्री. रघुनाथ हरी गद्रे यांचेकडे सहकार्य व मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त केली होती.

बागलाण तालुक्यातील सारावाढ चळवळीचा प्रचार-प्रसार करण्याकरीता एक वर्तमानपत्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या वर्तमानपत्राचे 'स्वराज्य' हे नाव निश्चित करण्यात आले होते. तसेच वर्तमानपत्र चालविण्याची जबाबदारी श्री. बाळकृष्ण जनार्दन मराठे यांनी स्वीकारली होती. पुढील काळात ही चळवळ संपूर्ण जिल्ह्यात पसरली. डॉ. भुतेकर, सितारामशास्त्री व रघुनाथ हरी गद्रे यांनी चळवळीचा जिल्हाभर प्रचार केला होता. शेतकऱ्यांनी सरकारला शेतसारा न देण्याचा विचार विनिमय करून चळवळ जिल्ह्यात राबविली.

बागलाण परिसरातील सारावाढ विरोधी चळवळीवर विचार-विनिमय करण्यासाठी नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटीने केलेल्या विनंतीस मान देऊन प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव यांनी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक घेतली होती. या बैठकीस मामा देवगिरीकर आणि बागलाण परिसराची माहिती असलेले वाळू काका कानिटकर हजर होते.[११] बैठकीत चर्चा करून सारावाढ विरोधी चळवळीला प्रांतिक काँग्रेस कमिटीने पाठिंबा दिला होता. त्याबरोबर बागलाण परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. भुतेकर यांना बागलाणमध्ये पाठविण्यात आले.

प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या निर्णयानुसार डॉ. भुतेकर, श्री. मोहिनीराज काथे यांनी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रघुनाथ गद्रे यांच्याशी चर्चा करून नामपूर येथे श्री. नरहरी गोपाळ शेठ यांची भेट घेऊन चळवळीच्या कार्यक्रमाविषयी विचार करण्यात आला होता. त्यानंतर गावात मिरवणूक काढून श्री. नरहर गोपाळशेठ यांच्या घरी मिरवणुकीची सांगता झाली. तेव्हा डॉ. भुतेकर यांनी आपल्या भाषणातून संघर्षाशिवाय परिस्थितीत सुधारणा होणार नाही याची शेतकऱ्यांना जाणीव करून दिली होती. तसेच शेतकऱ्यांनी एकजूट करून सारावाढीविरोधी लढण्याचे व सरकारला ही वाढ रद्द करण्यास भाग पाडावे असे आवाहन केले होते.

तसेच उपस्थित असलेल्या सर्व शेतकऱ्यांना सारावाढ विरोधी चळवळीत सहभागी होण्याची प्रतिज्ञा दिली होती. याचबरोबर शेतकऱ्यांची एकजूट करण्यासाठी डॉ. भुतेकर, श्री. देवचंद भिका पाटील, श्री. मोहिनीराज काथे, शंकरराव पोतदार, नारायण खुटाडे, सजन राघो पाटील, शंकरराव शेवाळे, काळू तानाजी पाटील यांनी ताहाराबाद, जायखेडे, मुल्हेर, विरगांव, डांगसौंदाणे, सटाणा, लोहणेर, लखमापूर इ. गावामध्ये सभा व बैठका घेतल्या होत्या. या सर्व सभा व बैठकांमधून शेतसारा न भरता वाढीव सारा रद्द करण्यासाठी एकमत केले होते. शेतकऱ्यांना आपल्यावरील अन्याय दूर करण्याची जाणीव करून दिली होती.

बागलाणमधील शेतकऱ्यांमध्ये सारावाढ विरोधी चळवळीची जागृती वाढली होती. याकामी वृत्तपत्राचे सहकार्य मिळाल्याने त्याची दखल प्रांतिक, राष्ट्रीय नेत्यांनाही घ्यावी लागली. १८ ऑगस्ट १९२८ रोजी मुंबई इलाखा शेतकरी संघाची सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक झाली. या बैठकीस नाशिक जिल्ह्यातील बागलाण मधील श्री. नरहर गोपाळशेठ, शंकरराव पोतदार, नारायण नथू सावंत, जयदेव सावंत, काळू तानाजी पाटील इत्यादी एकूण ४६ शेतकरी हजर होते. बागलाण मधील सारावाढ विरोधी चळवळीची सरदार पटेल यांना माहिती मिळाली तेव्हा त्यांनी या शेतकऱ्यांची भेट घेऊन मार्गदर्शन केले.[१२] तसेच चळवळीला आपला पाठिंबा दर्शविला होता.

बागलाण तालुक्यातील शेतकऱ्यांना सरदार पटेल यांचे मार्गदर्शन लाभल्यामुळे चळवळीला नवी दिशा व प्रेरणा मिळाली. बागलाणमधील दुष्काळाची सरकारला जाणीव करून देण्याकरीता अधिकाधिक सभा, बैठका घेऊन सरकारला शेतसारा न भरण्याकरीता एकजूट करण्याचे आवाहन केले होते. चळवळ सुरू ठेवण्याकरीता सूचना देऊन, पत्रके छापून, वाटप करून शेतकऱ्यांना संघटित करून योजनाबद्ध कार्यक्रम आखला गेला.

नाशिक जिल्ह्यातील सारावाढ विरोधी चळवळीचे वातावरण जिल्हाधिकारी आर. जी. गार्डन यांच्यापर्यंत गेले. तेव्हा त्यांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याकरीता २२ ऑक्टोबर १९२८ रोजी एक पत्रक प्रसिद्ध करून त्यामध्ये ''सारावाढीचा विचार सुरू असून तो अद्याप झालेला नाही. तरी लोकांनी आंदोलन करू नये.'' असे जाहीर केले होते. परंतु जिल्हाधिकारी यांचे हे पत्रक खरे नसून शेतकऱ्यांची दिशाभूल करणारे आहे याची शेतकऱ्यांना जाणीव झाली होती.

सारावाढीच्या या निर्णयाने शेतकरी वर्गात प्रचंड खळबळ निर्माण झाली. बागलाणमधील शेतकऱ्यांची संघटना तयार होऊन चळवळ उभी राहिली. यामधून बागलाण सारावाढ कमिटी स्थापन करण्यात आली. श्री. नरहर गोपाळशेठ यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर १९२८ मध्ये कमिटीची पहिली बैठक झाली. त्यामध्ये बागलाण तालुका शेतकरी परिषदेचे काम सुरू होऊन सभासद नोंदणी सुरू झाली. पत्रके, वृत्तपत्रे, सभा, मोर्चे, बैठका यांच्यातून चळवळीचा उद्देश शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात आला होता.

बागलाण परिसरात अशी अनेक गावे होती की, तेथे राहणाऱ्या शेतकऱ्यांना वर्षभर पुरेल इतके धान्य पिकत नव्हते. तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे जनावरांसाठी पुरेसे गवतही नव्हते. अशी परिस्थिती असताना सरकारने वनचराई सक्तीने वसूल करणे सुरू केले होते. तेव्हा शेतकऱ्यांनी सरकारच्या या धोरणाला संघटित होऊन विरोध करून चळवळ अधिक तीव्र केली. शेतकऱ्यांनी आपली गुरे जंगलात चारून वनचराई देण्यास नकार दिला.[१३] शेतकऱ्यांच्या जनावरांना कोंडवाड्यात टाकले तर

शेतकरी त्यांना सोडवत नसत. कोंडवाड्यात असलेल्या असंख्य गुरांच्या खर्चाचा बोजा सरकारवर पडू लागला होता. त्यावर उपाय म्हणून या जनावरांचा लिलाव सुरू केला. त्यावेळी लिलावात भाग न घेण्याचे निश्चित केले. त्यामुळे सरकारचा हा उपायही फसला होता. अशी परिस्थिती निर्माण करून सरकारी अधिकाऱ्यांवर शेतकऱ्यांनी बहिष्कार घालून जीवनावश्यक वस्तू देणे बंद केल्याने त्यांची वणवण सुरू झाली. तसेच चळवळीला नवीन दिशा देण्यात आली, ती म्हणजे कोंडवाडे फोडून जनावरांची सुटका करण्याची योजना आखली. परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी काही शेतकऱ्यांना अटक केली होती. यामुळे चळवळीला अधिक बळकटी आली होती.

बागलाणमध्ये सुरू झालेल्या चळवळीची व्याप्ती वाढविण्यासाठी नाशिक येथून दादासाहेब गद्रे, डॉ. खाडिलकर, सीतारामदास शास्त्री हे लोक बागलाणमध्ये येऊ लागले होते. तसेच श्री. नरहर गोपाळशेठ शेवाळे वकील इत्यादी अनेक स्थानिक शेतकरी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करीत होते. याचा परिणाम असा झाला की, ७ फेब्रुवारी १९३४ रोजी स्वत: सरदार वल्लभभाई पटेल हे सटाणा येथे आले होते. शेतकऱ्यांनी त्याचे उत्साहात स्वागत केले. त्यांनी शेतकऱ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला होता.

इ. स. १९३६ मध्ये फैजपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात शेतकऱ्यांचे शोषण, कर्जाचा बोजा, यांच्या मुळाशी जाचक अशा स्वरुपाची महसूल व्यवस्था, जमीन धारणेची पद्धती कारणीभूत आहे. तसेच जमीन महसूलात कपात, पाणी पट्टीत कपात, सहकारी शेतीचा पुरस्कार, प्रथम कर्ज वसुलीस स्थगिती देऊन नंतर कर्ज माफी करावी.[१४] अशा अनेक तरतुदींची मागणी करण्यात आली होती. या सर्व तरतुदींचा पाठपुरावा करण्यासाठी फैजपूर येथे किसान सभेचे अधिवेशन भरविण्यात आले होते. या अधिवेशनात अखिल भारतीय किसान संघटना स्थापन करण्यात आली होती. याचाच परिणाम म्हणून की काय बागलाण परिसरातील शेतकऱ्यांमध्ये झालेल्या एकजुटीचा व सुरू असलेल्या चळवळीची सरकारला दखल घ्यावी लागली होती. शेवटी सरकारने सन १९३५ मध्ये नाशिकला

दुष्काळ पाहणी करण्यासाठी समितीची निवड केली होती. या समितीत नाशिकचे गोविंदराव हरी देशपांडे यांचा समावेश होता. या समितीने नाशिक जिल्ह्यातील दुष्काळी भागाची पाहणी करून सरकारला अहवाल सादर केला होता. त्यातून पुढे ''बागलाण तालुका दुष्काळ निवारण समिती'' स्थापन झाली होती. या समितीच्या कार्यामुळे नाशिक जिल्ह्यात दुष्काळ निवारणाकरीता कामे सुरू करण्यात आली होती.

इ. स. १९३७ मध्ये पडिक जमीन शेतकऱ्यांना देण्याचे धोरण तत्कालीन सरकारने अंमलात आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी नाशिक जिल्ह्यातील नांदगांव, कळवण व मालेगाव तालुक्यातील बऱ्याच जमिनी शेतकऱ्यांना देण्याकरीता या जमिनींचा लिलाव करण्याचे निश्चित केले होते. तेव्हा नाशिक जिल्ह्यातील रावसाहेब थोरात यांनी २५ ऑगस्ट १९३७ रोजी विधिमंडळातील चर्चेत भाग घेऊन म्हटले, ''सरकारने ज्या पडिक जमिनीचा लिलाव करण्याचे ठरविले आहे त्या जमिनी शेतकरी बंधू पैशांअभावी विकत घेऊ शकणार नाहीत.''[१५] याची सरकारला जाणीव करून दिली होती.

तसेच शेती व्यवसायात कोणत्या प्रकारच्या अडचणी येतात याविषयी त्यांनी ३१ ऑगस्ट १९३७ रोजी म्हटले, ''शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळवून द्यावा, शेतकऱ्यांना जोडधंदा देण्यापूर्वी त्यांच्या शेतात तयार होणाऱ्या मालाला योग्य भाव मिळेल. त्याच्या मालाची योग्य किंमत त्याच्या पदरी पडेल अशी योजना तयार करावी. कारण भांडवलदार वर्ग काहीही श्रम न करता पुढे त्यावर भरपूर नफा कमवितात. हे त्यांचे उद्योग बंद झाल्यास शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल. त्याचबरोबर शेतकऱ्यांना फळे जास्त दिवस टिकविण्यासाठी शास्त्रोक्त माहिती द्यावी. आंबे व त्याचा रस डब्यात घालून टिकविण्याची प्रक्रिया शेतकऱ्यांना शिकवावी. हिरड्यापासून रंग व शिकेकाईपासून साबण करण्याचे शिक्षण शेतकऱ्यांना देण्यात यावे.'' अशा अनेक उपयुक्त सूचना करून शेतकऱ्यांची आर्थिक सुधारणा

करण्याकरीता या शेतकरी वर्गाच्या अडचणींकडे सरकारचे लक्ष वेधले होते. शेतकऱ्यांकरीता भरीव योजना आखण्याचे सूचविले होते.

दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा शेवट झाला तेव्हा जगातील प्रत्येक देशाचे सांपत्तिक नुकसान झाले होते. वेगवेगळ्या समस्यांनी डोके वर काढले होते. भारतातही अन्नधान्याची समस्या निर्माण झाली होती. तेव्हा या समस्येवर उपाय म्हणून तत्कालीन सरकारने स्वत:च अन्नधान्य खरेदी करण्याचा कायदा केला होता. या कायद्यानुसार सरकारने भाताचे व तांदळाचे भाव ठरवून गावागावातून अधिकारी नियुक्त केले होते. तेव्हा इगतपुरी तालुक्यातील पुंजाबाबा गोवर्धने यांनी याबाबतची सर्व माहिती जमा करून सरकारच्या या धोरणाविरोधात भात पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना संघटित करून लढा उभारला होता.

टिटवाळा येथे दि. ६ जानेवारी १९४५ रोजी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्याकरीता कम्युनिष्ट पक्षातील काही पुढाऱ्यांनी राज्यव्यापी अधिवेशन भरविले. त्या अधिवेशनात बी. टी. रणदिवे, मामा वरेरकर, ना. म. जोशी, श्यामराव परुळेकर, गोदाताई परुळेकर इ. होते. या अधिवेशनाची सुरूवात शाहीर अमर शेख यांच्या ''यो शेतकरी दादा समदा आला टिटवाळ्याला'' या पोवाड्याने झाली. तसेच परिषदेत कूळ कायदा, वेठ बिगार नष्ट करण्याचा कायदा, अशा २६ विषयांवरील अन्यायी ठरावांवर चर्चा करण्यात आली. सावकारी पाशातून शेतकऱ्यांची सुटका झालीच पाहिजे. ''कसेल त्याची जमीन'' हे या परिषदेचे घोषवाक्य होते. त्याबरोबर ''महाराष्ट्र किसान सभा'' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. अधिवेशनाकरीता भारतीय किसान सभेचे सरचिटणीस कॉ. अब्दुल्ला रसूल यांचे हस्ते उद्घाटन झाले. तसेच नाशिक जिल्ह्यातून पुंजाबाबा गोवर्धने वगैरे मंडळी हजर होती. त्यातून मिळालेल्या विचारांच्या शिदोरीवर त्यांनी शेतकऱ्यांकरीता प्रयत्न सुरू केले. या दरम्यानच्या काळात तत्कालीन सरकार शेतकऱ्यांकडून लेव्ही (सक्तीने धान्य) वसूल करत होते. परंतु इ. स. १९४४ मध्ये लेव्ही संदर्भात एक कमिटी नेमण्यात आली होती. मात्र सरकारने या कमिटीने केलेल्या शिफारशी विचारात न घेता जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. तसेच महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही राज्यातून

शेतकऱ्यांकडून लेव्ही म्हणून जो तांदूळ घेतला जात होता त्यातही मोठी तफावत होती. गुजरातमधील शेतकऱ्यांच्या भातास १६ रुपये मण भाव दिला जात होता. तर तशाच स्वरुपाच्या चांगल्या भातास महाराष्ट्रात फक्त साठेआठ रुपये भाव दिला जात होता. त्यामुळे येथील शेतकऱ्यांवर होणारा अन्याय दूर केला पाहिजे असे त्यांना वाटत होते. तसेच इ. स. १९४६ मध्ये संपूर्ण जिल्ह्यात अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी झाली होती. भारतातही अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली होती. अन्नधान्याचा पुरवठा अपुरा पडू लागला होता. मात्र सरकारकडून सक्तीने करण्यात येणारी लेव्ही वसुली थांबवली नव्हती. त्यामुळे परिसरातील सर्व शेतकरी वर्ग हवालदिल झाला. पुंजाबाबा गोवर्धने यांनी ही सर्व माहिती मिळविली. इगतपुरी तालुक्यातील १२६ गावांमधील पोलीस पाटलांना निरोप पाठवून लोकांना जमा करण्यास सांगत. त्या गावात गेल्यावर पुंजाबाबा गोवर्धने त्या लोकांना सरकारने ठरवून दिलेल्या भावात तांदूळ काढून दिला तर आपल्याला ५-७ रुपये जास्त मिळतील व कणी कोंडा आपल्याला मिळेल. त्याचा उपयोग कणीच्या पिठाच्या भाकरी मिळतील व कोंडा दुभत्या जनावरांना खाद्य म्हणून उपयोगी पडेल असा आदेश करीत. त्यावर संपूर्ण तालुक्यातील जनतेला त्यांचा हा सल्ला मान्य झाला होता. तेव्हा परिस्थिती विचारात घेऊन पुंजाबाबा गोवर्धने, डॉ. गंगाधर भुतेकर आणि दादासाहेब गायकवाड यांनी नाशिकमधील गंगापूर रस्त्यावरील डोंगरे वसतिगृहाच्या शेतात शेतकरी वर्गाची सभा आयोजित केली होती.[१६] सभेकरीता अमरशेख, अण्णाभाऊ साठे व त्याचे कलापथक बोलविले होते.

इगतपुरी तालुक्यातून १५० ते २०० शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ नाशिक येथे नेऊन तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. नागप्पा यांना भेटून निवेदन देण्याचे ठरविले. तसेच सरकारने भात वसुलीची एजन्सी व्यापाऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला होता. त्या विरोधी घोटी येथे सभा घेण्याचे निश्चित केले. त्याच्या पत्रिका छापून वाटण्यात आल्या होत्या. परंतु सभेकरीता जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेण्यात आली

नव्हती.[१७] याच गोष्टीचा फायदा उठवून व्यापाऱ्यांनी व काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी सभा उधळून लावली होती.

इ. स. १९२० पासून इगतपुरी तालुक्यातील ग्रामीण भागातून खेड्यापाड्यात सत्यशोधक चळवळीचे काम पुंजाबाबा गोवर्धने करीत होते. त्यामुळे तालुक्यातील बहुजन समाजातील सर्वसामान्य माणसांशी त्यांचे संबंध निर्माण झाले होते. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील पुंजाबाबा गोवर्धने यांनी कम्युनिस्ट पक्षाचे सदस्यत्व स्वीकारल्यानंतर ते जोमाने कामाला लागले होते. त्यांनी इगतपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांचे संघटन करायला सुरूवात केली होती. त्याकरीता शेतकरी परिषद घेण्याचा विचार केला. त्याला अनुसरून ८ नोव्हेंबर १९४७ रोजी म्हसुर्ली येथे शेतकऱ्यांची परिषद घेतली. या परिषदेत त्यांनी तत्कालीन सरकारवर जोरदार टीका केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात पुंजाबाबा शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्याकरीता म्हणाले, ''सरकार सक्तीची लेव्ही वसुली करते. शेतकऱ्यांच्या मालाला भावही वाढवून देत नाही. सावकारांवर निर्बंध आणत नाही. हे सर्व पाहता स्वातंत्र्य मिळून काय पदरात पडलं, असा प्रश्न उपस्थित होत आहे. स्वातंत्र्य चळवळीत अनेक लोक तुरुंगात गेले आणि स्वातंत्र्याचा लढा यशस्वी झाला. अशा शेतकऱ्यांच्या हिताच्या रक्षणासाठी आम्हालाही लढा उभारावा लागणार असं दिसत आहे.'' तसेच सरकारने भात मालाचे भाव वाढवून द्यावे असा एकमुखी ठराव पास करण्यात आला. परंतु सरकारने या परिषदेमधील मागणीकडे दुर्लक्ष करून तालुकाबंदी व जिल्हाबंदी उठविली नाही व भाताचे भावही वाढवून दिले नाहीत.

तेव्हा नाशिक जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या या अडचणींचे निराकरण करण्याकरीता ''अखिल भारतीय शेतकरी कामगार'' पक्षाची संघटना स्थापन करण्यात आली होती. या संघटनेच्या नाशिक जिल्हा शाखेचे चिटणीस भाई विठ्ठलराव हांडे यांनी शेतकऱ्यांच्या या परिस्थितीची जाणीव करून देण्यासाठी एक पत्रक जाहीर केले होते. या पत्रकान्वये तत्कालीन सरकारच्या या धोरणाला पाठिंबा देताना त्यांनी ''शेतकरी भरडला जाऊ नये म्हणून सरकारकडे दोन मागण्या केल्या होत्या. त्या

मागण्या म्हणजे, शेतकऱ्यांकडून धान्य वसूल करताना शेतकऱ्यांच्या कुटुंबात जितकी माणसे असतील त्या माणसांना पुरेल इतके धान्य त्याचेकडे ठेवण्यात यावे; तसेच दुसरी महत्त्वाची मागणी म्हणजे धान्यांच्या किंमतीबद्दलची होती.''

नाशिक जिल्ह्यातील शेतकरी वर्ग हा आपल्या शेतात पारंपरिक पिके घेत होता. त्यावेळी कोणत्याही पिकांचे संकरित वाण (बियाणे) आणि पिकावर फवारणी करण्यासाठी औषध उपलब्ध नव्हते. तेव्हा इ. स. १९४६ मध्ये रब्बी हंगामात घेण्यात येणाऱ्या गव्हाच्या पिकावर नाशिक जिल्ह्यातील निफाड, येवला, सिन्नर, कळवण, बागलाण व परिसरातील तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकावर तांबेरा रोग पडला होता. या रोगामुळे संपूर्ण जिल्ह्यातील गव्हाचे पीक नष्ट झाले होते. या अडचणीच्या काळात नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याकरीता प्रांतिक काँग्रेसच्या सरकारला जाणीव व्हावी यासाठी नाशिक जिल्हा किसन सभेच्या कार्यकर्त्यांनी सभा घेण्याचे निश्चित केले. या सभेकरीता वाघ गुरूजी, सुधीर फडके, जयवंतराव वाघ, दौलतराव घुमरे इत्यादी किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. किसान सभेने घेतलेल्या या सभेस जिल्ह्यातून साधारणपणे ५००० शेतकरी उपस्थित होते.[१८] या सभेत त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले होते. त्यांनी किसान सभेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे दु:ख सरकारसमोर मांडण्यासाठी प्रयत्न केले होते. तसेच इ. स. १९४६ मध्ये संपूर्ण नाशिक जिल्ह्यात अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी झाली होती. मात्र सरकारकडून सक्तीने करण्यात येणारी लेव्ही वसुली थांबवली नव्हती. त्यामुळे परिसरातील सर्व शेतकरी वर्ग हवालदिल झाला. तेव्हा परिस्थिती विचारात घेऊन पुंजाबाबा गोवर्धने, डॉ. गंगाधर भुतेकर आणि दादासाहेब गायकवाड यांनी नाशिकमधील गंगापूर रस्त्यावरील डोंगरे वसतिगृहाच्या शेतात शेतकरी वर्गाची सभा आयोजित केली होती. सभेकरीता शाहीर अमरशेख, अण्णाभाऊ साठे व त्याचे कलापथक बोलविले होते. परंतु काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी सभा उधळून लावली होती.

## स्वातंत्र्योत्तर शेतकरी चळवळ

स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर आलेल्या काँग्रेस पक्षाच्या मंत्रिमंडळाने २८ डिसेंबर १९४८ रोजी कायदा करून ''संरक्षित कुळांना जमीन विकत घेण्याचा अधिकार दिला होता.'' तसेच सक्तीच्या धान्य वसुलीबाबतही निश्चित असे धोरण जाहीर केले नव्हते. तेव्हा शेतकऱ्यांवरील हा अन्याय दूर करण्यासाठी पुंजाबाबा गोवर्धने यांनी इगतपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांना जागृत करण्याचे धोरण स्वीकारून गावोगावी पायी फिरून प्रत्येक गावातील शेतकऱ्यांच्या सभा घेऊन शेतकऱ्यांना संघटित केले. सरकार आपल्या उत्पादित मालाला योग्य भाव देत नाही. त्यासाठी सरकार दरबारी आवाज उठवण्यासाठी त्यांनी काकासाहेब वाघ यांच्या सहकार्याने इगतपुरी तालुक्यातील खंबाळा या गावी तालुक्यातील शेतकऱ्यांची परिषद भरविली होती. या परिषदेकरीता शेतकरी कामगार पक्षाचे प्रमुख नेते भाई सत्तार (अहमदनगर) यांना आमंत्रित केले होते. तसेच शंकरराव मोरे, तुळशीराम जाधव हेही उपस्थित होते. त्यांनी या सभेत शेतकऱ्यांनी आपल्या उत्पादित मालाला योग्य भाव मिळावा याकरीता सनदशीर मार्गाने सत्याग्रह करण्याचे आवाहन केले होते. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य बाजारभाव मिळावा याकरीता संपूर्ण भारतातून हा पहिलाच प्रयत्न होता. त्यांच्या या प्रयत्नाला जनतेचा भरभरून पाठिंबा मिळाला होता. या सत्याग्रह चळवळीत इगतपुरी तालुक्यातील स्त्रियांनीही सहभाग घेतला होता. काही स्त्रिया जेलमध्ये सुद्धा गेल्या होत्या. दादासाहेब गायकवाड यांनी या सभेत शेतकऱ्यांचे तत्कालीन ज्वलंत प्रश्न मांडले होते. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील पुंजाबाबा गोवर्धने यांनी कम्युनिस्ट पक्षाचे सदस्यत्व स्वीकारल्यानंतर ते जोमाने कामाला लागले होते. त्यांनी इगतपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांचे संघटन करायला सुरूवात केली होती. त्याकरीता शेतकरी परिषद घेण्याचा विचार केला. त्याला अनुसरून ८ नोव्हेंबर १९४७ रोजी म्हसुर्ली येथे शेतकऱ्यांची परिषद घेतली. या परिषदेत त्यांनी तत्कालीन सरकारवर जोरदार टीका केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात पुंजाबाबा शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्याकरीता म्हणाले, ''सरकार सक्तीची लेव्ही वसुली करते. शेतकऱ्यांच्या मालाला भावही वाढवून देत नाही. सावकारांवर

निर्बंध आणत नाही. हे सर्व पाहता स्वातंत्र्य मिळून काय पदरात पडलं, असा प्रश्न उपस्थित होत आहे. स्वातंत्र्य चळवळीत अनेक लोक तुरुंगात गेले आणि स्वातंत्र्याचा लढा यशस्वी झाला. अशा शेतकऱ्यांच्या हिताच्या रक्षणासाठी आम्हालाही लढा उभारावा लागणार असं दिसत आहे.'' तसेच सरकारने भात मालाचे भाव वाढवून द्यावे असा एकमुखी ठराव पास करण्यात आला. परंतु सरकारने या परिषदेमधील मागणीकडे दुर्लक्ष करून तालुकाबंदी व जिल्हाबंदी उठविली नाही व भाताचे भावही वाढवून दिले नाहीत.

नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील पंडित धर्मा पाटील यांनी दादासाहेब सैंदाणे यांच्या सहकार्याने बागलाण तालुक्यातील भूमिहीन आदिवासी लोकांचा मोर्चा कामगार आयुक्त यांचेकडे नेला होता. या मोर्चाने लेबर कमिशन पुढे परखड शब्दात साक्ष दिली होती. त्यात त्यांनी आदिवासी शेतकरी जनतेच्या विकासासाठी स्वतंत्र विकासगटाची स्थापना करण्याची मागणी केली होती .

त्यावेळी काँग्रेसविरोधी सर्व पक्षांनी एकत्र येऊन सरकारच्या लेव्हीच्या धोरणाला विरोध केला. आचार्य अत्रे यांनी *''नवयुग''* वृत्तपत्रातून ''हलकटपणाची परमावधी'' नावाचा लेख लिहून खेर-मोरारजी सरकारवर टीका केली. त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सरकारविरोधी वातावरण असताना आपल्या परिसरातील शेतकऱ्यांचे संघटन झाले पाहिजे. त्यांनाही सरकारच्या धोरणांची जाणीव झाली पाहिजे. याकरीता पुंजाबाबा गोवर्धने यांनी नाशिक जिल्ह्यातील सांजेगाव येथे ८ जानेवारी १९४८ रोजी परिसरातील शेतकऱ्यांची एक सभा घेतली. या सभेचे आयोजन करण्यामध्ये बाबूराव नाना गोवर्धने यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. या सभेत पुंजाबाबा गोवर्धने म्हणाले, ''सरकार सत्तेच्या जोरावर दंडेली करत आहे. शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळत आहे. पण आम्ही हिंसा करणार नाही. हिंसा न करताही आंदोलन यशस्वी करता येते हे महात्मा गांधींनी जगाला दाखवून दिले आहे. आंदोलनात आपण याच अहिंसेच्या मार्गाने जायला हवं. पण त्यासाठी आपली एकजूट पक्की पाहिजे. आपली एकजूट असेल तर कुणीही आपल्याला वाकवू शकणार

नाही.'' अशा स्वरूपाची शेतकरी वर्गात जाणीव करून शेतकऱ्यांनी सरकारच्या अन्यायी धोरणाला विरोध करावा याकरीता जागृती करून संघटन केले होते.

या दरम्यान काळातच ''शेतकरी कामगार संघ'' हा पक्ष कॉंग्रेसमधून बाहेर पडला आणि ''शेतकरी कामगार पक्षाची'' स्थापना केली. या पक्षाचे नेतृत्व केशवराव जेधे, शंकरराव मोरे, दत्ता देशमुख यांचेकडे होते. तसेच नाशिक जिल्ह्यातून ॲड. विठ्ठलराव हांडे हेही सहभागी झाले होते. या दरम्यानचे काळात पुंजाबाबा गोवर्धने यांनी इगतपुरी तालुक्यात शेतकऱ्यांच्या एक एकर भाताच्या पिकाला उत्पादनासाठी येणारा खर्च आणि सरकारकडून मिळणारा भाव यातील तफावत आकडेवारीसह त्यांनी काकासाहेब वाघ यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ नेऊन सरकार पुढे मांडली. तरीपण सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. याउलट इगतपुरी येथील तहसीलदारांनी १६ नोव्हेंबर १९४८ रोजी धान्य उत्पादक शेतकऱ्यांकरीता एक आदेश काढला होता. ''शेतकऱ्यांनी सरकारशिवाय कोणालाही धान्य विकू नये. भात पिकाचे भाव नंतर ठरविण्यात येतील.''तेव्हा पुंजाबाबा गोवर्धने यांनी यावर विचार विनिमय करण्याकरीता परिसरातील शेतकऱ्यांची इगतपुरी येथे एक बैठक आयोजित केली होती. या सभेत शेतकऱ्यांचा होणारा खर्च विचारात घेऊन २०% नफा धरून भाव निश्चित करण्यात यावा अशी मागणी केली होती. तसेच शेतकरी कामगार पक्षाच्या नाशिक जिल्हा शाखेचे सरचिटणीस विठ्ठलराव हांडे यांनी सरकारच्या या धोरणाला पाठिंबा देताना शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून दोन मागण्या केल्या होत्या.

**अ.** धान्य वसूल करताना शेतकऱ्यांच्या कुटुंबात जितकी माणसं असतील त्यांना पुरेसे धान्य ठेवण्यात यावे. सरकारने पूर्वीचे शेतकऱ्यांचे कुटुंब पाच माणसांचे समजले जाईल ही अट रद्द केली ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु दरडोई सालाला साडेचार मण धान्य हे पूर्वीचे प्रमाण कायम ठेवले असल्याने शेतकऱ्यांची उपासमार होणार आहे. शेतकरी कष्टाची कामे करतात. ते खेड्यात राहतात. दारिद्र्य असल्यामुळे भाकरी आणि कालवण यावर त्यांना जगावे लागते. कष्टामुळे आहार वाढतो. यामुळे पोटभर भाकरी मिळाल्याशिवाय समाधान होत नाही. शहरातील ख्याली खुशालीत जगणारे लोक अन्नधान्य कमी खातात. यावरून तेच प्रमाण

शेतकऱ्यांकरीता ठरविल्यास त्याची उपासमार झाल्याशिवाय राहणार नाही. तुरुंगातील कैद्यास जो व जितका आहार सरकार देत असे तसासुद्धा आहार शेतकऱ्यास मिळत नाही, हे राज्यकर्त्यांनी विसरू नये. म्हणून दरडोई कमीत कमी ७ मण धान्य देणे जरूरी आहे.

**ब.** शेतकऱ्यांच्या घरी किंवा शेतावर कामासाठी जे मजूर असतात त्यांना मालकाकडून धान्यरुपाने मजुरी मिळत असते. त्याची पाहणी करून शेतकऱ्यांकडून धान्य वसुली करताना त्यांच्यासाठीही धान्य शेतकऱ्यांकडे ठेवावे.

२) सरकारने कापडाचा, साखरेचा व इतर पदार्थांचा भाव नियंत्रित करताना उत्पादनाचा खर्च व त्यावर सुमारे २०% नफा जमेस धरून हे भाव ठरविले. शेतकरी वर्गास धान्याचे भाव देतानाही हेच धोरण ठेवणे न्यायाचे होईल. परंतु नेमकी याच तत्त्वाची पायमल्ली भाव ठरविताना करण्यात आली होती. तेव्हा पुंजाबाबा गोवर्धने यांनी भात लागवडीपासून ते भात घरी आणण्यापर्यंत शेतकऱ्याला किती खर्च करावा लागतो. सरकारला भात विकून शेतकऱ्याला किती तोटा सहन करावा लागतो या खर्चाची जाणीव शेतकऱ्यांना करून दिली होती.

इ. स. १९४८-१९५४ या काळात बागलाण तालुक्यातील पंडित धर्मा पाटील हे डेटरिलिफ वर्कर म्हणून काम करीत होते. तेव्हा या दरम्यानच्या काळात बागलाण तालुक्यातील आदिवासी डोंगराळ भागातील साल्हेर, मुल्हेर परिसरातील रहिवाशी असलेल्या आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांच्या ताब्यात गेल्या होत्या. सावकाराच्या ताब्यातील जमिनी पुन्हा शेतकऱ्यांना मिळाव्यात यासाठी त्यांनी या परिसरातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा केली. शेतकऱ्यांच्या गटागटाच्या सामूहिक सभा घेऊन त्यांना परिस्थितीची जाणीव करून दिली होती. कर्ज निवारण कायदा म्हणजे काय? तसेच शेतकऱ्यांवर असलेल्या कर्जाचे निवारण करण्यासाठी शेतकऱ्यांनी कोणती कागदपत्रे, दस्तऐवज आणावे याची माहिती दिली. त्यानंतर अशा सर्व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून कोर्टात केस दाखल केली होती. न्यायालयात जबानी कशी द्यावी याचीही माहिती दिली होती. त्यांच्या या प्रयत्नामुळे या परिसरातील शेतकऱ्यांच्या सावकारांच्या ताब्यात गेलेल्या सर्व जमिनी त्यांना

परत मिळवून दिल्या होत्या. यामुळे या परिसरातील गरीब शेतकऱ्यांना त्याच्या उदरनिर्वाहाचे मालकीचे साधन परत मिळाले होते.

इगतपुरी तालुका शेतकरी कामगार पक्षाने पुंजाबाबा गोवर्धने, बाळू सोनवणे तसेच पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई विठ्ठलराव हांडे व काकासाहेब वाघ यांच्या नेतृत्वाखाली सरकारकडून सत्याग्रह करणाऱ्या शेतकऱ्यांना कशी वाईट वागणूक मिळत आहे याची जाणीव करून लढा उभारला होता. त्यावर इगतपुरी तालुक्याचे तहसीलदार यांनी १६ ऑक्टोबर १९४८ रोजी जाहीर केले की, ''सर्व शेतकऱ्यांनी सरकारशिवाय कोणालाही धान्य विक्री करू नये. धान्याचे भाव नंतर ठरविण्यात येतील.'' तेव्हा सरकारच्या या धोरणावर विचार करण्यासाठी इगतपुरी तालुक्यातील शेतकरी प्रतिनिधीची १६ नोव्हेंबर १९४८ रोजी सभा घेण्यात आली होती. या सभेत असे ठरविण्यात आले की, ''शेतकऱ्यांचा होणारा खर्च धरून त्यावर २०% नफा आकारून भाव ठरविण्यात यावेत.'' या निर्णयाचा प्रसार करण्यासाठी १०-१५ शेतकरी गावोगावी पाठविण्यात आले होते .

तेव्हा सरकारने वेगळी शक्कल लढवून दोन मुद्दे नव्याने उपस्थित केले होते. ते म्हणजे हे आंदोलन श्रीमंत शेतकऱ्यांचे आहे. शेतीमालाचे भाव वाढवून दिले तर महागाई वाढेल असे सांगितले होते. तेव्हा पुंजाबाबांनी या सर्व मुद्यांचा अभ्यास करून सरकार शेतकऱ्यांची फसवणूक व दिशाभूल करून भातमालाची खरेदी करावयाची इतकाच सरकारचा उद्देश आहे, असे स्पष्ट केले होते. त्यामुळे शेतकरी मोठ्या संख्येने सत्याग्रहात सामील झाले होते. त्यानंतर पुंजाबाबांनी वाडीवऱ्हे, इगतपुरी, घोटी, आळवंड येथे कॉम्रेड नाना पाटील, काकासाहेब वाघ, आ. भाऊसाहेब राऊत, तुळशीदास जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेतल्या होत्या. त्याचा काहीही उपयोग झाला नव्हता.

तेव्हा पुंजाबाबा गोवर्धने, बाळू सोनवणे व काकासाहेब वाघ यांना ६ जानेवारी १९४९ रोजी जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले. त्यावेळी ते म्हणाले, ''आमची मागणी जनहिताची असल्याने आम्ही कुठलीही तडजोड करणार नाही.'' असे उत्तर दिले होते. तेव्हा सरकारचा हा हेतू लक्षात घेऊन इगतपुरी तालुक्यातील खंबाळे तळे

या गावी १६ जानेवारी १९४९ रोजी भाई एन. एन. सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली परिसरातील शेतकऱ्यांची एक सभा घेतली. त्यावेळी सभेला सुमारे १०-१२ हजार शेतकरी हजर होते व काही स्त्रियांही हजर होत्या. त्यापैकी चार स्त्रियांनी भाषणे केली. त्यात त्या म्हणाल्या ''मागे आम्ही मोत्यासारखा तांदूळ देऊन टाकला व आमच्या सोन्यासारख्या पोरांनी काळाकुट्ट धान्य खाल्ले. आता आमच्या मोत्याचे भाव आम्ही ठरविणार.'' असे मत मांडून आपला सहभाग नोंदविला होता. तसेच दिनकर देसाई म्हणाले, ''मंत्र्यानाही शेवटचे सांगण्यात आले की, चोहोंकडे मंत्र्याचे मित्र व काँग्रेस भक्त म्हणविणारे पांढरी शुभ्र खादी परिधान करून मिरवणारे आज खोऱ्याने पैसा ओढीत आहेत. ते आम्ही उघड्या डोळ्यांनी पहात असताना ज्यांचे जवळ उद्याची भ्रांत, दुपारची काळजी एवढीच इस्टेट शिल्लक आहे अशा शेतकऱ्यांना कसला स्वार्थ त्याग करावयास आम्ही सांगणार? एकूण आजची सभा आणि आजचा निर्णय हा कसल्याही प्रकारच्या घाईने अगर उच्छखलपणाने घेतलेला नसून पूर्ण वाटाघाटी केल्यानंतर बऱ्याच अर्ज विनवण्या व भेटीगाठी होऊन शेवटी निरुपयास्तव घेण्यात आला आहे.'' या सभेला इगतपुरी तालुक्यातून १५००० शेतकरी हजर होते. तसेच अनेक शेतकऱ्यांनी भाषणे केली होती. तसेच या सभेत शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा. शेतकऱ्यांनी धान्याला योग्य भाव मिळाल्यावरच विकावे असा ठराव करण्यात आला. तसेच ठरावानुसार सरकारशी पत्रव्यवहार करण्याकरीता एक समिती नेमण्यात आली होती. १) पुंजाजी लक्ष्मण पाटील - सांजेगाव, २) चंदन दगडू पाटील - आळवंड, ३) रामचंद्र गणपत पाटील - कुरनोली या समितीने परिषदेत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार शेतकऱ्यांचा लढा ताबडतोब सुरू करण्यात यावा. खेड्यापाड्यातून सत्याग्रही शेतकऱ्यांच्या याद्या तयार करण्यात आल्या होत्या. सत्याग्रहाकरीता ठाकूर, कोळी, वारली शेतकऱ्यांनी लढण्याची तयारी झाली होती.

सभेत ठरल्याप्रमाणे स्त्री-पुरुष यांच्या तुकड्या तयार करण्यात आल्या होत्या. त्यांनी गटागटाने जाऊन भात खरेदी करण्यासाठी सरकारने उभारलेले काटे बंद पाडायचे. धान्य खरेदी करणाऱ्यांवर काट्यावर सभा घेण्यास सुरुवात करून दोन दिवसात सरकारचे सर्व काटे बंद पाडले होते. त्यामुळे सरकारने चिडून शेतकऱ्यांच्या

रास्त मागण्या विचारात न घेता २० जानेवारी १९४९ रोजी इगतपुरी परिसरात १४४ कलम लागू करून सभा, मिरवणुका, प्रचार, निदर्शने, जमाव यांना बंदी केली. तरीही शेतकरी रस्त्यावर येत होते. ठिकठिकाणी सभा व निदर्शने करून सरकारने काढलेल्या आदेशांचा भंग करत होते. तेव्हा १०-१२ दिवसात सरकारने आंदोलनकर्त्या १०० स्त्रिया व ५०० पुरुषांना तुरुंगात टाकले. नाशिक येथील सरकारवाडा व यशवंत मंडईतील तुरुंग कमी पडल्याने मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात आले होते. काकासाहेब वाघ, पुंजाबाबा गोवर्धने व बाळू सोनवणे यांना नाशिक जिल्ह्यातून हद्दपारीचा आदेश दिला. तरीही शेतकरी वर्ग सत्याग्रह करीत होता. त्यावेळी शेवटी १ फेब्रुवारी १९४९ रोजी १४४ कलम मागे घेऊन सर्व सत्याग्रहींना बिनशर्त तुरुंगातून मुक्त केले होते.

त्यानंतर घोटी या ठिकाणी शेतकऱ्यांची सभा घेण्यात आली. या सभेस सुमारे १०,००० शेतकरी हजर होते. सभेचे अध्यक्षस्थान काकासाहेब वाघ यांच्या पत्नी श्रीमती गिताबाई वाघ यांनी स्वीकारलेले होते. त्यावेळी त्या म्हणाल्या, ''काकांना जरी हद्दपार केले असले तरी तुमच्यातून अनेक काका व पुंजाबाबा निर्माण होतील. तेव्हा लढा असाच चालू ठेवा.'' याच सभेत हद्दपारी रद्द करून अटक केलेल्या शेतकऱ्यांवर भरण्यात आलेले खटले मागे घेण्याचा ठराव करण्यात आला होता.

याचा परिणाम असा झाला की गावातील पोलीस पाटील व मुलकी पाटील यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले. त्यामुळे खेड्यातील लेव्ही वसुलीची यंत्रणाच कोलमडून पडली. त्यामुळे शेतकरी सरकारच्या दबावाला न घाबरता इ. स. १९५० च्या हंगामापासून सरकारला नाशिक जिल्ह्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात येणाऱ्या भाताला ३ रुपये मण भाव वाढवून द्यावा लागला होता. यातच खऱ्या अर्थाने हा लढा यशस्वी झाला होता असे आपणांस म्हणता येईल. शेतकऱ्यांची सावकाराकडून होणारी पिळवणूक थांबविण्याकरीता प्रयत्न केले होते. सर्वसामान्य शेतकरी भूमिहीन होणार नाही याची त्यांनी काळजी वाहिली होती. त्यांनी सावकारी मुक्तीची चळवळ उभारली होती.

इ. स. १९५० मध्ये नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यामधील साल्हेर, मुल्हेर, विसापूर, मोहोलांगी इत्यादी गावात पंडित धर्मा पाटील यांनी स्वत: पायी फिरून परिसरातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीची पाहणी केली होती. तेव्हा त्यांना असे दिसून आले होते की, या परिसरातील शेतकऱ्यांची गुरे साथीच्या आजारामुळे मेली होती. याची नोंद घेऊन सरकारकडून यावर उपाययोजना करण्याची मागणी केली होती. तसेच याच वर्षी बागलाण तालुक्यातील लखमापूर गावातील सर्व्हे नंबर ६४ ची जमीन तेथील आदिवासी लोकांना मिळावी म्हणजे त्यांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन मिळेल. यासाठी त्यांनी स्वत: पुढाकार घेतला होता. त्यांच्या या कार्यातून या गावातील ३५ आदिवासी शेतकरी कुटुंबांना ही जमीन मिळाली होती .

बागलाण तालुक्यातील पंडित धर्मा पाटील यांनी ऑक्टोबर १९५१ मध्ये नाशिक जिल्ह्याचे जिल्हा शेतकी अधिकारी यांना तालुक्यातील अजमीर सौंदाणे हे गांव तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. त्यामुळे या गावात शेतकी खात्याचा डेपो उभारण्याची मागणी केली होती. तसेच या काळात बागलाण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या उसावर 'पायरीला' नावाचा रोग मोठ्या प्रमाणात आला होता. तेव्हा त्याचा अधिक प्रमाणात प्रसार होऊ नये याकरिता परिसरातील शेतकऱ्यांना पावडर स्टिंग मशीन देण्यात यावी असे सूचविले होते. त्यांच्या या कामामुळे ऊसाचे पीक त्यावर्षी बचावले होते.

संपूर्ण महाराष्ट्र राज्यात इ. स. १९५२ मध्ये दुष्काळ पडला होता. त्यात इगतपुरी तालुका अवर्षणग्रस्त होता. या दुष्काळाच्या काळात जनता आणि गुरेढोरे यांचे हाल होत होते. त्यावर उपाय म्हणून सरकारकडून अन्नधान्य पुरवण्याकरीता स्वस्त धान्य दुकानांची सोय करण्यात आली होती. हे स्वस्त धान्य दुकानदार गरजू लोकांना धान्य पुरवठा करण्याऐवजी साठेबाजी, काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांना जास्तीच्या भावात धान्य विकत होते. त्यामुळे गरीब, शेतकरी, आदिवासी, शेतमजूर यांची उपासमार होऊ लागली होती. त्यावेळी पुंजाबाबा गोवर्धने यांनी इगतपुरीच्या तहसीलदारांची भेट घेऊन परिस्थिती लक्षात आणून दिली होती. त्याचा काहीएक फरक जाणवत नव्हता. त्यावेळी त्यांनी शेतकरी, आदिवासी, शेतमजुरांचा मोर्चा

इगतपुरी तहसीलवर नेला होता. यात ॲड. विठ्ठलराव हांडे, नरेंद्र मालुसरे, बाबा गोसावी, रामभाऊ गायकर, द. तु. जायभावे हे नाशिक जिल्ह्यातील डाव्या आघाडातील सर्व कार्यकर्ते सामील झाले होते. तसेच जिल्हाधिकारी यांचेकडे शिष्टमंडळ नेऊन निवेदन दिले होते. त्यात स्पष्ट केले होते की, ''भांडवलदार-सावकार कोऱ्या स्टॅम्प पेपरवर शेतकऱ्यांची सही घेऊन जमिनी सावकारांच्या हस्तकांच्या नावे खरेदी केल्या जातात. म्हणून सावकारी पाशातून शेतकऱ्यांची सुटका करावी. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्याची व्यवस्था करण्यात यावी असे म्हटले होते. इ. स. १९५३-५४ मध्ये नाशिक जिल्ह्यातील किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी नाशिक येथे अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष रॉय (आंध्रप्रदेश) याच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन घेतले. या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या अडचणींवर चर्चा करण्यात आली होती.

शेतकऱ्यावरील व कुळावरील अन्याय दूर करण्यासाठी तसेच त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी सावकारांच्या कर्जाबाबत बोलताना नाशिक जिल्ह्यातील भाऊसाहेब हिरे म्हणाले, ''शरीराच्या एखाद्या अवयवाला जर भयंकर रोग झाला तर तो अवयव कापून टाकल्याशिवाय इलाज नसतो. त्या अवयवाचा लोभ धरला तर तो त्यापायी एखादेवेळी संपूर्ण जमीन-जुमला व संसार गमावण्याचा प्रसंग येतो. जगात कर्जाला विश्रांती नाही. तो रात्रंदिवस राहून वाढत असतो. म्हणून वेळीच सावध होऊन त्याच्या वाट्यालाच जाता कामा नये आणि चुकून कर्ज घेतलच तर वेळीच ते निपटले पाहिजे.'' तेव्हा शेतकऱ्यांचे होणारे शोषण बघून त्यांनी यातून काहीतरी मार्ग काढलाच पाहिजे व शेतकऱ्यांना वाचविले पाहिजे. हा विचार करून त्यांनी महाराष्ट्र राज्याचे शेतकी व महसूल मंत्री असताना कुळ कायद्याचे विल मांडून ''कसेल त्याची जमीन व राहील त्याचे घर'' हे विधेयक अनेकांचा विरोध असतानाही १ एप्रिल १९५६ रोजी पास करून घेतले. तसेच त्याची अंमलबजावणी १ एप्रिल १९५७ या दिवसापासून लागू केली. यामुळे अनेक कुळांना संरक्षण मिळाले होते. सावकाराच्या, जमीनदारांच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर राबणाऱ्या भूमिहीन शेतकऱ्यांना जमिनीचे मालक केले होते. या कायद्याने महाराष्ट्र राज्यातील अनेक

गरीब शेतकरी, कष्टकरी, कुळ यांना आपल्या स्वत:च्या मालकीचे उदरनिर्वाहाचे साधन मिळाले होते.

## शेतकरी कामगार पक्षाचा लढा (दाभाडी प्रबंध)

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील. सावकार, जमीनदार यांच्या शोषणातून शेतकरी मुक्त होईल असे बहुजन समाजातील अनेकांना वाटत होते. परंतु स्वातंत्र्यानंतर सत्तेवर आलेल्या काँग्रेस पक्षाच्या सरकारने त्यात फारशी सुधारणा केली नव्हती. काँग्रेसच्या शेतीविषयक धोरणातील नाराजीमुळे बहुजन समाजातील नेत्यांनी काँग्रेस पक्षाबाहेर पडून दि. १३ जून १९४९ रोजी ''शेतकरी कामगार'' या नवीन पक्षाची स्थापना केली होती. या नवीन पक्षाचे नेतृत्व केशवराव जेधे, शंकरराव मोरे, दत्ता देशमुख यांचेकडे होते. त्यांनी सरकारकडे या पक्षाच्या माध्यमातून शेतसारा कमी करणे, शेतकऱ्यांना कर्ज माफी करावी अशा मागण्या केल्या होत्या.

पुणे येथे पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनाबाबत विचारविनिमयाबाबत बैठक आयोजित केली होती. या बैठकीस उपस्थित असलेले नाशिक जिल्ह्यातील काकासाहेब वाघ यांनी पक्षाचे दुसरे अधिवेशन नाशिक जिल्ह्यात घेण्यात यावे अशी मागणी केली. तसेच नाशिक जिल्हा कामगार पक्षाचे चिटणीस दाभाडी येथील रहिवाशी राजाराम निकम यांनी अधिवेशन मालेगाव तालुक्यातील दाभाडी या गावी घेण्याचे मान्य केले होते. त्यानुसार व्ही. डी. चितळे व वसंतराव तुळपुळे यांनी चार दिवस चर्चा करून दाभाडी अधिवेशनातील विषयांचा प्रबंध तयार केला. त्यानंतर ३१ मे १९५० रोजी मालेगाव परिसरातील दाभाडी गावातील गिरणा नदीच्या काठावरील आमराईच्या गर्द सावलीत खुले अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनाला केशवराव जेधे, क्रांतिसिंह नाना पाटील, रघुनाथराव खाडीलकर, तुळशीदास जाधव, काकासाहेब वाघ तसेच राज्यातील सर्व शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. या अधिवेशनात दाभाडी प्रबंधाच्या जाहीरनाम्यात १५ कलमी कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व शेतकऱ्यांच्या परिस्थितीबद्दल मागण्या करण्यात आल्या होत्या. ''दुसऱ्या जागतिक

महायुद्धोत्तर काळात आंतरराष्ट्रीय परिस्थितीत मूलभूत स्वरुपाचे फेरबदल झालेले आहेत. साम्राज्यवादी गट व साम्राज्यशाही विरोधी गट या परस्पर विरोधी गटातील झगडा आज अशा परिस्थितीत लढला जात आहे. साम्राज्यवादी शक्ती कमजोर होत आहेत आणि समाजवादी लोकशाहीशक्ती वाढत आहेत.'' तसेच ''साम्राज्यवादी व समाजवादी लोकशाही या परस्पर गटातील लढा दिवसेंदिवस तीव्र होत आहे. शेतकरी व शेतमजूर यांच्यासाठी लढा उभारणे हे ही निश्चित करण्यात आले होते. ''शेतकरी वर्गातील जवळजवळ निम्मा भाग स्त्रियांचा असतो आणि म्हणून शेतकरी संघटनेत स्त्रियांना विशेष स्थान आहे. त्याकरिता स्त्रियांमध्ये प्रचार करून त्यांना शेतकरी संघटनेत सामील करून घेणे हे अतिशय जरुरीचे काम आहे.''[१९] अशा स्वरुपाच्या मागण्यांबरोबर शेतकरी व शेतमजुरांसाठी लढा उभारणे, खाजगी नफ्यावर नियंत्रण ठेवणे, इत्यादी बाबींचा समावेश या ऐतिहासिक प्रबंधात करण्यात आलेला होता. त्याचा शेतकरी वर्गातील अनेकांना फायदाही झाला.

इ. स. १९३२ मध्ये सरकारने साखर उद्योगाला संरक्षण देण्याचे धोरण स्वीकारले. त्यावेळी मालेगाव तालुक्यातील रावळगाव परिसरातील अनेक शेतकऱ्यांची जमीन वालचंद हिराचंद शेठ यांनी खंडाने ताब्यात घेतली होती. त्यांनी रावळगाव शुगर फार्म लिमिटेड नावाचा खाजगी साखर कारखानाही सुरू केला होता.[२०] भाऊसाहेब हिरे यांनी ''कुळ कायदा'' केला. त्याचा अनेकांना फायदाही झाला. या कायद्याला अनुसरून नाशिक येथे २९ मार्च १९५८ रोजी ''कृषक समाज संस्था'' स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन सहकार मंत्री बाळा आहेर यांच्या अध्यक्षतेखाली २९ मार्च १९५८ रोजी बैठक झाली. या बैठकीत झालेल्या विचार विनिमयातून रावळगांव येथील कारखान्याच्या ताब्यात असलेल्या जमिनीची खंडवाढ चळवळ सुरू झाली होती.

नांदगांव तालुक्यातील मनमाड येथील कॉ. माधवराव गायकवाड यांनी इत्यादी स. १९५२ पासून साम्यवादी पक्षात काम करण्यास सुरूवात केली. या काळात खंडकरी शेतकऱ्यांचा प्रश्न हाताळण्यास सुरूवात केली. कारण या काळात

ब्रिटिश शासनाच्या काळात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी कारखानदारांच्या ताब्यात गेल्या होत्या त्या खंडकरी शेतकऱ्यांना कारखानदारांकडून दोन रुपये खंड दिला होता. खंडाचा मोबदला अत्यल्प तर होताच, त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्यास कारखानदारांनी नकार दिला. त्यावेळी सुरू करण्यात आलेल्या चळवळीने तीव्र रुप धारण केले होते. या चळवळीचे नेतृत्व कॉ. माधवराव गायकवाड यांनी केले होते. तेव्हा येवला तालुक्यातील उंदिरगाव येथे करण्यात आलेल्या सत्याग्रहात १०० सत्याग्रही शेतकऱ्यांवर पोलिसांनी लाठीमार केला होता. माधवराव गायकवाड यांच्यासह अनेक शेतकऱ्यांना कारावासाची शिक्षा दिली होती. परंतु शेतकऱ्यांनी चालवलेल्या आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई व महसूल मंत्री भाऊसाहेब हिरे यांनी खंडकरी शेतकऱ्यांसह माधवराव गायकवाड यांची सुटका केली होती. तसेच खंडकरी शेतकऱ्यांना कारखानदाराकडून देण्यात येणाऱ्या खंडाची रक्कम २ रुपये वरून ५० रुपये करण्यात आली होती. त्यानंतरच्या काळातही खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनीचा लढा सुरू ठेवण्यात आला होता. तेव्हा आंदोलन, चळवळ या माध्यमातून शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागत नाही म्हणून त्यांची चळवळ चालू होती. त्या काळात त्यांनी खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनीचा प्रश्न न्यायालयात मांडला. दरम्यानच्या काळात सरकारने शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याबाबत अनेकवेळा घोषणा केल्या होत्या. प्रत्यक्ष मात्र जमिनीचा ताबा दिला जात नव्हता. शेवटी न्यायालयात शेतकऱ्यांच्या जमिनीची व क्षुल्लक मिळणारा खंड वाढून मिळण्याकरीता आंदोलन उभारले. त्याच्या परिणामातून २ रुपये मिळणारा खंड ५० रुपये झाला होता. त्यानंतरही त्यांनी शेतकऱ्यांची जमीन त्यांच्या ताब्यात देण्याकरीता आंदोलन केले. तेव्हा झालेल्या आंदोलनामुळे कारखाना मालकांनी काही ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्या ताब्यात दिल्या होत्या. परंतु खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनीचा प्रश्न पूर्णपणे सोडवला गेला नव्हता. त्यामुळे त्यांनी हे आंदोलन पुढील काळातही सुरू ठेवले आहे. तो प्रश्न त्यांनी अनेकांच्या मदतीने न्यायालयात दाखल केलेला आहे. माधवराव गायकवाड यांनी साधारणपणे आपले संपूर्ण आयुष्य या खंडकरी

शेतकऱ्यांच्या चळवळीकरीता खर्ची घातले. त्याकरीता केलेल्या आंदोलनातून त्यांनी अनेकांच्या जमिनी परत मिळवून त्यांच्या ताब्यात परत करण्यास कारखानदारांना भाग पाडले.

रावळगांव साखर कारखाना मालकाने इ. स. १९२३ मध्ये कारखान्याला ऊस पुरवठा करण्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांकडून ३० वर्षाच्या मुदतीने एकरी ४-५ रुपये वार्षिक खंडाने (भाडेपट्टीने) १५०० एकर जमीन घेतली होती.[२१] या जमिनीची मुदत (भाडेपट्टा) संपल्यावर खंडवाढ करून मिळावी किंवा भाडेपट्टा रद्द व्हावा अशी परिसरातील शेतकऱ्यांची मागणी होती. मात्र रावळगांव कारखाना मालक शेतकऱ्यांना खंडात वाढही करून देत नव्हता किंवा शेतकऱ्यांची जमीन त्यांच्या ताब्यातही देत नव्हता. तसेच सरकारही शेतकऱ्यांच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेत नव्हते. याउलट या दरम्यानच्या काळात तत्कालीन सरकारने कारखान्यांना साथ देण्याकरीता १४ एप्रिल १९५८ रोजी एक हुकूम काढून कारखान्यांच्या ताब्यात असलेल्या ज्या जमिनीची भाडेपट्टीची मुदत संपली आहे ती जमीन कारखान्याकडे कायम ठेवण्याची तरतूद केली होती. तेव्हा रावळगाव परिसरातील शेतकऱ्यांना संघटित करण्याचे काम प्रजा समाजवादी पक्षाचे स्थानिक कार्यकर्ते यांनी करून शेतकऱ्यांची चळवळ उभारली.

प्रजा समाजवादी पक्षाचे स्थानिक कार्यकर्ते जाधव यांनी खंडकरी जमिनीच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य सरकारने स्वीकारलेल्या धोरणाच्या विरोधात ६ जून १९५८ रोजी केंद्रीय सरकारला निवेदन दिले होते. तसेच ९-१० ऑगस्ट १९५८ रोजी बाळासाहेब देसाई यांच्या अध्यक्षतेखाली धुळे येथे झालेल्या बैठकीस नारायण झोडगे यांच्या समवेत शिष्टमंडळ पाठवून रावळगाव परिसरातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीची त्यांना जाणीव करून दिली होती. त्यानंतर रावळगाव येथे प्रभाकर कुंटे यांच्या अध्यक्षतेखाली शिरूभाऊ लिमये यांच्या उपस्थितीत १२ जानेवारी १९५९ रोजी परिसरातील शेतकऱ्यांची परिषद घेण्यात आली होती. तेव्हा या परिषदेत रावळगाव कारखान्याच्या ताब्यात असलेल्या खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्याकडे

देण्यासाठी तत्कालीन सरकारने लक्ष घालून प्रश्न सोडवावा असा ठराव करण्यात आला होता. तरीही सरकारने शेतकऱ्यांच्या या मागणीकडे आपुलकीने पाहिले नव्हते. त्यानंतर साखरवाडी येथील प्रजा समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते गंगाधर उगले यांच्या अध्यक्षतेखाली २५ डिसेंबर १९५९ रोजी परिसरातील १०-१५ हजार शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत सभा घेऊन त्यात शेतकऱ्यांच्या हिताच्या मागण्या केल्या होत्या. अशा पद्धतीने ही चळवळ पुढील काळातही सतत सुरू ठेवून प्रयत्न केल्यामुळे शेवटी जमिनीच्या मोबदल्यात मिळणाऱ्या खंडाच्या रक्कमेत वाढ मिळाली होती.

## नाशिक जिल्हा शेतकरी चळवळ

शेतकऱ्यांच्या असलेल्या समस्यांकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते. तसेच शेतकऱ्यांना वादळ, पूर, दुष्काळ, अतिवृष्टी, पिकांवरील रोग यासारख्या नैसर्गिक संकटांना कायमच तोंड द्यावे लागते. त्याचबरोबर शेतमालाला बाजारात योग्य भाव मिळत नाही. या आणि अशा अनेक प्रश्नांचा विचार करून ''शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळालाच पाहिजे'' या एक कलमी कार्यक्रमाच्या आधारावर शरद जोशी यांनी इ. स. १९७७-७८ पासून शेतकरी वर्गाचे संघटन करण्यास सुरवात केली होती. त्यासाठी त्यांनी पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात इ. स. १९७८ मध्ये ''शेतकरी संघटना'' नावाची संघटना स्थापन केली होती. या संघटनेने आपल्या कार्याची सुरवात मार्च १९८० मध्ये कांदा भाववाढ आंदोलनाने केली होती. नाशिक जिल्हा हा कांदा उत्पादक जिल्हा आहे. कांद्याचे पीक हाती आल्यावर कांद्याचे बाजारभाव घसरणे हे नेहमीचेच झाले होते. १९८० साली कांद्याचे भाव घसरले होते तेव्हा नाशिक जिल्ह्यातील पिंपळगांव बसवंत येथे २० मार्च १९८० रोजी शेतकऱ्यांच्या उत्पादित कांद्याला प्रति किलो १ रुपये भाव मिळावा या मागणीकरीता शेतकरी संघटनेने मुंबई-आग्रा महामार्गावर शरद जोशी, खंडेराव मोरे, माधवराव बोरस्ते व प्रल्हाद पाटील कराड यांनी शेतकऱ्यांच्या समवेत ''रास्ता रोको'' आंदोलन केले होते.[२२] त्यावेळी आंदोलनाकरीता एकत्र आलेल्या शेतकरी वर्गाला पांगविण्याकरीता पोलिसांनी गोळीबार केला होता.

शेतकऱ्यांच्या या परिस्थितीची सरकारला जाणीव व्हावी याकरीता निफाड तालुक्याचे तत्कालीन आमदार मालोजीराव मोगल यांनी कांद्याच्या घसरलेल्या भावाविषयी सभागृहात म्हणाले, ''कांदा कापला तर कापणाऱ्याच्या डोळ्यात पाणी येते. पण त्याच कांद्याचे कोसळलेले बाजारभाव पाहून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आलेले आहे. आज जवळपास ४० लाख क्विंटलपेक्षा जास्त कांदा शिल्लक आहे. त्याच्या नियोजनाची व्यवस्था शासनाने केली पाहिजे. ४० कोटी रुपयांपेक्षाही अधिक नुकसान नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे झालेले आहे. कांद्याच्या बाजारभावाच्या मागणीकरीता शेतकरी आंदोलन करतात. तर सरकार त्या शेतकऱ्यांवर गोळीबार करते. कांद्याच्या बाजारभावाचा प्रश्न हा शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. कांदा व्यापारी शेतकऱ्यांचा कांदा सरासरी २५ ते ४० रुपये प्रति क्विंटल या भावाने कांदा खरेदी करीत आहेत. शेतकऱ्यांच्या कांद्याला किफायतीशर भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे. कांदा उत्पादनासाठी जो खर्च होतो तोही भरून निघत नाही. शेतकऱ्यांच्या कांद्याला १०० रुपये प्रति क्विंटल भाव दिला पाहिजे. शेतकऱ्यांकडे कांदा साठविण्यासाठी सुविधा नाहीत. तसेच कांदा नाशवंत माल आहे. त्यामुळे कांद्याला १०० रुपये भाव द्यावा व शेतकऱ्याला अडचणीतून सोडवावे.

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुका ऊस उत्पादनात अग्रेसर तालुका म्हणून परिचित होता. तेव्हा ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या उसाला प्रतिटन ३००/- रुपये भाव मिळावा याकरीता इ. स. १९८० मध्ये शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी आणि जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते मोहन गुंजाळ, नरेंद्र आहिरे व अनिल गोरे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू केले होते. त्यासाठी त्या वर्षाच्या कारखान्यांच्या गळीत हंगामात साखर कारखान्यांना ऊस न देण्याचा ठराव करण्यात आला होता. साखर कारखाना महासंघाचे तत्कालीन अध्यक्ष माधवराव बोरस्ते यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला होता. तेव्हा इतर ठिकाणच्या कारखान्यांनी येथील शेतकऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता.

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुका ऊस उत्पादनात अग्रेसर तालुका म्हणून परिचित होता. तेव्हा ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऊसाला प्रति टन ३००/- रुपये भाव मिळावा याकरीता इ. स. १९८० मध्ये शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी आणि जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते मोहन गुंजाळ, नरेंद्र आहिरे व अनिल गोरे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू केले होते. त्यासाठी त्या वर्षाच्या कारखान्यांच्या गळीत हंगामात साखर कारखान्यांना ऊस न देण्याचा ठराव करण्यात आला होता. साखर कारखाना महासंघाचे तत्कालीन अध्यक्ष माधवराव बोरस्ते यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला होता. तेव्हा इतर ठिकाणच्या कारखान्यांनी येथील शेतकऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता. तसेच सरकारनेही पिकासाठी आवश्यक असणारा पाणी व वीजपुरवठा बंद केला होता. तेव्हा नाशिक, धुळे व अहमदनगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ''रास्ता रोको'' आंदोलन सुरू केले होते.

## शेतकरी संघटना महिला आघाडी

शेतकरी संघटनेने महिला आघाडी स्थापन करून तिच्यामार्फत स्त्रियांच्या असलेल्या समस्यांचा अभ्यास करून त्यांना आपल्या हक्कांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला होता. शेतकरी वर्गातील महिलांना संघटित करून अन्याय व शोषणमुक्त जीवन जगण्यासाठी प्रयत्न केले. शेतकरी कुटुंबात व शेतात स्त्रियांच्या कष्टाशिवाय कोणतेही काम होत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे स्त्रियांची वंचित अवस्था दूर करण्याच्या उद्देशाने शेतकरी संघटनेने शेतकरी महिलांचे स्वतंत्र संघटन सुरू केले होते. त्यांना त्यांच्या हक्काबाबत जागृत करणे. शेतकरी संघटनेच्या मते, ''शेती मालाच्या रास्त भावाचा फायदा शेतमजुराला मिळतो. त्याबद्दल आमची खात्री आहे. परंतु त्याचा फायदा शेतकऱ्यांच्या घरच्या मायबहिणीला मिळेल याबद्दल जबरदस्त शंका आहे. शेतकऱ्यांच्या बायकोची डोईवरची भाकरीची टोपली नशिबी कायम ती कायम.'' या वास्तव परिस्थितीकडे डोळेझाक करता येणार नाही. शेतकरी वर्गाच्या उत्पादित मालाला रास्तभाव मिळवून देण्याचा जसा प्रयत्न केला. तशाच प्रकारे शेतकरी महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी हा प्रयत्न केला जात होता.

शेतकरी संघटनेने महिला आघाडीच्या माध्यमातून फक्त स्त्री सबलीकरणाचे सिद्धांत महत्त्वाचे न मानता, त्यासाठी प्रत्यक्ष कृती कार्यक्रम आखून त्यावर जोर दिला होता. त्यासाठी त्यांनी महिला आघाडी तर्फे पुढील कृती कार्यक्रमांवर भर दिला होता.

१. ग्रामीण महिलांना एकत्र आणून त्यांचे संघटन करणे.

२. महिलांना त्यांच्या हक्काबाबत सजग करणे.

३. शेती मालाच्या किंमतीबाबत शेतकरी महिलात जाणीव जागृती करणे.

शेतकरी संघटनेने या वेगवेगळ्या कार्यक्रमातून शेतकरी महिलांच्या संघटनेने विचार केला. शेतकरी संघटनेने दि. ३, ४, ५ मे १९८५ रोजी आपल्या कार्यकारिणीची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत काही निर्णय घेण्यात आले होते. या निर्णयाला अनुसरून जिल्हावार शेतकरी महिलांचे मेळावे घेण्याचे नियोजन करण्यात आले होते.

शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार नाशिक जिल्ह्यातील मालेगांव तालुक्यात असलेल्या दाभाडी या गावी दि. २२ ऑगस्ट १९८५ रोजी महिला आघाडीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला सुमारे १५००० शेतकरी महिलांची उपस्थिती होती. त्यावेळी या मेळाव्यात महिलांच्या प्रश्नांवर व्यापक चर्चा करण्यात आली. त्यात महिलांनी मनोगत काय करावे? आपली अंतिम ध्येय काय आहेत? शेतकरी महिला आघाडीने सामाजिक, राजकीय व आर्थिक बदलासाठी प्रतिज्ञा तयार केली होती

शेतकरी संघटना महिला आघाडीचे पहिले अधिवेशन नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे दि. ९, १० नोव्हेंबर १९८६ रोजी भरविण्यात आले होते. हे अधिवेशन चांदवड येथे भरविण्याचे कारण म्हणजे या ठिकाणी अहिल्याबाई होळकर यांचे वास्तव्य होते. त्यामुळे स्त्रियांना आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी येथून प्रारंभ करावा असाही उद्देश असावा. चांदवड येथील अधिवेशनास ग्रामीण, कष्टकरी, शेतकरी महिलांचा सहभाग होता. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी महिलांचे प्रश्न यावर चर्चा करणे, स्त्रियांना त्यांच्या हक्काबाबत जागृत करणे, हा या

अधिवेशनाचा उद्देश होता. या अधिवेशनाचे प्रमुख पाहुणे शेतकरी संघटनेचे संस्थापक नेते शरद जोशी होते. तर स्वागताध्यक्ष बागलाण तालुक्यातील शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्री. रामचंद्र बापू पाटील हे होते. या अधिवेशनात सहभागी होणाऱ्या स्त्रियांना त्यांच्या प्रश्नांची जाणीव व्हावी म्हणून, ''चांदवडची शिदोरी-स्त्रियांचा प्रश्न'' या नावाची पुस्तिका प्रकाशित करण्यात आली होती. या अधिवेशनात स्त्रियांनी ''आम्ही महिला आहोत आणि आम्हाला माणूस म्हणूनच वागविले गेले पाहिजे'' अशी प्रतिज्ञा अधिवेशनास उपस्थित असलेल्या स्त्रियांनी घेऊन अधिवेशनास सुरुवात झाली होती. आमची गुणवत्ता लक्षात घेतली जावी, जन्माच्या अपघाताने ठरणारे जात, वर्ण, धर्म, भाषा, संपत्ती नाही, लिंगभेद तर नाहीच नाही. या अधिवेशनास स्त्रियांच्या उपस्थितीचा उच्चांक गाठला होता.

चांदवड येथील अधिवेशनात महिला आघाडीने जे प्रश्न उपस्थित केले होते ते सर्व प्रश्न दुर्लक्षित होते. या महिला आघाडीने त्या समस्यांवर उपाय सूचविले होते. शेतकऱ्यांना ज्या पद्धतीने शेतकरी संघटनेने आत्मसन्मान मिळवून दिला तशा प्रकारची प्रतिष्ठा, निर्भयता व स्वअस्तित्वाची जाणीव शेतकरी महिलांना मिळविण्यासाठी या अधिवेशनाने प्रयत्न केले होते.

चांदवड अधिवेशनानंतर शेतकरी महिला आघाडीने सटाणा येथे ५ सप्टेंबर १९८७ रोजी मेळावा आयोजित केला होता. तसेच महिला आघाडीने स्त्रियांचे कष्ट, शोषण कमी करणारे व तिला सन्मान व प्रतिष्ठा मिळवून देणारे अनेक कार्यक्रम आयोजित केले होते. शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत होते. कोणत्याही प्रकारचे सरकारी अनुदान न घेता बागलाण तालुक्यातील आसखेडा वाघाळी येथे लोकसहभागातून नळपाणी योजना राबविली होती. अशा स्वरुपाची नळपाणी योजना सरकारी अनुदानाची वाट न पाहता गावागावात राबविण्यात यावी. दारुच्या नशेत महिलांना होणारी मारहाण, त्यांचा हुंड्यासाठी होणारा छळ थांबला पाहिजे असे ही सूचविले होते. त्यासाठी गावागावातील दारुविक्रीची दुकानबंदी आंदोलन सुरू करण्यात आले होते.[२३] शेतकरी संघटनेने

ग्रामीण शेतकरी महिलांना प्रतिष्ठा व आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी कार्यक्रमांची आखणी करून ते कार्यक्रम पार पाडले होते. त्यामुळे चांदवड येथील महिला अधिवेशन हे शेतकरी महिला आंदोलनांचा मैलाचा दगड ठरले आहे.

शेतकरी संघटनेचे आंदोलन सुरू असतानाच्या काळात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एस. कॉँग्रेस पक्षाचे नाशिक जिल्ह्यातील तत्कालीन आमदार मालोजीराव मोगल यांनीही आंदोलन करण्याची भूमिका घेतली होती. त्यानुसार वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात आली होती. या रुपरेषेनुसार नागपूर येथे सुरू असलेल्या अधिवेशनावर लाखो शेतकऱ्यांची दिंडी न्यायची व सरकारला शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यास भाग पाडायचे असा संकल्प करण्यात आला होता. तेव्हा जळगाव ते नागपूर अशी शेतकरी दिंडी काढण्याचे निश्चित केले. दि. ०७/१२/१९८० रोजी जळगांव येथून निघालेल्या या दिंडीत शरदराव पवार, गोविंदराव आदिक, कवी ना. धों. महानोर, मालोजीराव मोगल तसेच नाशिक जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते, शेतकरी या दिंडीत सामील झाले होते.

दिंडी पोलिसांनी अडविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा शेतकऱ्यांच्या मागणीवर सभागृहाने चर्चा करावी अशी जोरदार मागणी करण्यात आली होती. दिंडीत सहभागी झालेल्या हजारो शेतकऱ्यांनी स्वत:ला शांततेच्या मार्गाने अटक करून घेतली होती. त्यामुळे या दिंडीने संपूर्ण देशभरातील शेतकऱ्यांमध्ये एक नवे चैतन्य निर्माण झाले होते. सर्वत्र शेतकरी जागृत झाला होता.

नाशिक जिल्ह्यातील सुकेणे येथे तशाच स्वरुपाचे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे विशेष म्हणजे परिसरातील अनेक शेतकरी स्त्रियांना एकत्र करून सुकेणे येथील रेल्वेच्या रुळावर बसून रेल्वे अडविण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी या आंदोलन करणाऱ्या स्त्रियांना पोलिसांनी लाठीमार सुरू करून आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तेथील रेल्वेगेटची चौकी जाळून टाकण्यात आली होती.[२४] यावरून आपणास असे दिसून येते की, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाचे भाव किती खालावलेले होते. कारण आंदोलनात शेतकरी (पुरुष) बरोबर

त्याच्या कुटुंबातील शेतीत राबणाऱ्या स्त्रियांचाही राग अनावर झालेला होता. त्यांनीही प्रत्यक्ष आंदोलनात सहभाग घेतलेला होता.

महाराष्ट्र राज्यातील कांदा उत्पादनात अग्रेसर असणारा नाशिक जिल्हा तेव्हा डिसेंबर १९८१ पासून सतत कांद्याचे भाव घसरत गेले. तेव्हा घसरत जाणाऱ्या कांद्याच्या भाववाढीसाठी नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारकडे भाववाढीसाठी निवेदने देऊनही सरकारने दखल घेतली नाही. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील लासलगाव येथील कांदा विक्री मार्केटमध्ये फेब्रुवारी १९८२ मध्ये कांदा भावाने नीच्चांक गाठला होता. त्यावेळी हवालदिल झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांची समस्या सरकारपुढे मांडण्यासाठी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भास्करराव बोरावके यांनी बेमुदत उपोषण सुरू केले होते. तेव्हा शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व भारताचे पंतप्रधान यांना तारा पाठवून कांदा भावाला संरक्षण देण्याची विनंती केली होती. परंतु सरकारने त्यांच्या या विनंतीकडे लक्ष दिले नाही. तेव्हा संघटनेने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या तहसील कचेरीवर कांदा ओतणे व धरणे धरण्याचा कार्यक्रम केला होता. तरीही सरकारने कांद्याला योग्य भाव दिला नव्हता.

इ. स. १९८२ मध्ये शरद जोशींनी बांधावरील शेतकरी रस्त्यावर उतरविला. नाशिक जिल्ह्यातील परिस्थिती वेगळी होती. शेतकऱ्यांच्या मालाला वाजवी दाम मिळावा यासारख्या महत्त्वाच्या मागण्यांसाठी शेतकरी आंदोलनाचा वणवा गावोगावी पसरत होता. टेहरे व मंगरूळ फाटा येथे रास्ता रोको जाहीर केले. लाखो शेतकरी टेहरे व मंगरुळ फाट्यावर बैलगाड्यांसह आंदोलनात उतरले. चक्का जाम आंदोलन यशस्वी झाले. शांताराम आहेर, देविदास पवार, रामचंद्र बापू, कॉ. नामा पाटील, नरेंद्र आहिरे यांनी मंगरूळ फाटा तर मालेगाव तालुक्यातील नेत्यांनी टेहरे फाटा येथे रास्ता रोको केला होता. आंदोलकांवर लाठीमार व गोळीबार करण्यात आला होता. या प्रकारात अनेक शेतकरी आंदोलक जखमी झाले होते.

शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला रास्त भाव दिला जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची लूट होते. तसेच शेतकऱ्यांना तोट्याचा शेतीचा धंदा करण्यासाठी

सरकार शेतकऱ्यांना जे कर्ज देते त्याची परतफेड शेतकऱ्यांकडून होणे शक्य होत नाही. तेव्हा शेतकऱ्यांनी या कर्जातून नादारी घोषित करून मुक्त व्हावे हा आंदोलनाचा हेतू होता. शेतकरी संघटनेने आंदोलनासाठी इ. स. १९८८ ते १९८९ या कालावधीत गावोगावी शेतकऱ्यांना कर्जमुक्तीच्या अर्जाचे वाटप करून भरून घेतले आणि न्यायालयात दाखल केले होते. संघटनेची ही न्यायालयीन लढाई बराच काळ चालली होती.

## शेतमजूर

जो मनुष्य मजुरी मिळविण्याकरीता शेतात काम करतो तो शेतमजूर होय. शेतात पीक उत्पादन, त्याचबरोबर दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, पशू संवर्धन यासारख्या शेतीला पूरक उद्योगात मोलमजुरीचे काम करणाऱ्यांना शेतमजूर म्हटले जाते. ज्याला स्वत:ची जमीन नाही, परंतु तो इतरांच्या जमिनीत काम करून पैसा मिळवितो त्याला भूमिहीन शेतमजूर म्हणून ओळखले जाते.

## १. स्थानिक मजूर

गावातील (स्थानिक) किंवा जवळच्या गावातील लोकांना मोठे शेतकरी आपल्या शेतीत कामाला लावतात. या मजुरांना दिवस रोजावर कामाला लावले जाते. त्यांच्याकडून शेतीत नांगरणे, शेतीची मशागत करणे, पेरणे, तण काढणे, पिकाला पाणी भरणे, कापणी करणे वगैरे कामे करून घेतली जातात. त्याच्या बदल्यात त्याला दिवसाची ठराविक रक्कम दिली जाते.

## २. स्थलांतरीत मजूर

नाशिक जिल्ह्याचा पश्चिम भाग डोंगराळ असल्यामुळे तेथील लोकांना वर्षभर आपल्या स्वत:च्या गावातील शेतीत काम नसते. त्या लोकांना ठराविक हंगामात आपला उदरनिर्वाह करण्याकरीता इतरत्र काम (मजुरी) शोधावी लागते. या मजुरांना कापणीच्या कामासाठी, द्राक्ष बागाच्या मळ्यात कामावर आणले जाते. त्यांना कधी रोजंदारीवर तर कधी अंगावर कामे दिली जातात. नाशिक जिल्ह्यात कसमादे पट्ट्यात व निफाड तालुक्यातील गावांमध्ये असे मजूर कामावर येतात.

शेतमजुराची आर्थिक परिस्थिती सुधारावी, त्याचे राहणीमान सुधारावे किंवा त्याला किमान वेतन मिळावे इत्यादी गोष्टींसाठी काही संघटनांनी चळवळी केल्या आहेत. इ. स. १९४५ मध्ये झालेल्या किसान सभेच्या अधिवेशनात आदिवासी लोकांची वेठबिगारी नष्ट करणे, शेतमजुरी वाढवून देणे या मागण्यांचाही समावेश करण्यात आला होता.

तसेच अलीकडच्या काळात नाशिक जिल्ह्यातील कळवण, सटाणा, मालेगांव, देवळा (कसमादे) या तालुक्यात खरीप व रब्बी हंगामात कांदा हे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. तेव्हा या पिकाच्या लागवडीपासून ते बाजारपेठेत जाईपर्यंत मोठ्या प्रमाणात मजुरांची गरज भासते. त्याकरीता नाशिक जिल्ह्याच्या पश्चिम (सुरगाणा, दिंडोरी) या तालुक्यातून मोठ्या प्रमाणात मजूर कसमादे पट्ट्यात येत असतात. तसेच कांदा व्यापाऱ्याकडेसुद्धा याच भागातील मजूर काम करतात.

## शेतकऱ्यांचा शेतीच्या पाण्यासाठी लढा

नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा व पेठ तालुक्यात उगम पावणाऱ्या नार, पार व दमणगंगा या नद्या पश्चिम वाहिनी असल्यामुळे त्याचे पाणी अरबी समुद्रात वाहून जाते. तेव्हा या पाण्याचे योग्य पद्धतीने नियोजन करण्यात आले. तर उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांना भेडसावणाऱ्या पाण्याचा प्रश्न सोडविता येईल असा येथील कार्यकर्त्यांचा आग्रह होता. या दरम्यानच्या काळात केंद्रीय जल आयोगाने इ. स. १९९५ मध्ये एक अहवाल तयार केला होता. त्या अहवालाच्या आधारे इ. स. १९९७ मध्ये पाणी वाटपाचा बृहत आराखडा तयार करण्यात आला होता. त्यावेळी महाराष्ट्र राज्याच्या वाट्याला येणारे जे पाणी येत होते ते पाणी किंवा त्यापेक्षा निम्मेसुद्धा पाणी महाराष्ट्रात अडविले जात नव्हते. ते सर्व पाणी वाहून अरबी समुद्रात जाते असा निष्कर्ष समोर आला होता. तेव्हा महाराष्ट्राला त्याच्या वाट्याचे पाणी अशी मागणी महाराष्ट्रातील विशेषत: उत्तर महाराष्ट्रातील नेत्यांनी लावून धरली होती.

महाराष्ट्रातील हा पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरीता स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची मागणी केली. तेव्हा मंत्रिमंडळात समावेशीत असलेले मा. ना. ए. टी.

पवार यांनी आग्रही भूमिका घेऊन महामंडळ स्थापन करण्याची विनंती केली. त्याच्या या मागणीचा विचार करून तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी तापी खोरे विकास महामंडळ स्थापन करण्याचा अध्यादेश काढला होता. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांनी दि. ४ डिसेंबर १९९७ रोजी अध्यादेश क्र. १८/९७ जाहीर केला होता. त्या अध्यादेशाच्या आधारे दि. १ जानेवारी १९९८ रोजी जळगाव येथे तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यालय सुरू करण्यात आले. तापी खोरे विकास महामंडळाची दोन कार्यालये स्थापन केली. त्यापैकी एक जळगाव आणि दुसरे धुळे या ठिकाणी आहे. या महामंडळाची ६१ उपविभागीय आणि १२ विभागीय कार्यालये आहेत. तापी खोरे विकास महामंडळामुळे उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यामध्ये या महामंडळाच्या माध्यमातून मध्यम, लघु प्रभाव कालवे, तलाव बांधण्यात आले. त्याच्यामुळे या भागातील जलसिंचनाचे क्षेत्रात वाढ झालेली आहे. उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार या अनेक गावातील जमिनी ओलिताखाली आलेल्या आहेत. त्याचा फायदा शेतकरी वर्गास झालेला आहे. त्यांच्या शेतीच्या उत्पादनात भर पडली आहे. या महामंडळामुळे उत्तर महाराष्ट्रातील तापी खोऱ्यातील पाण्याचे योग्य पद्धतीने वाटप व वापर करण्यासाठी मार्गदर्शन व नियोजन केले जात आहे. त्यामुळे या विभागातील वेगवेगळ्या सिंचन क्षेत्रातील प्रकल्पांना चालना मिळत आहे.

नाशिक जिल्ह्यासह संपूर्ण देशात शेतीला पाणी देण्याची परंपरागत पद्धत रूढ होती. मात्र इ. स. १९८३-८४ या काळात ही पद्धत कालबाह्य होत चालली होती. या पद्धतीमुळे जमीन आणि पाणी यांचे मोठे नुकसान होते. तेव्हा कमी पाण्यात जास्तीत जास्त शेती ओलिताखाली आणण्यासाठी या दरम्यानचे काळात ठिबक सिंचन पद्धती नव्याने प्रचलित झाली होती. तेव्हा कमी पाण्यात अधिक शेतजमिनीला सिंचनाचा फायदा करून द्यावयाचा असेल तर आपल्या राज्यातही त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. परंतु ठिबक सिंचनाचा संच बसविणे हे शेतकऱ्यांना आर्थिक आवाक्याबाहेरचे आहे. तेव्हा सरकारने शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचा संच बसविण्यासाठी अनुदान द्यावे अशी मागणी नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील

मालोजीराव मोगल यांनी विधिमंडळात केली होती.[२५] त्यांची ही मागणी रास्त असल्याने सरकारने विचारात घेऊन पुढील काळात ठिबक सिंचनाचा संच बसविण्याकरीता शेतकऱ्यांना अनुदान देण्यास सुरवात केली. ठिबक सिंचन पद्धतीमुळे पाण्याची फार मोठी बचत होऊ लागली. तसेच कमी पाण्यात शेतजमीन बागायती होऊ लागली. शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनात वाढ झाली आहे. त्यातून त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास हातभार लागला आहे. आज तर शेती क्षेत्रात ठिबक सिंचन पद्धतीने क्रांती केलेली आहे.

## भूमिहीनांचा (दलित) जमीन सत्याग्रह

सरकारच्या ताब्यात असलेल्या वन आणि पडिक जमिनी दलित (अस्पृश्य) वर्गातील भूमिहीन लोकांना मिळाव्यात. या लोकांकडे स्वत:च्या उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे त्यांच्यात गरीबी आणि गुलामी टिकून आहे. तसेच ते या देशात अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. त्यामुळे या लोकांना सरकारने त्वरित जमिनी द्याव्यात. जमिनी नसल्यामुळे या लोकांचा अन्नधान्य, बेकारी आणि आर्थिक प्रश्न सुटत नाही असे भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांना वाटत होते. दलितांना (अस्पृश्य) जमिनी मिळाव्या याकरीता त्यांनी सत्याग्रहाचा मार्ग अनुसरला होता. त्यांनी दलितांना जमिनी मिळाव्या याकरीता जुलै १९५० मध्ये मराठवाड्यात सत्याग्रह केला होता. तेव्हा त्यांना ४ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. तसेच त्यांच्या समवेत सत्याग्रहात सहभागी असलेल्या ३००० सत्याग्रही लोकांना शिक्षा करण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी इ. स. १९५४ मध्ये मराठवाड्यातील भूमीवाटप आंदोलनाचे नेतृत्व केले होते. दलित (अस्पृश्य) समाजाच्या रोजीरोटीचा प्रश्न सुटावा, ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी व्हावे याकरीता त्यांनी सरकारविरोधी हा सत्याग्रह चालविला होता.

भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी महाराष्ट्रातील भूमिहीन चळवळीचे नेतृत्व करीत होते. त्यांचे भूमिहीन चळवळीचे काम महाराष्ट्रापुरतेच मर्यादित नव्हते. तर त्यांनी हा प्रश्न सोडविण्याकरीता गुजराथ, मध्यप्रदेश, बिहार, बंगाल, तमिळनाडू,

आंध्रप्रदेश, पंजाब, कर्नाटक इत्यादी राज्यात दौरे काढून जनमत तयार केले होते. मुंबई येथील नेरेपार्क येथे सप्टेंबर १९६४ मध्ये झालेल्या सभेत भाऊराव (दादासाहेब) गायकवाड म्हणाले, ''देशात स्वातंत्र्य मिळाले असे म्हटले जाते, पण हे कसले स्वातंत्र्य? देश म्हणजे दगड धोंडे नव्हे, या देशातील जनता म्हणजे देश आणि ही जनता जर सुखी नसेल तर याला काय स्वातंत्र्य म्हणायचे?'' असा प्रश्न त्यांनी केला होता. भारत स्वतंत्र झाला तरीही अन्नधान्याची समस्या सुटलेली नव्हती. परकीय राष्ट्रातून हजारो टन अन्नधान्य आयात करावे लागत होते. ही बाब तत्कालीन सरकारला लाजवणारी होती. या देशात तर कितीतरी कोट एक जमीन पडिक आहे. तेव्हा ही जमीन जात, धर्म, पंथ, विचारात न घेता भूमिहीन गरीब शेतमजुरांना कसण्यास दिली गेली, तर या जमिनीत अन्नधान्य पिकेल. त्यातून या देशाची अन्नधान्याची समस्या सुटेल आणि देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी होईल. यासाठी जिल्हाधिकारी, तहसीलदार यांच्या कार्यालयावर नेलेल्या मोर्चाने शासनावर काहीही परिणाम होत नाही. याची जाणीव झाल्यानंतर १ ऑक्टोबर १९८४ रोजी दिल्ली मोर्चाचे आयोजन केले होते. परंतु दरम्यानच्या काळात दुर्दैवी घटना घडली. रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष एम. शिवराज यांचे निधन झाले. तेव्हा त्यांचे पार्थिव दिल्ली येथून त्यांच्या गावी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी नेले. तेथून ते पुन्हा दिल्ली येथे परत आले. त्यावेळी दिल्लीमध्ये मोर्चात सहभागी होण्याकरीता संपूर्ण भारतातून मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते आले होते. तेव्हा पूर्वी ठरल्याप्रमाणे १ ऑक्टोबर १९८४ रोजी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात सर्व भागातील भूमिहीन व कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्यावेळी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील मोर्चाच्या शिष्टमंडळाने लोकसभेचे सभापती हुकुमसिंग यांची भेट घेऊन १० मागण्यांचे निवेदन दिले होते. तसेच त्याची प्रत तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री व गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांना दिली होती. त्यानंतर मोर्चेकऱ्यांचे सभेत रुपांतर झाले होते. सभेचे अध्यक्ष भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांचे भाषण झाले होते.

भूमिहीनांना जमीन मिळावी याकरीता दिल्ली येथे काढलेल्या मोर्चाच्या माध्यमातून देशभर झालेली जागृती व त्याची तीव्रता लक्षात घेऊन तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांची भेट घेण्याचे ठरविले. त्यानुसार २ नोव्हेंबर १९६४ रोजी बैठक झाली. भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी बैठकीला जाताना आपल्याबरोबर बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, भैयासाहेब आंबेडकर यांना नेले होते. तेव्हा बैठकीत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांना सबुरीने घ्या असा सल्ला दिला होता. त्यावेळी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड आपले मत मांडताना म्हणाले, ''आम्ही खूप वाट पाहिली आता फार तर ६ डिसेंबर पर्यंत वाट पाहू अन् नंतर नाईलाजास्तव ठरल्याप्रमाणे देशभर सत्याग्रहाला सुरवात होईल.'' असे स्पष्ट केले होते. तरी पण सरकार भूमिहीनांच्या प्रश्नाबाबत फारसे गंभीर नसल्याचे लक्षात आले. तेव्हा भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याकरीता १५ नोव्हेंबर १९६४ रोजी कमिटीची दिल्ली येथे बैठक घेतली होती. या बैठकीतील चर्चेअंती आपापल्या प्रांतात सत्याग्रहाच्या तयारीस लागण्याचा आदेश पक्षाध्यक्ष या नात्याने भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी दिला होता. यानुसार ६ डिसेंबर १९६४ रोजी सर्व प्रांतात मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह सुरू झाला. आपल्या मांडलेल्या १० मागण्यांबाबत देशव्यापी सत्याग्रह सुरू केला होता. या सत्याग्रहामुळे सरकारपुढे अभूतपूर्व संकट निर्माण झाले होते. सत्याग्रहाचा वाढता जोर आणि त्याचे विशाल स्वरूप पाहिल्यावर सरकारला या बाबतीत वाटाघाटी करून निर्णय घेणे भाग पडले. तेव्हा ३० जानेवारी १९६५ रोजी वाटाघाटी सुरू झाल्या. सत्याग्रहींच्या प्रमुख मागण्या मान्य झाल्यावर सत्याग्रह मागे घेण्याची सत्याग्रहींनी तयारी दर्शविली. त्याकरीता ३ व ४ जानेवारी १९६५ रोजी अमरावती येथे कार्यकारिणीची बैठक झाली होती. याच बैठकीत सत्याग्रह मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सत्याग्रहात सुमारे ३ लाख ६० हजार सत्याग्रहींनी सहभाग घेतला होता. भूमिहीन सत्याग्रहाची तयारी सुरू असताना २ नोव्हेंबर १९६४ रोजी मुंबई येथे भाऊराव (दादासाहेब) गायकवाड म्हणाले, ''६ डिसेंबर रोजी आम्ही पडिक जमिनीवर शेती करण्यास

सुरवात करणार आहोत. सरकार बदलण्यासाठी किंवा सरकारला त्याच्या कार्यात विनाकारण अडथळा निर्माण करणे हा आमचा या लढ्याचा उद्देश नाही.'' यावरून असे स्पष्ट होते की, सत्याग्रहाचा उद्देश म्हणजे सर्वसामान्य भूमिहीन जनतेचे प्रश्न सोडविण्याकरीता सत्याग्रह केला होता.

भूमिहीनांचा सत्याग्रह सुरू झाला त्यावेळी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी सत्याग्रहाबद्दलची भूमिका मांडतांना सरकार व विरोधकांना सडेतोड उत्तर देताना म्हणाले, ''सत्याग्रहास सुरूवातीला सर्वांनी सहानुभूती दाखविली; परंतु चळवळीचा नारा जसजसा वाढू लागला तसतसा काही व्यक्तिंनी चळवळीविषयी व सत्याग्रहाविषयी गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केला.''[२६] सत्याग्रहीवर भलतेसलते आरोप करून चळवळ बदनाम करण्याचा प्रयत्न चालविला आहे. तसेच पुढे म्हणाले, आजचा हा लढा या देशातील दलित, मागासलेले दडपलेल्या लोकांनी आपल्या उन्नतीसाठी सुरू केला आहे. या वर्गाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारावी यासाठी आहे. तेव्हा कृपा करा नि आपला तोल सुटू देऊ नका, खेड्यातील आम जनतेला या लढ्याविरुद्ध उगीच कलुसीत करून अधिक बेबंदशाही माजवू नका, हेच प्रेमाचे सांगणे आहे. त्याचे परिणाम देशाला दीर्घकाळ भोगावे लागतील अशी मला भीती आहे. दडपलेला वर्ग यापुढे आपली कोणाचीही दडपेगिरी सहन करू इच्छित नाही. मेलेले मेंढूर आगीला भीत नाही, म्हणून यात काय ते समजा. अशाप्रकारे समजुतीचा सल्ला महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांना दिला होता. त्याचे कारण म्हणजे त्यांनी वृत्तपत्रात मुलाखत देऊन भूमिहीन सत्याग्रहींवर आरोप केले होते.

भूमिहीन सत्याग्रहींनी सुरू केलेल्या सत्याग्रहाच्या दरम्यानच्या काळात २ ते ४ जानेवारी १९६५ कालावधीत मध्यवर्ती कृती समितीची बैठक नागपूर येथे भरविण्यात आली होती. त्यावेळी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांची वार्ताहरांनी मुलाखत घेतली असता ते म्हणाले, ''भूमिहीन सत्याग्रहाच्या निर्णयाबाबत आपला पक्ष सरकारबरोबर केव्हाही वाटाघाटी करण्यास तयार आहे. भारताच्या

राज्यघटनेनुसार पददलित समाजाच्या न्याय्य मागण्या व तक्रारी याचे योग्यरित्या निवारण करण्याचा हेतू आहे. या सत्याग्रहात पंगा व राज्यामध्ये संयुक्त समाजवादी पक्ष व कम्युनिस्टांच्या दोन्ही पक्षांनी व काही जनसंघाच्या नेत्यांनी या सत्याग्रहात सहभाग घेण्याची इच्छा दाखविली. विदर्भात शेतकरी, कामगार पक्षाने जाहीररित्या पाठिंबा दिला आहे. त्यामुळे लोकसभेच्या येत्या अर्थसंकल्पाच्या अधिवेशनाअगोदर या मागण्यांसंदर्भात सरकारने समाधानकारक उत्तर दिले नाही तर अधिवेशनात पक्षातर्फे आम्ही मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव मांडू.'' असा इशारा दिला होता. परंतु महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी आपल्या विश्वासातील काही लोकांना हाताशी धरून हा देशव्यापी सत्याग्रह मोडून काढण्याचा प्रयत्न चालविला होता. यावरून आपणास असे दिसून येते की, भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी आदिवासी, पददलित, दलित, भूमिहीन, गरीब जनतेला जागृत करून न्याय्य हक्कासाठी सत्याग्रह केला. रोजी-रोटीचा प्रश्न सोडविण्याकरीता आर्थिक व सामाजिक शोषणातून मुक्तता करण्याकरीता हा सत्याग्रह सुरू केला होता.

## दलित चळवळ

हिंदू समाजातील जातिसंस्थेत सर्वत्र जन्मजात विषमता, उच्चनीचभाव, अधिकारभेद आहेत. त्या काळातील शूद्रवर्णातील निरनिराळ्या जातीतील बहुसंख्य लोक आर्थिक, सामाजिक परिस्थितीने गांजलेले होते. त्यांची दुरावस्था आणि दलित समाजाची दैन्यावस्था याच्यात गुणात्मक फरक होता. काही जाति परमेश्वराच्या संकेताने पवित्र म्हणून पूज्य भू देव म्हणून त्यांना गुरू आणि प्रथम पूजेचा मान होता. काही जाति अत्यंत अपवित्र म्हणून अस्पृश्य. ही प्रथा हिंदूंच्या मनात पिढ्यान्‌पिढ्या दृढमूल झाली होती. दलित समाजातील माणसाचा स्पर्श झाला, सावली पडली तरी त्याचा विटाळ होत होता. सार्वजनिक विहिरी, देवळे, शाळा, व्यवसाय यामध्ये त्यांना बंदी होती. दासवृत्ती आणि हीन दर्जाची मानण्यात आलेली गलिच्छ कामे त्यांच्यावर शतकानुशतके लादली गेली होती. शारीरिक जुलूम आणि छळ त्यांना पावलोपावली सोसावा लागत होता. सतत मिळणाऱ्या तुच्छतेच्या वागणुकीमुळे त्यांची मने मारली

गेली होती. ''चोखा उभा तो बाहेरी । उद्यासाठी पदर पसरी ।।'' अशी केविलवाणी अवस्था रोजचीच होती. माणसांची इतकी मानहानी होत होती. या मानहानीला अनेकांना सामोरे जावे लागत होते.

भारतात ब्रिटिशांनी आपली सत्ता मजबूत केल्यावर शिक्षण आणि आरोग्य या मार्गातून समाजसेवा करण्यास आरंभ केला होता. त्यामुळे दलितांना (अस्पृश्यांना) त्यांच्या मुलांना शिक्षण आणि त्यांच्या बोर्डिंगमध्ये निवासाची सोय झाली होती. यामुळे दलित (अस्पृश्य) बांधव ब्रिटिशांच्या बाजूला झुकू लागले होते. तसेच दलित (अस्पृश्य) आणि बहुजन समाजाला वैदिक ब्राम्हण लोक धर्मशास्त्राचा धाक दाखवून धार्मिक क्रियाकर्मात नाडून त्यांच्या नावाने मोठ्या प्रमाणात दक्षिणा घेत असत. त्यावेळी बहुजन समाजातील लोकांना अशा अवस्थेतून वर काढण्याकरीता धर्माचे खरे स्वरूप समजावून देण्यासाठी व त्यांना शिक्षण मिळावे याकरीता २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा ज्योतीराव फुले यांनी पुणे येथे ''सत्यशोधक समाज'' नावाच्या समाजाची स्थापना केली होती.[२७]

महात्मा जोतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे कार्य जेव्हा सुरू झाले त्यावेळी धर्माच्या नावाखाली गांजलेली बहुजन समाजातील अनेक माणसे सत्यशोधक समाजाकडे आकर्षिली गेली. तसेच या समाजाचे काम तळागाळातल्या लोकांपर्यंत पोहचविण्याकरीता जनमानसात जागृती निर्माण करण्याकरीता त्यांना वर्तमानपत्राची गरज वाटू लागली होती. तेव्हा सत्यशोधक समाजाचे प्रमुख कार्यकर्ते कृष्णराव भालेकर यांनी इ. स. १८७७ मध्ये *''दीनबंधू''* नावाचे साप्ताहिक सुरू केले होते. तसेच सत्यशोधक समाजाच्या कार्याचा प्रभाव पडलेले डी. आर. भोसले हे पोलीस खात्यात दुय्यम निरीक्षक म्हणून नोकरीस असलेले गृहस्थ नाशिक जिल्ह्यात बदली होऊन आले. त्यावेळी त्यांनी गणपतदादा मोरे (पिंपळगाव ब.) यांना मदतीला घेऊन नाशिक जिल्ह्यात सामाजिक समतेचा प्रचार करण्यास सुरूवात केली होती. या दरम्यान काळात १६ एप्रिल १९२० रोजी छत्रपती शाहू महाराज हे नाशिक येथे उदोजी मराठा बोर्डिंगच्या पायाभरणीच्या

कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी दलितांसाठी (अस्पृश्य) उभारण्यात येणाऱ्या वसतिगृहाची कोनशिला आपल्या हस्ते बसविली होती. त्यावेळी केलेल्या भाषणात ते म्हणाले ''जातिभेद असू द्या, पण जातिद्वेष नको,'' असे म्हणणारे पुष्कळ आहेत. हे मत प्रामाणिकपणाचे असल्यास त्यांच्या अज्ञानाची कीव केली पाहिजे. कारण जातिभेदाचे कार्य जातिद्वेष हे आहे. तेव्हा जातिभेद नाहीसा केला पाहिजे. हिंदुस्थानला जी गुलामगिरी हजारो वर्षापासून भोगावी लागत आहे तिचे मुख्य कारण हा जातिभेद आहे. ''मी असेही मुर्ख लोक पाहिले आहेत की, जे आपल्या बंधु भगिणींना पशूपेक्षाही नीच समजतात. पण सर्व लोकांचे आपण पुढारी आहोत असे भासून तुमचे चांगले करू अशा थापा मारण्यास त्यांना शरम वाटत नाही.'' यातून छत्रपती शाहू महाराजांनी समतेचा संदेश देऊन जातिभेद नाहीसा करण्यासाठी सत्यशोधक चळवळीत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली होती. छत्रपती शाहू महाराजांची ही प्रेरणा आणि डी. आर. भोसले यांचे मार्गदर्शन यामुळे गणपत दादा मोरे यांना सत्यशोधकी जलसा काढण्याची प्रेरणा मिळाली होती.

नाशिक जिल्ह्यातील कसबेसुकेणा या गावाची यात्रा असताना भीमराव कर्डक या दलित (अस्पृश्य) समाजातील व्यक्तिने गणपत दादा मोरे यांचा जलसा पाहिला होता. [२८] याच धर्तीवर पुढे त्यांनी आंबेडकरी जलसा निर्माण करून गावागावात या माध्यमातून जनजागृतीचे काम सुरू केले होते. तत्कालीन समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक गुलामगिरीत अडकलेल्या दलित (अस्पृश्य) वर्गाला त्यातून मुक्त करण्याचा प्रयत्न छत्रपती शाहू महाराजांनी केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी दलितांच्या (अस्पृश्यांच्या) दु:खाला वाचा फोडण्याकरीता *'मूकनायक'* नावाचे साप्ताहिक काढले होते. त्याकरीता कोल्हापूर जिल्ह्यातील माणगाव येथे २२ मार्च १९२० रोजी महाराष्ट्रातील दलित (अस्पृश्य) लोकांची परिषद आयोजित केली होती. तेव्हा या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर छत्रपती शाहू महाराज हे प्रमुख वक्ते होते. या परिषदेत शाहू महाराजांनी सर्व उपस्थितांना आवाहन केले की सर्व महार लोक वतनाच्या मागे लागले आहेत.

त्यामुळे मला वेठबिगारी कमी करता येईना. त्यामुळे सर्व बलुतेदार व महार वतनदारांनी लहानलहान वतने व बलुते यांचे मागे न लागता सोडून द्यावी. याला अनुसरून त्यांनी वतन खालसा केली होती. त्यामुळे अनेक दलित (अस्पृश्य) लोक वरिष्ठ वर्गाच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त झाले होते. तसेच येथून पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने दलित (अस्पृश्य) नेतृत्त्व पुढे आले होते. तसेच दलितांचे पुढारी म्हणून प्रसिद्धीस आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या दलित (अस्पृश्य) जातीच्या लोकांसाठी चळवळ, लढा उभारत होते त्यांची अनेक शतकांपासून मानहानी झालेली होती. त्यांना चळवळीकरीता उभे करणे हे फार अवघड काम होते. हिंदू धर्मात असलेल्या विषमतेविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहितात, ''हिंदू धर्मात असलेली विषमता जितकी अनुपत आहे तितकीच ती निंदास्पदही आहे. कारण विषमतेनुरुप होणाऱ्या परस्परांच्या व्यवहाराचे स्वरुप हिंदू धर्माच्या शीलाला शोभण्यासारखे खास नाही. हिंदु धर्मात समाविष्ट होणाऱ्या जाति उच्च नीच भावनेने प्रेरित झालेल्या आहेत, हे उघड आहे. हिंदु समाज एक मनोरा आहे व जात म्हणजे त्याचा मजलाच होय. परंतु या मनोऱ्याला शिडी नाही. ज्या मजल्यात त्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्याचा इसम तो कितीही लायक असला तरी त्याला वरच्या मजल्यात जाता येत नाही. वरच्या मजल्यातला इसम मग तो कितीही 'नालायक' असो त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कोणाची प्रज्ञा नाही. रोटी-बेटी व्यवहाराच्याअभावी कायम झालेल्या परकेपणात स्पृश्यास्पृश्य भावनेने इतकी भर टाकली आहे की, या जाती हिंदू समाजात असून समाजाबाहेर आहेत, असेच म्हटले पाहिजे. या व्यवस्थेमुळे हिंदू धर्मियांचे ब्राह्मण, ब्राह्मणेतर व बहिष्कृत असे तीन वर्ग होतात आणि या विषमतेचा सर्वात जास्त परिणाम बहिष्कृत वर्गावर होतो.'' डॉ. बाबासाहेब यांनी अस्पृश्यता निवारणासाठी आपले आयुष्य घालविले. हिंदू धर्मातील दलित (अस्पृश्य) वर्गाला समानतेचा हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी इ. स. १९२० मध्ये *'मूकनायक'* साप्ताहिक काढले. त्याच्या अग्रलेखातून

दलितांच्या तत्कालीन आर्थिक, सामाजिक आणि राजकीय समस्या मांडल्या होत्या. त्या सोडविण्याकरीता प्रयत्न केले. त्यांनी दलित समाजात चळवळ रुजविली.

दलित (अस्पृश्य) वर्गातील जनतेला जागृत करण्याचे आणि संघटित करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केले होते. याकरीता त्यांनी मुंबई शहरातील परळ येथील दामोदर ठाकरसी सभागृहात एक सभा घेतली. या सभेत झालेल्या चर्चेतून एक ठराव पारीत करून त्यानुसार २० जुलै १९२४ रोजी ''बहिष्कृत हितकारिणी सभा'' स्थापन केली.[२९] या सभेच्या माध्यमातून त्यांनी अस्पृश्यांमध्ये स्वावलंबन, स्वाभिमान व आत्मोद्धार याची शिकवण देऊन परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. तसेच या सभेला सवर्ण (वरच्या) वर्गातील लोकांनीही सहकार्य करावे. कारण हा प्रश्न सर्व समाजाचा आहे. त्याच्याकडे दुर्लक्ष केले तर आपला देश पंगू होईल असा इशारा देऊन आपल्या कार्यास सुरूवात केली होती. इ. स. १९२५ मध्ये डॉ. आंबेडकर नाशिकला प्रथम आले. भाऊराव (दादासाहेब) गायकवाड इत्यादींच्या सहकार्याने अस्पृश्य समाज जागृतीस हात घातला. त्यासाठी त्यांनी सहभोजनाचे तीन कार्यक्रम घडवून आणले. त्यात १९२६ मध्ये पहिला सहभोजनाचा कार्यक्रम घडवून आणला.

नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील एका महिलेचा खून झालेला होता. त्याची केस नाशिक येथील न्यायालयात चालविली जात होती. तेव्हा ह्या खटल्याचे वकीलपत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतले होते. त्यावेळी ह्या खटल्याच्या तारखेकरीता इ. स. १९२८ मध्ये ते नाशिक येथे आले. तेव्हा त्यांनी आपला मुक्काम नाशिक मधील छत्रपती शाहू बोर्डींगमध्ये केला. यावेळी त्यांची नाशिक जिल्ह्यातील तळेगाव (ता. दिंडोरी) येथील मुळचे रहिवाशी आणि छत्रपती शाहू बोर्डिंगचे सुपरिटेंड म्हणून कामकाज सांभाळणारे भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांची ओळख झाली. त्यावेळी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांच्या अंगी असणारी हुशारी, साहस, जिद्द, महत्त्वाकांक्षा आणि लोकसेवेची तळमळ हे गुण त्यांनी पारखून घेतले

होते. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाऊराव गायकवाड यांच्यात समाजजागृतीबद्दल मौलिक अशा स्वरूपाची चर्चा झाली होती.

नाशिक जिल्ह्यातील तळेगाव (दिंडोरी) येथे भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांची स्वत:च्या मालकीची शेती होती. त्यांच्या या शेतीत ऊसाचे पीक घेतले जात होते. तेव्हा इ. स १९२६ मध्ये त्यांनी आपल्या शेतातील ऊसाची विक्री न करता स्वत: गुळ तयार करण्याचे गुऱ्हाळ लावून गुळ तयार केला. तो सर्व तयार केलेला गुळ त्यांनी नाशिक शहरात विक्रीकरीता आणला. परंतु तो गुळ एका दलित (अस्पृश्य) वर्गातील कुटुंबाने तयार केलेला आहे. त्यामुळे तेथे तो गुळ कोणीही खरेदी केला नाही. तेव्हा तो सर्व गुळ घोटी येथील बाजारपेठेत विक्रीकरीता नेण्यात आला. त्या ठिकाणीही तो विकला गेला नाही. त्यामुळे भाऊराव गायकवाड यांनी तो सर्व गुळ आपल्या दलित (अस्पृश्य) वर्गातील लोकांना फुकटात वाटून दिला होता. अशा स्वरूपाचा भेदनीतिचा कटु अनुभव त्यांना त्या काळात आला होता. त्यानंतर इ. स. १९२६ मध्ये गोकुळ अष्टमीच्या दिवशी नाशिक शहरातील लक्ष्मीनारायण मंदिरात रात्री भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. या भजनाच्या कार्यक्रमाच्या वेळी शिवराम मारू या भंगी व्यक्तिच्या घरून आलेले दूध भाऊराव गायकवाड यांनी पिले होते. त्यामुळे भाऊराव गायकवाड विटाळले गेले अशा स्वरूपाचा गैरसमज त्यांच्याच वर्गातील लोकांनी करून घेतला. त्यांच्यावर चांगलेच चिडले होते. तेव्हा लोकांमधील निर्माण झालेला हा गैरसमज दूर करण्याकरीता गावोगावी जाऊन सभा घेऊन जमतील त्या लोकांना ते उपदेश करीत की, आपण मृत जनावरांचे मांस खाणे सोडलेच पाहिजे, उष्टे, शिळे अन्न भीक म्हणून मागणे सोडले पाहिजे, आपली तथाकथित वतने नष्ट झाली पाहिजेत.[३०] यातून त्यांनी दलित वर्गातील लाचारी घालवून त्यांना जागृत करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्या या वर्तणुकीचा दलित (अस्पृश्य) लोकांना खूप राग आला होता. गावातील मेहत्तेर लोक तर फारच नाराज झाले होते. त्यावेळी इ. स. १९२८ मध्ये तळेगाव येथे एका दलित (अस्पृश्य) व्यक्तिच्या घरी तेराव्याचा कार्यक्रम होता. तेव्हा संधी साधून

तेराव्यांच्या कार्यक्रमाच्या जेवणाच्या आधी सभा घेऊन भाऊराव गायकवाड यांना वाळीत टाकण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करायचा नाही असे ठरविण्यात आले. तेव्हा हे सर्व जाहीर करणारी व्यक्ती मेहत्तरे यांना भाऊराव गायकवाड यांनी विचारणा करून सर्व गैरसमज दूर केला होता. तसेच मेहत्तरे यांना आपण दिलेला निर्णय मागे घेण्यास भाग पाडले होते. एवढे मोठे धाडस त्यांनी त्यावेळी चालीरितीच्या बंधनात गुरफटलेल्या समाजाच्या विरोधात जाऊन समाजातील लोकांचे वर्तन चुकीचे कसे आहे. याबद्दल असलेला गैरसमज दूर केला होता. भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी गुळ घरी तयार करायचा एवढी सुधारणेची कल्पना मांडून थांबले नाहीत तर त्यांनी नाशिकला व ओढ्याला स्वत:च्या घरी मांग, गारूडी, भंगी या सर्व जातिधर्मातील लोकांच्या बरोबरीने चहा घ्यावयाचा. त्याच्याही पुढची पायरी म्हणजे त्यांच्या पंगतीला जेवायला बसायचे. यातून त्यांनी समाजाला हळूहळू सुधारणेकडे नेण्याचा प्रयत्न केला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १ जानेवारी १९२७ रोजी कोरेगाव येथे सभा घेतली होती. या सभेत त्यांनी दलित (अस्पृश्य) वर्गावर समाजातील सवर्ण वर्गाकडून टाकण्यात आलेल्या निर्बंधाबद्दल चर्चा करून त्याविरोधी चळवळ करण्याची घोषणा केली. तसेच याच सभेत महाड येथे चवदार तळ्यावर करण्यात येणाऱ्या सत्याग्रहाबद्दल विचार विनिमय केला गेला होता. महाड येथील चवदार तळ्यावर करण्यात येणाऱ्या सत्याग्रहाकरीता सत्याग्रहीची नाव नोंदणी सुरू असताना नाशिक जिल्ह्यातून भाऊराव गायकवाड यांनी आपले नाव नोंदले होते. तसेच सत्याग्रहाकरीता महाड येथे जाताना आपल्या समवेत विठ्ठलराव रणखांबे यांना नेले होते. या ठिकाणच्या मिरवणुकीच्या नियोजनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

## स्वाभिमान संरक्षण परिषद

दलित (अस्पृश्य) जनतेला खेडोपाडी, ग्रामीण भागात त्याची जी मानहानी व मानवी हक्कासाठी ससेहोलपाट केली जात होती. त्याची ही ससेहोलपाट थांबविणे, निषेध करणे, या लोकांमध्ये स्वाभिमान यावा, समाजात मानाने जगता यावे. याकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'महार वतनदारी' पद्धती बंद झाली पाहिजे.

याकरीता त्यांनी चळवळ सुरू केली होती. या चळवळीविषयी संपूर्ण नाशिक जिल्ह्यात जागृती करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १६ सप्टेंबर १९२८ रोजी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांना पत्र लिहिले होते.[३१] तेव्हा हे काम भाऊराव (दादासाहेब) गायकवाड खेडोपाडी जाऊन करू लागले होते. त्यातून नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात असलेल्या चित्तेगाव येथे २६ मे १९२९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली 'स्वाभिमान संरक्षण परिषद' आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत आपली कर्तव्ये, आपले हक्क इत्यादी विषयांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गदर्शन केले होते.[३२] या परिषदेला सुमारे ६००० लोक उपस्थित होते. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, ''जन्माने अस्पृश्य मानलेल्या समाजात समावेश झाल्यामुळे उच्चवर्णीय समाजबांधवापेक्षाही अंगी अलौकीक गुण असूनही काही करता येत नाही. या परिस्थितीत आपणास आपल्या स्वाभिमानपूर्वक ध्येयास किंवा कार्यास बाधा येत आहे. देवालय प्रवेश, तळे, विहीरी इत्यादी ठिकाणी प्रवेश करण्यास अस्पृश्यांना मनाई केली जाते. त्यांच्यावर अत्याचार केले जातात. अशा हीन परिस्थितीतून मुक्त होण्यासाठी अस्पृश्य बांधवांना आपण स्वाभिमान जागृत करून माणुसकीच्या हक्कासाठी निष्ठांचा लढा दिला पाहिजे. वतनामुळे महार स्वाभिमानशून्य झाले आहेत. ही पद्धती त्याच्या प्रगतीला मोठा अडसर आहे. यामुळेच त्यांना मानहानीचे जीवन जगावे लागत आहे. त्यासाठी ही पद्धत नष्ट झाली पाहिजे. भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी चित्तेगाव येथील परिषदेनंतरही नाशिक जिल्ह्यातील खेड्यापाड्यात जाऊन वतन प्रश्नांसंबंधी महत्त्व पटवून दिले होते. तसेच सिन्नर येथेही सभा घेतली होती.

दलितांना (अस्पृश्यांना) देण्यात आलेल्या जमिनी महसूलातून वगळण्यात आल्या होत्या. त्याऐवजी त्या जमिनी (वतन) न देता त्या व्यक्तीला सरकार व ग्रामस्थ यांची जी नोकरी करावी लागत होती त्या बदल्यात इतर सरकारी नोकरांप्रमाणे मासिक वेतन मिळावे.[३३] अशी मागणी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी केली होती. त्यांच्या या प्रयत्नांना शेवटी यश आले होते. भारताला

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इ. स. १९५८ मध्ये वतने रद्द करण्याचा कायदा करण्यात आला. तसेच या लोकांना दरमहा पगार देण्यात यावा असे निश्चित करण्यात आले. आज ग्रामीण भागात गावपातळीवर काम करणारे कोतवाल ते हेच लोक आहेत.

## काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह (नाशिक)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित वर्गात अस्पृश्यतेची चळवळ रुजविली होती. जोपर्यंत या वर्गाला समानतेने हक्क मिळत नाहीत तोपर्यंत त्यांची प्रगती होत नाही. याकरीता त्यांनी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते सत्याग्रह म्हणजे ''ज्या कार्यापासून लोकसंग्रह होत आहे ते सत्कार्य आहे व त्यासाठी केलेला आग्रह त्यास सत्याग्रह म्हणावे.'' या विषयी मतभेद होणे शक्य आहे. कारण एखाद्याला हे कार्य लोकसंग्रहाचे वाटेल तर दुसऱ्याला लोकविग्रहाचे वाटेल. म्हणून या दोन तत्त्वांचा आधार घेऊन, जेथे समभाव आहे तेथे लोकसंग्रह आहे व जेथे लोकसंग्रह आहे तेथे सत्कार्य आहे आणि अशा कार्यसिद्धीचा आग्रह तो सत्याग्रह होय.'' आंबेडकरांनी दलितांना समानता मिळविण्याचा आग्रह धरला होता. त्यांची मागणी म्हणजेच सत्याग्रह होय. त्यांचे ध्येय दलित समाजाला उच्चवर्णियांच्या गुलामगिरीतून मुक्त करणे हेच होते. अस्पृश्यता नष्ट करून दलितांच्या प्रगतीचा मार्ग खुला करण्यासाठी जीवनभर संघर्ष करीत राहिले.

सत्याग्रहाच्याबाबत पहिली महत्त्वाची बाब म्हणजे सत्य कोणते असत्य कोणते हे ठरविणे हा होय. कारण सत्य म्हणजे काय हेच ठरविता आले नाही तर सत्याग्रहाची इमारत केव्हाही डळमळीत होऊ शकते. आपला आग्रह सत्याग्रह आहे किंवा नाही याविषयी जर सत्याग्रही व्यक्तिची खात्री नसेल तर त्याच्या हातून सत्याग्रह पार कसा पडणार? कारण सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तीच्या अंगी आत्मबल असावे लागते. म्हणून सत्य म्हणजे काय याची खूण सत्याग्रही माणसाला पटणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्याग्रह कोणाविरूद्ध करायचा याविषयी स्पष्ट करताना म्हटले, ''अस्पृश्यांची जी समान हक्काची मागणी आहे ती स्पृश्य लोकांकडे आहे. कारण अस्पृश्यांचे न्याय हक्क देण्यास कोणी विरोध करीत असतील

तर ते स्पृश्य आहेत. दलितांना (अस्पृश्यांना) जो सत्याग्रह करावयाचा आहे तो समान हक्कांसाठी आहे. समान हक्कांच्या आग्रहासाठी त्यांना सत्याग्रह करावा लागेल. हिंदू समाजरचनेत दलितांना सर्व प्रकारचे नागरी हक्क नाकारले होते. देवाचे दर्शन घेण्यास, प्रत्यक्ष पूजाअर्चा करण्यास, उपासना करण्यास मज्जाव, सार्वजनिक पाणवठे वापरण्यास बंदी या विरोधी सत्याग्रह करण्याची गरज त्यांना वाटत होती.

भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांचा वाढलेला जनसंपर्क व ते नाशिक जिल्ह्यातील दलित वर्गात सामाजिक जागृतीकरीता करीत असलेले प्रयत्न यास्तव काही सवर्ण व्यक्तिंनी त्यांना शाहू बोर्डींगच्या अधीक्षक पदाचा राजीनामा देण्यास भाग पाडले. तेव्हा दलितांवर होत असलेल्या अन्याय, अत्याचार विरोधी जोराने चळवळ सुरू केली होती.

दलितांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्याकरीता बंदी होती. त्याप्रमाणे त्यांना हिंदूंच्या मंदिरात प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आलेली होती. दलितांनी (अस्पृश्य) मंदिरात प्रवेश केल्यास मंदिर बाटणार असा गैरसमज त्या काळात समाजात निर्माण झालेला होता. त्यामुळे त्यांना मंदिरात प्रवेश करू देत नव्हते. तेव्हा दलितांना आपल्या हक्काने व मानाने जीवन जगता यावे याकरीता इ. स. १९२७ पासून हिंदूंच्या मंदिरामध्ये दलितांना (अस्पृश्य) सवर्णांना इतकेच समान हक्क असावेत अशी मागणी करण्यात येत होती. तसेच त्याकरीता त्यांनी मंदिर प्रवेशाची चळवळ सुरू केली होती. त्यांच्या या चळवळीची सुरूवात अमरावती येथील अंबादेवीच्या मंदिरापासून झाली होती.[३४] त्याच्यानंतर पुण्यातील पर्वती येथे सत्याग्रह करण्यात आला होता.

नाशिक येथील काळाराम मंदिर इ. स. १७८२ मध्ये सरदार ओढेकर यांनी सुमारे २३ लाख रुपये खर्च करून बांधलेले आहे. या मंदिरात दलितांना (अस्पृश्यांना) प्रवेश नव्हता. त्यामुळे या मंदिरात प्रवेश करण्यासाठी सत्याग्रह करण्याच्या कार्यक्रमाची आणखी करण्याकरीता १७ सप्टेंबर १९२९ रोजी नाशिकजवळील देवळाली गावात दलितांचा एक संघ स्थापन करण्यात आला.

त्यानुसार सत्याग्रह समितीत नांदूरवैद्य येथील संभाजी येसू रोकडे यांची अध्यक्ष व भाऊराव (दादासाहेब) कृष्णराव गायकवाड यांची चिटणीस म्हणून निवड करण्यात आली होती.[३५] या सत्याग्रह चळवळीला पाठिंबा देण्यासाठी नाशिकरोड येथे १८ जानेवारी १९३० रोजी बैठक झाली होती. या बैठकीला ७५ लोक हजर होते. तसेच निफाड येथे १४ जानेवारी १९३० रोजी जी सभा झाली त्या सभेला ८०० लोक उपस्थित होते. त्यातून सत्याग्रह चळवळीची व्याप्ती वाढत गेली होती.

नाशिक शहरातील मंदिर प्रवेशाकरीता सत्याग्रह करावा यासाठी भाऊराव गायकवाड, अमृतराव रणखांबे, सावळेराम दाणी, टी. बी. काळे इत्यादी लोकांनी एकत्र येऊन सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत जाणून घेण्याकरीता भाऊराव गायकवाड यांनी पत्र लिहून कळविले होते. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० फेब्रुवारी १९३० रोजी भाऊराव गायकवाड यांना पत्र लिहून कळविले की, सत्याग्रहाची योजना कशी आखता हे जाणून घेण्यासाठी आपल्या कार्यकारिणी समितीला प्रत्यक्ष भेटले पाहिजे. ते आपण केव्हा करू शकतो? समितीचे सदस्य मुंबईला येऊ शकतात काय? ''आपण सत्याग्रह केलाच पाहिजे. कारण कोणतेही हक्क आपणास स्वस्थ बसून स्पृश्य हिंदुकडून मिळतील असा गैरसमज करून घेणे चुकीचे होईल. तुम्ही हे जे पाऊल उचलत आहात त्यास माझा व्यक्तिश: पूर्ण पाठिंबा आहे. मात्र शांत व सनदशीर मार्गानेच आपण सत्याग्रहाचा मार्ग चोखाळला पाहिजे. शिवाय सत्याग्रह किती दिवस किती वर्ष करावा लागेल हे आज नक्की सांगता येणे अशक्य आहे. सनातन्यांचे हृदय परिवर्तनाचे काम महाकठीण आहे. तेव्हा पैशाची मुख्य व्यवस्था करण्यासाठी सत्याग्रहाची पूर्वकल्पना आपल्या जमातीतील सर्वांना पूर्णत: दिली पाहिजे.'' अशा स्वरूपाची सत्याग्रहाबाबतची पूर्वकल्पना देऊन मार्गदर्शन केले होते. तसेच आपल्या जातीमधील लोकांना एकसंघ केले पाहिजे असेही त्यांनी पत्राद्वारे भाऊराव गायकवाड यांना कळविले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार भाऊराव गायकवाड यांनी आपल्या सहकाऱ्यांशी विचार विनिमय करून कोणत्या मंदिरांना सरकारी अनुदान मिळते याची माहिती मिळविली तेव्हा नाशिक शहरातील काळाराम मंदिराला सरकारकडून अनुदान मिळते अशी माहिती मिळाली होती. त्यानंतर त्यांनी सत्याग्रहाची आखणी व पत्रव्यवहार करण्यासाठी भाड्याची जागा घेऊन तेथे आर्य समाज मंदिर नावाने कार्यालय सुरू केले होते. या कार्यालयातून मुंबई, नागपूर, औरंगाबाद, पुणे, धुळे, जळगांव, ठाणे व कोकणातील कार्यकर्त्यांशी पत्रव्यवहार करून माहिती दिली जात होती. जिल्ह्यातील गावांना भेटी दिल्या होत्या. या कार्यालयातून संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून सत्याग्रहीची नावे नोंदविली जात, तसेच पत्रव्यवहार करण्यात येत होता. सत्याग्रह कमिटीने ३ मार्च १९३० हा सत्याग्रहाचा पहिला दिवस निश्चित केला होता. तेव्हा झालेल्या पत्रव्यवहारानुसार अनेक ठिकाणाहून सत्याग्रही मिळेल त्या वाहनाने व दिसेल त्या रस्त्याने नाशिक शहरात सत्याग्रहाकरीता येत होते. ठरल्यानुसार ३ मार्च १९३० रोजी दुपारी काळाराम मंदिरावर सत्याग्रहीची मोठी मिरवणूक जाणार होती. परंतु त्यांच्या अगोदरच नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी १४४ कलम लागू केल्याचे जाहीर केले. त्यामुळे सर्व सत्याग्रहींचा अपेक्षाभंग झाला होता. तेव्हा सत्याग्रह समितीचे सेक्रेटरी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड सत्याग्रहींना म्हणाले, ''येथे आपण एखादा उत्सव किंवा एखादा उरूस साजरा करण्यासाठी जमलो नाही. आपल्याला फक्त मिरवणूक काढायची होती. आपण मंदिर प्रवेशाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून येथे जमलो आहोत. आपला मार्ग सोपा नाही. आजपर्यंत जे अनेक सत्याग्रह तुम्ही पाहिले असतील त्यांना महात्मा गांधींचा, काँग्रेसचा आशीर्वाद होता. हा दलितांनी (अस्पृश्यांनी) स्वतःच्या उद्धारासाठी स्फुर्तीने केलेला सत्याग्रह आहे. त्यामुळे सरकार, सनातनी लोक असे कितीतरी काटेकुटे, दगड धोंडे, आपल्या वाटेत आडवे येणार आहेत. त्यांना आपण दूर केले पाहिजे. सत्याग्रह किती दिवस टिकणार आहे. सनातन्यांचे मतपरिवर्तन केव्हा होणार आहे हे कसे सांगू शकणार? पण तोपर्यंत लढा चालवायचा आहे. त्यासाठी वधू परिवार होऊ या, नुसते १४४ कलम जारी झाले म्हणून आपले मनोबल,

मनोधैर्य खचता कामा नये.'' अशा पद्धतीने त्यांनी नाशिक शहरात आलेल्या सर्व सत्याग्रहींना उपदेश केला होता. यातून त्यांनी सत्याग्रहाबाबत सवर्ण (स्पृश्य) लोकांची असलेली भूमिका विशद केली होती. त्याचे मतपरिवर्तन करण्याकरीता आपणास एकसंघ राहण्याची भूमिका मांडली होती.

भाऊराव (दादासाहेब) गायकवाड व सत्याग्रह समितीच्या मार्गदर्शनांमुळे सत्याग्रह योग्य पद्धतीने सुरू झाला होता. परंतु काळाराम मंदिराचे चारही दरवाजे बंद करण्यात आले होते. मात्र मंदिराच्या पुजाऱ्यांचा घरातून मंदिरात जाण्यासाठी असलेल्या खाजगी दरवाजाने सनातनी लोक मंदिरात जाऊन दर्शन घेत होते. तेव्हा ही सुरू असलेली पद्धती ज्यावेळी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड आणि सत्याग्रहीच्या लक्षात आली होती त्यावेळी त्यांनी पत्राद्वारे ही सर्व हकीगत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कळविली होती. तसेच नाशिकचे जिल्हाधिकारी व डी. एस. पी. यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हा जिल्हाधिकारी यांनी सत्याग्रहींच्या बाजूने सहानुभूती तर दर्शविली नाही त्याउलट ते म्हणाले मंदिराच्या खाजगी मार्गावर कोणत्याही प्रकारचा सत्याग्रह करू नये. सत्याग्रह करण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही सत्याग्रहींना पकडू अशी धमकी देण्यात आली होती. यावरून सरकारी अधिकारी सुद्धा नि:पक्षपाती धोरणाचा त्याग करून सनातनी (स्पृश्य) लोकांच्या बाजूने वळलेले होते असे आपणास स्पष्टपणे दिसून येते.

नाशिक शहरातील या सर्व परिस्थितीची जाणीव भाऊराव गायकवाड व सत्याग्रह समितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना करून दिली होती. तेव्हा त्यांनी ही सर्व परिस्थिती तत्कालीन मुंबई प्रांताच्या गव्हर्नरांना २४ मार्च १९३० रोजी पत्र लिहून कळविले होते की, जिल्हाधिकारी यांनी केलेले वर्तन योग्य नसून पुढील संकट टाळण्याकरीता त्यांचे मतपरिवर्तन अशा स्वरूपाचा समजुतीचा सल्ला त्यांनी दिला होता. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या पत्राचा परिणाम दलितांच्या विरोधी झाला होता. त्यानंतर थोड्याच दिवसात ३ एप्रिल १९३० रोजी नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांनी हुकूम काढला की बॉम्बे डिस्ट्रीक्ट पोलीस ॲक्टच्या ४२ सेक्शनप्रमाणे यापुढील १५ दिवस कोणत्याही माणसाने काळाराम मंदिराच्या चारही

दरवाजापासून ३ यार्डच्या अंतरावर आपल्याजवळ कोणत्याही प्रकारचे शस्त्र, दगड, इत्यादी सामुग्री नेऊ नये. या हुकूमाच्या विरूद्ध वर्तणूक करणाऱ्यास त्याच कायद्याच्या सेक्शन ६८ प्रमाणे दंड करण्यात येईल.''[३६] असे म्हटले होते. यावरून सरकारी अधिकारी सुद्धा सत्याग्रह समितीवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करत होते. ६ एप्रिल १९३० रोजी सत्याग्रह समितीचे सचिव भाऊराव (दादासाहेब) गायकवाड व त्यांच्या समवेत असलेल्या ६ सहकाऱ्यांना नाशिकचे तत्कालीन न्यायाधीश डी. सी. घुगासे यांच्यासमोर हजर केले होते. त्यांनी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांचेवर गुन्हा दाखल केला होता. तसेच सत्याग्रहींनी मुख्य प्रवेशद्वारासमोर गर्दी केली होती. त्यामुळे त्यांनाही अटक करण्यात आली होती. त्यांच्यातील ४९ व्यक्तिंवर कारवाई करून २ तासांच्या आत सोडून देण्यात आले होते. या दरम्यान ९ एप्रिल १९३० रोजी रामनवमी होती. त्यादिवशी नाशिकमधून रामाच्या रथाची मिरवणूक निघणार होती. त्यावेळी ठरल्याप्रमाणे सवर्णांनी (स्पृश्यांनी) रथ मंदिराबाहेर आणला. मंदिराच्या दरवाजापासून १० फुट अंतरावर दलित व सवर्ण दोन्हींनी रथ ओढून मिरवणूक काढायचे ठरविण्यात आले होते. परंतु तशा स्वरूपाचे कोणतेही तत्त्व पाळण्यात आले नव्हते. दलित रथ ओढण्याकरीता दोर पकडण्याचा प्रयत्न करीत होते. त्यावेळी निर्माण झालेल्या गोंधळाच्या परिस्थितीचा फायदा घेऊन पोलीस शिपायांनी मारझोड केली होती. त्यावेळी लोक आपला जीव वाचविण्याकरीता पळाले होते. तेव्हा जवळच्या शेतात असलेल्या दगडाचा मारा दलितांना सवर्ण (स्पृश्य) यांनी केला होता. त्यामध्ये कितीतरी लोक जखमी झाले होते. तसेच सत्याग्रहींच्या तंबूकडे जाऊन तेथील वस्तुची मोडतोड केली होती. उरलेसुरले सामान नदीत फेकून दिले होते. यावरून असे कळून येते की सरकारला दोन्ही वर्गाची फसवणूक करून सुरू असलेला तंटा मिटू द्यावयाचा नव्हता.

तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गव्हर्नर यांना पत्र लिहून कळविले होते की, ''नाशिकच्या जिल्हाधिकारी यांना योग्य त्या सूचना द्या.'' परिस्थितीचा विचार करता जर दोन्ही गटात ठरल्याप्रमाणे रथ ओढण्याची संधी दिली गेली असती तर

झालेला प्रसंग टाळता आला असता. नाशिक येथे वरील घटनेमुळे १४४ कलम लागू करण्यात आले होते. तसेच काळाराम मंदिराचे दरवाजे बंद होते. त्यामुळे सत्याग्रह स्थगित करावा लागला होता. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांना २३ एप्रिल १९३० रोजी पत्र लिहिले होते. त्यात त्यांनी म्हटले, ''१४४ कलमाचा स्थगिती हुकूम उठला किंवा न उठला काय? त्याचे काही महत्त्व नाही. मंदिर राहते की उघडते हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तथापि लौकिक परिणामाच्या दृष्टीने बघता सत्याग्रह पुन्हा सुरू करणे बरे असे माझे व देवराज नाईक इ. चे मत आहे. तशी व्यवस्था करावी. मात्र प्रत्येक दरवाज्यावर ४-५ माणसांपेक्षा जास्त माणसे ठेवण्याचे कारण दिसत नाही. शिवाय खर्च कमी होईल.''[३७] काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरू राहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोलमेज परिषदेकरीता लंडनला गेले. त्यांनी सत्याग्रहाची जबाबदारी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांचेकडे दिली होती.

इ. स. १९३१ च्या मार्च महिन्यात पुन्हा काळाराम मंदिर प्रवेशाकरीता सत्याग्रह करण्याची चळवळ भाऊराव गायकवाड आणि सत्याग्रह समितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संमतीने निश्चित केली. ८ फेब्रुवारी १९३१ रोजी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी नाशिक येथे आ. सोळंकीच्या अध्यक्षतेखाली सभा घेतली होती. त्या सभेत १५ मार्च १९३१ रोजी काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह पुन्हा सुरू करण्याचे निश्चित केले होते. मात्र याही वेळी नाशिक जिल्ह्याचे तत्कालीन कलेक्टर आर. जी. गार्डन यांनी १५ मार्च १९३१ रोजी एक महिना मुदतीकरीता १४४ कलम लागू करून काळाराम मंदिरापासून १६० यार्डच्या आत सार्वजनिक ठिकाणी ३ पेक्षा जास्त माणसांनी एकत्र येऊ नये तसे करण्याचा प्रयत्न केल्यास इंडियन पिनल कोड १८८ च्या सेक्शनप्रमाणे दंड केला जाईल[३८] असे कळविले होते. सरकारी अधिकाऱ्यांनी सत्याग्रह समितीसमोर या आदेशाप्रमाणे दबाव टाकून त्यांच्या मार्गात अडथळा आणला होता. तेव्हा सत्याग्रह करावा किंवा नाही हा प्रश्न भाऊराव गायकवाड व सत्याग्रह समितीसमोर निर्माण झाला. यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांनी कळविले होते की, जिल्हाधिकाऱ्यांनी लागू केलेला प्रतिबंध दोन्ही पक्षांना लागू आहे. त्यामुळे आदेश मोडून काही साध्य होणार नाही. आपला मुख्य उद्देश सत्याग्रह करण्याचा असून यात्रेत अडथळा आणणे आणि गैरसोय निर्माण करणे होय. त्यामुळे हा आदेश आपला उद्देश साध्य करण्यास मदत करतो आहे. त्यामुळे सत्याग्रहीचा उपयोग मंदिरावर पहारा ठेवण्याकरीता करा. आदेशाचा भंग होणार नाही. अशा पद्धतीने त्यांनी दलितांनी आक्रमक भूमिका न घेता संयम राखून सनदशीर मार्गाने कायद्याच्या विरोधात कोणतेही पाऊल उचलू नका असेही स्पष्ट केले होते. त्याप्रमाणे भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी सत्याग्रह सुरू ठेवला होता. १५ मार्च १९३१ रोजी सत्याग्रहाला सुरवात झाली. मिरवणुकीच्या अगोदर एक सभा घेण्यात आली. या सभेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांचे भाषण झाले. त्यानंतर ते परत गेले होते. नंतर भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली मिरवणूक निघाली. त्याही वेळी दंगल झाली होती. त्यामुळे १४४ कलम लागू करण्यात आले होते. त्यावेळी नाशिकला कमिशनर यांनी दौरा केला होता. तेव्हा त्यांनी सत्याग्रह थांबविण्याचा सल्ला दिला होता.

सत्याग्रह समितीने ३१ मार्च १९३१ रोजी सभा घेऊन सिंहस्थापर्यंत मंदिर प्रवेश सत्याग्रह स्थगित करण्याचा ठराव केला होता. त्यानंतर देवराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक जिल्ह्यातील विंचूर येथे केलेला मंदिर प्रवेश सत्याग्रह ५ नोव्हेंबर १९३१ पासून भाऊराव (दादासाहेब) गायकवाड व त्यांच्या सत्याग्रह समितीने पुन्हा सुरू करण्याचे ठरविले होते.

तेव्हा सत्याग्रह समितीने स्थगित केलेला सत्याग्रह पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. सत्याग्रहाकरीता ५ नोव्हेंबर १९३१ ही तारीख निश्चित करण्यात आली होती. त्या दिवशी दलित बांधवांनी नाशिक शहरात मोठी मिरवणूक काढण्याचे आयोजन केले होते. त्याला प्रतिउत्तर म्हणून सनातनी (स्पृश्य) लोकांनीही मिरवणूक काढण्याचे ठरविले होते. तेव्हा या सत्याग्रहाकरीता मुंबई येथून देवराज नाईक, प्रधान कदेकर, भिडे पाटील, शिवतरकर पगारे, डोळस इत्यादी कार्यकर्ते नाशिकमध्ये आले होते. या सर्वांची व सत्याग्रहीची व्यवस्था भाऊराव गायकवाड व अमृतराव रणखांबे

दाणी, रोकडे, भालेराव यांनी व्यवस्थित पद्धतीने केली होती. परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी दोन्ही बाजूच्या लोकांनी चालविलेल्या तयारीचा अंदाज घेऊन त्याच दिवशी सकाळी १४४ कलम व पोलीस कायद्याच्या ४२ कलमाचा जाहीरनामा लागू केला होता. तेव्हा या निर्णयामुळे सत्याग्रह समितीने काळाराम मंदिरापासून १०० यार्ड अंतर सोडून मिरवणूक नेण्याची व मंदिराचा दक्षिण बाजूचा उघडा असल्यास चार सत्याग्रहींना मंदिरात पाठविण्याचे निश्चित केले. त्याकरीता दुपारी २ वाजता देवराम नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली आणि २।। वाजता दलितवस्ती (अस्पृश्य) पासून सत्याग्रहींनी मिरवणुकीला अगदी शिस्तीने सुरूवात केली होती. मिरवणूक पंचवटी परिसरात आली त्यावेळी काळाराम मंदिराचा दक्षिणेकडील दरवाजाही बंद करण्यात आला अशी माहिती मिळाली होती. त्यामुळे मंदिराच्या दिशेने निघालेली मिरवणूक त्याच मार्गाने माघारी परत नेण्यात आली होती.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी सत्याग्रहींना पुन्हा मंदिराकडे पाठविण्यात आले होते. त्यावेळी मंदिराचे चारही बाजूचे दरवाजे बंद होते. त्यामुळे सत्याग्रहींनी त्या दिवसाच्या सायंकाळपर्यंत फिरता सत्याग्रह केला होता. सनातन्यांनी (स्पृश्य) सायंकाळी ५ वाजता मंदिराचा उत्तर दरवाजा उघडला असता एका सत्याग्रहीने मंदिरात प्रवेश करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय म्हणून गर्जना केली. तेव्हा तेथे बंदोबस्ताकरीता असलेला सब इन्स्पेक्टर श्री. शेळके यांनी संबंधीत सत्याग्रहीस अटक केली होती. अशा परिस्थितीतही सत्याग्रहींनी आपला सुरू केलेला सत्याग्रह सुरू ठेवला होता. त्यानंतर तिसऱ्या दिवशी सायंकाळी मंदिराचा दरवाजा उघडण्यात आला. त्यावेळी २२ सत्याग्रहींनी मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही अटक करण्यात आली होती. या सर्व सत्याग्रहींना १ महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली होती. तेव्हा घडलेल्या घटनेची सर्व हकीगत सत्याग्रह समितीचे सेक्रेटरी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तारेने लंडनला कळविली होती. मंदिर सत्याग्रहात सत्याग्रह करणाऱ्यांना झालेली अटक खूप गाजली. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून सत्याग्रहींचे

अभिनंदन केले गेले. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस परिषदेने या घटनेची दखल घेऊन सत्याग्रहाला पाठिंबा जाहीर केला होता. तसेच १९ नोव्हेंबर १९३१ रोजी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांना मुंबई प्रांतिक काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी श्री. स. का. पाटील यांनी पत्र पाठविले होते. ''मित्रहो, तुम्ही जो सत्याग्रह करीत आहात, त्यास पाठिंबा देणारे मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या कौन्सिलने केलेला ठराव पाठवताना मला आनंद होत आहे.''

**ठराव** : ''कौन्सिलची ही सभा काळाराम मंदिराच्या ट्रस्टींनी मंदिरात प्रवेश करण्यास मज्ञाव करण्याचे जे धोरण स्वीकारले आहे त्याचा तीव्र निषेध करते. ज्या सत्याग्रहींनी तुरुंगवास पत्करला त्यांचे ही कौन्सिल अभिनंदन करते.''

''हा ठराव तात्काळ अंमलात यावा व तुमच्या सत्याग्रहाला यथाशक्ती करवेल ती मदत करावी अशी आमची इच्छा आहे; पण तुमचा सत्याग्रह हा खरा सत्याग्रह असला पाहिजे. म्हणजे तो अगत्याचारी असला पाहिजे व जबरदस्तीचा नसला पाहिजे. या बाबतीत आम्ही जी सहाय्यता देण्याचे ठरवू ती आम्हाला महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या तसेच नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सल्लामसलतीने व सहकार्याने ठरवावी लागेल. तुमच्या मंदिर प्रवेश कमिटीचाही विचार आम्ही घेऊ. काँग्रेसमध्ये असे पुष्कळ लोक आहेत की, सत्याग्रहासंबंधीच्या तुमच्या व त्यांच्या मनात काहीशी तफावत आहे. आमच्यापैकी पुष्कळांना असे वाटते की, अस्पृश्यता निवारणार्थ जो सत्याग्रह करावयाचा तो स्पृश्य हिंदूंनी केला पाहिजे. कारण या घोर सामाजिक अन्यायाचे प्रतिपालन स्पृश्य हिंदूंकडून होत आहे व म्हणून त्याचे परिमार्जनही त्यांच्याच हातून होणे इष्ट आहे. हा सत्याग्रह करावयाच्या बाबतीत तुमच्या हातून चूक घडली असे म्हणण्याच्या हेतूने हे लिहीत नसून स्पृश्य हिंदूंची जबाबदारी किती मोठी आहे, यासाठी मी उल्लेख केला आहे.

सत्याग्रह समितीने सुरू केलेला फिरता सत्याग्रह सुरू ठेवलेला होता. त्यामुळे मंदिराचे सर्व दरवाजे बंद ठेवण्यात आलेले होते. तेव्हा सत्याग्रहात सहभागी असलेले सत्याग्रही कधी-कधी उत्तर व पश्चिम दरवाजावर बसत होते. म्हणून मंदिराच्या आजूबाजूला असलेल्या घरामधून कधीकधी सत्याग्रहींवर दगडफेक केली जात होती.

अशी परिस्थिती असताना ३ जानेवारी १९३२ रोजी मंदिराच्या पुजाऱ्याने मंदिराचा खाजगी दरवाजा उघडा ठेवून यात्रेकरू लोकांना मंदिरात दर्शनाकरीता जाऊ दिले होते. त्यावेळी या यात्रेकरू बरोबर दोन सत्याग्रहींनी मंदिरात प्रवेश करून रामाच्या मुर्तीचे दर्शन घेऊन ''श्री रामचंद्रजी की जय'', ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय'' अशा घोषणा दिल्या. तेव्हा सनातनी लोकांनी या दोन्ही सत्याग्रहींना मारझोड केली होती. यावरून आपणास सनातनी लोकांच्या ठिकाणी असलेल्या कठोर नीतिची जाणीव होती. तसेच त्यांच्यात जातिभेदाविषयी रूजलेल्या भावनाही कळून येतात.

त्यानंतर ४ जानेवारी १९३२ रोजी काळाराम मंदिराचा उत्तर दरवाजा उघडला होता. तेव्हा सर्व लोक मंदिरात प्रवेश करीत होते. त्यांच्याबरोबर सत्याग्रहींनीही मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला असता त्यांना अडविण्यात आले. त्यातून सायंकाळी झालेल्या झगड्यात वासुदेव नावाचा सोनार जातीतील व्यक्ती मृत पावला. त्याच्या मृत्युला भाऊराव (दादासाहेब) गायकवाड हेच जबाबदार आहेत असा आरोप करून त्यांच्याविषयी सबळ पुरवाही सनातनी (स्पृश्य) लोकांनी तयार केला होता. काळाराम मंदिराच्या परिसरात झालेल्या या प्रकारामुळे मंदिराचे सर्व दरवाजे पुन्हा बंद करण्यात आले होते. तरीसुद्धा सत्याग्रह समितीने फिरता सत्याग्रह सुरू ठेवला होता. तेव्हा या सत्याग्रहात सहभागी असलेल्या ४१ सत्याग्रहींना अटक करून त्यांना धुळे येथील तुरूंगात रवाना करण्यात आले होते.

राममंदिर प्रवेश सत्याग्रह सुरू करण्याकरीता ७ एप्रिल १९३२ रोजी सत्याग्रह समितीची बैठक झाली. या सत्याग्रहाची माहिती खेड्यापाड्यात देण्याकरीता पत्रिका छापण्यात आल्या होत्या. त्यावर ''माणुसकी हा प्रत्येक माणसाचा जन्मसिद्ध हक्क आहे.'' असे छापण्यात आले होते. इ. स. १९३२ च्या रामनवमीच्या दिवशी पुन्हा सत्याग्रह करण्याकरीता मुंबई, पुणे, अहमदनगर, जळगाव, धुळे इत्यादी ठिकाणाहून सत्याग्रहींचे जथ्थे नाशिक शहरात दाखल झाले होते. तेव्हा हा सत्याग्रह यशस्वी करण्याकरीता भाऊराव गायकवाड, अमृतराव रणखांबे, देवराव नाईक या प्रमुख दलित नेत्यांची सत्याग्रहीच्या छावणीत भाषणे झाली. १५ एप्रिल १९३२ रोजी मंदिरात प्रवेश करणाऱ्या लोकांबरोबर काही सत्याग्रही आत गेले. त्यावरून २० सत्याग्रही

भाऊराव गायकवाड, दाणी व रणखांबे यांनाही अटक करण्यात आली होती. सर्व अटक करण्यात आलेल्या सत्याग्रहींना जेलमध्ये अत्यंत वाईट अशा स्वरूपाची वागणूक देण्यात आली होती. त्यांच्यानंतर देवराज नाईक यांनी सत्याग्रहींना मार्गदर्शन केले होते. तेव्हा मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या १४ दलित स्त्रियांना अटक करण्यात आली होती. पुन्हा त्यांनी सत्याग्रहींची तुकडी जमा केली होती. त्यामुळे मंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले होते. म्हणजे त्या काळात मंदिरच काय पण सर्वच ठिकाणी दलितांवर अमानुष अशी वागणूक मिळत होती याची आपल्याला माहिती मिळते. भाऊराव गायकवाड यांनी २३ फेब्रुवारी १९३४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पत्र लिहून कळविले होते की, एप्रिल १९३४ मध्ये येणाऱ्या रामनवमीच्या दिवशी काळाराम मंदिर प्रवेशाकरीता सत्याग्रह करावा किंवा नाही? तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३ मार्च १९३४ रोजी भाऊराव गायकवाड यांना पत्राने कळविले की, येत्या रामनवमीला नाशिक मधील काळाराम मंदिर प्रवेशाकरीता दलित (अस्पृश्य) वर्गाकडून सुरू करण्यात येणारा सत्याग्रह फक्त तात्पुरता स्थगित न करता पूर्णपणे थांबविला पाहिजे. कारण मी मंदिर प्रवेश सत्याग्रह फक्त सुरू केला. कारण मला वाटले दलित वर्गात उत्साह निर्माण करण्याचा आणि त्यांच्या अवस्थेची त्यांना जाणीव करून देण्याचा हाच सर्वोत्तम मार्ग होता. दलित वर्गाने आता त्यांची शक्ती आणि साधने राजकारण आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे. असा सल्ला शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रह समितीचे सेक्रेटरी भाऊराव गायकवाड यांना दलितांबद्दल स्पृश्य (सवर्ण) सनातन्यांच्या विचारांची जाणीव करून दिली होती. तसेच त्यांच्या विचारात व बुद्धीत कोणताही फरक पडत नाही, म्हणून आपण शेवटी आपला मार्ग बदलून आपले लक्ष विचलित होऊ न देता आपल्या ध्येयाकरीता नवीन मार्गाचा अवलंब करून लक्ष केंद्रित करण्यास भाग पाडले होते.

सत्याग्रहाचे यशापयश हा भाग वगळता या सत्याग्रहाकडे पाहिले पाहिजे. समाजातील तळागाळातील लोकांना आपल्या हक्कांची जाणीव झाली होती.

लोकशाहीच्या मार्गाने आपल्या हक्कांसाठी संघर्ष करू लागले ही बाब नक्कीच जनजागृती होऊ लागली असे म्हणण्यास पुरेशी ठरते.

## गोदावरी नदी कुंडावरील सत्याग्रह

काळाराम मंदिर प्रवेशाकरीता सुरू करण्यात आलेल्या सत्याग्रहाला सनातन्यांचा असलेला विरोध सत्याग्रहींनी प्रत्यक्ष अनुभवला होता. प्रभू रामचंद्राला आपले वडील महाराज दशरथाच्या मृत्युची बातमी ज्या ठिकाणी कळली तेव्हा त्यांनी राजा दशरथाच्या मृत्यूनंतरचे सर्व विधी जेथे केले होते तो भाग रामकुंड म्हणून ओळखला जातो. त्याच कुंडावर दलित सत्याग्रहींनी १३ डिसेंबर १९३१ या दिवशी नाशिक शहरातून वाहत जाणाऱ्या गोदावरी नदीतील रामकुंडावर जाऊन स्नान करण्याचे ठरविले. त्यावेळी नाशिक जिल्ह्याचे तत्कालीन कलेक्टर आर. जी. गार्डन यांनी सत्याग्रह समितीला कळविले होते की, ''सत्यागहींनी तसे केल्यास पीनल कोड २९५ कलमान्वये सत्याग्रहींवर खटले भरण्यात येतील.'' त्यांच्या या धमकीला भीक न घालता सत्याग्रह समितीने त्या दिवशी दलितांच्या (अस्पृश्य) ९ सत्याग्रहींचा एक गट तयार करून गोदावरी नदीवर पाठविले होते. मात्र सवर्ण (स्पृश्य) सनातन्यांनी सायंकाळच्या ५ वाजेपर्यंत या सत्याग्रहींना रामकुंडावर जाऊ दिले नाही. त्यानंतर ५-६ दिवस सत्याग्रहींनी सातत्य राखून हा प्रयोग केला होता. दलित वर्गाकडून करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना विरोध करण्याकरीता १९ एप्रिल १९३१ रोजी रामकुंडाभोवती काटेरी कुंपन लावण्याचे ठरविण्यात आले होते. तरीसुद्धा सत्याग्रह समितीकडून रामकुंडावर सुरू केलेला सत्याग्रह चालू ठेवला होता. त्याचदिवशी शंकर श्रावण गायकवाड (बेलमास्तर) सत्याग्रहीने ''आंबेडकर की जय'' असा जयजयकार करून रामकुंडात उडी टाकली होती. त्यावेळी सवर्ण (स्पृश्य) व्यक्तींनी त्यांना बेदम मारले होते. तेव्हा परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने १४४ कलम लागू करून दोन महिने रामकुंडावर जाण्यास बंदी घालून रामकुंडावर पहारा बसविला होता. तसेच यापुढे सत्याग्रहीचे धोरण काय राहील याची विचारणा सत्याग्रह समितीला केली होती. तेव्हा सत्याग्रह समितीचे सेक्रेटरी भाऊराव (दादासाहेब) गायकवाडांनी सांगितले की, एकतर रामकुंड यापुढे सर्वांनाच मोकळे झाले पाहिजे,

नाहीतर सर्वांना ते बंद झाले पाहिजे. त्यांनी केलेल्या या विनंतीमुळे रामकुंड सर्वांसाठी बंद करण्यात आले होते. त्यामुळे दलित वर्गाने केलेला हा सत्याग्रह यशस्वी झाला होता असे म्हणता येईल.

## मुखेड येथील पांडवप्रताप ग्रंथाची मिरवणूक सत्याग्रह [३९]

महाड येथील चवदार तळ्यावर करण्यात आलेल्या सत्याग्रहाची बातमी फारच थोड्या कालावधीत देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहचली होती. त्यावेळपासून खेड्यापाड्यातील दलित वस्तीत आपल्यावर पूर्वीपासून होणाऱ्या गुलामगिरीच्या अत्याचाराच्या जाचातून मुक्त होण्यासाठी मरगळ झटकून हा वर्ग सवर्णाच्या (स्पृश्य) विरोधात उभा राहू लागला होता. याला नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यामध्ये असलेल्या मुखेड गावातील दलित (अस्पृश्य) लोकही अपवाद नव्हते.

इंग्रजांच्या काळापासून मुखेड गावातील शेतीला पाणीपुरवठा करण्याकरीता कालवा तयार करण्यात आलेला होता. परंतु या कालव्याच्या पाण्याचा फायदा फक्त गावातील सवर्ण (स्पृश्य) लोकच आपल्या शेतीकरीता करीत होते. त्यामुळे दलितांच्या मालकीची शेती कोरडवाहू होती. यामुळे येथील दलित लोक हंगामातील शेतीची कामे संपल्यावर गावातील चावडीवर बसून आपला वेळ घालवत असत. या चावडीवर सत्याग्रहाबाबत लोकांमध्ये जी चर्चा केली जात होती ती चर्चा गावातील किसन भिकाजी वाघ नावाचा दलित तरूण मन लावून ऐकत असे. याचा परिणाम किसनच्या मनावर झाला होता. त्याने एके दिवशी घरात कोणालाही काही एक न सांगता घरातून निघून गेला. तो काही दिवस कल्याण येथील एका धार्मिक आश्रमात राहिला होता. त्याच्या वडिलांनी त्याला तेथून घरी परत आणल्यावर काही दिवसांनी तो २ मार्च १९३० रोजी काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाकरीता नाशिक येथे गेला होता. या सत्याग्रहानंतर परत घरी आल्यावर मुखेडच्या चावडीवर बसणाऱ्या दलितांसमोर एक छोटंस् भाषणही केले होते. त्यात त्याने उपस्थित असलेल्या सर्व लोकांना सांगितले की, १४ एप्रिल १९३० हा दिवस मुखेड गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस साजरा करावयाचा आहे. तसेच या कार्यक्रमाकरीता त्या दिवशी मुखेड गावात भाषण करण्याकरीता अमृतराव रणखांबे यांना निमंत्रण

दिले होते. कार्यक्रमाकरीता जास्तीत जास्त दलित (अस्पृश्य) लोक उपस्थित रहावे म्हणून शिरवाडे, वाकद, देवगाव, रूई, अंदरसूल, निमगाव, येसगाव या आजूबाजूच्या गावात निरोप पाठविण्यात आले होते. त्यातून या गावामधील उत्साही दलित लोक आले होते. तसेच अमृतराव रणखांबे हे सुद्धा भाषण देण्याकरीता हजर झाले होते. तेव्हा त्यांनी केलेल्या भाषणात म्हणाले मित्रहो डॉ. बाबासाहेब हे येथील जातीयवादी शक्ती विरोधी झगडत आहेत. दलितांच्या (अस्पृश्य) न्याय हक्कांसाठी लढत आहेत. ते केवळ आपल्या उद्धारासाठीच, त्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम व ऐक्य याचीच नितांत गरज आहे. यासाठी सर्वांनी जमेल तेवढा त्याग करा. मला खात्री आहे. डॉ. आंबेडकर हा सूर्य अस्पृश्यांना प्रकाश दाखविल्याशिवाय राहणार नाही. या देशात डॉ. बाबासाहेब सोडून दुसरा कोणीही आपला उद्धारकर्ता नाही. अशा शब्दात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या उद्धाराकरीता सुरू केलेल्या प्रयत्नांची जाणीव त्यांनी मुखेड परिसरातील दलित जनतेला करून दिली होती.

या कार्यक्रमानंतर मुखेड गावातील चावडीवर पांडवप्रताप ग्रंथ वाचण्याचे किसन वाघने ठरविले. त्याकरीता मुखेड गावच्या परिसरातील गावामधील दलित (अस्पृश्य) वस्तीतील लोकांना निरोपही पाठविण्यात आले होते. ठरल्यानुसार सर्व व्यवस्था झाल्यावर या दिवशी किसनने दुपारी ३ वाजता पांडवप्रताप ग्रंथ वाचण्यास सुरूवात करण्यापूर्वी पांडव प्रताप ग्रंथ ऐकण्याकरीता जमलेल्या दलित लोकांपुढे त्याने लहान प्रास्ताविक केले. त्यावेळी म्हणाला, ''जमलेल्या बंधु-भगिनींनो, हे आपले ग्रंथ वाचनाचे पारायण म्हणजे हिंदु धर्मातील विषमतेला फाटा देऊन आज आपण समतेचा अधिकार बजावत आहोत. यातून त्याने पांडवप्रताप ग्रंथाचे वाचन करणे म्हणजे दलितांनी आपल्याला समतेचा अधिकार... करून घेण्याकरीता चालविलेला हा उपक्रम असल्याचे स्पष्ट केले होते.'' तसेच सवर्ण (स्पृश्य) दलितांना जो अधिकार देत नाहीत तो मिळविण्याकरीता केलेला का एक प्रयत्न होता.

प्रास्ताविकानंतर किसन वाघ याने पांडवप्रताप ग्रंथाचा पहिला अध्याय वाचायला सुरूवात केली. अशा प्रकारे २३ सप्टेंबर १९३१ हा ग्रंथ वाचण्याचा शेवटचा दिवस होता. त्या दिवशी ग्रंथ वाचनानंतर पांडवप्रताप ग्रंथाच्या मिरवणुकीस सुरूवात

झाली होती. ती मिरवणूक हळूहळू पुढे जात होती. मिरवणुकीकरीता जमलेल्या स्त्रिया गाणी म्हणत होत्या. तसेच पुरूष मंडळी काही खेळाचे प्रात्यक्षिक करीत होते. मिरवणूक गावाच्या वेशीजवळ आली त्यावेळी गावातील १००-२०० सवर्ण (स्पृश्य) लोकांनी पूर्वनियोजित कटानुसार मिरवणुकीस आडकाठी आणली होती. ''एकच ग्रंथ, एकच तत्त्वज्ञान पण स्पृश्यांनी त्यातही भेद केला. देव एकच, भाव एकच, पण हिंदूंच्या मनातील उच्चनीच भावाने तोही डागळला.'' पांडवप्रताप ग्रंथाची मिरवणूक काढता यावी म्हणून या लोकांनी सत्याग्रह सुरू केला. तेव्हा सवर्ण (स्पृश्य) व दलित (अस्पृश्य) यांच्यात थोडी शाब्दिक चकमक झाली असता प्रसंग ओळखून दलितांनी अमृतराव रणखांबे यांना विंचूरला घेण्याकरीता २-४ तरुणांना पाठविले. मिरवणुकीत सहभागी असलेले सर्व दलित तेथेच रस्त्यावर बसले होते. तेव्हा हे लोक उठत नाहीत म्हणून सवर्णांच्या (स्पृश्य) जमावातील काही लोक त्यांना खडे मारत होते. तर काहींनी आजूबाजूला असलेल्या उकीरड्यावरून कचरा वगैरे आणून दलित (अस्पृश्य) बसलेल्या सत्याग्रहीच्या बाजूला पेटवून दिला होता. मात्र तरीही रस्त्यावर बसलेले सत्याग्रही आपला संयम राखून बसून होते.

त्यानंतर दुपारचे ४ वाजेच्या सुमारास अमृतराव रणखांबे, भाऊराव (दादासाहेब) गायकवाड, विठ्ठलराव रणखांबे, पतित पावनदास, सखाराम वस्ताद इत्यादी मंडळी मुखेड गावात आली होती. त्यांनी झालेल्या घटनेचा वृत्तांत समजून घेतला. परंतु आलेल्या दलितांच्या या कार्यकर्त्यांना पाहून गावातील सवर्ण (स्पृश्य) लोकांचा राग अधिक वाढला होता. त्यांनी सत्याग्रहींना त्रास देण्यास सुरूवात केली. त्यांना शिव्या-शाप देत होते. हे सर्व बघून भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांना सवर्णांचा (स्पृश्य) राग आला आणि ते म्हणाले ''स्पृश्यांनो आमचा रस्ता सोडा. हा रस्ता सार्वजनिक आहे हा रस्ता अडविण्याचा कोणालाच अधिकार नाही.'' त्यावर सवर्ण (स्पृश्य) म्हणाले, ''तुम्ही येवल्याहून पोलिसांना घेऊन या जा, नाहीतर कोणालाही पाठवा.'' तेव्हा भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी २-३ तरुणांना अमृतराव रणखांबे यांची गाडी देऊन येवला येथे पोलिसांना घेण्यासाठी पाठविले होते. त्यामुळे सवर्ण (स्पृश्य) लोकांचा संताप अधिक वाढला व त्यांनी दलितांना जोरजोरात

शिव्या देण्यास सुरूवात केली होती. तर काहींनी सरपनाकरीता रचलेल्या बाभळीच्या लाकडाच्या गंजीवरून लाकडे घेऊन मिरवणुकीतील सत्याग्रहींना मारण्यास सुरूवात केली होती. त्यात भाऊराव गायकवाड यांच्या गालाला लागले होते. तेव्हा सत्याग्रहींचाही संयम सुटला त्यातून मुखेड गावच्या वेशीतच दोन्ही गटात हाणामारी सुरू झाली होती. या गोंधळातच एका सवर्ण (स्पृश्य) व्यक्तीने रॉकेल आणून संतू वाघाच्या डोक्यावर असलेला पांडवप्रताप ग्रंथ ओढून जमिनीवर आपटला व त्यावर रॉकेल टाकून ''भारतमाता की जय,'' ''महात्मा गांधी की जय'' अशा घोषणा देत पेटवून दिला होता. त्यामुळे दोन्ही गट एकमेकांच्या विरोधात भांडणे करू लागली. तेव्हा जो तो आपला जीव मुठीत घेऊन पळ काढू लागला. त्यातच वाकद येथील भिमराव बच्छाव हे पळताना दगडाच्या खदाणीत पडले त्यात ते मृत्यु पावले. त्यानंतर रात्री ८:०० वाजता येवला येथून पोलीस फौजदार आले. त्यांना पाहून दोन्ही गटातील लोकांची पळापळ सुरू झाली होती. तेव्हा आलेल्या फौजदार साहेबांनी घडलेल्या घटनेचा पंचनामा केला. अमृतराव रणखांबे यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी १०:०० वाजता पांडवप्रताप ग्रंथाची मिरवणूक काढण्यात येईल असे सांगून त्याकरीता पोलीस संरक्षणाची मागणी केली होती. त्यानुसार दुसऱ्या दिवशी पोलीस व फौजदार हजर झाले होते. ठरल्याप्रमाणे मिरवणूक निघाली. संपूर्ण गावभर मिरवणूक निघून दुपारी ३।। वाजता चावडीवर आली. मिरवणुकीत सहभागी झालेल्या सर्व दलित बांधवांनी जेवण घेतले.

वरील घडलेल्या संपूर्ण घटनेची सविस्तर माहिती भाऊराव गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तारेने लंडनला कळविली होती. त्यामुळे ते खूप चिडून म्हणाले, ''पांडवप्रताप हा ग्रंथ जरी हिंदूंचा असला तरी तो माझ्या लोकांजवळ आहे. म्हणून त्यावर घासलेट टाकून त्याची होळी करावी व माझे लोक हिंदू धर्मियांच्या पांडवप्रताप ग्रंथांची मिरवणूक काढतात म्हणून त्यांना रक्तबंबाळ होईपर्यंत मारायचे, या मार्गाने आमचा हे लोक उद्धार करणार आहेत.'' तसेच मुखेड येथील घटनेची केस मनमाड येथील कोर्टात चालविण्यात आली होती. मुखेड येथील घडलेली घटना शेवटी निवळली. मात्र त्याचा प्रभाव गोलमेज परिषदेवर झाला. डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांनी ही समस्या गोलमेज परिषदेत मांडल्यामुळे त्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाले. तेव्हा महात्मा गांधींनी येरवडा जेलमध्ये उपोषण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पुणे करार करण्यास भाग पाडले. संयुक्त मतदार संघाची योजना पुढे आली. मुखेड येथील सत्याग्रहाने ग्रामीण भागातील अस्पृश्यता किती भयानक होती याची माहिती मिळते.

## दलितांचा पाण्याकरीता सत्याग्रह

महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतभर सर्वच शहरामध्ये खेडेगावात दलितांना (अस्पृश्य) सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्यास बंदी होती. अशीच परिस्थिती नाशिक जिल्ह्यातही होती. तेव्हा भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांची जिल्हा लोकल बोर्डावर नेमणूक झाली. त्यांनी पहिल्या प्रथम ''ज्या ज्या गावांना सार्वजनिक विहीरी आहेत. त्या सर्वांसाठी खुल्या केल्या पाहिजेत.'' असा ठराव मंजूर करून घेतला. त्यानंतर ज्या ठिकाणी सार्वजनिक विहीरी होत्या त्या विहीरीवर लोकल बोर्डातर्फे ''विहीर सर्वांसाठी खुली आहे.'' असे बोर्ड लावण्यात आलेले होते. नाशिक जिल्ह्यातील खेड्यापाड्यात ज्या विहीरी जिल्हा लोकल बोर्डाच्या मालकीच्या आहेत. परंतु त्या विहीरीवर दलितांना (अस्पृश्य) पाणी भरण्यास बंदी होती त्या विहीरी दलितांना पाणी भरण्याकरीता खुल्या करण्यात याव्यात याकरीता भाऊराव गायकवाड व त्यांचे सहकारी यांनी संपूर्ण जिल्हाभर जोरदार प्रचार सुरू केला होता.

दिंडोरी तालुक्यातील उमराळे गावातील विहीरीवर दलितांना पाणी भरू द्यावे याकरीता भाऊराव गायकवाड यांनी गावागावात प्रचार करताना म्हणाले, ''ज्या ज्या गावात सार्वजनिक विहीरी आहेत त्या दलितांना खुल्या केल्या पाहिजेत.'' तसेच सरकारचे धोरणसुद्धा तशाच स्वरूपाचे होते. यातून उमराळे गावात ४००-५०० दलित एकत्र आले होते. तेथे भाऊराव गायकवाड यांनी सभा घेतली होती. विहीरीवर पाण्यासाठी सत्याग्रह करण्यात आला. तेथे १८ मे १९२९ रोजी स्वत: विहीरीचे पाणी काढून प्राशन केले. उमराळ्याची विहीर दलितांना खुली झाली. त्यामुळे उमराळे गावातील सर्व सवर्ण (स्पृश्य) जनता घाबरली. पोलीस पाटील (पुंजा) यांनी माघार घेऊन उमराळे गावातील विहीर दलितांना पाणी भरण्याकरीता खुली केली होती.

त्यामुळे तेथे जमा झालेल्या दलित लोकांनी भाऊराव गायकवाड यांच्या नेतृत्त्वाखाली मिरवणुकीचे आयोजन करून विहीरीचे पाणी भरले होते.

नाशिक जिल्ह्यातील मुळेगाव या गावात सार्वजनिक विहीरीवर गावात राहणाऱ्या दलितांना पाणी भरू दिले जात नव्हते. तेव्हा त्या गावातही भाऊराव गायकवाड यांनी आपल्या समाजातील लोकांच्या मदतीने २५ जून १९३० रोजी सत्याग्रह केला होता. तेव्हा या गावातील सवर्ण (स्पृश्य) लोकांकडून सत्याग्रहाला तीव्र विरोध करण्यात येणार होता. याची माहिती सत्याग्रह करणाऱ्या लोकांना मिळाल्यावर त्यांनी सत्याग्रह करावयाच्या दिवशी मुळेगाव येथे सुरक्षितता म्हणून पोलीसही आणले होते. त्यामुळे सत्याग्रह शांततेच्या मार्गाने यशस्वी होऊन तेथील सार्वजनिक विहीर दलितांना पाणी भरण्याकरीता खुली करण्यात आली होती. त्याप्रमाणे चांदवड तालुक्यातील सोनजांब गावातील सवर्ण (स्पृश्य) लोकही दलितांना गावातील सार्वजनिक विहीरीवर पाणी भरू देत नव्हते. त्यावेळी दलितांनी त्यांचा विरोध मोडून सार्वजनिक विहीरीवर पाणी भरले होते.

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात असलेल्या झोडगे या गावातील सवर्ण (स्पृश्य) लोकांनी गावातील वाहून जाणारे सर्व सांडपाणी दलित वस्तीत आणून सोडले होते. त्यामुळे तेथे फार दलदल निर्माण झाली होती. तसेच दलित लोकांच्या वस्तीजवळ त्यांना पाणी पिण्यासाठी जी विहीर होती. त्या विहीरीजवळही गावातील घाण, कचरा, आणून टाकला जात होता. गावातील लोकांकडून दलितांवर करण्यात येणारा हा अन्याय त्यांनी बरेच दिवस सहन केला. त्यानंतर नाशिक जिल्ह्याचे दलितांचे तत्कालीन नेते भाऊराव (दादासाहेब) गायकवाड हे १२ डिसेंबर १९३८ रोजी मालेगाव येथे आले होते. त्यावेळी झोडगे गावातील काही दलित व्यक्तींनी त्यांची भेट घेऊन ही समस्या त्यांच्या कानावर घातली होती. तेव्हा त्यांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे १३ डिसेंबर १९३८ रोजी झोडगे येथील दलित वस्तीत जाऊन सर्व परिस्थितीची पाहणी केली होती. त्यानंतर त्यांनी समस्या नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे मांडली होती. वरील घटनेवरून त्या काळात खेडेगावात वास्तव्य करणाऱ्या दलितांना आपले जीवन जगत असताना किती भयानक समस्यांना सामोरे

जावे लागत होते याची स्पष्टपणे जाणीव होते. १२ फेब्रुवारी १९३८ रोजी सटाणा येथे परिषद घेऊन त्यात दलितांच्या (अस्पृश्यांच्या) समस्या मांडल्या होत्या. तसेच २३ ऑगस्ट १९३८ रोजी तत्कालीन गव्हर्नर यांनी नाशिकला भेट दिली होती. त्यावेळी भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी दलितांच्या (अस्पृश्य) लोकांच्या समस्या गावठाण, विहीरी इत्यादी समस्या मांडल्या होत्या.

त्यानंतर २४ जानेवारी १९३९ रोजी भाऊराव गायकवाड यांनी नाशिक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली होती. या भेटीत त्यांनी दलितांना सार्वजनिक ठिकाणी असलेल्या विहीरीवर पाणी भरण्यास मोकळीक मिळावी. याकरीता जिल्हाधिकारी यांना सांगितले की, प्रत्येक सरकारी कचेरीतील विहीर तुम्ही स्वत: सर्वांना खुली करावी मी प्रत्येक विहीरीवर माझ्या खर्चाने बादली व दोर घेण्यास पैसे देईन. त्यावेळी त्यांनी केलेली ही सूचना जिल्हाधिकारी साहेब यांनी तात्काळ मान्य करून तशा स्वरूपाचा आदेश काढला होता. त्यामुळे अनेक ठिकाणी कचेरीच्या परिसरात असलेल्या विहीरीवर दलितांनी पाणी भरले होते.

नाशिक जिल्ह्यातील लोअर इगतपुरी या गावी असलेल्या सार्वजनिक विहीरीवर तेथील दलित लोकांना पाणी भरू दिले जात नव्हते. या घटनेची माहिती भाऊराव गायकवाड यांना मिळाली. तेव्हा त्यांनी २४ जून १९३९ रोजी सकाळी ७:०० वाजता तेथे जाऊन तेथील नगरपालिकेचे तत्कालीन अध्यक्ष जाधव यांची भेट घेतली होती. त्यावेळी झालेल्या चर्चेत त्यांनी सार्वजनिक विहीर दलितांसाठी खुली करण्याची विनंती केली होती. तसेच त्या ठिकाणी राहणाऱ्या दलितांना केलेल्या तक्रारींचा अर्ज भाऊराव गायकवाड यांनी इगतपुरीचे तत्कालीन मामलेदार शिंदे यांना सादर केला होता. अशा प्रकारे भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी संपूर्ण नाशिक जिल्ह्यातील खेड्यापाड्यात जाऊन तेथील जनतेकडून दलितांवर जो अन्याय केला जात होता त्याला वाचा फोडली होती. तसेच दलितांना त्यांचा हक्क मिळवून देण्यास हातभार लावला होता.

चांदवड तालुक्यातील सोनजांब गावात लोकल बोर्डाची विहीर होती. या विहीरीवर गावातील सवर्ण (स्पृश्य) लोक तेथील दलित लोकांना पाणी भरू देत

नव्हते. तेव्हा अमृतराव रणखांबे, महमंद झकेरिया, मणियार, पा. जी. सबनीस, पतितपावनदास, के. पी. जाधव इत्यादी दलित कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत ३ एप्रिल १९३२ रोजी तेथील लोकल बोर्डाच्या विहीरीवर दलितांना पाणी भरण्याकरीता घालण्यात आलेली बंदी उठविण्याकरीता सत्याग्रह करण्यात आला. तेव्हा या सत्याग्रहाकरीता नाशिक जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून ४-५ हजार दलित प्रजा एकत्र आली होती. यावेळी सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेत दलित जनता कामे करीत नाही असा खोटा आरोप करून अधिकारी वर्ग उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना खोटे अहवाल पाठवतात. याचा निषेध करण्यात आला होता. त्यावेळी खडकजांब येथे जमलेले परिसरातील मराठा समाजाचे तत्कालीन नेते देवराम सयाजी वाघ, गणपत दादा मोरे, तिडके वकील यांनी दलितांचे गाऱ्हाणे मान्य करून लोकल बोर्डाच्या विहीरीवर दलितांना पाणी भरण्याची मागणी मान्य केली होती.

## येवला येथील धर्मांतराची घोषणा

नाशिकरोड येथे १९ फेब्रुवारी १९३४ रोजी दलितांची (अस्पृश्यांची) सभा भरली होती. या सभेत यावर्षी येणाऱ्या रामनवमीस पुन्हा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरू करावा असा विचार मांडण्यात आला होता. परंतु त्या घटनेवर निर्णय घेण्याकरीता भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांनी २३ फेब्रुवारी १९३४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पत्र पाठवून मत मांडले होते. त्यावर त्यांनी ३ मार्च १९३४ रोजीच्या पत्रात लिहिले, ''या प्रश्नावर सत्याग्रहाची भूमिका मला पसंत नाही. सत्याग्रह तहकूब करावा एवढेच नाही तर सत्याग्रहाचा विचार या प्रश्नावर सर्वस्वी रद्द करावा. त्याऐवजी हिंदू समाजाचा अविभाज्य, एकात्म भाग बनण्यापूर्वी हिंदू धर्मशाळा, हिंदू समाज याची संपूर्णत: पुनर्रचना करण्याचा दलित (अस्पृश्य) समाजाने आग्रह धरावा, असा सल्ला द्यावा असे वाटते. दलितांना (अस्पृश्यांना) त्यांच्या हक्काबद्दल जागृत करणे व त्यांच्यात जोम निर्माण करणे हाच सत्याग्रहाचा हेतू होता. यापुढे दलित (अस्पृश्य) वर्गाने राजकीय व शैक्षणिक कार्यावर आपली शक्ती पणाला लावावी.'' या विचारातून त्यांनी येवला येथे परिषद घेण्याची तयारी सुरू केली होती.

नाशिक जिल्ह्यातील येवला येथे दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी मुंबई इलाख्यातील दलितांची (अस्पृश्य) सभा भरविण्यात आली होती. या परिषदेचा मुख्य हेतू म्हणजे दलित वर्गाच्या गेल्या दहा वर्षाच्या चळवळीचा आढावा घेण्यासाठी, तसेच मॉन्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायद्याच्या दृष्टीने आपले पुढील धोरण ठरविण्याच्या उद्देशाने भरविण्यात आली होती. येवला येथे भरणाऱ्या या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यामुळे परिषदेला प्रचंड जनसमुदाय जमला होता. याच परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराच्या ऐतिहासिक घोषणेचा उच्चार करून म्हणाले, ''मी हिंदू धर्मात जन्माला आलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही.''[४०] असा संकल्प केला होता. पुढे ते म्हणतात, ''आठ कोटी अस्पृश्यांना (दलितांना) गुलामगिरीत ठेवून बहुजन समाजाला अज्ञान, दारिद्र्य, रूढी-परंपरेच्या अंधारात दडपणारा, असंख्य स्त्रियांना माणुसकीतून उठवणारा हा हिंदू धर्म, धर्म नाही. हिंदू असूनही हिंदूंच्या देवळात जायचे नाही, तळ्याचे पाणी प्यायचे नाही, इतकेच काय परंतु इतरांना स्पर्श देखील करायचा नाही. मग हा धर्म तरी काय कामाचा? असून नसून सारखाच आहे. दहा वर्ष चळवळ करूनही हिंदू लोक अस्पृश्यांना कोणतेच हक्क, सवलती देण्यास तयार नाहीत. ते म्हणतात, 'की थोडे दमाने घ्या, हजारो वर्षे चालत आलेली ही पद्धत एकदम मोडणार नाही; परंतु त्यांना विचारा की, अस्पृश्यांच्या (दलित) स्थितीत तुम्ही फक्त एक दिवस राहून पाहा, एक ना दोन दिवस, युगे लोटली, परंतु अस्पृश्यांच्या मागचा हा वनवास कधी मिटला नाही आणि या धर्मात राहून तो कधीही संपणार नाही. म्हणूनच मी हिंदू धर्मात जन्माला आलो हे माझे दुदैव समजतो. मी अशी प्रतिज्ञा करतो की, मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मुळीच मरणार नाही.'' अस्पृश्यता (दलित) नष्ट करण्यासाठी धर्मांतर करणे हा एकच शेवटचा उपाय त्यांना सापडला होता. कारण हिंदू लोकांच्या आचारविचारांचे एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे जोपर्यंत एखादा माणूस हिंदू समाजाचा घटक असतो तोपर्यंतच त्यात हिंदू धर्माचे श्रेय नि श्रेयाचे, पाप-पुण्याचे व स्पर्श-अस्पर्शाचे नियम लागू पडतात. परंतु त्याच व्यक्तीने जर दुसरा धर्म

स्वीकारला तर त्या व्यक्तीला हिंदू धर्माचे कोणतेही श्रेय नि श्रेय, पाप-पुण्य अथवा स्पर्श-अस्पर्शाचे नियम लागू होत नाहीत. उलट त्या व्यक्तीला मानवधर्माने घालून दिलेल्या मानवतावादी नियमाने वागविण्यात येते. उदा. ''एखादा अस्पृश्य जर हिंदू धर्मात राहिला तर त्याला हिंदूंकडून हीन लेखण्यात येते. परंतु त्याच व्यक्तीने जर ख्रिश्चन अथवा मुस्लीम धर्म स्वीकारला तर मात्र त्याला तेच हिंदू लोक आपल्या समानतेने वागवितात. अस्पृश्यता निवारण्याचा जर एवढा सोपा मार्ग असतानाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याचा लगेचच स्वीकार केला नाही. हिंदू धर्माबद्दल त्यांचा द्वेष नव्हता, तर त्यातील चालीरिती, रूढी, चातुर्वण्य जातिव्यवस्थेला त्यांचा विरोध होता. स्पृश्य हिंदूंनी जर अस्पृश्यांना हिंदू धर्मीय समजून तशी वागणूक दिली असती तर धर्मांतराची घोषणा करण्याची वेळ आली असती का? दलितांचे दु:ख स्वकीयांनी कधीच ओळखले नाही. परकीय लोकांनी ते ओळखले आणि अस्पृश्यांना माणुसकीने अधिकार देण्यास भाग पाडले. हिंदू समाजातील जातीभेदामुळे या समाजाचे ऐक्य नष्ट झाले आहे. येवल्याच्या या परिषदेत एक ठराव मांडण्यात आला. त्यानुसार आता पुन्हा सत्याग्रह करावयाचा नाही असे ठरविण्यात आले. सत्याग्रहामध्ये आपली शक्ती नष्ट करण्यापेक्षा सर्वांनी संघटित होऊन आपल्या समाजाला मानाचे स्थान स्वत:च प्राप्त करून घ्यायचे असे ठरले. यापुढे आपल्याला ''हिंदूंच्या देवदेवतांविषयी, मंदिराविषयी अगर रथाविषयी काहीच कर्तव्य नसून हिंदूंच्या कोणत्याही समारंभात यापुढे भाग घ्यायचा नाही.'' असा ठराव एकमताने मान्य करण्यात आला होता. याच ठरावाने मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह समाप्त करण्यात आला होता.

नाशिक जिल्ह्यातील भगूर गावात २१ जानेवारी १९४२ रोजी श्री. विश्वनाथ गणपत आडके, श्री. अंबादास गजमल शिंपी, चांदवडचे श्री. एस. के. शहा, जामनेरचे गजमल मारवाडी यांनी सभा घेऊन मार्गदर्शन केले. त्यांनी गांधीजींनी सुरू केलेल्या अस्पृश्यता (दलित) निवारण कार्यक्रमात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन केले.[४२]

तसेच आपण या जातिभेदाच्या प्रथेतून बाहेर पडण्याचे आवाहन केले. एकतेची भावना व आवश्यकता पटवून दिली होती.

सत्याग्रहाच्या चळवळीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दलितांवरील असलेली बंधने नष्ट करावयाची होती. त्यांनी समानतेच्या हक्कांच्या मागणीसाठी सत्याग्रहाची चळवळ केली. त्यांनी दलितांच्या समस्या सोडविण्याकरीता सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब केला होता. सामाजिकदृष्ट्या उच्चवर्णियांच्या बरोबरीने ताठ मानेने जगायचे असेल, समान नागरी हक्क मिळवायचे असतील तर सत्याग्रहाशिवाय दुसरा मार्ग नव्हता. म्हणून आपल्या समानतेच्या हक्कासाठी सत्याग्रह करावा अशी त्यांची भूमिका होती. त्यांनी सत्याग्रहाची संकल्पना आणि विचार आपल्या अनुयायांना वेगवेगळ्या पद्धतीने समजावून देण्याचा प्रयत्न केला होता. तरीही बाबासाहेबांच्या समवेत अनेकांनी धर्मांतर केले. आज हा समाज उच्चशिक्षित झाल्यामुळे प्रशासनामध्ये मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहे. त्यांच्या राहाणीमानाचा जीवनस्तर उंचावला आहे. नाशिक जिल्ह्यात औद्योगिक वसाहती आल्यामुळे विविध वंचित व दलित समाजातील लोक कामगार म्हणून काम करतात. कामगारांच्या परिस्थितीची व त्यांच्या परिवर्तनाची चर्चा कामगार चळवळ या पुढील प्रकरणात केली आहे.

## संदर्भ व तळटिपा


१. अविनाश डोळस, *सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी*, नाशिक, २००२, पृ. ८९.

२. बी. एल. ग्रोव्हर, एन. के. बेल्हेकर, *आधुनिक भारताचा इतिहास*, नवी दिल्ली, तिसरी आवृत्ती, २०१०, पृ. ११९.

३. शरद जोशी, *शेतकरी संघटना विचार आणि कार्यपध्दती*, अलिबाग, १९८८, पृ. ०३.

४. बिपिनचंद्र (अनु. काळे), *इंडियाज स्ट्रगल फॉर इन्डिपेन्डस्*, पृ. ६५.

५. धनंजय कीर, *महात्मा जोतीराव फुले*, मुंबई, तिसरी आवृत्ती, १९९६, पृ. २०६.

६. गेल ऑमव्हेट (अनु. दिघे पी. डी.), *वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड*, पुणे, १९९५, पृ. १३२.

७. अभिमन्यू सूर्यवंशी, *शेतकरी जेव्हा जागा होतो*, पुणे, २०१४, पृ. १८.

८. वामन नरहर कुलकर्णी, *दीपस्तंभ समाजाचे अजबा विठ्ठल पाटील*, सटाणा, १९५५, पृ. ६७-६९.

९. Home Department Special File No. 800 (53) II/1934 Extracts from the District Magistrate, Nashik. pp. 173, 175, 177

१०. प्रभाकर मांडे, *बागलाणचे बाबा*, औरंगाबाद, २००४, पृ. ९०, ९५.

११. Home Department Special File No. 800 (53) II/1934-687, pp. 185.

१२. शं. क. कापडणीस, *बागलाण इतिहास दर्शन*, सटाणा, १९९५. पृ. ११३, ११७.

१३. Home Department Special File No. 150 (39)-III/1930 Forest Disobediance Movement.

१४. सुधीर फडके, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य*, नाशिक, १९७४, पृ. १७८.

१५. कित्ता. पृ. १७८.

१६. राहुल पाटील (संपा.), *बाळासाहेब वाघ : कार्य आणि कर्तृत्व*, पुणे, पृ. ११६.

१७. सुमन गोवर्धने, *लढवय्या, कॉम्रेड पुंजाबाबा गोवर्धने*, नाशिक, मे २०१४, पृ. ३७-३८.

१८. टी. एस. पाटील, *आठवणीतले दिवस*, सावरकर नगर, नाशिक, २०११, पृ. ९१-९२.

१९. अनिल पाटील, *क्रांतीचा अंगार/क्रांतिसिंह नाना पाटील*, नाशिक, २०१२, पृ. १२-१३.

२०. स. आ. जोगळेकर (संपा.), *समग्र महाराष्ट्र कोश*, पुणे, १९६०, पृ. ६८५.

२१. य. दि. फडके, *२० व्या शतकातील महाराष्ट्र खंड २*, पुणे, चौथी आवृत्ती, १९९१, पृ. ७९.

२२. मालोजीराव मोगल (शब्दां. सोनवणे अशोक), *मोगलपर्व*, नाशिक, २०११, पृ. २४८.

२३. पंडितराव पवार (संपा.), *शतायुषी कर्मयोगी दुलाजी नाना पाटील*, मराठा विद्या प्रसारक मंडळ, नाशिक, २०१०, पृ. ६६-६७.

२४. सुरेशचंद्र म्हात्रे, *शेतकरी संघटना अधिवेशन*, पाचवी स्मरणिका, औरंगाबाद १९९३, पृ. १३.

२५. अभिमन्यू सूर्यवंशी, *आदिवासींचा विकास सूर्य*, पुणे, २०१३, पृ. ७३-७५.

२६. भाऊ लोखंडे, *डॉ. आंबेडकरी प्रेरणेचे लोकनेते कर्मवीर दादासाहेब गायकवाड*, नाशिक, २०१०, पृ. ७७-७८

२७. ग. बा. सरदार, *गांधी आणि आंबेडकर*, पुणे, २००८, पृ. १५-१६,

२८. विजय निरभवणे (संपा.), *प्रवर्तन*, सम्यक प्रबोधन सभा, नाशिक, २००६, पृ. ३५-३६.

२९. प्रदिप गायकवाड, *अग्रलेख मूकनायक आणि बहिष्कृत भारत*, नागपूर, २०१०, पृ. ११५.

३०. हरिभाऊ पगारे, *दादासाहेब गायकवाड जीवन व कार्य*, नाशिक, १९८७. पृ.२१-२२.

३१. निर्मलकुमार फडकुले (संपा.), *कर्मवीर दादासाहेब गायकवाड : काल आणि कर्तृत्व*, मुंबई, २००२, पृ. २७९.

३२. शंकरराव खरात (संपा.), *डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे*, मुंबई, २०१४, पृ. ३१.

३३. वसंत मुन व हरी नरके आणि इतर (संपा.), डॉ.आंबेडकरांची भाषणे, खंड १८, भाग १, मुंबई, पृ. १७२

३४. वसंत मुन व हरी नरके आणि इतर (संपा.), *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग १*, मुंबई, २०१६, पृ. ६५.

३५. य. दि. फडके, *२० व्या शतकातील महाराष्ट्र खंड ३*, पुणे, १९९१, पृ.१९०, १९४.

३६. वामन निंबाळकर (संपा.), *कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पाठविलेले पत्र दि. १९ मार्च १९३०*, नागपूर.

३७. शंकरराव खरात (संपा.), पूर्वोक्त पृ. ६८, ६९.

३८. चा. भ. खैरमोडे, डॉ. भिमराव रामाजी आंबेडकर चरित्रग्रंथ खंड १ ते १२, मुंबई, २००२.

३९. एम. जी. वाघ, मुखेडचा सत्याग्रह, औरंगाबाद, २००८, पृ. ७९, ८०.

४०. शंकरराव खरात (संपा.), पूर्वोक्त पृ. १४८,१४९.

४१. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई, २००६, पृ. २८४, २८५.

४२. मा. श. मोरे, बुद्ध धम्माचा इतिहास, लातूर, २००२, पृ. ३८.

# प्रकरण तिसरे

# कामगार चळवळ

कामगार ही संकल्पना भारतात मुख्यत्वे मोठ्या उद्योगधंद्यात काम करणाऱ्या कामगारांसाठी वापरण्यात येते. ''कारखान्यामध्ये काम करून वेतन मिळविणारा आणि त्यावर आपला उदरनिर्वाह करणारा मजूर किंवा श्रमिक म्हणजे कामगार होय.'' त्याप्रमाणे कामगारांचे आणखी काही प्रकार पडतात. त्याच्यामध्ये कुशल, अकुशल किंवा निव्वळ शारीरिक श्रमांची कामे करणारा असे अनेक प्रकार पडतात.

अठराव्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीला प्रारंभ झाला. त्यावेळेपासून कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांची संख्या वाढत गेली. यंत्रावर काम करण्यावर भर देण्यात येऊ लागला. यंत्रावर रात्रंदिवस काम करून घेता येत असल्यामुळे यंत्रमालक कामगारांची पिळवणूक करू लागले. तेव्हा कामगारांची होणारी ही पिळवणूक थांबविण्याकरीता कामगार संघटित होऊन संघटना स्थापन करू लागले. [१] इ. स. १८६९ मध्ये लंडन या ठिकाणी ''इंटरनॅशनल वर्कींग मेन्स असोसिएशन'' नावाची इतिहासप्रसिध्द संस्था स्थापन झाली होती.[२] या संघटना श्रमिकांना मिळणारे वेतन वाढविणे आणि कामगारांची पिळवणूक थांबविणे या उद्दिष्टांसाठी कार्य करू लागल्या होत्या.

भारतात या काळात ब्रिटिशांचे राज्य होते. त्यांनी सुरू केलेल्या शिक्षणामुळे येथील लोकांना सामाजिक, राजकीय व संघटित सामर्थ्यांची जाणीव होऊ लागली होती. यातून जातीयवाद वाढत जाऊन वर्गवादाचाही प्रचार होऊ लागला होता. युरोपातून व्यक्तिवाद व बुध्दीवादाप्रमाणे वर्ग संघर्षाचे नवीन तत्वज्ञान भारतात आले. या तत्वज्ञानातून इ. स. १८१८ मध्ये कलकत्ता या ठिकाणी पहिली कापड गिरणी निघाली. तर इ. स. १८५४ मध्ये मुंबई शहरात कासवजी दावर यांनी ''बॉम्बे स्पिनिंग ॲण्ड विव्हींग'' कंपनी नावाची कापडगिरणी मुंबई शहरात सुरू

केली होती.[३] तेव्हापासून या शहरात कापड गिरण्यांची व कामगारांची संख्या सतत वाढत गेली. परंतु या कापड गिरण्यात काम करणाऱ्या कामगारांचे प्रारंभीपासून शोषण सुरू झाले होते. या ठिकाणी कामाचे अनेक विभागात विभाजन करण्यात आले होते. त्या त्या विभागाचे प्रमुख कामगारांवर नियंत्रण ठेवीत होते. या अधिकाऱ्यांपैकी जॉबर हा गिरणीच्या व्यवस्थापनातील महत्त्वाचा घटक होता. जॉबर हा कामगारांला गिरणीत काम मिळवून देण्याचे कार्य करीत असे. त्या बदल्यात तो कामगारांकडून दस्तुरी किंवा बक्षीस घेत होता.[४] यावरून कापड गिरणीत काम करणाऱ्या कामगारांचे शोषण फक्त जॉबरकडून नाही तर इतर अनेक मार्गांनी त्यांचे शोषण केले जात होते. म्हणजेच कामगारांना कमी वेतन देत असत.

मुंबई शहरात इ. स. १८७५ ते १८९० या काळात कापड गिरणी उद्योगाची भरभराट झाली. त्यामुळे या शहरात कामगारांची वाढ झाली. परंतु त्यांच्या पगारात फार अल्पप्रमाणात वाढ झाली होती. तसेच कामगारांना कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा पुरविण्याकडे कापड गिरणी मालकांनी लक्ष दिले नाही. तसेच त्याच्या कामाच्या वेळेबाबत कोणत्याही प्रकारचे बंधन पाळले जात नव्हते. कामगाराला कामावर येण्यास उशीर झाल्यास त्याचा पगार कपात केला जात होता. तसेच स्त्रिया व लहान मुलांना कमी वेतनात जास्त तास कामाला राबवून घेतले जात होते. कामगारांची आर्थिक पिळवणूक, सामाजिक दास्य व आरोग्यविषयक असुविधा याचा जाच असहाय्य झाल्यामुळे व कामगारवर्गात निर्माण झालेला हा असंतोष मोठ्या नाराजीने व्यक्त करून त्याला वैचारिक बैठक व तात्विक महत्त्व देण्याचे कार्य एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाले.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या ''सत्यशोधक समाजाने'' कामगार व दलित वर्गाच्या समस्या ब्रिटिशांच्या काळात मांडल्या होत्या.[५] कारण या काळात कामगारांना वेतन आणि कामाची शाश्वती नव्हती. त्यामुळे कामगार वर्गापुढे अनेक समस्या होत्या. इ. स. १८७४ मध्ये श्रीपाद बॅनर्जी यांनी ''श्रमजीवी'' नावाचे पत्र प्रकाशित करून त्यातून कामगार वर्गाचे अनेक प्रश्न

मांडले होते. त्याबरोबर इंग्लंडमधील कारखान्यामध्ये लागू असणारे कायदे भारतातही लागू करण्यात यावे अशी मागणी करण्यात येत होती. या निर्माण झालेल्या परिस्थितीत मुंबईमधील कापड गिरणी मालक जागे झाले आणि त्यांनी आपले हित साधण्याकरीता ''बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन'' नांवाची संघटना स्थापन केली. त्यामुळे कामगार व कापड गिरणी मालक यांच्यातील संबंध बिघडत गेले. त्यावेळी या समस्येवर मार्ग काढण्याकरीता सरकारने इ. स. १८७५ मध्ये एक आयोग नेमला होता.[६] परंतु या आयोगाने केलेल्या शिफारशींना गिरणी मालकांनी विरोध केला होता. तेव्हा मुंबईतील काही समाजसेवकांना कापड गिरणी मालकांची ही भूमिका पसंत पडली नाही. तसेच सोराबजी शाहपुरीजी बंगाली यांच्या पुढाकाराने कामगारांची बाजू घेऊन एका विधेयकाचा मसुदा मुंबईच्या गव्हर्नरांकडे पाठविला. तसेच पुण्यातील ''सार्वजनिक सभेनेही'' कामगारांविषयी कायदा करण्याचा आग्रह धरला. त्यामुळे मुंबईच्या गव्हर्नरने मुंबईचा तत्कालीन कलेक्टर अर्बधनॉट याच्या अध्यक्षतेखाली ''फॅक्टरी ॲक्ट'' च्या निर्मितीसाठी कमिशन नेमले.[७] तेव्हा या कमिशनने सादर केलेल्या अहवालाच्या आधारावर सरकारने पहिला 'फॅक्टरी ॲक्ट' (कारखाना कायदा) भारतात लागू केला होता.

मुंबई सरकारने लागू केलेल्या 'फॅक्टरी ॲक्ट' मधील तरतुदी कामगारांना असामाधानकारक व अपुऱ्या वाटल्यामुळे त्यांच्यामध्ये असलेली निराशा कायम टिकून राहिली. तसेच तत्कालीन वृत्तपत्रांनीही कामगाराच्या या गोष्टीकडे लक्ष घातले. त्यापैकी *'नेटिव्ह ओपिनियन'* या वृत्तपत्राने कापड गिरणी मालकांच्या बाजूने लिखाण केले. याउलट *'रास्त गोफ्तर'* या वृत्तपत्राने कामगारांच्या हिताचा विचार करून लिखाण केले होते. त्याप्रमाणे कामगारांची बाजू भक्कमपणे मांडण्याचे काम *''दीनबंधू''* या वृत्तपत्राने केले होते.[८] कारण या वृत्तपत्राचे संपादक हे सत्यशोधक चळवळीचे नेते महात्मा ज्योतिराव फुले यांचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे हे होते. त्यांनी कापड गिरण्यातील स्टोअर किपरचे काम केलेले होते. त्यामुळे त्यांनी कापड गिरणीमधील कामगारांचे गिरणी मालकाकडून करण्यात येणारे शोषण जवळून पाहिलेले होते. त्यांना आलेल्या अनुभवातून त्यांनी

*'दीनबंधू'* मधून कामगारांच्या समस्यांना वाचा फोडली आणि कामगारांचे संघटन सुरू केले होते.

कामगार वर्गामध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांनी केलेल्या जागृतीमुळे सरकारने इ. स. १८८४ मध्ये तत्कालीन कलेक्टर डब्ल्यू. बी. मुलमू यांच्या अध्यक्षतेखाली फॅक्टरी कमिशन नेमले. मुंबई सरकारने नेमलेल्या या कमिशनमध्ये कामगारांच्या एकाही प्रतिनिधीची नेमणूक करण्यात आली नव्हती. त्यामुळे नारायण मेघाजी लोखंडे यांनी या कमिशनमध्ये कामगारांचे दोन प्रतिनिधी असावेत अशी मागणी केली. तसेच कामगारांमध्ये जागृती करण्याकरीता कामगारांच्या दोन सभा घेतल्या. त्यापैकी दुसरी सभा त्यांनी भायखळा येथे दि. २६ डिसेंबर १८८४ रोजी घेतली. या सभेत त्यांनी कामगारांच्या हितासाठी खालील प्रमुख मागण्या मांडल्या होत्या.

१. कापड गिरणी कामगारांना आठवडयातून एक दिवस म्हणजे रविवारी सुटटी देण्यात यावी.
२. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना दुपारी अर्धा तास सुटटी असावी.
३. कारखान्यातील काम सकाळी ८.३० वा. सुरू व्हावे व सूर्यास्ताला थांबवावे.
४. कामगारांचा पगार पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत करण्यात यावा.

कारखान्यात कामगार कामावर असतांना जर कामगाराला दुखापत झाली तर तो बरा होईपर्यंत त्याला पगार देण्यात यावा. तसेच कामगार कामावर असतांना मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला पेन्शन देण्यात यावी.

या मागण्यांच्या माध्यमातून त्यांनी कामगार वर्गात आपल्या न्याय हक्कांच्या बाबत जागृती केली. तसेच कापड गिरणी मालकांनाही कामगारांचे शोषण करू नये याची जाणीव करून दिली होती. तसेच इ. स. १८९० मध्ये ''बॉम्बे मिल हॅण्ड असोसिएशन'' या नांवाची पहिली कामगार संघटना स्थापन केली होती. त्यांनी स्थापन केलेली ही संघटना भारतातील पहिली कामगार संघटना होती. नारायण मेघाजी लोखंडे यांनी केलेल्या या प्रयत्नामुळे तत्कालीन

सरकारला कामगारांच्या हिताकडे लक्ष देणे भाग पडले. त्यातून सरकारने कामगारांना सोयी सुविधा देण्यासाठी एक कायदा पास केला होता.

नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगार वर्गाविषयी मांडलेल्या वरील मागण्या सरकारच्या विचाराधीन असतांना मुंबई शहरात कामगारांनी आपली एकजूट दाखविण्यासाठी इ. स. १८८५ मध्ये दोन कापड गिरण्यांमध्ये संप केला. त्यावेळी या संपाचे मुख्य कारण म्हणजे कामगारांना देण्यात येणाऱ्या पगारात केलेली कपात व पगार देण्यास कापड गिरणी मालकांनी केलेला उशीर ही कारणे होती. तसेच इ. स. १८८७ मध्ये मुंबईमधील कुर्ला येथील परदेशी गिरण्यातही संप झाला. त्यावेळी कामगारांच्या या संपाला प्रतिउत्तर म्हणून 'स्वदेशी मिलचे मालक' जे. एन. टाटा यांनी उत्तर भारतातून मुंबईत कामगार आणून मिल सुरू ठेवण्याचा केलेला प्रयत्न फसला होता. त्यावेळी त्याला प्रतिउत्तर म्हणून नारायण मेघाजी लोखंडे यांनी ३ जून १८८१ रोजी मुंबईच्या गव्हर्नरला पत्र लिहून लवकरात लवकर 'फॅक्टरी ॲक्ट' लागू करण्याची विनंती केली. तसेच सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडण्यासाठी २७ एप्रिल १८९० रोजी त्यांनी महालक्ष्मी रेसकोर्सवर कामगारांची सभा बोलाविली होती. या सभेत त्यांनी कामगारांना आठवड्यातून एक दिवस म्हणजे रविवारची सुट्टी असावी अशी मागणी केली होती.

कापड गिरणी कामगारांच्या वाढत्या शक्तीचा विचार करून सरकारने २५ सप्टेंबर १८९० रोजी सर्व समावेशक फॅक्टरी लेबर कमिशनची नेमणूक केली होती. या कमिशनने कामगार व कापड गिरणी मालक यांची मते जाणून प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून त्यावर आधारित असा फॅक्टरी ॲक्ट १८९१ मध्ये मंजूर केला होता. फॅक्टरी ॲक्ट मंजूर झाल्यानंतरही कामगारांवर होणाऱ्या अन्यायाविरूध्द लिखाण करण्याचे कार्य नारायण मेघाजी लोखंडे यांनी ''दीनबंधू'' या वृत्तपत्रातून सुरू ठेवलेच होते. त्यामुळे सरकारने कामगारांची खरी परिस्थिती समजून घेण्याकरीता इ. स. १८९१ मध्ये ''रॉयल कमिशन ऑफ लेबर'' स्थापन केले. या कमिशनने कामगारांच्या संघटना, मालक व त्यांच्या संघटना यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी कामगारांच्या बाजूने नारायण मेघाजी लोखंडे यांनी साक्ष

दिली होती.[९] त्यांनी कामगारांची बाजू परखडपणे मांडली. त्यामुळे कामगार वर्गाला दिलासा मिळाला. त्यातून कामगारांमध्ये आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली होती. याचा परिणाम म्हणजे कामगार संघटनांनी आपल्या हक्काच्या मागण्याकरीता संप घडवून आणले.

## विसाव्या शतकातील कामगार चळवळ

कामगार चळवळीला या शतकाच्या प्रारंभी बरीच चालना मिळाली. त्यामुळे इ. स. १९०१ मध्ये मुंबई शहरात कामगारांनी संप केला. त्याच्यानंतर स्वदेशीची चळवळ सुरू झाली. तेव्हा कामगार वर्गाला चांगली प्रेरणा मिळाली. या चळवळीच्या काळात इ. स. १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांना शिक्षा झाली. तेव्हा या घटनेचा निषेध म्हणून मुंबई शहरातील कामगारांनी ६ दिवसांचा राजकीय संप केला होता. परंतु तत्कालीन ब्रिटिश सरकार कामगार वर्गाकडे विरोधाने पहात होते.[१०] याउलट कामगारांनी आपल्या न्याय हक्काच्या मागण्या मांडण्याकरीता संघटन सुरू केले होते. या संघटनातून या दरम्यानच्या काळात बॉम्बे पोस्टल युनियन, कामगार हितसंवर्धन सभा, सोशल सर्व्हिस लिग या संघटनांची स्थापना झाली होती. या संघटनांनी मुंबईतील गिरणी मालकांशी मध्यस्थी करून कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यात काही अडचणीही आल्या होत्या. त्या म्हणजे कामगार वर्गाची अल्पसंख्या, अज्ञान, दारिद्र्य आणि काम नसेल अशा वेळी आपल्या मूळ गावाकडे परत जाण्याची सवय यामुळे कामगार वर्ग पाहिजे त्या प्रमाणात कारखाना मालकावर दबाव आणू शकला नव्हता.[११] तसेच या दरम्यानच्या काळात नारायण मेघाजी लोखंडे यांचे निधन झाले होते. त्यांच्या निधनानंतर भिकाजी संभाजी नरे यांनी सिताराम केशव बोले आणि बॅ. हरिश्चंद्र आनंदराव तालचेकर यांच्या सहकार्याने इ. स. १९०९ मध्ये ''कामगार हितवर्धक सभा'' नावाची कामगार संघटना स्थापन केली.[१२] या सभेने कामगारांना शिक्षण देणे, त्याच्यातील मद्यपानासारख्या व्यसनाला आळा घालणे, कामगारांच्या मालकांशी झालेल्या तंट्यात मदत करणे या बाबींना अग्रक्रम देऊन

कार्य करू लागली होती. थोडक्यात म्हणजे या सभेने कामगारांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला होता.

पहिल्या महायुध्दाच्या काळात भारतातील उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याकरीता तत्कालीन सरकारने मे १९१६ मध्ये टी. एच. हॉलंड यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. या आयोगाने औद्योगिकरणाच्या वाढीकरीता सरकारचा सक्रिय सहभाग असावा अशी शिफारस केली होती. परंतु दरम्यानच्या काळात कारखानदारांनी अमाप नफा मिळविण्याकरीता कामगारांचे हाल केले होते. त्यातून कलह वाढत गेला. त्यामुळे कामगारांच्या अनेक संघटना उदयास आल्या होत्या. बी. पी. वाडिया यांनी कामगारांना मार्गदर्शन करून इ. स. १९१८ मध्ये ''मद्रास लेबर युनियन'' नावाची संघटना उभारली.[१३] या संघटनेच्या पाठोपाठ देशात इतर ठिकाणीही कामगारांच्या संघटनांची स्थापना होऊ लागली होती. तेव्हा २४ नोव्हेंबर १९१८ रोजी ''पीपल्स युनियन'' या संघटनेच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने भाषण करतांना शाहू महाराज म्हणाले, ''इंग्लंडमध्ये मजुरदारांनी आपल्या उत्क्रांतीकरीता आपले संघ स्थापून स्वावलंबनाचे मार्ग स्वीकारले. त्याप्रमाणे आपण आपले सुव्यवस्थित संघ स्थापन केले पाहिजेत.''[१४] यावरून शाहू महाराजांची कामगार वर्गाविषयी असलेली तळमळ व आस्था आपणास स्पष्टपणे दिसून येते.

महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांच्या पाहणीकरीता तत्कालीन सरकारने इ. स. १९१६ मध्ये नेमलेल्या टि. एच. हॉलंड आयोगाने केलेल्या शिफरशीनुसार धुळे, जळगाव, चाळीसगाव, अमळनेर, नागपूर, भोर, मिरज, सांगली, इचलकरंजी, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी उद्योगधंद्याची वाढ झाली. याच काळात गुजरातमध्ये प्लेगची साथ आली. त्यामुळे शहरात राहणारा कामगार वर्ग गावाकडे जाऊ नये याकरीता कारखाना मालकांनी ७५% प्लेगभत्ता देण्याचे कबूल केले. परंतु कामगारांनी बोनसची मागणी केली. त्यांची ही मागणी फेटाळण्यात आली. त्यामुळे कामगारांनी डिसेंबर १९१७ मध्ये संप पुकारला.[१५] तसेच संपाचे नेतृत्व करणारे अनुसया साराभाई यांनी महात्मा गांधीजींना पत्र लिहून मार्गदर्शन करून

प्रश्न सोडविण्याची विनंती केली होती. त्याला अनुसरून महात्मा गांधीजींनी अहमदाबाद येथे जाऊन कामगारांच्या परिस्थितीचा आढावा घेऊन कापड गिरणी मालकांशी बोलणी करून ७५% पगारवाढ देण्याची शिफारस केली.[१६] कामगारांची मागणी मान्य झाल्यामुळे त्यांनी संप मागे घेतला होता. तसेच ''मजूर महासंघ'' नावाची कामगारांची संघटना स्थापन झाली होती. त्याचाच परिणाम म्हणून तत्कालीन सरकारने ना. म. जोशी यांची मध्यवर्ती विधिमंडळात कामगारांचे प्रवक्ते म्हणून नेमणूक केली होती.

पहिल्या जागतिक महायुध्दानंतर कामगार वर्गाला जागतिक व्यासपीठ मिळावे याकरीता सन १९१९ मध्ये स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या नियमानुसार तिच्यात भाग घेण्यासाठी प्रत्येक देशातील कामगारांच्या प्रतिनिधींची निवड करावयाची होती. त्याकरीता ३१ ऑक्टोबर १९२० रोजी मुंबईत एम्पायर नाटयगृहात लाला लजपतरॉय यांच्या अध्यक्षतेखाली ''ऑल इंडिया ट्रेड'' युनियनचे पहिले अधिवेशन, त्यात त्यांनी ''संघटित व्हा, चळवळ करा आणि लोकांना शिकवा'' ही त्रिसूत्री दिली. त्याचप्रमाणे या अधिवेशनात कामगारांना मताधिकार असावा व विधिमंडळात कामगारांचा प्रतिनिधी निवडला जावा अशी मागणीही करण्यात आली होती.[१७] कामगारांना संघटित करण्याचा आरोप अनेक नेत्यांवर ठेवून त्यांच्यावर खटले भरण्यात आले होते. तेव्हा कामगारांवर त्याचे वाईट परिणाम घडू नयेत म्हणून ''इंडियन ट्रेड युनियन ॲक्ट'' पास करण्यात आला होता.[१८] या कायद्यानुसार बाल कामगार, कामाचे तास, स्त्री-पुरुष याबाबत तरतुदी करण्यात आलेल्या होत्या.

सन १९२२ नंतर वाढता उत्पादन खर्च, जाचक कर व्यवस्था यामुळे गिरणी मालकांना पूर्वीसारखा भरपूर नफा कमविणे शक्य होत नव्हते. यामुळे त्यांनी कामगार संख्येत घट करण्याच्या धोरणाचा स्वीकार केला. तसेच कामगार कपात, बोनस व पगार कपात या कारणांमुळे सन १९२४ मध्ये दीड लाख कामगार संपावर गेले. त्यानंतर सन १९२६ मध्ये कामगार संघांना कायदेशीर मान्यता मिळाली. त्यानंतर सन १९२८ मध्ये कामगारांनी संप केला. तेव्हा ही

परिस्थिती लक्षात घेऊन सरकारने सप्टेंबर १९२८ मध्ये औद्योगिक तंटे विषयक कायदा पास करून समन्वय समिती नेमण्याची व न्यायालयीन चौकशी समिती, लोकहित कामात संप, टाळेबंदी याविषयी नियम ठरविण्यात आले. तसेच संपात सहभागी न होणाऱ्या कामगारांना संरक्षण व भरपाई देण्याची तरतूद करण्यात आली होती.

भारतात दोन वर्षांच्या काळात औद्योगिक क्षेत्रात तीव्र अशांती, संप वगैरे झाले. त्यामुळे तत्कालीन सरकारने या सर्व गोष्टींचा विचार करून जुलै १९२९ मध्ये व्हिटले जे. एच. यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले होते. या कमिशनने अनेक ठिकाणी भेटी देऊन पाहणी करून जॉबरचे अधिकार काढून घेतले. एकंदरीत कामगारांच्या हिताचा विचार केला होता. याच दरम्यान या काळात जागतिक महामंदीची लाट निर्माण झाली. तेव्हा अनेक ठिकाणी कामगारांनी मोठ्या धैर्याने या संकटाशी लढा दिला. तसेच अखिल भारतीय पातळीवर १४८ कामगार लढ्याची नोंद झालेली आहे. त्यावेळी एस. एम. जोशी, काकासाहेब गाडगीळ, लालजी पेंडसे, खंडेराव आत्माराम यांनी कामगारांचे मनोधैर्य टिकविण्याचा प्रयत्न केला. मुंबईत एप्रिल १९३४ पासून संप सुरू झाला होता. ''जनता'' वृत्तपत्राने त्याची जाणीव करून दिली होती. परंतु कामगार नेत्यांमध्येही एकमत नव्हते. अशा परिस्थितीत दोन महिने संप करूनही कामगारांच्या पदरात काही पडले नाही. त्यावेळी संतापलेल्या कामगारांनी ४ जुलै १९३४ रोजी मुंबईतील परळ भागात केशवराव जोगळेकर, दि. के. बेडेकर या कम्युनिस्ट नेत्यांना मारहाण केली होती.[१९] याचे कारण म्हणजे हा संप बेकायदा ठरवून मोठ्या प्रमाणावर कामगारांची कपात केली होती.

मुंबई येथे १७ मे १९३६ रोजी मणिबेन कार यांच्या अध्यक्षतेखाली 'आयटक' चे अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनात 'नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन' आणि 'आयटक' या दोन्ही कामगार संघटनांचे एकीकरण करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता.[२०] तसेच या काळात दलित (अस्पृश्य) वर्गासह सर्व कष्टकरी जनतेला संघटित करून त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याकरीता

१५ ऑगस्ट १९३६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ''स्वतंत्र मजूर पक्ष'' स्थापन केला. यांच्या कार्यातून त्यांना भारताच्या राजकारणात सर्व कष्टकरी, श्रमजीवींचे ऐक्य साधावयाचे होते. या पक्षाच्या कार्यक्रमात समाजवादी तत्वाचा समावेश करण्यात आला होता. तसेच बाळासाहेब खेर यांनी २ सप्टेंबर १९३८ रोजी मुंबई विधानसभेत एक विधेयक सादर केले. त्यात त्यांनी संपापूर्वी समेट करण्यावर भर दिला. कामगार व कारखानदार यांच्यातील समेटात न्यायालयाचे प्रमुखाची नियुक्ती करण्यात यावी. त्यावेळी या विधेयकांवर चर्चा सुरू असतांना स्वतंत्र मजूर पक्षाने ''काळा कायदा'' म्हणून संप घडवून आणण्याचा प्रयत्न केला. धुळे, अमळनेर येथील गिरण्यात हा संप  यशस्वी झाला होता.

जागतिक दुसरे महायुध्द सुरू असतांनाच्या काळात कामगारांच्या वेतनात सुधारणा घडवून आणण्यासाठी कामगार चळवळ अधिक वाढीस लागली. कामगार संघटना, सरकारी कर्मचारी संघटना, रेल्वे, पोष्ट, गोदी, नगरपालिका या सर्व विभागांमध्ये कामगार संघटनांनी वेतनवाढीची मागणी लावून धरली. मुंबईत ट्रेड युनियन काँग्रेसने एक कृतीसमिती नेमली होती. महागाई भत्त्याच्या मागणीवरून मुंबईला ५ मार्च १९४० रोजी गिरणी कामगारांनी संप केला. तेव्हा सरकारने एस. ए. डांगे, टी. बी. रणदिवे या कामगार पुढाऱ्यांना अटक केली होती.[२१] शेवटी लवाद मंडळाच्या शिफारशीप्रमाणे कमी दराने महागाई भत्त्याची वाढ मान्य करून कामगारांनी संप मागे घेतला होता. हा थोड्याफार प्रमाणात कामगार वर्गाचा विजय होता.

महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या ''चले जाव'' चळवळीच्या वेळी ब्रिटिशांना कामगार वर्गाचे सहकार्य पाहिजे होते. त्याकरीता तत्कालीन गव्हर्नर जनरलने डॉ. बाबासाहेब  आंबेडकरांना कार्यकारी मंडळात मजूरमंत्री म्हणून नेमले. त्यांनी महात्मा गांधीजींच्या घोषणेचा धिक्कार करून मुंबई आकाशवाणीवर १३ नोव्हेंबर १९४२ रोजी ''भारतीय मजूर पक्ष आणि महायुध्द'' या विषयावर भाषण दिले.[२२] त्यात ते म्हणाले लोकशाही पक्षाचा विजय झाला तर स्वातंत्र्य व नवीन समाजरचना लाभेल. त्याकरीता कामगारांनी आपली सर्व शक्ती एकत्रित करून भारताची

मागणी करावी असे सांगितले होते. या दरम्यानच्या काळात राष्ट्रीय काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली ''हिंदूस्थान मजूरसेवक संघ'' या नांवाची राष्ट्रवादी कामगार कार्यकर्त्यांची एक नवीन संघटना स्थापन केली होती.[२३] दुसरे महायुध्द संपले त्यावेळी मध्यवर्ती सरकारकडून चालविण्यात येणाऱ्या सर्व क्षेत्रातील नोकरांनी पगारवाढ आणि इतर सवलती याकरीता जोरदार मागणी केली. कामगारांनी केलेल्या दडपणामुळे सरकारने मे १९४६ मध्ये वेतन मंडळाची नेमणूक केली. त्यावर कामगार वर्गाचे प्रतिनिधी म्हणून ना. म. जोशी यांची सभासद म्हणून नेमणूक करण्यात आली होती. या मंडळाने एक वर्षाच्या आत अहवाल व शिफारशी सरकारला सादर केल्या.[२४] त्या शिफारशींपैकी कामगारांचे कामाचे तास ९ ऐवजी ८ करण्यात आले. काँग्रेस मजदूर सेवक संघाने मे १९४७ मध्ये परिषद भरवून 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस' इंटकची घटना मंजूर केली. त्यामुळे वर्षभरात इंटकची चांगलीच वाढ झाली होती.

स्वातंत्र्यानंतर भारतीय जनतेच्या अपेक्षा वाढल्या. परंतु भारताच्या अर्थव्यवस्थेत चलन फुगवटयामुळे महागाईचे संकट उभे राहिले होते. सत्तेवर आलेल्या काँग्रेसने भांडवलदारी जोपासायला सुरवात केली होती. त्यामुळे भारतातील संपत्ती पुन्हा 'आहेरे' वर्गाकडे जमा होत गेली आणि 'नाहीरे' वर्ग अधिकाधिक दरिद्री होत गेला. तेव्हा स्वतंत्र भारताच्या संसदेने २८ ऑगस्ट १९४८ रोजी भारतातील कारखान्याविषयीच्या पूर्वीच्या कायद्याची मूळ चौकट कायम ठेवून १ एप्रिल १९४९ पासून संपूर्ण देशभर नवीन कायदा लागू केला होता. या दरम्यानचे काळात काँग्रेसमध्ये असलेल्या समाजवाद्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून मार्च १९४८ मध्ये 'समाजवादी पक्ष' स्थापन केला होता. त्यानंतर त्यांनी डिसेंबर १९४८ मध्ये ''हिंद मजदूर सभा'' ही नवीन संघटना स्थापन केली होती. या समाजवादी मिल मजदूर संघाने पुढाकार घेऊन बोनसच्या मागणीकरीता मुंबईमधील गिरणी कामगारांनी संप केला होता. हा संप ६३ दिवस चालला होता. शेवटी दोन महिन्याच्या पगाराइतकी रक्कम बोनस म्हणून स्वीकारावी अशी

शिफारस केल्यामुळे ऑक्टोबर १९५० मध्ये समाजवाद्यांनी संप मागे घेतल्याची घोषणा केली होती.

सन १९५१ नंतर आर्थिक नियोजनाचे युग सुरू झाले. पहिल्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक विकासाला निश्चित दिशा देऊन भरपूर भांडवल देऊ केले. परंतु त्याचे लाभ कामगार वर्गाला लगेच मिळाले नाहीत. ऑगस्ट १९५७ मध्ये भारत सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा अभ्यास करण्यासाठी दुसरा वेतन आयोग नेमला होता. त्याचा अंतिम अहवाल डिसेंबर १९५९ मध्ये प्रकाशित झाला.[२५] त्यात सरकारने काही दुरुस्त्या केल्या होत्या . कामगाराला दरमहा ८०/- रुपये वेतन द्यावे, भविष्य निर्वाह निधी सुरू करावी, कामाचे दिवस वाढवावेत अशा शिफारशी केल्या होत्या.

## नाशिक जिल्ह्यातील उद्योगधंद्यांची सुरवात

गुजरातमधून नाशिकला स्थलांतर केलेल्या तांबट व कंसारा समाजातील लोकांनी खऱ्या अर्थाने नाशिकला उद्योगधंद्याची (कारखानदारीची) सुरवात केली. त्यामध्ये त्यांनी तांबे व पितळाची भांडी बनविण्याचा कारखाना सर्वात प्रथम सुरू केला होता.[२६] तसेच हातमागावर कापड विणण्याचा, रेशमी वस्त्रे तयार करण्याचा आपण ज्याला कुटीरउद्योग म्हणतो तसे व्यवसाय नाशिक जिल्ह्यात स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू झालेले आहेत. सन १८५७ मध्ये ब्रिटिश सरकारच्या विरोधात उठाव झाला. त्यावेळी उत्तर प्रदेशातील विणकर समाजाचा अतोनात छळ झाला. तसेच सन १८६४ मध्ये उत्तर भारतात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमध्ये तेथील विणकर समाजाच्या जीवन व अर्थार्जनावर संकट आल्यामुळे त्या ठिकाणचा मुस्लीम विणकर समाजाने आपल्या रोजीरोटीचा प्रश्न सोडविण्याकरीता दक्षिणेकडे स्थलांतर केले. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या धुळे, मालेगांव, भिवंडी, मुंबई इत्यादी ठिकाणी स्थायिक झाले.[२७] मालेगांव, चांदवड, नाशिक, येवला, दिंडोरी या ठिकाणी विणकाम केले जात होते.

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव व येवला या ठिकाणी शटल असलेला हातमाग चालत असे. मालेगावात सन १९२५ मध्ये संपत मिस्त्री नावाच्या

व्यक्तीने सोलापूर येथून शटल आणले होते.[२८] तेव्हापासून मालेगावात शटल असलेले हातमाग आहेत. त्यानंतर सन १९३५ पासून यंत्रमाग व्यवसायास सुरवात झाली.

नाशिक शहरापासून काही कि.मी. अंतरावर असलेल्या सिन्नर येथे सन १८६२ मध्ये परदेशी विडी उद्योग सुरू झाला होता. त्यानंतर सन १९०५ मध्ये कै. शंकरराव बाळाजी वाजे यांनी विडी उद्योगाला सुरवात केली.[२९] ब्रिटिश काळात नाशिकला रेल्वेचा पहिला वर्कशॉप सन १९०१ मध्ये सुरू झाला. त्यातून नाशिकरोड रेल्वे स्टेशन हे महत्त्वाचे रेल्वे स्टेशन म्हणून प्रसिध्दीस आले होते. या ठिकाणी ट्रॅक्शन वर्कशॉप सुरू झाले. त्या वर्कशॉपमध्ये ३०० कामगार कार्यरत होते. या वर्कशॉपमधून दर महिन्याला ३० रेल्वेच्या मोटार्स तयार होतात. नाशिक शहरात सन १९०४ मध्ये स्वस्तिक आयर्न कंपनीची स्थापना झाली. तसेच सन १९२१ मध्ये जिनिंग फॅक्टरीची सुरवात झाली.

तसेच नाशिकरोड येथे सन १९२४ मध्ये भारत प्रतिभूती मुद्रणालयाच्या (इंडिया सिक्युरिटी प्रेस) माध्यमातून खऱ्या अर्थाने मोठ्या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली गेली. या प्रेसमधून पोस्टकार्ड, पोस्टाची तिकीटे तसेच इतर प्रकारची स्टेशनरी छापण्यात येते. या प्रेसला जोडून केंद्र सरकारने सन १९२८ मध्ये मुद्रांक (स्टॅम्प) डेपो स्थापन केला. त्या अनुषंगाने छोटे मोठे उद्योगधंदे जिल्ह्याच्या परिसरात सुरू झाले. सन १९३३ मध्ये वालचंद उद्योग समूहाने मालेगाव तालुक्यातील रावळगाव येथे रावळगाव शुगर फॅक्टरी स्थापन केली. आजही हा कारखाना अग्रेसर कारखाना म्हणून ओळखला जातो. या कारखान्याने साखरेबरोबर चॉकलेट आणि गोळीचे उत्पादन सुरू केले आहे. तसेच सन १९३३ मध्ये नाशिक शहरात पहिली फाऊंड्री सुरू झाली. त्यातून सर्व प्रकारची ओतीव कामे केली जातात.

नाशिक शहरात साबण तयार करणाऱ्या कारखान्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.[३०] या कारखान्यामध्ये तयार करण्यात आलेला साबण जिल्हयातील सर्वच गांवामध्ये मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी पाठविला जातो. या कारखान्यामुळे

नाशिकमध्ये रोजगाराची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. नाशिकरोड गांधीनगर येथे सन १९५७ मध्ये न्यू करन्सी नोट प्रेसची स्थापना करण्यात आली. त्याच्या जोडीला महत्त्वाच्या सरकारी कागदपत्राच्या छपाईच्या कारखान्याची सुरवात केली.[३१] या प्रेसमध्ये १०-१२ हजार कामगार काम करतात. तसेच तेलबियांपासून तेल गाळप करणाऱ्या तेल कारखानेही आहेत. या कारखान्यामधून शेंगदाण्याचे तेल, तिळाचे तेल, खुरसणीचे तेल मोठ्या प्रमाणात उत्पादित केले जाते. सन १९६३ मध्ये संपूर्ण नाशिक जिल्ह्यात एकूण ५०० च्या जवळपास तेल गाळण्याचे कारखाने होते.[३२] तसेच नाशिक शहरात भात (तांदूळ) काढण्याच्या गिरण्या (मिल्स) आहेत. अनेक प्रकारच्या डाळी मशिनद्वारे तयार केल्या जातात.

सन १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेले यशवंतराव चव्हाण यांची सन १९६२ च्या भारत चीन युध्दाच्या वेळी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संरक्षणमंत्री म्हणून नेमणूक केली होती. तेव्हा यशवंतराव चव्हाण यांनी नाशिकजवळ विमान बांधणीचा कारखाना सुरु करण्यासाठी जवळजवळ ३५०० एकर जमीन हस्तांतरीत केली.[३३] ओझर गावाजवळ ''हिंदुस्थान ऍरोनॉटिक्स लिमिटेड'' नावाचा विमान बांधणीचा कारखाना स्थापन केला आहे. या कारखान्यात रशियाच्या मदतीने एम. आय. जी. (मिग) नावाने युध्दामध्ये वापरण्यात येणारे विमान तयार करण्यात येतात. सन १९७० मध्ये तयार करण्यात आलेले पहिले मिग विमान इंडियन एअर फोर्सकडे देण्यात आले. ओझर मिग कारखान्यात आज रोजी काम करणाऱ्या कामगारांची संख्या मोठी आहे. या कामगारांना सरकारने स्वतंत्र विविध सोयी सुविधा उपलब्ध असलेल्या वसाहतीची उभारणी केली आहे. त्याच्या या वसाहतीला ''ओझर टाऊनशीप'' असे नाव देण्यात आले आहे. या कारखान्यामुळे नाशिकच्या औद्योगिकरणात मोठा हातभार लागलेला आहे.

तेलबियांपासून तेल गाळप करणारे कारखाने नाशिक शहरात आहेत. या कारखान्यामध्ये शेंगदाण्याचे तेल, तिळाचे तेल, खुरसणीचे तेल मोठ्या प्रमाणात गाळप केले जाते. या तेल कारखान्याची मालकी साधारणपणे मारवाडी, तेली

समाजातील व्यक्तिंकडे असलेली दिसते. इ. स. १९६३ सालच्या सर्व्हेक्षणानुसार संपूर्ण नाशिक जिल्ह्यात साधारणपणे १००० च्या जवळपास तेल गाळपाचे कारखाने नोंदणीकृत होते.[३४] नाशिक जिल्हयाच्या पश्चिम भागातील शेतकरी आपल्या शेतीतून मोठ्या प्रमाणात भाताचे उत्पादन घेतात तेव्हा हा पिकविलेला भात स्वच्छ करण्याकरीता नाशिक जिल्हयात भात (तांदूळ) काढण्याच्या गिरण्या आहेत. या गिरण्यांमध्ये मशीनच्या सहाय्याने भाताचा भुसा व तांदूळ अलग केला जातो. तसेच तांदळापासून पोहे व मुरमुरे हे खाद्य पदार्थ तयार केले जातात. ते पदार्थ तयार करण्याचेही कारखाने या परिसरात आहेत. अशा प्रकारे नाशिक जिल्हयात कारखानदारीची सुरूवात झाली होती.

नाशिक जिल्ह्यात सहकारी संस्थाची स्थापना झाली होती. त्यामुळे येथील जनतेला नवीन कार्यक्षेत्र उपलब्ध झाले होते. महाराष्ट्रातील मुंबई व पुणे या शहरांच्या नंतर औद्योगिकरणाचा विकास करण्यासाठी नाशिक शहर या शहराइतके महत्त्वाचे आहे असा दृढ विश्वास नाशिकमधील ध्येयवादी व्यक्तिच्या मनात निर्माण झाला होता. या व्यक्तिंमध्ये गोपाळराव सैंदाणकर, वा. का. जोशी, गोविंदराव देशपांडे, रावबहादूर प्रधान, माधवराव जोरणकर, बी. एच. काझी त्याचबरोबर नाशिक शहराचे नेतृत्व करणारे तत्कालीन बाबूभाई राठी, दादासाहेब पोतनीस, दादासाहेब अंधृटकर, महादेव शुक्ल, प्रेमजीभाई वालिया, देवकिसन व किसनलाल सारडा त्या काळातील या व्यक्तिंची नांवे घेता येतील. तत्कालीन या ध्येयवादी लोकांनी केलेल्या प्रयत्नांना राज्य पातळीवर कार्य करणाऱ्या पंजाबराव देशमुख व स. का. पाटील यांनी मार्गदर्शन करून साथ दिली होती. त्यांनी केलेल्या सहकार्याने नाशिक शहरातील वा. का. जोशी व गोपाळराव सैंदाणकर यांनी घेतलेल्या पुढाकारातून आयुर्वेदिक कारखान्याची स्थापना झाली होती.[३५] यामुळे नाशिकमधील जनतेला बऱ्यापैकी आरोग्यविषयक औषधे उपलब्ध होऊ लागली होती.

नाशिक जिल्हयात औद्योगिकरणाचा विस्तार व्हावा त्याकरीता प्रयत्न करणारे गांवकरी वृत्तपत्रांचे तत्कालीन संपादक दादासाहेब पोतनीस हे प्रयत्नशील

होते. त्यांनी सूत्रबध्द आराखडा तयार करण्यासाठी परिश्रम घेतले. तसेच इ. स. १९५८ मध्ये नाशिक येथे एक चर्चासत्र आयोजित करून त्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उद्योगमंत्री शेषराव वानखेडे यांना दिली होती. त्या माहितीच्या आधारावर औद्योगिक वसाहतीचा १ मे १९६० रोजी आराखडा तयार केला होता. तेव्हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १ ऑगस्ट १९६० रोजी या कल्पनेस मान्यता दिली होती. त्यानंतर नाशिकमध्ये औद्योगिक वसाहतीची उभारणी करण्यासाठी २२ जानेवारी १९६३ रोजी भूमिपूजन समारंभ पार पडला होता. नाशिक त्र्यंबकेश्वर रस्त्यावर असणाऱ्या सातपूर गावाजवळ औद्योगिक वसाहतीची स्थापना केली होती. या औद्योगिक वसाहतीच्या उभारणीसाठी सातपूर गावाजवळ ६३७ हेक्टर जमीन आरक्षित करण्यात आली होती. या वसाहतीत सुरूवातीस मायको बॉश हा प्रकल्प सुरू झाला होता. सातपूरमध्ये औद्योगिक विकास व प्रगतीकरीता जे क्षेत्र मान्य करण्यात आले होते त्या ठिकाणी ७३९ भूखंड उद्योगधंद्याकरीता विभागण्यात आले होते. याचा थोडक्यात अर्थ म्हणजे या ठिकाणी ७३९ नवीन कारखाने करण्यात येणार होते.[३६] सातपूरमध्ये औद्योगिक विकासाकरीता जे क्षेत्र मान्य करण्यात आले होते त्यामुळे नाशिक शहर व जिल्ह्याच्या विकासात, आर्थिक समृध्दीत व रोजगाराच्या क्षेत्रात फार मोठी भर पडली होती.

मुंबई, पुणे आणि महाराष्ट्र राज्याबाहेरील अनेक उद्योजक, कारखानदार नाशिकच्या औद्योगिक क्षेत्रात भांडवल गुंतविण्यास, आपला उद्योग स्थापन करण्यासाठी उत्सुक होते. याला कारण म्हणजे मुंबई व पुणे या दोन्ही शहरापासून सम अंतरावर हे शहर वसलेले होते. तसेच या शहरामध्ये व्यापाराच्या निमित्ताने ये-जा करण्यासाठी येणाऱ्या माल वाहतूक वाहनासाठी चांगले रस्ते होते. तसेच नाशिकचा एक भाग असलेले नाशिकरोड या ठिकाणी रेल्वेचे स्टेशन आहे. येथून देशाच्या अनेक मोठमोठ्या शहरांना जोडणारे मार्ग आहेत. त्यामुळे मालाची ने-आण करणे सोयीचे ठरणार होते.

नाशिकमध्ये सातपूर व अंबड या दोन प्रमुख औद्योगिक वसाहती उभ्या राहिल्यानंतर नाशिक जिल्ह्यातील जनतेला रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली होती. या वसाहतीतील मोठमोठ्या कारखान्यांवर अवलंबून असणारे अनेक लहानलहान लघुउद्योग उभारले गेले होते. येथील उपलब्ध असणाऱ्या सोयीसुविधा तसेच उद्योग क्षेत्राला अनुकूल असणारे हवामान यामुळे या ठिकाणी महाराष्ट्र राज्यातूनच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातील अनेक ठिकाणाहून उद्योजक या ठिकाणी आकृष्ट झाले होते. या औद्योगिक क्षेत्राचा विचार करता एकूण २०५८ उद्योगापैकी १९६४ उद्योग हे लघु उद्योग आणि ९३ मोठे उद्योग स्थापन झाले होते. त्यापैकी ५८१ लघुउद्योग आणि ९ मोठे उद्योग बंद पडलेले आहेत.[३७] तसेच येथील मिटकॉन आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या दोन्ही संघटनांच्या संयुक्त पुढाकाराने फक्त महिलांसाठी चालविण्यात येणाऱ्या उद्योगाकरीता एक वेगळी वसाहत इ. स. १९८० मध्ये स्थान करण्यात आली आहे.[३८] महाराष्ट्र राज्यातील पहिली महिला औद्योगिक वसाहत म्हणून नाशिक शहरातील अंबड परिसरातील औद्योगिक क्षेत्रात स्वतंत्र जागा राखून ठेवण्यात आली आहे. या वसाहतीत अनेक महिला समर्थपणे आपले उद्योग चालवित आहेत. या औद्योगिक वसाहतीला पाण्याची फार गरज असते. पाण्याची ही समस्या निवारण्याकरीता महानगरपालिकेने पाण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. तसेच या औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना आर्थिक मदत करण्याकरीता 'सिकॉम' ही कर्ज पुरवठा करणारी संस्था उभारण्यात आलेली आहे.

नाशिकमध्ये असलेल्या सातपूर औद्योगिक वसाहतीत वेगवेगळया प्रकारचे आंतरराष्ट्रीय स्तरावर नावारूपास आलेले उद्योगांची स्थापना झालेली आहे. या उद्योगांमध्ये जर्मनी या राष्ट्राने मायको, मुंबई येथील व्ही. आय. पी. बॅग्ज तयार करणारा कारखाना, जीप गाडी तयार करणारा महिंद्रा ॲण्ड महिंदा तसेच शेतीसाठी उपयुक्त असणारे महिंद्रा सरपंच ट्रॅक्टर तयार करणारा हा कारखाना आहे. या उद्योगाव्यतिरिक्त इलेक्ट्रॉनिक्स व इलेक्ट्रिकल विजेची उपकरणे यांची निर्मिती करणारा क्रॉम्प्टन ग्रिव्हज हा कारखाना आणि असे विविध प्रकारचे अनेक

नामांकित कारखाने नाशिक शहराच्या परिसरात उभारले गेले आहेत. एशिया, ज्योती स्ट्रक्चर, इलेक्ट्रीक कन्ट्रोल, कार्बन कॉर्पोरेशन, पुना स्वीच गिअर, इंडियन व्हॉल्व्ह, सिमेन्स, बुश इंडिया लिमिटेड, सीएट, सुदर्शन ॲल्युमिनिअम, महिंद्रा स्पायसर, तापरिया टूल्स, बिझनेस कम्बाईन, एक्स्लो अशा प्रकारचे अनेक उद्योग या ठिकाणी उभारले गेले आहेत.[३९] तसेच या कारखान्यांमध्ये तयार करण्यात येणाऱ्या वस्तुंकरीता लागणाऱ्या लहान वस्तू तयार करणाऱ्या अनेक लघु उद्योगांनाही महत्त्वाचे स्थान आहे. अशा उद्योगाचीही संख्या बरीच मोठी आहे.

नाशिकच्या अंबड परिसरात सन १९७७ मध्ये औद्योगिक वसाहतीची स्थापना झालेली आहे.[४०] इ. स. १९८० नंतर मोठ्या प्रमाणामध्ये औद्योगिक विकासाच्या दृष्टीने जणूकाही चळवळ उभी राहिली होती. नाशिक शहराची पूर्वीपासून तीर्थक्षेत्र म्हणून ओळख होती. त्याची आता तीर्थक्षेत्राबरोबर सातपूर आणि अंबड या दोन औद्योगिक वसाहतीच्या नावाने ओळख निर्माण झाली आहे.

नाशिक शहर परिसरात चालविण्यात येणाऱ्या उद्योगामधून तयार करण्यात येणारी स्टेशनरी, क्रीडा साहित्य, शेतीउपयोगी वस्तू, रसायने, इंजिनिअरींग इलेक्ट्रीकल वस्तू, ॲटोमोबाईल्स तसेच वेगवेगळया यंत्राचे सुटे भाग तसेच काही वैशिष्ट्यपूर्ण औजारे, वस्तूंची अमेरीका, दक्षिण आफ्रिका, आखाती देश तसेच जगातील अनेक छोट्या-मोठ्या राष्ट्रांमध्ये निर्यात केली जातात. त्यामुळे नाशिकची औद्योगिक वसाहत फक्त महाराष्ट्र राज्याच्या किंवा भारत देशाच्या नकाशापुरती मर्यादित न राहाता जगाच्या नकाशावर या औद्योगिक वसाहतींनी आपल्या नावाचा लौकिक मिळविला आहे.

## नाशिक जिल्ह्यातील व शहरातील कामगार चळवळ

नाशिक जिल्ह्यातील नाशिकरोड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात ब्रिटिश काळात इ.स. १९२४ मध्ये 'करन्सी प्रेस' ची स्थापना करण्यात आली. सुरुवातीच्या काळात या प्रेसमध्ये पोष्ट कार्ड, पोष्टाची तिकीटे इत्यादी छपाई केली जात होती. नाशिकरोड येथील सिक्युरिटी प्रेसमधील कामगारांना त्या काळात नोकरीवरून निवृत्त झाल्यावर पेन्शन आणि ग्रॅच्युईटी वगैरे काहीच मिळण्याची

योजना नव्हती. तेव्हा या समस्येला वाचा फोडण्यात तेथील कामगारांनी आपले शिष्टमंडळ वारंवार भाऊराव (दादासाहेब) गायकवाड यांचेकडे नेले होते. या कामगारांची ही अडचण अगदी समर्पक होती. त्यावेळी या समस्येसंदर्भात आपण काही तरी केले पाहिजे हा विचार त्यांनी केला होता. कामगारांनी ३० वर्षे इनामे इतबारे सेवा केल्यावर त्यांना वृध्दापकाळात त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होत होता. वृध्दापकाळात त्यांना पोरके व्हावे लागत होते. त्यावेळी २३ जून १९३७ रोजी एक्साईज इन्स्पेक्टर मि. नाईट हे नाशिकरोड येथे आले होते.[४१] तेव्हा त्यांच्यासमोर ही तक्रार मांडण्याकरीता भाऊराव (दादासाहेब) गायकवाड नाशिकरोडला आले होते. दादासाहेब गायकवाड यांनी त्यांची भेट घेतली. त्या भेटीत दादासाहेब गायकवाड यांनी कामगारांची समस्या, प्रश्न इंग्रजीमध्ये मि. नाईट यांच्यासमोर मांडली होती.

२० व्या शतकाच्या मध्याच्या काळात महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या हिंदी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकारिणीशी इ. स. १९४२ मध्ये संघटनात्मक व तात्त्विक मतभेद झाल्यामुळे वेगळे झालेले कॉ. एस. के. लिमये, कॉ. भाऊ फाटक, कॉ. यशवंत चव्हाण व वसंतराव नाईक या सर्व व्यक्तिंनी मिळून आपली स्वतंत्र ''नवजीवन'' नावाची संघटना २१ जानेवारी १९४३ रोजी स्थापन केली होती.[१८१] त्यांनी या संघटनेच्या स्थापनेपासून कामगारवर्गात कम्युनिस्ट पद्धतीने संघटनाचे काम सुरू केले होते.

भारतात इंग्रजी सत्तेचा अंमल होता. त्या काळात नाशिकरोड येथे रेल्वे माल धक्का सुरू झाला होता. या माल धक्क्यावर उतरविण्यात येणारा माल शहापूर, ओझर, मालेगांव, दिंडोरी, सटाणा इत्यादी ठिकाणी कार्टिंग एजंटाच्या मार्फत पोहचविण्यात येत होता. या कार्टिंग एजंटाच्या नियंत्रणाखाली रेल्वे बोगीतून माल उतरविण्याचे काम अनेक कामगार करत होते. या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत काम करावे लागत होते. कारण हे सर्व कामगार खाजगी क्षेत्रात काम करतात. तेव्हा या कार्टिंग एजंटाच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या कामगारांनी इ. स. १९२७ मध्ये आपल्या

असणाऱ्या मूलभूत समस्यांची सोडवणूक करण्याकरीता कार्टिंग एजंटाकडे दाद मागितली.[४२] त्यावेळी कार्टिंग एजंटांनी कामगारांनी केलेल्या मागण्यांची समस्या सोडविण्याकरीता त्यांना वर्षातून ५ दिवस पगारी सुट्टी आणि दिवसाला एक तास विश्रांतीकरीता सुट्टी देण्याचे मान्य केले होते.

रेल्वेच्या मालधक्यावर माल उतरविणाऱ्या कामगारांचे त्या ठिकाणी असलेले कार्टिंग दलाल (एजंट) वेगवेगळया कारणातून शोषण करीत असत. रेल्वेच्या मालधक्यावर आलेल्या मालवाहू गाडीच्या बोगीतून माल खाली करण्याच्या कामात जर ठराविक वेळेपेक्षा जास्त वेळ लागला किंवा माल उतरविला गेला नाही तर रेल्वे प्रशासन कार्टिंग एजंटाकडून उशीराचे शुल्क वसूल करीत. त्यावेळी कार्टिंग एजंट हे या धक्यावर काम करणाऱ्या कामगारांकडून तेवढे पैसे वसूल करत असत. माल धक्क्यावर उतरविण्यात येणारा माल वेळेत उतरविता आला नाही तर रेल्वे प्रशासन कार्टिंग्ज एजंटाकडून 'वारफेम' नांवाचा कर आकारत असे. हा कर कार्टिंग एजंट कामगारांच्या पगारातून कपात करत असत. तेव्हा या व्यवस्थेत त्या कामगारांची कोणत्याही प्रकारची चूक नसते म्हणजे एखादा कार्टिंग एजंटकडे २० कामगार असतील आणि मालगाडीच्या डब्याची संख्या ४० असेल त्यावेळी हे काम जे कामगार वेळेत पूर्ण करू शकत नाहीत त्या परिस्थितीचा विचार करून अलीकडच्या काळात कामगारांनी माथाडी कामगार जनरल युनियन, कराड कम्युनिस्ट कामगार पक्ष इत्यादी कामगार संघटनांची स्थापना करून या संघटनांच्या माध्यमातून मुकादम पद्धतीचा अवलंब केलेला आहे. त्यांनी स्वीकारलेल्या पद्धतीमुळे पूर्वीच्या पद्धतीला काही प्रमाणात आळा बसलेला आहे.[४३] वरील सर्व बाबींचा विचार करता रेल्वे माल धक्क्यावर काम करणाऱ्या कामगारांचे कामाचे स्वरूप अतिशय कष्टाचे आहे. त्याच बरोबर त्यांना आपले जीवन अतिशय हलाखीत जगावे लागते. तसेच या एजंटाकडून त्यांना मिळणाऱ्या कामाची शाश्वती नसते. त्याबरोबर आरोग्याच्या फारशा सुविधा उपलब्ध होत नाहीत. एकंदरीत या कामगारांचे जीवन अस्थिर स्वरूपाचे असते.

स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्यांनी या जाहीरनाम्यात गरीब, कामगार, बेरोजगार यांच्या हिताची काळजी वाहण्याचे निश्चित केले होते. त्यानंतर नाशिक जिल्हयातील मनमाड येथे १२, १३ फेब्रुवारी १९३८ रोजी ''अखिल भारतीय जी. आय. पी. रेल्वे दलित (अस्पृश्य) कामगारांची परिषद आयोजित केली होती. या परिषदेत १३ फेब्रुवारी १९३८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ''भारतातील कामगार चळवळीची दशा आणि दिशा'' या विषयावरील भाषणात बोलतांना म्हणाले, ''देशातील कामगारांना दोन शत्रूंशी तोंड द्यावे लागत आहे. हे दोन शत्रू म्हणजे ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही ह्या होय.'' तसेच ''भारतात सापेक्षपणे निश्चित असे दोन वर्ग अस्तित्वात नाहीत. सर्व कामगार एक असून त्यांचा एक वर्ग आहे. ही घोषणा आदर्शरूप असून ती प्रत्यक्षात उतरावयाची आहे. त्याकरीता कामगारांच्या ऐक्यामध्ये आड येणारी कारणे नष्ट करणे हाच कामगार ऐक्याचा खरा मार्ग आहे.'' त्याचबरोबर कामगार वर्गाच्या जीवनस्तराचे कमी होण्यापासून संरक्षण करणे हा कामगार संघटनाचा मुख्य उद्देश आहे.''[४४] त्यांनी मांडलेल्या या विचारातून श्रम करणाऱ्या कामगार वर्गाच्या जीवनाविषयी त्यांचे चिंतन किती उदात्त होते यांची जाणीव होते. तसेच त्यांनी कामगारांच्या जीवनावर अन्याय करणाऱ्या तत्कालीन समाजात प्रचलित असलेल्या दोन्ही अन्यायकारी वर्गाला जाणीव करून दिली होती.

नाशिक जिल्ह्यात समाविष्ट असलेल्या मालेगाव तालुक्यातील रावळगांव येथे वालचंद हिराचंद शेठ यांनी पारतंत्र्याच्या काळात इ. स. १९३४ मध्ये खाजगी मालकी असलेला साखर कारखाना स्थापन केला होता. तेव्हा या कारखान्यात असलेल्या कामगार वर्गाने इ. स. १९४६ पर्यंत कामगार संघटना स्थापन केली नव्हती. परंतु दुसरे जागतिक महायुध्द सुरू झाले, त्यावेळी परिस्थिती बदलली. मानवाला आवश्यक असणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या भावात मोठी वाढ झाली होती. परंतु कामगारांच्या मिळणाऱ्या वेतनात कोणत्याही प्रकारची वाढ झाली नाही. त्यामुळे कामगारांना मिळणाऱ्या वेतनातून त्यांच्या कुटुंबाच्या दैनंदिन

गरजांची पूर्तता होत नव्हती. तेव्हा या कामगारांनी कारखाना मालकाकडे वेतनवाढीची मागणी केली. परंतु कारखाना मालकांनी कामगारांच्या या मागणीकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे कारखान्यातील कामगारांनी आपली मागणी मान्य करून घेण्यासाठी संघटित होऊन इ. स. १९४६ मध्ये ''रावळगाव साखर कारखाना कामगार'' नांवाची संघटना स्थापन केली होती. कामगारांनी या संघटनेच्या माध्यमातून आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्याकरीता ३ जानेवारी १९४७ रोजी संप पुकारला होता. कामगारांनी अंगिकारलेल्या या धोरणामुळे कारखाना मालक व कामगार यांचे संबंध बिघडले. त्यातून रावळगांव साखर कारखान्यात कायमस्वरूपी कामावर असलेल्या ३०० कामगारांना कारखाना मालकाने कामावरून कमी केले होते. त्यामुळे या कारखान्यात दोन वर्षे परिस्थिती अस्थिर झाली होती. शेवटी कारखाना मालक व कामगार यांची एकत्र सभा झाली होती. या सभेत झालेल्या चर्चेतून कामगार व मालक यांनी समजुतीची भूमिका घेतली होती.[४५] त्यामुळे कारखाना मालकाने कामगारांना कामावर घेतले होते. परंतु संपात सहभागी असलेल्या कामगारांपैकी काना कामगारांना कायमचे कामावरून काढून टाकले होते.

भारतात तत्कालीन काळात कार्यरत असलेल्या समाजवादी गटाने वेगवेगळया क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कामगारांना संघटित करण्याकरीता इ. स. १९४८ च्या उत्तरार्धाच्या काळात ''हिंद मजदूर सभा'' नांवाची कामगार संघटना स्थापन केली होती. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील समाजवादी विचारसरणीचे नेते यादव नारायण जाधव यांनी मालेगाव येथे ''हिंद मजदूर सभा'' नावाची कामगार संघटना स्थापन केली होती. त्यांनी सुरुवातीच्या काळात या संघटनेच्या माध्यमातून मालेगावातील भंगी कामगारांचे संघटन केले होते. तसेच त्यांना न्याय मिळवून दिला होता. यानंतर त्यांनी रावळगाव साखर कारखान्यातील कामगार गंगाधर ओगले आणि राजाराम लाला बच्छाव यांच्या सहकार्याने तेथील कामगारांना एकत्र केले होते. तसेच सर्व कामगारांना संघटित करून इ. स. १९४९ मध्ये ''रावळगांव येथे'' ''हिंद मजदूर सभा'' संघटनेची

स्थापना केली होती. या संघटनेच्या माध्यमातून कारखाना मालकाने कायमस्वरूपी कामावर असलेल्या ३२ कामगारांना कमी केले होते. त्या कामगारांना पुन्हा कामावर घेण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केले होते. त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश येऊन कारखाना मालकाने त्या कामगारांना कामावर घेतले होते. त्याचबरोबर या कारखान्यात हंगामी कामावर असलेल्या कामगारांना साप्ताहिक पगार दिला जात होता. तो पगार मासिक देण्यात यावा. तसेच या कामगारांना १५ दिवस हक्कांची रजा मिळावी, ७ दिवस आजारी रजा मिळावी, प्रॉव्हिडंट फंड कपात करण्यात यावा.[४६] या कामगारांच्या मागण्याकरीता संघटनेच्या माध्यमातून सभा, मोर्चे यांचे आयोजन करून कामगारांच्या पदरात काहीतरी मिळवून देण्याकरीता प्रयत्न केले होते.

रावळगांव येथे मालेगांव येथील हिंद मजदूर सभेने २३ डिसेंबर १९५५ रोजी सदानंद वर्टी यांच्या अध्यक्षतेखाली माधवराव लिमये,दत्ता ताम्हणे यांच्या उपस्थितीत ''महाराष्ट्रातील साखर कामगार प्रतिनिधी'' यांची परिषद भरविण्यात आली होती. या परिषदेतून कामगारांनी बोनस मिळविण्याकरीता मागणी केली होती.[४७] तेव्हा संघटनेने केलेल्या प्रयत्नांना यश येऊन कामगारांना बोनस देण्यास कारखाना मालकाला भाग पाडले होते. त्यानंतर कारखाना परिसरात कामगारांना सोयी सुविधा मिळविण्याकरीता ११ नोव्हेंबर १९५६ रोजी यादव नारायण जाधव यांच्या अध्यक्षतेखाली तसेच शिवाजी पाटील, राजाराम लाला बच्छाव आणि शाहीर मालजी नाईक यांच्या उपस्थितीत कामगारांची सभा घेण्यात आली होती. त्यावेळी या सभेत कामगारांकरीता कारखाना परिसरात कारखाना मालकाने दवाखान्याची सुविधा, पगारवाढ, भविष्य निर्वाह निधी कपातीची मागणी केली होती. तसेच सरकारने मंजूर केलेल्या किमान वेतन कायद्यान्वये निश्चित केलेले २४ रुपये प्रतिदिन मोबदला (पगार) या बाबी लागू करण्यात याव्यात.[४८] या मागण्या मांडल्या होत्या. या सर्व बाबी येथील कामगारांना कारखाना मालकाने लागू कराव्यात याकरिता प्रयत्न केले होते.

रावळगाव येथील कारखाना मालक येथे काम करणाऱ्या कामगारांना अस्थिर ठेवण्याकरीता त्यांच्या सेवा जाणूनबुजून खंडित करीत असे. त्याचबरोबर कामगारांच्या महागाई भत्त्याच्या दरात वाढ करीत नव्हते. त्या हिंद मजदूर सभेने कारखाना मालकाच्या या मनमानी कारभाराविरोधी तत्कालीन सरकारकडे कामगारांचे गाऱ्हाणे मांडले होते. संघटनेने केलेल्या या गोष्टीची प्रत्यक्ष पाहणी करण्याकरीता मध्यवर्ती सरकारमध्ये त्या काळात कार्यरत असलेले मजूरमंत्री शांतीलाल शाह यांनी रावळगांव येथे प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी करून कामगार नेत्यांशी चर्चा केली होती. तसेच कारखाना मालकाला कामगारांना योग्य त्या सोयी सुविधा देण्याची सूचना केली होती.[४९] त्यांनी केलेल्या या शिफारशीनुसार पुढील काळात कारखाना मालकाने कामगारांच्या हिताकरीता कारखाना परिसरात कामगारांना निवासी घरे बांधून दिली होती. कामगार वर्गाच्या मुलांच्या शिक्षणाकरीता शैक्षणिक सोय उपलब्ध करून दिली होती.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या ''सिक्युरिटी प्रेस'' आणि ''गव्हर्नमेंट प्रिंटींग प्रेस'' या दोन्ही ठिकाणी असलेल्या कामगारांनी कामगार संघटनेची स्थापना केली होती. प्रारंभीच्या काळातील येथील कामगारांनी आपली संघटना 'इंटक' संघटनेला जोडली होती. या दोन्ही प्रेसमधील कामगारांना आठवडयाला कामाचे जे तास निश्चित करण्यात आले होते त्यामध्ये तफावत होती. सिक्युरिटी प्रेस कामगारांना ४८ तास काम लागत होते तर प्रिंटीग प्रेसमधील कामगारांना ४२ तास काम करावे लागत होते. या कामाच्या तासांची असलेली तफावत दूर करण्याकरीता इ.स. १९५७-५८ मध्ये नाशिकरोड येथील गव्हर्नमेंट सिक्युरिटी प्रेसमधील कामगारांनी ''हिंद मजदूर सभे''च्या माध्यमातून कामाच्या तासामध्ये असलेली तफावत दूर करण्याची मागणी केली होती. सरकारने मात्र कामगारांच्या या मागणीकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे गव्हर्नमेंट सिक्युरिटी प्रेसमधील कामगारांनी तेथे कार्यरत असलेल्या ''हिंद मजदूर सभे''चे अध्यक्ष रामभाऊ खेडगीकर यांच्या नेतृत्वाखाली १४ डिसेंबर १९५७ रोजी संप पुकारला होता.[५०] कामगारांचा हा संप २९ दिवस चालला होता.

त्यावेळी संपाला अयोग्य वळण लागू नये, कामगारांनी केलेली मागणी योग्य मार्गाने मान्य व्हावी याकरिता अनेक कामगार कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले होते. तेव्हा या संप काळात ३१ डिसेंबर १९५७ रोजी संपकरी कामगारांना मार्गदर्शन करण्याकरीता प्रेस जिमखाना मैदानावर महाराष्ट्र राज्य समाजवादी पक्षाचे नेते एस. एम. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित केली होती. या सभेत अनेक ठिकाणच्या हिंद मजदूर सभेच्या कामगार नेत्यांनी कामगारांना मार्गदर्शन केले होते. सभा समाप्त झाल्यावर ''हिंद मजदूर सभा'' कामगार युनियनच्या कार्यकारी मंडळाची बैठक घेण्यात आली होती.[५१] या बैठकीत संपाविषयी वाटाघाटी करण्यावर विचारविनिमय करण्यात आला होता. या बैठकीत करण्यात आलेल्या चर्चेच्या आधारावर कामगारांची मागणी एस. एम. जोशी यांनी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांच्यापुढे मांडली होती.[५२] त्यानंतर २ जानेवारी १९५८ रोजी सिक्युरिटी प्रेसच्या संपकरी कामगारांनी टाळ मृदुंगाच्या गजरात आपल्या मागणीची जाणीव करून देण्याकरीता मिरवणूक काढली होती. या मिरवणुकीचे नाशिकरोड येथील साने गुरुजी मैदानावर सभेत रूपांतर झाले होते. त्यावेळी माधवराव लिमये व या. ना. जाधव या हिंद मजदूर सभेच्या नेत्यांनी कामगारांना मार्गदर्शन करणारी भाषणे केली होती.[५३]

गव्हर्नमेंट सिक्युरिटी प्रेसच्या कामगारांनी केलेल्या या संपाच्या तडजोडीकरीता हिंद मजदूर सभेच्या नाशिक जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी एस. एम. जोशी, बॅ. नाथ पै यांना आमंत्रित करून कामगारांनी केलेल्या मागण्या योग्य व रास्त असून त्यांना न्याय मिळवून दिला पाहिजे. याकरीता प्रयत्न करण्यात यावेत असे समजावून दिले होते. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मध्यस्थीने केंद्रीय सरकारचे तत्कालीन मजूरमंत्री गुलझारीलाल नंदा यांच्याशी चर्चा केली होती. मजूरमंत्री यांनी कामगारांची मागणी विचारात घेऊन मान्य केली होती. त्यानुसार गव्हर्नमेंट सिक्युरिटी प्रेसच्या कामगारांचे कामाचे ३ तास कमी करण्यात आले होते. तसेच कामगारांच्या महागाई भत्त्यात प्रतिमाह ५ रुपये वाढ करण्यात आली होती. आपली मागणी

मान्य झाल्यामुळे कामगारांनी १५ जानेवारी १९५८ रोजी संप मागे घेतला होता.[५४] कामगारांच्या या संपात हिंद मजदूर सभेने घेतलेली भूमिका सरकारने मान्य केली होती. कामगारांना न्याय मिळाला होता. त्यांची आर्थिक मागणीही मान्य झाली होती. यावरून कामगार वर्गाचा हा विजय होता.

इ. स. १९६८ मध्ये प्रेस कामगार युनियनने संप केला होता. त्यावेळी या संपाचे नेतृत्व या ठिकाणी कार्यरत असलेल्या 'हिंद मजदूर सभा' युनियनचे अध्यक्ष बगाराम तुपूर्व यांनी केले होते. त्यावेळी कामगारांनी १९ सप्टेंबर १९६८ पासून संप सुरू केला होता. यावेळी कामगारांनी जो संप केला त्या संपाच्या मागण्या म्हणजे कामगार वर्गाला राहण्यासाठी वसाहत उभारण्यात यावी, कामगारांना आरोग्य विषयक सुविधा मिळाव्या, कामगारांना कपडे देण्यात यावे तसेच सिक्युरिटी प्रेसमध्ये अपंग असलेल्या कामगारांच्या नोकरीवर भारताचे तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी गदा आणली होती. या सर्व मागण्याकरीता सिक्युरिटी प्रेसमधील कामगारांनी संप केला होता.

त्यावेळी कामगारांनी वरील मागण्यांकरीता केलेल्या संपाला यश आले होते म्हणजे कामगारांच्या सर्व मागण्या मान्य झाल्या होत्या. अपंग कामगारांच्या पाल्यांना प्रेसमध्ये कामावर घेण्याची मागणी पूर्ण झाली होती. कामगारांना नाशिकरोड परिसरात वसाहत उभारण्यात आली आहे. त्या वसाहतीला नेहरू नगर नावाने ओळखली जाते. प्रेस कामगारांच्या मुलांसाठी या कामगार वसाहतीच्या परिसरात शैक्षणिक व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच कामगार वर्गाच्या मनोरंजनाकरीता 'श्रमिक हॉल' व आरोग्याकरीता 'वेल्फेअर हॉल' बांधण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र राज्य सरकारने १ जून १९४८ रोजी प्रवाशी वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करण्यासाठी ३६००० पेक्षा जास्त बसगाडया खरेदी करून प्रवाशी वाहतूक सुरू केली होती. सुरुवातीला या प्रवाशी वाहतुकीची वाटचाल महाराष्ट्र राज्य सरकारने 'रस्ते वाहतूक' (बॉम्बे रोड ट्रान्सपोर्ट) या नावाने सुरू केली होती. प्रवाशी वाहतुकीचा विस्तार इ. स. १९४९ पर्यंत कोकण, नाशिक, पुणे, मुंबई या

शहरांना जोडणाऱ्या मार्गावर विस्तार केला होता. त्यानंतर भारत सरकारने इ. स. १९५० मध्ये महामंडळ निर्मितीचा एक कायदा मंजूर केला होता. या कायद्यांतर्गत प्रत्येक राज्यात प्रवाशी वाहतूक मंडळाची स्थापना करण्यात आली होती. महाराष्ट्र राज्यात या कायद्याने 'महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ' निर्माण करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्यात परिवहन महामंडळाची निर्मिती झाली. त्यावेळेपासून या मंडळात कार्यरत असणाऱ्या कामगार वर्गाचे संघटन आणि नेतृत्व वसंतराव नाईक यांनी केले होते. याकरिता त्यांनी परिवहन मंडळातील कामगारांचे फेडरेशन तयार केले होते. ते या फेडरेशनचे शेवटपर्यंत अध्यक्ष होते. वसंतराव नाईक यांनी हे फेडरेशन कामगार वर्गाच्या इंटक या संघटनेला जोडले होते.[५५] या संघटनेने आपल्या मागण्यांकरीता अनेक वेळा सरकारच्या विरोधी चळवळ (संप) केले आहेत. या संपात आपल्या न्याय आणि हक्कांच्या मागण्या मांडून पूर्ण करून घेतल्या आहेत.

नाशिक शहरात इ. स. १९५० मध्ये परिवहन मंडळाचे आगार स्थापन झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील परिवहन मंडळाच्या आगारात असलेल्या मागासवर्गीय कामगारांनी त्यांचे प्रश्न सोडविण्याकरीता २० नोव्हेंबर १९८० रोजी ''कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटना'' स्थापन केली. या संघटनेचे पहिले अध्यक्ष कृष्णा इंगळे होते. त्यांनी संपूर्ण राज्यभरातील परिवहन मंडळाच्या आगारामध्ये संघटना स्थापन करण्यात आल्या होत्या. या संघटनेने इ. स. १९९० मध्ये संपूर्ण राज्यात संप पुकारला होता. त्यावेळी हा संप ६ दिवस चालला होता. त्यात कामगारांनी खालील मागण्या केल्या होत्या.

१. चालक/वाहक यांची १२ (ब) अंतर्गत बडतर्फी कारवाई केली जाते, परंतु भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जात नाही. यामध्ये असलेली ही असमानता दूर करावी.
२. कनिष्ठ वेतनश्रेणी रद्द करावी.
३. कामगारांची महामंडळाकडे असलेली थकबाकी त्वरीत देण्यात यावी.
४. चालक/वाहक यांचे विश्रांतीगृह स्वच्छ व अद्यावत असावे.

५. बढती देतांना मागासवर्गीयांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

६. रात्री वस्ती मुक्कामाला असणाऱ्या चालक/वाहकांना सुरक्षा मिळावी.

७. आगारात कामाला असणारे सुरक्षारक्षक आणि सफाई कामगार यांच्या कामाचे खाजगीकरण बंद करावे.

८. विभागीय पातळीवर अनिर्णित असलेल्या प्रश्नांचे त्वरीत निवारण करावे.[५६] कामगार वर्गाने केलेल्या या मागण्या महाराष्ट्र राज्य सरकारने काही मान्य केल्या होत्या.

महाराष्ट्र राज्य सरकारने १४ मार्च १९८४ रोजी श्री. मधुकरराव पिचड यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र विडी कामगार यांचे वेतन आणि वेतनाचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली होती. सरकारने या समितीला ६ महिन्यांची मुदत दिली होती. या समितीने कामगारांची प्रतिकूल परिस्थितीचा अभ्यास करावयाचा होता. कारण या कामगारांना १००० विड्या बांधण्याचा मोबदला फक्त रू. ९.६० पैसे मिळत होता. त्यामुळे महागाईच्या वाढत्या निर्देशांकाप्रमाणे त्यांना वेतन वाढवून देण्याची चौकशी समितीने करावयाची होती. परंतु संबंधित समितीने आपली मुदत संपल्यानंतर मुदत वाढवून घेतली होती. परंतु अहवाल सादर केलेला नव्हता. त्यावेळी तत्कालीन आमदार तुकाराम दिघोळे यांनी याविषयी विधानसभेत आवाज उठविला होता.

महाराष्ट्र राज्यात इ. स. १९६० मध्ये विद्युत मंडळाची स्थापना झालेली आहे. या विद्युत मंडळात असलेल्या कामगारांना वसंतराव नाईक यांनी प्रथम संघटित केले होते. त्यांनी स्थापन केलेली ही संघटना इंटकप्रणीत होती.[५७] विद्युत कामगारांची ही संघटना इ. स. १९७५ मध्ये नाशिकमध्ये स्थापन केली होती. या संघटनेच्या माध्यमातून इ. स. १९८३ आणि १९८६ मध्ये मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून मोठा संप झाला होता. या संपात कामगारांनी खालील मागण्या केल्या होत्या.

१. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचा अनुशेष भरून काढणे.

२. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची पदनिश्चिती करावी.

३. अनुकंपाखाली घेण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी राखीव जागा ठेवण्यात याव्यात.

४. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या बढतीमध्ये किरकोळ कारणावरून भेदभाव करणे थांबवावे.

महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या कर्मचारी संघटनेने वरील मागण्यांसंदर्भात केलेल्या संपाच्या वेळी तत्कालीन उर्जामंत्री यांनी कामगारांना संपातील मागण्यांसंदर्भात चर्चा करण्याकरीता मंत्रालयात बैठकीस आमंत्रित केले होते. त्यावेळी उर्जामंत्र्याच्या कामगारांशी दोन बैठका झाल्या होत्या.[५८] कामगारांच्या मागण्या मंजूर करण्यात आल्या होत्या. या संपात संपूर्ण महाराष्ट्रातून कामगारांनी सहभाग घेतला होता.

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत मंडळ कर्मचारी संघटनेने केलेल्या कार्यामुळे अनेक कामगारांना विद्युत मंडळात नोकरीत कायम करण्यात आले होते. तसेच संघटनेच्या घटनेच्या १२ व्या कलमानुसार हंगामी कामगार म्हणून नवीन कामगारांची भरती करतांना राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. त्याबरोबर हंगामी कामगाराने सतत ५ वर्षे काम केल्यास त्या कामगाराला कायम सेवेत करण्यात यावे याकरीता संघटनेने प्रयत्न करून ती मागणी मान्य करून घेतलेली आहे.

तसेच मागासवर्गीय विद्युत कामगार संघटनेने केलेल्या प्रयत्नातून महाराष्ट्र राज्यातील नागपूर व नाशिक येथे नाशिक येथे विद्युत मंडळात असलेल्या कामगारांना प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आलेली आहेत. त्याबरोबर विद्युत मंडळात कामगार म्हणून कामास असलेल्या लोकांना अडीअडचणीच्या प्रसंगी आर्थिक मदत करण्याकरीता पतसंस्था स्थापन केली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात या पतसंस्थेच्या २६ शाखांची स्थापना करण्यात आलेली आहे. अशा पध्दतीने या संघटनेने कामगारांना नोकरीत कायम करण्यात व त्यांच्या आर्थिक अडचणींच्या प्रसंगाची सोडवणूक करण्यास हातभार लावलेला

आहे. एकंदरीत विद्युत मंडळातील कामगार वर्गाला आपल्या जीवनात स्थिरता प्राप्त करून दिली आहे.

सहकारी कारखाना चालविणे हे एक दिव्य काम आहे. सरकार, सभासद, विरोधक, कामगार आणि साखरेचे बाजारभाव याबद्दल  असलेली परिस्थिती या सर्व गोष्टी विचारात घेऊन कारखाना चालवावा लागतो. त्यामुळे कामगार वर्गाच्या हिताचे काही धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतात.

नाशिक जिल्ह्यातील निफाड सहकारी साखर कारखान्यातील कामगारांनी त्यांच्या संघटनेमार्फत कारखान्याकडे बोनसची मागणी केली होती. तेव्हा निफाड सहकारी साखर कारखान्याच्या तत्कालीन संचालक मंडळाने कामगारांची ही मागणी विचारात घेऊन त्यांना ५१% बोनस देण्याचा निर्णय घेतला होता. तसेच कामगारांना कारखान्याच्या परिसरात राहण्याकरीता चांगली घरे बांधून दिली होती. तेव्हा कामगारांनीही साखर उत्पादनात चांगली वाढ केली होती. त्यामुळे कारखान्यातील कामगार व संचालक मंडळ यांच्यात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण तयार झाले होते.

नाशिक शहरातील सातपूर येथील औद्योगिक वसाहतीत लॅम्प कॅप्स ॲण्ड फिलामेंटस् या कंपनीची उभारणी झाली. त्यावेळी कंपनीच्या संचालक मंडळाने इ. स. १९७२ साली विज पुरवठा करणाऱ्या वेगवेगळया संस्थाकडून कर्जपुरवठा घेऊन कंपनीची उभारणी केलेली होती. मात्र नंतरच्या काळात कंपनीच्या संचालक मंडळाने कंपनी उभारणीकरीता वित्त संस्थांकडून घेतलेल्या कर्जाच्या हप्त्यांची वेळेवर परतफेड केली नव्हती. त्यामुळे कंपनीच्या विरोधात वित्त संस्थांनी मुंबई येथील उच्च न्यायालयात कंपनीच्या विरोधात दावा दाखल केला होता. त्यावेळी कंपनीच्या संचालक मंडळाने कंपनी बंद असल्यामुळे कर्जाची परतफेड करता आली नाही असे कारण दर्शविले होते. मात्र कंपनीत असलेल्या कामगार वर्गाला याविषयी कोणत्याही प्रकारची कल्पना नव्हती. तेव्हा १२ डिसेंबर १९८६ रोजी उच्च न्यायालय मुंबईच्या कोर्ट रिसिव्हर आणि कर्जपुरवठा केलेल्या वित्त संस्थाचे प्रतिनिधी यांनी कारखाना ताब्यात घेऊन कामावर असलेल्या कामगारांना बाहेर

काढले होते. त्यानंतर काही दिवसांनी कामगारांनी आपणांस कामावर घेण्यात यावे या मागणीकरीता पंतप्रधान, मुख्यमंत्री, कामगार मंत्री यांच्याशी पत्रव्यवहार, निवेदने पाठविली होती. तसेच नाशिक येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर उपोषण केले होते.[५९] आपली मागणी पूर्ण करून घेण्याकरीता संघर्ष समितीची स्थापना करण्यात आली होती. कामगारांनी आपल्या जीवनाला स्थिरता प्राप्त करून घेण्याकरीता आपल्या रोजीरोटीची समस्या सोडविण्याकरीता सतत दोन वर्षे प्रयत्न केले होते.

नाशिक परिसरातील सातपूर व अंबड या दोन्ही वसाहतीतील उद्योगधंद्यांमध्ये झालेल्या संक्रमणातून विविध संस्था, संघटना, कामगार चळवळींचा उदय झाला. या चळवळी अनेक ठिकाणी निर्माण झाल्या होत्या. त्याच पध्दतीने नाशिक परिसरात स्थापन झालेल्या उद्योगधंद्यातही निर्माण झालेल्या होत्या. नाशिक शहरातील सातपूर औद्योगिक वसाहतीत इ. स. १९७३ मध्ये व्ही. आय. पी. कंपनीची स्थापना झाली होती. या कंपनीत सुरूवातीच्या काळापासून दत्ता सामंत यांनी स्थापन केलेली ''महाराष्ट्र कामगार युनियन'' ही कामगार संघटना कार्यरत होती. इ. स. १९८० मध्ये कामगारांनी युनियनच्या माध्यमातून आपल्या मागण्या मांडल्या होत्या. त्यावेळी कारखाना मालकाने कामगारांची बोनसची मागणी मंजूर करून वेतनवाढीचा करार केला होता. तेव्हा वेतनवाढीचा करार तीन वर्षाकरीता करण्यात आले होते.[६०] कारखाना व्यवस्थापकाने युनियनची वाढती शक्ती लक्षात घेऊन फूट पाडण्याचा प्रयत्न केला. कारखान्यात कामाला असलेल्या काही कामगारांना हाताशी धरून कामगारांचा नेता कामगारच असला पाहिजे असा विचार रूजविला होता. कारखान्यातील कामगारांमधील सुरेश गायकवाड नावाच्या कामगाराला आपलेसे करून दुसऱ्या कामगार संघटनेची स्थापना करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कामगार दोन गटात विभाजीत झाले. त्यातून वैमनस्य वाढीस लागले. दोन्ही गटात संघर्ष झाला. त्या वादात रंगनाथ गिते नावाचा कामगार जखमी झाला होता. कारखान्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.[६०] यावरून असे दिसते की, कारखाना

व्यवस्थापनाने आपल्या स्वार्थाकरीता कामगार वर्गात फूट पाडली होती म्हणजे 'फोडा आणि झोडा' या नीतिचा अवलंब केला होता.

नाशिक शहरातील अंबड औद्योगिक वसाहतीतील आर्यन कोच बिल्डर्स प्रा. लिमिटेड या कारखान्यात उत्पादित होणाऱ्या मालाला बाजारात चांगली मागणी होती. या कारखान्याने सिकॉम या वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थेकडून कर्ज घेतले होते. कारखान्याने वेळेवर कर्जाची परतफेड केली नव्हती. त्यावेळी कंपनीत तयार होणाऱ्या मालाला बाजारात उठाव नाही. त्यामुळे कंपनी डबघाईस आहे, म्हणून कंपनी कर्ज फेडू शकत नाही अशा स्वरूपाचे कारण दिले होते. त्याकरीता कंपनी व्यवस्थापनाने ९ जुलै १९८७ रोजी टाळेबंदी जाहीर केली. याच दरम्यानच्या काळात कंपनीला दिल्ली परिवहन मंडळाकडून ६६ नवीन बस तयार करण्याची ऑर्डर मिळाली होती. कामगारांनी सहकार्याच्या भावनेतून ते काम वेळेत पूर्ण केले होते. तरीही कंपनी व्यवस्थापनाकडून टाळेबंदी मागे घेतली जात नव्हती. तेव्हा या कंपनीत दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखालील ''महाराष्ट्र जनरल कामगार युनियन'' कार्यरत होती. कामगारांनी कारखान्याची टाळेबंदी उठविण्यात यावी, कारखाना बंद काळातील वेतन मिळावे या मागण्याकरीता युनियनच्या माध्यमातून २२ एप्रिल १९८८ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. त्यावेळी उपोषणाचा सहावा दिवस म्हणजे २७ एप्रिल १९८८ रोजी कामगार युनियनचे टी. आर. बोराडे, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक जे. एम. आर्या आणि जिल्हाधिकारी अशा त्रिपक्षीय समितीत चर्चा करण्यात आली होती. त्यावेळी कंपनी व्यवस्थापकीय संचालकांनी जुलै १९८८ अखेरपर्यंत कंपनीत लागू करण्यात आलेली टाळेबंदी उठविण्याचे आश्वासन दिले होते.[६१] परंतु कंपनी व्यवस्थापकाने कामगारांना दिलेले आश्वासन पुढील काळात पाळले नाही. त्यामुळे कामगार वर्गात नाराजी निर्माण झाली होती. त्यांच्या दैनंदिन जीवनात विस्कळीत अवस्था निर्माण झाली होती. त्यानंतर १० एप्रिल १९९५ रोजी या कंपनीचे कर्जापोटी सिकॉम या वित्त संस्थेकडे हस्तांतर झाले होते. त्यानंतर कामगारांनी कंपनी सुरू करण्याचे प्रयत्न केले होते.

सातपूर औद्योगिक वसाहतीत असलेली 'इंडियन टुल्स' नांवाची कंपनी ५ नोव्हेंबर १९८७ पासून बंद झाली होती. त्यावेळी कामगारांची दयनीय अवस्था झाली होती. तेव्हा बंद असलेली कंपनी सुरू करण्याकरीता अनेकवेळा मोर्चा, निदर्शने केली, सत्याग्रह केले, कामगार मंत्र्याशी वाटाघाटीकरीता चर्चा केली होती. परंतु या सर्व उपायातून काहीही निष्पण्ण झाले नव्हते, काहीही तोडगा निघाला नव्हता. त्यावेळी कामगारांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते. त्याचाही काहीएक उपयोग झाला नव्हता. तेव्हा कंपनीत टाळेबंदी सुरू होऊन १४ महिने झाले होते. अखेरीस कामगारांनी टाळेबंदीवर मार्ग काढण्याकरीता औद्योगिक न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. तरीही टाळेबंदी उठविली जात नव्हती. तेव्हा या पेचप्रसंगावर मार्ग काढण्याकरीता १९ जानेवारी १९८९ रोजी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उद्योगमंत्री, कामगार मंत्री बॅ. रामराव आदिक यांच्या नेतृत्वाखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतही काही मार्ग निघाला नव्हता. त्यानंतर पुन्हा २२ मार्च १९८९ रोजी पुन्हा मुंबई येथे बैठक घेण्यात आली होती. तेव्हा या बैठकीत १५० कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती घ्यावी असे कंपनीच्या व्यवस्थापन मंडळाकडून सुचविण्यात आले होते. स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कामगारांना वर्षाकाठी २००० रुपये देण्यात येतील असा प्रस्ताव कंपनी व्यवस्थापक मंडळाने मांडला होता. कामगारांना कंपनीचा हा प्रस्ताव मान्य नव्हता. या दरम्यानच्या काळात तीन वर्ष बंद असल्याने झालेली उपासमारी आणि नैराश्यातून मधुकर चाकणे नावाच्या कामगाराने आत्महत्या केली होती. शेवटी कंपनी व्यवस्थापन मंडळाने १२ सप्टेंबर १९८९ रोजी ३०१ स्वेच्छानिवृत्तीच्या नोटीसा पाठवून शासनाकडे कामगार कपातीचा खुलासा करणारा अर्ज पाठविला होता. याच आधारावर अखेरीस २३९ कामगारांना स्वेच्छानिवृत्ती देण्यात आली होती. तसेच कंपनीत कार्यरत होणाऱ्या उर्वरित कामगारांना देण्यात येणारे सर्व भत्ते बंद करण्यात येत आहेत अशी अट टाकण्यात आली होती.[६२] ज्या कामगारांना आपल्या कुटुंबाच्या भरणपोषणाकरीता दुसरा मार्ग उरलेला नव्हता त्या कामगारांनी या सर्व अटी मान्य करून कामावर हजर झाले

होते. यावरून आपणांस एवढेच म्हणता येईल की, ज्यावेळी व्यक्तिच्या समोर असलेले सर्व पर्याय संपुष्टात आलेले असतात त्यावेळी ती व्यक्ती कोणतीही गोष्ट करण्यास तयार होते. याच परिस्थितीत असलेल्या या कामगारांनी २ वर्षानंतर कंपनी व्यवस्थापन मंडळापुढे गुडघे टेकून अटी मान्य करून नवीन जोमाने कामाला सुरुवात केली होती.

या दरम्यानचे काळात औद्योगिक वसाहतीतील 'महिंद्रा ॲण्ड महिंद्रा' कारखान्यात कामावर असलेल्या १२२६ हंगामी कामगारांना कंपनी व्यवस्थापनाने कामावरून कमी केले होते. त्यावेळी या कंपनीत कामाला असलेल्या संजय सपकाळ या कामगाराने गळफास घेऊन आत्महत्या केली होती.[६३] वरील प्रसंगावरून आपणांस असे दिसते की जर कामगारांला कामावरून कमी केले जाते त्यावेळी या कामगाराकडे जीवन जगण्याकरीता अन्य पर्याय उपलब्ध नसला तर तो कामगार आपले जीवन संपविण्यासही मागे पुढे पाहत नाही.

मोटार गाड्यांचे टायर उत्पादन करणाऱ्या सातपूर औद्योगिक वसाहतीत ''सीएट'' नावाची कंपनी आहे. या कंपनीतील पूर्वीच्या पगारवाढीच्या कराराची मुदत संपलेली होती. तेव्हा पुन्हा नव्याने पगारवाढीसाठी कंपनीत कामावर असलेल्या कामगारांनी कामगार युनियनच्या माध्यमातून ३१ डिसेंबर १९८७ रोजी कंपनी व्यवस्थापन मंडळाला पगारवाढीच्या नवीन कराराच्या प्रस्तावाची एक सनद (प्रत) दिली होती.[६३] परंतु कंपनी व्यवस्थापन मंडळाने कामगारांच्या या मागणीकडे दुर्लक्ष केले होते. त्यावेळी कामगारांनी कंपनी व्यवस्थापनाच्या या मनमानी धोरणाविरोधी संप केला होता.

सातपूर औद्योगिक वसाहतीत असलेल्या ''कृष्णा लगेज इंडस्ट्रीज प्रा. लि.'' या बॅग तयार करणाऱ्या कंपनीत ६७ कामगार कायमस्वरूपी कामावर होते. असे असतानाही कंपनी व्यवस्थापन मंडळाने नव्याने १०० कामगारांना हंगामी स्वरूपात भरती केले होते. या कामगारांकडून वाढीव काम करून घेतले होते. तसेच कायमस्वरूपी कामावर असलेलया कामगारांना कोणतीही पूर्वसूचना न देता १३ मे १९८८ पासून अचानकपणे टाळेबंदी जाहीर केली. तसेच पूर्वीचे काम

केल्याचा पगार मोबदला दिला नव्हता. यामुळे कामगार वर्गाने कंपनीच्या स्वयस्थापन मंडळाला धारेवर धरले होते. त्यामुळे या परिस्थितीला कंटाळून कंपनीतील व्यवस्थापकीय मंडळाने राजीनामे दिले. परंतु कामगारांचे प्रश्न सुटत नव्हते, त्यावेळी नाशिकचे तत्कालीन लोकप्रतिनिधी मुरलीधर माने यांनी इंटक कामगार संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केले. त्यावेळी नाशिक येथील कामगार आयुक्तांनी कंपनी व्यवस्थापनाला कामगाराचे वेतन देण्याचे आदेश दिले होते. अशी परिस्थिती निर्माण झालेली असतांनाही कंपनीच्या व्यवस्थापन मंडळाने त्याकडे दुर्लक्ष केले होते. तसेच सरकारनेही कंपनी सुरू करण्याचे वेळोवेळी व्यवस्थापन मंडळाला आदेश दिले होते. याकडेही कंपनीने दुर्लक्ष केले होते. अशा परिस्थितीमुळे कामगारांना अनेक कठीण समस्यांना सामोरे जावे लागले होते.

नाशिकमधील सातपूर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या मोटार गाडयाचे टायर तयार करणाऱ्या ''सीएट'' कंपनीत दर तीन वर्षांनी वेतनवाढीचा करार केला जात होता. तेव्हा पूर्वी झालेल्या वेतनवाढीच्या कराराची मुदत संपली होती. त्यावेळी कंपनीत कार्यरत असलेल्या 'श्रमिक संघ' या कामगार संघटनेने नवीन वेतनवाढीच्या कराराची सनद कंपनी व्यवस्थापनाला दिली होती. मात्र कंपनी व्यवस्थापनाने त्याकडे दुर्लक्ष करून जानेवारी १९८९ पर्यंत कामगार युनियनशी बोलणी करण्याची तयारी दाखविली नव्हती. तेव्हा कंपनीत असलेल्या ७०० कामगारांनी २० जानेवारी १९८९ रोजी दुसऱ्या पाळीपासून बेमुदत संप पुकारला होता. संप मिटविण्याकरीता कामगारांचे प्रतिनिधीबरोबर कंपनी व्यवस्थापनाने प्रयत्न केले होते. त्यांनी नाशिक येथे तीन आणि मुंबई येथे एक अशा एकूण चार बैठका घेऊन बोलणी करण्याचा प्रयत्न केला होता. अखेरीस कंपनी व्यवस्थापनाने आपली आग्रही असलेली भूमिका मागे घेऊन उत्पादनाशी निगडित वेतनवाढ या तत्वानुसार ६.५% उत्पादन वाढीकरीता ५००/- रुपये वेतनवाढ करण्याचे आणि संप काळातील कामगारांच्या रजा भर पगारी देण्याचे मान्य केले होते. त्यामुळे या कंपनीत सुरू असलेला संप ३७ दिवसानंतर मिटला होता. तो २० फेब्रुवारी १९८९ रोजी सामोपचाराच्या बोलणीने मागे घेण्यात आला

होता.[६४] कंपनी व्यवस्थापनाने कामगारांची असलेली रास्त मागणी लक्षात घेऊन कंपनी कामगारांना वेतनवाढ दिली होती. त्यामुळे कंपनी पुन्हा सुरू झाली होती. कामगार वर्गावर कोसळणारे बेकारीचे आरिष्ट टळले होते.

सी. पी. टूल्स कंपनीतील अंतर्गत कामगार युनियनने कामगारांच्या त्रैवार्षिक वेतनवाढीकरीता कामगारांनी १ जानेवारी १९८८ रोजी संप सुरू केला होता. यावेळी कंपनीच्या व्यवस्थापनाने कामगारांच्या मागणीला अनुसरून अगदी थोडया दिवसात निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार कामगारांच्या मूळ पगारात १५० रुपये महागाई भत्त्यात ९० रुपये वाहन भत्त्यात ३० रुपये आणि वैद्यकीय खर्चात ५ रुपये अशी एकूण २७५ रुपये वेतनवाढ केली होती.[६५] यावेळी कंपनी व्यवस्थापनाने वेळेत निर्णय घेऊन कामगार वर्गावर कोसळणारे संकट बाजूला केले होते.

नाशिकमधील सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीत असलेल्या इंडीयन टूल्स, परमनंट कलर, आर्यन कोच, गणेश फेरोकास्टींग, कृष्णा लगेज, लाँच कॅप्स ॲण्ड फिलोमेंटस् इत्यादी कारखान्यामध्ये औद्योगिक कलहामुळे वातावरण बिघडले होते. औद्योगिक कलहामुळे या कारखान्यामधील सुमारे ५००० कायमस्वरूपी कामावर असलेल्या कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली होती. त्यावेळी या असहाय्य कामगारांना मदतीसाठी कामगार क्षेत्रात नव्याने सहभाग घेतलेल्या ''कामगार एकता युनियन'', सातपूर येथे ११ जानेवारी १९८९ रोजी मधु कडू यांच्या 'गाढवाचं लग्न' या लोकनाट्याचा प्रयोग आयोजित केला होता. तेव्हा यापासून मिळालेल्या पैशातून या प्रयोगाचा खर्च काढून उरलेल्या रक्कमेचे धान्य खरेदी करून बंद पडलेल्या कारखान्यातील कामगारांना वाटप केले होते.[६६] कामगार युनियनने राबविलेल्या या उपक्रमामुळे उपासमारीची वेळ आलेल्या कामगारांना अन्नधान्य मिळाले होते. त्यांच्या कुटुंबाचा काही दिवसांचा प्रश्न सुटला होता.

नाशिकमधील सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीतील वेगवेगळया कंपनीत कार्यरत असलेल्या कामगार संघटनांनी एकत्र येऊन 'संयुक्त कामगार

कृती समिती' स्थापन केली होती. या समितीच्या माध्यमातून आपल्या विविध मागण्यासंदर्भात ३ एप्रिल १९८९ रोजी नाशिक शहरातून मोर्चा काढला होता. या मोर्चास सहभागी झालेल्या कामगारांना मार्गदर्शन करण्यासाठी मुंबई येथील कामगार आघाडीचे नेते श्री. दादा सामंत, टी. एस. बोराडे आलेले होते. या मोर्चात खालील मागण्या करण्यात आल्या होत्या.

१. नाशिक शहरातील औद्योगिक वसाहतीतील बंद असलेले कारखाने त्वरीत सुरू करावे.
२. महाराष्ट्र राज्य सरकारने व्यवसाय करात २० रुपयावरून ५० रुपये वाढ केलेली आहे, ती करवाढ रद्द करण्यात यावी.
३. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगार वर्गाबाबत इ. स. १९८२ मध्ये स्वीकारलेली महागाई भत्त्याची मालिका रद्द करावी.
४. कामगार वर्गाबाबत स्वीकारलेली किमान वेतन कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी.
५. औद्योगिक क्षेत्रात सुरू झालेली कंत्राटीपद्धत बंद करण्यात यावी.
६. अंबड येथील औद्योगिक वसाहतीत असलेल्या कामगारांसाठी कामगार विमा योजना लागू करण्यात यावी.
७. सातपूर येथील कामगार विमा योजनेचे रूग्णालय ताबडतोब सुरू करावे.[६७]

या मोर्चात नाशिक शहरातील बंद पडलेल्या कारखान्यामधील कामगार आणि सुरू असलेल्या कारखान्यातील पहिल्या व तिसऱ्या पाळीत कामावर असलेले कामगार सहभागी झाले होते.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकाच्या सुरूवातीस भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळाने जुलै १९९१ मध्ये नवे आर्थिक धोरण स्वीकारले होते. त्यांनी स्वीकारलेल्या या नव्या धोरणानुसार परकीय भांडवलाला मुक्त वाव, शासकीय उद्योगधंद्याचे खाजगीकरण, उद्योगावरील निर्बंधाचे शिथिलीकरण आणि खुल्या बाजारपेठेवर आधारित अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने वाटचाल करणारे धोरण स्वीकारले होते. मध्यवर्ती सरकारने स्वीकारलेल्या या

धोरणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत टिकून राहाण्याकरीता उद्योजकांना वस्तूंचा उत्पादन खर्च कमी करणे गरजेचे होते. त्यामुळे उद्योजकांनी आपापल्या उद्योगात नवे तंत्रज्ञान आणले होते. या नव्या तंत्रज्ञानामुळे कर्मचारी अतिरिक्त होतील. तसेच नवीन कामगार भरती बंद होऊन बेकारी वाढेल. त्यामुळे चैनीच्या आणि अनावश्यक वस्तूंची मागणी केली होती. तसेच स्पर्धेत टिकून राहाण्यासाठी कामगारांच्या वेतनात कपात करणे हा एकच पर्याय कारखाना मालकासमोर उरला होता.[६८] त्यामुळे उद्योगातील मालकवर्गाने आपल्या कारखान्यांमध्ये कामगार कपातीच्या धोरणाचा स्वीकार केला होता. त्यामुळे कारखाना व कामगार यांच्यात संघर्ष निर्माण झाला. त्यावेळी या नव्या धोरणाचे परिणाम नाशिक शहरातील औद्योगिक वसाहतीतील कारखान्यामध्ये उमटू लागले होते.

सातपूर औद्योगिक वसाहतीत असलेल्या बिझीनेस कंबाईन लिमिटेड कंपनीच्या व्यवस्थापन मंडळ व कामगार युनियनमध्ये तीन वर्षाकरीता कामगारांच्या वेतनवाढीचा करार २० मार्च १९९१ रोजी झालेला होता. परंतु या करारात झालेली वेतनवाढ वाढत्या महागाईमुळे पुढील काळात कमी वाटू लागली होती. त्यामुळे कामगार युनियनने २४ नोव्हेंबर १९९२ रोजी तो करार रद्द करून संपुष्टात आणला. तसेच २१ जानेवारी १९९३ रोजी कामगारांच्या प्रतिनिधींनी कंपनीतील व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांना धक्काबुक्की केली होती. त्यावेळी कामगारांनी केलेल्या या कृत्याची सखोल चौकशी केली. त्यानंतर दोषी असलेल्या ९ कामगारांना कामावरून बडतर्फ केले होते. त्यावेळी कामगारांनी १२ फेब्रुवारी १९९३ पासून निरनिराळया खात्यात उत्पादित होणाऱ्या मालाच्या उत्पादनात २०% कपात केली होती. त्यास अनुसरून कंपनी व्यवस्थापकांनी २०% वेतन कपात करण्याचे सूचित केले होते. कंपनीने घेतलेल्या या निर्णयाला प्रतिउत्तर म्हणून १५ फेब्रुवारी १९९३ पासून युनियनच्या आदेशानुसार कामगारांनी काम थांबविले. तसेच कामगार युनियनचे अध्यक्ष आर. जे. मेहता यांनी कंपनीच्या व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांना पत्र पाठवून फॅक्टरी अॅक्ट १९४८ मधील तरतुदींचा कंपनी व्यवस्थापनाने भंग केला आहे असे म्हटले होते.

त्यानंतर ४ मार्च १९९३ रोजी आर. जे. मेहता युनियनच्या उपाध्यक्षा श्रीमती चाँदबीबी यांनी कंपनी व्यवस्थापनाची परवानगी न घेता कंपनी आवारात कामगारांची सभा घेतली होती. या सभेत त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार कामगारांनी २६ एप्रिल १९९३ पासून काम करण्यास व मशीन चालविण्यास नकार दिला होता. त्यावेळी कामगारांनी कामावर यावे याकरीता कंपनी व्यवस्थापनाने वेळोवेळी आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनास कायमस्वरूपी कामावर असलेल्या १९२ कामगारांपैकी ६५ कामगारांनी कामावर रुजू होऊन नियमित उत्पादन देण्याचे मान्य केले होते. परंतु १२७ कामगार आपल्या भूमिकेवर ठाम होते. त्यांनी कामावर येण्यास नकार दिला होता. त्यामुळे कंपनीच्या उत्पादनावर परिणाम झाला होता. त्यावेळी कंपनी व्यवस्थापनाने परिस्थितीचा विचार करून कामगार युनियनशी वाटाघाटी करण्याचा निर्णय घेतला होता.[६९] परंतु कामगार युनियनचे नेते आर. जे. मेहता यांनी कंपनी व्यवस्थापनाला पत्र पाठवून कामगारांच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत कंपनी बंद ठेवण्याचा आदेश केला होता. त्यामुळे कामावर असलेल्या ६५ कामगारांकडून काम करून घेणे अशक्य झाले होते. त्यावेळी टाळेबंदी लागू केल्याशिवाय दुसरा पर्याय राहिला नव्हता. त्यामुळे कंपनी व्यवस्थापनाने कामगार युनियनचे नेते आर. जे. मेहता, कामगार सभा, ठाणे, औद्योगिक व कामगार न्यायालय, कामगार उपायुक्त, जिल्हाधिकारी आणि पोलीस खाते यांना १० मे १९९३ रोजी टाळेबंदी सूचना पत्राच्या प्रति पाठवून टाळेबंदी लागू केली होती.[७०] या कंपनीत टाळेबंदी लागू केल्यामुळे ज्या कामगारांची मिळेल त्या वेतनात काम करण्याची इच्छा असतांनाही त्यांना काम बंद करावे लागले होते. त्यामुळे या परिस्थितीत या कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. त्यांच्या मुलाबाळांचे, कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे साधन बंद पडले, त्यांचे संसार उघडयावर आले. त्यामुळे या कामगारवर्गात नैराश्य आले होते. कामगार युनियनच्या हट्टामुळे त्यांना काम सोडावे लागले होते.

सातपूर औद्योगिक वसाहतीत असलेल्या ''व्हीआयपी'' या कंपनीत १६ ऑगस्ट १९९१ पासून टाळेबंदी लागू करण्यात आली. तेव्हा कंपनीच्या संचालकांनी लागू केलेली टाळेबंदी उठविण्यात यावी यासाठी कामगारांनी शासनाकडे मागणी केली होती. त्यावेळी कामगारांची ही मागणी विचारात घेऊन शासनाने कंपनी व्यवस्थापनाला टाळेबंदी उठविण्याची सूचना केली होती. परंतु कंपनी व्यवस्थापनाने शासनाच्या या सूचनेकडे दुर्लक्ष केले.

## संदर्भ व तळटीपा


१. Home Department Special File No. 924 DPI, i & II 29th January 1942.

२. मुकूंद महाजन, स. का. बर्वे, *भारताचा आर्थिक इतिहास १७५०-१९५०,* मुंबई १९७७ पृ. २२४

३. दि. वा. फडणवीस (संपा.), *महाराष्ट्र राज्य ट्रेड युनियन*, नागपूर, १९८०,
पृ. ४७.

४. मि. आ छापखाने, *औद्योगिक जडण-घडण व धोरण*, पुणे, १९८०, पृ. २०१.

५. प्रकाशचंद्र व्यास, *महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन*, नाशिक, २०११, पृ. ४४.

६. एस. एम. विसपुते, *माणूस नेता : एसेम्*, २०००, पृ. २९३.

७. मुकूंद महाजन व स.का. बर्वे (संपा.), *भारताचा आर्थिक इतिहास १७५० ते १९५०*, मुंबई, १९७७, पृ.०१.

८. श. ना. जोशी, *आत्माराम रावजी भट : व्यक्ती आणि कार्य*, पुणे, १९८०, पृ.०१.

९. वसंत जाधव, *आधुनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनाचा इतिहास*, नागपूर, २००४, पृ.२५७.

१०. कित्ता पृ. २५८.

११. गोविंद पानसरे, *राजर्षी शाहू वसा आणि वारसा*, कोल्हापूर, पृ.३५.

१२. एस. एम. विसपुते, *माणूस नेता : एसेम्*, अमळनेर, २०००, पृ. २९३.

१३. य. दि. फडके, *२० व्या शतकातील महाराष्ट्र, खंड ४*, पुणे, जून १९९३, पृ. २३

१४. के. एस. भिवसनकर, *महाराष्ट्र शासन आणि राजकारण*, औरंगाबाद, १९९९, पृ. १३१.

१५. गोविंद पानसरे, *राजर्षी शाहू वसा आणि वारसा*, कोल्हापूर, पृ. ३८.

१६. रंगनाथ डोळस व शरणकुमार लिंबाळे (संपा.), *सामाजिक चळवळी*, नाशिक, २०११, पृ. १२०.

१७. सेन सेन सुकामेल (अनु. आनंद हर्डिकर), *भारतीय कामगार चळवळ*, मुंबई, डिसेंबर, २०००, पृ. ६१-६३.

१८. य. दि. फडके, *२० व्या शतकातील महाराष्ट्र, खंड २*, पुणे ३०, १९९१, पृ. २२९-२३१

१९. सेन सेन सुकामेल (अनु. हर्डिकर), *भारतीय कामगार चळवळ*, मुंबई, डिसेंबर, २०००, पृ. १२३.

२०. कित्ता पृ. १६५ ते १६६.

२१. य. दि. फडके, *२० व्या शतकातील महाराष्ट्र, खंड ४*, पुणे ३०, जून १९९३, पृ. ९ ते १०.

२२. कित्ता पृ. १४ ते १५.

२३. पांडुरंग आंधळे, *क्रांतीवीर वसंतराव नाईक*, नाशिक, डिसेंबर २००२, पृ. १३ ते १३१.

२४. प्रकाशचंद्र व्यास, *महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन*, नाशिक, एप्रिल, २०११.पृ. ४८.

२५. श. ना. जोशी, *आत्माराम रावजी भट : व्यक्ती आणि कार्य*, पुणे, १९८०, पृ. ६०.

२६. कित्ता पृ. ७९.

२७. य. दि. फडके, *२० व्या शतकातील महाराष्ट्र*, खंड-६, पुणे, १३.

२८. कित्ता पृ. २४.

२९. सरल धारणकर व इतर (संपा.), *येवले सांस्कृतिक व ऐतिहासिक दर्शन*, नाशिक, मे २०१३, पृ. ७३.

३०. इलियास सिद्दीकी, *सरदार नारोशंकर राजेबहादूर व मालेगावचा इतिहास*, मालेगांव, २००८, पृ. २१९ ते २२३.

३१. अब्दुल अन्सारी, *मिसाल और हाल*, लखनौ, १९९०, पृ. ९४.

३२. राजेंद्र भामरे व इतर (संपा.) सिन्नर *ऐतिहासिक व सांस्कृतिक यथादर्शन*, नाशिक, जुलै २०१८, पृ. ६४, ८६ ते ८७.

३३. *दैनिक सकाळ*, नाशिक जिल्हा आवृत्ती दि. २४ सप्टेंबर २०११

३४. भारतीय इतिहास संकलन समिती, (संपा.), ''गौतमी'', नाशिक, १९९६,
पृ. ६३.

३५. *दैनिक सकाळ*, नाशिक, दि. २३ मार्च २००५.

३६. साप्ताहिक धडपड, मालेगाव, दि. १४/६/१९६३

३७. दैनिक सकाळ, नाशिक, दि. २३ मार्च २००५

३८. वंदन पोतनीस, *स्नेहयात्रा स्मरणिका*, पृ. २३८.

३९. भारतीय इतिहास संकलन समिती (संपा.), *''गौतमी''*, नाशिक, १९९६, पृ. ४७.

४०. *दैनिक सकाळ*, नाशिक, दि. २४/९/ २०११.

४१. *दैनिक देशदूत*, नाशिक, दि. २ नोव्हेंबर २००३.

४२. *दैनिक सकाळ*, नाशिक, दि. २४/९/ २०११.

४३. एन. एस. तांबोळी, जनस्थान, नाशिक, २००५, पृ. २२.

४४. भारतीय इतिहास संकलन समिती (संपा.), ''गौतमी'', नाशिक, १९९६, पृ. ४८.

४५. भावना भार्गवे, *पद्मश्री दादासाहेब गायकवाड, काल व कार्य,* सदाशिव
पेठ, पुणे, १९६८, पृ. १२५.

४६. सुधीर फडके, कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य, नाशिक, जुलै १९७४, पृ. २९२.

४७. मुलाखत, धिवरे जयपाल

४८. कित्ता

४९. प्रदीप गायकवाड, *कामगार चळवळ डॉ. बा. आ. निवडक भाषणे*, नागपूर, २००५, पृ. ६ व ४२.

५०. के.के. खैरनार, पीएच. डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ , पृ. २४० ते २४१.

५१. शं. क. कापडणीस (संपा.), *नामस्मृती*, नाशिक, जुलै २०१२, पृ. ४१.

५२. *दैनिक गांवकरी*, नाशिक जिल्हा आवृत्ती, दि. २४ डिसेंबर १९५५.

५३. के.के. खैरनार, पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ , पृ. २४१.

५४. *दैनिक गांवकरी*, नाशिक, दि. २३ नोव्हेंबर १९५७.

५५. एस. एम.विसपुते, *माणूस नेता : एसेम्*, अमळनेर, २०००, पृ. ३१५.

५६. *दैनिक गांवकरी*, नाशिक, दि. १ जानेवारी १९५८.

५७. एस. एम.विसपुते, *माणूस नेता : एसेम्*, अमळनेर, २०००, पृ. ३१५.

५८. *दैनिक गांवकरी*, नाशिक, दि. ३ जानेवारी १९५८.

५९. के.के. खैरनार, पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ , पृ. २३९ ते २४०.

६०. पांडुरंग आंधळे, *क्रांतिवीर वसंतराव नाईक*, नाशिक, डिसेंबर २००२, पृ. १३४.

६१. मुलाखत, पी. डी.जगताप, नाशिक

६२. पांडुरंग आंधळे, *क्रांतिवीर वसंतराव नाईक, नाशिक*, डिसेंबर २००२, पृ. १३४.

६३. मुलाखत, भालेराव अरुण नामदेव.

६४. *दैनिक देशदूत*, नाशिक, दि. ७ डिसेंबर १९८८.

६५. मुलाखत, मनोहर भागुजी रूपवते

६६. *दैनिक लोकमत*, नाशिक, दि. २० फेब्रुवारी २०००.

६७. *दैनिक देशदूत*, नाशिक, दि. १४ नोव्हेंबर १९८८.

६८. *दैनिक देशदूत*, नाशिक, दि. २५ जानेवारी १९८९.

६९. *दैनिक देशदूत*, नाशिक, दि. ५ एप्रिल १९८९.

७०. *दैनिक देशदूत*, नाशिक, दि. १ मार्च १९८९.

## प्रकरण चौथे

# आदिवासी चळवळ : परिवर्तनाचा आढावा

प्राचीन काळी आर्य व आदिवासी यांच्यात संघर्ष झाला. या संघर्षात आदिवासी दुबळा ठरला. त्यामुळे आदिवासीला जंगलाचा आश्रय घ्यावा लागला. तो जंगल तोडून शेती करू लागला. शेती व्यवस्थेमुळे त्याच्या सामुहिकतेची भावना वाढीस लागली. शेती पध्दत प्राथमिक त्यांच्याजवळ राहिली. लोकसंख्या वाढत गेली त्यामुळे जीवन निकृष्ठ होत गेले. शिकार आणि कंदमुळे यावर उदरनिर्वाहाची शतकानुशतके सवय झाल्यामुळे त्यांच्यात महत्त्वाकांक्षेचा उगम झाला नाही. नाशिक जिल्ह्यातील आदिवासीची आर्थिक परिस्थिती हालाकीची होती. त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन जंगल व शेती हेच आहे.[१] स्वातंत्र्यप्राप्ती वेळी ब्रिटिश राजवटीत आदिवासी विकासासाठी अनेक उपाययोजना राबविण्यात आल्या. मात्र या उपाययोजना राबविण्यामागे धर्मप्रसार करणे हा त्यांचा उद्देश होता.

ब्रिटिश काळात लंडनहून येणारा ख्रिस्ती मिशनरी भारतातील डोंगर दऱ्या, खोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी कुष्ठरोग्याची मलमपट्टी करून सेवाशुश्रुषा करत होतो. त्यामुहे आदिवासी बांधव मिशनऱ्यांकडे अपेक्षेने पाहत असतील. त्याच्या मागे जावून 'येशूख्रिस्त की जय' म्हणत असतील तर त्यात काय वावगे? [२] कारण त्यांना झालेल्या कुष्ठरोगाचे निदान त्याचे पूर्ण जन्माचे पाप, दारिद्रीपणा याला देत होतो.

आदिवासीची आर्थिक समितीबाबत इ. स. १९३२ साली जनगणना आयुक्त हटन यांनी म्हटले होते की, ''आदिवासींना अलग, अलिप्त राहू द्यावे''. तसेच वंश शास्त्रज्ञ आणि ख्रिस्ती मिशनरी डॉ. व्हेरियर एल. व्ही. यांनी म्हटले आहे की, ''आदिवासी समाजाच्या समस्या प्रगत समाजाच्या संपर्कातून उद्‌भवल्या आहेत'' तेव्हा त्यांना शक्य तितके प्रगत समाजापासून पूर्णपणे अलग ठेवावे. राखीव जागी ठेवले जावे, त्यामुळे त्यांची स्वतःची संस्कृती जोपासता येईल. संस्कृतीवरील आक्रमण, त्याची पिळवणूक थांबेल'[३] प्रगत समाजाने आदिवासी समाजाचे शोषण

केले, त्यामुळे त्याच्या समस्येत भर पडली ते काही अंशी खरे असले तरी ती समस्या सोडविण्यासाठी बाहय जगापासून अलिप्त ठेवणे ही बाब राष्ट्रीय एकात्मकतेच्या दृष्टीकोणातून बरोबर नाही. हे इतिहासाविरूध्द वर्तन आहे. परंतु ख्रिस्ती मिशनरी व राज्यकर्ते यांना आदिवासीच्या अलिप्तपणामुळे धर्मप्रसार करणे सोपे जाणार होते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिशांचे धोरण वसाहतवादी होते. ते आदिवासीबाबत शक्यतोवर तटस्थ राहात होते. इ. स. १७८२ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने राजमहल टेकडयातील आदिवासी येथील जमीनदार यांच्या संघर्षातून मार्ग काढण्यासाठी कायदा करून आदिवासींना काही सवलती दिल्या होत्या. मात्र इ. स. १८५६ मध्ये संभाळी लोकांनी केलेलया उठावामुळे या सवलती काढून घेण्यात आल्या होत्या. इ. स. १८७४ मध्ये आदिवासी (अनुसूचित) जिल्हयाबाबत कायदा करण्यात आला. इ. स.१९३५ मध्ये ब्रिटिशांनी आदिवासी लोकांच्या समस्याचे स्वरूप लक्षात येण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी चौकशी सिमती नियुक्त केली होती. इ. स. १९२२ मध्ये महात्मा गांधी हियांच्या प्रेरणेने ''भिल्ल सेवा'' नावाची संस्था निर्माण झाली. इ.स. १९१८ मध्ये ''खानदेश भिल्ल सेवामंडळ'' ही संस्था काकासाहेब बर्वे व शंकरराव ठकार यांनी स्थापन केली होती.

नाशिक जिल्हयातील आदिवासीच्या आर्थिक विकासासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून दादासाहेब बिडकर, भाऊसाहेब हिरे, नानासाहेब दिक्षित, गोदावरी परूळेकर, ठक्कर बाप्पा इत्यादी नेत्यांनी प्रयत्न केले होते. भूमीला खऱ्या अर्थाने माता मानणारे हे आदिवासी लोक होय. राकट शरीराची पण निरागस मनाची माणस आहेत. प्रगतीकडे जाणाऱ्या आधुनिक शिक्षणाचे मार्गावर पहिले पाऊल टाकण्याआधी धार्मिक चालीरिती, मागासलेपणा, आर्थिक दुर्बलता, देव देवतांच्या जंगलातून बाहर पडावे की ना पडावे या संक्रमात अमूल्य वेळ दवडणारे हे आदिवासी होय.

आदिवासी हा मराठी शब्द इंग्रजीतील ट्राईब्ज या शब्दापासून घेतला असावा.[४] आदिवासींना वनवासी असेही म्हटले आहे. युरोपीयन लोकांनी ज्यावेळी अमेरीका, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका व पूर्व आफ्रिका या प्रदेशात आपल्या वसाहती स्थापन केल्या होत्या. तेव्हा आधीपासून वास्तव्य करणाऱ्या लोकांना त्यांनी मूळचे रहिवाशी

असे नाव दिले. भारतात आर्य लोकांच्या आगमनापूर्वी टोळया, ट्राईब्ज, भूमीज, भूमिजन, अदिम या नावाने देखील ओळखले जात असत. आदिवासी अथवा मूळ आदिवासी हाच शब्दप्रयोग त्याकरीता योग्य आहे.

शहरी वस्तीपासून दूर राहणाऱ्या या आदिवासी लोकांना भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जमाती (शेडुल्ड ट्राईब) असा शब्दप्रयोग ३६६ (२५) कलमानुसार केलेला आहे. मात्र त्याऐवजी मूळ निवासी किंवा आदिवासी हाच शब्दप्रयोग अनेकांना योग्य वाटतो.[५] इ. स. १९६२ मध्ये शिलाँग येथे भरलेल्या आदिवासी परिषदेत आदिवासी या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे. एका समान भाषेचा वापर करणाऱ्या एकाच पूर्वजांपासून उत्पत्ती सांगणारा एका विशिष्ट प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या तंत्रशास्त्रीय दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेल्या व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरीवाजांचे प्रामाणकपणे पालन करणाऱ्या एकजिनशी गटाला ''आदिवासी समाज'' असे म्हणतात.[६] आदिवासी परिषदेत केलेली ही व्याख्या अर्थपूर्ण व वास्तव असून आदिवासी विकासाची गरज प्रतिपादन करणारी आहे. नागरी संस्कृती पासून अलिप्त राहणारा हा समाज रूढीप्रियतेमुळे मागास राहिला आहे.

आदिवासी लोक आत्मसंरक्षणास तितकेसे समर्थ नव्हते. त्यामुळे भारतात पश्चिम, वायव्य व ईशान्य या दिशांकडून आलेल्या अनुक्रमे द्रविड, इंडो आर्यन या लोकांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. त्यापुढे या वन्य जमातींना हार मानावी लागली. आजही हे अशाच जागी कायमची वसती करून राहातात. या आदिवासींचे अनेक पोट जातीत विभाजन झाले. मात्र प्रत्येक जात स्वतंत्र समजली जाते. आदिवासी समाज मूळचा रहिवाशी, गतिहीन, मागासलेला, आर्थिक दुर्बलता, रूढीप्रिय, अक्षर ओळख नसलेला वनवासी, गिरीजन अशा पध्दतीने विचारंत त्याचे विवेचन करतात. प्राचीन काळापासून त्याचे योगदान आहे.

## नाशिक जिल्हयातील आदिवासी

महाराष्ट्र राज्यातील २१ जिल्हयांपैकी नाशिक हा एक जिल्हा आहे. महाराष्ट्रातील प्रमुख १० आदिवासी जिल्हयांपैकी नाशिक हा आदिवासी बहुसंख्य

वसती असलेला जिल्हा आहे. नाशिक जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी २२-२५ टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे.[७] या जिल्हयातील ७ तालुके नाशिक, इगतपूरी, पेठ, सुरगाणा, दिंडोरी, बागलाण, कळवण हे आदिवासी तालुके म्हणून महाराष्ट्र शासनाने घोषित केलेले आहेत.

## आदिवासीचे उद्योगधंदे

आदिवासी लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. त्याचे उपजीविकेचे मुख्य साधन शेती आहे. शेती व्यवसायात शेती करणाऱ्या आदिवासीचे दोन प्रकार पडतात. स्वतःच्या मालकीची शेती करणारे आणि दुसऱ्यांची शेती भाडयाने किंवा बटाई हिश्याने करणारे किंवा दुसऱ्याच्या शेतीवर श्रम करून मजुरी करणारे शेतकरी संशोधन कार्य क्षेत्रातील ५५ टक्के आदिवासी स्वतः शेतकरी असून २५ ते ३० टक्के शेतमजूर आहेत. सुमारे २५ टक्के आदिवासी गवत गोळा करणारे, जंगलातील लाकुडतोड, फुले, फळे व पाने गोळा करणे, शिकार करणे इत्यादी व्यवसाय करतात. ६५ टक्के लोकांना त्याच्या स्वतःच्या जमिनी आहेत. २५ टक्के दुसऱ्याच्यजमिनी खंडाने करतात. मात्र शेतीचे उत्पन्न खूप कमी आहे. त्याची शेती पावसावर अवलंबून आहे. यात मात्र झपाटयाने बदल होत असून शासकीय योजनाचा फायदा शेती व्यवसाय विकासाकडे वाटचाल करत आहे. आदिवासी भागातील शेतीवर काम करणाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणत आहे. लहान मुले, वृध्द, स्त्री-पुरुष शेतीवर राबतात. परंतु अधिक कष्ट करणारा हा आदिवासी समाज आर्थिकदृष्टया दुर्बल असल्यामुळे सुख दिसत नाही.

नाशिक जिल्हयातील आदिवासी भागातील जमीन डोंगर घाट उतारावरील दऱ्या-खोऱ्यात आहे. घनदाट जंगल त्यातून पाऊल वाटेने जाऊन आदिवासी शेतीचा व्यवसाय करतात. आदिवासीची शेती फक्त पोटाची खळगी भरण्यासाठी आहे. त्यातही सावकारी, व्यापारी, कंत्राटदार, अधिकारी शोषण करायला टपलेले आहेत. परंतु अलिकडच्या काळात राजकीय विकास झाल्यामुळे बाहय जगाशी संपर्क येऊ लागल्यामुळे आदिवासी भित्रा होता तो आता धीट बनू लागला आहे.

आदिवासी भागातील लागवडी खालील जमिनीत खरीप व रब्बी या दोन प्रकारची पिके घेतली जातात. या पिकांचे अन्नधान्य शिवाय इतर नगदी स्वरूपाची पिके घेतली जातात. अन्नधान्याचा भरपूर साठा व्हावा म्हणून नवीन बी-बियाणे वापरली जातात.[८] त्यात ज्वारी, बाजरी, मका, भात, भुईमुग, नागली, तूर, नाचणी, गहू, उडीद, मुग इत्यादी पेरली जातात.

आदिवासी लोकांची शेती जुन्या परंपरागत पध्दतीने आणि तुटपुंज्या साधन सामुग्रीने केली जाते. त्याच्यातील काही शेतकऱ्यांची जमीन धारणा अधिक आहे. परंतु त्याबरोबर भूमीहीनांचे प्रमाणही बरेच आहे. ओलीताची शेती विशेषतः मोठया प्रमाणात आढळत नव्हती. त्यामुळे जमिनीत फक्त खरीप पिके घेतली जातात.[९] त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण सरासरी कमी होते. त्यामुळे एकूण शेती हा व्यवसाय आदिवासीच्या उपजीविकेसाठी पुरसे उत्पन्न देऊ शकत नाही.

## शेतमजूर

शेतमजूर हा अर्थव्यवस्थेतील एक सर्वात दुर्बल घटक आहे. संशोधन कार्यक्षेत्रातील ६०% जमीन शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे म्हणजे कोरडवाहू जमीन आहे. आज रोजी पो. सुरगाणा या तालुक्यामध्ये तसेच देवळा, मालेगाव, नांदगाव, येवला, चांदवड या तालुक्यातील काही भागांमध्ये मार्च महिन्यापासून पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. शेतमजूर वर्षभर शेतीवर मजुरी करत राहतात. शेती परंपरागत पध्दतीने केली जाते. नांगरणी पासून ते कापणी पर्यंत विविध कामे मजुरांकडून रोजगारावर करून घेतली जातात.

नाशिक जिल्हयातील नाशिक, पेठ, दिंडोरी, सुरगाणा, कळवण, बागलाण, इगतपूरी या सातही आदिवासी तालुक्यातील शेतकऱ्यांची संख्येपैकी जवळ जवळ ७०% शेतकरी आदिवासी आहेत. तर ८५% शेतमजूर आदिवासी आहेत. बिगर आदिवासी क्षेत्रातही शेतमजूर म्हणून आदिवासी लोक याच मोबदल्यात काम करतात. त्यामुळे त्याचे आर्थिक जीवन दारिद्री आहे. त्यामुळे त्यांना गरीब, उपासमारीला तोंड द्यावे लागते. शेतमजुरांना धान्याच्या मोबदल्यात मजुरी दिली जाते. दुसऱ्याच्या शेतात काम करणारा मजूर असतो. त्याला सालदार असे म्हणतात.

आदिवासी भागात स्थलांतरीत शेतीची प्रथा होती. मात्र ती प्रथा जवळ जवळ बंद झालेली आहे. परंतु आदिवासी भागतील शेतमजूर व काही अल्प जमीन असलेले शेतकरी ग्रामीण भागात विशेष करून बागायत जमीन असलेल्या भागात साधारणपणे डिसेंबर महिन्यापासून स्थलांतर करतात. पावसाळा सुरू होण्याआधी हे मजूर आपल्या भागात परत येतात. याला कारण म्हणजे पुरेसा रोजगार उपलब्ध होत नाही.

## उद्योगधंदे

नाशिक शहर व जिल्हयातील काही ठिकाणी औद्योगिक विकासाचे गाळे पसरले आहे. मालेगाव, सिन्नर, देवळाली, ओझरमिग, दिंडोरी इत्यादी ठिकाणी औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) कार्यरत आहे. त्या ठिकाणी मोठे कारखाने औद्योगिक प्रकल्प आहेत. परंतु त्या कारखान्यामध्ये काम करण्यासाठी लागणारे कौशल्य आदिवासीकडे नसल्यामुळे याचा त्यांना फारसा उपयोग होत नाही. काही प्रमाणात जड श्रमाची कामे मिळतात. त्यामुळे हा आदिवासी भाग औद्योगिक दृष्टीने मागासलेला आहे.[१०] नैसर्गिक साधन सामुग्री प्रामुख्याने वन उत्पादन यावर आधारित कच्चा माल म्हणून उपयोगात आणणारे उद्योग उभारण्यात यावेत.

आदिवासी भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असला तरी शेतीच्या उत्पन्नावर संपूर्ण वर्षभर कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नाही. त्यामुळे शेतीला जोड उद्योग म्हणून लाकूड विकणे, गवत गोळा करणे, टेंभूर्णीची पाने, मोहाची फूले गोळा करून विकणे इत्यादी उद्योग त्यांना करावे लागतात. मात्र हे उद्योग केवळ दोन तीन महिनेपर्यंत चालतात. याशिवाय शेळया, कोंबडया, गायी, म्हशी पाळणे, जंगलातील कंपात काम करणे, रस्ता दुरूस्तीची कामे करणे इत्यादी प्रकारचे उद्योग आदिवासी लोक करीत असतात.[११] पान वस्तू गोळा करून विकणे, तेंदूची पाने, आपटयाची पाने, मुळे, मोहाची फुले इत्यादी वनस्पती अन्नपदार्थ म्हणून विकतात. डिंक काढून विकणे हा आदिवासीचा लहानसा व्यापार परंतु जंगल हळू हळू नष्ट होऊ लागल्यामुळे हा व्यवसाय नष्ट होत आहे.

## १. मद्य तयार करणे किंवा दारू गाळणे

मद्य तयार करणे हा आदिवासीचा चैनीचा आवडता व्यवसाय आहे. मोहाची फुले, गुळ व नवसागर या पदार्थापासून हातभटटी लाऊन दारू तयार करतात. आदिवासीच्या सांस्कृतिक जीवनात दारूला अनन्य साधारण महत्त्व दिसून येते. ते आपला चरितार्थ चालविण्यासाठी हा व्यवसाय करतात. यामुळे आदिवासी समाजामध्ये या व्यसनाचे प्रमाण खूप वाढले आहे. आनंद व दुःख या दोन्ही वेळी ते मद्यपान करतात.[१२] आजही ग्रामीण भागात दारू तयार करून विक्री करण्याचे काम आदिवासी करतात.

## २. शिकार व पशूपालन

प्राचीन काळापासून आदिवासी लोकांचा प्रिय व्यवसाय शिकार करून उपजीविका करणे, शिकारीमध्ये विविध प्रकारच्या प्राण्यांची शिकार केली जाते. उदा. चिमणी, कबुतर, मोर, कोकिला, ससा, हरिण, साळुंकी, लाव्हरी इत्यादी पशू पक्षांचा समावेश होतो. शिकारीकरीता निरनिराळया प्रकारची हत्यारे वापरतात. त्यामध्ये गोफण, तिरकामठा, भाला, कुऱ्हाड, विळा इत्यादी साधणे वापरतात.

पाळीव प्राण्यांचा आणि त्याच्यापासून मिळणाऱ्या पदार्थांच्या उदरनिर्वाहासाठी उपयोग करण्याच्या क्रियेला पशूपालन असे म्हणतात. पाळीव गाईच्या जातीची संख्या मर्यादित असून त्यामध्ये गाय, बैल, शेळी, मांजर, कोंबडी, कबुतर, मोर, पोपट, चिनी कोंबडया हे पाळीव प्राणी आहेत. थोडक्यात आर्थिकदृष्टया ज्या आदिवासीची परिस्थिती चांगली आहे तेच गाय, बैल इत्यादी प्राणी पाळतात. आर्थिकदृष्टया दुर्बल लोकांचे हे पशू प्राणी पाळण्याची ऐपत नसते. देशात, राज्यात, जिल्ह्यात आयात निर्यात, व्यापारात वाढ झालेली असली तरी शेतकरी, शेतमजूर विशेष करून आदिवासी हा वर्ग गरीब राहीला. गरीब श्रीमंत यांच्यातील दरी कधीच कमी झाली नाही. तसेच वेठबिगार पध्दती जरी कायद्याने बंद झाली असली तरी अप्रत्यक्षपणे वेठबिगारी चालू आहे. ''मानव जन्माला येतो तेव्हा मुक्त असतो. तरीही प्रत्येक ठिकाणी त्याच्या पायी बेडया अडकवलेल्या आढळतात'' असे रूसोने म्हटले

आहे. इ. स. १९७६ मध्ये संसदेने कायदा करून वेठबिगार पध्दत बंद केली. ही पध्दत रोखण्यासाठी तालुका पातळीवर समित्या स्थापन करण्यात आल्या. तरी सुध्दा ''गांधी पीस फाऊंडेशन आणि नॅशनल इन्स्टीटयूट'' यांनी सर्व्हेक्षण करून जो अहवाल प्रसिध्द केला त्यामध्ये महाराष्ट्रात वेठबिगारी आहेत असे सांगितले.[१३]

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी लोकांचा मुख्य व्यवसाय जंगलातून मध, अन्न गोळा करणे. पशूपालन आणि शेती व्यवसाय आहे. शेतीवर, जंगलावर आणि इतर कामावर मजुरीसाठी जाणे ही त्यांची नित्याचीच कामे आहेत. कोकणा आदिवासी ग्रामीण व जंगली राहतात. क्षुल्लक धान्यावर उपजीविका करतात. नाशिक जिल्ह्याचा काही भाग आदिवासी भाग म्हणून ओळखला जातो. ब्रिटिश काळात या भागात मिस जे. एल. लॅथम नावाची सेवानिवृत्त इंग्रज स्त्री कार्य करत होती. ती बागलाण तालुक्यातील ताहाराबाद येथील डाक बंगल्यात निवासी राहात होती. मुल्हेर-ताहाराबाद परिसरातील २५-३० खेड्यात पायी प्रवास करीत फिरताना मोडक्या-तोडक्या बोलता येणाऱ्या मराठी-हिंदी भाषेत आदिवासी लोकांशी संवाद साधत होती. सावकारी आणि सरकारी अधिकारी यांच्या दृष्टचक्रात अडकेलेले आदिवासी लोक त्यांच्याजवळ आपल्या व्यथा सांगत असत.

आदिवासी लोक परिसरातील जंगलातून सरपणाच्या मोळ्या आणत. त्या मोळ्या लॅथमबाई खरेदी करून त्याच्या बदल्यात रोज एक शेर बाजरी देत होत्या. त्यांचा हा उपक्रम बरेच दिवस चालत होता. त्यावेळी मार्च-एप्रिल १९३७ मध्ये दादासाहेब बिडकर व मिस लॅथमबाई यांची भेट झाली. तेव्हा या वयोवृद्ध स्त्रीने बिडकरांना आदिवासींच्या मदतीकरीता संस्था उभी करावी असा सल्ला दिला. त्यास सर्व सहकार्य देण्याचेही आश्वासन दिले होते. त्यांच्या या सल्ल्यावर दादासाहेब बिडकरांनी वैकुंठभाई मेहता यांना पत्र लिहून कळविले होते. त्यास त्यांच्याकडून होकार मिळाला. परंतु त्याबरोबर त्यांनी एक इशारा दिला, तो म्हणजे, ''चांगलं ते सर्व शिका, चांगलं ते करा, पण धर्मप्रसाराला बळी पडू नका.'' त्याप्रमाणे दादासाहेब बिडकर यांनी संस्था सुरू करण्याकरीता जिल्हाधिकारी, स्थानिक जागरूक लोकांशी बोलणी केली होती. त्यानंतर ठक्कर बाप्पा यांची भेट घेऊन त्यांच्याशी

सविस्तर चर्चा करून त्यांचे आशीर्वाद घेतले. २३ जून १९३७ रोजी मुल्हेर येथे ''डांगसेवा मंडळ'' या नावाची संस्था स्थापन करून मुल्हेर येथे तिचे कार्यालय उघडले होते. या संस्थेच्या माध्यमातून सुरूवातीच्या काळात त्यांनी तीन उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवली होती, ती म्हणजे -

१. आदिवासींना कर्ज मुक्त करण्यासाठी प्रयत्न करणे.

२. आदिवासींवर सरकारकडून होणाऱ्या अन्यायाचं निवारण आणि आदिवासींच्या तक्रारीचं निवारण.

३. आदिवासींना शिक्षण देणेसाठी प्रयत्न करणे.

दादासाहेब बिडकर यांनी पुढाकार घेऊन स्थापन केलेल्या ''डांगसेवा मंडळ'' या संस्थेला आर्थिक मदत देण्याचे वैकुंठभाई मेहता यांनी मान्य केले होते. तेव्हा बिडकर यांनी बागलाण तालुक्यातील मुल्हेर परिसरातील २५-३० खेडेगांवातील समस्या जाणून त्याचा अहवाल तयार केला. तो अहवाल वैकुंठभाई मेहता यांना सादर केला. त्यानंतर त्यांनी संस्थेच्या माध्यमातून आदिवासीकरीता शाळा सुरू करणे आणि त्यांची अन्नाची गरज भागवण्याकरीता आदिवासींना धान्य पुरवण्यासाठी धान्य कोठार सुरू केले होते. त्यातून आदिवासींना खावटी व बियाणे देण्यात येत होते. यावरून आपल्या असे लक्षात येते की, दादासाहेब बिडकर यांनी सावकार वर्गाकडून आदिवासींची होणारी पिळवणूक थांबवण्याकरीता हा उपक्रम हाती घेतला असावा. तसेच आदिवासीच्या अन्नाचा प्रश्न जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत ते आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत, ही आदिवासींची प्रमुख समस्या लक्षात घेऊन त्यांनी धान्य कोठारांची योजना सुरू केली असावी, असे आपणास दिसून येते.

सन १९४१-४२ मध्ये बागलाण तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी कोणाही आदिवासीकडे घरात धान्य नसल्यामुळे त्यांची उपासमार सुरू झाली होती. तेव्हा आदिवासी लोक आपल्या पोटाची खळगी भरण्याकरीता नाशिकमध्ये स्थलांतरीत होऊ लागली होती. त्यावेळी दादासाहेब बिडकर, शंकरराव शिंदे, अमृता पांडु पाटील इत्यादी कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन 'डांगसेवा मंडळा'च्या माध्यमातून या दुष्काळी परिस्थितीत आदिवासींना धान्य पुरविण्यासाठी उपाययोजना

केली होती. त्याकरीता त्यांनी या आदिवासी भागात अनेक ठिकाणी धान्य केंद्र सुरू केली होती. त्यांच्या या कार्याला ठक्कर बाप्पा, आवारी गुरुजी, वैकुंठभाई मेहता यांचा आशीर्वाद मिळाला होता. तसेच त्यांच्या या कार्यात बागलाण तालुक्यातील मुंगसे या गावातील महादू पाटील नावाच्या शेतकऱ्यानेही हातभार लावला होता. त्या काळात सत्तेवर असलेल्या सरकारने शेतकऱ्यांकडून सक्तीने धान्य वसुली (लेव्ही) सुरू केली होती. परंतु संबंधित शेतकऱ्याने सरकारला लेव्ही न देता आपल्याकडे असलेल्या धान्याचा साठा परिसरातील शेतकऱ्यांना धान्य व बियाणे म्हणून देण्याकरीता राखून ठेवला होता. तेव्हा या गोष्टीची माहिती सरकारी अधिकाऱ्यांना कोठून तरी मिळाल्यावर त्यांनी ते सर्व धान्य जप्त करण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांचेवर गुन्हा दाखल केला होता. तेव्हा भाऊसाहेब हिरे, दादासाहेब बिडकर व गोविंद हरी देशपांडे यांनी प्रयत्न करून सरकारी अधिकाऱ्यांना तो गुन्हा मागे घेण्यास भाग पाडले होते. या घटनेतून आपणास असे दिसते की, निरक्षर, अशिक्षित आदिवासींना कायद्याचा धाक दाखवून सरकारी अधिकारी जी सक्तीची धान्य वसुली (लेव्ही) जमा करत त्या विरोधी या कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य जनतेत जागृती केली होती. तसेच सरकारी अधिकाऱ्यांना सक्तीचे धान्य न देता ते गरजू, गरीब आदिवासीच्या उपयोगात आणले होते.

आदिवासींच्या परिचयाची शिक्षित मंडळी म्हणजे सरकारी अधिकारी, सावकार व ठेकेदार एवढेच होते. मात्र हे सर्वजण आदिवासी प्रजेला लुटणारे, त्यांच्यावर अत्याचार करणारे असे होते. त्यावेळी आदिवासींच्या समस्या, त्यांच्या अडीअडचणी समजावून घ्याव्यात या उद्देशाने इ. स. १९४५ मध्ये पेठ तालुक्यातील बोरकर या खेडेगावात उच्चशिक्षित व आदिवासी प्रजेबद्दल असुया असणाऱ्या व्यक्तिंची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस तत्कालीन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, शंकरराव देव, साने गुरुजी, आचार्य बाबा भिसे यांच्या उपस्थितीत ही बैठक घेतली. त्यांना परिसरातील आदिवासींची खरी परिस्थित व त्यांच्या असलेल्या समस्यांची जाणीव करून दिली होती.

आदिवासींना कशाचीही जाणीव नव्हती. कुठेतरी मजुरी करणे, मिळेल ते खाते, अडचणीच्या प्रसंगी शेठ-सावकारांकडून कर्ज घेणे, त्यांच्या घरी, शेतात राबून ते फेडणे यापुरतेचे त्यांचे जीवन मर्यादित होते. तसेच आदिवासी कामगारांची जंगलाच्या ठेकेदाराकडून पिळवणूक, शोषण, केले जात होते. तेव्हा या प्रवृत्तीचा कुठेतरी शेवट करावा. आदिवासी जंगल कामगाराला त्याच्या कामाचा योग्य तो मोबदला मिळावा याकरीता सहकारी संस्था स्थापन करावी, या उद्देशाने इ. स. १९४८ मध्ये पेठ तालुक्यातील आणे या गावी ''आदिवासी जंगल कामगार सोसायटी'' स्थापन करण्यात आली होती. त्यानंतर ''डांग जंगल कामगार संघ'' स्थापन करण्यात आला होता. या सोसायटींना सरकारच्या वन खात्याकडून ''कूप'' मिळत असत. या कुपामधील सागवानी लाकूड, जळाऊ लाकूड वेगवेगळे करून त्याची विक्री केली जात असे. त्यातून मिळणारा पैसा सरकारच्या वन खात्याकडे जमा करण्यात येत होता. कामगाराला मिळालेल्या रक्कमेतून एक रुपया मागे एक आणा जमा केला जात होता. त्या कामगाराचे अशा प्रकारे ५ रुपये इतकी रक्कम जमा झाल्यावर त्याला सोसायटीचा सभासद करून घेतले जात होते. पेठ, सुरगाणा, दिंडोरी, बागलाण, कळवण या परिसरात जंगल कामगार सोसायटी माध्यमातून तेथील जंगल कामगारांचे प्रश्न, समस्या सोडविण्यात येऊ लागल्या होत्या. तसेच आदिवासी जंगल कामगारांना जंगलातून फक्त लाकूड तोडून आणणे एवढ्या कामाकरीता राबवून न घेता त्यांना लाकडाचे मोजमाप करणे, गट लावणे, मजुरी काढणे, नोंदी व हिशोब लिहिणे इत्यादी कामे तेथील स्थानिक आदिवासींना शिकविण्यात आली होती.

## आदिवासीचें आर्थिक परिवर्तन

नाशिक जिल्ह्याचा पश्चिम भाग आदिवासी बहुल आहे. या परिसरात निवासी असलेली जनता कोकणा, कोळी, भिल्ल, वारली या जमातीची आहे. या परिसरात राहणाऱ्या जनतेचे जीवन अतिशय कष्टमय, पिकेल तेवढे खावे, जंगलातील फळे, कंदमुळे यावर आपली उपजीविका भागवावी. तसेच या परिसरात त्या काळी रस्ते दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. सतत मुक्त, स्वच्छंदीपणे जीवन जगणारे

लोक होते. त्यांच्या जीवनात असलेल दारिद्र्य, अज्ञान आणि शोषण या सर्व बाबींचे निरीक्षणातून ज्यांच्या लक्षात आले ते दत्तात्रय (दादासाहेब) मल्हार बिडकर यांनी आपल्या सहकार्याची मदत घेऊन त्यांच्यात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते.

इ. स. १९०५ मध्ये ठक्करबाप्पा यांनी आदिवासी जनतेच्या जीवनात बदल घडवून आणण्याकरीता 'आदिमजाती सेवक संघ' स्थापना केली होती. तसेच आदिवासी जनतेच्या उत्थानाकरीता महात्मा गांधीजींनी गरीबातल्या गरीब समाजात जाऊन काम करा असा उपदेश केला होता. याच प्रेरणेतून बागलाण परिसरात कार्यरत झालेले दत्तात्रय (दादासाहेब) बिडकर यांनी बागलाण व त्यास लागून असलेल्या डांग परिसरात आपले कार्य सुरू केले होते. त्यातून त्यांना या भागातील आदिवासी जनतेच्या समस्या आणि परिस्थितीची जाणीव झाली होती. तेव्हा त्यांनी आपल्या सहकार्याच्या मदतीने इ. स. १९३७ मध्ये सटाणा (बागलाण) येथे 'डांगसेवा मंडळ' स्थापन करून पुढाकार घेतला होता. त्यानंतर इ. स. १९४६ च्या काळात 'आदिमजाती सेवक संघाचे' तत्कालिन अध्यक्ष मोरारजी देसाई होते, तर उपाध्यक्ष दादासाहेब बिडकर होते. तेव्हा त्यांनी नाशिक जिल्हयातील बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे जंगल कामगार सहकारी चळवळीचे अधिवेशन भरविले हाते. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. जुगतरामभाई होते. तसेच अधिवेशनाकरीता आचार्य भिसे, भाऊसाहेब हिरे, द. न. बांद्रेकर यांच्यासह राज्यातील जंगल कामगार सहकारी संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रारंभीच्या काळात सरकार जमीन घेऊन जंगल कामगार संस्थाना कूप दिले होते. कूप म्हणजे सरकारच्या वनखात्यात जंगलाखाली असलेले भाग. असे भाग कूप वनखात्याकडून सोसायटींना दिले जात. त्या सोसायटीला त्या कूपाचे पैसे वनखात्याकडे भरणा करावे लागत होते. या कूपात सागवानी आणि जळाऊ लाकूड वेगळे करून विक्रीसाठी तयार करावे लागत होते.[१४] तेव्हा जंगल कूप ठेकेदारांकडून वन कर्मचाऱ्यांकडून जंगलात काम करणाऱ्या आदिवासी जनतेची पिळवणूक केली जात होती. या सर्व परिस्थितीतून या जनतेला त्यांच्या कामाचा मोबदला मिळवून

देण्यासाठी त्यांच्यावर केले जाणारे अन्याय, अत्याचार दूर करण्यासाठी त्यांना योग्य मजुरी मिळू शकेल, यासाठी नाशिक जिल्हयातील आदिवासी भागात जंगल कामगार सहकारी चळवळीची सुरूवात केली होती. आदिवासी मजुराने मालक म्हणून काम करून मजुरी मिळविणे हा जंगल सहकारी चळवळीचा मुख्य उद्देश होता.

जंगल कामगार सोसायटीत काम करणाऱ्या आदिवासी कामगारांना कूपातील लाकूड तोडणे, लाकूड तासणे, वाहतूक करणे, मोजमाप करणे, गट लावणे ही कामे करावी लागणार होती. तेव्हा या सर्व कामाची माहिती सहकारी संस्थेने वनखात्याकडून मिळविली होती. तसेच या संस्थेत काम करणाऱ्या सहकार्यांनी स्थानिक आदिवासी तरूणांकडून हिशोब ठेवणे, मजुरी काढणे अशा कामाची माहिती दिली होती. इ. स. १९४७ मध्ये मोहळांगीला डांगसेवा मंडळांतर्गत जंगल कामगार सहकारी सोसायटीची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर इ. स. १९४८ मध्ये नाशिक जिल्हयातील आदिवासी भागात पेठ तालुक्यातील अंबे या गावी सुरू केली होती.

त्यानंतर त्यांनी नाशिक जिल्हयातील आदिवासींची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी दादासाहेब बिडकर यांनी पुढाकार घेऊन कळवण तालुक्यातील अभोणे येथे दत्तोपंत अभोणकर यांच्या देखरेखेखाली जंगल कामगार सहकारी सोसायटी स्थापन केली होती. तसेच पेठ तालुक्यातील शिवशेत येथे विष्णू नलपाठकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केली होती. या सोसायटीचे नंतर बाऱ्हे विभाग जंगल कामगार सहकारी संघ असे नामकरण केले होते. या सोसायटीचे पहिले चेअरमन धर्मा झिपर गायकवाड हे होते. तसेच इ. स. १९४९ मध्ये सुरगाणा तालुक्यातील राक्षसभुवन व दांडीची बारी येथे डांगसेवा मंडळांतर्गत असलेलया जंगल कामगार सहकारी सोसायटीने स्वतंत्र कूप घेतले होते. या कूपातील लाकूड विक्रीतून सोसायटीला जो नफा झाला होता त्या नफ्यातून सोसायटीने १६ एकर जमीन खरेदी केली होती. त्या जमिनीला 'वन वैभव' असे नाव दिले होते. नाशिक जिल्हयातील पेठ, सुरगाणा, बागलाण, कळवणे, दिंडोरी या तालुक्यात बापू मास्तर, नानू दिक्षित, बाळासाहेब अग्निहोत्री यांच्या सहकार्याने सुमारे ३२ जंगल कामगार सहकारी

सोसायटीची स्थापना केली हेती. तसेच इ. स. १९६६ मध्ये दादासाहेब बिडकर हे महाराष्ट्र राज्य 'जंगल कामगार संघ' या संस्थेचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्त झाले होते. तेव्हा त्यांनी या चळवळीचा प्रसार करण्यासाठी 'जंगल कामगार' नावाचे मुखपत्र सुरू केले होते. डांगसेवा मंडळ, नाशिक संलग्नित जंगल कामगार सहकारी संघ खालीलप्रमाणे -

०१. पेठ विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., वनवैभव, सीता गुंफा रोड, पंचवटी नाशिक.

०२. पेठ तालुका, सुरगाणे विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., भोंडे गल्ली, पंचवटी, नाशिक.

०३. आंबेविभाग, जंगल कामगार सहकारी संघ, भोंडे गल्ली, पंचवटी, नाशिक.

०४. बाऱ्हे विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., वनवैभव, सीता गुंफा रोड, पंचवटी, नाशिक.

०५. हरसुल विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., तेली धर्मशाळा, रविवार पेठ, नाशिक.

०६. शिरसगाव विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., तेली धर्मशाळा, रविवार पेठ, नाशिक.

०७. देव डोंगरा, ओझर विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., तेली धर्मशाळा, रविवार पेठ, नाशिक

०८. गोंदे विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., तेली धर्मशाळा, रविवार पेठ, नाशिक.

०९. आंबोडा विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., वनवैभव, सीता गुंफा रोड, पंचवटी, नाशिक.

१०. ननाशी विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., वनवैभव, सीता गुंफा रोड, पंचवटी, नाशिक.

११. पळसन विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., वनवैभव, सीता गुंफा रोड, पंचवटी, नाशिक.

१२. मनखेड विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., भोंडे गल्ली, पंचवटी, नाशिक.

१३. भनवड विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., वनवैभव, सीता गुंफा रोड, पंचवटी, नाशिक.

१४. सुरगाणे महाल, जंगल कामगार सहकारी संघ लि., ता. पो. सुरगाणा.

१५. सुरगाणे महाल, पूर्व विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., ता. पो. सुरगाणा.

१६. उंबरठाण विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., ता. पो. सुरगाणा.

१७. पांगारणे विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., ता. पो. सुरगाणा.

१८. बारागाव डांग विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., ता. पो. वासंदा, जि. सुरत.

१९. बारागाव डांग, दक्षिण विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., ता. पो.वासंदा, जि. सुरत.

२०. सिध्देश्वर कनाशी विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., ता. पो. कळवण.

२१. अभोणे फॉरेस्ट लेबरर्स को-ऑप. सोसायटी लि., ता.पो. कळवण.

२२. इंद्रयाल विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., ता. पो. कळवण.

२३. गणेश विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., ता. पो. कळवण.

२४. आसखेडा विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., आसखेडा, ता. बागलाण.

२५. मुल्हेर विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., पो. सटाणे, ता. बागलाण.

२६. डांगसौंदाणे विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., पो. सटाणे, ता. बागलाण.

२७. नांदगाव विभाग, जंगल कामगार सहकारी संघ लि., पो. मनमाड, ता. नांदगाव.

२८. ब्लॅकवर्ड क्लास जंगल कामगार सहकारी संघ लि., पो. ता. पेठ. बागलाण.

आदिवासी भागात बाहेरून आलेले ठेकेदार आदिवासी कामगारांची लुबाडणूक करीत होते. ही सर्व परिस्थिती दादासाहेब बिडकर यांनी पाहिली. तेव्हा त्यांनी या कामगारांना जागे करण्यासाठी या संघाची स्थापना केली. त्या माध्यमातून त्यांनी जंगल तोड काम सर्वसमावेशक या सहकारी सोसायटीच्या कार्यातून आदिवासी तरूणांना साधे हिशोब करता येऊ लागले होते. त्यांना त्यांच्या कामाची योग्य मजुरी मिळू लागली होती. आदिवासींची पिळवणूक थांबली होती. आदिवासी जनतेच्या हाताला काम मिळवून देण्यास मदत केली होती. आदिवासीच्या जीवनात असलेले दारिद्रय कमी करण्यास हातभार लावला होता. जंगल कामगारांना योग्य मजुरी मिळावी म्हणून सहकारी संस्था स्थापन केल्या होत्या.

विविध शासकीय योजनांद्वारे आदिवासींना मदत केली जाते. इ. स. १९९६-९७ मध्ये त्यांचे सर्वेक्षण केले असता त्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची साधननिहाय वर्गवारी व टक्केवारी पुढील प्रमाणे होती.[१५]

| **अ. क्र.** | **साधन** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १. | कृषीशेती | ४३.४१% |
| २. | कृषी मजूर | ३५.८०% |
| ३. | वनमजूर | २.७५% |
| ४. | व्यापार | ०.७५% |
| ५. | नोकरी | १३.५०% |
| ६. | दूध | १.२३% |
| ७. | इतर साधने (बँजो, वाजंत्री, | २.५६% |
| **एकूण टक्केवारी** | | **१००%** |

आदिवासींमध्ये रोजगारासाठी मजूर स्थलांतर करतात. कारण त्यांना त्यांच्या मूळ ठिकाणी उदरनिर्वाहाचे कारण उपलब्ध होत नसल्याने ते द्राक्ष बागाच्या कामासाठी शहराकडे स्थलांतरित होतात. नाशिक शहराच्या ज्याभागात ते उतरतात. त्यांना आजही मजूर अड्डा असे नाव आहे. काही आदिवासी युवक गुजरात राज्यातील

औद्योगिक पट्ट्यामध्ये नोकरी निमित्ताने स्थिर झाले आहेत. तर काही जण उस तोडणी कामगार म्हणून पुणे जिल्ह्यात येतात.

सरकारने त्यांच्यासाठी रोजगार हमी, पाझर तलाव, सामाजिक वनीकरण, संयुक्त वनव्यवस्थापन समितीमार्फत मिळणारी कामे, रोपवाटिकेतील कामे, इत्यादी कामे उपरलब्ध करुन दिली आहेत. आदिवासी विकास विभागाने विशेष कैंद्रिय सहाय्य योजना, लघुउपसा जलसिंचन योजना, विहीर खोलीकरण योजना, घरकुल योजना, शिलाई यंत्रपुरवठा व प्रशिक्षण, विटभट्टी सुरु करण्यासाठी आर्थिक सहाय्य, गांडूळखत प्रशिक्षण, मशरुम तयार करण्याचे प्रशिक्षण, पत्रावळी व द्रोण तयार करणे. महिला सक्षमीकरण बांबू उत्पादन, फर्निचर प्रशिक्षण, भातलावणीसाठी शेतकऱ्यांना चिखल यंत्र पुरविणे आणि संकरित गाई, शेळ्या यांचे वाटप, इत्यादी विविध योजना राबविल्या आहेत.

नाशिक जिल्हयातील आदिवासी भागातील शेतमजूर, अल्प भूधारक, भूमीहीन जनतेची आर्थिक पिळवणूक थांबविण्याकरीता तसेच त्यांचा सर्व क्षेत्रात विकास घडवून आणण्याकरीता महाराष्ट्र राज्य सरकारने इ. स. १९७२ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास मंडळ स्थापन केले होते. परंतु या मंडळाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या अनेक योजना गरजू जनतेपर्यंत पोहचत नव्हत्या. त्याची अंमलबजावणी फक्त कागदावरच राहात होत्या. तेव्हा कळवण तालुक्यातील आदिवासी नेता ए. टी. पवार यांनी याबाबत असलेल्या उणीवाची सरकारात जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी याकरीता आदिवासी उपाय योजनांतर्गत येणाऱ्या योजना गतीने राबविण्याकरीता कायदा करण्याचा आग्रह धरला. त्यांनी व त्यांच्या समवेत असलेल्या कार्यकर्त्यांच्या कार्यातून महाराष्ट्र राज्य सरकारने इ. स. १९७६ मध्ये ''महाराष्ट्र राज्य जनजाती सुधारणा अधिनियम'' मंजूर करण्यात आला. या कायद्याच्या माध्यमातून आदिवासी भागातील जनतेची व्यापारी आणि सावकार यांच्याकडून जी पिळवणूक करण्यात येत होती त्याला पायबंद घालण्यात आला होता. या कायद्याच्याद्वारे आदिवासी भागात सोसायटीची स्थापना करण्यात

आली होती. त्या सोसायटीमधून आदिवासी शेतकऱ्यांच्या शेती आणि जंगली मालाला योग्य भाव मिळू लागला होता.

कळवण तालुक्यातील शेतकऱ्यांना भाताच्या शेतीच्या सपाटीकरणासाठी उपसिंचनासाठी विविध योजना लागू करून घेतल्या. त्यामध्ये वीजपंप व तेलपंप हे आदिवासी भागातील शेतकऱ्यांना सरकारकडून मोफत देण्याची योजना मंजूर करून घेतली. याचा या भागातील शेतकऱ्यांना फार मोठा फायदा झाला. त्यांच्या शेतीच्या सिंचन क्षेत्रात वाढ झाली, त्यातून त्यांच्या शेतीच्या उत्पादनात वाढ झाली, त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास हातभार लागला होता.

## विवाह संस्था

वंचित घटकांत येणाऱ्या बहुजन समाजातील कोणत्याही व्यक्तीवर विवाह संस्कार होणे फार मोठे पुण्य घडणे ही याची श्रद्धा आहे. हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे १६ संस्कारातील महत्त्वाचा संस्कार हा विवाह होय. पाप-पुण्य या गोष्टीशी विवाहाचा संबंध जोडला जातो. विवाह कोणाशी केव्हा आणि कसा करावा याबाबत वंचित घटकांमध्ये काही अलिखित नियम आहेत. ते नियम अगदी कडकपणे पाळले जातात. त्यामुळे विवाहाची पुढीलप्रमाणे व्याख्या करण्यात आली आहे. ''स्थायी होईल या भावनेने सुरू झालेला व समाजाची मान्यता असलेला स्त्री-पुरुष समागमन म्हणजे विवाह होय.'' पूर्वी बालविवाहाची प्रथा रुढ होती. परंतु आज मात्र मुला-मुलीचे वय अनुक्रमे १८ वय पूर्ण झाल्याशिवाय विवाह केले जात नाहीत. समाजात वरच्या जातीत विवाह एकदाच केला जातो.

नाशिक जिल्ह्यातील बहुजन (वंचित) समाजात विवाहाच्या वेळी हुंडा घेण्याची-देण्याची प्रथा रुढ आहे. तो म्हणजे वधू पिता वराला पैसा, वस्तू वगैरे देतो. नाशिक जिल्ह्यातील चांदवड, निफाड, येवला, नांदगांव या तालुक्यामध्ये वर (नवरदेव) हा मुलीच्या घरी विवाहाच्या आदल्या दिवशी जातो. तर इतर तालुक्यांमध्ये वर (नवरदेव) हा वधूच्या घरी विवाहाच्या दिवशी जातो. विवाहाच्या वेळी आदल्या दिवशी मांडव, देव आणणे इत्यादी विधी (कार्यक्रम) केले जातात. सायंकाळी नवरदेव-

नवरीला हळद लावण्याचा विधी केला जातो. त्यावेळी स्त्रिया गाणी म्हणतात -

मांडवाच्या दारी । हळदीची वाळवण ।
नवऱ्याचं केळवण ।। १ ।।
मांडवाच्या दारी । हळदीबाईचा केला घोडा ।
नवरा वधूनी दिला हुंडा ।। २ ।।
मांडवाच्या दारी । घोडा नाचतो थयथया ।
नवरा उठना पाणी न्हा या ।। ३ ।।
पहिली मंडोळी कशाची । पहिली मंडोळी चाफ्याची
नवरदेवाच्या बापाची ।। ४ ।।
एवढी हौस पुरवा । नवरदेव गल्लीला मिरवा ।
नवरदेव भाऊ तुना डोळा कारे लाल ।
करवली बाई आवर मांडोळीनी झोल ।। ५ ।।[१६]

तसेच विवाहांच्या प्रसंगी बहुजन समाजात बॅण्ड, संबळ, डीजे इत्यादी वाद्य वाजवली जातात. त्यावर पुरुष-स्त्रिया तालावर नाचतात.

विवाहाच्या रुढी परंपरांमध्ये जातीनुसार थोडाफार फरक आढळून येतो. मामे बहिणीशी विवाह केला जातो. तर आते बहिणीशी विवाह केला जात नाही. सर्वसाधारणपणे आपले कुळ सोडून इतर कुळातील व्यक्तशी विवाह केला जातो. वंचितांच्या अनेक जातींमध्ये विवाहसंस्काराचा कार्यक्रम पूर्वी ४ दिवस चालत असे. परंतु आधुनिक काळात हा कार्यक्रम दोन दिवसात आटोपला जातो.

## पोशाख व आहार

नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील बहुजन (वंचित) घटकातील जनता मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून होती. येथील शेतकरी, कामगार व इतरांचा पोशाखा साधा व मर्यादित स्वरुपाचा होता. सूती कापडाचा वापर करीत व त्याच्यात कपड्याचा वापर व नेसणे याच्यात वेगळेपणा होता व आजही आहे. त्यामध्ये जाडे-भरडे धोतर, अंगात सदरा, डोक्यावर पागोटे किंवा टोपी आणि एक साधे उपरणे असा

पुरुषाचा पोशाख होता. मात्र अलीकडच्या काळात यात बदल झालेला आढळतो. आजचा पुरुष हा लांब पॅन्ट व सदरा आणि टोपी याचा वापर करून लागले आहेत.

शेतात काम करणारी स्त्री नऊवारी लुगडे नेसत अंगात चोळी, झंपर (ब्लाऊज) वापरत होती तर अलीकडच्या काळातील या स्त्रिया सहावारी साडी व झंपर (ब्लाऊज) अंगात घालतात. तर काही स्त्रिया ह्या सौंदर्यप्रसाधनाचा वापर करीत असतात. ग्रामीण बहुजन समाजातील व्यक्तीच्या आहारात बाजरी, ज्वारी याची भाकरी, गव्हाची चपाती असते. तर सणाच्या दिवशी पुरणपोळी करतात.

समाजात राहणारे वंचित (बहुजन) समाजातील प्रजा आपल्या आर्थिक परिस्थिती व आवडीनुसार वेगवेगळ्या प्रकारचे व विविध धातूचे दागिने वापरतात. त्यामध्ये सोने, चांदी व मिश्र धातू यांचा वापर केला जातो. त्यामुळे ''ठेविले अनंते तैसेची राहावे''[१७] अशी प्रथा त्या काळात व आजही रुढ झालेली आहे.

## सांस्कृतिक जीवन

नाशिक जिल्ह्यातील वंचित (बहुजन) घटक हा हिंदू धर्मीय आहे. त्यांच्या अनेक पंथ, उपपंथ तयार झालेले आहेत. ते बहुदेवतावादाचे उपासक आहेत. दैववाद, अगतिकता आणि उदासीनता यामुळे पूर्वीपासून चालत आलेल्या चालीरिती, सण-उत्सव यांना मानणारा होता व आहे. तसेच ग्रामदैवते मनाला भयमुक्त करतात. त्याच्या आशाआकांक्षांचे समाधान करतात. त्यामुळे त्यांना महत्त्व देऊन त्यांची उपासना करतात. आपल्याला पुण्यप्राप्ती, सुखप्राप्ती व्हावी, आजारपणातून सुटका व्हावी यासाठी नवस बोलले जातात. त्या देवतेला केलेला नवस फेडण्यासाठी बोकड किंवा कोंबडे बळी देऊन प्रसाद म्हणून सर्वजण भक्षण करतात.

तसेच दानधर्म व देवदर्शन करण्यावर भर होता व आहे. आषाढी-कार्तिकी एकादशीला पंढरपूरला पायी वारी करतात. तर काही जण जेजुरी येथे जातात. तेथे केलेला नवस फेडण्यासाठी जागरण, गोंधळ कार्यक्रम करतात. त्यावेळी गाणे म्हणतात.

पाव पावरे खंडेराया ।

तुझा गोंधळ घालीन मी ।।

पाव पावरे देवा तुला ।

भंडारा वाहीन मी ।।

तसेच खंडोबाची अवतार कल्पना मानून त्यांनी ज्या-ज्या ठिकाणी अवतार घेतला आहे त्या त्या ठिकाणच्या अवतारांचे महत्त्व वर्णन करतात.

मल्हारी जागरणाला यावे ।

आमंत्रण देतो कडे पठार ।।

मल्हारी जागरणाला यावे ।

मालेगावच्या मल्हारी जागरणाला यावे ।

सातारचे मल्हारी जागरणाला यावे ।।[१८]

तसेच पुनर्जन्म, स्वर्ग-नरक या कल्पनांचा समाजावर मोठा प्रभाव जाणवतो.

## सण-उत्सव

हजारो वर्षाची परंपरा असलेल्या भारत देशाची ओहख त्याच्या प्राचीन संस्कृतीत आहे. या महान संस्कृतीचे प्रकटीकरण, उदात्तीकरण त्यांच्या सण-उत्सवातून होते. म्हणून सण-उत्सव या संस्कृतीचा समाजजीवनाचा गाभा म्हणून ओळखला जातो. संस्कृतीने घालून दिलेल्या रुढी-परंपरा, नीतिमूल्ये यांची जोपासना सण-उत्सवाच्या माध्यमातून होते.

नाशिक जिल्ह्यातील वंचित (बहुजन) समाजात गुढीपाडवा, होळी, पोळा, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांती, वसंत पंचमी, अक्षयतृतीया, नवरात्री, रामनवमी, कृष्णष्टमी, हनुमान जयंती, वटसावित्री पौर्णिमा, महाशिवरात्री, इत्यादी सण उत्सव साजरे केले जात व आजही साजरे केले जातात. गुढीपाडवा हा सण चैत्र महिन्याच्या प्रतिपदेला साजरा केला जातो. हा सण मराठी नववर्षाच्या पहिल्या दिवशी येतो. या सणाला बहुजन (वंचित) घटकातील जनतेच्या प्रत्येकाच्या घराच्या दारावर मंगलमय गुढी उभारली जाते. त्यानंतर वैशाख महिन्यातील पहिला सण म्हणजे ''अक्षयतृतीया'' होय. हा दिवस साडेतीन मुहूर्तापैकी एक मानला जातो. वटसावित्री पौर्णिमा हा सण सुवासिनी स्त्रियांनी सौभाग्यवृद्धीसाठी केलेले व्रत आहे. ते व्रत ज्येष्ठ पौर्णिमेला करतात.

पोळा हा सण मुख्यत्वे शेतकरी वर्ग साजरा करतो. पोळा सण श्रावण महिन्यातील अमावास्येला साजरा करतात. शेतकऱ्याचे संपूर्ण जीवन बैलावर अवलंबून असल्यामुळे या दिवशी बैलाच्या रुपाने श्रमदेवतेची पूजा करण्याचा हा दिवस आहे. या दिवशी बैलांना धुवून (आंघोळ) त्यांच्या शिंगांना रंग दिला जातो. त्यानंतर गावातील ग्रामदेवतेच्या मंदिराभोवती बैलांच्या फेऱ्या मारल्या जातात. त्यानंतर दसरा हा सण आश्विन महिन्यात दशमीला साजरा करतात म्हणजे नवरात्र उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी होय. दसरा हा सर्व कार्यासाठी शुभ दिवस मानला जातो. या दिवशी आपट्याच्या पानांची पूजा करतात. नंतर ती पाने सोने म्हणून देवांना आपल्या जवळच्या व्यक्तिंना वाटली जातात. या दिवशी सीमोल्लंघन, शमी पूजन व शस्त्रपूजेला विशेष महत्त्व देण्यात येते. ''दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा ।।''[१९] अशी म्हण प्रचलित आहे.

दिवाळी हा सण आश्विन व कार्तिक या महिन्यात येतो. या सणाला वसूबारस, धनत्रयोदशी, नर चतुदर्शी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज असे सहा दिवस साजरी केली जाते. प्रत्येक घरोघरी पंचपक्वान्न तयार केले जातात. या सणाला सर्वत्र वातावरण आनंदी असते. बाजार फुलतात, खरेदी-विक्री वाढते, घरे सजवली जातात. बलिप्रतिपदा या दिवशी शेतकऱ्यांचा राजा म्हणून बळी राजाची स्मृती जागवली जाते. ''इडा पिडा टळो आणि बळी राज्य येवो.'' असे म्हणण्याची प्रथा आहे. तसेच धनत्रयोदशीच्या दिवशी व वसूबारसच्या दिवशी काही म्हणी आहेत.

दिन दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी ।
गायचा चारा बैला मोरा ।।
बैल कुणाचा ऽऽ लक्ष्मणाचा ।
लक्ष्मण कुणाचा ऽऽ आई बापाचा ।।

याप्रमाणे भाऊबीज हा दिवस म्हणजे बहीण-भावाचे नाते दृढ करणारा दिवस होय. या दिवशी बहीण भावाला ओवाळते. या वेळी बहीण म्हणते..

भाऊबीज केली बहिणीनं रातोराती,
पांजळल्या चंद्रज्योती

भाऊबीजेला आला माझा दादा खास

चाखी अमृताचा रस

भाऊबीजेचे दिवशी माझ्या ताटात मोतीहार

ओवाळीला मी तालेवार ।।

तसेच बहीण आपल्या भावाला ओवाळण्यासाठी किती आतूरतेने वाट पाहते ते खालील गाण्यातून स्पष्ट होते.

दिवाळी-दसरा मनी कापणीनी घाई ।

तीळ संक्रातीले मूळ धाड बाई ।।

दिवाळीनं मूळ नको परताऊ सासरा ।

भाऊले ओवाळाले सण नाहीना दुसरा ।।

दिवाळी दसरा मना जंगली पसारा ।

दिर कशा म्हणजे वहिनी माहेर विसरा ।।

दिवाळीनी चोळी, तीळ संक्रातीला लाडू ।

भावजाई बाई, म्हनी आशा नको मोडू ।।

मकरसंक्रातीचा सण पौष महिन्यात येतो. हा सण भोगी, संक्रात आणि क्रिकांत अशा तीन दिवसात विभागलेला असतो. या सणाला घरात गोड अन्न तयार केले जाते. घरोघरी तीळ-गुळ वाटप केले जाते. ''आमचे तीळगुळ सांडू नका , आमच्याशी भांडू नका'' असे वाक्य म्हटले जाते.

तिळात मिसळला गुळ,

त्याला केला लाडू ।

मधूर नात्यासाठी,

गोड गोड बोलू ... ।।[२०]

अशाप्रकारे मकरसंक्रातींच्या सणाचे महत्त्व आहे. त्यानंतर होळी हा सण येतो. होळी हा सण फाल्गून शुद्ध पौणिमेला येतो. हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. ''होळी रे होळी पुरणाची पोळी'' असे म्हणत मुले आनंदाने गावातून गल्ली बोळाने गात असतात. गावातील चौकात होळी पेटविली जाते. ती पेटविण्याचा मान

गावच्या पाटलाला असतो. होळीला पुरणपोळीचा नैवद्य दिला जातो. त्यावेळपासून कोणत्याही दुष्ट, असुरी शक्ती गावात, घरात आणि माणसांच्या मनात प्रवेश करू नये यासाठी हा सण साजरा केला जातो, अशी प्रथा रुढ आहे.

## धार्मिक जीवन

धर्म या शब्दाची उत्पत्ती घृ या धातूपासून झाली आहे. हिंदू धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे ज्यामुळे समाजाची धारणा होते तो धर्म असा विशाल अर्थ सांगितला आहे. धर्माचा अंतिम उद्देश मानवी कल्याण असा आहे. निसर्गातील अत्यंत पवित्र संपूर्ण मानवी भवितव्यांशी संबंध जीवन व विश्व अथवा निसर्ग याची नियंत्रक अशा अलौकिक शक्तीवर माणसाची श्रद्धा असते. त्या शक्तीचा स्वत:शी अनुकूल पवित्र व घनिष्ठ संबंध स्थापित करणारी वैयक्तिक अथवा सामाजिक प्रवृत्ती, मनप्रवृत्ती आणि त्याच्यातून निघणारी आचरणाची पद्धती म्हणजेधर्म होय. त्या व्यक्तीची प्रतिकूल मनप्रवृत्ती व आचरण म्हणजे अधर्म होय.[२१] महाराष्ट्रात जे अनेक धर्म संप्रदाय उदयास आले आहेत. ते संप्रदाय नाशिक जिल्ह्यातही आहेत. वारकरी, भागवत, नाथपंथ, दत्तपंथ, महानुभाव पंथ या संप्रदायाचा प्रसार होऊन धार्मिक जीवनात फार मोठे स्थित्यंतर घडून आले.

नाशिक जिल्ह्यातील बहुजन (वंचित)घटकात ज्यांनी वारकरी संप्रदाय स्वीकारलेला आहे ते लोक आषाढी-कार्तिकी एकादशीला पंढरपूर येथे पायी वारीने जातात. ग्रामीण भागात गावागावात भजन-कीर्तन यासारखे प्रबोधनाचे कार्यक्रम केले जातात. तसेच आळंदी, देहू येथेही पायी वारीला जातात. टाळमृदुंगाच्या गजरात भजने म्हणतात. तसेच नाथपंथ आणि दत्तपंथ स्वीकारलेल्या व्यक्ती शाकाहारी जीवन जगतात. त्याप्रमाणे महानुभाव संप्रदाय हा पंथ येथे प्रचलित आहेत.

नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण बहुजन, आदिवासी समाजातील जनता अशा वेगवेगळ्या धार्मिक परंपरा जपताना दिसते. त्यानुसार आपले आचार विचार करून जीवन जगत आली आहे. नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील नांदुरी येथील सप्तशृंगी व चांदवड येथील रेणुका देवी यांच्या नावाने नवरात्रोत्सव व धार्मिक उत्सव

मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. ग्रामीण भागात यात्रा (जत्रा) महत्त्व असते.[२२] वर्षातील ठराविक दिवशी त्या दैवतांना व धार्मिकप्रथांना मानणारे लोक आहेत

सारांश, महाराष्ट्र राज्यातील एकूण आदिवासींपैकी २०% लोकसंख्या ही नाशिक जिल्ह्यात राहाते. नाशिक जिल्ह्यातील सात तालुके (नाशिक, इगतपुरी, पेठ, सुरगाणा, दिंडोरी, बागलाण, कळवण) हे आदिवासी तालुके म्हणून घोषित केले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी लोकांचा बिगर आदिवासी लोकांशी खूप जवळचा संबंध आला आहे. त्याच्यात संस्कार, संस्कृती, आचार-विचार यांची देवाण-घेवाण वाढली आहे. समाजसेवी संस्था, राजकीय पक्ष, समाज सुधारक महाराष्ट्र शासन यांनी आदिवासीच्या प्रगतीसाठी प्रयत्न केलेले आहेत.

## स्वातंत्र्योत्तर स्थित्यंतर/परिवर्तन

इ. स. १९५२ मध्ये झालेल्या मागासवर्ग प्रतिनिधींच्या परिषदेत पंडित नेहरू यांनी आदिवासीच्या नृत्य व गायनासंबंधी वन्य जामतीशी संपर्क साधातांना प्रथम त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे ते शिकले पाहिजे. मगच त्यांनी मदत करण्याची भाषा बोलली पाहिजे. मुख्यत्व नृत्य व संगीत यांच्याद्धारा जीवनात आनंद लुटणारी ती माणसं आहेत. वायदे बाजारात बसून आकडा ओळखणारी, सौदा करणो आहेत. आदिवासींपासून आनंद लुटण्याची ही कला आपण शिकली पाहिजे.आदिवासींच्या जीवनात लोकगीतांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्यापासून रुढी, परंपरा, श्रध्दा, शेती, दैवत, शौर्य, घराण्याचा इतिहास, मनोरंजन, निसर्गपूजा हे प्रसंग असतात.

प्राचीन काळी आर्य व आदिवासी यांच्यात संघर्ष झाला. या संघर्षात आदिवासी दुबळा ठरला. त्यामुळे आदिवासीला जंगलाचा आश्रय घ्यावा लागला. तो जंगल तोडून शेती करू लागला. शेती व्यवस्थेमुळे त्याच्या सामुहिकतेची भावना वाढीस लागली. शेती पध्दत प्राथमिक त्यांच्याजवळ राहिली. लोकसंख्या वाढत गेली त्यामुळे जीवन निकृष्ठ होत गेले. शिकार आणि कंदमुळे यावर उदरनिर्वाहाची शतकानुशतके सवय झाल्यामुळे त्यांच्यात महत्त्वकांक्षेचा उगम झाला नाही.

नाशिक जिल्हयातील आदिवासीची आर्थिक परिस्थिती हालाकीची होती. त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन जंगल व शेती हेच आहे. स्वातंत्र्यप्राप्ती वेळी ब्रिटिश

राजवटीत आदिवासी विकासासाठी अनेक उपाययोजना राबविण्यात आल्या. मात्र या उपाययोजना राबविण्यामागे धर्मप्रसार करणे हा त्यांचा उद्देश होता.

ब्रिटिश काळात लंडनहून येणारा ख्रिस्ती मिशनरी भारतातील डोंगर दऱ्या, खोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी कुष्ठरोग्याची मलमपट्टी करून सेवाशुश्रुषा करत होतो. त्यामुहे आदिवासी बांधव मिशनऱ्यांकडे अपेक्षेने पाहत असतील. त्याच्या मागे जावून 'येशूख्रिस्त की जय' म्हणत असतील तर त्यात काय वावगे? कारण आपण त्यांना झालेल्या कुष्ठरोगाचे निदान त्याचे पूर्ण जन्माचे पाप, दारिद्रीपणा याला देत होतो.[२३]

आदिवासीची आर्थिक समितीबाबत इ. स. १९३२ साली जनगणना आयुक्त हटन यांनी म्हटले होते की, ''आदिवासींना अलग, अलिप्त राहू द्यावे''. तसेच वंश शास्त्रज्ञ आणि ख्रिस्ती मिशनरी डॉ. व्हेरियर एल. व्ही. यांनी म्हटले आहे की, ''आदिवासी समाजाच्या समस्या प्रगत समाजाच्या संपर्कातून उद्‌भवल्या आहेत'' तेव्हा त्यांना शक्य तितके प्रगत समाजापासून पूर्णपणे अलग ठेवावे. राखीव जागी ठेवले जावे, त्यामुळे त्यांची स्वतःची संस्कृती जोपासता येईल. संस्कृतीवरील आक्रमण, त्याची पिळवणूक थांबेल.'' प्रगत समाजाने आदिवासी समाजाचे शोषण केले, त्यामुळे त्याच्या समस्येत भर पडली ते काही अंशी खरे असले तरी ती समस्या सोडविण्यासाठी बाहय जगापासून अलिप्त ठेवणे ही बाब राष्ट्रीय एकात्मकतेच्या दृष्टिकोनातून बरोबर नाही. परंतु ख्रिस्ती मिशनरी व राज्यकर्ते यांना आदिवासीच्या अलिप्तपणामुळे धर्मप्रसार करणे सोपे जाणार होते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिशांचे धोरण वसाहतवादी होते. ते आदिवासीबाबत शक्यतोवर तटस्थ राहात होते. इ. स. १७८२ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने राजमहल टेकडयातील आदिवासी येथील जमीनदार यांच्या संघर्षातून मार्ग काढण्यासाठी कायदा करून आदिवासींना काही सवलती दिल्या होत्या. मात्र इ. स. १८५६ मध्ये संभाळी लोकांनी केलेल्या उठावामुळे या सवलती काढून घेण्यात आल्या होत्या. इ. स. १८७४ मध्ये आदिवासी (अनुसूचित) जिल्हयाबाबत कायदा करण्यात आला. इ. स. १९३५ मध्ये ब्रिटिशांनी आदिवासी लोकांच्या समस्याचे स्वरूप लक्षात येण्यासाठी

उपाययोजना करण्यासाठी चौकशी सिमती नियुक्त केली होती. इ. स. १९२२ मध्ये महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने ''भिल्ल सेवा'' नावाची संस्था निर्माण झाली. इ.स. १९१८ मध्ये ''खानदेश भिल्ल सेवामंडळ'' ही संस्था काकासाहेब बर्वे व शंकरराव ठकार यांनी स्थापन केली होती. नाशिक जिल्हयातील आदिवासीच्या आर्थिक विकासासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून दादासाहेब बिडकर, भाऊसाहेब हिरे, नानासाहेब दिक्षित, गोदावरी परूळेकर, ठक्कर बाप्पा इत्यादी नेत्यांनी प्रयत्न केले होते.

महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्याने सांस्कृतिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविलेला आहे. मराठी साहित्यातील मनाचे श्लोक देणारे समर्थ रामदास स्वामी यांचे वास्तव्य असणारे टाकळी हा नाशिकचा भाग होता. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक म्हणून ओळखले जाणारे दादासाहेब फाळके हे नाशिक जिल्ह्यातील होते. तसेच साहित्यक्षेत्रात नावारुपाला आलेले व नाशिकचे नाव अजरामर करणारे वि. वा. शिरवाडकर (तात्यासाहेब कुसुमाग्रज) यांनीही आपल्या साहित्यातून वंचितांविषयी लिखाण केलेले आहे. इ.स. १९९६ मध्ये भारतीय साहित्यातील ''ज्ञानपीठ'' हा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

तसेच स्वा. वि. दा. सावरकर हे प्रसिद्ध साहित्यिक होते. प्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर, अ. वा. वर्टी, कवी गोविंद सोपानदेव चौधरी, बाबुराव बागूल, उत्तम कांबळे अशी एक ना अनेक नावाने साहित्य क्षेत्रात मानाचे स्थान असून ते नाशिक जिल्ह्यातील होते. तसेच अनेक सिनेमागृहे, कालिदास कलामंदिर, सायखेडकर नाट्यगृह, कर्मवीर दादासाहेब गायकवाड नाट्यगृह हे नाशिकच्या मनोरंजनात वाढ करीत आहेत. नाशिक जिल्ह्यात वास्तव्य करणाऱ्या वंचित घटकांच्या सांस्कृतिक परंपरा वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत. या परिसरातील वंचित घटक आपल्या सांस्कृतिक परंपरा यात्रा, सण, उत्सव व विवाह अशा वेगवेगळ्या प्रसंगी मोठ्या उत्साहाने साजऱ्या करत आणि करतात. तसेच गावात राहणारा प्रत्येक घटक त्यात सहभागी होऊन त्याचा आनंद लुटताना आपल्याला दिसून येतो. खेडेगावातील यात्रा असते. त्यावेळी गावात वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाकडून समप्रमाणात वर्गणी

(पैसा) जमा केला जातो. या जमा झालेल्या पैशातून यात्रा साजरी करण्याकरीता त्या गावच्या परंपरेनुसार विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. त्या कार्यक्रमाकरीता तो पैसा खर्च केला जातो. काही गावांमध्ये यात्रेच्या तीन-पाच दिवस अगोदर रात्री बोहडा (रामायण कथेवर आधारित) या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तर काही गावांमध्ये यात्रेच्या दिवशी रथाची मिरवणूक काढण्यात येते. तर काही गावांमध्ये गावातील स्थानिक ग्रामदैवतांच्या नावाने गावात असलेल्या भगतांच्या सहाय्याने बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम आयोजित केला जातो. तसेच रात्री लोकनाट्य, तमाशा कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा फड रंगतो. तसेच नाशिक जिल्ह्याच्या दक्षिण भागातील काही गावांमध्ये बैल किंवा घोडा यांच्या टांग्याच्या शर्यतीचे आयोजन केले जाते. नाशिक जिल्ह्यातील वडांगळी या गावात मकरसंक्रातीच्या दुसऱ्या दिवशी एका अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. गावातील कोणत्याही कुटुंबातील नात्याने मेव्हुणा (जावई) लागणाऱ्या व्यक्तीला आमंत्रित करून त्याला त्या दिवशी नवे कपडे घालून गाढवावर बसवून संपूर्ण गावातून त्याची मिरवणूक काढली जाते. अशा वेगवेगळ्या प्रथा, परंपरा गावपातळीवर साजऱ्या केल्या जातात.

गावगाड्याच्या व्यवस्थेत पूर्वीच्या काळात गावातील दलित (अस्पृश्य) वर्गाच्या वाट्याला फार थोडी कामे येत असत. तसेच ती कामे फारच खालच्या दर्जाची असत. त्यामुळे त्यांना रिकामा वेळ मिळत होता. त्या वेळात ही लोक गाणे म्हणणे, भजन करणे, तमाशा करीत. जलसा, मेळे, वाद्य तयार करणे इत्यादी कलांची जोपासना करीत असत. त्यातील बऱ्याच पद्धतीचे कार्यक्रम करणारे लोक नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, पंचवटी, ओझर, मोहाडी, सिन्नर, देवगाव पिंप्री, दिंडोरी, निफाड, नांदगांव, पिंपळगांव इत्यादी गावांमध्ये होते. ओझर येथील पंढरीनाथ बुवा, सोपान बुवा, कृष्णाबाई जाधव हे लोक दलित वस्तीत प्रबोधनपर कीर्तन करीत असत. तसेच नारायण शिंदे व प्रल्हाद शिंदे हे प्रसिद्ध तबलावादक म्हणून ओळखले जात होते. त्यांचे सुरूवातीच्या काळातील बरेच दिवस कृष्णाबाई जाधव यांच्या समवेत गेले होते. नाशिक जिल्ह्यातील ओझर या गावात जन्माला आलेले रंगनाथ

जाधव यांची भारतात प्रसिद्ध कव्वाल गायक म्हणून गणना केली गेली. त्यांनी अनेक चित्रपटात पार्श्वगायक म्हणून काम केले होते.

तसेच कसबे सुकेणा या गावातील रहिवाशी भीमराव कर्डक, कारसूल गावातील केरुजी घेंगडे, जऊळके येथील के. आर. बागुल, वडाळी येथील निरभवणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील प्रसिद्ध जलशाकार व शाहीर होते. या लोकांनी आपल्या जलशाच्या कार्यक्रमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक जागृतीचे विचार खेड्यापाड्यातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविले होते. त्याबरोबर तत्कालीन समाज व्यवस्थेतील अनिष्ठ प्रथावर आपल्या विनोदातून व विडंबनातून टीका करून समाजप्रबोधन केले होते.

ग्रामीण भागातील यात्रा (जत्रा) प्रसंगी तमाशा हा एक करमणुकीचा प्रकार त्याकाळी प्रसिद्ध होता. तेव्हा येवला तालुक्यातील अनकवाडे या गावातील नामदेव श्रीधर नावाची व्यक्ती तमाशा या करमणुकीच्या कलेत सोंगाड्या या पात्राचा अभिनय करण्यात संपूर्ण महाराष्ट्रात नावाजली होती. तसेच सुकेणा या गावातील रायरंद हे करमणुकीचा खेळ सादर करीत असत. त्याचे ''बाजीराव नाना तुमडीभर देना'' हे गाणं त्या काळात समाजात फारच लोकप्रिय झालं होतं.

नाशिक जिल्ह्यातील मोहाडी, सिन्नर, देवगाव, वडांगळी, ओझर ही गावे बोहडा या कलेसाठी प्रसिद्ध झाली होती. हा कलाप्रकार रात्रीचा केला जात असे. त्यामध्ये प्राचीन काळातील पौराणिक कथांवर आधारित वेगवेगळ्या प्रकारचे पोशाख परिधान करून कला प्रदर्शित केली जात होती. यानंतरच्या काळात गायन केलेला महत्त्व मिळाले होते.[२४] गायन या कलेची सुरूवात वामनदादा कर्डक यांनी रूढ केली होती. त्यांनी गायलेली गाणी ही आंबेडकरी चळवळीचा प्रचार-प्रसार करणारी होती. त्यांची ''... तर नवरा कशाला हवा ग शेजारीन सखेबाई'' ही गाणी त्या काळात फारच प्रसिद्ध पावली होती. वामनदादा कर्डक यांनी फक्त नाशिक जिल्ह्यातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातल्या सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे. तसेच संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या काळात मनमाड येथील शाहीर चकोर यांनी गायनातून जनतेला जागृत केले होते. नंतरच्या काळात नाशिक जवळील देवळाली गावातील

शाहीर बबनराव घोलप यांचे सप्तशृंगी कलापथक कार्यरत झाले होते. त्यांच्या या लोकनाट्य कला प्रकारातून दारुबंदी, बालविवाह, भ्रष्टाचार, सावकारी, लोकसंख्या, अंधश्रध्दा अशा विविध विषयांवर ग्रामीण भागातून प्रबोधन, जागृती केली जात होती.

इ. स. १९५० मध्ये नाशिक शहरात लोकहितवादी मंडळ स्थापन झाले होते. या मंडळाच्या माध्यमातून नाटकाचे प्रयोग केले जात होते. त्यानंतर १ ऑगस्ट १९५९ रोजी नाशिक येथे नाट्यसंघ स्थापन झाला होता.[२५] या संघाच्या माध्यमातून नाट्यकलेच्या सेवेसाठी तरुण कलावंतांना उत्तेजन दिले जात होते. तसेच धर्मार्थ सेवेसाठी नाटकाचे वेगवेगळे प्रयोग केले जात होते. लोकोपयोगी कार्यासाठी नाटकाचेप्रयोग केले जात होते.

इ. स. १९५१ मध्ये लोकनाट्य कलापथक नावाचे पथक प्रतापसिंग परदेशी व श्री. बी. डी. जाधव यांच्या पुढाकाराने स्थापन झाले होते. या पथकाच्या माध्यमातून समाजातील सर्वसामान्य जनतेची करमणूक, लोकशिक्षण आणि समाजजागृती हा उद्देश होता. कारण त्या काळात आजच्यासारखी प्रसारमाध्यमे अस्तित्वात नव्हती. त्यामुळे अनेक गोष्टींची जाणीव सर्वसामान्य जनतेला होत नव्हती. त्याची जाणीव या जनतेला व्हावी हा या संस्थेचा मुख्य उद्देश होता. सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे नागरिकांचे मनोरंजन करण्यासाठी साहित्यिक कलाकारांचे मनोरंजनाचे कार्यक्रम घडवून आणत असत. थोर पुरुषाचे उत्सवाचे कार्यक्रम आयोजन करून जनतेला प्रेरित करत होते.

इ. स. १९६० नंतरच्या काळात नाट्यप्रकार पुढे आला. त्यामध्ये ओझर गावातील ''अक्षय नाट्यमंच'' ही संस्था दलित (अस्पृश्य) यांच्या समस्याप्रधान नाटके लिहून सादर करीत होती. अखिल भारतीय दलित (अस्पृश्य) रंगभूमीची शाखा ओझर टाऊनशिप व नाशिकरोड अशा दोन ठिकाणी स्थापन झालेली आहेत. त्यांच्या संयुक्त विद्यमाने इ. स. १९९२ मध्ये उन्मेष साहित्य परिषद नाशिक येथे स्थापन झाली आहे. यावरून असे म्हणता येईल की, नाशिक जिल्ह्याच्या सांस्कृतिक चळवळीला अधिक गतिमान करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था प्रयत्नशील आहेत.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी लोकांचे सांस्कृतिक जीवनाचा विचार करता हे लोक विवाह, सण, उत्सव प्रसंगी दारू पिणे, नृत्य करणे हे त्यांचे नित्याचेच असते. भिल्ल या आदिवासी जमातीत हिंडण नृत्य केले जाते. या जमातीत नृत्याला अधिक महत्त्व आहे. थाळी, तुणतुणे, डफ  यांच्या तालावर नृत्य करतात. दीप अमावस्या, वाघदेव, त्रिणादेव अशा सणांच्या प्रसंगी नृत्य करतात. आदिवासी समाजाच्या नृत्य प्रकारात मुखवटे यांना फार महत्त्व असते.

आदिवासींच्या गावगाडयातील दलित समाज आता पूर्वीची कामे करत नाही. त्यांच्यामधे गायन, सत्यशोधकी जलसे, शाहिरी, चित्रपट गीत, यांच्या गायन, वादनामध्ये तसेच अभिनय क्षेत्रामध्ये तो आता अग्रेसर झाला आहे. नारायण शिंदे व प्रल्हाद शिंदे यांना तबला प्रशिक्षण देण्याचे काम नाशिकच्या कृष्णाबाई जाधवांनी केले. रंगनाथ जाधव हे आता प्रसिद्ध कव्वाली गायक आहेत. केरुजी घेंगडे यांनी आपल्या गीतांमधून अनिष्ठ प्रथांवर टिका करुन समाजप्रबोधन केले. वामन दादा कर्डक यांनी समाज प्रबोधनातून आंबेडकरी विचार घरोघरी नेला. आदिवासींचे नाट्य प्रयोग आता नाट्यसंघ स्थापनेत रुपांतरीत झाले. प्रतापसिंग परदेशी यांचे लोकनाट्य कला पथक, लोकशिक्षणात अग्रेसर झाले. अक्षय नाट्यमंच या संस्थेने दलितांच्या समस्यांना रंगभूमी उपलब्ध करुन दिली. नाशिकच्या पेठ, सुरगणा व इतर आदिवासी गावांमधे पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्यायी तत्त्वज्ञानाने प्रवेश केला आणि आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाचे स्वरुप 'Wine To Devine' असे झाले. पावसाचे पाणी पिण्यासाठी कसे वापरावे व टिकवावे याविषयी स्वाध्यायींचे प्रयोग आदिवासींनी घराघरात राबविले.

याप्रकरणात आपण स्वातंत्र्यपूर्व कालखंड ते स्वातंत्र्योत्तर काळ या कालखंडातील आदिवासींच्या एकंदरित संस्कृती व परिवर्तनाविषयक मुद्द्यांचा आढावा घेतला यापुढील प्रकरणात नाशिक जिल्ह्यातील वंचित समाजाचे आर्थिक व शैक्षणिक परिवर्तन कसे झाले. याविषयी मांडणी केली आहे.

## संदर्भ व तळटीपा


१. सुधीर फडके, *महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे प्रश्न*, पुणे, १९६३, पृ. ९३.

२. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), *मराठी विश्वकोश खंड २*, मुंबई १९७९, पृ.४.

३. सदाशिव दीक्षित, *डांगचा सिंह*, पुणे, प्रथमावृत्ती, मे, १९८८.

४. ए. वाय. कोंडेकरत, *भारतीय समाज व समस्या*, कोल्हापूर,पृ. १०

५. गोविंद गारे, *आदिवासी प्रश्न*, पुणे, प्रथमावृत्ती, १९७५.

६. एम. एम. जाधव, *वनवासी राजा,* नाशिक, प्रथमावृत्ती १९८४.

७. महादेव जोशी (संपा.) *भारतीय संस्कृती कोश, खंड १,* पुणे, प्रथमावृत्ती, १९८२. पृ.१२.

८. आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक कार्यालय अहवाल धारिका, नाशिक, १९८०, पृ.२२.

९. आदिवासी विकास प्रकल्प, कळवण कार्यालय अहवाल १९७७, कळवण, पृ.१०५

१०. समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, नाशिक अहवाल धारिका १९८५, पृ.१७.

११. गोविंद गारे, *आदिवासी प्रश्न*, पुणे, प्रथमावृत्ती, १९७५, पृ. २४.

१२. आदिवासी विकास प्रकल्प, कळवण कार्यालय, वार्षिक अहवाल धारिका, कळवण, १९८५ पृ. ३७.

१३. शौनक कुलकर्णी, *महाराष्ट्रातील आदिवासी,* मुंबई, १९८९, पृ. ८१.

१४. बाबूराव पवार, *सोनहिरा*, नाशिक, मार्च, १९९८, पृ. १००.

१५. वार्षिक आदिवासी उपयोजना, बेंच मार्क सर्वेक्षण २०१० ते २०१२, नाशिक जिल्हा शासकीय अहवाल धारिका, २०१२, पृ. ४८२.

१६. वामन कुलकर्णी, *समाजाचे दीपस्तंभ,* अजवा विठ्ठल पाटील,सटाना, पृ. १५५.

१७. मुलाखत - श्री. साळुंके निंबा वामन, दि. १०.१०.२०१७.

१८. मुलाखत - श्री. पानसरे गोविंद सखाराम, दि.१४.४.२०१५

१९. मुलाखत - श्री. सागर केवल देवचंद, खंडोबा भक्त, दि. ३.५.२०१८

२०. गुरुनाथ नागतोंडे, *भारतीय आदिवासी*, पुणे, १९७९, पृ. २५८.

२१. पु. स. देशपांडे, *महाराष्ट्र दर्शन*, *वनवासी आदिवासी*, पुणे, १९३०, पृ.१६

२२. मुलाखत - श्री. साबळे विक्रम सखाराम, डांगसौंदाणे, दि. २४.१२.२०१८.

२३. स. मा. गर्गे, *भारतीय समाजविज्ञान कोश, खंड १*, पुणे, १९८६, पृ. २९.

२४. सरोजिनी बाबर, *आदिवासी सण व उत्सव,* मुंबई, १९९९, पृ. ४.

२५. निरभवणे विजय (संपा.) *प्रवर्तन, सम्यक प्रबोधन सभा,* नाशिक, २००६ पृ. ५४-५७.

# प्रकरण पाचवे

# आर्थिक व शैक्षणिक परिवर्तन

महाराष्ट्रामध्ये शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. पूर्वी शेतीवरच लोकांची उपजीविका होती. साधारणपणे समाजातील ७२ टक्के लोक शेती व्यवसायात गुंतलेले होते. ब्रिटिशांनी भारतात राबविलेल्या अर्थव्यवस्थेमुळे येथे चालणारे सर्व लहान (कुटीर) उद्योगधंदे मोडकळीस आले. त्यामुळे वाढती लोकसंख्या, दुष्काळ, सावकाराची कर्जे अशा कठीण अवस्थेत शेतकरी आपले जीवन जगत होता. त्यावेळी पुणे येथे इ. स. १८८० मध्ये स्थापन झालेल्या सार्वजनिक सभेने शेतकऱ्यांच्या या परिस्थितीकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु तत्कालीन सरकारने याकडे फारसे लक्ष दिले नाही. मात्र पुढील काळात इ. स. १९०१ मध्ये सरकारने नेमलेल्या 'फॅमिन कमिशनने' तत्कालीन शेतकऱ्यांच्या कर्जबाजारी परिस्थितीचे वर्णन करतांना म्हटले, ''शेतकरी हा कर्जात जन्माला येतो, कर्जात वाढतो आणि कर्जातच मरण पावतो, शेतकरी व कर्ज याची सांगड ही जवळ जवळ १०० वर्षापेक्षा जास्त काळाची आहे. ''त्यापुढे कमिशन म्हणते,'' जर देशात सहकारी पतपेढया निघाल्या आणि चांगल्या वाढल्या तरच भरघोस यशाचा संभव आहे.''[१] तेव्हा इ.स. १९०४ मध्ये देशात सहकाराचा पहिला कायदा पास करण्यात आला होता. यानंतर इ. स. १९१२ मध्ये या कायद्यात दुरूस्ती करून सहकारी संस्थाची उभारणी करण्याचे ध्येय निश्चित केले गेले. सावकारांच्या मगरमिठ्ठीत सापडलेल्या शेतकरी वर्गाची सोडवणूक करून शेतकऱ्यांना स्वावलंबी करावे, याकरिता सहकार चळवळ सुरू करण्यात आली होती.

## सहकार चळवळ

इ. स. १९१९ मध्ये झालेल्या मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायद्याने सहकार हा विषय (खाते) केंद्र सरकारऐवजी प्रांतिक सरकारकडे सुपूर्द केला होता. या दरम्यान याच काळात इ. स. १९२१-२२ मध्ये नाशिक जिल्हयाचे कलेक्टर म्हणून

सिकॉक्स नावाची व्यक्ती होती. त्यांना मराठी भाषा चांगली बोलता येत होती. तसेच सर्वसाधारण समाजात मिसळण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे येथील लोकांशी त्यांचा चांगला परिचय झाला होता. त्यांचा एके दिवशी आजच्या बागलाण (सटाणा) तालुक्यात असलेल्या ब्राम्हणगांवी मुक्काम होता. त्यावेळी सटाणा येथील दगा अजबा पाटील यांनी त्यांना सामुदायिक शेतीचा प्रयोग सुचविला. त्यावेळी सिकॉक्स साहेबांनी लखमापूर गावातील ४०० एकर जमीन देऊ करून सिंडीकेट बनवून सामुदायिक शेतीचा प्रयोग साकरण्याची परवानगी दिली. तेव्हा चर्चेत निश्चित झालेल्या योजनेप्रमाणे दगाजी अजबा पाटील यांनी २२ लोकांची संस्था स्थापन करून इ. स. १९२२ पासून लखमापूर सिंडीकेट तयार केली. सिंडीकेटने चांगल्याप्रकारे श्रम करून या जमीनीतून चांगले उत्पन्न मिळविले. परंतु इ. स. १९३० च्या दरम्यान सिंडीकेट व सरकार यांच्यात काही कारणास्तव भांडण सुरू झाले.[२] मात्र त्यात सिंडीकेट विजयी झाले. ही सिंडीकेट सहकारी तत्त्वावर कार्यरत राहील. शेवटी ते हळूहळू मोडकळीस गेले.

शेतकऱ्यांना शेतीची साधने आणि उत्तम प्रकारच्या बी-बियाणांचा पुरवठा सवलतीने करता यावा याकरिता सहकारी तत्त्वावर एक प्रातिनिधीक संस्था आपल्या परिसरात कार्यरत असावी अशी कल्पना त्यांना सूचली. त्याकरिता दगाजी अजबा पाटील यांनी शेती खात्यातील अनेक अधिकाऱ्यांशी विचार विनिमय केला. इ. स. १९२२ सालच्या ऑगस्ट महिन्यात तालुक्यातील सर्व प्रमुख शेतकऱ्यांची सभा घेतली. या सभेस शेतकऱ्यांबरोबर शेती, पाणी पुरवठा, सहकार खात्यातील भागवत, जोशी व साठे हे तत्कालीन अधिकारी उपस्थित होते. या सभेचे अध्यक्ष बागलाण तालुक्याचे तत्कालीन मामलेदार श्री. घैसास होते. सभेत झालेल्या विचार विनिमयानंतर ''बागलाण तालुका शेती सुधारणा मंडळ'' ही संस्था स्थापन करण्याचा ठराव मंजूर करून संस्थेची स्थापना केली होती.[३] या संस्थेअंतर्गत शेतकी प्रदर्शन भरवून बागलाणमधील शेतकऱ्यांना शेतीकरीता वापरण्यात येणाऱ्या अनेक प्रकारच्या नवीन औजारांची माहिती करून देण्यात आली होती.

नाशिक जिल्ह्यातील देवळा येथे इ. स. १९२९ सालच्या ऑगस्ट महिन्यात बागलाण, कळवण, चांदवड या तालुक्यातील शेतकऱ्यांची सहकारी परिषद आयोजित केली होती. या परिषदेत वरील तीनही तालुक्यांच्या कार्याचा आढावा घेऊन सहकारी क्षेत्रातील पुढील विधायक कार्याची योजना आखण्यात आली होती. नाशिक शहरातील नागरीक कै. गोपाळराव सौंदाणकर व वामनराव जोशी यांनी नाशिक शहरातील अनेकांची मदत घेऊन १५ मे १९३६ रोजी सह्याद्री विमा कंपनी स्थापन केली होती.[४] या कंपनीमार्फत शेतकऱ्यांना आपल्या गुराढोरांचे व शेतीतील पिकांचे विमा काढण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी या विमा कंपनीचे संस्थापक म्हणून काकासाहेब वाघ यांनी काम करण्याचे मान्य केले.[५] त्यांचेबरोबर चांदवड तालुक्यातील काजीसांगवी येथील कारभारी पाटील व लासलगाव येथील लक्ष्मणराव भागूजी पाटील यांना संचालक करून जिल्हाभर कंपनीचा प्रसार करून नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना संरक्षण दिले होते.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतात उत्पादित केलेल्या शेतीमालाची विक्री व्यापाऱ्यांना करावी लागत होती. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनाकरीता लागणारा खर्च वजा जाता त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नव्हता. त्यात दलाल, आडते, व्यापारी यांची नफेखोरी जास्त होती. तेव्हा त्यांच्या या वृत्तीला पायबंद घालण्याकरीता शेत मालाची खरेदी-विक्री जर सहकारी संस्था स्थापन करून केली तर शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला योग्य भाव मिळेल. या विचारातून भाऊसाहेब हिरे यांनी इ. स. १९४८ मध्ये नाशिक जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ स्थापन केला. या संघातून शेतकऱ्यांना खते, बी-बियाणे, कीटकनाशके, शेतीची औजारे इत्यादी शेतीकरीता उपयोगी असणाऱ्या वस्तूंचा संघामार्फत पुरवठा करण्यात येऊ लागला. तसेच या संघामार्फत शेतीमालाची खरेदी-विक्री करण्यात येऊ लागली. तसेच शेतकऱ्यांनी आपल्या शेतीकरीता बँकांकडून घेतलेली कर्ज परस्पर वसूल करण्यात येऊ लागली. नांदगाव येथे शिवस्फूर्ती नांवाने स्थापन झालेल्या सहकारी संस्थेने बांधलेल्या इमारतीचे उद्‌घाटनासाठी उपस्थित असलेले भाऊसाहेब हिरे भाषणात म्हणाले, ''मित्रांनो, सहकारी क्षेत्र ही सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे,

तेव्हा दररोज सोन्याचे अंडे घेऊन समाधानी राहायचे की कोंबडीच मारून खायची, हा विचार पक्का करा व सहकारी संस्था राजकारणापासून अलिप्त ठेवा, एकजूट कायम ठेवा''[६] म्हणजे त्यांनी भविष्यातील विचार करून सहकारातील कार्यकर्त्यांनी तो पाळावा. सहकारी चळवळ टिकवून धरण्याचे प्रयत्न करावे हा सल्ला दिला होता. पुढील काळात भाऊसाहेब हिरे यांनी जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या मदतीने शेतकी संघाची स्थापना केली होती.

## कांदा-बटाटा उत्पादक सहकारी संस्था

सन १९५४ च्या अगोदरपासून नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उत्तम प्रतीचे बटाटा बियाणे कमी दरात उपलब्ध करून देण्याचे काम ही संस्था करीत होती. सन १९५४ मध्ये ही संस्था रजिस्टर करण्यात आली. तेव्हापासून या संस्थेचा व्याप वाढला. कांदा बटाटा ही संस्था बियाणेबरोबर उत्तम प्रतीची मिश्रखते पुरवू लागली होती. या संस्थेने नाशिक जिल्ह्यात उत्पादित होणारा कांदा अगदी कमी कालावधीत कोलंबो, सिंगापूर व पेनांग येथे निर्यात केला होता.[७] कांदा बटाटा उत्पादक सहकारी संस्थेमुळे नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा माल परदेशात जाऊ लागला होता. त्यातून येथील शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध झाली होती. त्यातून शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत मिळून चांगला मोबदला मिळू लागला होता.

## सहकारी साखर कारखाने

## गिरणा सहकारी साखर कारखाना

जागतिक दुसऱ्या महायुध्दाच्या काळात शेती मालाच्या किंमती वाढल्या होत्या. त्यामुळे बागायती भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत बऱ्यापैकी सुधारणा झाली होती. तेव्हा अहमदनगर परिसरात बँकेच्या मदतीने शेतकऱ्यांनी सहकारी तत्त्वावर साखर कारखाना काढण्याच्या योजनेवर विचार करण्याकरीता १७ डिसेंबर १९४५ रोजी धनंजय गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली परिषद आयोजित केली होती. या परिषदेत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सहकारी तत्त्वावर कारखाने

काढण्याची परवानगी मिळविण्यासाठी मुंबई सरकारकडे अर्ज करण्यात आले. परंतु नोव्हेंबर १९४८ पर्यंत साखर कारखान्यांना सरकारची परवानगी मिळाली नव्हती.[८]

नाशिक येथे भरणाऱ्या मराठा शिक्षण परिषदेच्या प्रचाराकरीता भाऊसाहेब हिरे, काकासाहेब वाघ व रावसाहेब थोरात हे दौरा करीत असतांना मालेगाव तालुक्यातील रावळगांव येथील खाजगी मालकीचा कारखान्याच्या मॅनेजरने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची चालविलेली पिळवणुकीची माहितीची जाणीव झाली. तेव्हा यावर तोडगा काढण्याकरीता २२ फेब्रुवारी १९४८ रोजी दाभाडी येथे काकासाहेब वाघ यांच्या अध्यक्षतेखाली रावळगाव कारखाना मालकाला भेटण्यासाठी शिष्टमंडळ गेले.[९] परंतु भेट नाकारण्यात आली. त्यामुळे त्यांनी २६ मार्च १९४८ रोजी मालेगाव येथे परिसरातील शेतकऱ्यांची सभा आयोजित केली होती. रावळगाव खाजगी साखर कारखाना उसाचे भाव वाढवून देत नाही, हे पाहून ५ जुलै १९५४ रोजी दाभाडी येथे शेतकऱ्यांची सभा घेतली. या सभेत भाऊसाहेब हिरे म्हणाले,'' नवीन कारखाना हा शेतकऱ्यांच्या मालकीचा असावा की ज्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचा त्यातून विकास होई असे'' अशा पध्दतीने सहकारी तत्त्वावरील साखर कारखान्याचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून दिले. याच सभेत मालेगाव तालुक्याकरीता दामोदर राजाराम निकम व बागलाण तालुक्याकरीता दगा अजबा पाटील यांची चीफ प्रमोटर्स म्हणून नेमणूक करण्यात आली होती. इ.स. १९५५ च्या जुलै महिन्याअखेरपर्यंत ५ लाखाचे वर भाग भांडवलाची रक्कम जमा करून ६ ऑगष्ट १९५५ गिरणा सहकारी साखर कारखाना रजिष्टर करण्यात आला होता.[१०] या कारखान्यामुळे मालेगाव बागलाण परिसरातील खाजगी साखर कारखाना मालकाची एकाधिकारशाही संपली होती. तसेच या परिसरातील एक विकसित औद्योगिक झाले होते. त्यामुळे परिसरातील अनेक रिकाम्या हातांना रोजगार उपलब्ध झाला होता.

## निफाड सहकारी साखर कारखाना

गिरणा कारखान्याचे यश बघून जिल्ह्यातील ऊस उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या निफाड तालुक्यातही सहकारी तत्त्वावर कारखाना सुरू करावा. याकरीता काकासाहेब वाघ व भाऊसाहेब हिरे यांनी ७ एप्रिल १९५९ रोजी

निफाड येथे तालुक्यातील शेतकऱ्यांची सभा घेऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले.[११] त्याप्रमाणे काकासाहेब वाघ, दुलाजी सिताराम पाटील, माधवराव बोरस्ते, मालोजीराव मोगल यांनी सहा महिने प्रचार केला. दुसरी सभा सुकेणे येथे घेण्यात आली होती. त्यानंतर २८ ऑक्टोबर १९५९ रोजी निफाड येथे सभा घेऊन १ नोव्हेंबर १९५९ पासून भाग भांडवल जमा करण्यास सुरूवात केली. तसेच भाऊसाहेब हिरे यांना चीफ प्रमोटर करण्यात आले. थोडयाच कालावधीत ११ लाख ५० हजार रुपये भाग भांडवल जमा झाले. त्यानंतर २६ जानेवारी १९६० रोजी अथक परिश्रमाने कारखान्याचे रजिस्ट्रेशन मंजूर झाले.[१२] त्यानंतर निफाड तालुक्यातील पिंपरी व पिंपळस या दोन खेडेगावाच्यामधील जमीन मिळवून कारखाना उभारण्यात आला. त्यानंतर १९६४ पासून कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाला होता.

**वसंतदादा पाटील सहकारी साखर कारखाना**

नाशिक जिल्ह्यातील गिरणा नदीच्या परिसरात असलेल्या कळवण बागलाण या तालुक्यामध्ये २० व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या काळात येथील शेतकरी आपल्या शेतात मोठया प्रमाणावर ऊस या पिकाचे उत्पादन घेत होते. परंतु या दोन्ही तालुक्याच्या परिसरात साखर कारखाना नव्हता. त्यामुळे येथील ऊस निफाड व कोपरगांव येथील साखर कारखान्यांना पाठवावा लागत होता. तसेच परिसरातील शेतकरी गुळाची गुऱ्हाळ मोठया प्रमाणावर चालवत होते. येथे तयार करण्यात येणारा गुळ बऱ्याच दूरवरच्या गावापर्यंत विक्रीकरीता पाठविला जात होता. परंतु पुढील काळात हा गुळ खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांनी व दलालांनी नवीन मार्गाचा अवलंब केला होता. व्यापाऱ्यांचा व दलालांचा हा नवीन मार्ग म्हणजे सुरूवातीच्या काळात गुळाला दिला जाणारा भाव बऱ्यापैकी द्यावयाचा आणि नंतर तो भाव कमी करायचा हा होय. तेव्हा व्यापाऱ्यांकडून व दलालांकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक थांबविण्यासाठी उपाय म्हणून या परिसरात सहकारी साखर कारखाना सुरू करण्याचा विचार पुढे आला होता. त्यासाठी सुरूवातीला कळवण येथे शेतकरी वर्गाची सभा घेण्यात आली. तेव्हा सभेत आजच्या देवळा तालुक्यातील उमराणे येथील

ग्यानदेव तुकाराम देवरे यांची मुख्य प्रवर्तक आणि लालजी दौलत पाटील व शंकरराव मराठे यांची उप प्रवर्तक म्हणून निवड करण्यात आली होती.

त्यानंतर कारखाना उभारणीकरीता समभाग (शेअर्स) जमा करण्यास सुरूवात करण्यात आली होती. तसेच कारखाना उभारणी करीता जागेची निवड करण्यात आली. आजच्या देवळा तालुक्यातील लोहणेर येथील देशमुख, वाणी, माळी, परदेशी समाजातील व्यक्तिंनी ७६ एकर गायरान जमीन देण्यास होकार दिला. तसेच या जागेचे सरकार जे मूल्य देईल ते मूल्य स्वीकारण्यास त्यांनी संमती दिली. या सर्व बाबींची बऱ्यापैकी जुळवाजुळव झाल्यानंतर ग्यानदेव तुकाराम देवरे यांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्र राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांना जागेची पाहणी करण्यासाठी आणले होते. त्यानंतर राज्य व केंद्र शासनाची मंजुरी मिळवून लोहणेर येथे ''वसंतदादा पाटील सहकारी साखर कारखाना'' या नांवाचा कारखाना उभारण्यात आला आहे.[१३] या कारखान्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचा ऊस पिक उत्पादनाचा प्रश्न सुटला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास हातभार लागला. परिसरातील, गावामधील प्रशिक्षित, अशिक्षित लोकांना रोजगार मिळाला, त्यांच्या आर्थिक स्थितीत भर पडली.

## कादवा सहकारी साखर कारखाना

दिंडोरी तालुक्यातील कादवा नदीवर धरण बांधण्याची योजना ब्रिटीशकालीन होती. उनंदा नदीवर ओझरखेड गांवाजवळ धरण बांधण्याची पाहणी सुरू केली होती. त्यावेळी केंद्र सरकारमध्ये यशवंतराव चव्हाण हे संरक्षण मंत्री होते. त्यांनी वरील योजना बदलून या परिसरातील सर्व नद्यांवर एकच धरण बांधण्याची अधिकाऱ्यांना सूचना केली होती. परंतु या योजनेमुळे दिंडोरी तालुक्यातील संपूर्ण सुपीक जमीन धरणाच्या पाण्याखाली जाणार होती. त्यामुळे येथील जनतेने नाशिक जिल्ह्याचे तत्कालीन आमदार वसंतराव नाईक यांच्याकडे आपली समस्या मांडली होती. त्यांनी येथील जनतेची समस्या दिल्ली येथील मंत्रालयात मांडली. त्यामुळे तत्कालीन पाटबंधारे मंत्री श्री. राव यांनी प्रत्यक्ष पाहणी करून वाघाड, करंजवण, ओझरखेड व पालखेड अशी चार धरणे बांधण्याचे मान्य केले.

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी व कळवण तालुक्याच्या पश्चिम भागातील गांवे समाविष्ट करून कादवा सहकारी साखार कारखाना उभारण्याची योजना तयार करण्यात आली होती. ही योजना कार्यान्वित करण्यात राजाराम वाघ यांचा सिंहाचा वाटा होता. पुढे ह्या योजनेत बदल करून चांदवड तालुक्याचाही समावेश करण्यात आला. कादवा सहकारी कारखाना उभारणीस मान्यता मिळाली. कारखाना उभारणीसाठी दिंडोरी तालुक्यातील मातेरेवाडी हे स्थळ निवडण्यात आले. कारखाना उभारणीचे स्थळ पाहण्यासाठी महाराष्ट्र राज्य शुगरचे चेअरमन काकासाहेब वाघ यांच्या पुढाकाराने डेप्युटी डायरेक्टर ऑफ शुगर श्री. पद्मनाभच्या हे आले होते.[१४] त्यानुसार मातेरेवाडी हे स्थळ निश्चित करण्यात आले. कादवा सहकारी साखर कारखान्याची उभारणी झाली आहे.

## नाशिक जिल्हा सहकारी बँक

भाऊसाहेब हिरे हे ऑनररी सेक्रेटरी म्हणून कार्यरत असतांना नाशिक शहरात पंचवटी येथे श्री कृर्तकोटी यांच्या प्रेरणेने इ. स. १९४३ मध्ये पंचवटी नागरीक को-ऑप. स्टोअर्स ही सहकारी ग्राहक संस्था सुरू केली होती. त्याच्याही पूर्वी सहकारी चळवळीच्या कार्याने प्रभावित झालेल्या मध्यमवर्गीय कार्यकर्त्यांनी २० जानेवारी १९०० रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची नोंदणी करून कामकाज चालविले होते. परंतु नंतरच्या कालावधीत काही दुर्देवी घटनांमुळे बँकेचे कामकाज त्यांना ठेवीदारांच्या ठेवी परत करून २६ ऑगष्ट १९२८ रोजी बँक बंद करावी लागली होती.[१५] त्यामुळे शेतकी सहकारी पतपेढयांचा कर्ज पुरवठाही बंद झाला होता. त्यामुळे नाशिक जिल्हयातील शेतकरी खाजगी सावकाराकडून कर्ज घेत होते. त्यामुळे जिल्हयातील शेतकरी वर्गात निराशा निर्माण झाली. तेव्हा शेतकऱ्यांची ही परिस्थिती भाऊसाहेब हिरे यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी हं. प्रा. ठा. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. गो. पुराणिक यांची मदत घेऊन इ.स. १९५३ पासून नाशिक येथे मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू केले. तद्नंतर १२ नोव्हेंबर १९५४ पासून बँक स्थापनेच्या कार्यास चालना दिली गेली होती.[१६] त्यानंतर अगदी अल्प कालावधीत म्हणजे केवळ आठच दिवसात नियोजित बँकेचे सर्व शेअर्स विकले गेले.

नाशिक जिल्हा सहकारी बँकेची नोंदणी करण्यासाठी भाऊसाहेब हिरे, एस. जी. पुराणिक, एम. एल. जाधव, भिकुसा क्षत्रिय, अहमद हाजी अब्दुल करीम, काशिनाथ मन्नालाल, आर. जी. गुंजाळ, शिवराम वेडू पाटील यांच्या सहकार्याने अर्ज दाखल करण्यात आला होता. त्याला अनुसरून २६ जानेवारी १९५५ रोजी बँकेची रितसर नोंदणी झाली. त्यानंतर पुणे येथील प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजय गाडगीळ यांचे हस्ते २० फेब्रुवारी १९५५ रोजी बँकेचे उद्घाटन करण्यात आले होते.[१७] सुरूवातीच्या काळात नाशिक इगतपुरी, कळवण, दिंडोरी, सिन्नर या तालुक्यापुरतेच बँकेचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. त्यानंतरच्या काळात संपूर्ण जिल्हाभर सहकारी बँकेच्या शाखांची स्थापना करून त्याचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. त्यांनी बँकेचे कार्य फक्त पतपुरवठा करणे एवढ्यापुरते मर्यादित न ठेवता शेती, व्यापारी व औद्योगिक विकासाच्या ज्या ज्या क्षेत्रात प्रवेश करून काम करणे शक्य होते त्या त्या विभागातील गरजूंना कर्जपुरवठा उपलब्ध करून जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता हातभार लावला होता. ही बँक जिल्ह्यातील शेतकऱ्यांची अर्थवाहिनी झाली. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन होण्यापूर्वी सामान्य शेतकऱ्यांना सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत होते. त्यामुळे शेतकऱ्यांची खूप पिळवणूक होत होती. बँकेमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कर्ज मिळू लागली. त्यामुळे शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबली होती.

तसेच नाशिक जिल्हयातील सर्व व्यापारी पेठा असलेल्या गावामध्ये व्यापारी सहकारी बँका असाव्यात या विचारातून त्यांनी नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत मदत केली. इ. स. १९५९ ते १९६२ या काळात नाशिक जिल्हयातील मनमाड, सिन्नर, पिंपळगांव, नांदगाव, घोटी, देवळा, ओझर, नाशिकरोड, कळवण, मालेगांव, न्यायडोंगरी इत्यादी ठिकाणी व्यापारी बँकेच्या शाखांची स्थापना करण्यात आली होती.[१८] या बँकामार्फत शेतकऱ्यांना विहिर खोदणे, पंपसेट, जमीन सुधारणा इत्यादीकरीता कर्ज उपलब्ध करून देण्यात येत होते. त्यामुळे जिल्ह्यातील बागायती शेतीच्या क्षेत्रात वाढ झाली होती.

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेती मालाला योग्य व वाजवी भाव मिळत नाही त्यामुळे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालावर प्रक्रिया करण्याशिवाय पर्याय नाही या विचारातून कै. भाऊसाहेब हिरे यांनी 'यशवंत को-ऑपरेटिव्ह कॅनिंग' ही फळांवर प्रक्रिया करणारी संस्था पिंपळगाव (बसवंत) या ठिकाणी स्थापन करण्याकरीता मार्गदर्शन केले.[१९]

नांदगांव तालुक्यातील मनमाड परिसरातील खेड्यांमध्ये शेतकऱ्यांची सहकारी संस्था नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांना अडचणीच्या प्रसंगी कर्ज मिळत नव्हते. त्यातून शेतकऱ्यांच्या विकासात अडचणी येत होत्या. त्यावर मात करण्याकरीता कॉ. माधवराव गायकवाड यांनी मनमाड गावाच्या परिसरातील ७/८ खेड्यातील शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांना कर्ज पुरवठा करण्याकरीता विविध कार्यकारी सहकारी संस्था स्थापन केली.[२०] या संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाईप लाईन, विहीरी, फार्म हाऊस इ. करीता कर्ज पुरवठा करण्यात येऊ लागला.

ग्रामीण भागात शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या धान्यापासून खाद्य पदार्थ तयार करण्याच्या उद्देशाने निफाड सहकारी साखर कारखान्याने इ. स. १९७१ साली किसान बेकरीची उभारणी केली.[२१] तसेच या बेकरीत तयार करण्यात येणारा माल म्हणजे पाव, केक्स, बिस्कीट पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यातून परिसरातील शेतकऱ्यांना त्यांचा चांगला फायदा झाला होता.

शेतीच्या प्रगतीकरीता शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात भागभांडवल निर्माण करून देणे आवश्यक होते. त्याकरीता नाशिक जिल्ह्यात भू-विकास बँक आणि नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचेकडून शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यात येत होते; परंतु यात काही मर्यादा पडत होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतीकरीता जास्तीच्या पतपुरवठ्याची गरज वाटत होती. त्यावेळी सिन्नर तालुक्यातील नायगाव, जायगाव, सोनगिरी, जोगलटेंभी, वडझिरे, देशवंडी, ब्राह्मणपाडे या गावांचे कार्यक्षेत्र असलेली सहकारी बँक युनियन बँकेच्या पुरस्काराने २६ ऑक्टोबर १९७८ रोजी 'गोदा युनियन कृषक सेवा सहकारी संस्था मर्यादित नायगांव' या नावाने मा. तुकाराम दिघोळे यांच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आली.[२२] या संस्थेने शेती व

शेतीपूरक व्यवसाय यांच्या उभारणीकरीता कर्जपुरवठा केल्यामुळे या परिसरातील शेतीचा विकास होण्यास हातभार लागला आहे.

## शेती : जलसिंचनाच्या समस्या

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी, पेठ, सुरगाणा, कळवण या तालुक्यांमध्ये जिल्हयातील इतर तालुक्यांपेक्षा पाऊस चांगला पडतो. तेव्हा इगतपूरी तालुक्यात काही मोठी धरणे आहेत. तसेच कळवण तालुक्यात चणकापूर वगळता फार मोठी धरणे नव्हती. त्यामुळे या परिसरात चांगला पाऊस पडूनही उन्हाळयात पाण्याची समस्या जाणवत होती. तसेच शेतीलाही बारमाही पाणी पुरवठा उपलब्ध होत नसल्याने शेती उत्पादनात वाढ होत नव्हती. तेव्हा शेतकऱ्यांच्या या समस्येवर उपाय म्हणून जिल्हयातील काही व्यक्तिंनी पुढाकार घेऊन विविध प्रकल्पांची आखणी, पाठपुरावा करून या संकटावर मात करण्याचा प्रयत्न केला.

नाशिक जिल्हयातील कळवण तालुक्यातील अभोणा गावाजवळ गिरणा नदीवर चणकापूर येथे ब्रिटिशांनी बांधलेले धरण आहे. परंतु या धरणाचा फारसा फायदा होत नव्हता. तेव्हा येथील स्थानिक नेतृत्व करणारे ए. टी. पवार यांनी या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करण्यास सुरूवात केली. तेव्हा कळवण तालुक्यातील सुपले या गांवाजवळ धरण बांधल्यास कळवण, सुरगाणा, मालेगाव, सटाणा, देवळा या तालुक्यातील किती क्षेत्र सिंचनाखाली येईल याची माहिती तज्ञांकडून मिळवून शासनाला त्याचे महत्त्व पटवून दिले. त्यातून महाराष्ट्र शासनाने इ.स. १९८१ मध्ये पुनद प्रकल्पास मान्यता दिली.[२३] शासनाची मान्यता मिळाल्यानंतर त्यांनी धरणासाठी लागणारी जमीन हस्तांतरीत करून विस्थापीत होणाऱ्या विविध गावातील जनतेचे पुनर्वसन करण्याचे काम केले. या धरणातून डावा आणि उजवा कालवा काढून शेतकऱ्यांच्या शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास हातभार लावला आहे.

कळवण तालुक्यातील सप्तशृंग गडावर पावसाळयात पडणाऱ्या पाऊसाचे पाणी वाहून जात होते. तेव्हा गडावर पाणी साठवण्याची कुठल्याही प्रकारची सोय नव्हती. तेव्हा गडावर अनेक ठिकाणाहून येणाऱ्या भक्तांसाठी व स्थानिक नागरीक यांना

पाण्याची गैरसोय निर्माण होत होती. तेव्हा सप्तशृंग गडावरील ही पाण्याची समस्या सोडविण्याकरीता ए. टी. पवार यांनी पुढाकार घेऊन नांदुरी लघु पाटबंधारे तलावाची बांधणी केली. या तलावाच्या पाण्याचा गडावर पुरवठा केला जातो.

कळवण तालुक्यातील सप्तशृंग डोंगराच्या जवळ असणाऱ्या मार्कंडेय डोंगर आहे. त्याच्या पायथ्याशी मार्कंडे पिंप्री नावाचे लहाने खेडेगाव आहे. या परिसरातील मार्कंड, पाळे, पिंप्री गांवातील शेतकरी व नागरीक यांच्या शेतीच्या व पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याकरीता इ. स. १९९३ मध्ये येथे लघु पाटबंधारे तलाव बांधण्यात यावा, याकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यास मंजुरी मिळून तो पूर्ण झाला.[२४] या तलावामुळे परिसरातील नागरीकांची पिण्याच्या व शेतीच्या पाण्याची गैरसोय दूर झाली आहे. या तलावातुन दोन कालवे तयार करण्यात आले आहेत.

कळवणपासून काही अंतरावर असणारे मळगांव हे गांव आहे. या गावापासून वाहणाऱ्या नदीवर पाणी साठवण बंधारा बांधल्यास त्या गावासह आजुबाजूच्या गावातील पाण्याचे दुर्भिक्ष कमी होईल. या विचारातून त्यांनी हा बंधारा बांधण्याकरीता ए. टी. पवार यांनी इ. स. १९८३ मध्ये प्रयत्न केले. त्या प्रयत्नांना यश येऊन बंधारा बांधण्यात आला. या बंधाऱ्यातून ६ कि. मी. लांबीचा कालवा काढण्यात आला आहे. या बंधाऱ्यामुळे दहयाणे, ललगाव, चिंचपाडा या गांवातील ५१६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आलेली आहे.[२५] तसेच बऱ्याच लहान लहान आदिवासी पाडयांना त्याचा फायदा झालेला आहे.

नाशिक जिल्हयातील बागलाण तालुक्यातील साल्हेर मुल्हेर येथील डोंगर रांगांमधून वाहणाऱ्या आरम नदीवर धरण बांधण्यात यावे. याकरीता या परीसरातील गोपाळ मोरे नांवाच्या सामान्य शेतकऱ्याने सन १९५२ पासून प्रयत्न सुरू केले होते. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र शासनाचे अनेक मंत्री, आमदार, खासदार यांच्या कानी ही मागणी मांडली होती. तसेच तत्कालीन पंतप्रधान स्वर्गीय श्रीमती इंदिरा गांधी यांची भेट घेऊन त्यांच्याकडे आणि महाराष्ट्र राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचेकडे ही समस्या मांडून धरणासह २२ गावांना पाणीपुरवठा होऊ शकेल

असा कालवाही मंजूर करून घेतला. मात्र निधी अभावी धरणाच्या कामास गती मिळत नव्हती. परंतु इ. स. १९८० च्या दशकात ३३९४ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येईल एवढया लांबीच्या कालव्यासह धरणाचे काम पूर्ण झाले. या धरणाचे उद्‌घाटना महाराष्ट्र राज्याचे तत्कालिन पाटबंधारे मंत्री डॉ. बळिराम हिरे यांच्या हस्ते झाले होते.

## शैक्षणिक कार्य परिवर्तन

स्वातंत्र्यपूर्व काळापासून येथील समाजाचा शैक्षणिक विकास व्हावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. याकरीता अनेक समाजसुधारक व सेवाभावी संस्था कार्यरत आहेत. नाशिक जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासाचा विचार केला असता इ स. १९१४ मध्ये मराठा विद्याप्रसारक समाज, शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी इ. स. १९४४ मध्ये आदिवासी सेवा समिती, इ. स. १९५४ मध्ये महात्मा गांधी विद्यामंदिर या शिक्षण संस्थांची स्थापना केली. आदिवासी सेवक दादासाहेब बिडकर यांनी 'डांगसेवा मंडळ', दलित मित्र लोकनेते पंडित धर्मा पाटील यांनी विधायक कार्य समिती, सटाणा ही संस्था स्थापन केली आहे. त्यांनी या शैक्षणिक संस्थांच्या कार्यातून शिक्षणाची गंगोत्री खेड्यापाड्यात पोहोचविली. त्यामुळे नाशिक जिल्हा परिवर्तनाचा व विकासाचा केंद्र बनला आहे.

## नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्था

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक ही बहुजन समाजाच्या सर्वांगिण प्रगतीकरीता प्रयत्न करणारी व नावारूपास आलेली महाराष्ट्रातील एक अग्रगण्य शिक्षणसंस्था आहे. इ. स. १९०७ मध्ये 'अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद' ची स्थापना झाली होती. या परिषदेच्या कार्यातून प्रेरणा घेऊन बहुजन समाजातील काही थोर शिक्षणप्रेमी लोकांनी महाराष्ट्रातील वेगवेगळया ठिकाणी शिक्षणसंस्था स्थापन करून शैक्षणिक विकास घडवून आणला आहे.

नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज ही संस्था महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक संस्थांना प्रेरणास्थान ठरलेली आहे. भारतात ब्रिटिश सत्ता स्थिरस्थावर होईपर्यंत हिंदू समाज पूर्वीपासून चालत आलेल्या रुढी, परंपरा आणि चालरीती यांच्या

जोखडात अडकलेला होता. ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी भारत व महाराष्ट्रातील शिक्षण पध्दती मुख्यत्वे हिंदू पाठशाळा आणि मुस्लीम मदरसे एवढयापुरती मर्यादित होती. तेव्हा सर्वांना उपयोगी ठरेल अशी शिक्षण पध्दती अस्तित्वात आलेली नव्हती. बहुजन समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी ज्ञान हेच महत्त्वाचे साधन आहे. या विचारातून बहुजन समाजाची शिक्षणसंस्था असावी हा विचार पुढे आला होता. इ. स. १९०३ मध्ये मुंबई येथील मराठयांनी शिक्षण परिषद भरविण्याकरीता एक समिती नियुक्त केली होती. मात्र तिला फारसा प्रतिसाद मिळाला नव्हता. पुढील काळात धारवाड येथील काही लोकांनी एकत्र येऊन 'मराठा शिक्षण फंड' स्थापन केला होता.[२६] त्यातून मराठा लोकांना विद्या प्रसाराच्या कामात मदत करण्यास प्रवृत्त केले होते.

इ. स. १९०७ मध्ये धारवाड येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अधिवेशन भरले. या बैठकीत उपस्थित विचारवंत व समाजासाठी कार्य करणाऱ्यांच्या प्रयत्नातून इ. स. १९०७ मध्ये 'अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची' स्थापना ठराव क्र. ४ नुसार करण्यात आली होती.[२७] शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या बहुजन समाजाच्या कल्याणासाठी कार्य करणारी संघटना स्थापन झाली. या संघटनेचे ब्रीदवाक्य ''बहुजन हिताय । बहुजन सुखाय'' या गौतम बुध्दाच्या सुप्रसिध्द वचनाचे राहिले.[२८] धारवाड येथील अधिवेशनातील ठराव क्र. ९ च्या अनुषंगाने इ. स. १९०८ मध्ये सातारा व नाशिक येथे मराठा विद्या प्रसारक समाज (मंडळ) स्थापन करण्यात आले. तसेच पुढील वर्षाची अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद नाशिक येथे भरवावी असा सर्वानुमते ठराव संमत करण्यात आला.[२९] नाशिक येथे इ. स. १९०७ च्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्रीमंत उदाजीराव पवार होते. या परिषदेत अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले. नाशिक येथे जिल्ह्यातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गरज भागावी याकरीता नाशिक येथे वसतिगृह स्थापन करावे हा विचार परिषदेच्या कार्यातून कार्यकर्त्यांच्या मनात आला. याकरीता रावसाहेब थोरात, डी. आर. भोसले, गणपत दादा मोरे, किर्ती वामनराव निंबाळकर यांनी वसतिगृहाकरीता जागा शोधली होती. नाशिक येथील अधिवेशनाकरीता जमा

झालेल्या पैशातून अधिवेशनाचा खर्च जाता शिल्लक राहिलेल्या रक्कमेतून वसतिगृह स्थापन केले.

नाशिक शहरातील रविवार पेठेतील कृष्ण गल्लीतील वाईकरांच्या वाडयात जुलै १९१४ मध्ये 'मराठा विद्यार्थी वसतिगृह' सुरू करण्यात आले होते. या वसतिगृहात सुरूवातीला ०५ विद्यार्थी होते.[३०] ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची मोठी सोय झाल्यामुळे अनेक ठिकाणाहून विद्यार्थी येऊन राहू लागले होते. वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने रावसाहेब थोरात यांनी महाराष्ट्रातील थोर संत 'संत तुकाराम' यांच्या नांवाने वाचनालय सुरू केले होते. सुरूवातीच्या काळात संस्थेची 'उदोजी मराठा विद्यार्थी वसतिगृह', नाशिक ही एकमेव शाखा होती. इ. स. १९२५ नंतर संस्थेच्या कार्यकारी मंडळात काकासाहेब वाघ यांचा समावेश करण्यात आला. या नवीन कार्यकारी मंडळाने त्याच वर्षी संस्थेची नियमावली व घटना तयार केली. मराठा शिक्षण प्रसारक समाज, नाशिक या संस्थेची स्थापना इ. स. १८६० चा कायदा कलम २१ नुसार इ. स. १९३२ मध्ये नोंदणी करण्यात आली होती. त्यानंतर इ. स. १९३४ मध्ये संस्थेचे कार्यकारी मंडळ नेमण्यात आले होते.[३१] ते खालीलप्रमाणे होते.

१. रावसाहेब भाऊसाहेब थोरात : चेअरमन
२. पांडुरंग महादेव तथा आण्णासाहेब मुरकुटे : सेक्रेटरी
३. भाऊसाहेब सखाराम हिरे : जॉईन्ट सेक्रेटरी
४. देवराम सयाजी (काकासाहेब) वाघ : सभासद
५. परशराम गणपत तिडके : सभासद
६. धर्मा तानाजी बागुल (पाटील) : सभासद
७. वामनराव गणपत तिडके : सभासद
८. वामनराव गोविंदराव पाटील : सभासद
९. कारभारी बगाजी पाटील : सभासद
१०. धर्मराज जयदेव सावंत : सभासद
११. लक्ष्मण धनाजी पाटील : सभासद

१२. हरी अमृत पाटील : सभासद[३२]

या नवनियुक्त कार्यकारी मंडळाने संस्था विस्ताराच्या कार्यास इ. स. १९३५ पासून सुरूवात केली होती.

संस्थेच्या कार्यकारी मंडळाने उदोजी मराठा विद्यार्थी वसतिगृहाला जोडून इ.स. १९३५ मध्ये 'शेतकी व औद्योगिक शाळा' सुरू करण्याची योजना आखली होती. कार्यकारी मंडळाच्या या हेतूला नाशिक जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी एस. अमिनोद्दिन यांनी चांगली मदत मिळवून दिली होती. ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि कारागीर यांना रोजगार मिळावा या उदात्त हेतूने ही औद्योगिक शाळा सुरू केली होती.

उदोजी मराठा विद्यार्थी वसतिगृह, नाशिक यांची दिवसेंदिवस प्रगती होत होती. इ. स. १९३५-३६ मध्ये या वसतिगृहात २५० विद्यार्थी निवासी रहात होते. या वसतिगृहात निवासी राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नाशिक शहरातील चांगल्या इंग्रजी शाळेत प्रवेश मिळण्यास अडचणी येत होत्या. तेव्हा कार्यकारी मंडळाने विचार करून या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी याकरीता रावसाहेब थोरात यांनी हायस्कूल सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव त्यांनी धर्मा तानाजी बागुल यांच्या माध्यमातून वि. द. घाटे यांचेकडे मांडला होता. त्यांनी हायस्कूलला शासनाची परवानगी मिळवून देण्यास मदत केली होती. मराठा हायस्कूलचे उद्‌घाटन तत्कालीन मुंबई इलाक्याचे शिक्षणमंत्री दिवाण बहादूर कांबळी साहेब यांचे हस्ते ७ जून १९३६ रोजी करण्यात आले होते.[३३]

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक या संस्थेने प्राथमिक शिक्षणचा प्रसार करण्याकरीता नाशिक जिल्हयातील अनेक खेडेगांवामध्ये इ. स. १९३६-३७ पासून स्वयंसेवी (व्हालींटियरली स्कूल) सुरू केल्या होत्या. या स्वयंसेवा शाळामध्ये ज्ञानदानाचे काम करणारे शिक्षक हे अप्रशिक्षित होते. तेव्हा या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याकरीता संस्थेने इ.स. १९३९ मध्ये नाशिक शहरात महर्षी शिंदे अध्यापक विद्यालय सुरू केले होते. या अध्यापक विद्यालयामुळे जिल्ह्यातील आणि राज्यातील अनेक शाळांमध्ये प्रशिक्षित शिक्षक मिळण्यास हातभार लागला होता. नाशिक

जिल्ह्यातील अनेक खेडेगांवांमध्ये मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेमार्फत एकूण ५७ स्वयंसेवी शाळा (व्हालींटियरली स्कूल) चालविण्यात येत होत्या.[३४] या शाळांमधून सर्वसामान्य माणसाची ज्ञानाची भूक भागविली जात होती.

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक या संस्थेने इ. स. १९१४ पासून ''बहुजन हिताय । बहुजन सुखाय'' हे ब्रीद अंगीकरले होते. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही रामबाण उपाय नाही. हे जाणून संस्थेने इ. स. १९२३ मध्ये नांदगांव व इ. स. १९२६ मध्ये सटाणा येथे श्री छत्रपती शिवाजी मराठा बोर्डींग सुरू केले होते. या बोर्डींगच्या स्थापना कार्यात नानाजी पाटील, मन्साराम गोविंद पाटील, बुवा गुरूजी खरे यांचे फार मोलाचे योगदान आहे.[३५] या बोर्डींगमुळे पिंपळनेर, साक्री, कळवण, मालेगांव, दाभाडी, देवळा या परिसरातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची व जेवणाची सोय झाली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात बहुजन समाज शिक्षणाने अत्यंत मागासलेला होता. आपल्या देशातील ग्रामीण भागात शिक्षण पोहोचलेले नव्हते. तेव्हा बहुजन समाजातील सर्वसामान्यांना शिक्षण घेण्यासाठी जागे करावे लागत होते. मुला-मुलींना शाळेत घाला म्हणून जागृती करून सांगावे लागत होते. या मुलांना मोफत व सक्तीने शिक्षण देण्याकरीता तालुक्याच्या व जिल्हयाच्या ठिकाणी वसतिगृहे स्थापन करावी लागत होती. या कार्यात मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेनेही नाशिक जिल्हयात पुढाकार घेतला होता.

## माध्यमिक शिक्षणातील परिवर्तन

शिक्षणातून लोकपरिवर्तन करावयाचे असेल तर नाशिक शहर हेच विद्येचे केंद्र न मानता ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेलाही ज्ञात समृध्दिचा मार्ग दाखविला पाहिजे. या विचारातून संस्थेच्या मंडळाने त्या दिशेने प्रयत्न सुरू केले होते. त्या प्रयत्नाला सटाणा (बागलाण) तालुक्यापासून सुरूवात केली होती. त्याकरीता रावसाहेब थोरात व काकासाहेब वाघ यांनी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांची भेट घेतली. त्यांच्या प्रेरणेने व सटाणा येथील दगाजी अजबा पाटील, धर्माजी तानाजी बागुल पाटील, भिकन गयाजी पाटील यांच्या सहकार्याने सटाणा शहरात १० जून

१९३९ रोजी 'मराठा इंग्लिश स्कूल' या नांवाने पाहिली ग्रामीण भागातील माध्यमिक शाळा सुरू केली होती. पहिल्या वर्षी या माध्यमिक शाळेत २० विद्यार्थी होते. सुरूवातीच्या काळात ही शाळा सटाणा शहरात लागून असलेल्या आरम नदीच्या काठावर देव मामलेदार यशवंतराव महाराज यांच्या मंदिरासमोरील धर्मशाळेत भरत होती. तेव्हा विद्यालयाकरीता स्वतःची जागा विकत घेऊन त्या जागेवर बांधकाम सुरू केले होते. हे बांधकाम इ. स. १९५९ मध्ये पूर्ण झाले. या विद्यालयाचे २० ऑगस्ट १९९७ रोजी लोकनेते पंडीत धर्मा पाटील ''मराठा इंग्लिश स्कूल'', सटाणा असे नामकरण करण्यात आले आहे.[३६] सर्व तालुक्यातील खेडयांमधून विद्यार्थी या शाळेत प्रवेश घेऊ लागले होते. विद्यार्थी संख्या वाढत गेली.

इ. स. १९४७ मध्ये आपला देश स्वतंत्र झाला. गुलामगिरीची अवस्था संपून देशाला आणि जनतेला स्वातंत्र्य मिळाले होते. त्यातून स्वातंत्र्योत्तर काळात संस्थेच्या कार्यालयातील तालुक्यातूनही माध्यमिक विद्यालये सुरू करण्याची मागणी होऊ लागली होती. तेव्हा ज्या गावात माध्यमिक विद्यालयाची आवश्यकता आहे तसेच गावातील गावकऱ्यांची आर्थिक, जागा आणि इमारत याबाबत सहकार्य करण्याची तयारी आहे. अशा गांवामध्ये माध्यमिक विद्यालये सुरू करण्याचे धोरण संस्थेच्या कार्यकारी मंडळाने स्वीकारले होते.

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी हा आदिवासी तालुका आहे. या तालुक्यात त्या काळात रस्ते, आरोग्यसेवा, शिक्षण दळणवळण आणि पाण्याची भीषण परिस्थिती होती. वर्षानुवर्षापासून असलेले आर्थिक दारिद्रय, अंधश्रध्दा आणि परंपरा यांच्यात अडकलेला समाज, अज्ञानाचा अंधार असलेल्या या तालुक्यात शिक्षणाचा प्रसार झालेला नव्हता. या सर्व गोष्टींचा विचार करून संस्थेच्या कार्यकारी मंडळाने नाशिक, वणी, सापुतारा रस्त्यावरील मध्यवर्ती महत्त्वाचे दिंडोरी हे गांव होते. येथे इ. स. १९५३ मध्ये जनता इंग्लिश स्कूल, दिंडोरी माध्यमिक विद्यालय सुरू केले होते. सुरूवातील ४८ विद्यार्थी संख्येवर हे विद्यालय सुरू झाले होते. विद्यार्थी संख्या वाढल्यावर संस्थेने ४.८ आर क्षेत्र विकत घेऊन तेथे इ. स. १९६० पर्यंत वर्ग खोल्यांचे बांधकाम पूर्ण केले आहे.[३७] अशा मागासलेल्या आदिवासी भागात विद्यालय सुरू

केल्यामुळे आदिवासी व बहुजन समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणाची मोठी सोय झाली होती.

बागलाण तालुक्याच्या उत्तरेकडील परिसरात शिक्षणाचा फारसा प्रसार झालेला नव्हता. या परिसरातील मुलांना माध्यमिक शिक्षण घेण्याकरीता सटाणा, नाशिक, मालेगांव येथे जावे लागत होते. या परिस्थितीवर मात करण्याकरीता परिसरातील काही व्यक्तिंनी एकत्र येऊन ''दि एज्युकेशन सोसायटी'' नामपूर ची स्थापना करून १३ जुन १९५५ रोजी नामपूर इंग्लिश स्कूल, नामपूर स्थापन करून इ. ८ व ९ वी चे वर्ग सुरू केले होते. या दोन्ही वर्गाचे मिळून ८९ विद्यार्थी होते.[३८] हे विद्यालय इ. स. १९६१ मध्ये मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेकडे वर्ग करण्यात आले. इ. स. १९६४ मध्ये नरहर गोपाळशेठ यांनी ७ एकर जमीन दिली. या जागेवर संस्थेने १९६९ साली दगडी इमारत बांधली आहे.

नांदगांव तालुक्यात शिक्षणाचा फारसा प्रसार झालेला नव्हता. येथील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याकरीता बाहेरगांवी जावे लागत होते. तेव्हा इ. स. १९५२ मध्ये येथील रामराव नानाजी पाटील यांनी संस्थेच्या कार्यकारी मंडळाकडे नांदगांव येथे माध्यमिक विद्यालय सुरू करण्याची मागणी केली. या मागणीचा विचार करून संस्थेच्या तत्कालिन कार्यकारी मंडळाचे सभासद भाऊसाहेब हिरे, आण्णासाहेब मुरकुटे, वामनराव गोविंद पाटील यांनी इ. स. १९५५ मध्ये नांदगांव येथे ''न्यू इंग्लिश स्कूल'', नांदगांव या माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली होती.[३९] पुढील काळात संस्थेने २० एकर १८ आर जमीन मिळवून त्या जागेवर दगडी इमारत बांधलेली आहे.

बागलाण तालुक्याच्या उत्तरेस सटाणा-सुरत रस्त्यावर असलेले ताराहाबाद गांव आहे. या गांवापासून सुमारे २० कि. मी. परिसरात माध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे बहुजन समाजातील मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते. तेव्हा या परिसरातील मुलांच्या शिक्षणाची गरज लक्षात घेऊन संस्थेच्या कार्यकारी मंडळाने १३ जुन १९५९ रोजी भाऊसाहेब हिरे यांच्या हस्ते उद्घाटन करून ''न्यू इंग्लिश स्कूल'' ताराहाबाद या माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली. सुरूवातीच्या काळात १०५ विद्यार्थी संख्येवर इ. ८ वी व इ. ९ वी हे दोन वर्ग सुरू केले होते.

येथील ग्रामस्थांच्या सहकार्याने इ. स. १९६० मध्ये २ एकर सरकारी जमीन मिळाली.[४०] या जागेवर आज डौलदार इमारत उभी आहे.

दिंडोरी तालुक्यातील खेडगांव येथे परिसरातील विद्यार्थ्यांच्या माध्यमिक शिक्षणाची अडचण लक्षात घेऊन तसेच ग्रामस्थांच्या आग्रहास्तव संस्थेने जून १९५९ मध्ये ''श्री छत्रपती शिवाजी विद्यालय खेडगांव'' सुरू केले. या विद्यालयामुळे आजूबाजूच्या भागातील विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या शिक्षणाची समस्या दूर झाली आहे. या विद्यालयास गावातील गावठाणाची जागा देण्याचा ग्रामस्थांनी ठराव केला होता. त्यानुसार ४ एकर १० आर क्षेत्र इ. स. १९६० मध्ये मिळाले. या जागेवर दोन टप्यात इमारतीचे बांधकाम पूर्ण केले आहे.

बागलाण तालुक्यातील निताणे या गावातील प्राथमिक शाळेचा इ. स. १९५९-६० मध्ये निकाल १००% लागला होता. तेव्हा ग्रामपंचायतीचे सरपंच त्र्यंबक जिभाऊ पवार संस्थेचे ज्येष्ठ सभासद मुरलीधर देवराम देवरे यांना माध्यमिक विद्यालय सुरू करण्याची संस्थेकडे मागणी केली. त्यावेळी १२ जुन १९५९ रोजी ''न्यू इंग्लिश स्कूल'', निताणे हे माध्यमिक विद्यालय सुरू केले. पुढील काळात जागेची व इमारतीची गरज भासू लागली होती. तेव्हा ग्रामस्थांनी ३ एकर १ आर सरकारी जमीन ऑक्टोबर१९६४ मध्ये विद्यालयाला दिली.[४१] त्या जागेवर संस्थेने इमारतीचे बांधकाम तीन टप्याने पूर्ण केले आहे.

कळवण तालुल्यातील गिरणा व पुनद या नद्यांच्या संगमावर वसलेले बेज हे गांव होय. गाव तसे बागायती मात्र गांवात माध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती. माध्यमिक शिक्षणाची ही अडचण लक्षात घेऊन धर्मा पाटील, हरी आनंदा पाटील, मोतीराम सावकार यांनी प्रयत्न केले होते. त्यांच्या या प्रयत्नांना यश येऊन जून १९६० मध्ये ''न्यू इंग्लिश स्कूल'' बेज (जुनी) हे विद्यालय सुरू झाले. पुढील काळात नवी बेज येथेही विद्यालय सुरू झाले होते. परंतु सामंज्यस्यातून तोडगा काढून तो प्रश्न निकाल काढण्यात आला होता. ग्रामस्थांनी ३ एकर ३३ आर जागा विद्यालयाला दिली होती.[४२] त्या संस्थेने इमारत बांधली आहे.

सटाणा-मालेगाव रस्त्यावर असलेले ब्राह्मणगांव येथे प्राथमिक शिक्षणानंतर पुढील शिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे बहुजन समाजातील सर्वसामान्यांची शिक्षणाची दारे आपोआप बंद होत होती. त्यामुळे ग्रामस्थांना माध्यमिक विद्यालयाची गरज वाटू लागली. तेव्हा भाऊसाहेब हिरे, काकासाहेब वाघ, नारायण मन्साराम सोनवणे, दगाजी अजबा पाटील यांच्या सहकार्याने जून १९६० मध्ये ''नूतन इंग्लिश स्कूल'', ब्राह्मणगांव ही माध्यमिक विद्यालय सुरू केले.[४३] गांवातील दानशूर व्यक्ती रामभाऊ सजन आहिरे यांनी त्यांचे बंधू श्रीराम सजन आहिरे यांच्या स्मरणार्थ जानेवारी १९६४ मध्ये ९० आर क्षेत्र विद्यालयासाठी दान दिलेली आहे.

बागलाण तालुक्यातील जायखेडा हे गांव परिसरातील व्यापारी पेठ व शेती जीवनात ओळख होती. परंतु माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्याची खंत गावातील सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तिंना वाटत होती. त्यामुळे १६ जून १९६० रोजी ''जनता इंग्लिश स्कूल'' जायखेडा हे विद्यालय सुरू केले. सुरूवातीला या विद्यालयाचे इ. ५ वी, इ. ८ वी हे दोन वर्ग सुरू केले. या दोन्ही वर्गाची मिळून १०३ विद्यार्थी संख्या होती. जायखेडा येथील विद्यालयामुळे परिसरातील नांदीन, वाडी मिसोळ, एकलहरे, लाडूद, सोमपूर गांवातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली होती.

निफाड तालुक्यातील सायखेडा परिसरातील माध्यमिक शिक्षणाकरीता विद्यार्थ्यांची होत असलेली हेळसांड लक्षात घेऊन भाऊसाहेब हिरे ॲण्ड नामदेवराव माधवराव ठाकरे, काकासाहेब वाघ यांनी १३ जून १९६० रोजी ''जनता इंग्लिश स्कूल'' सायखेडा हे माध्यमिक विद्यालय सुरू केले होते. पुढील काळात या विद्यालयाला नैसर्गिक संकटात सामारे जावे लागले होते. तेव्हा संस्थेने इ. स. १९७५ मध्ये गावातील काही व्यक्तींच्या मालकीची जमीन खरेदी केली होती. त्या जागेवर इमारत बांधण्याकरीता निफाड सहकारी साखर कारखान्याने आर्थिक मदत केली होती.

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर हा दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जातो. या तालुक्यातील वडांगळी परिसरात रस्ते, आरोग्य, दळणवळण तसेच माध्यमिक शिक्षण याविषयी कोणतीही सुविधा नव्हती. कायमच्या दुष्काळी परिस्थितीवर शिक्षणाने मात

करता येईल अशा प्रकारचा विचार करून ग्रामस्थांनी शंकरराव कोंडाजी नवले यांच्या मदतीने इ.स. १९६० मध्ये वडांगळी येथे ''न्यू इंग्लिश स्कूल'', वडांगळी या माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली. त्यानंतर जुलै १९६१ मध्ये वडांगळी ग्रामपंचायतीने विद्यालयाला इमारत बांधणेकरीता जमीन देण्यात आली होती.

नाशिक-पुणे रस्त्यावर असलेले सिन्नर येथे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याकरीता विद्यालय असावे या हेतूने शंकरराव बाळाजी वाजे यांनी पुढाकार घेतला होता. त्यातून संस्थेनेच २८ ऑगस्ट १९६१ रोजी सिन्नर येथे ''जनता विद्यालय'', सिन्नर हे माध्यमिक विद्यालय सुरू केले होते. या विद्यालयात सुरूवातीला १५० विद्यार्थी होते. विद्यालयाला इमारत बांधण्याकरीता ग्रामस्थांनी १ एकर ४५ आर जमीन दिली आहे.[४४] आज त्या जागेवर तीन मजली डौलदार इमारत उभी आहे.

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी हा आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो. हा तालुका शैक्षणिकदृष्टया खूपच मागासलेला होता. येथील आमदार पुंजाजी लक्ष्मण गोवर्धने (पुंजा बाबा) यांनी संस्थाचालकांकडे या परिसरात विद्यालय सुरू करण्याचा आग्रह धरला होता. आदिवासी भागातील शिक्षणाची निकड लक्षात घेऊन ११ जून १९६१ रोजी ''जनता विद्यालय सिन्नर'' हे माध्यमिक विद्यालय सुरू केले होते. सन १९६५ मध्ये ग्रामस्थांनी गमपंचायतीच्या मालकीची ५५ आर जमीन दिली होती.

नाशिकपासून थोडयाच अंतरावर असलेले मौजे सुकेणे हे महानुभाव पंथाचे धार्मिक स्थळ म्हणून ओळखले जाते. या परिसरात शिक्षणाची सोय नव्हती. तेव्हा गावातील ग्रामस्थांच्या आग्रहावरून संस्थेने जून १९६१ मध्ये ''कर्मवीर रावसाहेब थोरात हायस्कूल'', मौजे सुकेणे येथे माध्यमिक विद्यालय सुरू केले. सुरूवातीला मारुती मंदिराच्या शेजारी मालोजीराव मोगल यांची एक इमारत होती. ती विद्यालयाला दिली होती.[४५] पुढे ग्रामस्थांच्या मदतीने संस्थेने विद्यालयाकरीता दोन मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण केले.

चांदवड तालुक्यात असलेले वडनेरभैरव हे गांव संपूर्ण भारतात पानमळयासाठी प्रसिध्द झालेले होते. परंतु इ. स. १९६० पर्यंत या गांवात माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था नव्हती. या परीसरातील बहुजन समाजातील मूल-मुली

शिक्षणापासून वंचित राहात होती. तेव्हा ग्रामस्थांनी संस्थेच्या कार्यकारी मंडळाकडे माध्यमिक विद्यालय सुरू करण्याची मागणी केली. त्यावेळी संस्थेने जून १९६१ मध्ये ''जनता विद्यालय'', वडनेर भैरव हे विद्यालय सुरू केले. सुरूवातीच्या काळात वर्ग नव्हते. मारुती मंदिर, पवार वाडा येथे वर्ग भरत असत. पुढे विद्यार्थीसंख्या वाढत गेल्यावर ग्रामस्थांनी विद्यालयाची इमारत बांधण्याकरीता गावठाणाची जागा देण्याचा ठराव केला. त्यानुसार १ एकर २२ आर जमीन मिळाली.[४६] पुढे संस्था व गावकऱ्यांच्या सहकार्याने व जिल्हा परिषदेने केलेल्या आर्थिक मदतीतून १२ वर्ग खोल्यांची दगडी इमारत बांधली आहे.

मुंबई-आग्रा महामार्गावर वसलेले वडाळीभोई हे गांव आहे. या गांवाची प्रसिध्दी म्हणजे खवा विक्री व जवळच असलेले केदराई हे तीर्थक्षेत्र आहे. या परिसरातील बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गरज लक्षात घेऊन संस्थेने ११ जून १९६१ रोजी येथे ''जनता विद्यालय'', वडाळी भोई विद्यालयाच्या रूपाने इ. ८ वी चा वर्ग सुरू केला होता. पुढे विद्यार्थीसंख्या वाढत गेल्याने विद्यालयाचाही विस्तार झालेला आहे. इ. स. १९९० मध्ये विद्यालयात संस्थेने कनिष्ठ महाविद्यालय सुरू केले आहे.

चांदवड तालुक्यातील काजीसांगवी येथे जुलै १९६१ मध्ये ''जनता विद्यालय'', काजीसांगवी हे माध्यमिक विद्यालय सुरू केले. या विद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाकरीता मालोजीराव मोगल हे बांधकाम सभापती असतांना जिल्हा परिषद सेस फंडातून २५०००/- रुपये निधी मंजूर केला होता. इ. स. १९९० मध्ये उच्च माध्यमिक विद्यालय सुरू केल्याने पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली आहे.[४७] या विद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे.

बागलाण तालुक्यातील ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले गिरणा नदीच्या काठावर वसलेले लोहणेर हे गांव आहे. या गांवात संस्थेने १८ एप्रिल १९६१ रोजी ''जनता विद्यालय'', लोहणेरची स्थापना केली. पुढील काळात विद्यार्थी संख्या वाढत गेल्याने विद्यालयाला जागा व इमारत बांधणेकरीता ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. फेब्रुवारी १९७१ मध्ये ग्रामपंचातीने गावठाणाची ३ एकर १ आर सरकारी जमीन

दिली. इमारतीच्या बांधकामाकरीता पंचक्रोशीतील दानशूर व्यक्तिंनी भरीव स्वरूपाचे सहकार्य केले. आज विद्यालयाची इमारत उभी आहे.

इ. स. १९६० पर्यंत बागलाण तालुक्याच्या पश्चिम भागातील ३२ गावात माध्यमिक शिक्षणाची सुविधा नव्हती. हा परिसर आदिवासी बहुल आहे. त्यामुळे हा परिसर शिक्षणापासून दुरावलेला होता. येथील ग्रामस्थांनी इ. स. १९५८ पासून माध्यमिक विद्यालय सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. तेव्हा संस्थेने १९६१ मध्ये ''जनता विद्यालय'', कंधाणे या माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली आहे. सुरूवातीला इ. ५ वी, इ. ८ वी हे दोन वर्ग सुरू केले होते. पहिल्या वर्षी ३० विद्यार्थी प्रवेशित झाले होते. विद्यालयातील विद्यार्थीसंख्या वाढत गेली. वर्ग खोल्यांची अडचण भासू लागली. तेव्हा ग्रामस्थांच्या सहकार्याने सरकारी जमीन मे १९७३ मध्ये विद्यालयाला देण्यात आली. त्या जागेवर संस्थेने इमारत बांधली आहे.[४८]

सटाणा येथे शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वाढत गेली. तेव्हा मुलींसाठी स्वतंत्र विद्यालय असावे याकरीता नारायण मन्साराम सोनवणे, दगाजी अजबा पाटील, पंडीत धर्मा पाटील इत्यादी व्यक्तिंनी प्रयत्न सुरू केले होते. तेव्हा स्त्री शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन संस्थेने १२ जून १९६१ रोजी सटाणा येथे ''जिजामाता गर्ल्स हायस्कूल'', सटाणा हे स्वतंत्र मुलींचे विद्यालय सुरू केले.[४९] आज विद्यालयाची भव्य इमारत उभी आहे. येथे कला शाखेचे उच्च माध्यमिक शिक्षण देण्यात येते.

नाशिक तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात माध्यमिक शिक्षणाचा प्रसार व्हावा या हेतूने गोपाळराव रामजी थेटे यांनी प्रेरणा दिली. त्यातून इ. स. १९६२ मध्ये ''कर्मवीर भाऊसाहेब हिरे हायस्कूल'', गिरणारे येथे इ. ८ वी चा वर्ग सुरू केला होता. प्रारंभी येथे ४२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी याकरीता इ. स. १९८३ मध्ये येथे वसतिगृह सुरू केले होते. तेथे ३० विद्यार्थी निवासी राहात होते. विद्यालयाची अद्यावत इमारत असावी, विद्यालयातील शिक्षणाचे वर्ग एकाच ठिकाणी असावेत याकरीता इ. स. १९८० मध्ये ३ एकर २ आर जमीन ग्रामस्थांनी दिली. त्या जागेवर आज भव्य इमारत उभी आहे. त्यानंतर इ. स. १९८७-८८ पासून संस्थेने येथे कला व वाणिज्य शाखेचे उच्च

माध्यमिक विद्यालय सुरू केलेले आहे. आदिवासी भागातील एक नामांकित विद्यालय म्हणून ओळखले जाते.

नाशिक शहराला लागून असलेले मखमलाबाद येथे संस्थेने जून १९६२ मध्ये ''श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय'', मखमलाबाद सुरू केले. सुरूवातीच्या काळात विद्यालयाचे वर्ग खाजगी घरामध्ये भरत होते. गांवाच्या मालकीची १ हेक्टर ७९ आर जमीन जुलै १९७० मध्ये इमारत बांधण्याकरीता संस्थेकडे वर्ग करण्यात आली. संस्थेने या जागेवर सन १९७० मध्येच इमारत बांधून पूर्ण केली.

दिंडोरी तालुक्यातील मोहाडी हे गांव, या गावासह पंचक्रोशीतील गावामध्ये माध्यमिक शिक्षणाची इ. स. १९६२ पर्यंत सोय नव्हती. तेव्हा येथे विद्यालय सुरू करण्याकरीता जयराम पाटील, रंगनाथ पाटील, एकनाथ जाधव इत्यादी ग्रामस्थांनी विद्यालयाकरीता वर्ग खोल्या व आर्थिक सहकार्याची ग्वाही दिली होती. त्यावेळी १६ जून १९६२ रोजी इयत्ता आठवीचा वर्ग सुरू करून ''कर्मवीर रावसाहेब थोरात हायस्कूल'', मोहाडी येथे ४७ विद्यार्थी संख्येवर विद्यालय सुरू केले. विद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी निफाड सहकारी साखर कारखान्याने मदत केली होती. इ. स. १९९२ मध्ये येथे कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे.

चांदवड तालुक्यातील धोडप या किल्यामुळे इतिहास प्रसिध्द असलेली धोडंबे गांव आहे. संख्येने ८ जून १९६३ मध्ये येथे ''कर्मवीर काकासाहेब वाघ हायस्कूल'', धोडंबे हे माध्यमिक विद्यालय सुरू केले होते. या विद्यालयात पहिल्याच वर्षी इ. ८ वी च्या वर्गात ४४ आणि इ. ९वी च्या वर्गात २० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. गावातील ग्रामस्थांनी इ. स. १९८८ मध्ये गावठाणाची ३ एकर जागा इमारत बांधण्यासाठी दिली. लोकवर्गणी व इतर माध्यमातून पैसा जमा करून इमारत बांधली आहे. या विद्यालयामुळे डोंगर परिसरातील गावातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झालेली आहे.

इ. स. १९६३ मध्ये संस्थेने दिंडोरी तालुक्यातील मातेरेवाडी या गावात ''नूतन इंग्लिश स्कूल'' मातेरेवाडी हे माध्यमिक विद्यालय सुरू केले आहे. तसेच याच वर्षी सटाणा, नवापूर रस्त्यावर असलेले विरगांव येथील विद्यालय संस्थेकडे जोडण्यात

आले. त्यावेळी या विद्यालयाचे ''कर्मवारी भाऊसाहेब हिरे'' असे नामकरण करण्यात आले. येथील वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन इमारत बांधणे गरजेचे वाटू लागले. तेव्हा जिल्हा परिषदेच्या शाळेच्या ताब्यातील ३ एकर ३२ आर क्षेत्र ऑगस्ट १९७६ मध्ये संस्थेला मिळाले. त्या जागेवर संस्थेने १८ वर्ग खोल्यांची इमारत बांधलेली आहे.

बागलाण तालुक्यातील पिंपळकोठे येथे जून १९६४ मध्ये संस्थेने ''जनता विद्यालय'', पिंपळकोठे हे सुरू केले होते. या विद्यालयाची इमारत बांधणेकरीता त्र्यंबक बळीराम भामरे यांनी ८० आर क्षेत्र बक्षीस दिले. या जागेवर दानशूरांच्या मदतीतून इमारत बांधण्याची योजना गावकऱ्यांनी आखली. ती त्यांनी पूर्णत्वास नेली आहे.

बागलाण तालुक्यातील कारवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागातील टेंबे हे गांव आहे. येथील तळमळीची व्यक्ती सजन राघो पाटील यांची विद्यालय सुरू करण्याचा आग्रह ग्रामस्थांच्या मदतीने केला. तेव्हा संस्थेने त्याची ही तळमळ लक्षात घेऊन जून १९६४ मध्ये ''जनता विद्यालय'', टेंबे हे विद्यालय सुरू केले. या विद्यालयामुळे कारवन परिसरातील सोळा गावातील विद्यार्थ्यांचा माध्यमिक शिक्षणाची असलेली अडचण सुटण्यास मदत झाली आहे. या विद्यालयात इ. ५ वी ते इ. १० वी पर्यंतचे शिक्षण दिले जाते.

इगतपुरी तालुक्यातील अस्वली हे गाव आदिवासी व दुर्गम भागातील आहे. येथील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय नव्हती. तेव्हा मा. पुंजाबाबा गोवर्धने यांच्या प्रयत्नातून संस्थेने २९ एवढया विद्यार्थी संख्येवर ६ जून १९६४ रोजी ''जनता विद्यालय'', अस्वली माध्यमिक विद्यालय सुरू केले आहे. आज या विद्यालयातील विद्यार्थी संख्या जवळपास ६०० ते ६५० इतकी आहे. याच वर्षी संस्थेने सिन्नर तालुक्यातील पांढुर्ली येथील गावकऱ्यांच्या मागणीनुसार जून १९६४ मध्ये ''जनता विद्यालय, पांढुर्ली सुरू केले. या विद्यालयाच्या कायमस्वरूपी इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

सिन्नर तालुक्यातील डुबेरे हे गाव पहिले बाजीराव पेशवे यांचे जन्मगांव म्हणून प्रसिध्द आहे. या गावाच्या परिसरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून संस्थेने १४ जून १९६५ रोजी ''जनता विद्यालय'', डुबेरे येथे सुरू केले. सुरूवातीच्या काळात येथे ४० विद्यार्थी संख्येवर इ. ८ वी चा वर्ग सुरू करण्यात आला. पुढे वर्ग व विद्यार्थी संख्या वाढत गेली. तेव्हा फेब्रुवारी १९८३ मध्ये गावातील दोन ग्रामस्थांनी ८९ आर जमीन बक्षीस दिली आहे. त्या जागेवर संस्थेने १५ वर्ग खोल्या असलेल्या इमारतीचे बांधकाम केले आहे. तसेच सोनांबे येथे जून १९६५ मध्ये ''जनता विद्यालय'', सोनांबे येथे माध्यमिक विद्यालय सुरू केले होते. या विद्यालयाच्या इ. ८ वी च्या वर्गात पहिल्या वर्षी ३५ विद्यार्थी प्रवेशित झाले होते. विद्यालयाच्या इमारतीकरीता मार्च १९८२ मध्ये संस्थेने जमीन विकत घेऊन बांधकाम पूर्ण केले आहे.

नाशिक-पेठ या रस्त्यावर असलेले दिंडोरी तालुक्यात उमराळे गाव आहे. हा परिसर ग्रामीण आदिवासी बहुल आहे. या परिसरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून जून १९६५ मध्ये ''जनता विद्यालय'', उमराळे सुरू केले. या विद्यालयात इ. ८ वी चा वर्ग सुरू केला. या वर्गात ३८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. संस्थेने विद्यालयाकरीता ३ एकर जमीन विकत घेतली. त्या जागेवर देणगीदारांच्या मदतीने इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या विद्यालयामुळे आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली आहे. येथे आज सुमारे ६०० ते ७०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

बागलाण तालुक्यात धाने गांव आहे. या गावाच्या परिसरात माध्यमिक विद्यालय नव्हते. तेव्हा सन १९६५ मध्ये ''जनता विद्यालय'', द्याने हे विद्यालय सुरू केले. प्रारंभीच्या वर्षी येथे ६४ विद्यार्थी उपलब्ध झाले होते. तेव्हा संस्थेने दोन वर्ग इ. ८ वी चे सुरू केले. विद्यालयाला जुलै १९७१ मध्ये तुकाराम नामदेव बागुल, विश्वास व्यंकटेश बागुल यांनी जमीन दान दिली. त्या जागेवर ग्रामस्थांच्या व संस्थेच्या मदतीने टप्याटप्याने इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

इ. स. १९६६ मध्ये संस्थेने नाशिक जिल्हयात वेगवेगळया ठिकाणी ७ माध्यमिक विद्यालये सुरू केली. त्यापैकी सिन्नर तालुक्यातील मनेगाव येथे १३ जून १९६६ रोजी ''नूतन जवाहर विद्यालय'', मनेगाव सुरू केले आहे. या विद्यालयात ८०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[४९] चांदवड तालुक्यातील देवरगाव येथे संस्थेने जून १९६६ मध्ये ''जनता विद्यालय'', देवरगाव माध्यमिक विद्यालय सुरू केले. विद्यालयातील विद्यार्थीसंख्या वाढत गेल्यावर संस्थेने इमारत बांधकामासाठी १ एकर २० आर जमीन विकत घेतली. इ. स. १९७९ मध्ये बांधकाम केले. या विद्यालयात आज सुमारे ३५० विद्यार्थी शिकत आहेत. बागलाण तालुक्यातील सोमपूर येथे जून १९६६ मध्ये ''नेहरु विद्यालय'', सोमपूर सुरू केले. या विद्यालयात सुरूवातीच्या वर्षी इ. ८ वी च्या वर्गात ७० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. पुढे विद्यार्थी संख्या, वर्ग संख्या वाढत गेली. त्यामुळे वर्ग खोल्यांची अडचण भासू लागली. इ. स. १९७५ मध्ये संस्थेला जमीन मिळाली. संस्थेने त्या जागेवर १६ वर्ग खोल्या असलेली दुमजली इमारत बांधली आहे. आज या विद्यालयात ४५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कळवण तालुक्यातील पाळे येथे ग्रामस्थांच्या विचाराला अनुसरून संस्थेने जून १९६६ मध्ये ''जनता विद्यालय'', पाळे हे विद्यालय सुरू केले. विद्यालयाला स्वतःची जागा व इमारत आवश्यक वाटू लागली. तेव्हा ग्रामस्थांनी जमीन दिली. बांधकामासाठी भरीव अर्थसहाय्य देणाऱ्या व्यक्तिंची नांवे दिली आहेत.

देवळा तालुका हा परिसर सतत दुष्काळाच्या छायेत असल्यामुळे पैशाअभावी येथील मुला-मुलींना बाहेरगावी शिक्षणासाठी जाता येत नव्हते. तेव्हा नारायण मन्साराम सोनवणे यांच्या माध्यमातून येथील ग्रंथानी विद्यालय सुरू करण्याची मागणी केली होती. तेव्हा संस्थेने जून १९६६ मध्ये ''जनता विद्यालय'', पिंपळगाव (वा) येथे विद्यालय सुरू केले. पुढे विद्यार्थी संख्या वाढल्याने इमारतीची आवश्यकता वाटू लागली. ६१ आर जमीन १९७९ मध्ये विकत घेतली. तेथे सुंदर दुमजली इमारत बांधली आहे. येथे कनिष्ठ महाविद्यालय सुरू केले आहे.

नाशिक-सापूतारा रस्त्यावर असलेले वणी हे गाव येथे स्थानिक लोकांनी १९५७ मध्ये माध्यमिक विद्यालय सुरू केले होते. ते विद्यालय इ. स. १९६६ मध्ये

मराठा विद्या प्रसारक समाजाकडे जोडण्यात आले. तेव्हा त्याचे ''कर्मवीर रावसाहेब थोरात हायस्कूल'', वणी असे नामरकण तत्कालिन शिक्षणमंत्री यांचे हस्ते करण्यात आले. आज ४७ तुकडया असून सुमारे ३००० च्या आसपास विद्यार्थी संख्या आहे.[५०] निफाड तालुक्यातील खेडले झुंगे येथे संस्थेने परिसरातील शिक्षणाची गरज लक्षात घेऊन जून १९६६ मध्ये माध्यमिक विद्यालय व इ. स. १९९२ मध्ये कनिष्ठ महाविद्यालय सुरू केले आहे. या विद्यालयाने लोकसहभागातून १९७० व १९८९ मध्ये अनुक्रमे पहिला व दुसऱ्या मजल्यावर वर्ग खोल्यांचे बांधकाम पूर्ण केले आहे.

महाराष्ट्र शासनाने एप्रिल १९६७ पासून माध्यमिक विद्यालयाकरीता नवीन अनुदान संहिता लागू केली होती. या संहितेनुसार खाजगी माध्यमिक विद्यालयांना शिक्षक शिक्षकेतर वर्गाचे पगार, भत्ते आणि इमारत भाडे १२% याव १००% अनुदान घोषित केले होते.[५१] तेव्हा संस्थेने १२ जून १९६७ रोजी अंबासन येथे ''नूतन विद्यालय'', अंबासन सुरू केले. या विद्यालयात १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. तेथे आज ६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु या विद्यालयात आजतागायत स्वतःची जागा व इमारत नाही. विद्यालयाचे वर्ग ज्या इमारतीत भरतात ती ग्रामविकास ट्रस्टची इमारत आहे.

शिक्षण हे आयुष्याला आकार देते. या हेतूने प्रेरीत झालेल्या गावातील सुशिक्षितांच्या मागणीनुसार संस्थेने बागलाण तालुक्यातील लखमापूर येथे निंबोळयाचे लालजी धर्मा पाटील यांच्या विचारातून पंडित धर्मा पाटील विद्या, लखमापूर हे २५ एप्रिल १९६४ रोजी सुरू झाले होते. पुढे इ. स. १९६७ मध्ये हे विद्यालय संस्थेला जोडण्यात आले. इ.स. १९८४ मध्ये ग्रमस्थांनी गावठाणाची ३ एकर जमीन संस्थेला दिली.[५२] त्या जागेवर लोकसहकार्याने संस्थेने ३१ वर्ग खोल्या असलेली दुमजली इमारत बांधलेली आहे. आज उच्च माध्यमिक वर्ग सुरू केले आहेत. आज या विद्यालयात १५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

नांदगाव तालुक्यातील नाशिक, औरंगाबाद, जळगाव जिल्हयाच्या सीमेवर असलेले जातेगाव आहे. या गावात अठरा पगड जातीचे लोक एकदिलाने राहातात. येथे संख्येने इ. स. १९६७ मध्ये ''जनता विद्यालय'', जातेगाव ही माध्यमिक

विद्यालयात ३६ विद्यार्थी संख्येवर इ. ८ वी चा वर्ग सुरू केला. संस्थेने इ. स. १९९२ मध्ये येथील वामन मुरलीधर बर्वे यांच्या मालकीची १ हेक्टर ६ आर जमीन इमारत बांधणेकरीता विकत घेतली. त्या जागेवर इमारत बांधली आहे.

चांदवड येथे असलेल्या श्री. नेमिनाथ जैन विद्यालयात बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे अडचणीचे होत होते. तेव्हा ही अडचण लक्षात घेऊन काही समाज हितकारक व्यक्तिंनी संस्थेकडे विद्यालय सुरू करण्याची मागणी केली. त्यास अनुसरून जुलै १९८७ मध्ये ''जनता विद्यालय'', चांदवड सुरू केले. या विद्यालयाची इमारत बांधेकरीता इ. स. १९७५ मध्ये १ एकर ३३ आर जमीन विकत घेतली. तेथे संस्थेने इमारत बांधली आहे. या विद्यालयात इ. स. १९९७-९८ मध्ये कला व विद्यान शाखाचे उच्च माध्यमिक विद्यालय सुरू केले आहे. या विद्यालयामुळे चांदवड परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली आहे. तसेच याच तालुक्यातील उसवाड या गावात जानेवारी १९६७ मध्ये ''जनता विद्यालय'', उसवाड हे विद्यालय सुरू केले आहे. या विद्यालयाच्या १६ वर्ग खोल्यांची परिपूर्ण अशी इमारत उभारली आहे. आज या विद्यालयात जवळपास ६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सर्वसामान्य वर्गातील मुलांच्या शिक्षणाची होणारी अडचण लक्षात घेऊन खामखेडा (देवळा) येथील जाणकार व्यक्तिंनी विद्यालय सुरू करण्याची विनंती केली. त्यानुसार संस्थेने १८ जून १९६७ रोजी ''जनता विद्यालय'', खामखेडाची स्थापना केली. येथील विद्यार्थी संख्या वाढत गेली तेव्हा १९ जून १९७८ रोजी गावातील ४५ आर जमीन विकत घेतली. ग्रामस्थांच्या आर्थिक मदतीने दोन टप्यात इमारतीचे बांधकाम केले आहे. आज मितीस या विद्यालयात ५०० विद्यार्थी शिकत आहेत.

नाशिक-मुंबई महामार्गावर वसलेले आजूबाजूच्या परिसरातील खेडयापाडयात राहाणारे आदिवासी बहुल भागातील इगतपूरी गांव आहे. येथील आदिवासी बांधवाच्या मुलांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून संस्थेने इ. स. १९६७ मध्ये ''जनता विद्यालय'', इगतपुरी हे माध्यमिक विद्यालय सुरू केले. या

विद्यालयाची  इमारत बांधली आहे. येथे बालवाडी ते इ. १२ वी विज्ञान शाखेपर्यंतचे वर्ग आहेत.

येवला तालुक्यातील ऐतिहासिक व धार्मिक वारसा असलेले मुखेड गाव आहे. या गावाच्या परिसरातील विद्यार्थ्यांना वाहतुकीची साधने नसल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहाणाऱ्या बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचा विचार करून संस्थेने जून १९६७ मध्ये ''जनता विद्यालय'', मुखेड या विद्यालयाची स्थापना केली. पहिल्या वर्षी इ. ८ वी च्या वर्गात ३५ विद्यार्थी होते. पुढे वर्ग संख्या व विद्यार्थी संख्या वाढली. तेव्हा वर्ग खोल्यांची अडचण भासू लागली होती. त्यावेळी ग्रामस्थांनी सहविचार सभा होऊन गावातील शेतकरी गंगाधर नागरे यांची ३ एकर जमीन विकत घेतली. त्या जागेवर इमारत बांधण्यात आलेली आहे.

नाशिक शहरातील सातपूर भागातील कामगार वर्गाच्या मुलांच्या शिक्षणाचा विचार करून संस्थेने जून १९६७ मध्ये ''जनता विद्यालय'', सातपूर हे विद्यालय सुरू केले आहे. येथील गावठाणाची ८० आर जमीन फेब्रुवारी १९८७ मध्ये संस्थेला मिळाली. तेथे संस्थेने ५४ वर्ग खोल्या बांधल्या आहेत. इ. स. १९९३ मध्ये येथे कनिष्ठ महाविद्यालय सुरू केले आहे.

शिक्षणापासून वंचित असलेलया रामेश्वर ता. देवळा येथील ग्रामस्थ व परिसरातील गावानी येथे विद्यालय सुरू करण्याची संस्थेकडे मागणी केली. संस्थेने १३ जून १९६८ रोजी ''जनता विद्यालय'', रामेश्वर हे विद्यालय सुरू केले  ऑगस्ट १९८५ मध्ये ४८ आर क्षेत्र गावाकडून इमारत बांधणेकरीता मिळाले. आता या विद्यालयात जवळपास ३०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सिन्नर तालुक्यातील दुर्गम भागात वसलेले नायगाव या भागात शिक्षणाची सोय व्हावी याकरीता ग्रामस्थांनी मागणी केली. त्यावेळी संस्थेने जून १९६८ मध्ये ''जनता विद्यालय'', नायगांव सुरू केले. जून १९७२ मध्ये या विद्यालयात इ. ५ वी ते इ. ७ वीचे वर्ग जोडण्यात आल्याने वर्ग कमी पडू लागले. तेव्हा संस्थेच्या प्रयत्नांनी ८० आर जमीन डिसेंबर १९८९ मध्ये मिळाली. तेथे वर्ग खोल्यांचे बांधकाम केले आहे. या विद्यालयात आज मितीस सुमारे १००० विद्यार्थी विद्यार्थीनींची इ. ५ वी ते इ.

१२ वी पर्यंतचे शिक्षण घेत आहेत. तसेच याच वर्षी संस्थेने निफाड तालुक्यातील म्हाळसाकोरे येथे माध्यमिक विद्यालय सुरू केले आहे. या विद्यालयात गावकऱ्यांची व फिलेक्स डिसोझा यांचेही योगदान लाभले आहे.

निफाड तालुक्यातील करंजगाव येथे संस्थेने जून १९६८ मध्ये ''जनता विद्यालय'', करंजगाव विद्यालय सुरू केले. प्रारंभीला इ. ८ वी च्या वर्गात ३७ विद्यार्थी होते. पुढे विद्यार्थी व वर्गसंख्या वाढली, तेव्हा इमारतीची अडचण भासू लागली होती. तेव्हा जुलै १९६९ मध्ये अल्प किंमतीत २ एकर जागा खरेदी केली. तेथे संस्थेने २४ वर्ग खोल्या असलेल्या अद्यावत इमारतीचे बांधकाम केले आहे. तसेच येवला तालुक्यातील पाटोदा येथे ऑगस्ट १९६८ मध्ये ''जनता विद्यालय'', पाटोदा विद्यालय सुरू केले. या विद्यालयात पहिल्या वर्षी इ. ८ वी च्या वग्रत ४८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. पुढील काळात विद्यार्थी संख्या वाढली. तेव्हा ग्रामपंचायतीने ८० आर क्षेत्र संस्थेला इमारत बांधण्याकरीता दिले. त्या जागेवर संस्थेने २२ वर्ग खोल्यांचे बांधकाम दोन टप्प्यात पूर्ण केले आहे. येथे इ. ५ वी ते उच्च माध्यमिक पर्यंतचे वर्ग असून जवळपास २००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

कळवण तालुक्यातील आदिवासी परिसरातील डोंगराच्या कुशीत असलेले मोकभणगी गाव आहे. या परिसरात माध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती. त्यांची शिक्षण घेण्याची इच्छा असूनही शिक्षण घेता येत नव्हते. तेव्हा ग्रामस्थांनी संस्थेकडे माध्यमिक विद्यालय सुरू करण्याची विनंती केली. तेव्हा संस्थेने जून १९६८ मध्ये महात्मा फुले हायस्कूल, मोकभणगी सुरू केले. या विद्यालयाकरीता ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून ४ वर्गखोल्यांचे बांधकाम केले होते. ते वर्गही अपुरे पडू लागल्याने गावठाणाची ६० आर जमीन संस्थेला दिली. त्या जागेवर संस्थेने वाढीव वर्ग खोल्यांचे बांधकाम पूर्ण केले. या विद्यालयामुळे परिसरातील आदिवासी पाडयातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली आहे.

मुंबई आग्रा महामार्गावर असलेले एच. ए. एल. मिग विमान कारखाना असलेले प्रसिध्द ओझर मिग हे गाव होय. येथील ग्रामस्थांनी विद्यालय सुरू करण्याची विनंती केली. त्यानुसार संस्थेने ९ जून १९६९ रोजी माधवराव बोरस्ते

विद्यालय, ओझरमिग सुरू केले. सुरूवातीला येथे ९४ विद्यार्थी संख्येवर इ. ८ वी चा वर्ग सुरू केला. संस्थेने विद्यालयाची इमारत बांधणेकरीता १ एकर २१ आर जमीन कराराने घेऊन बांधकाम केले. या विद्यालयात जवळपास २१०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

दिनांक ९ जून १९६९ रोजी संस्थेने निफाड तालुक्यातील कुंदेवाडी येथे ''स्वामी विवेकानंद विद्यालय'' सुरू केले. स्वामी विवेकानंद यांच्या नावाने विद्यालय सुरू करण्याचे कारण म्हणजे आदर्श पुरूषांची नांवे दिली म्हणजे त्यांचा आदर्श कार्याचा प्रसार विद्यार्थी वर्गात होईल. गावातील रघुनाथ उमाजी कुशारे यांनी ४१ आर जमीन ११ मे १९७० रोजी विद्यालयास बक्षीस दिली.

महाराष्ट्र राज्य सरकारने २४ ऑगस्ट १९७१ रोजी १० वर्षांचा माध्यमिक शिक्षणाचा आकृतीबंधला (१०+२+३) मान्यता दिली होती. त्याबरोबर महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणाच्या पुनर्रचनेसंबंधीच्या धोरणाबाबत केलेल्या निवेदनात इ. ५ वी ते इ. ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळांना जोडण्याचा कार्यक्रम हाती घेतला जाईल असे जाहिर केले होते. या निर्णयामुळे इ. ५ वी ते इ. ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळांना जोडण्यात आल्याने या विद्यालयामध्ये वर्गसंख्या, विद्यार्थीसंख्या व शिक्षकसंख्या वाढली होती.[५३] त्या अनुषंगाने संस्थेनेही आपल्या शाखांचा विस्तार केला होता. त्यामध्ये निफाड तालुक्यातील कोठुरे येथे जून १९७१ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय, कोठुरे हे विद्यालय सुरू केले. कोठुरे हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे आजोळ असल्यामुळे त्या विद्यालयाला त्यांचे नाव दिले होते.[५४] या महाविद्यालयाला ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून इमारत उपलब्ध करून दिलेली होती.

बागलाण तालुक्यातील विंचूर-प्रकाशा राज्य महामार्गावर असलेले करंगाड आहे. परिसरातील व गावातील मुलींना इ. ७ वी नंतर शिक्षण अर्धवट सोडावे लागत होते. ही समस्या सोडविण्याकरीता ग्रामस्थांनी विद्यालय सुरू करण्याची मागणी केली. तेव्हा १२ जून १९७१ रोजी ''जनता विद्यालय'', करंगाड हे माध्यमिक विद्यालय सुरू केले आहे. तेथील ग्रामस्थांनी सटाणा-साक्री रस्त्यावरील २ एकर जागा विद्यालयाला दिली आहे. त्या जागेवर संस्थेने १० वर्गखोल्यांची पक्की इमारत

बांधली आहे. याच वर्षी या तालुक्यात संस्थेने जून १९७१ मध्ये उत्राणे या गावात ''जनता विद्यालय'', उत्राणे हे विद्यालय सुरू केले आहे. त्यास गावाने ३ एकर १२ आर जमीन जून १९८८ मध्ये दिली आहे.

मालेगाव तालुक्यातील दुर्गम डेगावातील मुला-मुलींचे शैक्षणिक नुकसान होऊ नये हे लक्षात घेऊन जून १९७१ मध्ये ''जनता विद्यालय'', तळवाडे हे विद्यालय सुरू केले  सुरूवातीला इ. ८ वी चा वर्ग २५ विद्यार्थी संख्येवर सुरू केला. या विद्याालयाला वर्गखोल्या बांधण्याकरीता जानेवारी १९८७ मध्ये ग्रामस्थांनी ५ एकर जागा दिली. त्या जागेवर संस्थेने सुसज्ज इमारत बांधली आहे.

चांदवड तालुक्यातील निमोण या गावाच्या परिसरात माध्यमिक शिक्षणाची सुविधा नव्हती. तेव्हा बहुजन समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी या हेतूने जून १९७१ मध्ये ''जनता विद्यालय'', निमोण हे माध्यमिक विद्यालय ग्रामस्थांच्या आग्रहाने सुरू झाले. गावातील नागरीक बाबुराव शंकर लाड यांनी ऑगस्ट १९८३ मध्ये २ एकर २० आर जमीन दानपत्राने विनामूल्य दिली आहे. त्या जागेवर २१ वर्गखोल्यांची परिपूर्ण इमारत उभारली आहे.

दिंडोरी तालुक्यातील करंजवण धरणाच्या पायथ्याशी असलेले गाव आहे. आदिवासी व बहुजन समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी या हेतूने संस्थेने १४ जून १९७१ रोजी येथे ''जनता विद्यालय'', करंजवण सुरू केले आहे. येथे १९९३-९४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. या विद्यालयास माणिकराव देशमुख यांनी जुलै १९७१ मध्ये ८० आर जमीन बक्षीस दिली आहे. त्या जागेवर संस्थेने १३ वर्गखोल्यांची इमारत उभारली आहे. या विद्यालयात ८५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

कवी कुसुमाग्रज यांचे जन्मगाव शिरवाडे वणी येथे ग्रामस्थांनी माध्यमिक विद्यालय सुरू करण्याची मागणी केली. तेव्हा संस्थेने जून १९८६ मध्ये ''कविवर्य कुसुमाग्रज'' विद्यालय, शिरवाडे वणी हे सुरू केले. या विद्यालयात सुरूवातीला ४१ विद्यार्थी होते. ग्रामस्थांनी विद्यालयाला इमारत बांधण्याकरीता १९८८ मध्ये ३ एकर

जागा दिली.[५५] संस्थेने तेथे प्रशस्त इमारत बांधली आहे. संस्थेने यावर्षी चांदवड तालुक्यातील रायपूर भडाणे येथे विद्यालय सुरू केले.

शेतकरी कामगार पक्षाच्या विचारांचे प्रसिध्द असलेले निफाड तालुक्यातील चांदोरी हे गाव आहे. या गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची भूक भागावी या हेतूने संस्थेने जून १९९० मध्ये ''जनता विद्यालय'', चांदोरी विना अनुदान तत्त्वावर सुरू केले. यावर्षी संस्थेने सिन्नर तालुक्यातील शिवडे येथे माध्यमिक विद्यालय सुरू केले आहे. वसिष्ठ ऋषीचे नातू पाराशर ऋषींनी ज्या भूमीत तप केले त्या गावाला पारेगाव असे नाव मिळाले आहे. त्या गावातील ग्रामस्थांच्या आग्रहास्तव संस्थेने सन १९९० मध्ये ''जनता विद्यालय'', पारेगाव हे माध्यमिक विद्यालय सुरू केले. याच वर्षी संस्थेने ''जनता विद्यालय'', मातोरी विद्यालयात इ. ८ वी चा वर्ग सुरू केला.

इ.स. १९९२ साली नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेने ग्रामीण भागातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची अडचण लक्षात घेऊन १५ माध्यमिक विद्यालये सुरू केली आहेत. त्यामध्ये येवला तालुक्यातील देशमाने, कळवण तालुक्यातील चिंचपाडा जामणे, सिन्नर तालुक्यातील मिठसागरे, चांदवड तालुक्यातील शिंदे भायाळे, बागलाणमधील सारदे, दिंडोरी तालुक्यातील कोराटे व तिसगाव पेठ तालुक्यामधील मोहवाडा पेठ, नाशिक शहरात धोंडेगाव, दसक पंचक आणि सिडो येथील पवननगर येथे माध्यविद्यालये सुरू केली आहेत.

निफाड तालुक्यातील नांदुरमध्यमेश्वर अभयारण्याजवळ असलेले दिंडोरी मास हे गाव आहे. या गावाच्या परिसरात माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्यामुळे ग्रामस्थांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडे माध्यमिक विद्यालय सुरू करण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने संस्थेने संस्थेने जून १९९९ मध्ये जनता विद्यालय, दिंडोरी मास येथे माध्यमिक विद्यालय सुरू केले. येथे सुरूवातीला इ. ५ वी चा वर्ग सुरू करण्यात आला आहे.

नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागात माध्यमिक विद्यालये सुरू केली आहेत. या विद्यालयामुळे ग्रामीण, आदिवासी, डोंगराळ भागातील बहुजन, आदिवासी मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय

झाली आहे. या विद्यार्थ्यांना शिक्षणाचे दरवाजे खुले झाले आहेत. या विद्यालयातून शिक्षण घेऊन अनेकांनी आपल्या ज्ञानाच्या जोरावर वेगवेगळया क्षेत्रात आपले व संस्थेचे नावलौकिक केले आहे.

## उच्च शिक्षणातील परिवर्तन

पुणे येथील डेक्कन कॉलेजच्या २५ व्या वर्धापन दिनाच्या भाषणात डॉ. ए. गो. भांडारकर म्हणाले, ''विद्यार्थ्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन अचूक व्हावा यासाठी केलेले मार्गदर्शन म्हणजे शिक्षण होय, भावभावना व संज्ञाशक्ती यांना वळण लावण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण. सुव्यवस्थित व शिस्तबध्द मन, वर्तनातील सभ्यता आणि नम्रता हे शिक्षणाचे परिणाम होत, त्यांनाच आपण संस्कार म्हणतो. परिपूर्ण निरीक्षण करून तौलनिक वृत्तीने योग्य त्या संकल्पनापर्यंत पोहचणे याचे नाव शिक्षण, विवेक बुध्दिच्या सहाय्याने नैतिक निर्णय घेण्याची क्षमता म्हणजे शिक्षण''[५५] यातून बोध घेऊन संस्था प्रतिनिधींनी महाविद्यालयीन शिक्षणाच्या दिशेने वाटचाल सुरू केली होती.

माध्यमिक शालांत परीक्षा पास झाल्यावर बागलाणच्या परिसरातील मुला-मुलींना महाविद्यालयीन शिक्षणासाठी नाशिक, मालेगाव इत्यादी ठिकाणी जावे लागत होते. त्यामुळे गरीब, आदिवासी बहुजन वर्गातील मुलांचे शिक्षण थांबत होते. या मुलांचे शिक्षण खंडीत होता कामा नये यासाठी मराठा विद्या प्रसारक संस्थेने सटाणा येथे महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. पुणे विद्यापीठाच्या अटींची पूर्तता झाल्यानंतर जून १९६७ मध्ये कला व वाणिज्य महाविद्यालय, सटाणा या महाविद्यालयाची स्थापना झाली.[५६] सुरूवातीच्या काळात हे महाविद्यालय मराठा इंग्लिश स्कूल विद्यालयाच्या इमारतीत भरत होते. या महाविद्यालयात दोन्ही शाखांचे १४४ विद्यार्थी आणि १६ विद्यार्थीनींनी प्रवेश घेतला होता. त्यानंतर विज्ञान शाखेची गरज लक्षात घेऊन १९७१ मध्ये संस्थेने विज्ञान शाखा सुरू केली आहे.

या महाविद्यालयाकरीता दादाजी विठ्ठल सोनवणे यांनी २ एकर २६ आर जमीन बक्षीसपत्राने दान दिली आहे. संस्थेने त्या जागेवर १९७८-७९ मध्ये महाविद्यालयाची अद्यावत इमारत बांधली आहे.[५७] या महाविद्यालयाच्या स्थापनेपासून

नारायण मन्साराम सोनवणे यांचे मोठे योगदान होते. संस्थेने हे लक्षात घेऊन या महाविद्यालयाचे कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सटाणा असे नामकरण केले आहे.

निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत हे गाव मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर आहे. द्राक्षे, कांदा, टोमॅटो यांची मोठी बाजारपेठ आहे. परंतु या परिसरात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नसल्यामुळे या परिसरातील मुलांना नाशिक येथे जावे लागत होते. परंतु आर्थिक अडचणीमुळे गोरगरीबांना शिक्षण घेता येत नव्हते. तेव्हा महाविद्यालय सुरू करण्यासाठी काकासाहेब वाघ, ॲड, विठठ्लराव हांडे, ॲड. बाबुराव ठाकरे, दुलाजी नाना पाटील यांनी प्रयत्न केले. विद्यापीठाच्या अटींची पूर्तता करून १५ जून १९६८ रोजी कला व विज्ञान शाखा सुरू करण्यात आल्या. कला शाखेत ६९ मुले १४ मुली आणि विज्ञान शाखेत २७ मुले १ मुलगी अशा एकूण १११ विद्यार्थ्यांच्या प्रवेशाने महाविद्यालय सुरू झाले होते.[५८] महाविद्यालयाची इमरत उभारण्याकरीता जागेची गरज होती. तेव्हा काकासाहेब वाघ यांनी प्रयत्न करून २३ जून १९७० रोजी १० एकर सरकारी जमीन मिळविली. त्या जागेवर ना. यशवंतराव चव्हाण व तत्कालीन मुख्यमंत्री कै. मा. वसंतराव नाईक यांच्या हस्ते इमारत बांधणी कामाचे भूमीपूजन करण्यात आले. तेथे भव्य इमारत बांधण्यात आली आहे. इ. स. १९९२ पासून कला व विज्ञान शाखेच्या ६ विषयात पदव्युत्तर शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. या महाविद्यालयाचे १ मार्च १९७० रोजी ना. यशवंतरावजी चव्हाण यांच्या हस्ते कर्मवीर काकासाहेब वाघ कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पिंपळगांव (बसवंत)[५९] असे नामकरण करण्यात आले. या महाविद्यालयामुळे या परिसरातील शेतकऱ्यांच्या मुलांची शिक्षणाबाबतची असलेली दयनीय अवस्था समाप्त झालेली आहे. त्यामुळे पिचलेल्या ग्रामीण शेतकऱ्यांच्या, दीनदलितांच्या मुलांना महाविद्यालयीन शिक्षण घेता येऊ लागले.

नाशिक शहरात असलेल्या महाविद्यालयामध्ये बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यास अडचणी येत होत्या. तेवहा नाशिक शहरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरू करावे असा विचार काकासाहेब वाघ, ॲड. बाबुराव ठाकरे, ॲड.

विठठ्लराव हांडे, मालोजीराव मोगल आणि संस्थेच्या कार्यकारी मंडळाने केला. तेव्हा संस्थेने १९६९ मध्ये पुणे विद्यापीठाकडे नाशिक शहरात महाविद्यालय सुरू करण्याची मागणी केली. विद्यापीठाच्या अटींची पूर्तता झाल्यानंतर जून १९६९ मध्ये कर्मवीर रावसाहेब थोरात कला, भाऊसाहेब हिरे वाणिज्य व आण्णासाहेब मुरकुटे विज्ञान (केटीएचएम) महाविद्यालय, नाशिक नांवाने सुरू झाले. सुरूवातीच्या काळात हे महाविद्यालय मराठा हायस्कूल व महर्षी शिंदे अध्यापक विद्यालयाच्या इमारतीत सुरू झाले. प्रारंभी या महाविद्यालयात २९१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. आज या महाविद्यालयात १५ हजाराजून जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या महाविद्यालयात २८ पदवी वर्गाचे अभ्यासक्रम, २६ पदव्युत्तर आणि १० संशोधन केंद्रे आहेत.[६०]

सिन्नर हा दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जातो. सिन्नरमधील विडी उद्योग प्रसिध्द आहे. तो उद्योग सुरू करण्याचे श्रेय बाळाजी गणपत वाजे या बहुजन समाजातील व्यक्तिकडे जाते. मविप्र संस्थेच्या शैक्षणिक कार्यात सिन्नरचे भूमीपुत्र आण्णासाहेब मुरकुटे हे सक्रिय होते. या परिसरात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना पुणे, नाशिक, अहमदनगर येथे जावे लागत होते. त्यामुळे बहुजन समाजातील अनेक विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित राहात होते. तेव्हा आण्णासाहेब मुरकुटे, शंकरराव बाळाजी वाजे इत्यादींनी येथे महाविद्यालय सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. त्यानुसार जून १९६९ मध्ये कला व वाणिज्य या दोन शाखा असलेले महाविद्यालय सुरू झाले. सुरूवातीच्या काळात या महाविद्यालयात ७० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. सुरूवातीच्या काळात भाडे तत्त्वाच्या इमारतीत वर्ग सुरू करण्यात आले होते. या महाविद्यालयाच्या इमारतीकरीता भगवंतराव वाजे यांच्या स्मरणार्थ ८ एकर जमीन दानपत्राने बक्षीस दिली होती. नोव्हेंबर १९६९ मध्ये महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते इमारतीचे भूमीपूजन झाले होते.[६१] त्यानंतर विज्ञान विद्याशाखा सुरू करण्यात आली. या महाविद्यालयामुळे सिन्नर तालुक्यातील बहुजन व आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली. पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची सोय

झाल्यामुळे दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांना रोजगार व नोकरी, व्यवसायाची संधी प्राप्त होऊ लागलेली आहे.

नाशिक औरंगाबाद राज्य महामार्गावर वसलेले निफाड हे गाव होय. या शहरातील व परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी नाशिक व पिंपळगांव (बसवंत) येथे जावे लागत होते. बहुजन समाजातील सर्व विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना बाहेरगावी जाणे शक्य होत नव्हते. शांतीलालजी सोनी व विनायक दादा पाटील यांच्या प्रयत्नाने जून १९७१ मध्ये कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य महाविद्यालय निफाड येथे सुरू झाले. प्रारंभी या महाविद्यालयात कला व वाणिज्य शाखेत ६५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या महाविद्यालयाची इमारत नसल्यामुळे निफाड इंग्लिश स्कूलच्या इमारतीत वर्ग भरत होते. त्यानंतर ऑगस्ट १९७० मध्ये विनायकराव पांडुरंग उपाध्ये यांची ३ एकर २० आर जमीन खरेदी केली.[६२] त्या जागेवर इमारत बांधून वर्ग भरविण्यात येऊ लागले आहेत.

नाशिक जिल्हयातील दुष्काळी डोंगराळ, खडकाळी भाग म्हणून नांदगाव तालुका ओळखला जातो. या परिसरात उच्च शिक्षणाची सुविधा नसल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांना फार मोठा द्रविडी प्राणायाम करावा लागत होता. येथील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाकरीता मालेगाव, नाशिक, औरंगाबाद येथे जावे लागत होते. तेव्हा ही अचूक नाडी ओळखून आण्णासाहेब कवडे, रामराव कवडे, वामनराव पाटील यांनी नांदगाव येथे महाविद्यालय सुरू करण्यासाठी संस्थेकडे आग्रह धरला. संस्थेने ग्रमीण भागातील गरज लक्षात घेऊन जून १९७२ मध्ये कला व वाणिज्य महाविद्यालय, नांदगाव सुरू केले. त्यानंतर १९८९ मध्ये विज्ञान शाखा सुरू केली. संस्थेने नोव्हेंबर १९७५ मध्ये ८ एकर ७ आर जमीन दिनकर निंबा पवार यांचेकडून खरेदी केली.[६३] त्या जागेवर इमारत बांधून महाविद्यालय या इमारतीत स्थलांतरीत केले आहे.

वणी हे आदिवासी व ग्रामीण भागातील गाव आहे. ते मविप्र संस्थेचे आद्य संस्थापक रावसाहेब थोरात यांचे जन्मगाव आहे. या परिसरात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नव्हती. या दोन्ही बाबींचा विचार करून वणी येथे महाविद्यालय सुरू

करण्यासाठी ॲड. बाबुराव ठाकरे, ॲड. विठ्ठलराव हांडे यांनी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन पुणे विद्यापीठाने मंजुरी दिली. त्यानुसार जून १९७२ मध्ये संस्थेने कला व वाणिज्य महाविद्यालय, वणी सुरू केले. सुरूवातीच्या काळात हे महाविद्यालय भाडयाच्या इमारतीत भरत होते. मार्च १९७६ मध्ये महाविद्यालयाची इमारत बांधण्याकरीता ग्रामपंचायतीने ३ एकर २४ आर जमीन दिली. त्या जागेवर संस्थेने प्रशस्त इमारत बांधून जून १९८७ पासून या इमारतीत स्थलांतरीत झाले आहे. या महाविद्यालयामुळे आदिवासी व ग्रामीण भागातील बहुजन आदिवासी समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय झालेली आहे.

नैसर्गिक साधन संपत्तीने नटलेला आदिवासी बहुल म्हणून ओळखला जाणारा इगतपुरी तालुका होय. शिक्षणाच्या क्षेत्रात हा तालुका मागे होता. तेव्हा या तालुक्याच्या शैक्षणिक विकासासाठी मविप्र संस्थेने १९८१ मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरू केले. प्रारंभी कला व वाणिज्य शाखेत १७८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. इ.स. १९९३ मध्ये विज्ञान शाखा सुरू केली आहे.[६४] या महाविद्यालयामुळे इगतपुरी तालुक्यातील आदिवासी विद्यार्थी विद्यार्थिनींची महाविद्यालयीन शिक्षणाची सोय झाली आहे. त्यातून या परिसरातील कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. त्याचा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विकास होण्यास हातभार लागला आहे.

निफाड तालुक्यातील ओझर हे गाव मिग जातीच्या लढाऊ विमान कारखान्यामुळे प्रसिध्दीस आले आहे. येथील बहुजन समाजाची गरज लक्षात घेऊन ग्रामस्थांच्या मागणीला अनुसरून संस्था चालकांनी ओझर येथे महाविद्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव विद्यापीठास सादर केला. महाराष्ट्र शासन व पुणे विद्यापीठाची परवानगी मिळाल्यानंतर जून १९८४ पासून कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओझर मिग सुरू केले आहे. या महाविद्यालयाला इमारत बांधणेकरीता गावठाणाची ३ एकर ३५ आर सरकारी जमीन मिळाली. त्या जागेवर ऑक्टोबर १९९५ मध्ये विजयादशमीच्या मुहूर्तावर इमारतीचा भूमीपूजन समारंभ झाला.[६५] महाविद्यालय नवीन इमारतीत स्थलांतरीत करण्यात आले आहे.

नाशिक शहराचा एक भाग देवळाली कॅम्प आहे. या परिसरात लष्करी छावणी व रेल्वे स्टेशन असल्यामुळे या परिसराला महत्त्व प्राप्त झालेले आहे. तसेच काही अंतरावर स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जन्मगाव भगूर आहे. तेव्हा या परिसरात महाविद्यालय सुरू करण्याची सभासदांची मागणी होती. या मागणीला अनुसरून मविप्र संस्थेने जून १९८४ मध्ये येथे वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय सुरू केल. सुरूवातीला या महाविद्यालयाचे वर्ग भरविण्याकरीता लोटावाला फाऊंडेशनची इमारत भाडे तत्त्वाने घेतली होती. पुढे विद्यार्थीसंख्या वाढल्याने जागेची व इमारतीची गरज भासू लागली. तेव्हा भाटिया कुटुंबाने आपली जागा ऑक्टोबर १९९२ मध्ये बक्षीसपत्राने दिली.[६६] त्या जागेवर अनेक अडचणींना सामोरे जाऊन संस्थेने इमारतीचे बांधकाम पूर्ण केले आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीतील सुमारे ४.५ लाख लोकसंख्या असलेल्या सिडको परिसरात इ. स. १९९२ पर्यंत महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नव्हती. या परिसरात वास्तव्यास असलेली सर्व लोकसंख्या ही बहुजन समाजातील कामगार वर्ग आहे. तेव्हा या कामगार वर्गाच्या मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी याकरीता परिसरात स्वतंत्र महाविद्यालय सुरू करण्याचे प्रयत्न केले. त्यानुसार जून १९९३ मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंबड पोलीस स्टेशनजवळ सिडको कार्यालयाच्या इमारतीत होते. या महाविद्यालयात पहिल्या वर्षी २५० विद्यार्थी प्रवेशित झाले होते.[६७] पुढे विद्यार्थीसंख्या वाढल्याने वर्ग व इमारत अपूरी पडू लागली. तेव्हा तत्कालीन महापौर शांताराम बापू वावरे यांच्या सहकार्याने सिडको महामंडळाकडून इमारत विकत घेतली. या परिसरात हे महाविद्यालय सुरू झाल्यामुळे कामगार वर्गाच्या मुलांच्या महाविद्यालयीन शिक्षणाची सोय झाली आहे.

बागलाण तालुक्यातील ताराहाबाद परिसरातील ग्रामीण भागात उच्च शिक्षणची सोय नव्हती. तसेच हा परिसर आदिवासी बहुल असल्यामुळे येथील विद्यार्थ्यांला बाहेरगांव शिक्षण घेणे फारसे परवडणारे नव्हते. तेव्हा ग्रामीण व आदिवासी मुला मुलींना शिक्षणाची संधी मिळावी, समाजाच्या तळागाळापर्यंत उच्च शिक्षण पोहचावे या उद्देशाने मविप्र संस्थेने जून १९९७ मध्ये कला, वाणिज्य महाविद्यालय, ताहाराबाद

सुरू केले. महाविद्यालयाला इमारत व क्रीडांगणासाठी जागेची आवश्यकता होती. तेव्हा मविप्र संस्थेने ६ एकर जागा विकत घेतली. त्या जागेवर संस्थेने इमारत बांधली आहे.

नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर हा आदिवासी तालुका आहे. या परिसरातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाकरीता नाशिक शहरात यावे लागत होते. परंतु या परिसरतील जनतेच्या हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे आदिवासी विद्यार्थ्यांना ते परवडत नव्हते. त्यामुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहात होते. या सर्व परिस्थितीचा विचार करून त्र्यंबकेश्वर तालुक्यातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज ओळखून मविप्र संस्थेने १५ जून १९८४ रोजी कला, वाणिज्य महाविद्यालय सुरू केले. विद्यार्थीसंख्या वाढल्याने स्वतंत्र जागेची गरज निर्माण झाली. जागा विकत घेऊन इमारत बांधली आहे.

नाशिक जिल्हयातील निफाड तालुक्यात असलेले सायखेडा गाव. या गावाच्या परिसरात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नव्हती. येथील विद्यार्थ्यांना निफाड, नाशिक येथे जाणे लागत होते, परंतु मुलींचे शिक्षण थांबत होते. तेव्हा येथील ग्रामस्थांनी मविप्र संस्थेकडे येथे महाविद्यालय सुरू करण्याची मागणी केली. संस्थेने विचार करून जून १९९८ मध्ये कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरू केले. पहिल्या वर्षी या महाविद्यालयात ९८ विद्यार्थी प्रवेशित झाले होते. त्यावेळी पायाभूत सुविधा नव्हत्या. संस्थेने महाविद्यालयासाठी ४ एकर ३१ आर जमीन विकत घेतली. संस्थेने इमारतीचे बांधकाम पूर्ण केले आहे.[६८] याशिवाय मविप्र संस्थेने नाशिक जिल्हयातील नांदगाव, नाशिक येथे वसतिगृहे सुरू केली आहेत. तसेच नाशिक, सटाणा, वणी, ओझर येथे आदर्श बाल मंदिरे सुरू केली आहेत. नाशिक व नांदगाव येथे अध्यापक विद्यालय सुरू केली आहेत.

नाशिक शहराची तीर्थक्षेत्राकडून औद्योगिकरणाकडे वाटचाल सुरू झालेली आहे. नाशिक जिल्हयातील औद्योगिक वसाहतीमध्ये प्रशिक्षित कामगार वर्गाची निर्माण झालेली गरज लक्षात घेऊन संस्थेने बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र उभारण्याकडे लक्ष दिले. त्याकरीता संस्थेने

नाशिक, सिन्नर, सटाणा, मालेगाव, नांदगाव, ताराहाबाद येथे औद्योगिक प्रशिक्षण (आयटीआय) केंद्र सुरू केली आहेत.[६९] या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण घेतलेली बहुजन समाजातील अनेक विद्यार्थी सरकारी, खाजगी क्षेत्रात काम करीत आहेत. तर काहींनी आपले स्वतंत्र व्यवसाय सुरू केलेले आहेत. या प्रशिक्षण केंद्रामुळे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना रोजगार मिळाले आहे. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यात मोलाचे योगदान दिले आहे. याबरोबर कृषी व इंजिनिअरींग क्षेत्रातही भरीव योगदान दिले आहे.

बहुजन समाजातील गोरगरीब व सामान्य माणसांना परवडेल अशी सेवा उपलब्ध करून देण्याचा निर्णय (वैद्यकीय) घेतला. कारण नाशिक जिल्ह्यातील अनेक रुग्णांना उपचार होण्याकरीता पुणे, मुंबई येथे जावे लागत होते. सर्व रुग्णांना तेथील खर्च परवडत नव्हता. अतिशय कमी दरात तज्ञ डॉक्टरांकडून सर्वसामान्य व गोरगरीब यांना आरोग्यविषयक सुविधा मिळाव्यात याकरीता संस्थेने १ हजार रुपये फी घेऊन आजीव सभासद करण्याची योजना आखली. त्यानुसार १० ऑक्टोबर १९८९ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर १५० खाटांचे रुग्णालय व संशोधन केंद्र सुरू केले. त्यानंतर वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत बांधण्याकरीता संस्थेने सरकारी जागेची मागणी केली होती. त्या मागणीला अनुसरून आडगाव शिवारात ५० एकर जमीन मिळाली.[७०] त्या जागेवर महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरू करून पूर्ण केले. या नव्या इमारतीत वैद्यकीय महाविद्यालय स्थलांतरीत केले आहे. या महाविद्यालयाने ग्रामीण भागात स्त्रियांचे आरोग्य तपासणीकरीता कर्करोग शिबीर, रक्तदान शिबीर, मोतीबिंदू शिबीर, शालेय विद्यार्थी तपासणी शिबीर इत्यादी आयोजन करून बहुजन समाजासाठी उज्वल असे कार्य केले आहे.

## आदिवासी सेवा समितीचे योगदान

ख्रिश्चन मिशनऱ्यांना इ. स. १८१३ च्या कायद्यानुसार हिंदुस्थानात वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. त्यांना मिळालेल्या या सवलतीचा मिशनऱ्यांनी पूरेपूर फायदा उठवून येथे चर्च सोसायटी, स्कॉटीश मिशनरी सोसायटी, लंडन मिशनरी सोसायटी, अमेरीकन मराठी मिशन इत्यादी मिशनरी संस्थांनी

महाराष्ट्रातही जोरदार काम सुरू केले होते.[७१] या मिशनरी संस्था खऱ्या अर्थाने धर्माचा प्रसार करण्यासाठी स्थापन झालेल्या होत्या. त्या जोडीला त्यांनी येथील समाजातील गोरगरीब, दीनदुबळया जनतेवर मोफत उपचार केले. तसेच या जनतेच्या मुलांसाठी मोफत शाळा सुरू केल्या होत्या. समाजातील गोरगरीब, दीनदुबळयाना मदतीचा हात दिला होता.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी डोंगर दऱ्याखोऱ्यात राहात होता. त्यांच्या वस्ती पाडयावर जाऊन मिशनरी त्यांच्या जीवनाशी एकरूप झाले होते. त्यांनी दिलेल्या या मदतीमुळे आदिवासी गरीब लोंढा त्यांच्यामागे जाऊ लागला होता. 'येशू ख्रिश्चनकी जय' म्हणू लागला होता.[७२] पूज्य ठक्कर बाप्पा व सत्यशोधक चळवळ यांच्या कार्याचा प्रभाव झालेले मालेगाव तालुक्यातील निमगाव येथील भाऊसाहेब हिरे यांनी दोधू आनंदा बोवा गुरुजी यांच्या सहकार्याने आदिवासी, हरिजन, गिरीजन वंचित घटकातील मुलांच्या शिक्षणाकरीता स्वातंत्र्यपूर्व काळात बागलाण तालुक्यातील सटाणा येथे इ. स. १९३७ मध्ये सरस्वती विद्यामंदिर, सटाणा या प्राथमिक शाळेची स्थापना केली होती.[७३] या शाळेची स्थापना केल्यानंतर समितीने दोधू आनंदा बोवा गुरुजी, उत्तम शामराव पाटील व रघुनाथ पर्वत पवार यांच्या सहकार्याने नाशिक, डांग, ठाणे, कुलाबा, धुळे, औरंगाबाद इत्यादी जिल्ह्यातून पायी प्रवास करून बहुजन व आदिवासी यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले होते. तेव्हा त्या काळात या परिसरात सुरू करण्यात आलेल्या शाळांमध्ये मुले येत नसत. घरोघरी जाऊन मुलांना शाळेत आणावे लागत होते आणि दुर्गम भागात प्राथमिक शाळा व (व्हॉलिंटिअरली स्कूल) सुरू करण्यात आल्या होत्या. त्या काळात शिक्षणाबाबत पालक जागरूक नव्हते. गाणे, गोष्टी, नकला, विविध खेळ या माध्यमातून त्या मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात येत असे. अगदी कमी कालावधीत या प्राथमिक शाळांची संख्या ५०० एवढी वाढली होती.[७४] या शाळांना तत्कालीन सरकारकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा आर्थिक मदत मिळत नव्हती, लोकवर्गणी यातून चालविण्यात येत होत्या. ग्रामीण भागात स्वयंस्फूर्त (व्हॉलिंटिअरली) प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची जबाबदारी सरकारने इ. स.

१९५४ मध्ये घेण्याचे मान्य केले. तेव्हा सरकारच्या या आदेशानुसार आदिवासी सेवा समितीने ३१ मार्च १९५४ शिक्षकांसह जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आल्या होत्या.[७५]

भाऊसाहेब हिरे यांनी दोधू आनंदा बोवा गुरुजी यांच्या सहकार्याने १ जून १९३७ रोजी सटाणा येथे सरस्वती मंदिर शाळा स्थापन केली होती.[७६] त्यानंतर डोंगर दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिवासींची वस्ती विस्तारली आहे. त्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील वारली, धुळे जिल्हयातील भिल्ल, मावची, गावित, कोकणा तर नाशिक जिल्ह्यातील महादेव कोळी, कोकणा, भिल्ल, वारली या आदिवासींच्या शिक्षणाकरीता ब्रिटिश काळात सोय नव्हती. त्या आदिवासी भागात साधारणपणे ४४ प्राथमिक शाळा सुरू केल्या होत्या. अगदी कमी काळात या शाळांची संख्या ६६ पर्यंत जाऊन पोहचली होती.[७७] आदिवासी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळावा, त्यांना राष्ट्रीय शिक्षण प्रवाहात सहभागी होता यावे, त्यांचा विकास व्हावा असा सर्वसमावेशक दृष्टिकोन समोर ठेवून १ जून १९४५ रोजी आदिवासी सेवा समिती या शैक्षणिक संस्थेची स्थापना करण्यात आली. पुढे ही संस्था १८६० च्या संस्था नोंदणी कायद्यान्वये रजिष्टर नंबर १५२७ दि. २० फेब्रुवारी १९४७ व १९५० च्या संस्था ट्रस्ट डिडच्या कायद्याने रजिष्टर नंबर एफ २६ दि. २६ जून १९५४ रोजी नोंदणी करण्यात आली. या समितीचे कार्यालय सुरूवातीच्या काळात मालेगाव येथे होते.[७८] आदिवासी सेवा समितीच्या संस्थापकांनी २७ एप्रिल १९४७ रोजी तात्पुरते संचालक मंडळ नियुक्त केले होते. त्यानंतर समितीच्या सप्टेंबर १९४७ च्या बैठकीत संस्थापकांनी कार्यकारी मंडळाची नियुक्ती केली होती.

| **अ. नं.** | **संचालकाचे नांव** | **पद** |
|---|---|---|
| १. | भाऊसाहेब सखाराम हिरे | अध्यक्ष |
| २. | काशिनाथ मन्नालाल अग्रवाल | उपाध्यक्ष |
| ३. | मंगलदास ताराचंद भावसार | संचालक |
| ४. | रघुनाथ पर्वत पवार | संचालक |

| | | |
|---|---|---|
| ५. | दोधू आनंदा बोवा | संचालक |
| ६. | उत्तमराव शामराव पाटील | संचालक |
| ७. | माधवराव काशिनाथ वाघ | संचालक |

ग्रामीण भागात शिक्षण देणाऱ्या स्वयंस्फूर्त (व्हॉलिंटिअरली) शाळांची जबाबदारी इ. स. १९५० मध्ये स्कूल बोर्डाने स्वीकारल्यामुळे आदिवासी सेवा समितीच्या अनेक शाळा जोडून देण्यात आल्या होत्या.[७९] आदिवासी सेवा समितीने आदिवासी दुर्गम भागातील गोरगरीबांना फक्त शिक्षणाची सोय पुरविली नाही तर त्या प्रदेशातील मुलांना अन्न, वस्त्र, पाठय पुस्तकांची आणि निवासाची सोय असलेले शिक्षण उपलब्ध करून दिले. अति डोंगराळ आदिवासी भागात आश्रमशाळा, वसतिगृहे आणि छात्रालये सुरू केली आहेत.

## पूर्व प्राथमिक बालमंदिर

भारतात ब्रिटिशांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या काळात किंडर गार्डन शाळांची स्थापना करून पूर्व प्राथमिक शिक्षणाचा पाया घातला होता. महाराष्ट्रात इ. स. १९२० मध्ये 'नूतन बालशिक्षण संघ' स्थापन झाला होता. या देशातील पूर्व प्राथमिक शिक्षणाची हीच खरी नांदी होती.[८०] त्या वेळपासून खाजगी प्रयत्नाने पूर्व प्राथमिक शिक्षण देण्यास सुरूवात झाली आहे. तसेच मुलांच्या भविष्यातील विकासाच्या दृष्टीने वय वर्ष १ ते १० महत्त्वाचे असते.[८१] आदिवासी सेवा समितीने व्हॉलिंटिअरली स्कूलच्या बरोबर इ. स. १९५४ पासून बालमंदिरे विभाग स्थापन केला होता. आदिवासी सेवा समितीच्या प्रारंभीच्या बालमंदिराच्या सेविका म्हणून इंदूबाई बोवा यांनी जबाबदारी सांभाळली होती. आदिवासी सेवा समिती या संस्थेकडून नाशिक जिल्हयात मालेगाव व पेठ तालुक्यात २१ बालमंदिरे चालविली जात होती. या बालमंदिरामधून सुमारे ५५३ मुले-मुली शिक्षण घेत होत्या. तसेच १५ सेविका म्हणून कार्यरत होत्या. समितीच्या या बालमंदिरांना समाज कल्याण विभागाकडून आर्थिक सहाय्य मिळत होते. या बालमंदिरांची संख्या पुढील काळात वाढत गेली. इ. स. १९८०-८१ मध्ये ५७ पर्यंत पोहचली होती. त्यावेळी त्यातून १३६३

मुलां-मुलींवर ४१ सेविका बालसंस्कारसाठी कार्यरत होत्या.[८२] मात्र पुढील काळात ही बालमंदिरे कोणत्या वर्षी आणि कोणत्या कारणाने बंद झाली या संदर्भात माहिती उपलब्ध होत नाही. त्यानंतर आदिवासी सेवा समितीने शहरी भागात इ. स. १९८८ पासून पुन्हा नव्याने बालमंदिरे सुरू केली आहेत.

## प्राथमिक शाळा

महाराष्ट्र राज्यातील ज्या खेडेगावाची लोकसंख्या २०० पेक्षा जास्त आहे अशा प्रत्येक खेडेगावात प्राथमिक शिक्षणाची सोय निर्माण करण्यात आलेली होती. या प्राथमिक शाळांचा कारभार मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा १९४७ व मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ च्या तरतुदीनुसार करण्यात येत होता.[८३] समाजात कोणतीही क्रांती यशस्वी करायची असेल तर शिक्षणाशिवाय कोणतेही दुसरे प्रभावी साधन नाही. या उक्तीतून बोध घेऊन आदिवासी सेवा समितीने ब्रिटिश काळात शाळांची स्थापना केली होती. तसेच नंतरच्याही काळात समितीने प्राथमिक क्षेत्रातील शैक्षणिक कार्याचा विस्तार केलेला दिसतो. आदिवासी सेवा समितीने इ. स. १९३७ मध्ये सटाणा, इ. स. १९८८ मध्ये सिडको इ. स. १९९० मध्ये पंचवटी आणि इ. स. १९९३ मध्ये सातपूर प्राथमिक शाळांची स्थापना केली आहे.[८४] वरील चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही शाळेला जोडून वस्तीगृह स्थापन केलेले नाही.

## प्राथमिक आश्रमशाळा

दुर्बल घटक त्यातील विशेषतः आदिवासी गिरीजन यांच्या आर्थिक व शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष द्यावे असे तत्कालिन मुंबई राज्य सरकारने स्पष्ट केले होते. तत्कालिन महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील ३०० लोकसंख्या असलेल्या खेडेगावामध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षणात सोय करण्यात आलेली होती. परंतु डोंगराळ दुर्गम भागातील आदिवासी लोकवस्ती असलेलया भागातील खेडया पाडयाची लोकसंख्या त्या मानाने कमी असल्याने तेथे फारशा शैक्षणिक सोयी उपलब्ध झाल्या नव्हत्या. तेव्हा आदिवासी, गिरीजन व विमुक्त भटक्या जमाती यांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था करणे त्या काळात अत्यंत गरजेचे होते.

त्यावेळी आदिवासी जमातींच्या विद्यार्थ्यांची परिणामकारक शिक्षणाची सोय व्हावी यासाठी या भागातील विद्यार्थ्यांना मोफत जेवणाची व निवासाची व्यवस्था करण्यात येईल. तसेच पात्र शिक्षकांकडून या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळेल. त्यांच्या निरीक्षणाखाली त्यांना सतत शिक्षण दिले जाईल अशी योजना तयार करण्यात आली होती. त्यावेळी महाराष्ट्र राज्यात ही योजना राबविण्यासाठी तत्कालीन शिक्षणमंत्री दिनकर देसाई यांच्या अध्यक्षतेखाली १८ सप्टेंबर १९५३ रोजी पुणे येथे सरकारी अधिकारी व स्वयंसेवी शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी यांची परिषद भरविण्यात आली होती.[८५] महाराष्ट्र शासनाच्या या धोरणाला अनुसरून नाशिक जिल्ह्यातील डोंगराळ दुर्गम आदिवासी भागात आश्रमशाळा स्थापन करण्याचे काम आदिवासी सेवा समिती या शैक्षणिक संस्थेने स्वीकारले. त्यानुसार आदिवासी भागातील चिंचवड या गावात ११ ऑक्टोबर १९५४ रोजी पहिली आश्रमशाळा सुरू करण्यात आली होती.[८६] त्यानंतर कळवण तालुक्यातील मानूर येथे १ एप्रिल १९५६ रोजी आश्रमशाळा सुरू करण्यात आली. यानंतर थोडयाच काळात आदिवासी सेवा समितीचे संस्थापक भाऊसाहेब हिरे यांचे अकाली निधन झाले. त्यामुळे या संस्थेच्या कार्याची जबाबदारी त्यांचे पुत्र व्यंकटराव हिरे यांच्यावरआली होती. तेव्हा त्यांनी त्यांच्या कार्यकाळात त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ओझर या गावी १५ जुलै १९६५ रोजी आश्रमशाळा स्थापन केली होती. याच वर्षी १९ जुलै १९५६ रोजी राहिले येथेही शाळा सुरू करण्यात आली होती. तद्नंतर इगतपुरी तालुक्यातील खंबाळे येथे १ जून १९६६ रोजी आश्रमशाळा सुरू केली होती. तसेच दिंडोरी तालुक्यातील पांडाणे येथे १ ऑगस्ट १९६७ व पिप्रिअंचला येथे १५ फेब्रुवारी १९७२ रोजी आश्रमशाळा सुरू करण्यात आली आहे. त्यानंतर मालेगाव तालुक्यातील सौंदाणे या ग्रामीण भागात ५ जून १९७२ रोजी आश्रमशाळा सुरू करून आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. व्यंकटराव हिरे यांचे हे कार्य पार पाडत असतांना अपघाती निधन झाले. त्यांच्या या कार्याची पुढील धुरा त्यांच्या पत्नी पुष्पाताई हिरे व पुत्र प्रशांत हिरे यांनी सांभाळली. त्यांच्या काळात सुरगाणा तालुक्यातील अति दुर्गम असलेल्या आंबेपाडा या गावी त्यांनी १३ नोव्हेंबर १९८१ आणि सुरगाणा येथे १२

जानेवारी १९८७ रोजी प्राथमिक आश्रमशाळांची स्थापना केली आहे. त्यानंतर चांदवड तालुक्यातील खडकजांब या गावी १ ऑगस्ट १९८७ रोजी प्राथमिक आश्रमशाळा स्थापन केली.

त्यानंतर त्यांनी मालेगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील माळणे या गावी विमुक्त भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोय उपलब्ध करून देण्यासाठी १५ सप्टेंबर १९९० रोजी प्राथमिक आश्रमशाळा सुरू केली आहे. तद्नंतर त्र्यंबकेश्वर तालुक्यातील आडगाव (देवळा) आणि अंजनेरी येथे १५ जुलै १९९४ रोजी प्राथमिक आश्रमशाळा सुरू केल्या होत्या. त्यानंतर कळवण तालुक्यातील पिंपळे बु. येथे ३० नोव्हेंबर १९९८ आणि रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील तळोशी येथे १ डिसेंबर १९९८ रोजी प्राथमिक आश्रमशाळा सुरू केल्या आहेत.[८७] आदिवासी सेवा समितीने डोंगर दऱ्या खोऱ्यात वास्तव्य करणाऱ्या आदिवासी मुलांच्या शैक्षणिक सोयीकरीता अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या गरजा बरोबर पाठय पुस्तके यांची उपलब्धता करून या मुला मुलींच्या शारीरिक, मानसिक आणि बौध्दिक विकास झाला पाहिजे. त्यांना सेवाभावी व ध्येयनिष्ठ बनवायचे असेल तर त्याचा जास्त वेळ गुरुजनांच्या सहवासात गेला पाहिजे. या उद्देशाने या शाळांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच हे ध्येय या शैक्षणिक संस्थेच्या अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शाळांमधून पाळले जात असल्याचे नजरेस येते.

प्राथमिक आश्रमशाळांपैकी १६ आश्रमशाळातून आदिवासी समाजातील मुलामुलींना ज्ञानार्जनाचे कार्य करतात. तर १ आश्रमशाळा विमुक्त भटक्या जमातीच्या मुला मुलींना शिक्षण देण्यासाठी चालवली जात आहे. तसेच या शैक्षणिक संस्थेतर्फे ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या वरील आश्रमशाळांपैकी सौंदाणे, गाळणे, खडकजांब या तीन शाखा ग्रामीण भागात आहेत तर उर्वरित सर्व शाखा या आदिवासी दुर्गम भागात आहेत. तसेच या आश्रमशाळातील विद्यार्थी विद्यार्थीनींच्या संख्येचा विचार करता प्रारंभीच्या काळात मुलांची जी संख्या होती ती पुढील काळात स्थिर असलेली दिसून येते, तर मुलींच्या संख्येत वाढ झालेली दिसते.

महात्मा जोतीबा फुले व छत्रपती शाहू महाराज यांच्यापासून प्रेरणा घेऊन आदिवासी सेवा समितीने आदिवासी, हरिजन, भटक्या विमुक्त जाती आणि इतर मागासवर्गीय समाजातील मुला मुलींची माध्यमिक शिक्षणाची सोय करण्यासाठी कार्य सुरू केले होते. त्यांनी सुरूवातीला त्र्यंबकेश्वर तालुक्यातील दुर्गम भागातील हरसूल येथे ९ जून १९६३ रोजी पहिली माध्यमिक शाळा सुरू केली होती. त्यानंतर पेठ तालुक्यातील आदिवासी दुर्गम करंजाळी येथे १५ जून १९६३ रोजी माध्यमिक विद्यालय सुरू केले आहे. तद्नंतर नाशिक शहरातील पंचवटी भागात १४ जून १९७१ आणि वडाळा येथे १२ जून १९७२ रोजी माध्यमिक विद्यालये स्थापन केली आहेत. त्यानंतर आदिवासी भागातील कळवण तालुक्यातील सप्तशृंगी गड येथे १२ जून १९७२ रोजी माध्यमिक विद्यालय स्थापन केले.

ग्रामीण आदिवासी भागातील त्र्यंबकेश्वर येथे २ सप्टेंबर १९८५ रोजी माध्यमिक विद्यालय सुरू केले आहे. त्यानंतर नाशिक शहरातील औद्योगिक क्षेत्रातील वेगवेगळया कारखान्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या जास्त असलेल्या सिडको या भागात १५ जून १९८८ रोजी माध्यमिक विद्यालय सुरू केले. आदिवासी सेवा समितीचे प्रमुख लोकनेते व्यंकटराव हिरे यांचे दरम्यानच्या काळात दुर्दैवाने अकाली निधन झाले. त्यांच्यानंतर या शैक्षणिक संस्थेची जबाबदारी श्रीमती पुष्पाताई हिरे आणि पुत्र प्रशांतदादा हिरे यांच्यावर आली होती. तेव्हा त्यांनी अनेक कठीण प्रसंगांचा सामना करीत शैक्षणिक कार्याचा यज्ञ चालू ठेवला. त्यांच्या काळात त्र्यंबकेश्वर तालुक्यातील दुर्गम भागातील ठाणापाडा आणि मालेगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील हताणे येथे १४ जून १९९३ रोजी माध्यमिक विद्यालये सुरू केली. तसेच नाशिक शहरातील कामगारांची वस्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सातपूर भागातील अशोकनगर येथे ५ जुलै १९९३ व पाथर्डी येथे २७ जून १९९४ रोजी माध्यमिक शाळा सुरू केल्या आहेत. त्यानंतर पेठ तालुक्यातील जायलोढा या आदिवासी डोंगराळ दुर्गम गावी २ ऑक्टोबर २००० आणि बागलाण तालुक्यातील ग्रामीण भागातील महालपाटणे येथे १२ जून २००० रोजी माध्यमिक आश्रमशाळाची स्थापना केली आहे. ८८ आदिवासी सेवा समितीने इ. स. २००० पर्यंत सुरू केलेल्या

माध्यमिक शाळांच्या शाखांपैकी ४ शाळा या नागरी भागात आहेत तर ९ शाखा या ग्रामीण आदिवासी भागात आहेत. या शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही उत्तरोत्तर वाढत गेलेली आपणास दिसून येते. या सर्व शाखांपैकी दोन शाखा या फक्त मुलींसाठी चालविण्यात येतात.

**माध्यमिक आश्रमशाळा**

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील मुला मुलींच्या शैक्षणिक विकासाकरीता राज्यात स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदानित आश्रमशाळा चालविल्या हात होत्या. या शाळांमधून शिक्षण घेणारे विद्यार्थी इ. ७ वी पास झाल्यावर त्यांच्या पुढील शिक्षणाची अडचण निर्माण होत होती. तेव्ही ही समस्या लक्षात घेऊन इ. स. १९६२-६९ मध्ये महाराष्ट्र शासनाने एक योजना अंमलात आणली होती. या नवीन योजनेनुसार ज्या आश्रमशाळांमध्ये इ. ७ वी पर्यंतचे वर्ग चालविले जात होते. अशा माध्यमिक शाळांमध्ये इ. ८ वी चा वर्ग सुरू करून इ. १० वी पर्यंतचे पोस्ट बेसिक (बुनियादी आश्रम) श्रेणीवाढ करण्याचे अंमलता आणले. या पोस्ट बेसिक आश्रमशाळांमधून मोफत शिक्षणा बरोबर निवास, भोजन, गणवेश, पाठयपुस्तके इत्यादी सोयी सुविधा विद्यार्थ्यांना मोफत पुरविण्याचे अंमलात आणले.[८९]

तेव्हा आदिवासी सेवा समितीने आदिवासी, दलित, निराधार बहुजन समाजातील सर्व सामान्य जनतेला सहज शिक्षण मिळावे हा उद्देश डोळयासमोर ठेवला होता. या उद्देशाने आपल्या सर्व सहकार्यांना विश्वासात घेऊन आदिवासी व ग्रामीण भागात पोस्ट बेसिक माध्यमिक आश्रमशाळा सुरू करण्यास सुरूवात केली होती. तेव्हा आदिवासी सेवा समितीने त्र्यंबकेश्वर तालुक्यातील चिंचवड या आदिवासी दुर्गम भागात १५ जुलै १९७२ रोजी पोस्ट बेसिक आश्रमशाळा सुरू करून या क्षेत्रात श्रीगणेशा केला होता. त्याच वर्षी कळवण तालुक्यातील आदिवासी ग्रामीण भागातील मानूर या गावी १४ जुलै १९७२ रोजी पोस्ट बेसिक आश्रमशाळा सुरू केली आहे. त्यानंतर इगतपूरी तालुक्यातील खंबाळे या आदिवासी भागातील गांवात ०२ जून १९७३ रोजी पोस्ट बेसिक माध्यमिक आश्रमशाळा सुरू केलेली आहे. तद्नंतर नाशिक जिल्हयातील आदिवासी तालुके त्र्यंबकेश्वर मधील रोहिले, दिंडोरी

तालुक्यातील पांडणे येथे १० जून १९७४ रोजी पोस्ट बेसिक माध्यमिक आश्रमशाळा सुरू केलेल्या आहेत. त्यानंतर दिंडोरी तालुक्यातील पिंप्री अंचला येथे ०९ जुलै १९८९ रोजी पोस्ट बेसिक माध्यमिक आश्रमशाळा स्थापन केली आहे. आदिवासी दुर्गम असलेला सुरगाणा तालुक्यातील आंबेपाडा येथे २५ मार्च १९८६ रोजी पोस्ट बेसिक माध्यमिक आश्रमशाळा सुरू करण्यात आली आहे. मालेगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील सौंदाणे येथे १५ जून १९८७ रोजी पोस्ट बेसिक आश्रमशाळा स्थापन केली आहे. त्यानंतर ०८ जून १९९४ रोजी सुरगाणा येथे चांदवड तालुक्यातील खडकजांब येथे १३ जून १९९४ आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ओझर येथे ०७ डिसेंबर १९९४ रोजी पोस्ट बेसिक आश्रमशाळांची स्थापना करून आदिवासी विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली आहे.[१०]

आदिवासी सेवा समितीने पोस्ट बेसिक आश्रमशाळाच्या कार्यास प्रारंभ केल्यापासूनच्या कार्याचा अंदाज गृहीत धरल्यास पहिल्या १० वर्षांच्या काळात समितीने ६० टक्के कार्य केले आहे. दुसऱ्या टप्यात ४० टक्के कार्य केल्याचे दिसून येते. तसेच चिंचवट, रोहिले आणि पांडाणे या ठिकाणच्या शाखांमधील विद्यार्थिनींची संख्या वाढलेली दिसून येते.

## उच्च माध्यमिक विद्यालये

महाराष्ट्र राज्य सरकारने शैक्षणिक क्षेत्रात १०+२+३ हा आकृतीबंध लागू केला. त्यावेळी आदिवासी सेवा समितीने या कार्यात हिरीरीने सहभाग घेऊन आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. त्यातून त्र्यंबकेश्वर तालुक्यातील हरसूल येथे १ जुलै १९८६ रोजी उच्च माध्यमिक विद्यालय स्थापन केले होते. तसेच बदलत्या काळाचा वेध लक्षात घेऊन आदिवासी दीनदुबळया बहुजन समाजातील सर्वसामान्य शेतकरी व कष्टकरी यांच्या मुलांना व्यवसायाभिमुख शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी कळवण तालुक्यातील मानूर येथे १५ ऑगस्ट १९९० रोजी कृषी तंत्रनिकेतन या कृषी विद्यालयाची स्थापना केली आहे. तसेच वडाळा येथे ०१ एप्रिल १९८१ रोजी सुतार काम प्रशिक्षण केंद्र सुरू

करून ग्रामीण आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना स्वावलंबी होण्याकरीता कार्य सुरू केले.

## वसतिगृहे

आदिवासी आणि बहुजन समाजातील मागासवर्गीय समाजाच्या प्रगतीकरीता शिक्षण हे एकमेव साधन आहे. तेव्हा हे शिक्षण घेण्यासाठी डोंगर दऱ्या खोऱ्यात राहाणाऱ्या आदिवासी ग्रामीण भागात राहाणाऱ्या दीनदुबळया समाजातील विद्यार्थ्यांना मुख्य अडचण जी होती ती म्हणजे त्यांना शिक्षण मिळणाऱ्या ठिकाणी निवासाची व्यवस्था ही होय. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या समस्या मिटविण्याकरीता स्वातंत्र्यपूर्व काळापासून आदिवासी सेवा समितीने या विद्यार्थ्यांकरीता वसतिगृहे स्थापन केली आहेत.[११] वसतिगृह म्हणजे ''जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्याने प्रवेशीत असलेल्या विद्यार्थ्यांना राहाण्यासाठी योग्य असल्याबाबत मान्य केलेली इमारत किंवा घर म्हणजे वसतिगृह. या इमारतीत स्वयंपाक घर, जेवणाची खोली, धान्यसाठी खोली, अधीक्षकासाठी निवासस्थान, स्नानगृह, संडास या सोयी असाव्यात. या वसतिगृहात राहणारा विद्यार्थी म्हणजे शैक्षणिक संस्थांनी मान्य केलेला सुनियोजीत व पूर्ण वेळ असलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी वसतिगृहात दाखल झालेला आदिवासी, मागासवर्गीय विद्यार्थी होय.''[१२] आदिवासी सेवा समितीने स्वातंत्र्यपूर्व काळापासून वसतिगृहे सुरू केलेली आहेत. या वसतिगृहाची इ. स. २०७० पर्यंतची संख्या ३५ इतकी होती.

## छात्रालये

आदिवासी सेवा समितीने आदिवासी व ग्रामीण भागातील खेडोपाडी शाळा सुरू केल्या होत्या. या सुरू करण्यात आलेल्या शाळांमध्ये मुलींची संख्या वाढत नव्हती. तसेच मुली सतत हजर राहात नाही याच्या पाठीमागचे कारण जेव्हा आदिवासी सेवा समितीचे कार्य सांभाळणाऱ्या सहकार्यांच्या लक्षात आले. तेव्हा आदिवासी सेवा समितीने स्वातंत्र्यपूर्व काळापासून मुलींच्या शैक्षणिक सोयीकरीता छात्रालये स्थापन केली होती.[१३] स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू करण्यात आलेल्या

छात्रालयाची संख्या इ. स. २००० पर्यंत २२ इतकी झालेली आहे. या छात्रालयामधून विद्यार्थीनींची जेवणाची व निवासाची सोय केल्यामुळे आदिवासी ग्रामीण भागातील विद्यार्थीनींची शिक्षण घेण्यासाठी असलेली संख्या आणि हजेरीत वाढ झालेली आहे.

## डांग सेवा मंडळाचे शैक्षणिक योगदान

नाशिक जिल्ह्याचा पश्चिम भाग आणि त्यातही पेठ, सुरगाणा हे तालुके अतिदुर्गम आहेत. या परिसरात आल्यावर आपण जगापासून दूर आल्यासारखे वाटणारा हा प्रदेश होता. या परिसरात निवासी असणारी जनता प्रामुख्याने आदिवासी आहे. कोकणा, भिल्ल, वार्ली यांचा समावेश होतो. या भागातील जनतेचे जीवन फारच कष्टाचे, पिकेल तेवढे खावे, कंदमुळे ही निसर्गातील वस्तू खाव्यात, अनकुचीदार खिळा ठोकलेली काठी, विळा सतत बरोबर बाळगत त्यामुळे जंगली प्राणी समोर आले तरी न घाबरता संकटाला तोंड देण्याची तयारी ठेवणारा हा आदिवासी समाज आहे. या जनतेच्या जीवनात असलेले दारिद्रय, अज्ञान आणि त्याचे शोषण दादासाहेब बिडकर यांनी पाहिले होते.[१४] तेव्हा या जनतेच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले होते.

आदिवासींच्या जीवनात बदल घडवून आणण्याकरीता दादासाहेब बिडकर यांनी ठक्कर बाप्पा यांना भेटून त्यांचे आशीर्वाद घेतले आणि आपल्या कार्याला सुरूवात केली होती. त्यानुसार त्यांनी २३ जून १९३७ रोजी बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे 'डांगसेवा मंडळ' नावाची संस्था स्थापन केली. सुरूवातीच्या काळात या मंडळाचे कार्यालय सटाणा येथे सुरू केले होते. या संस्थेच्या सुरूवातीचे पदाधिकारी मंडळी खालीलप्रमाणे होते.

| अ. नं. | पदाधिकाऱ्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | मिस. जे. एल. लॅथम | अध्यक्ष |
| २. | श्री. वैकुंठभाई मेहता | उपाध्यक्ष |
| ३. | श्री. दत्तात्रय मल्हार बिडकर | चिटणीस |
| ४. | श्री. भाऊसाहेब सखाराम हिरे | सदस्य |
| ५. | श्री. सरदार नारायण विंचूरकर | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६. | श्री. दामोदर हरी पाठक | सदस्य |
| ७. | श्री. दत्तात्रय शंकर पोतनीस | सदस्य |
| ८. | श्री. नारायण बुधा कोकणी | सदस्य |
| ९. | श्री. लालचंद्र हिराचंद | सदस्य |
| १०. | श्री. नारायण हरी झोडगे | सदस्य |
| १२. | हरी अमृत पाटील | सभासद |

या पदाधिकारी मंडळाची नियुक्ती करून त्यांनी तीन उद्दिष्टे समोर ठेवली होती.

१. आदिवासींची कर्जमुक्ती होण्यासाठी प्रयत्न करणे.

२. सावकाराकडून होणारा अन्याय आणि तक्रार याचे निवारण करणे.

३. शिक्षण देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.[१५]

यातून त्यांनी डांगसेवा मंडळाच्या माध्यमातून शाळा सुरू करण्याच्या कार्याला सुरुवात केली होती. बागलाण तालुक्यातील गोलवाड या गावी डांगसेवा मंडळाने इ. स. १९३९ मध्ये आदिवासीसाठी पहिली शाळा सुरू केली होती. या शाळेत लक्ष्मीकांत पंडित यांनी शिक्षक म्हणून खुशीने काम स्वीकारले होते.[१६] सुरूवातीच्या काळात ही शाळा एका झोपडीत सुरू केली होती.

बागलाण नंतर कळवण तालुक्याच्या पश्चिम भागात असलेले अभोणे, कनाशी या परिसरात डांगसेवा मंडळाच कार्य सुरू केले. तेथेही शाळा सुरू केली होती. डांगसेवा मंडळाच्या कार्यातून शाळा वाढीस लागल्यावर त्यांना वसतिगृहाची स्थापना करणे गरजेचे वाटू लागले. त्यांनी अनेक ठिकाणी वसतिगृहाची स्थापना करून आदिवासी विद्यार्थी विद्यार्थिनींची निवासाची व जेवणाची सोय केली होती. बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे इ. स. १९४१ मध्ये वसतिगृह सुरू केले होते. तेथे विद्यार्थ्यांना राहाण्याकरीता छात्रालय सुरू केले होते.

त्यानंतर इ. स. १९४४-४५ मध्ये पेठ तालुक्यात शिक्षण फार दुर्मिळ होते. तेव्हा ही परिस्थिती लक्षात घेऊन दादासाहेब बिडकर यांनी संपूर्ण तालुक्यात ४५

व्हालिंटियरली शाळा सुरू केल्या होत्या.[१७] या काळाचे पर्यवेक्षक गंगाराम आवारी ज्यांना पुढील काळात आवारी गुरुजी या नावाने प्रसिध्दी मिळाली होती. ते हेच गंगाराम आवारी होय.

## शैक्षणिक विस्तार

डांगसेवा मंडळाने नाशिक जिल्ह्यातील बागलाण, सुरगाणा, कळवण आणि पेठ या तालुक्यातील आदिवासी भागात वसतिगृह, आश्रमशाळा, माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना करून शिक्षण प्रसाराचे कार्य केले आहे.

## वसतिगृहे

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात ज्या गावात प्राथमिक व आश्रमशाळा आहेत त्या शाळांमध्ये येणारी मुले-मुली ही डोंगर दऱ्याखोऱ्यातून पायी येत होती. त्यामुळे अशा ठिकाणी त्या विद्यार्थ्यांना निवासी राहाण्याकरीता वसतिगृहे सुरू करण्याचा विचार केला. त्यातून अगदी सुरूवातीला बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे ४ एप्रिल १९४१ रोजी विद्यार्थी वसतिगृह सुरू केले. त्यानंतर कळवण तालुक्यातील अभोणा येथे १ जुलै १९४५ रोजी वसतिगृह सुरू केले आहे. तसेच अभोणा येथे १ डिसेंबर १९४७ रोजी विद्यार्थिनींकरीता कला वसतिगृह सुरू केले आहे. आज या दोन्ही वसतिगृहात अनुक्रमे १३२ इतके विद्यार्थी आणि १२९ इतक्या विद्यार्थिनी निवासी राहून शिक्षण घेत आहेत. तद्नंतर नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात बोरगाव येथे एप्रिल १९४६ मध्ये विद्यार्थी वसतिगृह सुरू केले आहे. या वसतिगृहात आज रोजी  १२० एवढे विद्यार्थी निवासी राहातात. त्यानंतर पेठ येथे १ जुलै १९५७ रोजी डांगसेवा मंडळाने विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना केली. या वसतिगृहात ९६  इतके विद्यार्थी निवासी आहेत.

डांगसेवा मंडळाने नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील बाऱ्हे येथे जून १९६२ मध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी अशी दोन्ही वसतिगृहांची स्थापना केली आहे. आज या दोन्ही वसतिगृहात अनुक्रमे ६६ इतके विद्यार्थी आणि ३० इतक्या विद्यार्थिनी निवासी राहतात.[१८] या वसतिगृहाच्या

माध्यमातून आदिवासी दुर्गम भागातील दीनदुबळयांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली आहे. अशिक्षित, मागासलेल्या अज्ञानी व आदिवासी जनतेच्या जीवनोध्दारासाठी मार्ग दाखविला आहे.

## माध्यमिक विद्यालये

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भाग दुर्गम आहे. या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण मिळावे याकरीता डांगसेवा मंडळाने बागलाण, कळवण, पेठ, सुरगाणा तालुक्यात माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली आहे. पेठ तालुक्याच्या ठिकाणी परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी १ जून १९५८ रोजी जनता विद्यालय, पेठ या शाखेची स्थापना केली. या विद्यालयातून १३७८ एवढे विद्यार्थी आज रोजी शिक्षण घेत आहेत. तद्नंतर कळवण तालुक्यातील अभोणा येथे १ जून १९६२ रोजी जनता विद्यालय, अभोणा या शाखेची स्थापना केली. या विद्यालयाची इमारत अभोणा गावाच्या जवळ असून तेथे सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. तेथे १५२२ इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यानंतर बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे २२ जून १९६३ रोजी जनता विद्यालय, मुल्हेर हे विद्यालय सुरू केले. या विद्यालयात आज ११३४ रोजी इतक्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची भूक भागवली जात आहे. इ. स. १९७६ मध्ये सुरगाणा तालुक्यातील बाऱ्हे या दुर्गम आदिवासी व कळवण तालुक्यातील ओतूर या गावी माध्यमिक विद्यलायाची स्थापना करण्यात आली आहे.[११] अशा रितीने डांगसेवा मंडळाच्या माध्यमातून आदिवासी भागात शिक्षणाचा प्रसार करण्याकरीता सतत प्रयत्न केले गेले.

## माध्यमिक आश्रमशाळा

डांगसेवा मंडळाने आदिवासी विद्यार्थ्यांना निवासी राहण्याची व्यवस्था करून माध्यमिक आश्रमशाळाची स्थापना केली आहे. सुरूवातीला सुरगाणा तालुक्यातील अति दुर्गम असलेला भाग म्हणजे उंबरठाण होय. या ठिकाणी १६ जून १९८६ रोजी एकलव्य माध्यमिक आश्रमशाळा, उंबरठाण सुरू केले आहे. या ठिकाणच्या विद्यालयाच्या कायमस्वरूपी इमारतीचे अगदी साध्या पध्दतीने भक्कम इमारतीचे

बांधकाम पूर्ण केले आहे. आज या आश्रमशाळेत इतकी ९६१ विद्यार्थीसंख्या आहे. त्यानंतर दिंडोरी तालुक्यातील आंबेगण येथे आद्य आदिवासी सेवक ठक्कर बाप्पा यांच्या नावाने ८ जून १९९२ रोजी माध्यमिक आश्रमशाळा सुरू केली. या आश्रमशाळेत ३१३ विद्यार्थी शिक्षण घेतात. कळवण तालुक्यातील सुळे येथे सिध्देश्वर माध्यमिक आश्रमशाळा या नावाने १४ जून १९९३ रोजी माध्यमिक आश्रमशाळा सुरू केलेले आहे. आज रोजी या शाळेत ४५२ एवढे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

## प्राथमिक आश्रमशाळा

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात त्या काळात रस्ते, पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती. तेव्हा या परिस्थितीत तेथे शिक्षणाचा लवलेशही नव्हता. या भागात दादासाहेब बिडकर यांनी पुढाकार घेऊन डांगसेवा मंडळाच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणाचा प्रसार केला होता. सुरगाणा तालुक्यातील उंबरठाण येथे १६ ऑक्टोबर १९५४ रोजी एकलव्य प्राथमिक आश्रमशाळा सुरू केली आहे. या आश्रमशाळेत सुरूवातीला १५ मुले आणि ४ मुलींनी प्रवेश घेतला होता. या आश्रमशाळेच्या इमारतीकरीता उंबरठाण येथील चंद्रा भगत नावाच्या व्यक्तिने १ एकर जमीन दान दिली होती. त्या जागेवर डांगसेवा मंडळाने आश्रमशाळेची इमारत उभारली आहे.[१००] त्यानंतर दिंडोरी तालुक्यातील आंबेगण येथे १ जानेवारी १९५९ रोजी ठक्कर बाप्पा यांच्या नावाने प्राथमिक आश्रमशाळा सुरू केली आहे.[१०१] आज या शाळेतून ३१३ एवढया विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था झालेली आहे. तद्नंतर सुरगाणा तालुक्यातील कुकुडणे येथे १ जून १९६४ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू ही प्राथमिक आश्रमशाळा सुरू केली. पुढील काळात या शाळेच्या इमारतीच्या बांधकामाकरीता शासनाकडून अनुदान मिळवून इमारतीचे बांधकाम पूर्ण केले आहे.[१०२] कळवण तालुक्यातील सुळे येथे सिध्देश्वर प्राथमिक आश्रमशाळा १ जून १९६६ रोजी सुरू केली. या शाळेत सुरूवातीला विद्यार्थीसंख्या फारच कमी होती. पुढील काळात विद्यार्थीसंख्या वाढत गेल्याने आज ४५२ एवढे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तद्नंतर सुरगाणा तालुक्यातील दुर्गम भागात गिरजादेवी प्राथमिक आश्रमशाळा, शिंदे (दिगर) येथे १ जून १९६६ रोजी स्थापन केली. प्रारंभीच्या काळात या शाळेत

विद्यार्थीसंख्या २६८ इतकी होती. परंतु या परिसरातील जनतेला जसजसे शिक्षणाचे महत्त्व लक्षात येत गेले तसतशी येथील विद्यार्थीसंख्या वाढत गेली. या परिसरातील जनतेला ज्ञानाची गरज लक्षात आली आहे. त्यामुळे या परिसरातील जनतेचा शिक्षणाकडे ओढा वाढलेला दिसून येतो. डांगसेवा मंडळाने १ जून १९९१ रोजी नाशिक जिल्हयातील दिंडोरी तालुक्यातील वारे आणि बागलाण तालुक्यातील धांद्रीपाडा या दोन प्राथमिक आश्रमशाळा सुरू केलेल्या आहेत.[१०३]

## कनिष्ठ महाविद्यालये

डांगसेवा मंडळाने बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे १ जुलै १९७१ रोजी जनता कनिष्ठ महाविद्यालय सुरू केले. त्यानंतर कळवण तालुक्यातील अभोणा येथे जनता कनिष्ठ महाविद्यालय २१ जून १९७३ रोजी सुरू केले. आज या कनिष्ठ महाविद्यालयातून ११५ एवढे आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेतात.[१०४] या कनिष्ठ महाविद्यालयामुळे या परिसरातील उच्च माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय झाली आहे.

## महाविद्यालये

आदिवासी भागात असलेली जनता आपल्या मुलांचे उच्च माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे दूरवर शहरी भागात पुढील शिक्षणासाठी आपल्या मुलांना पाठवत नव्हती. तेव्हा ही परिस्थिती लक्षात आल्यानंतर डांगसेवा मंडळाने या विद्यार्थ्यांची पुढील शिक्षणाची गरज विचारात घेऊन पेठ या तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी १ जुले १९९३ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय सुरू केलेले आहे. या महाविद्यालयातून आज विद्यार्थी पदवी वर्गाचे शिक्षण घेत आहे. त्यानंतर कळवण तालुक्यातील अभोणा येथे १ जून १९९७ रोजी कला महाविद्यालय, अभोणा तसेच १५ जून २०१२ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय उंबरठाण, ता. सुरगाणा हे पदवी वर्गाचे शिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले आहे.[१०५] या महाविद्यालयामुळे आजूबाजूच्या परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या पदवी शिक्षणाची सोय झाली आहे. आज या महाविद्यालयातून सुमारे १८३६ विद्यार्थी पदवीचे शिक्षण घेत आहेत.

या महाविद्यालयात काही विषयांचे पदव्युत्तर शिक्षण देणारे काही विभाग सुरू करण्यात आले आहेत.

अशा रीतीने डांगसेवा मंडळाने आदिवासी भागात उच्च शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचविली आहे. अज्ञानी, अशिक्षित, दरिद्री आदिवासी समाजाचे जीवनमान सुधारण्याकरीता त्यांच्या आर्थिक परिस्थितीत वाढ होण्यासाठी या संस्थेने हातभार लावला आहे. या संस्थेतून शिक्षण घेतलेल्या अनेक व्यक्तिंनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे.

## नाशिक जिल्हा विधायक कार्यसमिती

खेडयापाडयातील मुलांना शहरात जाऊन शिक्षण घेणे अशक्य होते. त्यामुळे अर्धवट शिक्षण घेऊन खेडयातील मुले घरी राहून बेकार बनतात. त्यामुळे त्यांचे शिक्षणाचे उद्दिष्ट पूर्ण होत नव्हते. तेव्हा सरकारने शिक्षणाचा प्रसार करण्याकरीता शालेय संस्था सुरू करण्याच्या प्रोत्साहनाचा फायदा घेऊन खेडयापाडयात शाळा सुरू कराव्यात. शिक्षण फक्त ज्ञान प्राप्तीसाठी नसून ते माणसाची नैतिक पातळी वाढविण्याकरीता हेतू त्यात प्रकट व्हावा अशा उदात्त हेतूने पंडित धर्मा पाटील यांनी या संस्थेची स्थापना केली होती.

नाशिक जिल्हा विधायक कार्यसमितीची स्थापना सुरूवातीला ''बागलाण तालुका विधायक कार्य समिती'' या नांवाने सटाणा येथे १३ जून १९६४ रोजी केली होती. त्यांनी समाजाच्या हिताच्या दृष्टीने अभ्यासपूर्वक संस्थेची घटना तयार केली होती. त्यांना या कार्यात अनेक निष्ठावंत कार्यकर्ते मिळाले होते. त्यांनी या कार्यकर्त्यांना विधायक कार्यसमितीत सामील करून घेतले होते. त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांच्या शुभहस्ते ९ जून १९६८ रोजी सटाणा येथे संस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या जागेवर भूमीपूजन केले होते.[१०६] विधायक कार्यसमिती संस्थेच्या कार्यक्षेत्राचा विस्तार सुरूवातीच्या काळात बागलाण व कळवण या दोन तालुक्यापुरता मर्यादित होता. परंतु नंतरच्या काळात जिल्हयातील काही प्रमुख कार्यकर्त्यांनी संस्थेचा विस्तार करण्याची मागणी केली होती. तेव्हा त्यांनी या मागणीचा विचार करून तालुक्यापुरते मर्यादित असलेले क्षेत्र बदलून

जिल्हयाचे क्षेत्र केले होते. तसेच संस्थेस नाशिक जिल्हा विधायक कार्यसमिती या नावाने रूपांतरीत करण्यात आले.

संस्थेने आपल्या कार्याचा विस्तार करतांना सुरूवातीला ग्रामीण आणि अविकसित आदिवासी भागातील शैक्षणिक गरजांकडे विशेष लक्ष दिले होते. बागलाण तालुका विधायक कार्यसमिती या संस्थेने बागलाण तालुक्यातील कपालेश्वर या आदिवासी भागात एकलव्य आदिवासी वसतिगृह सुरू करून संस्थेच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली होती. या वसतिगृहात सुरूवातीच्या काळात ५० विद्यार्थी निवासी होते. या वसतिगृहाला लागून ७ एकर शेतजमीन मिळवली होती.[१०७] या शेतीतून भाताचे उत्पन्न घेऊन त्यातून सकस आहार योजना राबविली होती. या कामी त्यांना गंगाराम काळू जगताप व तुळशीराम शंकर ठाकरे यांनी सहकार्य केले होते.

कपालेश्वर येथे त्यांनी आश्रमशाळा सुरू केली आहे. या आश्रमशाळेकरीता त्यांनी पुरेशी जमीन खरेदी केली होती. त्या जागेवर आश्रमशाळेची इमारत बांधण्यासाठी १५ नोव्हेंबर १९६८ रोजी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन समाजकल्याण मंत्री भास्कर यांचे हस्ते भूमीपूजन केले होते.[१०८]

## विधायक कार्यसमितीचा शैक्षणिक विस्तार

शहरी भागात माध्यमिक विद्यालयाच्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध होतात. त्याप्रमाणे खेडयापाडयात या सोयी मिळत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना दूरवर पायी शिक्षणासाठी जावे लागते. विद्यार्थीनी तर शिक्षण अर्धवट सोडून देतात. या सर्व गोष्टींचा विचार करून विधायक कार्यसमितीने अनेक अडचणींवर मात करुन बागलाण, कळवण व दिंडोरी या आदिवासी भागात माध्यमिक विद्यालये स्थापन केली आहेत. त्या परिसरातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना गावात किंवा गावाच्या अगदी जवळच्या गावात माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली आहे.

नाशिक जिल्हा विधायक कार्यसमितीने इ. स. मध्ये बागलाण तालुक्यातील जोरण या गावी जनता विद्यालय, जोरण हे विद्यालय सुरू केले होते. या विद्यालयात त्यांनी सुरूवातीला इ. ८ वी चा वर्ग सुरू केला त्यावेळी तेथे इतकी विद्यार्थीसंख्या होती. आज येथे इ. १२वी पर्यंतचे वर्ग आहेत. येथून ५०० इतके विद्यार्थी शिक्षण घेत

आहेत.[१०९] इ. स. १९६० मध्ये बागलाण तालुक्यातील मेशी या बहुजन समाजाची वसती असलेल्या गावात ''जनता विद्यालय'' नावाने विद्यालय सुरू केले. या विद्यालयात इ. ८ वी च्या वर्गात पहिल्या वर्षी ३५ इतकी विद्यार्थीसंख्या होती. पुढे वर्ग व विद्यार्थीसंख्या वाढत गेले. तेव्हा विद्यालयाची इमारत बांधणेकरीता गावातील ग्रामस्थांनी गावठाणाची जागा दिली. त्या जागेवर संस्थेने वर्ग खोल्यांचे बांधकाम केले आहे. येथे कनिष्ठ महाविद्यालय आहे. येथील आजची ३०४ इतकी विद्यार्थीसंख्या आहे. बागलाण तालुक्यातील अजमीर सौंदाणे या गावात इ. स. मध्ये विधायक कार्यसमितीने इ. ८ वी चा वर्ग सुरू करून विद्यालयाची स्थापना केली. विद्यालयात आज ३५० एवढे विद्यार्थी शिकत आहेत.

बागलाण तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण सटाणा या गावापासून ९ कि. मी. अंतरावर आराई हे बहुजन समाजाची लोकसंख्या असलेले गाव आहे. या गावात कर्मवीर भाऊसाहेब हिरे विद्यालय इ. स. मध्ये सुरू केले. या विद्यालयात पहिल्यांदा इ. ८ वी चा वर्ग सुरू केला होता. त्यावेळी २८ विद्यार्थी होते. पुढे वर्ग व विद्यार्थीसंख्या वाढत गेली. त्यातून विद्यालयाचा विकास होत गेला. बागलाण तालुक्यातील खर्डे येथे इ. स. मध्ये ''इंदिरा गांधी'' यांच्या नावाने विद्यालय सुरू केले. आज येथे २४० इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यानंतर बागलाण तालुक्यात असलेल्या निताणे या गावात ''यशवंतराव चव्हाण'' विद्यालय सुरू केले. संस्थेने सुरूवातीला इ. ८ वी चा वर्ग सुरू केला. पुढे इ. १० वी पर्यंतच्या वर्गांची वाढ केली.

अशा प्रकारे नाशिक जिल्ह्यातील विविध शिक्षण महर्षींनी वंचितांना शिक्षणाची प्रवेशद्वारे खुली करुन दिली.[११०] आज नाशिक जिल्ह्यात वंचित समाजातील किमान काही हजार तरुण उच्च शिक्षित होऊन स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासनामध्ये कार्यरत आहेत. शैक्षणिक परिवर्तन होण्यासाठी शिक्षण महर्षींचा जसा हातभार लागला. तसाच हातभार थोर साहित्यीक व कृतीशील समाजसुधारकांचाही लाभला आहे. प्रस्तुत प्रबंधांच्या सहाव्या प्रकरणात आपण समाजसुधारकांनी व साहित्यकांनी वंचित समाजासाठी दिलेल्या योगदानाची चर्चा करणार आहोत.

## संदर्भ व तळटीपा

१. शैलजा देवगांवकर, *आदिवासी जीवन आणि संस्कृती*, नागपूर, १९८९.

२. बाबुराव पवार, *सोनहिरा*, नाशिक, मार्च, १९९८.

३. वामन कुलकर्णी, *समाजाचे दीपस्तंभ,* अजवा विठठल पाटील, सटाणा, १९५५.

४. कित्ता

५. वि. शिरवाडकर (संपा.),*जीवनगंगा*, नाशिक, १९६४.

६. सुधीर फडके, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य,* नाशिक, आवृत्ती प्रथम, जुलै १९७४.

७. बाबुराव पवार, *सोनहिरा*, नाशिक, मार्च, १९९८.

८. वि. वा. शिरवाडकर (संपा.), *जीवनगंगा*, नाशिक, १९६४.

९. सुधीर फडके, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य,* नाशिक, जुलै १९७४.

१०. कित्ता

११. बाबुराव पवार, *सोनहिरा*, नाशिक, मार्च, १९९८.

१२. कित्ता

१३. मालोजीराव मोगल (शब्दां. सोनवणे), *मोगलपर्व*, नाशिक, जुलै २०११.

१४. अभिमन्यू सूर्यवंशी, *आदिवासींचा विकास सूर्य,* पुणे, २०१३.

१५. पुंजाबाबा आव्हाड, स्वातंत्र्याच्या रणधुमाळीतून इथपर्यंत

१६. मालोजीराव मोगल (शब्दां. सोनवणे), *मोगलपर्व*, नाशिक, जुलै २०११, पृ. २७३.

१७. बाबुराव पवार, *सोनहिरा*, नाशिक, मार्च, १९९८.

१८. मालोजीराव मोगल (शब्दां. सोनवणे), *मोगलपर्व*, नाशिक, जुलै २०११.

१९. बाबुराव पवार, *सोनहिरा*, नाशिक, मार्च, १९९८.

२०. आर. भामरे व साळुंके वाय. एम. (संपा.), *विचारवेध*, नाशिक, २००४.

२१. तुकाराम दिघोळे, *तहानलेली माती अन् विकासाची गती*, नाशिक, फेब्रुवारी २०१५.

२२. सुधीर फडके, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य,* नाशिक, जुलै १९७४. .

२३. तुकाराम दिघोळे, तहानलेली माती अन् विकासाची गती, नाशिक, फेब्रुवारी २०१५.

२४. कित्ता पृ.१०५ ते १०८

२५. अभिमन्यू सूर्यवंशी, *आदिवासींचा विकास सूर्य*, पुणे, २०१३, पृ. ६४

२६. ज. जगताप, *अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचा इतिहास*, गेली २५ अधिवेशने पृ. ११५,११८

२७. सुधीर फडके, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य,* नाशिक, जुलै १९७४, पृ. २६-२७

२८. शं. क. कापडणीस (संपा.), *नामस्मृती स्मृतीग्रंथ*, नाशिक, जुलै २०१२, पृ. २५२

२९. सुधीर फडके, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य,* नाशिक, जुलै १९७४, पृ.२७

३०. वसंत पवार व इतर (संपा.), *अमृतकुंभ,* नाशिक १९१४ ते २०१४, पृ.१

३१. सुधीर फडके, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य,* नाशिक, जुलै १९७४, पृ. ३०

३२. भगवंतराव पालेकर, *उदोजी मराठा वसतीगृहाचा पुरूषार्थ सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ* १९६४-६५, पृ. १६४.

३३. वसंत पवार व इतर (संपा.), *अमृतकुंभ,* नाशिक १९१४ ते २०१४, पृ. ४ ते ७.

३४. वामन कुलकर्णी, *समाजाचे दीपस्तंभ,* सटाणा, १९५५, पृ. ७५.

३५. शं. क. कापडणीस (संपा.), *नामस्मृती स्मृतीग्रंथ,* नाशिक, जुलै २०१२,पृ.५१.

३६. सुधीर फडके, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य,* नाशिक, जुलै १९७४, पृ. ६१-६२.

३७. मालोजीराव मोगल (शब्दां. सोनवणे), *मोगल पर्व*, नाशिक, जुलै २०११, पृ. १६७.

३८. सुधीर फडके, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल आणि कार्य,* नाशिक, जुलै १९७४, पृ. ६४.

३९. शं. क. कापडणीस (संपा.), *नामस्मृती स्मृतीग्रंथ*, नाशिक, जुलै २०१२, पृ.१४९.

४०. बाबुराव पवार, *सोनहिरा,* नाशिक मार्च, १९९८, पृ. ८३.

४१. कापडणीस शं. क. (संपा.), *नामस्मृती स्मृतीग्रंथ*, नाशिक, जुलै २०१२, पृ. १४९ ते १७१.

४२. *दैनिक गावकरी*, नाशिक जिल्हा आवृत्ती, दि. १५ ऑगस्ट २०११.

४३. निलिमा पवार (संपा.), *शतपर्व*, नाशिक, १९१४ ते २०१४, पृ. ९६.

४४. मालोजीराव मोगल (शब्दां. सोनवणे), *मोगल पर्व*, नाशिक, जुलै २०११ पृ. १६७

४५. कित्ता पृ.१५१

४६. कित्ता पृ.१३०

४७. वसंत पवार व इतर (संपा.),*अमृतकुंभ,* नाशिक १९१४ ते २०१४, पृ. ०५.

४८. शं. क. कापडणीस, *नामस्मृती स्मृतीग्रंथ*, नाशिक,जुलै २०१२, पृ. १८८.

४९. *दैनिक गावकरी*, नाशिक, आवृत्ती दि. १५ ऑगस्ट २०११.

५०. मालोजीराव मोगल (शब्दां.सोनवणे), मोगल पर्व, नाशिक, जुलै २०११, पृ. १७०.

५१. नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज ५ वा अहवाल,१९६९ पृ. ७०.

५२. शं. क. कापडणीस (संपा.), *नामस्मृती स्मृतीग्रंथ*, नाशिक, जुलै २०१२, पृ. ६८.

५३. लिला पाटील, *आजचे शिक्षण, आजच्या समस्या*, पाचवा *वार्षिक अहवाल*, नाशिक १९७०, पृ. ९७.

५४. मालोजीराव मोगल (शब्दा. सोनवणे), मोगल पर्व, नाशिक, जुलै २०११.पृ. १३०

५५. वसंतराव पवार व इतर (संपा.), अमृतकुंभ, नाशिक १९१४ ते २०१४, पृ. ०५.

५६. लिला पाटील, *आजचे शिक्षण, आजच्या समस्या*, पाचवा वार्षिक अहवाल, नाशिक १९७०, पृ.१०५.

५७. कापडणीस शं. क. (संपा.), *नामस्मृती स्मृतीग्रंथ*, नाशिक,जुलै २०१२, पृ. २५३.

५८. मालोजीराव मोगल (शब्दां. सोनवणे), *मोगल पर्व*, नाशिक, जुलै २०११, पृ.१६७.

५९. कित्ता, पृ. १३६.

६०. वसंतराव पवार व इतर (संपा.), *अमृतकुंभ*, नाशिक १९१४ ते २०१४, पृ. ९ ते १०.

६१. कित्ता पृ. १०.

६२. कित्ता पृ.११.

६३. मालोजीराव मोगल (शब्दां. सोनवणे), *मोगल पर्व*, नाशिक, जुलै २०११, पृ.१३६.

६४. *दैनिक गांवकरी*, नाशिक जिल्हा आवृत्ती, दि. १५ ऑगस्ट २०११

६५. वसंतराव पवार व इतर (संपा.), अमृतकुंभ, नाशिक १९१४ ते २०१४, पृ. १२.

६६. *दैनिक गांवकरी*, नाशिक जिल्हा आवृत्ती, दि. १५ ऑगस्ट २०११.

६७. मालोजीराव मोगल (शब्दां. सोनवणे), *मोगल पर्व*, नाशिक, जुलै २०११, पृ. १७२-१७३.

६८. शंकर बोऱ्हाडे, *शोध डॉ. वसंतराव पवारांचा*, नाशिक, सप्टेंबर २०११, पृ. १०८.

६९. मालोजीराव मोगल (शब्दां. सोनवणे), *मोगल पर्व*, नाशिक, जुलै २०११, पृ. १७२

७०. कित्ता पृ. १६९.

७१. शंकर बोऱ्हाडे, *शोध डॉ. वसंतराव पवारांचा*, नाशिक, सप्टेंबर २०११, पृ. ७३, ११९ ते १२०.

७२. बी. व्ही. पाटील, *१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास*, पृ. ७०.

७३. गोविंद गारे, *आदिवासी जीवनाचे शिल्पकार*, औरंगाबाद, १९९७, पृ. १००.

७४. भाऊसाहेब खामकर, *कर्मयोगी शिक्षण महर्षी भाऊसाहेब हिरे*, पुणे, पृ. ९९.

७५. उत्तमराव पाटील, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, पृ. १९५३-५४, पृ. ०४.

७६. उत्तमराव शामराव, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, पृ. १९७६-७७, पृ. ०३.

७७. मंगलदास भावसार, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९५४-५५, पृ. २.

७८. बाबुराव पवार, *सोनहिरा*, नाशिक, मार्च, १९९८, पृ. ८८.

७९. उत्तमराव पाटील, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९५५-५६, पृ. ०१.

८०. श्रीकांत वाघ (संपा.), सत्याग्रह ज्ञानमहर्षी तपस्वी, पृ.०९.

८१. व. रा. नागपुरे, महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास १९६०-६५, पृ.८१.

८२. उत्तमराव पाटील, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*,१९७०-७१, पृ. ७.

८३. उत्तमराव पाटील, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९८०-८१, पृ. ३९.

८४. व. रा. नागपुरे (प्रकाशक ), *महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास*, पृ. १०.

८५. उत्तमराव पाटील, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९८० ते ८१, १९६० ते ६१, ०४ - ०३

८६. मु. दि. सौकुदे, खाजगी आश्रमशाळा *मार्गदर्शिका*, पृ. ०४.

८७. मंगलदास भावसार, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९५४-५५, पृ. ०२.

८८. उत्तमराव पाटील, आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल, १९८१ ते ८२, १९६० ते ६१, पृ. ५.

८९. प्रशांत हिरे, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९९९-२००७, पृ. २९.

९०. व. रा. नागपुरे, *महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास*, १९७०-१९८५, पृ. ४४-४५

९१. उत्तमराव पाटील, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९६४-६५, १९७०-७१, पृ. ०३.

९२. उत्तमराव पाटील, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९८० ते ८१, पृ. १३

९३. प्रशांत हिरे, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९९० ते १९९१, पृ. ०९

९४. प्रशांत हिरे, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९९९ ते २०००, पृ. ३०.

९५. मु. दि. सौकुदे, *शासन निर्णय व परिपत्रके संग्रह*, पृ. ८२.

९६. उत्तमराव पाटील, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९८० ते ८१, पृ. १७.

९७. प्रशांत हिरे, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९९०-१९९१.

९८. प्रशांत हिरे, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९९९-२०००.

९९. प्रशांत हिरे, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९९९-२०००, पृ. ३१.

१००. पंडीतराव नेरे, *सामाजिक स्थित्यंतरे आणि वसतिगृहाचे योगदान*, पृ. ३ ते १९.

१०१. मंगलदार भावसार, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९५५ ते १९५६, पृ. ०१.

१०२. उत्तमराव पाटील, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९८० ते ८१, पृ. २५.

१०३. प्रशांत हिरे, *आदिवासी सेवा समिती वार्षिक अहवाल*, १९९९-२०००, पृ. ३३ ते ३६.

१०४. सरल धारणकर, *आदिवासी सेवक दादा बिडकर*, पुणे, २००५, पृ. ३७ ते ३८.

१०५. सरल धारणकर, *दादासाहेब बिडकर वसाः आदिवासी सेवेचा*, पुणे, २०१२, पृ. २८-२९.

१०६. सरल धारणकर, *आदिवासी सेवक दादा बिडकर*, २००५, पृ. ५०.

१०७. सरल धारणकर, *दादासाहेब बिडकर वसा : आदिवासी सेवेचा*, पुणे, २०१२, पृ. ३७ ते ३८.

१०८. सरल धारणकर, *आदिवासी सेवक दादा बिडकर*, पुणे,२००५, पृ. ५७.

१०९. सरल धारणकर, *दादासाहेब बिडकर वसाः आदिवासी सेवेचा*, पुणे, २०१२, पृ. ७२.

११०. सरल धारणकर, *आदिवासी सेवक दादा बिडकर*, पुणे, २००५, पृ. ७६ ते ७९.

## प्रकरण सहावे

# साहित्यिक व सुधारकांचे योगदान

वंचितांचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाचे चित्रण करण्याचे कार्य मराठी साहित्यातील शाहिरी वाद्य हा एक प्रकार आहे. या शाहीरी वाद्याची परंपरा मराठी या लोकभाषेइतकी जुनी आहे. यातील लावणी, पोवाडा हा त्यातील प्रकार आहे. शाहीरांनी जी लोकगीते गाईली त्यांना 'पोवाडा' असे म्हणतात. 'पोवाडा' या शब्दाची उत्पत्ती कन्नड भाषेतील 'पवाड' या शब्दापासून झाली असावी. पाडू हा कानडी तामिळ भाषेतील शब्द आहे. पा आणि ड यांच्यामध्ये व येऊन पावडू हा शब्द तयार झाला. असे पत्र श. ब. जोशी यांनी मऱ्हाटी संस्कृती या ग्रंथात मांडले आहे. त्याचा अर्थ गीत गाणे असा आहे. गंगाधर मोरजे म्हणतात, हा शब्द संस्कृतमधून आला असून 'पोवाडा' हा एक काव्य प्रकार आहे. पोवाडा गाणाऱ्याला शाहीर असे म्हणतात.[१]

पोवाडा हे बहुजन समाजाला जागृत व उत्तेजित करणारे गीत आहे. समाजात जे बदल झाले ते शाहीरांनी आपल्या वाद्याने आपल्या काव्यातून व्यक्त केलेले दिसून येतात. शाहीरांनी सुरूवातीच्या काळात माणूस, माणसाचे जीव, मानवता, समाजाच्या आणि जनतेच्या भाव भावनांची मांडणी केली आहे. त्यांनी समाजातील मानवाच्या व्यथा बोलक्या केल्या आहेत. समाजातील अनिष्ट प्रवृत्तीचे विडंबन केले आहे.

शाहीर पिराजीराव सरनाईक यांनी येथील शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे वर्णन करतांना म्हटले,

''सत्यशोधक समाज स्थापना । केल्यावर जाणा ।।
गांवोगावात । लागल्या लहान मोठया सभा भरण्यास ।।
वऱ्हाड, खानदेश, सोलापूरात । नाशिक ।।
नगर, सातारा वगैरे आसपास । शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती ।।

बिघडली किती । देत माहिती ।।

प्राथमिक शिक्षण आले सर्वांस ।

एकदेव आहे जाणून तत्त्वास । करावी भक्ती दलाल नको त्यास ।।[२]

वंचित घटकातील शेतकरी वर्गाच्या सावकार यांच्याकडून होणाऱ्या पिळवणूकीतून झालेल्या परिस्थितीविरोधी महात्मा ज्योतिबा फुले, सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून विरोध केला होता. त्यांनी जागृती करीता सभा घेतल्या होत्या. याचे वर्णन पोवाडयातून केले आहे.

शाहीर अमर शेख यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांच वर्णन पुढील शाहीरीतून केले आहे.

डांगरी शेत माझंग मी बेनू किती,

कवळाच भार बाई गं घेऊन चढाव किती ।।

आडाच पानी बाई पानी भराव किती,

घरात तान्हा माझा गं तान्हा रडल किती,

तान्हाचं रड ऐकून पान्हा येईल किती ।।१।।

आलं आलं बरीस जमीन नांगरून

उभ पिकाचे सोन्यानं फुलून

पर एक मेला सावकार ठोला

हिसकून घेतो बाई सोन्याचा गोळा

अस उपाशी राहून ग, आम्ही मराव किती ।।२।।

महागाईन बाई घातला हौदस

गळा आवळी बाई सावकारी फास

कुणाच देऊ आणि कुणाच ठेवू

अशीच वासीवर वर्स जातील किती ।।३।।

कवळांच भारंबाई ग घेऊन चडाव किती

तान्हाच रड ऐकूण पान्हा येईल किती ।।४।।[३]

या शाहीरीतून समाजातील शेतकरी वर्गाची व्यथा मांडली आहे. शेतकरी शेत तयार करून पीक लावतो. त्याचे उत्पन्न घेतो, परंतु आपला प्रपंच चालविण्यासाठी सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडण्यासाठी आलेले सर्व उत्पन्न देऊन टाकतो. तसेच वाढती महागाई यामुळे दैनंदिन गरजा भागविणे सुध्दा शक्य होत नाही. तेव्हा अशा परिस्थितीत जीवन कसे जगावे याचे विदारक कथन ते करतात.

शाहीर विठ्ठल उमप यांनी पावसाळयात जर कदाचित अति वृष्टी झाली तर पुर येतो. त्या पुरामुळे सर्वसामान्य मानवी जीवनाची जी परिस्थिती निर्माण होते त्या परिस्थितीचे वर्णन करतांना म्हणतात,

पावसानं घातल थैमान
वादळाच उठल तुफान
पूर निघाला तुडवित रान
झाडं टाकीली उखडून त्यात
कृष्णा आईच गोजिरवाण
बाळराज ओढीलं की तान्ह
कितीक म्हातारी निजवान नेली
वाहून या पाण्यानं
केली पुरात की धुळधाण
गांवोगांव झाल स्मशान ।। [४]

साधारणपणे समाजातील गरीब लोक हे गावाच्या मुख्य वस्तीच्या आजुबाजूला वस्ती करून राहतात. त्यांची घरे ही साधी असतात. नदी किनारी वगैरे ठिकाणी त्यांची वस्ती वसलेली असते. तेव्हा अति वृष्टी झाल्यामुळे नदीला पूर येतो. या पुरात अनेक व्यक्तींचा जीव जातो. या संकटाचे वर्णन त्यांनी केलेले आहे.

शाहीर अमर शेख यांनी कामगार वर्गाच्या समस्या सोडविण्याकरीता त्यांना एकजूट करण्याचा सल्ला खालील शहीरीतून दिलेला आहे.

ही आग भुकेची जळते आमच्या पोटी ।
मागतो खावया एकच आम्ही रोटी ।।

शेवटी तार स्वराने म्हणत होता

रणशिंग दोस्तहो फुका एकजुटचे ।।

हया निशान आपल्या खांदयावर क्रांतीचे ।।

वाजवा तुतारी कामकरी जनतेची ।

द्या सनद जगाला मिळवून माणुसकीची ।।[५]

यातून त्यांमगार जनतेच्या दुःखाचे वर्णन केलेले आहे. त्यांनी कामगारांना शोषकांच्या विरोधात एकजुट करण्याचे आवाहन केले आहे. आपल्या कष्टाचा मोबदला मिळविण्यासाठी एकत्र येण्याची आवश्यकता पटवून दिली आहे.

शाहीर लहरी हैदर यांनी येथील हस्त व कुटीर उद्योग मोडकळीस गेल्यानंतर बेकार झालेल्या कारागिरांचे वर्णन केले आहे.

देशी धंदे लयास गेले ।।

बेकार लोक झाले ।। शिकले सवरलेले ।।

नोकरीच्या मागे लागलो फार ।।

एक जागा खाली पाचशे उमदवार ।।

नोकऱ्या तरी कशा कुठे मिळणार ।।[६]

येथील उद्योगधंदे आधुनिकरणामुळे बंद पडले. तेथे काम करणारा बेकार झाला. त्यामुळे तो आपल्या उपजीविकेकरीता नोकरी शोधू लागला. तेथेही गर्दी वाढली आहे. त्यामुळे उपजीविका भागविणे अवघड झाले आहे.

शाहीर आत्माराम पाटील यांनी कारखान्यातील कामगार वर्गाचे मालक शोषण करतो. तेव्हा त्याच्या विरोधात कामगार वर्ग संप पुकारतो याचे वर्णन त्यांनी केले आहे.

खाऊन कोटीवर नफा

बघा मालकांच्या थापा

कशा गिरण्या कप गप्पा

आता बंद पडती आता

सांचे गुंडाळून मराठयांना पिरगाळून

उपऱ्यांना वेटाळून, करतील नवी भरती ।।[७]

त्या काळातील कारखाना मालकांनी कामगारांचे शोषण करून भरपूर नफा कमविला होता. कामगारांनी आपल्या न्याय मोबदल्याची मागणी केली त्यावेळी त्यांनी गिरण्या बंद केल्या होत्या. तसेच इतरांच्या आश्रयास जाऊन कामगार वर्गाची नवीन भरती केली होती. याचे जिवंत चित्रण त्यांनी मांडले आहे. तसेच त्यांनी कामगारांना जागृत करण्यासाठी खालील पोवाडयातून म्हटले,

किर्ती कामगार संपाची टिकवा
जोर धरा नि सरकारला वाकवा ।।
कुणी उरू नका । माघ फिरू नका । लढा हरू नका ।
नीट बैलाची गाडी रे वाकवा ।
जशी सुरुंगात लावल्यात वती ।
तशी गोळीबाराला द्या छाती ।
जसा सुरास्त घुसतो जाळ ।
तशी फुरास्त न्या क्रांतीमाळ ।
मग भगदड पडल । त्यात काँग्रेस दडल । तुमचा झेंडा चढल ।
पाणी पाजून पाणी लागल दाखवा । जोर धरा नि सरकारला वाकवा ।।[८]

वरील शाहीरीतून कामगार वर्गाने पुकारलेल्या संपातून आपली मागणी मान्य होईपर्यंत मागे हटू नका. या विरोधी धीटपणे लढा देण्याचा सल्ला देतात असे केल्यास मालक वर्गाला पाठींबा देणाऱ्या शासनाला जाग येईल. त्यातून कामगार वर्गाच्या मागण्या पूर्ण होतील असे पटवून देतात.

शाहीर डॉ. अनीज नदाफ यांनीही कष्टकरी जनतेच्या समस्याचे वर्णन करतांना म्हणतात,

''धन्यास धतुरा, चोरास मलिदा
रद्य देऊन शान, रूमण्यान बडवा
एकजुटीत जिंदगी तरली रं खपून
खपून शान जिंदगी सरली रं ''[९]

यातून कष्टकऱ्यांना अत्यंत कमी मोबदला आणि मालकास भरपूर नफा मिळतो. तेव्हा अशा प्रथेला विरोध करण्यास सांगतात. असे जर नाही केले तर आपले आयुष्य असेच जाईल असे असा उपदेश ते करतात.

शाहीर पिराजीराव सरनाईक यांनी येथील समाज व्यवस्थेत असलेल्या जाती पातीच्या प्रथेविरोधी चळवळीचे वर्णन करतांना म्हणतात,

मतलंबी अंधश्रध्देने । बुडाला देश हा आमचा ।।धृ।।

डॉक्टर आंबेडकरांनी । धर्मातील भेद पाहूनी ।

काढीला मार्ग पहात्यांनी धर्मांतर करण्याचा ।।१।।

जोतिरावांची तत्वे ती । बिंबवून हृदयी पूर्ती ।

हरिजन प्रेमे कवटाळा धर । अभिमान हो त्यांचा ।।२।।

भेदभाव सर्व सोडोनि । सुमंगल दिन दावूनी ।

शांतता स्वर्गी तो आत्मा महात्मा जोतिरावाचा ।।३।।

हिंदु धर्माला भेदाभेदाचे बंड । झाले प्रचंड । निव्वळ धोतांड ।

सिध्द करण्यात । सामाजिक, आर्थिक, शिक्षण देयात ।

सत्य समाजाने धडाडीचे पाऊल टाकीला ।।

जागृती केली, दिली जाणीव आमची आम्हांला ।

याच सत्य समाजाचा तो । पोवाडा गातो । ठेवा ध्यानाला ।[१०]

समाजात असलेल्या जातीपातीच्या बंधनाच्या विरोधात आंबेडकरांनी चळवळ केली होती. त्यांनी अस्पृश्य जातीचा त्याग करून बौध्द धर्माचा स्वीकार केला होता. याचे वर्णन त्यांनी केले आहे.

शाहीर विठठ्ल उमप यांनी भेदाभेद पध्दती विरोधात म्हटले :-

''जाती पातीची भिंत कशाला ।

माणूस म्हणारं या माणसाला ।

भिमरावाचा सांगण काय रं ।''[११]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती भेदाच्या रुढ प्रथेविरोधी जे विचार मांडले होते त्याचे वर्णन त्यांनी केले आहे.

शाहीर पिराजीराव सरनाईक समाजातील जाती प्रथेचे स्तोम वाढविण्यास वरील वर्गातील जनतेने कसा हातभार लावला आहे याबद्दल सांगतात -

समाजाची मुख्य कर्तव्ये । सांगतो आता परिसले ।।
दयावंत ईश्वराची । लेकरे ही सगळे त्याची ।।
मग कोणत्याही ती जाती या धर्माची ।।
समान असे समजावे हो ठेवा हृदयी जाणावे ।।१।।
आई जवळ जाण्याला । मध्यस्थी नको मुलाला ।
तसे परमेश्वराच्या आराधनेला ।
दलाल कशाला हवे हो स्वतःचे उरकावे ।।२।।
भिक्षुक शाहीने लुबाडण्याला ।
देवमुर्तीचा म्हणून पहा सांगती सकला ।
एकदेव समजावे हो सत्य हे माता मनोभावे ।।३।। [१२]

वरील शाहीरीतून ते सांगतात की, समाजातील सर्व जनता ही एकाच ईश्वराची आहेत. त्यामुळे सर्वांना समानतेने वागणूक देण्यात यावी. देवळात मुर्तीच्या दर्शनाकरीता कोणालाही आडकाठी नसावी. भट, भिक्षूक याची मंदिरातील मूर्तीच्या दर्शनासाठी असलेली बंधने नसावीत. सर्व समाजात हे तत्व अंगीकारण्यात यावे.

विठ्ठल उमप यांनी प्रचलित असलेल्या चालिरिती चुकीच्या कशा आहेत याची जाणीव करतांना म्हणतात -

''मोठया मनान चांगुलपणानं, कन्या देणार असावा,
खरा तो बाप समजून पाप हुंडा घेणार नसावा.
गरीब मजुराला शेतकऱ्याला खरी वाट दावणार असावा,
गावागावात, भावाभावात तंटा लावणार नसावा.
हिमतीनं भारी देशाला तारी शूरवीर दांडगा असावा.
आईला झोकणार बापाला ठोकणार, बायकांचा हंडगा नसावा.'' [१३]

वडीलांनी आपल्या मुलीचा विवाह करतांना चांगल्या वराची निवड करून द्यावी. तोवर हुंडा घेणारा नाही पाहिजे. तसेच तो आप-आपसात भांडणे-तंटे लाऊ

नयेत. पत्नीच्या विचारावर निर्णय घेऊ नये. आई वडीलांचा सांभाळ करावा. तेव्हाच देशाला खरी बळकटी प्राप्त होईल असा संदेश देतात.

आदिवासी भागात होता कुपोषण
सरकारला येते आठवण
मंत्र्यांना येते जाण
दौरा होतो लगोलग
होते खेडयांची पहाणी
विमाने आणि मोटार गाडयांनी
केल्या जातात घोषणा
जाहीर होतात योजना
दिली जाते थोडीशी मदत
केवळ येण्यासाठी फोटोत
फिरतो सहानुभूतिने हात पाठीवरून
लगेचच केले जाते प्रमाण
मदत वाटपासाठी सरकारच असत खात
पण त्यातलच कुणीतरी खात असत
होत नाही मदतीचे पूर्ण वाटप
पोहचायच्या आधीच संपून जाते आपोआप
जाहीर झालेल्या योजना राहतात कागदावर
आठवण होते पुन्हा कुपोषणाचा बळी गेल्यावर [१४]

कवी पुरूषोत्तम आगशे यांनी वरील कवितेतून आदिवासी भागातील बालकांचे सकस आहर न मिळाल्यामुळे जे कुपोषण होते त्याविषयी सरकारी पातळीवरून जी कार्यवाही केली जाते, या गोष्टीचे श्रेय आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी राजकीय पुढारी ज्या धोरणांचा स्वीकार करतात, तसेच मदत मिळण्याची वास्तव परिस्थिती कशी राबविण्यात येते याचे ज्वलंत चित्रण त्यांनी केले आहे.

आम्ही आदिवासी । पहिल रहिवाशी

पर जिंदगी अशी । बिन वारशी ।

आमची ज्याची मजुरी । त्याला अपूरी ।

पोरांना शाळेत टाकाव कसं?

शाळा दाराशी पर पोर ढोरांशी ।[१५]

वरील आदिवासी गीतातून त्याच्या जीवनाची सत्य परिस्थिती कथन केली आहे. आदिवासी लोक या देशातील पहिले रहिवाशी आहेत. परंतु आजही ते मुख्य प्रवाहापासून दूरवर आहेत. त्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन त्यांना त्यांच्या कामाचा पूर्ण मोबदला दिला जात नाही. त्याच्या मुलांकरीता शाळा आहे, पण मुल रानात गुर चारण्यासाठी जातात. अश सत्य परिस्थितीचे वर्णन केलेले आहे.

आम्ही शेताचं मजूर बारामाशी ।

आम्ही पिकवतो कणसरी सारी ।

आमच्या कुणब्याच्या कणग्याला उंदीर घुशी ।

अन आमचे घरा सदा एकादशी ।

आम्ही पिकवितो भात जातो मुंबई शहरात ।

आम्ही पोर घरात उपाशी ।[१६]

वरील गीतातून वर्षभर शेतावर कष्ट करणारा शेतकरी धान्य पिकवितो, परंतु सावकार कर्ज देणारा ते सर्व धान्य कर्जापायी घेऊन जातो. कष्ट करणारा मात्र अर्ध पोटी उपाशी राहतो. तर काही प्रमाणात धान्य हे कौटुंबिक इतर गरजा भागविण्या-करीता विकावे लागते. ही आर्थिक विषयता या गीतातून ठळकपणे दिसून येते.

## सत्यशोधकी जलसे/मेळे

महात्मा ज्योतिबा फुले यांनी इ. स. १९७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. सत्यशोधक समाजाच्या जलशाची सुरूवात इ. स. १८७३ च्या सुमारास झाली होती. जलशा हा शब्द अरबी भाषेतून आलेला आहे. सहजासहजी कुठेही केव्हाही सादर करता येईल असे फर्सिकल संगीत नाटक होय. बहुजन

समाजातील कामगारांनी बहुजन समाजाच्या प्रबोधनासाठी सादर केलेली कलाकृती म्हणजे जलशा होय.[१७]

महात्मा ज्योतिबा फुले यांनी सुरू केलेल्या या चळवळीला खतपाणी घालण्याचे काम राजर्षी शाहू महाराज यांनी केले. सत्यशोधक समाजाच्या जलशाची सुरूवात इ.स. १९१०-१९११ च्या सुमारास झाली होती. सत्यशोधक चळवळीत कार्य करणाऱ्या गेधे, जवळकर यांनी छत्रपती मेळा स्थापन केला होता. त्यांनी हातात डफ घेऊन गाणी, पोवाडे गायीले होते. त्यांनी महात्मा फुले यांचे सत्यशोधक विचार जनसामान्यापर्यंत पोहचविले होते.

''अरे आला छत्रपती मेळा
पळा भटांनो, पळा पळा''
''कुठेही भट आडवा आला
राज्याचाही निकाल होईल
जाईल नाशाला'' [१८]

अशा पदातून त्यांनी तत्कालीन समाजातील सर्वसामान्य जनतेला ब्राम्हण, पुरोहित यांच्या विरोधी बहुजन समाजातील मानवाच्या मनावर संमोहन केले होते. तसेच सत्यशोधक समाजाचे महात्म्य वर्णन करतांना म्हणतात -

''सत्यशोधकाची सभा । कैसी उगवली प्रभा ।। १ ।।
प्रभेच्या या उजेडात । घ्यावे सर्वांनी ज्ञानामृत ।। २ ।।
सत्यशोधक समाजा । कंटी सदा सत्य काज ।। ३ ।।
सत्यशोधक समाज । धुतीचा जिखी माज ।। ४ ।।
सत्यशोधक समाज । राखे सज्जनांची लाज ।। ५ ।।
शामा म्हणे हाची सत्य । त्यास भजा तुम्ही नित्य ।। ६ ।। [१९]

या शब्दात सत्यशोधक समाजाचे महात्म्य गौरवून शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेविषयी, जातीभेद, भाऊबंदकी, अंधश्रध्दा, मूर्तीपूजा विरोध, स्त्री शिक्षण सुधारणेची कळकळ त्यांनी वर्णन केली आहे.

नाशिक जिल्ह्यात सत्यशोधक समाजाचा जलसा पिंपळगांव (ब) येथील गणपत दादा मोरे व दिंडोरी तालुक्यातील रंभाजी पाटील यांनी सुरू केले होते. त्यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक जलसा प्रकल्प, नाशिक येथील सेंट जॉर्ज हायस्कूलमध्ये इयत्ता ६ वी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या रावसाहेब थोरात यांच्यावर झाला होता. त्यांनी याच काळात दत्ताजी भोसले, किर्ती वानराव निंबाळकर, गणपत दादा मोरे, आण्णासाहेब मुरकुटे यांच्या बरोबर बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्याच्या कार्यास वाहून घेतले होते. त्याच्यानंतर भाऊसाहेब हिरे, काकासाहेब वाघ यांनीही त्यात सहभाग घेतला होता.[२०] त्यांनी सत्यशोधक जलशातून पोवाडे, पदे, गाणी यांच्या माध्यमातून सत्यशोधक विचार बहुजन समाजात पोहचविले होते. त्यांनील जलसाच्या माध्यमातून बहुजन समाजातील अज्ञान, परंपरा, अंधश्रध्दा, पिळवणूक यांच्या विरोधात जृती केली होती. रावसाहेब थोरात यांनी तर श्री. उदोजी मराठा वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये सत्यशोधनाची, सत्य वर्तनाची निष्ठा निर्माण व्हावी यासाठी पत्रे लिहीली होती. त्यांच्या या पत्राचा ''बोधामृत'' नावाचा पत्रसंग्रह प्रसिध्द झाला आहे. या पत्रामधून त्यांनी कर्तव्य, रुढी, परंपरा, खोटया प्रतिष्ठेच्या कल्पना, अंधश्रध्दा यावर टिका केली आहे. सत्यशोधकी जलसा पद सुधारणांवर जोर देत असत.

''लहान थोरांनी शाळेत जावे
शिक्षण शिकुन मोठे व्हावे''

तसेच केशवपणाला विरोध करणारी पदेही गायीली होती.

आण्णा मी तुमची लाडकी
मला कशी करता हो बोडकी
तुम्ही सोडा तुमचा हटट
लावा माझा पाट

वरील पदातून सत्यशोधक जलसाने समाजातील केशवपणाच्या अनिष्ट प्रथेविरूध्द जनमनात जागृती करण्याचा प्रयत्न केला होता. अशा पध्दतीने जलसातून सत्यशोधक विचार तळागाळात बहुजनापर्यंत पोहचविला गेला. ब्राह्मण,

सावकार यांच्या उछपणाखाली हालाकीच्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या बहुजन समाजातील जनतेला विचार करावयास भाग पाडणे हे या जलसाचे उद्दिष्ट होते. याच जलसाच्या धरतीवनर आंबेडकरी जलसे तयार झाले होते.

नाशिक जिल्ह्यात आंबेडकरी संगीत जलसे स्थापन होण्याचे मुख्य कारण म्हणजे नाशिक येथे काळाराम मंदिर सत्याग्रह झाला. त्या सत्याग्रहाच्या काळात सत्याग्रह करणाऱ्या जनतेला मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नाशिक येथे सभा झाली होती. या सभेत त्यांनी दलित (अस्पृश्य) समाजातील तरूणांना सामाजिक कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या या आवाहनाला साथ म्हणून भिमराव कर्डक व त्यांच्या सहकार्यांनी नाशिक शहरातील येस्करवाडा येथे दि. २६ ऑक्टोबर १९३० रोजी ''नाशिक जिल्हा युवक संघ'' नांवाने संघाची स्थापना केली होती.[२१] त्यांनी या संघाटच्या माध्यमातून दलित (अस्पृश्य) समाजात असलेल्या चालीरिती बंद करण्यास हातभार लावला होता.

त्यानंतर त्यांनी निफाड तालुयातील चांदोरी येथील दादासाहेब नामदेव पगारे, देवधर सिताराम डांगळे (करंजवण), भिमराव धोंडीबा कर्डक (कसबे सुकेणे), बालाजी रामजी भालेराव (दापूर), माधवराव गंगाराम आहेर (नांदुर्डी) इत्यादी व्यक्तिंच्या मदतीने दि. १४ जानेवारी १९३१ रोजी ''नाशिक जिल्हा युवक संघ संगीत जलसा मंडळ'' स्थापन केले होते. त्यांच्या या मंडळाच्या जलसाचा पहिला प्रयोग दि. ४ फेब्रुवारी १९३१ रोजी चांदोरी या गांवी खंडोबाची यात्रा होती. त्या यात्रेत करण्यात आला होता.[२२] त्याच्या अगोदर भिमराव कर्डक हे इ.स. १९२२ मध्ये नाशिक शहरातील शाहू बोर्डींगमध्ये शिक्षण घेत होते. तेव्हा त्यांनी दलित (अस्पृश्य) जनतेला जागृत करण्यासाठी ''अस्पृश्य बांधवांनो, वडीलांची चाल सोडा'' हे कवन गायीले होते. यावरून त्यांनी दलित जाणिवेची कवने केली होती. त्यांनी आंबेडकरांच्या नांवाचा, कार्याचा, गुणांचा, विचारांचा, चळवळींचा प्रचार, प्रसार केला होता.

''जलसा मंडळ गोड गाणी गाती आनंदानी ।।

जिल्हा युवक संघ नाशिक जलसाकार ते कर्डक ।।

दादा मास्तर जोडी ठिक मावशी बालाजी गुणी ।।
जलसा केला की संगीत कवन जोडी नामांकित ।।
जनता केली की अंकीत ही मंडळी जुनी''।।[२३]

अशा पध्दतीची कवने जलसेकर म्हणत असत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांला आमच्या कुलदैवताला महात्मा ज्योतिबा फुल्यांला, छत्रपती शाहू महाराजांना'' वरील कवनातून जलसेकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पहीले वंदन केले आहे. अस्पृश्य समाजाचे दुःख, दैन्य, शोषन यांचे चित्रण करणारी कवने, कविता, गाणी, पोवाडे रचले जात होते. त्यांनी आपल्या जलशातून दलितांची अंतःकरणे जागविण्याचा प्रयत्न केला होता.

नाशिक येथे काळाराम मंदिर सत्याग्रह सुरू झाला होता. तेव्हा हक्कांसाठी संघर्ष करण्याकरीता कर्डकांनी कवने केली होती.

''महार, मांग, भंगी, चांभार, हिंदु ।
का न हकु आम्हां हिंदुत्वाचे ।।धृ।।
म्हणूनी धार्मिक हक्कासाठी या ।
फुंकले रणशिंग सत्याग्रहाचे ।।१।।
परधर्मी लोक घालूनी बूट ।
जाती देवाच्या जवळ थेट ।
त्यांचा अस्पृश्यांना नाही बाट ।
असे हिंदुधर्मीय हलकट ।।२।।[२४]

वरील कवनातून म्हणतात, हिंदु धर्मीय असूनही मंदिरात प्रवेश नाही. तर दुसऱ्या धर्मातील असून देवाचे पावित्र्य राखत नाहीत. तरी त्यांना मंदिरात प्रवेश मिळतो. अशी समाजात असलेली भेदाभेद नितीची जाणीव ते करून देतात. तसेच दलित (अस्पृश्य) वर्गातील जनतेने शिक्षण घ्यावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता. तो या समाजातील तळागाळातील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी जलसेकार भिमराव करडक म्हणतात.

''विनंती माझी दलित बंधूना । शिक्षण द्या हो मुलामुलींना ।।

शिक्षणाचा चमत्कार । बाबा आंबेडकर झाले बॅरीस्टर ।।''

या कवनातून त्यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहे. तसेच हिंदु धर्मात असलेल्या विषमतेमुळे या धर्माची अधोगती झाली आहे. त्याविषयी ते म्हणतात -

''नाही समजा तुमचे अंगी । तुम्ही लिहिली शास्त्रे ढोंगी ।।धृ।।

ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र । हिंदू धर्मास पाडीले छिद्र ।।१।।

उच्च नीच भावना अंगी । जडविली पुराणे ढोंगी ।।२।।

हे सोवळे तुमचे वरपांगी । कर्डक म्हणे अंतरी हे ढोंगी ।।३।।'' [२५]

ब्राम्हण वर्गाने स्वतःच्या स्वार्थासाठी हिंदु धर्मात वर्ण निर्माण करून विषमता माजविली. ती विषमताच हिंदु धर्माच्या अधोगतीचे मुख्य कारण आहे. ही विषमता नष्ट करण्यासाठी आत्मपरीक्षण करावे असे त्यांनी सुचविले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक जिल्हयातील येवला येथे १३ ऑक्टोबर १९३५ रोजी धर्मांतरांची घोषणा केली. त्याविषयी करडक कवन करतात.

करा तयारी धर्मांतराची । बेडी तोडा गुलामगिरीची ।।

सात कोटी हिंदु असता । माणुसकीवीण कां जगता ।।

लाज ठेवा मनी याची । करा तयारी धर्मांतराची ।।१।। [२६]

दलितांना (अस्पृश्य) म्हणणे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मांतर करण्याची वेळ कां आली होती. याची जाणीव करतांना ते म्हणतात, उच्च वर्णीयांच्या आडमुठेपणा आणि हटवादी कर्मठपणा व सनातन्यांनी केलेल्या जुलूम, अत्याचारामुळे हा निर्णय त्यांना घ्यावा लागला होता याची जाणीव ते वरील कवनातून करून देतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना यांच्या निधनानंतर २ ऑक्टोबर १९५७ रोजी रिपब्लिक पक्षाची स्थापना झाली. मात्र या पक्षात अगदी अल्प काळात गट तट निर्माण झाले. याचे वर्णन करतांना कर्डक म्हणाले,

कोण कुणाचा गुरु ना चेला । जो तो पुढारी झाला ।

मतभेदांनी समाज ग्रासला । चळवळ खिचड काला ।

अकलेचे निघाले दिवाळे । संघटनेला गेला तडा ।

जनता दुभंगल, बरळत सुरली । हाड नसे जिभेला ।।१।। [२७]

यावरून बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित (अस्पृश्य) समाजातील जनतेला एकत्र आणून आपल्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्यांच्यानंतर चळवळीत काम करणारी प्रत्येक व्यक्ती स्वतः पुढारी म्हणून घेऊ लागली होती. त्यामुळे अंतर्गत मतभेद वाढले होते. एकोपा राहीला नव्हता. इ.स. १९३२ मध्ये नाशिक जिल्हयातील मनमाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित (अस्पृश्य) वर्गीय कामगारांची कामगार परिषद भरविली होती. तेव्हा त्यांनी या परिषदेत दलित (अस्पृश्य) तरूणांना ''प्राणयज्ञ दलाची'' स्थापना करण्याचे आवाहन केले होते. तेव्हा अशा स्वरूपाच्या दलाची आवश्यकता असल्याची जाणीव करून देतांना कर्डक म्हणतात -

बाबासाहेबांचे आम्ही सच्चे भक्त ।

तत्वे त्यांचीच पाळीत आलो फक्त ।।१।।

समाजासाठी सांडू आमचे रक्त ।

सोडूनी संसार प्रपंच बनू विरक्त ।।२।। [२८]

डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेली तत्वे अंगीकारून राजकी क्षेत्रात तयार झालेले गट तट बंद पाडता येतील असे त्यांचे विचार आहेत.

नाशिक जिल्हयात मनमाड, चांदोरी, चांदवड, सिन्नर येथे आंबेडकरी जलसेकार होते. नाशिक जिल्हा आघाडीवर होता. स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण भागात बहुजन समाजातील जनता आपल्या गांवातील सावकाराकडून कर्जापोटी पैसा घेत होती. सावकार त्या पैशांवर भरमसाठ व्याज आकारून वसूल करत होते. त्यामुळे काही लोकांना भूमीहीन सुध्दा होण्याची वेळ येत होती. त्यावर जलसेकार कवनातून म्हणतात -

''सावकार नव्हे हा तस्कर । याने बुडविले माझे घर ।

करूनी याने खोटा व्यवहार । कर्जाचा लादला भार।'' [२९]

यातून त्यांनी सावकारी व्याजाचे दुष्परिणाम मांडले आहेत.

नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यात असलेले साताळीगांव येथील रामचंद्र नामदेव सोनवणे यांनी सत्यशोधक जलसातून प्रेरणा घेऊन आंबेडकरी जलसे चालविला होता. त्यांच्या या जलशात महादु विठू सोनवणे (अध्यक्ष) रामचंद्र नामदेव सोनवणे (गायक) सदूबा (नाच्या), सिताराम चादुबा सोनवणे (ढोलकी वादक), तुकाराम सावळाराम सोनवणे, किसन जाधव हे झिलकरी होते. त्यांनी सत्यशोधक जलसाचे कवन केले होते.

धन्य धन्य ज्योतिबा फुले । सत्य त्यांनीच शोधीले ।।धृ।।
धन्य राजा गायकवाड । सत्यासाठी त्याची धडपड ।
अज्ञ जनांना शोधिले । सत्य त्यांनीच शोधीले ।।१।।
गरीब प्रजा एकीकड । शेटजी भटजी दुसरीकडं ।
सुज्ञ करण्या मुली नि मुले । सत्य त्यांनी शोधीले ।।२।।
सत्यशोधकांचा फिरता फड । शाळा पाटीती चोहीकड ।
ज्ञानमंदिर केले खुले । सत्य त्यांनीच शोधीले ।।३।।
आम्ही सारे अज्ञ मुढ । चंदू सोनवणे झाला पुढं ।
फुले चरणी झाले लीन । सत्य त्यांनीच शोधीले ।।४।। [३०]

त्यांनी येवला तालुक्यात सत्यशोधकी तमाशे करून त्याच्यातून दलित (अस्पृश्य) बहुजन समाजाचे हाल, दुःख, दारिद्रय मांडले होते. त्यांनी येवल्याच्या रघुजी काकाच्या यात्रेत गंगा दरवाजा, आनकाई, एरंडगांव, जळगांव इत्यादी गांवाच्या यात्रेतही जलसे सादर केले होते. त्यांनी इ. स. १९३१ मध्ये मनमाड येथे 'समता सैनिक जलसा मंडळ' स्थापन केले होते. मालेगांव तालुक्यातील रावळगांव येथे वालचंद हिराचंद शेठ यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात साखर कारखाना सुरू केलेला होता. या कारखात्यात जातीभेद मानीत होते. तेव्हा दादासाहेब (भाऊराव) गायकवाड यांनी रावळगांव येथे महार वतन परिषद आयोजित केली होती. त्यावेळी या परिषदेला रामचंद्र नामदेव सोनवणे यांनी आपल्या समता सैनिक जलसा मंडळाच्या माध्यमातून जलसा कार्यक्रम सादर करून जाती भेदावर चांगलीच टीका केली होती. त्यांचा अंधश्रध्दा आणि शिक्षण यावर जलसातून जास्त भर होता. तसेच नाशिक

जिल्हयातील सिन्नर तालुक्यातील ठाणगांव येथील शंकर पदुजी जगताप यांनी सुबोध जलसा मंडळ नांवाचे जलसा मंडळ स्थापन केले होते. त्यांनी इ.स. १९४८ नंतर संपूर्ण नाशिक जिल्हयात सर्वत्र जलसाचे कार्यक्रम केले होते. त्यांनी 'भिममला' नांवाचे दीर्घ कवन रचले होते.

धन्य रामजीच्या बाळा कोण जाणे तुमची कला ।।
समता माळणीचा मला तुम्ही त्याचे धनी ।।१।।
जागोजाग राखणदार किती शिपई, जमादार, नाईक
आणि हवालदार भरते मळया पाणी ।।२।। [३१]

याशिवाय त्यांनी सामाजिक, राजकीय, धार्मिक विषयांवर अनेक पदे, गाणी, पोवाडे लिहिली आहेत.

नाशिक जिल्हयातील निफाड तालुक्यातील टाकळी या गांवचे काशिनाथ गोंडाजी उर्फ के. जी. आहिरे यांनी इ. स. १९३२-३३ मध्ये जलसा मंडळाची स्थापना केली होती. ते कवन करतात -

अहिंसा वृत्तीची ऐका थोरी ।
तुम्ही आम्ही बंधू एकच सारी ।
नव्हे हिंदुस्थानी जातवारी ।
असा जगामधी प्रचार करी । [३२]

महात्मा गांधीजींच्या अंहिसावादी वृत्ती संदर्भात वरील पदातून ते हरिजन सप्ताह, सहभोजन कार्यक्रमाबद्दल ते कवनातून सर्वसामान्य जनतेला जाणीव करून देतात.

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील बंडू ठकाजी जाधव यांनी इ. स. १९४२ मध्ये ''क्रांतिकारक जलसा मंडळ'' नांवाचे मंडळ स्थापन केले होते. त्यांच्या जलसातून अंधश्रध्दा व अज्ञान यावर कवन करीत असत.

रश्मीकांत म्हणे विनंती माझी ।
नष्ट करा सारी बुवाबाजी ।
मजूर जनतेचे एकटेच कैवारी ।

आहेत डॉ. आंबेडकर रणगाजी ।[३३]

त्यांनी वरील कवनातून समाजातील सर्व अंधश्रध्दा नाहीशी करण्याची विनंती केली. तसेच मजुरांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळावा यासाठी झटणाऱ्या व्यक्तिचा गौरव केला आहे.

सत्यशोधक जलसे सुरू झाले होते. ते जलसे ग्रामीण भागात खेडोपाडी सादर करण्यात येऊ लागले होते. तेव्हा या जलशाचा बहुजन समाजातील जनतेवर फार मोठा परिणाम होऊ लागला होता. या जलशातून शेठजी, भटजी, पुरोहित, सावकार, जमीनदार यांनी केलेल्या धार्मिक, आर्थिक, सामाजिक शोषणाविरूध्द लोकजागृती केली होती. बहुजन समाजातील जनता कोणत्याही धार्मिक कार्यासाठी पुरोहिताला न बोलविता जे धार्मिक कार्य सत्यशोधक पध्दतीने पार पाडू लागली होती. समाजातील शेतकरी वर्ग कर्जाने त्रस्त होतो, कर्जात जगतो आणि कर्जा मरतो. समाजात रूढ असलेली विधवा केशवपन, शिक्षण प्रसार इतयादी बाबत गाण्यात येणारी कवने ऐकून जनता जागृत झाली होती. त्यांना विरोध करू लागली होती. खेडेगावांत जलशाचा प्रयोग पाहण्यासाठी कोणी बैलगाडया जुंपून येत तर कोणी पायी येत असत. आंबेडकरी जलशातून दलित जनतेवर होणारा अन्याय, जातीयता, धर्मांधता इत्यादी गोष्टींबद्दल जागृती करण्यात येत होती. कामगार, श्रमिक, शेतमजूर यांच्या शोषणाचे वास्तवचित्र या जलशातून मांडण्यात येत होते. या जलशाची चळवळ दलित, भटके, आदिवासी,तळागाळातील माणसांपर्यंत पोहचली होती. त्यामुळे या जनतेत स्वाभिमान, संघटीत व संघर्षशीलता जागृती झाली होती.

## नाशिक जिल्ह्यातील सुधारक व त्यांचे कार्य

नाशिक जिल्ह्यात बहुजनांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीच्या सुधारणा प्रक्रियेत असलेल्या अनेक समस्यांवर मार्ग काढीत अनेक सुधारकांनी विकासाचा ध्यास घेतलेला होता. त्यांनी केलेल्या या कार्याचे फार मोठे ऋण आजच्या समाजावर आहे. याची ओळख व्हावी हाच हेतू आहे.

बहुजनांच्या सुधारणाक्षेत्रात कामे करणाऱ्या सुधारकांच्या वेगवेगळया विचारधारा होत्या, आहेत. बहुजन समाजातील जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा ही

त्यांची तळमळ होती. ''समाजाचा विकास साधायचा असेल तर तळागाळातील लोकांपासून सुरूवात केली पाहिजे.'' या महात्मा गांधीजींच्या विचारातून प्रभावीत होऊन मानवतावादी दृष्टिकोनातून इ.स. विसाव्या शतकापासून सुरूवात झाली.

## १. कर्मवीर भाऊसाहेब हिरे

शिक्षण सहकारमहर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचा जन्म मालेगाव तालुक्यातील निमगाव येथे दि. १ मार्च १९०५ रोजी शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी बहुजन समाजातील कष्टकरी शेतकरी जनतेला शेतीचे मालक बनविले. ''कुळ कायदा'' अंमलबजावणी केली. ''कसेल त्याची जमीन, राहिल त्याचे घर'', काम करणाऱ्याचा कारखाना''[३४] या माध्यमातून कष्टकरी वंचितांना न्याय मिळवून दिला.

कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी इ. स. १९२८ मध्ये सत्यशोधक चळवळीत सहभाग घेऊन सामाजिक कार्यास सुरूवात केली. मालेगाव येथे वकिली सुरू केली होती. या दरम्यानच्या काळात तालुका व जिल्हा लोकल बोर्डाचे सभापती म्हणून त्यांची निवड झाली होती. इ. स. १९३६ मध्ये कॉँग्रेस संघटनेत सहभाग घेऊन महात्मा गांधीजींच्या विचारांनी प्रभावित होऊन स्वातंत्र्यलढ्यात ते सहभागी झाले होते. इ. स. १९३७ मध्ये तत्कालीन मुंबई राज्याच्या विधिमंडळात त्यांची निवड झाली. या दरम्यानच्या काळात शिक्षण प्रसारक मंडळाची निमगाव येथे स्थापना केली. इ. स. १९४५ मध्ये आदिवासी सेवा समिती व इ. स. १९५२ मध्ये महात्मा गांधी विद्यामंदिर या शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. सहकार क्षेत्रात भरीव काम केले. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना केली.[३५] स्वातंत्र्यपूर्व काळात कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी इ. स. १९४१-४२ मध्ये पू. ठक्कर बाप्पाच्या आदेशानुसार मालेगाव तालुक्यातील सौंदाणे येथे पहिली आदिवासी शाळा व छात्रालय सुरू केले.[३६] इ.स. १९४५ ते इ.स. १९६१ दरम्यानचे काळात भाऊसाहेब हिरेंनी आदिवासी सेवा समितीची धुरा व्यवस्थित सांभाळली. या काळात त्यांना श्री. उ. शा. पाटील, श्री. दोधू आनंदा बोवा, श्री. वाघ गुरुजी आणि श्री. र. प. पवार यांची साथ मिळाली. या त्यांच्या सहकाऱ्यांनी नाशिक जिल्ह्यातील पश्चिम भागातील आदिवासी डोंगराळ भागात पायी प्रवास करून ज्या गावामध्ये प्राथमिक शिक्षणाची

सोय उपलब्ध नव्हती त्या गावात शाळा सुरू केल्यात. आदिवासी पाडयांवर स्वयंस्फूर्त आदिवासी शाळा सुरू केल्या होत्या. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर शासनाच्या विविध योजनांची जनतेला माहिती देऊन त्या त्यांच्यापर्यंत पोहचविल्या होत्या. त्यांनी अज्ञानी, अक्षरशत्रू, रूढी, परंपरा यात गुरफटलेल्या समाजाला शिक्षणाची ओळख करून दिली होती. त्यांचे हे कार्य अत्यंत मोलाचे आहे.

## २. दत्तात्रय म. बिडकर उर्फ दादासाहेब बिडकर

कोल्हापूर जिल्ह्यातील तासगाव येथे दि. १९ मार्च १९१० रोजी द. म. बिडकर यांचा जन्म झाला. तासगाव येथे बिडकरांचा वाडा प्रसिध्द होता. त्यांच्या वडीलांचा सर्कसचा व्यवसाय होता. त्याचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर येथे झाले. त्यानंतर त्यांनी उच्च शिक्षणासाठी हैदराबाद येथील जिजाऊ महाविद्यालयात प्रवेश घेतला. या दरम्यानचे काळात ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षिले गेले.[३७] महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय चळवळीने जोम धरला होता. सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू होती. भारतीय जनतेला इंग्रज सत्तेविषयी मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण झाली होती.

महात्मा गांधीजींनी भारतीयांना आदेश दिला होता तेव्हा तरुण शाळा सोडून स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेऊ लागले होते. दादासाहेब बिडकर यांची हैदराबाद येथे गोविंदभाई श्रॉफ, नारायण चव्हाण, दामोदरदास मुंदडा यांच्याशी जवळीक तयार झाली होती. या सर्वांनी महाविद्यालयीन शिक्षण सोडून सत्याग्रहात सहभाग घेतला होता. मुंबईत येऊन कॉंग्रेसच्या शिबिरात राहिले. कॉंग्रेसने या काळात प्रचारफेऱ्या, बुलेटिन वाटप असे कार्यक्रम सुरू केले होते. त्यावेळी दादासाहेब बिडकर, दादासाहेब पोतनीस, अच्युतराव देशपांडे यांनी घरी परत जातांना नाशिक येथे येऊन चरखा वर्ग सुरू केले होते. या चरखा वर्गांना तरुण-तरुणी येऊ लागले. त्यांच्या समवेत स्वातंत्र्यगीते, क्रांतीकारकाच्या साहित्याचे वाचन, प्रभात फेरी इत्यादी कार्यक्रम सुरू केले होते. त्यामुळे त्यांच्यावर पोलिसांनी पाळत ठेवली. तेव्हा दादासाहेब बिडकर यांनी आपले कार्य बागलाण तालुक्यातील ग्रामीण भागाकडे वळविले.

बागलाण तालुक्यातील नामपूर हे गाव स्वातंत्र्य चळवळीचे केंद्र होते. तेथील नरहरशेठ हे मार्गदर्शक होते. या काळात त्यांनी नामपूर जवळील टेंभे या गावी ग्रामसुधारणेचा कार्यक्रम सुरू केला होता. या चळवळीत कार्यरत असतांना इ.स. १९३२ मध्ये दादासाहेब बिडकर यांना अटक झाली. २ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. त्यावेळी त्यांना धुळे येथील तुरुंगात ठेवण्यात आले होते. या तुरुंगात त्यांचा विनोबा भावे, साने गुरुजी यांच्याशी परिचय झाला. तुरुंगातून सुटका झाल्यावर दादासाहेब बिडकर यांनी खादी फेरी सुरू केली होती. बागलाण तालुक्यातील साल्हेर-मुल्हेर येथे कार्य करणाऱ्या ख्रिस्ती मिशनरी मिस. लॅथॅम जे. एल. यांची भेट झाली. या भेटीत झालेल्या चर्चेतून त्यांनी स्वतःला या भागातील आदिवासींच्या कामात भाग घेतला.[३८] टेंभे येथील सजन पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी इ. स. १९३१ मध्ये ग्रामसेवा समिती स्थापन केली होती. ही संस्था इंग्रजांनी १९३२ मध्ये जप्त केली होती. काँग्रेसच्या आदेशानुसार दादासाहेब बिडकर, दामू आण्णा फाटक, नारायण बुवा आणि मिस लॅथॅमबाई या ५-६ व्यक्तींनी एकत्र येऊन डांगसेवा मंडळ नावाची संस्था स्थापन केली होती. या संस्थेमार्फत आदिवासी सेवा कार्यास प्रारंभ करण्याचे निश्चित केले होते. त्यानुसार ताहाराबाद येथे २३ जून १९३७ रोजी डांगसेवा मंडळाची सभा घेतली.

या भागातील निवासी जनता आदिवासी यांना सावकाराच्या पाशातून मुक्त करणे, त्यांना अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढणे, यासाठी त्यांनी सुरूवातीला दोन कार्यक्रम हाती घेतले. त्यामध्ये एक म्हणजे शाळा काढणे आणि खावटीसाठी धान्य कोठार सुरू करणे. तसेच इ. स. १९४० पासून जंगल कामगार सहकारी संस्था उभी केली. त्यांनी हाती घेतलेल्या वरील कार्यक्रमातून गोलवाड येथे पहिली शाळा सुरू केली होती. त्यानंतर बोरदैवतला दुसरी शाळा सुरू झाली. नंतरच्या काळात आदिवासी आश्रमशाळा व छात्रालय यांचा विचार करण्यात आला. आदिवासी लोकांकडे पावसाळयात धान्य नसायचे त्यावेळी हे लोक सावकाराकडून धान्य घेत. त्यावर सावकार अवाजवी धान्य वसूल करीत असे.[३९] त्यावर उपाय म्हणून दादासाहेब बिडकर यांनी धान्य कोठार योजना सुरू केली होती.

जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यावर डांगसेवा मंडळाच्या शाळा जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आल्या. धान्य कोठार योजना बंद पडली. तसेच वनविकास महामंडळाची स्थापना झाल्यानंतर जंगल कामगार सहकारी संस्थाचे अस्तित्व नांवाला शिल्लक राहिले. त्यापैकी फक्त बागलाण तालुक्यातील धान्य कोठार सुरू आहे. दादासाहेबांनी आदिवासींच्या विकासाकरीता इ. स. १९३७ ते इ. स. २००२ पर्यंत असे एकूण ६५ वर्षे काम करीत राहिले. त्यांच्या विकासाकरीता जीवन घालविले. एक आगळावेगळा आदर्श समाजासमोर ठेवला, खऱ्या अर्थाने ते आदिवासी सेवक राहिले.

### ३. कचरुभाऊ राऊत

यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात असलेल्या निगडोल या गावी ९ सप्टेंबर १९२४ रोजी आदिवासी कोकणा कुटुंबात झाला. त्यांनी इयत्ता ७वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले होते. अगदी लहान वयापासून समाजकार्याला सुरूवात केली होती. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात प्रभात फेरी काढणे, लोकजागृती करण्याच्या कामात सहभाग घेत होते. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुका काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस म्हणून नियुक्त झाल्यापासून राजकीय कार्याचा श्रीगणेशा केला होता. इ. स. १९६२, १९७२ मध्ये दिंडोरी मतदार संघातून आमदार म्हणून निवडून आले. इ. स. १९९७ साली मालेगाव लोकसभा मतदार संघाचे खासदार म्हणून निवडून आले होते. त्यांनी नाशिक जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य खात्याचे सभापतीपद सांभाळले होते. त्यांनी कायम आदिवासी जनतेच्या विकासाच्या कार्याला महत्त्व दिले होते.[४०] ते आदिवासींना सावकारीच्या कचाट्यातून मुक्तता करण्यासाठी चळवळ व सहकारी संस्थाची उभारणी करण्यात अग्रेसर होते. नाशिक जिल्ह्यात आदिवासींची जंगल कामगार सहकारी संस्था, पेठ तालुक्यातील आंबे येथे सुरू करण्यात आली. तिचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले होते. आदिवासी भागातील जनतेच्या ताब्यात असलेल्या जमिनीत असणाऱ्या सागाच्या झाडावर सरकारची मालकी होती. तेव्हा त्यांनी या झाडावर त्या जनतेचा हक्क असावा यासाठी विधानसभेत प्रश्न मांडून 'रॉबी फॉरेस्ट' कायद्यातून त्याची मालकी शेतमालक यांचेकडे देण्याचा हक्क

मिळवून दिला होता. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागातील लोक एक वर्ष कराराने जमिनी कसत होते. तेव्हा त्या जमिनी कसणाऱ्याला कायमची देण्यात यावी, यासाठी प्रयत्न केले होते. तसेच आदिवासी शेतकऱ्यांना तेलपंप व वीजपंप शासनाकडून १००% मिळावे, यासाठी सिंहाचा वाटा उचलला होता. आदिवासी भागातील सहकारी संस्थांचा चेअरमन/अध्यक्ष हा आदिवासी जमातीचा असावा अशी मागणी मांडून मान्य करून घेतली होती. तसेच त्यांनी डांगसेवा मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या भरभराटीसाठी देखील हातभार लावलेला आहे.

## ४. हरिभाऊ महाले

हरिभाऊ शंकर महाले यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात वारे या गावी इ. स. १९३८ मध्ये एका आदिवासी कोकणा कुटुंबात झाला होता. पुढे त्यांचा संपर्क डांगसेवा मंडळाचे दादासाहेब बिडकर यांच्याशी झाला. डांगसेवा मंडळाचे सचिवपद त्यांनी काही काळ सांभाळले. त्याचबरोबर त्यांनी डांगसेवा मंडळाने स्थापन केलेल्या जंगल कामगार सहकारी संस्थेच्या कामात महत्त्वाची कामे केली. त्यांच्या या कामातून त्यांनी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात सामाजिक व आर्थिक बदल घडविण्याचा प्रयत्न केला होता. धान्य कोठारे, दारुबंदी, नशाबंदी, जागृती मेळावे, सावकाराकडून होणारे आदिवासींचे शोषण, वन जमिनीचा प्रश्न अशा अनेक चळवळीत त्यांनी सहभाग घेतलेला होता. इ. स. १९६२ मध्ये ते दिंडोरी तालुका पंचायत समितीचे उप सभापती झाले. इ. स. १९६७ ला दुसऱ्यांदा पंचायत समितीचे सदस्य म्हणून निवडून आले होते. इ. स. १९७७ मध्ये लोकसभेची निवडणूक झाली. त्यावेळी त्यांनी जनता पक्षातर्फे लोकसभेची दिंडोरी मतदार संघातून लोकसभेची निवडणूक लढविली आणि त्यात ते खासदार म्हणून निवडून आले होते. इ. स. १९८० मध्ये आमदार आणि इ. स.१९९९ मध्ये पुन्हा खासदार म्हणून निवडून आले होते. [४१]

हरिभाऊ शंकर महाले यांनी आपल्या राजकीय जीवनाला गाव पातळीपासून सुरूवात करून थेट दिल्लीपर्यंत मजल मारली होती. या वेगवेगळया पदावर काम करतांना त्यांनी एकाधिकार धान्य खरेदी, जात प्रमाणपत्र तपासणी, सरकारी

नोकऱ्यांमध्ये आदिवसींना असणाऱ्या राखीव जागा, रस्ते, शाळा, शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी योजना, पाटबंधारे अशा वेगवेगळया क्षेत्रात सेवा कार्य केले. त्यांच्या मते आदिवासी जनतेच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्थाना मदत देणे आवश्यक आहे. फक्त सरकारी अधिकारी त्यांचे सहकारी यांच्यामार्फत कामाला गती पाहिजे. तशी गती मिळणार नाही. त्यासाठी आदिवासींच्या सेवा कामात नवीन प्रामाणिक कार्यकर्ते पुढे आले पाहिजेत. तसेच प्रशासकीय व्यवस्थेबद्दल ते म्हणतात, ''ज्या गोष्टीमध्ये वैयक्तिक फायदा होत असेल ती बाब लगेच केली जाते आणि जेथे जनतेचा फायदा असतो, स्वार्थ साधला जात नाही अशा गोष्टीबाबत मुद्दामहून दिरंगाई केली जाते.''[४२] त्यांनी तळागाळातील माणसांपर्यंत संपर्क साधून त्यांच्या समस्या समजून घेतल्या होत्या. सतत दुसऱ्याला मदत करण्याचा ध्यास घेतलेला होता. विकासास गती देणारा लोकप्रतिनिधी होण्याकडे त्यांचा कल होता.

## ५. अर्जुन तुकाराम उर्फ ए. टी. पवार

ए. टी. पवार यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील दळवट या गावी आदिवासी कुटुंबात १ डिसेंबर १९३८ रोजी झाला. त्यांचे पूर्ण नांव अर्जुन तुळशिराम पवार असे होते. त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण स्वतःच्या गावी नंतर माध्यमिक शिक्षण कळवण येथे घेतले. नंतर औरंगाबाद येथील मिलींद महाविद्यालयातून राज्यशास्त्र विषयातून एम. ए. ची पदवी मिळविली होती. त्यानंतर त्यांनी ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील 'हरीजन-गिरीजन समाज उन्नती मंडळ' या संस्थेत काही काळ व्यवस्थापक म्हणून नोकरी केली. या ठिकाणी त्यांचे मन स्वस्थ बसत नव्हते, त्यांनी ती नोकरी सोडून आपल्या आदिवासी अशिक्षित, मागास समाजाचा विकास करण्याचा ध्यास घेतला. त्यांना धैर्यशीलराव पवार, (सुरगाणा संस्थान) यांनी इ. स. १९६७ मध्ये कनाशी गटातून जि. प. निवडणूक लढविली. या निवडणुकीत ते विजयी झाले. कृषी समितीचे सभापती झाले. या काळात त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला.[४३] त्यानंतर इ. स. १९७२ ते १९८५ आणि इ. स. १९९० ते २०१४ असे आठ वेळा सलग महाराष्ट्र राज्य विधानसभेवर कळवण व सुरगाणा मतदार संघातून आमदार म्हणून निवडून आले होते.

त्यांनी कळवण, बागलाण आदिवासी भागात लघु पाटबंधारे, उपसा जलसिंचन योजना, मध्यम आणि मोठे पाटबंधारे, ग्रामीण रुग्णालये, रस्त्याचे जाळे तसेच कळवण येथे विभागीय कृषी कार्यालय, प्रकल्प कार्यालय यांची स्थापना करण्यात मोठी भूमिका पार पाडली. आश्रमशाळा योजनेचा विस्तार, एकाधिकार धान्य खरेदी योजना, आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारणा कायदा, शबरी वित्तीय महामंडळाची स्थापना, धान्य कोष योजना, लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटची मागणी, नवसंजीवन योजना, जाती प्रमाणपत्र तपासणी समिती अशा अनेकविध योजना राबविण्याकरीता राज्य पातळीवरील निर्णयामध्ये त्यांची भूमिका व योगदान महत्त्वपूर्ण आहे.[४४]

## ६. पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड

कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे पूर्ण नाव भाऊराव (किसन) कृष्णराव गायकवाड असे आहे. १५ ऑक्टोबर १९०२ रोजी दादासाहेबांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील आंबे या गावी झाला. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण नाशिकमध्ये झाले. मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर ब्रिटिश सरकारच्या सेंट्रल एक्साईजमध्ये त्यांना नोकरी मिळाली. नोकरी करताकरता समाजसेवेची त्यांना आवड निर्माण झाली. पित्याचीही तीच इच्छा असल्याने व नाशिक येथील श्री शाहू छत्रपती बोर्डींगचे अधीक्षक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या समाजसेवेला निश्चित दिशा मिळाली. त्यांच्या समाजकार्यावर महात्मा गांधी, स्वा. सावरकर यांचा प्रभाव होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा त्याचवेळी समाजसेवेत व राजकारणात प्रवेश झाला होता. ही बातमी तमाम दलितांसमवेत दादासाहेबांनाही वर्तमानपत्रातून समजली होती. दादासाहेबांच्या कार्यासंबंधी व बोर्डिंगसंबंधी बाबासाहेबांना निश्चित माहिती त्यांच्या बहिष्कृत हितकारिणी सभेतील सदस्यांकडून कळली असल्याने कोर्टाच्या कामासाठी बाबासाहेब थेट वसतिगृहावर गेले व तेथे हे दोन असामान्य नेते एकमेकांना पहिल्यांदा भेटले. स्वत:ची ओळख व्हायला फार उशीर लागला नाही आणि दादासाहेबांनी हिऱ्याची पारख करूनच त्यांना ताबडतोब गुरू मानले. तर बाबासाहेबांना भाऊरावांना आपला सहकारी व शिष्य म्हणून आनंदाने स्वीकारले ते

कायमचे. माणसाला माणूस म्हणून जगू देण्याची रीत समाजात नव्हती. अशावेळी समाजाला एकसंध करीत चळवळी, सत्याग्रह, शैक्षणिक व धार्मिक कार्य यशस्वी करणाऱ्या नेतृत्त्वाच्या रूपाने दादासाहेब गायकवाड यांचे कार्य डोळ्यांपुढे उभे राहते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दादासाहेब गायकवाड असं चळवळीचं समीकरण बनलं होतं. म्हणूनच मानवाच्या उद्धाराचे नाशिकचे जननायक म्हणून दादासाहेब आपल्या सर्वांच्या स्मरणात राहिले आहेत.

कोणत्याही सामाजिक परिस्थितीमध्ये शोषितांची व वंचितांची सहनशक्ती जेव्हा कमी झालेली असते आणि हे पाहणारा, ऐकणारा एक सामान्य माणूस या अन्यायाविरूद्ध कृतीशील कार्यक्रम मनाशी निश्चित करतो आणि वंचित व शोषितांना त्यांचा मिळवून देतो असे कर्तृत्त्व संपन्न, बुद्धीमान व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. आंबेडकरांच्या रूपाने या हजारो वर्षे वर्णभेदाच्या नावाखाली पिटला गेलेल्या दलित समाजाच्या राष्ट्रपुरूष मिळालेला आहे. आंबेडकरांची विचारशक्ती जनसागराच्या कणाकणात घालून त्या महासागराला भरती-आहोटीची आदेश देणारा त्यांचा उत्तम शिष्य म्हणजे दादासाहेब गायकवाड. दादासाहेबांनी खळखळत्या झऱ्यासारखे कार्य केले. डॉ. आंबेडकरांनी गायकवाडांच्या समाजसेवेची क्षमता पाहूनच आपला वारस म्हणून स्वीकारले होते. दादासाहेब गायकवाडांनी नाशिक जिल्ह्यातून व जिल्ह्याबाहेर समाजसेवा, भूमिहीनांबाबत शिक्षण क्षेत्रात, अंधश्रद्धा, राजकारण इत्यादीबाबत अनेक चळवळी, सत्याग्रह व मोर्चे काढलेले आहेत [४५] व उल्लेखनीय कार्य केलेले आहे.

## ७. शांताबाई दाणी

शांताबाई दाणी यांचा जन्म नाशिकचाच. शांताबाईंच्या आईंनी प्रतिकूल परिस्थितीतही शिकण्याची आस असलेल्या मुलीला शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. शांताबाईंचे प्राथमिक शिक्षण ते महाविद्यालयीन शिक्षण नाशिकमध्येच झाले. महाविद्यालयीन शिक्षणाच्या महत्त्वाच्या टप्प्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाने प्रेरित होऊन शांताबाई प्रभावित झाल्या.

समाजावर होणाऱ्या पिढ्यान्‌पिढ्यांचा अन्यायाविरूद्ध महामानवापासून प्रेरणा घेऊन त्यांनी समाजकारण व राजकारणात आपला आगळावेगळा ठसा उमटविला. एप्रिल १९५९ मध्ये नाशिकरोड परिसरातील तक्षशिला माध्यमिक शाळा सुरू करण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला. यावेळी महारांनी शाळा सुरू केल्या तर विद्यार्थी कसे मिळतील असा समाजाचा आरोप व मनात येणारा विचार यांना न डगमगता त्यांनी मिलटरी शेडस्‌ (नाशिक रोड परिसर) होत्या तेथे शाळा भरवायला सुरूवात केली. जून १९६५ मध्ये त्र्यंबकरोडवर किस्मत बागेच्याजवळ श्री. पाटील यांच्या जागेत त्यांनी शाळा उघडली. महिलांनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांनी परिश्रम घेतले. किस्मत बाग येथे सुरू झालेली शाळा ही स्वतंत्र मुलींसाठी असलेली शाळा होती. त्यातूनच पुढे सारडा कन्या विद्यालयाची सुरूवात झाली. त्या काळात मुलींसाठी वसतीगृहे सुरू करण्यास त्या आग्रही होत्या व त्यांनी मुलींसाठी वसतीगृहेही सुरू केली. विधान परिषद सदस्या म्हणून त्या निवडल्या गेल्या असताना वंचित घटकांच्या मुलींच्या शैक्षणिक सुविधांसाठी त्यांनी या काळात व्यापक काम केले. १९७२ या वर्षी शांताबाईंनी राज्य शासनाकडून सतत पाठपुरावा करून नाशिकरोड येथील तक्षशिला, गौतम छात्रालय व नाशिकमधील रमाबाई आंबेडकर कन्या विद्यालयासाठी विनामुल्य जागा मिळविली.

जिल्ह्यातील भूमिहीनांच्या लढ्याच्या वेळेस त्या मोठ्या हिरीरिने सहभागी झाल्या. १९४४ साली समता सैनिक दलाच्या अधिवेशनात शांताबाई सहभागी होत्या. १९४६ ला शांताबाई सार्वत्रिक निवडणुकीस उभ्या होत्या. १९६८ ते १९७४ या कालखंडात विधान परिषद सदस्य म्हणून त्यांनी आंबेडकरी चळवळीची भूमिका विधीमंडळात जोरदारपणे मांडली. विधिमंडळात दलितांना प्रतिनिधीत्त्व मिळावे म्हणून केलेल्या महिला सत्याग्रहाच्या नेतृत्त्वामुळे त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला.

१९५९ पासून नाशिक जिल्ह्यात भूमिहीनांचे आंदोलन झाले. शांताबाई दाणी यांच्या नेतृत्त्वाखाली जिल्हा कृती समिती नेमण्यात आलेली होती. यावेळी भूमिहीनांचा प्रश्न पूर्णपणे सुटल्याशिवाय नियोजित सत्याग्रह मागे घ्यायचाच नाही. या विचाराने ठाम राहत नाशिक जिल्ह्यातील आंदोलनात उमराळे, दिंडोरी, देवरगाव,

सुरगाणा, पठ, त्र्यंबकेश्वर व इगतपुरी आदी केंद्रातून आंदोलन जोरदार करायचे हेही या कृती समितीने एकमताने ठरवले होते. यावेळी नाशिक जिल्ह्यात पहिला सत्याग्रह उमराळे येथे करण्यात आला. या सत्याग्रहामुळे कितीतरी अस्पृश्य लोक भूमिहीन होते. सरकारच्या ज्या जमिनी वहिवाटीत होत्या पण अन्य काही कारणांमुळे त्या वर्षानुवर्षे पडीत राहिल्या होत्या अशा जमिनी भूमिहीनांना मिळाल्याच पाहिजेत यासाठी सत्याग्रह सुरू होता. यासाठी शांताबाईंनी कार्यकर्त्यांसोबत नाशिकसह महाराष्ट्राचाही प्रचार चालवला होता. यातून वंचित व अस्पृश्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याचे प्रयत्न सुरू होते.

१० व ११ जानेवारी १९७६ रोजी नाशिक येथे अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र राज्यातील कार्यकर्त्यांचे शिबिर आयोजित करण्यात आलेले होते. या शिबिराचे नियोजन व आयोजन भारतीय रिपब्लिकन पक्षाच्यावतीने सौ. दाणींनी केलेले होते. शिबिराच्या चर्चेत महत्त्वाच्या प्रश्न होता तो म्हणजे हस्तांतरित जमिनींचा तसेच भूमिहिनांचा प्रश्न, कामगारांचे प्रश्न, बेकार व बेरोजगारांचा प्रश्न, इत्यादी प्रश्नांवर चर्चा होऊन सरकारकडे धोरण ठरविण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आले.[४६]

शांताबाई दाणी यांनी १९५८ ते १९८० पर्यंत नाशिक जिल्ह्यात मुलींचे शिक्षण, भूमिहीन, अस्पृश्य याबाबत मोलाचे कार्य केले, चळवळीचे व मोर्चे तसेच शिबिरे घेत वंचितांच्या हक्कांबाबत विशेष कार्य केल्यामुळे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे त्यांना डी. लिट पदवीचा सन्मानही मिळाला.

## ८. कॉम्रेड नाना मालसुरे

कॉ. नाना मालुसरे हे नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व शेतकरी यांचे लढे यशस्वीपणे जिंकणारे व जोडीला पत्रकारिता करणारे लढवय्ये कार्यकर्ते होऊन गेले. आदिवासी, कष्टकरी व कामगार वर्गासाठी कॉ. नाना मालुसरे यांनी भरीव कामगिरी केली. अशा समाजातील कष्टकरी व पिडीत वर्णाला त्यांच्या न्याय हक्कासाठी संघटीत करण्याचे मोलाचे कार्य नानांनी केले आहे. सत्ता, पद, पैस याचा कोणताही हव्यास न बाळगता सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून चळवळ उभी करणाऱ्यांपैकी ते एक होते.

नरेंद्र (नाना) लक्ष्मणराव मालुसरे यांचा जन्म १२ जानेवारी १९२७ रोजी नाशिकरोड येथे झाला. त्यांचे वडील नाशिकरोड रेल्वे स्टेशनचे मास्तर होते. हे मध्यमवर्गीय कुटुंब होते. मात्र आर्थिक परिस्थिती थोडी बरी होती. परंतु लहानपणापासूनच नानांना जाती व्यवस्थेविरूद्ध चीड होती. अन्यायाविषयी व वर्णभेदाविषयी ते पेटून उठत असत. म्हणूनच पुढे त्यांच्याकडून मोठमोठ्या चळवळी, आंदोलने व मोर्चे यशस्वीरित्या घडत गेले.

नानांनी १९४९-५० या काळात समाजवादी पक्षात काम करीत असताना नाशिक जिल्ह्यातील निळवंडी पाडा येथील आदिवासींच्या जमिनीच्या लक्ष्याने तीव्र रूप धारण केलेले होते. जिल्ह्यातील मोठे शेतकरी हा लढा मोडण्यासाठी प्रयत्न करीत होते. परंतु नानांच्या संघटन कौशल्यामुळे सतत तीन वर्ष चाललेला लढा यशस्वी झाला व आदिवासींना काटवनाची जमीन मिळली. भूमिहीन आदिवासींना जमीन मिळवून देण्यात आलेले हे नानांचे पहिले यश.

१९५२ ते ५४ या तीन वर्षाच्या काळात भारतासह नाशिक जिल्ह्यातही भीषण दुष्काळ पडलेला होता. त्यावेळच्या कायद्यानुसार पिकांची आणेवारी सतत तीन वर्षे चार आणि असल्याशिवाय सरकार दुष्काळ जाहीर करीत नसे; परंतु अशावेळी सरकारने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत करावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे होते. म्हणून कळवण जवळील पाळे येथे जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत कॉ. काकासाहेब वाघ यांच्या अध्यक्षतेखाली किसान सभेची स्थापना करण्यात आली. नानांनी पूर्ण जिल्हा पालथा घालून सुमारे ८५० पेक्षा जास्त गावांना भेटी दिल्या आणि सुरगाणा वगळता जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यावर मोर्चे संघटित केले. सतत १२ दिवस रोज एक याप्रमाणे मोर्चे संघटित केले.

दुष्काळ जाहीर करा, गुरांना चारा, वैरण, शेतकऱ्यांना जगण्यासाठी दुष्कळी काम यासारख्या प्रमुख मागण्यांसोबतच पायऱ्यांच्या विहीरी बुजवा ही सुद्धा मागणी होती. नाशिक तालुक्याच्या पश्चिम भागात पसरलेली नारूची साथ, चांदवड तालुक्यातील केद्राई लघुपाटबंधारे अडकलेले काम अशा अनेक गोष्टींसाठी लढा देत नानांच्या नेतृत्त्वाखालील किसान सभेने ५२ च्या दुष्काळात दुष्काळ पिडीतांना

दिलासा मिळवून दिला. यानिमित्ताने जिल्ह्याच्या ग्रामीण भागाची, कष्टकरी जनतेची व त्यांच्या दैन्यावस्थेची नानांना बरीच ओळख झाली.

१९६४-७२ च्या काळात नाशिक जिल्ह्यातील पेठ-सुरगाणा या आदिवासी भागात किसान सभा, भारतीय कम्युनिस्ट पक्ष व नंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नानांनी जोरात कार्य सुरू केले. हरीभाऊ महाले, रामजी धुळे इ. सुरूवातीच्या कार्यकर्त्यांसमवेत किसान सभा व पक्षाचे काम वाढविण्याचे जिवापाड प्रयत्न केले. आदिवासींच्या शोषणाविरूद्ध काम करण्यास सुरूवात केली. या हाल-अपेष्टांचे, शोषणाचे कारण अन्याय व्यवस्था आहे. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या आधारे व समाजवादी समाजव्यवस्था मोडून काढून न्याय, समतेची स्थापना प्रदीर्घ लढ्यातूनच प्रस्थापित होऊ शकते हे किसान सभेच्या व पक्षाच्या माध्यमातून पटविण्यात नानांना यश आले. याच काळात ११ सहकाऱ्यांसह नानांना १८ महिने जेलची हवा खावी लागली. वैचारीक कणा मजबूत होण्यासाठी याचा फार मोठा नानांना उपयोग झाला.

१९७५ च्या आणीबाणीच्या काळात नानांनी सावकारी विरूद्ध लढे यशस्वी केले. नाशिक, दिंडोरी, सुरगाणा व पेठ तालुक्यातील आदिवासींच्या जमिनी सावकारांनी अक्षरश: लाटलेल्या होत्या. त्या सोडविण्यासाठी किसान सभेच्या माध्यमातून नानांनी जोरदार संघर्ष केला. अनेक आदिवासींना त्यांची सावकारांनी ताब्यात घेतलेली जमीन नानांनी आपल्या आंदोलनाच्या बळावर सोडवून दिली. या हस्तांतरीत जमिनीच्या लढ्यांची दखल टाटा स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सने घेऊन प्रशंसा केली.

१९८१ या वर्षी तलासरी येथील आदिवासी परिषदेसाठी १५१ आदिवासींना सोबत घेऊन नानांनी बाऱ्हे ते तालसरी पायी प्रवास केला होता.

१९८२ साली राक्षसभुवन येथे तात्यासाहेब शिरवाडकरांच्या उपस्थितीत ३१ जोडप्यांचा सामुदायिक विवाह लावून नानांनी आदिवासी समाजामध्ये एका नव्या प्रथेचा प्रारंभ केला. १९८३ साली अलंगूण येथे ३८५ आदिवासी जोडपी विवाहबद्ध झाली. १९८२ या वर्षीचीच चारोटी येथील महाराष्ट्र राज्य आदिवासी परिषद, १२००० आदिवासी शेतकऱ्यांच्या मिरवणुकीने गाजलेली नाशिकची परिषद, १९८६ चा

ओझरखेडचा जमीन लढा १९८७ चा वांगणबारी येथील फॉरेस्ट प्लॉटचा लढा, १९८९ साली सुरगाण्याला झालेली आदिवासी परिषद ही सारी नानांच्या कारकीर्दीतील [४७] यशस्वी फलस्वरुपे आहेत. नानांच्या सत्याग्रही प्रेरणेने पेठ-सुरगाण्यातील ७४ पाझर तलावांची कामे पूर्ण झाली. यासाठी १५००० आदिवासी शेतकऱ्यांनी ठिकठिकाणच्या पाझर तलावांवर सलग १५ दिवस विना मोबदला काम केले. १९९२-९३ मधल्या जातीय दंगलीच्या काळात नाशिकमध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय एकात्मता अभियानचे अध्यक्ष नाना होते. पुढे गो. रा. खैरनारांच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनातही नाना आघाडीवर होते. १९९४ साली दिंडोरी तालुक्यातील वनखात्याच्या मोकळ्या जमिनींचा कब्जा मिळण्यासाठी भूमिहीन शेतकऱ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला नानांचे मार्गदर्शन होते.

अशाप्रकारे २० व्या शतकातील तब्बल ३५ वर्षापेक्षा जास्त मालुसरे यांनी आदिवासी जमात, कष्टकरी, भूमिहीन व कामगार वर्गासाठी भरीव कामगिरी केली. अशा समाजातील कष्टकरी व पीडित वर्गाला त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटित करण्याचे मोलाचे कार्य नानांनी केले. नानांच्या पुढाकारानेच नाशिक जिल्ह्यात सामाजिक बांधीलकीच्या चळवळी उभ्या राहिल्या. आदिवासी भूमिहीन शेतकरी व कष्टकरी यांना चळवळी व मोर्चे यामुळे त्याकाळी न्याय मिळत गेला.

## ९. बाबुराव बागूल

बाबुराव बागूल यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून दलितांच्या वास्तव जीवनाचा एक वेध घेतला. त्यामुळे दलित साहित्याला सामाजिक, वास्तव व विद्रोही स्वरूपाचे नव परिणाम प्राप्त झाले.

बाबुराव बागुलांचा जन्म १७ जुलै १९३१ रोजी नाशिक जिल्ह्यातील नाशिकरोडपासून जवळ असलेले, देवळाली कॅम्पलगतचे विहितगाव येथे झाला. त्यांचे वडील स्वतःची जमीन कसत असत, तसेच कुटुंबाच्या उपजीविकेसाठी शेतमजुरी किंवा वाहतुकीची कामी करत असत. आई शेतमजुरी व रस्त्यावरतील केळी व भाज्या विकण्याची कामे करीत असे. असे दारिद्रय असताना बाबुरावांनी शिक्षण केले. त्याचवेळी नाशिक आणि त्या परिसरातील वातावरण काळाराम

मंदिराच्या सत्याग्रहाने आंबेडकरी झालेले होते. त्यामुळे शिक्षणाबरोबरच बाबुरावांच्या मनावर आंबेडकरी वातावरणाचे संस्कार होत होते.[४८] या वातावरणाचा परिणाम म्हणूनच बागुल यांनी इयत्ता चौथीमध्ये असतानाच डॉ. आंबेडकरांच्या जीवन कार्याचा गौरव करणारे गीत लिहिले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या आयुष्यात जे जे लढे दिले, त्यात नाशिक शहराला फार मोठे स्थान आहे. काळाराम मंदिर सत्याग्रहामुळे ही ओळख आणखी ठळक दिसते. बाबासाहेबांचे एकनिष्ठ शिलेदार दादासाहेब गायकवाड यांची ही भूमी, कवी कुसुमाग्रजांचा हा परिसर तसेच बाबुराव बागूल यांचे विहितगाव येथून जवळच बाबुरावांचं उमेदीचं आयुष्य गिरणीतल्या साच्यांशी दोस्ती करण्यात गेलं. मुंबईत राहत असतानाच मार्क्स व कामगारांच्या चळवळींशी त्यांचं नातं जुळलं. दलित दु:खाची ठणक मग त्यांच्या साहित्यातून व्यक्त होऊ लागली.

बाबुरावांची कथा, कादंबरी यातून शोषितांच्या वंचितांच्या वेदनांचे कढ शब्दबद्ध झालेले आहेत. बागुल हे १९६० सालच्या दरम्यान उदयास आलेले विचारवंत, सृजनशील लेखक आहेत. बागुल यांचा कम्युनिस्ट चळवळींशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंधत आलेला असतानाही माक्स बरोबरच आंबेडकर हेही त्यांच्या चिंतनाचा आणि वाङमयीन लेखनाच्या प्रेरणेचा भाग राहिले आहेत. प्रागतिक दृष्टिकोन, भौतिकवादी विचारपद्धती, दलित-शोषितांच्या जीवन आणि चळवळी विषयीची आपुलकी आणि बांधिलकी यामुळे त्यांच्यावरील तात्विक प्रभावाचे केंद्र सर्वच प्रगतीशील जसे मार्क्स, लेनिन, माओ, बुद्ध, फुले आणि आंबेडकर राहिलेले आहेत.

*जेव्हा मी जात चोरली होती* (१९६३) आणि *मरण स्वस्त होत आहे* (१९६९) हे त्यांचे *कथासंग्रह सूड* (१९७०), *अघोरी, आंबेडकर भारत (भाग-एक)* (१९८१), *आंबेडकर भारत* (भाषा दोन) (१९९५) या त्यांच्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्या. याशिवाय त्यांच्या इतर काही कादंबऱ्या दिवाळी अंकांमधून आणि वाङ्मयीन नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेल्या आहेत. यापैकी *कोंडी* (२०००), *पावश्या* (१९७१), *पाषाण, सरदार, भूमिहीन, मूकनायक* इत्यादी त्यांच्या काही कथा

व कादंबऱ्या आहेत. यामधून दलित, अस्पृश्य, वंचित घटकांवरील लिखाण प्रवाहीपणे मांडलेले दिसून येते. [४१] बागूल यांचे सर्वच लिखाण जीवन जाणिवांचे अविष्कारण समोर आणते. कारण कोणताही लेखक लिखाण करीत असताना त्याच्यासमोर काही वास्तव गोष्टी घडत असतात. त्या संबंधीचे लिहित असतो. म्हणून बाबुराव बागुलांच्या लिखाणात वंचित व दलित बैठकांबद्दल समाजात अनेक पातळ्यांवर होत असलेले अत्याचार, समाजात मिळत असलेली वागणूक त्यांचा संघर्ष या बाबींसंबंधी वैचारिक विश्लेषण दिसून येते.

बागूलांच्या साहित्यामधून मानवी जीवनातील अनेक पातळ्यांवरील संघर्ष आणि विद्रोहाचे चित्रण झालेले आहे. त्यात केवळ जगण्याच्या प्रेरणेतून प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीशी, पाशवी व्यक्ती आणि दारिद्रयाशी दिलेला संघर्ष जसा चित्रित होतो तसाच विषमतावादी समाजव्यवस्थेमुळे निर्माण होणारा संघर्ष त्यांच्या साहित्यातून चित्रित होतो. त्यांच्या कथेतून चित्रित होणारा संघर्ष अत्यंत तीव्र आणि चित्तथरारक स्वरूपाचा आहे तर त्या तुलनेत त्यांच्या कादंबरीतील संघर्षाची तीव्रता मात्र असल्याचे दिसून येते. त्यांच्या कादंबरीमधील संघर्षाला व्यक्तींच्या मनातील अहंकार, पाशवी प्रवृत्ती, अध्यात्मिक कर्मकांडाचा प्रभाव या गोष्टी जशा कारणीभूत आहेत तसाच या कादंबऱ्यांमधील संघर्ष, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सत्ताप्राप्तीच्या प्रेरणांमधून व विषमतावादी समाजव्यवस्थेमुळेही निर्माण झालेला दिसतो. बागुलांच्या पावश्या, पाषाण आणि सरदार या तीन कादंबऱ्यांमधून विषमतावादी समाजव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या संघर्षाचे चित्रण होते. यातील संघर्षाला उच्चवर्णीयांच्या मनातील अहंकार, इतरांबद्दल असलेला तुच्छतावाद, अन्याय अत्याचारी व वर्चस्ववादी प्रवृत्ती आणि समाजात प्रचलित असलेली अस्पृश्यता कारणीभूत आहे.

बाबुरावांच्या पावश्या या कादंबरी मधून चित्रित होणाऱ्या संघर्षाला उच्चवर्णीयांची अहंकारी, स्ववर्चस्ववादी दलितांबद्दलची शंकाखोरी आणि अत्याचारी प्रवृत्ती कारणीभूत ठरलेली आहे. यातील संघर्ष व्यक्तिगत व शारीरिक मारामारीचा आहे. परंतु नंतर याला सामूहीक अत्याचाराचेच स्वरूप प्राप्त झालेले दिसते.

उच्चवर्णीयांच्या मनात दलितांच्याबद्दल असलेला तुच्छतावाद या कादंबरीतून तीव्रतेने प्रकट होतो. या कादंबरीत शिंदे सरकार नावाची व्यक्ती दलितांवर आपला बैल मारून टाकल्याचा आळ होते. या घटनेचा जाब विचारण्यासाठी सीता पैलवान या दलिताला तो लाथा बुक्क्यांनी मारतो.

शिंदे सरकारला प्रतिकार करण्याची शारीरिक शक्ती असूनही अस्पृश्यतेतून आलेल्या स्वत:बद्दलच्या हीनगंडामुळे सीता पैलवान सुरूवातीस आपल्यावर झालेली मारहाण निमुटपणे सहन करतो. परंतु ही मारहाण असह्य होते तेव्हा तो शिंदेला उचलून फेकून देतो. शिंदे सरकारवर एका दलित माणसाने हात उचलणे ही घटना गावातील उच्चवर्णीयांना अपमानास्पद वाटते. म्हणून उच्चवर्णीय लोक पुन्हा समुहाने एकत्र येऊन सीता पैलवानाला बदडून काढतात. यातील सीता पैलवान शारीरिकदृष्ट्या बलदंड आहे. परंतु तो मानसिकदृष्ट्या दुबळा आहे. व्यवस्थेने निर्माण केलेल्या अस्पृश्यतेने त्याला गुलाम बनवलेले आहे. म्हणून आपल्याकडे असलेल्या शक्तीचा वापर उच्चवर्णीयांच्या अन्याय, अत्याचारी प्रवृत्ती विरूद्ध संघटितपणे कसा करावा यासंदर्भात तो सुसंगत विचार करून शकत नाही. त्यामुळे तो स्वत:कडे बळ असूनही अत्याचाराविरूद्ध शेवटपर्यंत संघर्ष करून विजय मिळवू शकत नाही. शिक्षण व समाजप्रबोधनाच्या माध्यमातून सीता पैलवानासारख्या दलित माणसाची माणूस म्हणून असलेली अस्मिता जागृत केली तर असा माणुसही विद्रोही बनू शकतो. याचे सूचन मात्र या कादंबरीतील संघर्षातून बाबुरावांनी केलेले दिसून येते.

बागूलांच्या सरदार या कादंबरीतील संघर्षाला अस्पृश्यतेची चाल कारणीभूत ठरलेली आहे. आपला मुलगा पास झाल्याच्या आनंदात नारळ फोडण्यासाठी देवळात गेलेल्या गुन्हयापाशी या कादंबरीतील सखा मांगला रामदेव नावाचा उच्चवर्णीय माणूस बेदम मारतो. गावातील शिकलेली दलित तरूणांची नवी पिढी कायदेशीररित्या रामदेवाशी संघर्ष करण्याचा प्रयत्न करते परंतु हात लांबवर पोचलेले असल्यामुळे आणि आपल्या जुन्या पिढीचे सहकार्य मिळत नसल्यामुळे आणि आपल्या जुन्या पिढीची सहकार्य मिळत नसल्यामुळे या संघर्षात दलित तरूणांना यश मिळू शकत

नाही. सार्वजनिक विहीरीवर पाणी भरण्यावरून निर्माण होणारा दलित व उच्चवर्णीयांमधील संघर्ष बाबुरावांनी पाषाण या कादंबरीमधून चित्रित केला आहे.

अघोरी या कादंबरीतील अघोरी बाबा हा कोणी केवळ मांत्रिक नसून पाटलाकडून लुबाडला गेलेला आणि त्या लुबाडणुकीचा सूड घेण्यासाठी पेटून उठलेला एक शोषित माणूस आहे. या कादंबरीत बागुलांनी वर्ग संघर्षाचेच चित्रण केलेले आहे. यातून शोषित लोकांचा जीवन प्रवाहही दिसून येतो. म्हणून बागुलांच्या कादंबरीतून चित्रित होणारा संघर्ष मानवी प्रवृत्तींचा सखोल वेध घेणारा आहे. माणसा माणसांमध्ये निर्माण होणाऱ्या विशिष्ट वृत्तीप्रवृत्तींच्या मानसिक, पौराणिक, ऐतिहासिक आणि सामाजिक कारणांचा तो शोध घेणारा आहे.

पावश्या या कादंबरीमध्येही बागुलांनी बुटनेर या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून विद्रोही जाणिवेचा आविष्कार प्रकट केलेला आहे. हा खेड्यातला दलित माणूस इंग्रजांकडे नोकरी करतो म्हणून त्याला स्वत:च्या माणूसपणाची जाणीव होते. गावी आल्यावर मात्र अस्पृश्य म्हणून पायात बुटही घालू न देणाऱ्या पाटलाची त्याला चीड येते. तो म्हणतो साहेब सर्व जागाचा राजा, देशाचा राजा तो चांगला वागतो. बुट घालायला सांगतो, खायला देतो, प्यायला दारू देतो अन् हा पडक्या वाड्यात राहणारा भिकारडा सरदार पायात बूट घाटले म्हणून चिडतो. पहिलवानाचा जीव घेतो. कायदा कुठेय व्हेरीज लॉ? याच स्वरूपाच्या वाक्यांनी बाबुरावांनी विद्रोह प्रकट केलेला आहे. काही वास्तविकता त्यांच्या कथा व कादंबरीतून प्रकट होताना दिसून येते. ते स्वत: म्हणतात मला येणारे अनुभव केवढे दाहक आणि दुभंगून टाकणारे होते. ह्या अनुभवांनी अंत:करणात होणारी निर्मीती मात्र एखादे सूत्र, एखादी भावना, राग, दु:ख, खिन्नता, निराशा, अथवा काव्य, संवाद, स्वगतात आकारत. मलाही आत चाललेली अनुभवातली आगडोंब विझवून टाकणारी त्रुटिक निर्मिती नको होती. मी ठरवून टाकले आता विचार कथेत करायचा. मी तसा विचार करू लागलो, मनातल्या मनात कथा जमू लागल्या या स्वगतावरून असे लक्षात येते की बाबुराव बागुल कथालेखनाकडे का वळाले असतील व त्यांच्या लिखाणातून दलिताना क्रांतीच्या लढ्याचे नेतृत्त्व करणारे युगनायकत्त्व दिलेले आहे. म्हणून त्यांचे साहित्य

म्हणजे दलित अस्मितेचा प्रतिशोध, विद्रोही जाणिवेचा कोश, समाजपरिवर्तनाचे, दलितांच्या, वंचितांच्या व कामगारांच्या क्रांतीचे तत्त्वज्ञान होय.

बाबुराव बागूलांच्या साहित्यातील विद्रोह निव्वळ काल्पनिक स्वरूपाचा निव्वळ काल्पनिक स्वरूपाचा नाही तर तो अत्यंत वास्तवाधिष्ठित स्वरूपाचा आहे, विद्रोही मानसिकतेचे नेमके आणि जिवंत चित्रण करणारा आहे. विद्रोही व्यक्तिला प्रतिकूल परिस्थितीशी तोंड देत असताना अनेक वेळा संघर्ष करावा लागतो, व्याकुळ व्हावे लागते याचा प्रत्यय देणारा आहे. हा विद्रोह सुखकर मानवी जीवनाला अहितकारक ठरणाऱ्या गोष्टी नष्ट करू पाहणारा आणि मानवी मुल्यांवर आधारलेली नवी समाजरचना निर्माण करण्यासाठी व्यापक असा लढा देऊ पाहणारा आहे. बाबुराव बागुलांनी साहित्याच्या रूपाने दलिताना जागृतीच्या दिशेने दिलेले विद्रोह हे एक महत्त्वपूर्ण असे नवे वाङ्मयीन मूल्य आहे.

प्रबंधाच्या या सविस्तर मांडणीनंतर पुढील प्रकरणात निष्कर्ष दिले आहे.

## संदर्भ व तळटीपा


१. आदिवासी उपेक्षित समाज आणि विकास संमेलन विशेषांक '*हाकारा*', नाशिक, १९६७, पृ. २१.

२. कित्ता पृ. २४.

३. माधव पोतदार, *शाहिरांचे योगदान*, पुणे, २०१०, पृ. ८०.

४. कित्ता पृ. १६६.

५. माधव पोतदार, *संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहिरांचे योगदान*, पुणे,२०१० पृ. ४४.

६. माधव पोतदार, *संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहिरांचे योगदान*, पुणे, २०१०, पृ. ५०.

७. माधव पोतदार, *शाहिरांचे योगदान*, पुणे, २०१०, पृ. १४८.

८. माधव पोतदार, *संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहिरांचे योगदान*, पुणे, २०१०, पृ. १६७

९. माधव पोतदार, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहिरांचे योगदान, पुणे ४३, २०१०, पृ. १६०.

१०. 'हाकारा' *त्रैमासिक* जुलै, सप्टेंबर १९५५, पृ. २.

११. सुदाम जाधव, *आदिवासी साहित्य*, पृ. ६०.

१२. कित्ता पृ. ६१.

१३. संभाजी खरात, *महात्मा फुले आणि सत्यशोधकी जलसे.*

१४. श्रीराम गुंदेकर, *सत्यशोधक साहित्याचा इतिहास, खंड १*, पृ. ५२५.

१५. भगवान ठाकूर, *आंबेडकरी जलसे*, पुणे, २००५.

१६. भगवान ठाकूर, *आंबेडकरी जलसे*, पुणे, २००५, पृ. ५७.

१७. कित्ता पृ. १०१.

१८. कित्ता पृ. १०३.

१९. कित्ता पृ. १०९.

२०. कित्ता पृ. १२१.

२१. कित्ता पृ. १२४.

२२. कित्ता पृ. १२७.

२३. कित्ता पृ. १३३.

२४. कित्ता पृ. १३३.

२५. कित्ता पृ. १६२.

२६. कित्ता पृ. १७३ ते १७४.

२७. कित्ता पृ. १८९.

२८. कित्ता पृ. २११.

२९. कित्ता पृ. १५०.

३०. भाऊसाहेब खामकर, *कर्मयोगी शिक्षण महर्षी भाऊसाहेब हिरे*, पुणे, पृ. ५५.

३१. बाबुराव पवार, *सोनहिरा*, नाशिक, मार्च १९९८, पृ. ३५.

३२. अ. द. पोतनीस व इतर (संपा.), *कर्मवीर बिडकर स्मरणिका*, पृ.३१.

३३. कित्ता पृ. १२.

३४. गोविंद गारे, *आदिवासी विकासाचे शिल्पकार*, पुणे, पृ. ७४.

३५. डांगसेवा मंडळ वार्षिक अहवाल, १९७७-७८, पृ. ७९.

३६. सखाराम मराठे (संपा. ) मा. कचरूभाऊ राऊत अमृत महोत्सव विशेषांक, नाशिक, पृ. ०४.

३७. *त्रैमासिक*, एप्रिल-जून, १९९६, पृ. ८९.

३८. आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, आदिवासी सेवा संस्था पुरस्कार परिचय पुस्तिका, १९९९-२०००, पृ. ०६.

३९. गोविंद गारे, *बदलत्या उंबरठ्यावरील कोकणा आदिवासी*, पुणे, २०००, पृ. २०.

४०. कृष्णा खोपरकर (प्र. संपा.), *कॉ. नाना मालुसरे अनासक्त कर्मयोगी*, नाशिक, १९७५, पृ. १४.

४१. रंगनाथ डोळस, *पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड*, नाशिक, २००२, पृ. २७९.

४२. भावना भार्गवे, दादासाहेब गायकवाड काल आणि कार्य

४३. भार्गवे भावना, *रात्रंदिन आम्हा शांताबाई दाणी यांचे आत्मनिवेदन*, १९९०, पृ. ८९.

४४. कृष्णा खोपरकर (संपा.), *कॉ.नाना मालुसरे अनासक्त कर्मयोगी*, नाशिक, १९७५, पृ. ८०, ८५

४५. कृष्णा खोपरकर (संपा), कॉ नाना मालुसरे अनासक्त कर्मयोगी, नाशिक, १९७५, पृ. १६९.

४६. बाबूराव बागूल, *जेव्हा मी जात चोरली होती*, मुंबई,१९७६, पृ. १३२.

४७. कृष्ण किरवले, *समग्र लेखक बाबुराव बागुल*, पुणे, २००२, पृ. ४८-१४४.

४८. अलका, दिवाळी अंक, १९७९.

४९. बाबुराव बागुल (संपा.) पावश्या आम्ही नियतकालिक मे ते सप्टेंबर १९७१.

## प्रकरण सातवे

# उपसंहार

'इतिहास म्हणजे सनावळ्या', इतिहास म्हणजे राजाची कहानी किंवा गतकालीन राजकारण या इतिहासाहविषयीच्या कल्पना आता आमूलाग्र बदलल्या आहेत. इतिहास म्हणजे काय या मूलभूत प्रश्नाच्या विचाराला तात्त्विक बैठक प्राप्त झाली आहे. इतिहास ही मानवी जीवनाची सर्वांगीण कथा आहे. व्यक्ती, समाज, स्थळ आणि काल यांचे संदर्भ घेऊन इतिहास घडत असतो. भूतकाळातील घटनांचा, प्रसंगाचा, विचारांचा, संस्कृतीचा आणि त्याविषयीच्या इतिहासाच्या स्मृतींचा तेव्हाच खरा अर्थबोध होतो. जेव्हा त्या स्मृतींना किंवा आठवणींना काळाचा संदर्भ असतो. एकविसाच्या शतकाच्या प्रारंभी विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या अभ्यासक्रमांमध्ये काही मूलभूत बदलांची प्रक्रिया सुरु केली. इतिहास केवळ गतकाळाची गोष्ट, राजघराण्यांची कहाणी, घडलेल्या घटनांचा इतिवृन्तांत हा पारंपारिक समज आता इतिहास जमा झाला असून नव्याने अभ्यास संशोधन करणाऱ्या संशोधकांनी त्यापासून बोधही घेतला आहे.

नाशिक जिल्ह्याचे ऐतिहासिक महत्त्व अनन्य साधारण आहे. रामायण काळापासून त्या शहराचा उल्लेख असलेला दिसून येतो. तसेच भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासातही नाशिक शहरात झालेल्या ऐतिहासिक घडामोडींचा उल्लेख आहे. परंतु या जिल्हयात वंचित समाजाविषयी या समाजजीवनातील परिवर्तनाविषयी सत्याग्रह, चळवळी याविषयी फारसा उल्लेख (अभ्यास) असलेला दिसत नाही. प्रस्तुत संशोधनातून संशोधकाने नाशिक जिल्हयातील वंचितांसाठी केलेल्या कार्याचा व त्यामुळे वंचितांमध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास केलेला आहे.

नाशिक जिल्हयात विविध ठिकाणी २० व्या शतकात शेतकरी चळवळी, जमीन हक्क विषयक चळवळी, शेतमजुरांच्या चळवळी, दलित (अस्पृश्य) चळवळ, आदिवासींच्या चळवळी, औद्योगिक कामगार चळवळी, शैक्षणिक चळवळी व

सुरूवात इत्यादी चळवळीत व समाज परिवर्तनासाठी प्रयत्न झालेला आहे. यासाठी समाज सुधारकांनी, नेत्यांनी, राजकीय कार्यकर्त्यांनी विशेष योगदान दिलेले आहे.

जातिव्यवस्था, गरिबी, दारिद्रय, भेदभाव इत्यादी घटकांमुळे समाजातील एक वर्ग नेहमी वंचित असलेला दिसून येतो. नाशिक जिल्ह्यात संपूर्ण विसाव्या शतकात शोषित, वंचित समाजासाठी विविध क्षेत्रातून सुधारकांच्या प्रयत्नांमुळे सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात विविध चळवळी, सत्याग्रह, मोर्चे इत्यादींमुळे जो बदल घडून आला याचा संशोधनात्मक अभ्यास संशोधकाने प्रस्तुत प्रबंधात केलेला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टये

संशोधकाने प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी पुढील उद्दिष्ट्ये डोळयासमोर ठेवली आहेत.

१. नाशिक जिल्हयातील वंचितांचे गट (प्रमुख) त्यांची वैशिष्ट्ये आणि त्यांच्यावरील निर्बंध जाणून घेणे.

२. नाशिक जिल्हयातील वंचितांच्या प्रमुख गटाच्या हितासाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्था, संघटना, व्यक्ती यांच्या कार्यावर दृष्टिकोन टाकणे..

३. नाशिक जिल्हयातील वंचितांच्या प्रमुख गटाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक चळवळींचा अभ्यास करणे.

४. नाशिक जिल्हयातील वंचित समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था, संघटना यांना आलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

५. नाशिक जिल्हयात विसाव्या शतकात वंचित समाजासाठी झालेल्या कार्यामुळे व चळवळीमुळे वंचितांच्या समाज जीवनात झालेले परिवर्तन अभ्यासणे.

## संशोधनाची गृहीतके

१. नाशिक जिल्हयातील वंचितांच्या समस्यांचे पूर्णपणे निराकरण झालेले नाही. वंचितांच्या समस्येच्या मुळाशी आर्थिक समस्या आहे.

२. नाशिक जिल्हयातील वंचितांच्या विकासासंबंधी कार्य करणाऱ्या धोरणांमध्ये बदल झालेला नाही.

३. नाशिक जिल्हयात २० व्या शतकात वंचितांच्या हितासाठी कार्य करणारे गट उदयास आले म्हणून वंचित समाज जीवनात परिवर्तन झालेले आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रबंधासाठीची माहिती गोळा करताना उपलब्ध साधनांचे परिशीलन करुन मिळविलेल्या साधनांपैकी नेमकी कोणती साधने घ्यायची यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती वापरली आहेत. प्रबंधाचा विषय वंचितांच्या इतिहासाशी संबंधित असल्याने त्याचा प्रारंभ अंतोनियो ग्रामची यांच्या सबार्ल्टन मांडणीपासून सुरुवात केली आहे.

संशोधनाचे स्वरुप लक्षात घेऊन स्वतःलाच काही प्रश्न विचारुन प्रश्न पद्धती, तज्ज्ञ व जाणकार लोकांच्या मुलाखती तसेच सामाजिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेली मुलाखत पद्धती वापरली आहे. सर्वेक्षण अथवा निरीक्षण पद्धती, प्रश्नावली पद्धती आणि संशोधनासाठी विशेष आवश्यक असलेली महत्त्वाची टिपणे तयार करण्यासाठी वापरावयाची पुष्तिका पद्धती वापरली आहे. त्याचप्रमाणे कामगार संघटना, चळवळीतील कार्यकर्ते या सर्वांच्या भेटी घेण्यासाठी क्षेत्रभेट पद्धतीचा अवलंब केला आहे. क्षेत्रभेटीचा अवलंब करुन नाशिक जिल्ह्यातील वंचितांच्या प्रमुख गटांच्या सामाजिक जीवनामध्ये कोणता बदल झाला आहे. यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्था संघटना व त्यांचे कृतिशील नेते यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. त्याविषयीची यादी व प्रश्नावली प्रबंधांच्या अखेरीस परिशिष्ठांमध्ये दिली आहे.

## शिफारशी

ग्रामीण आणि आदिवासी भागातील बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी उपाय करता येतील

१. आद्यौगिक तंत्रात बदल-उत्पादना तंत्रज्ञानामुळे देशात गरजा भागविणे आवश्यक आहे. भांडवल केंद्रीत तंत्रज्ञानाचा ऐवजी श्रम केंद्रीत तंत्रज्ञानाचा

वापर केल्यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील लोकांना रोजगार मिळू शकेल म्हणून आयोगिक तंत्राच्या बदलास प्रोत्साहन देण्यात यावे.

२. औद्योगिकीकरण करण्यात यावे. औद्यागिकीकरणामुळे अधिक उद्योग असतील तर रोजगाराच्या अधिक संधी प्राप्त होतील. विशेषतः व्यावसायीक आणि तांत्रिक शिक्षण हे स्त्री आणि पुरुषांना देण्यात यावे तसेच कुशल आणि अकुशल्ल अशा श्रमिकांना रोजगार पाहिजे असेल तर जलद औद्योगिकीकरणामुळे ही समस्या सोडविता येईल. आद्यौगिकीकरणामुळे आरोग्य सेवा, शाळा, महाविद्यालये, बँका याच्यात वाढ होते यामुळे सुशिक्षितांना रोजगार संधी उपलब्ध होते. आदिवासी आणि ग्रामीण भागातील रोजगाराची समस्या सोडविण्यासाठी कुटीर उद्योगांच्या विकासावर भर देणे आवश्यक आहे. या करीता सरकारने त्यांना कर्ज उपलब्ध करुन द्यावे व त्यांनी तयार केलेल्या वस्तूला बाजारपेठ उपलब्ध करुन दिनी तर बेराजगारीचा प्रश्न सोडविता येईन.

३. व्यावसायीक व तांत्रिक प्रशिक्षण संस्थाची स्थापना करणे-अशा संस्थानची स्थापना करुन या संस्थानमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होतील जेव्हा महाविद्यालय आणि प्रशिक्षण संस्था या मोठ्या कारखान्यांना जोडणे आवश्यक आहे. या रोजगाराच्या मुळे आदिवासी आणि ग्रामीण भागातील बेकारीची समस्या दूर होऊ शकेल.

४. कुटीरउद्योग आणि लघुउद्योगांचे पुनरुज्जीवन कुटीर आणि लघुउद्योगाचा विकास झाला पाहिजे अशा उद्योगाच्या विकासाकरीता शासना खाजगी क्षेत्राला प्राध्यान्य देऊन त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

५. स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणाऱ्या सरकारने आदिवासी आणि ग्रामीण भागातील युवकांमध्यसे स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देणे नवीन उद्योजकांना निर्माण होणाऱ्या अडचणी सोडावण तसेच त्यांना कच्चामालाची कर्ज विषयक समस्या असतील तर त्या सोडविण्यासाठी सरकारने मदत करणे.

६. रोजगार कार्यक्रमाना आधिक महत्त्व-शेती क्षेत्रामध्ये असलेले हंगामी बेकार यांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी सिंचन, रस्ते, पूर नियंत्रण, वीज, ग्रामीण विद्युतीकरण या सारख्या कार्यक्रमातून रोजगार उपलब्ध करु देता येऊ शकतो.

## गृहितकांची पडताळणी

'नाशिक जिल्हयाच्या विशेष संदर्भात वंचितांच्या समाजजीवनातील परिवर्तनाचा अभ्यास (कालखंड २० वे शतक)' हा विषय अभ्यासताना काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. जी गृहितके संशोधन-विषयासाठी निवडली होती. त्यांची पुर्तता झाली आहे. तसेच गृहितके क्र. २ मध्ये बदल झाला आहे. तो म्हणजे नाशिक जिल्ह्यातील वंचितांच्या विकासासंबंधी कार्यकरणाऱ्या शैक्षणिक, शासकीय व स्वयंसेवी संस्था यांच्या धोरणात अमुलाग्र बदल झाला आहे.

## निष्कर्ष

०१) वंचितांची चळवळ नाशिक परिसरात शेतकरी मजूर, कामगार यांच्या बळावर उभी राहिली. त्यांनी शांततापूर्ण मार्गाने चळवळ करुन किंवा सत्याग्रह करुन आपले उद्दिष्ट काही प्रमाणात साध्य केले.

०२) औद्योगिक वसाहतीत काम करणारा कामगार वर्ग हा काही प्रमाणात संघटित आहे. संघटित असलेला वर्ग नोकरीमध्ये कायम आहे. मात्र हंगामी कंत्राटी व स्थलांतरित झालेला मजूर वर्ग यांची परिस्थिती दैयनिय आहे.

०३) आदिवासी वर्गातील स्त्री कामगार वर्गाची परिस्थिती फारशी बदललेली नाही. आदिवासींच्या सामाजिक जीवनात अजूनही ती चूल आणि मूल यातच अडकलेली आहे. मात्र ज्या आदिवासींनी शहराकडे स्थलांतर केले. त्यांनी शासकीय योजनांचा, आश्रमशाळांचा व वसतीगृहांच्या सहाय्याने आपले शिक्षण पूर्ण करुन विशेषतः आदिवासी मुली पोलिस खाते, महसूल, पाटबंधारे विभाग या विभागांमध्ये नोकरीमधे रुजू झाल्या आहेत.

०४) आधुनिकीकरणाने कामगार वर्गाच्या जीवनावर मूलभूत परिणाम झाले आहे. नाशिक येथे इंडिया सिक्युरेटी प्रेसची स्थापना झाल्यावर पहिल्या टप्प्यात तेथे स्थानिक मजूर म्हणून आदिवासी व वंचित समाजातून भरती करण्यात आली. त्याअनुषंगाने लघुद्योगांची निर्मिती झाली. मालेगाव येथे रावळ गाव चॉकलेटचा उद्योग सुरु झाला, साबण निर्मितीचे कारखाने सुरु झाले, न्यु करंसी नोट प्रेस सुरु झाली, तेल उत्पादक कारखाने, भात गिरण्या इत्यादी उद्योग सुरु होऊन किमान २० ते २५ हजार आदिवासी बांधवांना रोजगार मिळाला. परिणामी आदिवासींच्या आर्थिक जीवनात स्थित्यंतर घडून आले.

०५) भारतीय संरक्षण विभागाचा 'हिंदुस्थान ऍरोनॉटिक्स लिमिटेड' हा विमान बांधणीचा कारखाना नाशिक येथे सुरु झाला. तेथे कामगारांची मोठी वस्ती तयार झाली. तिला ओझर टाऊनशीप असे नाव आहे. याठिकाणी घरकाम करणाऱ्या आदिवासी व स्थानिक स्त्रियांची संख्या मोठी आहे.

०६) नाशिक जिल्ह्याचा औद्योगिक विस्तार व्हावा म्हणून दादासाहेब पोतनीस यांनी अर्थपूर्ण योगदान दिले. गावकरी, सकाळ, लोकमत या वृत्तपत्रांच्या प्रेस सातपुर औद्योगिक वसाहतीमध्ये तयार झाल्या. आणि कामगारांची परिस्थिती बदलू लागली. परिणामी तीर्थक्षेत्र नाशिकची ओळख औद्योगिकनगरी म्हणून होऊ लागली.

०७) नाशिक जिल्ह्याची सांस्कृतिक ओळख वेगळी आहे. आदिवासींचे सांस्कृतिक जीवन हे पर्यटनाचा अविभाज्य भाग बनले आहे. डोंगरदेवाची यात्रा पाहण्यासाठी कित्येक पर्यटक आदिवासी पाडयांवर जातात. आदिवासींच्या आर्थिक स्थित्यंतरामध्ये दादासाहेब बिडकर, दत्तोपंत आभोणकर, विष्णु नलपाठकर यांनी आदिवासी विकासाच्या जवळ जवळ सोळा संस्था स्थापन केल्या आहेत. त्यांच्यामार्फत विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी, सामुदायिक विवाह सोहळा आयोजन करणे, आदिवासींमधे मुलभूत परिवर्तन घडून आणण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करणे. याकामी वर उल्लेख केलेल्या मान्यवरांचे योगदान मोठे आहे.

०८) गावगाडयातील दलित समाज आता पूर्वीची कामे करत नाही. त्यांच्यामधे गायन, सत्यशोधकी जलसे, शाहिरी, चित्रपट गीत, यांच्या गायन, वादनामध्ये तसेच अभिनय क्षेत्रामध्ये तो आता अग्रेसर झाला आहे. नारायण शिंदे व प्रल्हाद शिंदे यांना तबला प्रशिक्षण देण्याचे काम नाशिकच्या कृष्णाबाई जाधवांनी केले. रंगनाथ जाधव हे आता प्रसिद्ध कव्वाली गायक आहेत. केरुजी घेंगडे यांनी आपल्या गीतांमधून अनिष्ठ प्रथांवर टिका करुन समाजप्रबोधन केले. वामन दादा कर्डक यांनी समाज प्रबोधनातून आंबेडकरी विचार घरोघरी नेला. आदिवासींचे नाट्य प्रयोग आता नाट्यसंघ स्थापनेत रुपांतरीत झाले. प्रतापसिंग परदेशी यांचे लोकनाट्य कला पथक, लोकशिक्षणात अग्रेसर झाले. अक्षय नाट्यमंच या संस्थेने दलितांच्या समस्यांना रंगभूमी उपलब्ध करुन दिली. नाशिकच्या पेठ, सुरगणा व इतर आदिवासी गावांमधे पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्यायी तत्त्वज्ञानाने प्रवेश केला आणि आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाचे स्वरुप 'Wine To Devine' असे झाले. पावसाचे पाणी पिण्यासाठी कसे वापरावे व टिकवावे याविषयी स्वाध्यायींचे प्रयोग आदिवासींनी घराघरात राबविले.

०९) नाशिक जिल्हयाचे आर्थिक व शैक्षणिक परिवर्तन हे अमूलाग्र आहे. सहकारी साखर कारखाने, सहकारी बँक, विविध कार्यकारी सोसायटी, शेती उत्पादक व शेती पूरक सहकारी संस्था जलसिंचनामुळे शेतीत झालेला बदल परिणामी नगदी व व्यापारी पिकांना दिलेले प्राधान्य यामुळे नाशिकची शेती उत्पादने उदा. द्राक्षे, वाईनरी उद्योग जगप्रसिद्ध झाला आहे. लिव्हिंग फुड व ईपिक या खाद्यसंस्कृतीचा पुरस्कार करणाऱ्या वृत्तवाहिन्यांनी याउद्योगांची व स्थानिक आदिवासींच्या खाद्यसंस्कृतीची दखल घेऊन त्याविषयी स्वतंत्र कार्यक्रम सादर केले आहेत.

१०) शैक्षणिक स्थित्यंतरामध्ये नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेने प्राथमिक ते उच्च माध्यमिक क्षेत्रात घेतलली झेप, शिक्षणाचा विचार

समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत घेऊन जाण्यासाठी १९०७ केलेली सुरुवात, बहुजन समाजातील थोर शिक्षणप्रेमी भाऊसाहेब हिरे, रावसाहेब थोरात, धर्मा बागुल, परशराम तिडके, काकासाहेब वाघ या प्रभुतींनी 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' याउक्तीप्रमाणे काम केले. एका अर्थाने महात्मा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविचार, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा शिक्षणवारसा त्यांनी नाशिक परिसरात समाजाचा शेवटच्या घटकांपर्यंत नेला.

११) आदिवासी सेवा समितीने केलेले कार्य, पूर्वप्राथमिक बालमंदिर ते उच्च शिक्षण, डांग सेवा मंडळाचे कार्य, नाशिक जिल्हा मराठा शिक्षण मंडळाचे कार्य या सर्व संस्थांच्या शैक्षणिक व आर्थिक योगदानामुळे संपूर्ण नाशिक जिल्हा शिक्षण क्षेत्रात अग्रभागी आला आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या निर्मितीने, बागलाण तालुक्यातील विधायक कार्यसमितीच्या शैक्षणिक कार्यामुळे वंचितांना शिक्षणाची प्रवेशद्वारे खुली झाली. परिणामी, नाशिक जिल्ह्यातील वंचित समाजातील तरुण उच्चशिक्षित होऊन स्पर्धापरीक्षा, विविध शासकीय पदांवर रुजू होण्यासाठीच्या परीक्षा देऊ लागला. याकामी वर उल्लेख केलेल्या कृतीशील शिक्षणतज्ज्ञांनी अर्थपूर्ण योगदान दिले आहे.

१२) वंचितांचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाचे चित्रण विविध साहित्यिक व सुधारकांनी आपल्या साहित्यात केलेले आहे. थोर साहित्यीक कुसुमाग्रजांची कर्मभूमी ही नाशिक आहे. पोवाडा हे बहुजन समाजाला लाभलेले बहुमोल रत्न आहे. शाहीर पिराजीराव सरनाईक यांनी पोवाडयाच्या माध्यमातून शेती, ब्रिटिशांनी स्थानिक जनतेवर केलेले अत्याचार तसेच स्थानिक सावकारांनी आदिवासी व बहुजनांची कशी पिळवणूक केली याविषयीचे चित्रण केले.

१३) अमर शेख यांनी गीतांमधून शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या समस्या, त्यावर एकत्र येणे हा उपाय, शाहीर विठ्ठल उमप यांनी अतिवृष्टी झाल्यावर शेतकऱ्यांची काय परिस्थिती झाली, शाहिर लहरी हैदर यांनी औद्योगिक

क्रांतीने हस्त व कुटीर उद्योगाचा बळी कसा घेतला याविषयी केलेली मांडणी, शाहीर अनिज नदाफ यांनी कष्टकरी जनतेच्या मांडलेल्या समस्या आदिवासींच्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनाचे चित्रण करणारे आहेत.

१४) डॉ. आंबेडकरांनी, साने गुरुजींनी केलेला काळाराम मंदिराचा सत्याग्रह, सत्यशोधकीय जलसे, वामनदादा कर्डक, भाऊसाहेब हिरे, दादासाहेब बिडकर, कचरुभाऊ राऊत, हरीभाऊ महाले, ए. टी. पवार, दादासाहेब गायकवाड, शांताबाई दाने, क्रॉमेड नाना मालुसरे, बाबुराव बागुल या सर्व साहित्यीकांनी आपल्या साहित्यातून व कार्यातून केलेली मांडणी सुखकर मानवी जीवनाला अहितकारक ठरणाऱ्या गोष्टी नष्ट करणाऱ्या होत्या. तसेच मानवी मुल्यांवर आधारलेली नवीन समाज रचना निर्माण करण्यासाठी व्यापक असा समाज लढा उभा केला.परिणामी दलित व वंचित तथा बहुजनांना समाज जागृतीच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी महत्त्वपूर्ण असे वाङ्मयीन मुल्य आपल्या साहित्यातून निर्माण करुन दिले. परिणामी बहुजन समाज सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रात दमदार पाऊल ठेवू लागला आहे.

१५) प्रस्तुत संशोधन हे जरी वंचित, बहुजन, आदिवासींच्या परिवर्तनाविषयीचे असले तरी एका अर्थाने ते नाशिक जिल्ह्याचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व स्थानिक इतिहासाविषयीच्या मांडणीचा तो एक भाग आहे. म्हणून प्रस्तुत प्रबंध हा वंचितांच्या (बहुजन, आदिवासी, व सर्वसामान्यांच्या) जाणिवांची मांडणी करणारा आहे.

# संदर्भ ग्रंथ सूची


**अ) प्राथमिक साधने (अप्रकाशित)**

1. Home Department Special File No. 800 (53) II/1934, Extracts from the District Magistrate, Nashik.
2. Home Department Special File No. 150 (39) II/1930, Forest Movements.
3. Home Department Special File No. 924 (I & II) 1940. Weekly Confidential Report, 5 November 1941.

**आ) प्राथमिक साधने (प्रकाशित)**

१. आदिवासी विकास विभाग, *महाराष्ट्र शासन मुंबई, आदिवासी सेवक व आदिवासी सेवा संस्था पुरस्कार परिचय पुस्तिका १९९९-२०००*, (संपा.) नाशिक डिस्ट्रीक्ट्स गॅझेटिअर, मुंबई, १९७५.

२. जेम्स कॅम्बलपेल (संपा.), *गॅझेटिअर ऑफ इंडिया*, बॉम्बे प्रेसिडेन्सी, नाशिक, डिसेंबर १९८३.

३. नाशिक जिल्हा परिषद, *रौप्य महोत्सव स्मरणिका*, नाशिक, १९८७.

४. महाराष्ट्र शासन, *जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन*, जिल्हा

५. सांकलिया देव, *रिपोर्ट ऑन द एक्सकॅव्हेशन ऑफ जोर्वे*, डेक्कन कॉलेज, पुणे, १९५५.

**इ) प्राथमिक प्रकाशित साधने (मराठी)**

१. डांगसेवा मंडळ, *नाशिक : वार्षिक अहवाल*, नाशिक, १९७१-७२.

२. पाटील उत्तम शामराव, *वार्षिक अहवाल आदिवासी सेवा समिती*, नाशिक, १९५४-१९७२.

३. नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, *नाशिक वार्षिक अहवाल १९७१-१९७२*, नाशिक.

४. हिरे प्रशांत व्यंकटराव, *महात्मा गांधी विद्यामंदिर वार्षिक अहवाल*, १९८०-२००१.

## ई) प्राथमिक प्रकाशित साधने (इंग्रजी)

1. Ranajit Guha, ed. *Subaltern Studies I : Writings on South Asian History & Society*, New Delhi : Oxford University Press India, 1982.
2. Ranajit Guha, ed. *Subaltern Studies II*, New Delhi: Oxford University Press India, 1983.
3. Ranajit Guha, ed. *Subaltern Studies III*, New Delhi: Oxford University Press India, 1984.
4. Ranajit Guha, ed. *Subaltern Studies IV*, New Delhi: Oxford University Press India, 1985.
5. Ranajit Guha, ed. *Subaltern Studies V*, New Delhi: Oxford University Press India, 1987.
6. Guha, Ranajit and Gayatri Chakravorty Spivak, eds. *Selected Subaltern Studies*, New York : Oxford University Press, 1988.
7. Ranajit Guha, ed. *Subaltern Studies VI*, New Delhi : Oxford University Press India, 1989.
8. Partha Chatterjee and Gyanendra Pandey, eds. *Subaltern Studies VII*. New Delhi : Oxford University Press India, 1992.
9. David Arnold and David Hardiman, eds. *Subaltern Studies VIII : Essays in Honour of Ranajit Guha*, New Delhi : Oxford University Press India, 1994.
10. Shahid Amin and Dipesh Chakrabarty, eds. *Subaltern Studies IX*, New Delhi : Oxford University Press India, 1996.
11. Guha, Ranajit, ed. *A Subaltern Studies Reader : 1986-1995*. Minneapolis : University of Minnesota Press, 1997,
12. Gautam Bhadra, Gyan Prakash, and Susie Tharu, ed. *Subaltern Studies X*, New Delhi : Oxford University Press, 1999.

13. Partha Chatterjee and Pradeep Jeganathan, ed. *Subaltern Studies XI : Community, Gender and Violence*, New York : Columbia University Press, 2000.

14. Shail Mayaram, M. S. S. Pandian, and Ajay Skaria, ed. *Subaltern Studies XII : Muslims, Dalist and the Fabrications of History,* New Delhi : Permanent Black and Ravi Dayal Publisher, 2005.

**उ) दुय्यम प्रकाशित साधने**

१. आगलावे सरोज, *जोतिराव फुले सामाजिक तत्त्वज्ञान*, सुगावा प्रकाशन, पुणे, २००३.

२. आंधळे पांडुरंग, *क्रांतिवीर वसंतराव नाईक*, सूर्यकिर्ती प्रकाशन, नाशिक, २००२.

३. कापडणीस शं. क., *बागलाण इतिहास दर्शन*, परफेक्ट प्रिंटर्स सटाणा, १९९९.

४. कीर धनंजय, *महात्मा फुले*, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, तृतीयावृत्ती, १९९६.

५. कीर धनंजय, *डॉ.बाबासाहेब आंबेडकर*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चतुर्थावृत्ती, २००६.

६. कुलकर्णी प. वा., *पराक्रमी युवक : अनंत कान्हेरे*, भारतीय इतिहास संकलन समिती, नाशिक, तृतीयावृत्ती, २००९

७. कांडेकर ए. वाय., *भारतीय समाज व समस्या*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८. खरात शंकरराव (संपा.), *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे*, इंद्रायणी साहित्य, मुंबई, २०१४.

९. खामकर भाऊसाहेब, *कर्मवीर शिक्षण महर्षी भाऊसाहेब हिरे*, वायूदूत प्रकाशन, पुणे.

१०. खोपरकर कृष्णा (प्र. संपा.), *कॉ. नाना मालुसरे अनासक्त कर्मयोगी*, कॉम्रेड नाना मालुसरे चॅरिटेबल संस्था, नाशिक, १९७५.

११. गर्गे स. मा., *भारतीय समाजविज्ञान कोश, खंड-१*, ज्ञानेश प्रकाशन, पुणे, १९८६.

१२. गायकवाड प्रदिप, *कामगार चळवळ*, क्षितीज पब्लिकेशन, नागपूर, द्वितीयावृत्ती, २००५.

१३. गारे गोविंद, *आदिवासी प्रश्न*, आदिम प्रकाशन पुणे, १९७५.

१४. गारे गोविंद, *बदलत्या उंबरठ्यावरील कोकणा आदिवासी*, श्री विद्या प्रकाशन, पुणे, २०००.

१५. गारे गोविंद, *आदिवासीचे शिक्षण*, साकेत प्रकाशन औरंगाबाद, १९९७.

१६. गारे गोविंद, *आदिवासी विकास योजना*, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे द्वितीयावृत्ती, १९९९.

१७. गारे गोविंद, *महाराष्ट्रातील आदिवासी जमाती*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००२.

१८. गारे गोविंद, *आदिवासी विकासाचे शिल्पकार*, श्री विद्या प्रकाशन, पुणे.

१९. गेल ऑमव्हेट (अनु. दिघे पी. डी.), *वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड*, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५.

२०. गोवर्धने सुमन हुकमतराव, *लढवय्या, कॉ. पुंजाबाबा गोवर्धने*, शब्द सुमन प्रकाशन, नाशिक, २०१८.

२१. जोशी शरद, *स्त्रियांचा प्रश्न : चांदवड शिदोरी*, शेतकरी प्रकाशन, अलिबाग, १९८६.

२२. जोशी प्र. न., *अर्वाचीन महाराष्ट्र सांस्कृतिक दर्शन*, नरेंद्र प्रकाशन, पुणे, १९७८.

२३. जोशी महादेव शास्त्री (संपा.) *भारतीय संस्कृती कोश, खंड-१*, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, १९८२.

२४. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा), *मराठी विश्वकोश, खंड-२*, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई. १९७९.

२५. जोशी श. ना., *आत्माराम रावजी भट : व्यक्ती आणि कार्य*, चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रीज, टिळकरोड, पुणे, १९८०.

२६. ठाकूर भगवान, *आंबेडकरी जलसे*, सुगावा प्रकाशन, पुणे, २००५.

२७. डावरे पुरुषोत्तम, *कॉ. माधवराव गायकवाड*, न्यू एज प्रिंटींग प्रेस, प्रभादेवी, मुंबई, २०११.

२८. डोळस रंगनाथ, *पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड*, युगांतर प्रकाशन, नाशिक, २००२.

२९. डोळस रंगनाथ, लिंबाळे शरणकुमार (संपा.), *सामाजिक चळवळी*, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २०११.

३०. दास्ताने संतोष संपत, *भारत एक पहाणी*, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९९१.

३१. धारणकर सरल, *दादासाहेब बिडकर : वसा आदिवासी सेवेचा*, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१२.

३२. धारणकर सरल व इतर (संपा.), *येवले सांस्कृतिक व ऐतिहासिक दर्शन*, भारतीय इतिहास संकलन समिती, नाशिक, २०१३.

३३. निंबाळकर वामन (संपा.), *डॉ. आंबेडकरांची दादासाहेब गायकवाडांना पत्रे*, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, २०११.

३४. पगारे हरिभाऊ, *दादासाहेब गायकवाड जीवन व कार्य*, अनिल प्रकाशन, नाशिक, १९८७.

३५. पवार सुधाकर, *कर्मवीर भाऊसाहेब हिरे*, ज्योती प्रकाशन, नाशिक, १९९८.

३६. पवार बाबूराव, *सोनहिरा*, प्रताप प्रकाशन, नाशिक, १९९८.

३७. पवार पंडितराव (संपा.), *शतायुषी कर्मयोगी दुलाजी नाना पाटील*, मराठा विद्या प्रसारक समाज प्रिंटींग प्रेस, नाशिक, २०१०.

३८. पाटील टी. एस., *आठवणीतले दिवस*, सुदर्शन प्रकाशन, सावरकर नगर, नाशिक, २०११.

३९. पाटील राहुल (संपा.), *बाळासाहेब वाघ : कार्य आणि कर्तृत्व*, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१२.

४०. पोतदार माधव, *संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहिरांचे योगदान*, अनुबंध प्रकाशन, पुणे, २०१०.

४१. फडणवीस दि. वा. (संपा.), *महाराष्ट्र राज्य ट्रेड युनियन*, सुरेख प्रकाशन, महल रोड, नागपूर, १९८०.

४२. फडके सुधीर, *कर्मवीर काकासाहेब वाघ : काल व कार्य*, ना. जि. म. वि. प्रसारक समाज, नाशिक, १९७४.

४३. फडके य. दि., *२० व्या शतकातील महाराष्ट्र, खंड-२*, श्री विद्या प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, १९९१.

४४. बाबर सरोजिनी, *आदिवासी सण व उत्सव*, महाराष्ट्र राज्य लोक साहित्यमाला, पुष्प : २४,

४५. सेन सुकामेल (अनु. हर्डिकर), *भारतीय कामगार चळवळ*, न्यू एज प्रिंटींग प्रेस, प्रभादेवी, मुंबई, प्रथमावृत्ती, डिसेंबर, २०००.

## ऊ) स्मरणिका

१. तांबोळी एन. एस., *जनस्थान*, भारतीय इतिहास संकलन समिती, नाशिक जिल्हा, २००५.

२. पोतनीस अ. द. (संपा.), *कर्मवीर दादासाहेब बिडकर अमृत महोत्सव स्मरणिका*, १९८६.

३. बागूल बाबूराव व इतर (संपा.) *दलित, आदिवासी, ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलन*, नाशिक, द. आ. ग्रा. सं. सा. सं. समिती, जून १९८८.

४. भामरे के. जी., व जाधव एम. डी. (संपा.), *व्यक्तिविशेष*, विश्वभारती मुद्रणालय, मालेगांव, १९७६.

६. मराठे शंकर (संपा), *दलित मित्र व आदिवासी सेवक मा. कचरुभाऊ राऊत, अमृत महोत्सव विशेषांक*, रिप्लिका प्रिंटर्स, नाशिक.

७. शिरवाडकर वा., *जीवनगंगा*, नाशिक महानगरपालिका, नाशिक, १९६४.

**ए) पीएच. डी अप्रकाशित प्रबंध**

१. गायकवाड सुदिन, ''महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास (सन १९६० ते सन २०१०)'', (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१०.

२. सोनवणे डी. ए., ''नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकासाच्या निवडक योजनांची परिणामकारकता (कालावधी सन १९९१ ते सन २०११)'' (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २०१८.

**ऐ) विशेषांक**

१. मटाटकर रा. के. (प्रका.), *दिशा, आदिवासी व उपेक्षित समाज*, अस्मिता आणि विकास संमेलन, नाशिक, २००१.

२. मुरारकर रा. के. (प्रका.), *हाकारा विशेषांक*, जानेवारी-जून २००१. नाशिक.

## परिशिष्टे एक

### १. नमुना प्रश्नावली : एक

१. तुम्ही कार्यरत असलेल्या कामगार संघटनेची स्थापना, नाव वगैरे माहिती.

२. कामगार संघटनेकडे (चळवळीकडे) आकर्षित होण्याची कारणे.

३. तुम्ही कार्यरत असलेल्या कामगार संघटेना नाशिक शहर व परिसरातील थोडक्यात इतिहास सांगा.

४. कामगार संघटनेत काम करताना आलेले काही अनुभव स्पष्ट करा.

५. तुम्ही कार्यरत असलेली कामगार संघटना कोणत्या क्षेत्रात काम करते?

६. तुम्ही कार्यरत असलेल्या कामगार संघटनेने संप, टाळेबंदी वगैरे सारख्या चळवळीत कार्य केले आहे काय आणि ते कोणत्या उद्योगक्षेत्रात व कोठे केले?

७. तुम्ही सहभागी असलेल्या कामगार संघटनेने औद्योगिक, सहकारी, सरकारी, खासगी वगैरे ठिकाणी कामगारांचे नेतृत्व करताना संप वगैरे घडवून आणले आहेत काय? कोणत्या ठिकाणी?

८. संप करण्यासाठी संघटनेचा आदेश (उद्देश) होता की, कामगारांनी स्वेच्छेने संप केला होता काय?

९. कामगारांनी संप केला त्यावेळी संघटनेने कामगारांना मदत कशी व कोणत्या स्वरुपात केली?

१०. कामगारांच्या संपाचे नेतृत्व करताना आपणास काही बऱ्यावाईट प्रसंगांना तोंड द्यावे लागले काय?

११. कामगारांच्या बौद्धिक, शारीरिक विकासासाठी आपण व संघटना काही उपक्रम राबवते काय? असल्यास कोणते?

## २. नमुना प्रश्नावली : दोन

१. मुलाखत घेणाऱ्याचे नाव.

२. मुलाखत देणाऱ्याचे नाव व हुद्दा.

३. कामगार म्हणून काम करीत असलेल्या उद्योग समूहाचे नाव.

४. कारखान्यात काम करण्याचा एकूण अनुभव.

५. कारखान्यात काम करताना येणाऱ्या आर्थिक अडचणी कोणत्या?

६. कारखान्यात काम करताना येणाऱ्या सामाजिक अडचणी कोणत्या?

७. कामगार म्हणून काम करताना असलेल्या कौटुंबिक समस्या.

८. कामगार असल्यामुळे आपल्या कुटुंबातील मुलांना येत असलेल्या शैक्षणिक अडचणी?

९. कामगार म्हणून काम करताना कारखान्यातील वातावरणामुळे आरोग्यावर होणारे परिणाम?

१०. कामगार म्हणून काम करताना संप, टाळेबंदी, आर्थिक महामंदी वगैरे प्रसंगी आपणास कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते?

११. कामगारांकडे पाहण्याची शासनाची व उद्योग मालकाची भूमिका कोणत्या प्रकारची असते?

१२. कामगार म्हणून काम करताना उत्पादन व्यवस्थेतील परिवर्तनामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी कोणत्या प्रकारच्या आहेत?

१३. आधुनिक काळातील नवीन तंत्रज्ञान, यासंबंधी प्रशिक्षण, सोयीसुविधा पुरविल्या जातात काय?

१४. कारखान्यातील काम करताना स्त्री कामगार म्हणून आलेले अनुभव व येणाऱ्या समस्या.

१५. बाल कामगार असल्यामुळे कोणते तोटे त्यांना सहन करावे लागतात?

१६. कारखान्यात काम करताना निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या अडचणींच्या प्रसंगी मालकवर्ग, कामगार संघटना, शासन यांच्याकडून कोणती भूमिका पार पाडली जाते?

१७. कंत्राटी कामगार म्हणून काम करताना येणाऱ्या अडचणी कोणत्या स्वरुपाच्या आहेत?

## ३. मुलाखत घेतलेल्या मान्यवरांची यादी

१. मा. सुनील मालुसुरे (कामगार नेते, औद्योगिक वसाहत नाशिक), दि. २ फेब्रुवारी २०१९.

२. डॉ. डी. एन. कराड (कामगार नेते, औद्योगिक वसाहत अंबड, नाशिक), दि. ५ फेब्रुवारी २०१९.

३. मा. डॉ. प्रा. शंकर बोऱ्हाडे (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ओझर नाशिक), दि. १० फेब्रुवारी २०१९.

४. श्री. निंबा वामन साळुंखे (आदिवासी सामाजिक कार्यकर्ते नाशिक), दि. १० ऑक्टोबर २०१७.

५. श्री. केवल देवचंद सागर (खंडोबा देवस्थानचे पुजारी व भक्त, नाशिक), दि. ३ मे २०१८.

६. श्री. रमेश कृष्णा वाघ (आदिवासी समाजाचे कार्यकर्ते, नाशिक), दि. १० मार्च २०१९.


७. श्री. वामन नथा पगार (आंबेडकरी चळवळीचे जेष्ठ कार्यकर्ते, नाशिक), दि. १३ मार्च २०१९.

८. श्री. विक्रम सखाराम साबळे (आदिवासी चळवळीचे कार्यकर्ते, डांग सौंदाणे, नाशिक), दि. २४ डिसेंबर २०१९.

९. डॉ. सुनील अमृतकर (विद्यावर्धिनी प्रतिष्ठानचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे, श्री. अमृतकर यांचे वास्तव मूळ गावी नाशिक या गावी आहे.), दि. २२ मार्च २०१९.

## परिशिष्टे दोन

### १. नाशिक जिल्हयाचा नकाशा



## २. नाशिक जिल्हयाचा औद्योगिक वसाहत नकाशा

### अ) अंबड औद्योगिक वसाहत, नाशिक



## ब) सातपूर औद्योगिक वसाहत, नाशिक

